# भारताची महासत्तेच्या दिशेने वाटचाल

## (India's Journey Towards Superpower)

संपादक

**डॉ. राजेश गंगाधरराव उंबरकर**

सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,

नेताजी सुभाषचंद्र बोस कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

नांदेड. (महाराष्ट्रराज्य)

**SIDDHI PUBLISHING HOUSE**

**Nanded.(MAH) 431601**

**ISBN No.: 978-81-962287-8-1**

**Editor**
**Dr. Rajesh Gangadharrao Umbarkar**
Dept. of Economics, Assistant Professor,
Netaji Subhashchandra Bose Arts, Commerce and Science College,
Nanded. 431 601(Maharashtra)
Email- umbarkar.rajesh@yahoo.com
Mob. No.- 9623979067

●

**Published By**
**SIDDHI PUBLISHING HOUSE, SHRINAGAR, NANDED – 431605** (Maharashtra)
Mob. No. 9623979067
Email :shrishprakashan2009@gmail.com

●

**Printers**
Anupam Printers,
Shrinagar, Nanded.
431605. Mob. No. 7620303116

●

**First Edition : 21 March 2024**

© **Author** All rights reserved.

●

**Type Setting & Cover Designing**
Mss. Pallavi L. Shete
Tejas R. Rampurkar

●

**Price** :Rs. 500/-

**Note:** The ideas/views expressed in this book belongs to the writers exclusively. The Editor, Pubisher & Printer have nothing to do it with them. At the same time it is made clear that if writers violate copyright act. they will be responsible for their own action. Hence it is clerfied from Editors, Publisher and Printers side.

# :: Advisory Board ::

**Dr. Sudir V. Shivnikar**
Principl, N. S. B. College, Nanded.
**Dr. Kalpna Kadam**
Vci Principl, N. S. B. College, Nanded.
**Mr. K. J. Kamble**
Head Dept. of Economics, Associate Professor
N. S. B. College, Nanded.
**Dr. Manish Deshpande**
Head Dept. of Physiscs
N. S. B. College, Nanded.
**Dr. Girish Pande**
Head Dept. of Chemistry, Dyes and Drugs
N. S. B. College, Nanded.

**Dr. Aand Ashturkar**
Dept. of Enviomental Science, Assistant Professor,
N. S. B. College, Nanded.
**Dr. Sandip Kale**
Dept. of Englesh, Assistant Professor,
N. S. B. College, Nanded.
**Dr. Sagar Sakle**
Dept. of Microbylogy, Assistant Professor,
N. S. B. College, Nanded.
**Dr. Bhalchandr Dharmapurika**
Dept. of Political Science, Assistant Professor,
N. S. B. College, Nanded.

# :: Editorial Board ::

**Dr. CA Varadraj Bapat**
Professor, IIT Mumbai.

**Mr. Milind Sudhakar Marathe**
Chairman, National Book Trust India.
Under Ministry of Education, GoI.

**Dr. Vikas Sukale**
Head Dept. of Economics, People's College Nanded.
Associate Dean of Faculties of Huminites SRTMU Nanded.

**Prof. Dr. Ashok Tiparse**
Member Senate and Grievance redressal committee,
Member of Management Council SRTMU Nanded.

**Prof. Dr. Namdeo Mundhe**
Head of the Dept. of Economics,
shri. Sant Gadge Maharaj Mahavidyalaya, Loha, Dist. Nanded.
Academic Council Member SRTMU (Nominated by Gov. of MS)

**Prof. Dr. D. D. Choudhari**
Head of the Dept. of Economics, Mahatma Phule Art's Colleghe
Ahmadpur.

**Prof. Dr. Ratnakar R. Kamble**
Head of the Dept. of Economics, Sharada Mahavidyalaya, Pardhani.

# :: शुभेच्छा संदेश ::

अधिकांश शिक्षण संस्था या राजकीय दृष्ट्या प्रेरित आणि एकल विचाराच्या असल्याने समाजात राष्ट्रभक्तीचा दिवा तेवत ठेवण्यासाठी, राष्ट्रीय विचारांचे महाविद्यालयातील तरुणांवर संस्कार होण्यासाठी एक महाविद्यालय असावे. या उद्देशाने प्रेरित होऊन संस्थेची व महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. याला समाजातून भरभरून प्रेम व मदत प्राप्त झाली. म्हणूनच आमच्या संकल्पनेला मूर्त स्वरूप आले.

संस्थेचे नावं काय असावे हा विचार करताना प्रखर राष्ट्रप्रेमी असलेले स्वा. सावरकरांनी स्थापन केलेली अभिनव भारत या क्रांतिकारी संघटनेचेच नावं संस्थेला दिले गेले जी आज "**अभिनव भारत शिक्षण संस्था, नांदेड**" या नावाने कार्यरत आहे. स्वा. सावरकरांच्या मते, रणाविना स्वातंत्र्य कोणा मिळाले या धारनेला साजेसे असे एक व्यक्तिमत्व डोळ्यासमोर आले ते म्हणजे नेताजी सुभाषचंद्र बोस होय. म्हणून **नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय** हे नाव महाविद्यालयास देण्यात आले.

महान क्रांतिकारक सरदार भगतसिंग यांच्या मातोश्री श्रीमती विद्यावतीदेवी यांच्या शुभ हस्ते भूमी पूजन करून महाविद्यालयाची पायाभरणी करण्यात आली. राष्ट्रप्रेम व राष्ट्रासाठी समर्पनाची भावना असलेला विद्यार्थी घडविणे हा हेतू लक्षात घेऊन आजतागयत संस्था कार्यरत आहे.

महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागातर्फे नाविन्यपूर्ण असा उपक्रम नेहमीच घेतला जातो. त्याचाच एक भाग म्हणून आज अर्थशास्त्र विभागातर्फे **"भारताची महासत्तेच्या दिशेने वाटचाल"** या विषयावर एकदिवसीय ऑनलाइन राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे. त्यांच्या या कार्यास माझ्या हार्दिक शुभेच्छा...!

**मा. बालासाहेब बापूराव पांडे**

**अध्यक्ष**

अभिनव भारत शिक्षण संस्था, नांदेड.

(महाराष्ट्रराज्य)

# :: मनोगत ::

स्वातंत्र्यवीर सावरकरांची अभिनव भारत ही संकल्पना डोळ्यासमोर ठेवून राष्ट्रप्रेमी व्यक्तींनी राष्ट्रीय विचाराने प्रेरित होऊन अभिनव भारत शिक्षण संस्थेची 1970 मध्ये स्थापना केली. या संस्थेने नेताजी सुभाषचंद्र बोस यांची शिस्त, कणखर बाणा, अभ्यासूवृत्ती डोळ्यासमोर ठेवून, त्यांच्या व्यक्तिमत्त्वा सारख्या विद्यार्थ्यांच्या पीढ्या निर्माण करण्याच्या हेतूने 1971 मध्ये नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयाची स्थापना केली. नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयाचे वैशिष्ट्य म्हणजे, या महाविद्यालयाची पायाभरणी शहीद भगतसिंग यांच्या मातोश्री विद्यावती देवी यांच्या शुभहस्ते झाली.

तेव्हा पासून आतापर्यंत महाविद्यालयाने दैदीप्यमान अशी प्रगती केली. महाविद्यालयात शैक्षणिक गुणवत्ते बरोबरच एक आदर्श असा विद्यार्थी घडविण्याचे कार्य अविरतपणे चालू आहे. महाविद्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन दरवर्षी केले जाते. त्याचाच एक भाग म्हणून महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाने दि. 21 मार्च 2024 रोजी "भारताची महासत्तेच्या दिशेने वाटचाल" या विषयावर एकदिवसीय आभासी पद्धतीने राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे. निश्चितच या चर्चासत्राद्वारे भारत महासत्तेच्या दिशेने वाटचाल करताना समाजात एक सकारात्मकता निर्माण होऊन आपला देश महासत्ता बनेल, त्या दृष्टीने टाकलेले हे एक पाऊल आहे. या एका नव्या व चालू विषयावर अर्थशास्त्र विभागाने चर्चासत्राचे आयोजन केल्याबद्दल मी या विभागाचे कौतुक करू इच्छितो आणि त्यांच्या या कार्यास हार्दिक शुभेच्छा....

**प्राचार्य डॉ. सुधीर शिवणीकर**
नेताजी सुभाषचंद्र बोस कला, वाणिज्य व
विज्ञान महाविद्यालय, नांदेड. (महाराष्ट्रराज्य)

# :: संपादकीय ::

प्रिय आदरणीय शिक्षक, प्राध्यापक, सहकारी मित्र, वाचक, अभ्यासक, संशोधक मित्रांनो !

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि अभिनव भारत शिक्षण संस्था, नांदेड द्वारा संचलित नेताजी सुभाषचंद्र बोस कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नांदेड, अर्थशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने दि. 21 मार्च 2024 रोजी "भारताची महासत्तेच्या दिशेने वाटचाल" या विषयावर झालेल्या एकदिवसीय ऑनलाइन राष्ट्रीय चर्चासत्राच्या निमित्ताने चर्चासत्रात सादर झालेल्या आणि संकलित केलेल्या शोधनिबंध संग्रहाचा हा सुबक आणि आखीवरेखीव असा संशोधनमूल्य आणि संदर्भमूल्य लाभलेला दर्जेदार संपादित ग्रंथ आपल्या हाती देताना मला किंबहुना आम्हाला मनापासून आनंद होत आहे. यासाठी आपण आम्हाला जे भरभरून सहकार्य केले त्याबद्दल पण मी आपला सर्व प्रथम आभारी आहे.

"भारताची महासत्तेच्या दिशेने वाटचाल" या विषयावर व्यापक अशी चर्चा घडवून आणावी आणि आपण सर्वांनी आपला देश महासत्ता कसा होईल यासाठी प्रयत्न करावे व त्या दृष्टीने एक पाऊल पुढे टाकावे. या यज्ञ कुंडात सर्वांचा खारीचा वाटा असावा. या हेतूने प्रेरित होऊन आम्ही हे चर्चासत्र आमचे मार्गदर्शक संस्थेचे अध्यक्ष मा. बालासाहेब पांडे यांच्या अध्यक्षतेखाली आणि संस्थेच्या सचिव अड. विनिता जोशी व महाविद्यालयाचे सन्माननीय प्राचार्य डॉ. सुधीर शिवणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केले होते.

डॉ. विकास सुकाळे, डॉ. वरदराज बापट, श्री मिलिंद मराठे, डॉ. अशोक टिपरसे, डॉ. नामदेव मुंढे, प्रो. डॉ. डी. डी. चौधरी व डॉ. रत्नाकर कांबळे यांनी मार्गदर्शन केले त्यांचा मी कायम ऋणी आहे.

भारत जागतिक महासत्ता होण्याच्या मार्गावर आहे हे अजूनही अनेकांना स्वप्नरंजन वाटते. मात्र भारतीय अर्थव्यवसंस्थेच्या दीर्घकालीन

भवितव्याबद्दल आंतरराष्ट्रीय नाणेनिधींचा जो अंदाज आहे तो या बाबतीत बरेच काही सांगून जातो.

2000 मध्ये भारताचे देशांतर्गत उत्पादन होते 0.5 लाख कोटी डॉलर्स म्हणजे जगाच्या एकूण उत्पन्नात आपला हिस्सा होता फक्त 1.5(दीड) टक्का.2011 मध्ये भारताचे एकूण उत्पन्न झाले 1.9 लाख कोटी डॉलर्स म्हणजे जगाच्या एकूण उत्पन्नाच्या 2.8 टक्के आणि आता ते 8 लाख कोटी डॉलर्सच्या जवळ जवळ जात आहे म्हणजे जगाच्या एकूण उत्पन्नाच्या 7 टक्के. यावरून आपणास लक्षात येईल.

भारत भविष्यात सर्वात मोठी आर्थिक महासत्ता म्हणून उदयाला येईल यावेळी जीडीपी चीनच्या तुलनेत 90 टक्के व अमेरिकेपेक्षा 30 टक्के जास्त असेल असे सेंटर फॉर इकॉनॉमिक्स अँड बिझनेस रिसर्चने आपल्या अहवालात म्हटले आहे.

तथापि आपल्या देशाकडे अनेक संधी आहेत जसे की तरुण आणि शिक्षित लोकसंख्या, समृद्ध इतिहास, वैविध्यपूर्ण संस्कृती, वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आणि डिजिटल परिवर्तनाचा स्वीकार या द्वारे भारत आपल्या आव्हानांवर मात करू शकला आणि संधीचा फायदा उठवू शकला व काही कडक निर्णय घेऊ शकला तर 2030 पर्यंत देश जागतिक महासत्ता बनण्यास सक्षम असेल. म्हणजेच महासत्ता बनण्यासाठी अजून बराच कालावधी आहे. पण त्या दिशेने पाऊल टाकल्या शिवाय स्वप्न कसे पूर्ण होईल. ज्यांना हे निव्वळ स्वप्न वाटत आहे त्यांना 370, तीन तलाख, सर्जिकल स्ट्राईक, राममंदिर हे स्वप्नच वाटत होतं, गरज आहे ती फक्त प्रबळ इच्छाशक्तीची यातूनच स्वप्नातील भारत उभा राहील. भविष्यात भारत जागतिक नेता बनेल यात शंका नाही.

म्हणूनच यादिशेने आपले एक पाऊल टाकण्यासाठी भारताची महासत्तेच्या दिशेने होणारी वाटचाल या विषयावर हा राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित केले आहे.

पायाभूत सुविधांमध्ये सरकारच्या सततच्या गुंतवणुकीमुळे भारत विज्ञान व तंत्रज्ञानात अग्रेसर बनत आहे. बाजाराचा मोठा आकार, परकीय गुंतवणुकीतील वाढ, उच्च भांडवल निर्मिती, उत्तम व्यापार धोरण, पायाभूत सुविधा, उच्च उत्पादकता आणि तंत्रज्ञानातील प्रगती ही काही कारणे आहेत त्यामुळे भारत महासत्तेच्या दिशेने वाटचाल करेल.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने (International Monetary Fund) सहा मार्च रोजी आपला नवा अंदाज प्रसिद्ध केला आहे. यामध्ये सांगण्यात आलंय की, भारत, चीन, अमेरिका आणि इंडोनेशिया हे चार देश जागतिक अर्थव्यवस्थेच्या विकासामध्ये पुढील पाच वर्षात महत्त्वाचं योगदान देत राहतील.

या रिपोर्टमध्ये भारत महत्वाच्या भूमिकेत असल्याचं सांगण्यात आलं आहे. जागतिक अर्थव्यवस्थेच्या वाढीतील ५० टक्क्यांपेक्षा जास्त योगदान या चार देशांचे असेल. विशेष म्हणजे आयएमएफने २०२३ मध्ये देखील अशाच प्रकारचा अंदाज व्यक्त केला होता. (Three Other Countries To Contribute More Than Half of Global Economic Growth in Next Five Years)

भारत ही जगातील सर्वाधिक गतीने वाढणारी अर्थव्यवस्था आहे. भारताचा आर्थिक विकास दर हा सात ते आठ टक्क्यांच्या दरम्यान राहिलेला आहे. जगातील अनेक देशांवर आर्थिक संकट आलेले आहे. शिवाय, अनेक देशांचा आर्थिक विकास संथ गतीने होत आहे. अशा स्थितीत भारतीय अर्थव्यवस्था चांगली कामगिरी करत आहे. आयएमएफच्या रिपोर्टने एकप्रकारे यावर शिक्कामोर्तब केले आहे.

भारत हा विकसनशील देशांमध्ये मोडतो. अशा स्थितीत भारताला एक विकसित राष्ट्र म्हणून उदयाला येण्यासाठी आणखी काही वर्ष जावी लागणार आहेत. असे असले तरी भारतीय अर्थव्यवस्था ही सर्वाधिक गतीने वाढत आहे. सध्या भारताची अर्थव्यवस्था ही पाचव्या क्रमांकाची सर्वात मोठी अर्थव्यवस्था

आहे. केंद्र सरकारने भारताला तिसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी अर्थव्यवस्था करण्याचे स्वप्न पाहिले आहे.

**मूडीजची रेटिंग :-**

जागतिक रेटिंग एजन्सी मूडीजने भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीचा अंदाज काही दिवसापूर्वी व्यक्त केला होता. मूडीजने यापूर्वी ६.१ अर्थव्यवस्था वाढीचा वेग दर्शवला होता. तो वाढवून आता ६.८ टक्के करण्यात आला आहे.

मागील वर्षाच्या शेवटच्या महिन्यात देशाच्या अर्थव्यवस्थेने वेग घेतला आहे. या कालावधीत जीडीपी वाढीचा दर ८.४ टक्के राहिला. जागतिक सर्वेक्षणात अर्थव्यवस्था वाढीचा वेग ६.६ टक्के असेल असा अंदाज व्यक्त करण्यात आला कारण ऑक्टोबर-डिसेंबर तिमाहीत भारताच्या अर्थव्यवस्थेने वेग घेतला.

या कालावधीत जीडीपी 8.4 टक्क्यांनी वाढला आहे. दीड वर्षात GDPची सर्वात वेगवान वाढ झाली आहे आणि रॉयटर्सने सर्वेक्षण केलेल्या अर्थशास्त्रज्ञांच्या 6.6% अंदाजापेक्षा खूप पुढे आहे. (Moody's raises India's 2024 GDP growth estimate to 6.8 percent)

GVA 6.5 टक्क्यांनी वाढला. GVA हे अर्थव्यवस्थेत उत्पादित वस्तू आणि सेवांच्या एकूण मूल्याचे मोजमाप आहे आणि त्यात अप्रत्यक्ष कर आणि अनुदाने समाविष्ट नाहीत. ऑक्टोबर-डिसेंबर तिमाहीत GVA आणि GDP मधील तफावत मुख्यतः त्या तिमाहीत सबसिडीमध्ये तीव्र घट झाल्यामुळे होते.

**भारताच्या अर्थव्यवस्थेची कामगिरी चांगली':-**

भारताच्या अर्थव्यवस्थेने 2023 मध्ये चांगली कामगिरी केली आहे. 2023 मध्ये अपेक्षेपेक्षा आम्हाला 2024 च्या वाढीचा अंदाज 6.1 टक्क्यांवरून 6.8 टक्क्यांपर्यंत वाढवण्यास प्रवृत्त केले आहे. आधीच अपेक्षेप्रमाणे, G-20 अर्थव्यवस्थांमध्ये भारत सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था राहील. मूडीजने 2024 च्या ग्लोबल मॅक्रो इकॉनॉमिक आउटलुकमध्ये म्हटले आहे.

या वर्षीच्या अंतरिम अर्थसंकल्पात 2024-25 मध्ये 11.1 लाख कोटी रुपयांच्या भांडवली खर्चाचे वाटप किंवा GDP च्या 3.4 टक्के उद्दिष्ट ठेवले आहे, जे 2023-24 च्या अंदाजापेक्षा 16.9 टक्के जास्त आहे. "लोकसभा निवडणुकांनंतर धोरणातील सातत्य आणि पायाभूत सुविधांच्या विकासावर सतत लक्ष केंद्रित करण्याची आम्हाला अपेक्षा आहे," असे मूडीजने म्हटले आहे.

**खाजगी औद्योगिक भांडवली खर्च वाढण्याची अपेक्षा आहे:-**

एजन्सीने म्हटले आहे की, खाजगी औद्योगिक भांडवली खर्चातील वाढ मंदावली असली तरी, सध्या सुरू असलेल्या पुरवठा साखळीतील प्रमुख उत्पादन उद्योगांना चालना देण्यासाठी सरकारच्या उत्पादनाशी संबंधित प्रोत्साहन योजनेला गुंतवणूकदारांच्या प्रतिसादामुळे वेग वाढण्याची अपेक्षा आहे.

भारत, इंडोनेशिया, मेक्सिको, दक्षिण आफ्रिका, UK आणि US यासह अनेक G-20 देशांसाठी 2024 हे वर्ष निवडणुकीचे वर्ष आहे. अहवालात म्हटले आहे की, आजच्या अशांत जगात, निवडणुकांचे परिणाम सीमेपलीकडे आहेत. तसेच ते आर्थिक आणि सार्वजनिक धोरणाच्या पलीकडे जाऊ शकतात.

भारत ही जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे आणि जागतिक बँकेपासून ते IMF पर्यंत सर्वांनी तिचे कौतुक केले आहे. सांख्यिकी मंत्रालयाने 29 फेब्रुवारी रोजी जारी केलेल्या आकडेवारीनुसार डिसेंबर तिमाहीत भारताचे सकल देशांतर्गत उत्पादन (GDP) वेगाने वाढले आहे. एवढा सर्व विचात लक्षात घेतल्यास नक्कीच स्वप्नातील भारत साकार होईल.

या चर्चासत्रात भारतातील केवळ महाराष्ट्रच नव्हेतर पंजाब, हरियाणा, आसाम, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, राज्यस्थान, पश्चिम बंगाल अशा विविध राज्यातून रिसर्च पेपर आले आहेत. त्या सर्व संशोधक प्राध्यापक व संशोधक विध्यार्थी यांचे मी अभिनंदन करतो व असेच सहकार्य भविष्यात राहील अशी अपेक्षा करतो.

या राष्ट्रीय चर्चा सत्रात मला मार्गदर्शन करणारे उपप्राचार्य डॉ. कल्पना कदम, प्रा. के. जे. कांबळे, डॉ. शशिकांत दरगु, प्रो. डॉ एम. वाय. कुलकर्णी, डॉ. मनीष देशपांडे, डॉ. गिरीष पांडे, माझे मित्र डॉ. भालचंद्र धर्मापुरीकर, डॉ. आनंद अष्टुरकर, डॉ. संदीप काळे, डॉ. सागर साकळे, श्री. बासरकर, श्री. करडखेडकर, श्री. बनसोडे, तथा योग्य दिशा देणारे प्रा. किंगावकर मॅडम आणि सहकारी प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा मी खूप खूप आभारी आहे.

धन्यवाद!



**संपादक**

**डॉ. राजेश गंगाधरराव उंबरकर**

सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,

नेताजी सुभाषचंद्र बोस कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नांदेड. (महाराष्ट्रराज्य)

मो. ९६२३९७९०६७

# अनुक्रमनिका


| अ. क्र. | प्रकरणाचे नावं | लेखक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 01. | **इस्रायली शेतीपद्धतीचा भारतीय कृषी क्षेत्रावरील परिणामांचा चिकित्सक अभ्यास** | **प्रा. शामराव भगवान वायसे<br>उमेश बळवंत कोठावदे** | 18 |
| 02. | **अंदाजपत्रकातील बदल** | **प्रा. दिपमाला बबनराव वाघमारे** | 30 |
| 03. | **कर प्रणालीत झालेला बदल** | **प्रा. गणपत सुभाष शेळके** | 44 |
| 04. | **भारताची महासत्तेच्या दिशेने वाटचाल आणि सामाजिक समस्या व आव्हाने** | **संजीवनी श्रीकांत जाधव** | 61 |
| 05. | ‘भारताच्या महासत्तेकडील वाटचालीत जागतिकीकरण व भांडवलवाद यांचा जनसामान्यावर होणारा प्रभाव’ | प्रा. डॉ. राजू लक्ष्मण आदे | 71 |
| 06. | मोदीकालीन परराष्ट्रीय धोरणाची परिपक्वता : एक चिकित्सक अध्ययन | डॉ. सुभाष दौलतराव उपाते | 79 |
| 07. | **विविध योजना (स्टार्टअप इंडिया, डिजिटल इंडिया, मेक इन इंडिया)** | **डॉ. मारुती भिवा चौगले** | 87 |
| 08. | भारतीय विविध योजनांचा आढावा | प्रा. डॉ. कांबळे नागनाथ विठ्ठलराव | 99 |
| 09. | **भारताचे बदलते परराष्ट्र धोरण** | **संभाजी अंकुश तांबे** | 105 |

| | | | |
|---|---|---|---|
| 10. | डिजिटल इंडिया : उद्दिष्टे, फायदे आणि आव्हाने | डॉ. सिद्धार्थ हरिदास मेश्राम | 111 |
| 11. | सक्षम भारतासाठी महिला सक्षमीकरण काळाची गरज!! | प्रा. डॉ. सुदाम राठोड | 122 |
| 12. | भारताचे महासत्तेकडील वाटचालीचे एक पाऊल : महिला उद्योजकता | डॉ. सुजाता शिवाजी गडाख | 129 |
| 13. | छोटे उद्योगधंदे सुंदर आणि शक्य-एक व्यावसायिक दृष्टीकोन | प्रा. डॉ. रवींद्र बापूराव शेंडे | 135 |
| 14. | भारताची महासत्तेकडील वाटचाल व जागतिक संघटनेतील सहभाग व महत्त्व | श्री आडे गजानन धर्मा | 144 |
| 15. | मेक इन इंडिया - एक अभ्यास | डॉ. मयुरी राजेश्वर फुके | 151 |
| 16. | शिक्षण क्षेत्रातील बदल नवीन शैक्षणिक धोरण 2020 | श्री. खरबे नारायण तुकाराम | 162 |
| 17. | भारताचे नवीन शैक्षणिक धोरण, २०२० आणि मध्यम वर्गीय मानसिकता | प्रा. डॉ. सुर्यकांत लक्ष्मणराव शेळके | 168 |
| 18. | शाश्वत विकास व सर्वसमावेशक वृद्धी | डॉ. (सौ.) मंजूषा राजेंद्र ठाकरे | 174 |
| 19. | सामाजिक बाजारमंच (Social Stock Exchange) | डॉ. उदय खंडू टेके | 183 |

| | | | |
|---|---|---|---|
| 20. | **भारताची स्वदेशी शस्त्रनिर्मिती आणि लष्करी व आर्थिक सामर्थ्यांतील भरारी** | **डॉ. सोनवणे जी. एन.** | 194 |
| 21. | भारतातील वाहतूक सूविधा : प्रगती आणि विकास | डॉ.सरिता उदापुरकर | 203 |
| 22. | कामकाजी महिलाएं एवं भूमिका संघर्ष | डॉ. तृप्ती पंचोली | 215 |
| 23. | **भारत G20** "वसुधैव कुटुंम्बकम्" | **सौ. भारती बेदील माने** | 225 |
| 24. | योग आणि भारत | **Dr. Naresh P. Borkar** | 229 |
| 25. | **राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये मातृभाषेचे स्थान** | **डॉ. पदमाकर डिगांबर वानखडे** | 237 |
| 26. | **नवीन शैक्षणिक धोरण-2020** | **प्रा. डॉ. टी. एम. गुरुनुले** | 244 |
| 27. | **भारताची महासत्तेच्या दिशेने वाटचाल आणि सामाजिक समस्या व आव्हाने** | **प्रा. डॉ. गुरुनाथ मावंजी घुटे** | 251 |
| 28. | **पर्यावरण में परिवर्तन** | **डॉ. गूंजा पंवार** | 259 |
| 29. | **जागतिक पर्यावरण विषयक समस्या एक अभ्यास** | **चिमाजी पांडुरंग हारके प्रा. डॉ. विनायक शिंदे** | 265 |
| 30. | **आर्थिक आणि सामाजिक विकास संदर्भात गौतम बुद्धांच्या आर्थिक विचारांचा आढावा** | **डॉ. सुभाष तातेराव पंडित** | 276 |

| | | | |
|---|---|---|---|
| 31. | भारतीय बँकांच्या अनुत्पादक मालमत्तेचा संकल्पनात्मक अभ्यास | प्रा. संतोष प्रभाकर जाधव<br>डॉ. पाकधाने स्मिता नामदेवराव | 282 |
| 32. | भारतीय विदेश नीति : 'नेहरू युग' | प्रा. डॉ. अतुल नारायण खोटे | 291 |
| 33. | महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना: एक चिकित्सक अभ्यास | प्रा. डॉ. अनिल दिगंबर वाडकर | 297 |
| 34. | दुष्काळ मुक्त महाराष्ट्रासाठी पाणी फाउंडेशन एक लोक चळवळ | प्रा. डॉ. अविनाश गेडाम<br>संदिप बबन वाघ | 316 |
| 35. | महाराष्ट्रातील कृषी क्षेत्रातील समस्या व आव्हाने | प्रा. डॉ. रंजिता डी. जाधव | 330 |
| 36. | "पुणे जिल्ह्यांचे औद्योगिक आणि कृषी विषमता: 2010-11 ते 2019-20" | निखिल तांबे<br>रचना कोळपे<br>नितेश राठोड | 346 |
| 37. | भारताला भारतरत्न 'कर्पुरी ठाकूर' यांची आणि 'कर्पुरी फॉर्मुला' ची प्रांसगिकता किंवा गरज | विनोद सखाराम बोरकर | 363 |
| 38. | लोकशाही, समाज आणि नवं युवा मतदार : महाराष्ट्राचे बदलते राजकरण | प्रा. स्वप्निल भारत रणखांबे | 373 |

| | | | |
|---|---|---|---|
| 39. | बँकिंग क्षेत्रातील रोकडविरहीत व्यवहार: फायदे, आव्हाने व उपाययोजना | डॉ. महादेव आसाराम रिठे | 384 |
| 40. | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जातीनिर्मुलन विषयक विचार | प्रिती ताराचंद निकाळजे<br>डॉ. आर. एन. आलटे | 394 |

# इस्रायली शेतीपद्धतीचा भारतीय कृषी क्षेत्रावरील परिणामांचा चिकित्सक अभ्यास

**प्रा. शामराव भगवान वायसे**
नं. ता. वि. समितीचे, गजमल तुळशीराम पाटील महाविद्यालय, नंदुरबार
**उमेश बळवंत कोठावदे**
नं. ता. वि. समितीचे, गजमल तुळशीराम पाटील महाविद्यालय, नंदुरबार

---

**प्रास्ताविक** :

इस्रायल या देशात खूप मोठया प्रमाणात वाळवंट असूनदेखील देशाने नावीन्यपूर्ण शेती आणि प्रगतिशील शेती तंत्रज्ञानाचा अवलंब केल्याने जागतिक पातळीवर कृषी क्षेत्रात आघाडीवर आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञान, संशोधन आणि व्यावसायिक तसेच व्यावहारिक अनुभवाच्या संयोजनातून इस्रायलने नापीक भूभागाचे सुपीक जमिनीमध्ये रूपांतरण केलेले आहे. इस्रायलने शेती क्षेत्रातील विशेषतः फळ उत्पादनात घन पद्धतीचा अवलंब केला आहे. देशाने पिकांचे उच्च उत्पादन घेऊन तेथील लोकांसाठी शाश्वत अन्नपूरवठा केलेला आहे. ऐतिहासिक दृष्टिकोनातून विचार जर केला तर भारताच्या फाळणीच्या काळातच इस्रायलचा जन्म झाला. १९९० च्या दशकापासून, म्हणजेच मागील तीन दशकांपासून, भारत आणि इस्राईल देशामध्ये व्यापक आणि मजबूत स्वरूपाचे द्विपक्षीय संबंध असून अनेक समान आव्हानांना तोंड देत दोन्ही देशात लष्करी, आर्थिक, व्यापारी, सामाजिक आणि राजकिय संबंध प्रस्थापित

झाले आहेत. भारताचाही भौगोलिक रचनेचा अभ्यास केला असता राजस्थान राज्य हे वाळवंटी प्रदेशासाठी ओळखले जाते. त्यादृष्टीने राजस्थानात आणि गुजरात मधील कच्छच्या प्रदेशात इस्रायली शेतीचे तंत्रज्ञान वापरुन शेती व्यवसायातील समस्या सोडवणे शक्य आहे. भारतातून इस्रायलच्या शेती क्षेत्रातील तंत्रज्ञानाचा फायदा करून घेण्यासाठी भारतातून मोठ्या प्रमाणात अभ्यास दौरे केले जात आहेत व त्याचा प्रगत बागायती शेतकऱ्यांना मोठा फायदा होत आहे. या पार्श्वभूमीवर, प्रस्तुत शोधनिबंध भारताच्या विकास योजनांचे आणि शेती क्षेत्रातील आर्थिक, सामाजिक विकास प्रयत्नांचे मूल्यमापन करून भविष्यकालीन धोरणांची रचना व दिशा स्पष्ट करतो.

इस्रायल राष्ट्राचा जीडीपी ५६४.१५ अब्ज डॉलर असून राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ दरवर्षी ३% होत असून राष्ट्राचा मानव निर्देशांक ०.९१९ असा सर्वोच्च आहे. इस्रायल राष्ट्राचे प्रतीव्यक्ती दरडोई उत्पन्न ५८२७३ डॉलर असून एकूण राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा २.४% हिस्सा आहे. तर एकूण लोकसंख्येपैकी शेती क्षेत्रात फक्त १.१% लोक कार्यरत आहेत. तर भारत ही जगातील पाचवी अर्थव्यवस्था असून एकूण राष्ट्रीय उत्पादन ४.११३ ट्रिलियन डॉलर आहे. भारताचा मानव विकास निर्देशांक ०.६३३ असून प्रतिडोई उत्पन्न २८४५ डॉलर आहे. भारतात एकूण राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा हिस्सा १८.४% असून एकूण लोकसंख्येपैकी ४२.६०% लोकसंख्या शेतीक्षेत्रात कार्यरत आहे. एकूण निर्यातीत शेती क्षेत्राचा हिस्सा १४.१% आहे. भारतात अन्न धान्य उत्पादन ३१५.७ दशलक्ष टनापर्यंत पोहोचले असून अन्न धान्याच्या बाबतीत देश स्वयंपूर्ण झाला आहे. भारतात राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर ६.६% असून कृषी विकासाचा दर ३% आहे. इस्रायल शेतीपद्धतीचा अवलंब करून कृषी विकासाचा दर वाढून राष्ट्र विकासात हातभार लावता येईल.

**बीजशब्द :** शेती, सहकार, तंत्रज्ञान, हरितगृह, शाश्वत, घन, विकास

**उद्देश :**

1. भारत आणि इस्रायल या दोन्ही देशातील संबंधांचे अध्ययन करणे.
2. इस्रायली शेतीच्या तंत्रज्ञानाची भारताच्या दृष्टीने उपयुक्तता पडताळून पाहणे.
3. भारतीय शेतीतील समस्यांचे अध्ययन करून त्यावर उपाययोजना सुचवणे.

**गृहितके :**

1. इस्रायली तंत्रज्ञान भारत देशातील शेतीत वापरल्याने शेतीतील उत्पादन आणि उत्पन्न वाढवणे शक्य आहे.
2. अत्याधुनिक तंत्राचा वापर केल्याने मर्यादित उपलब्ध साधनांचा सक्षम वापर कसा करावा हे समजते.
3. भारतीय शेतकऱ्याचा शेतीकडे बघण्याचा दृष्टिकोन जीवन जगण्याचा मार्ग असा न राहता व्यावसायिक होत आहे.

**संशोधन पद्धती :** इस्रायल देशातील शेती क्षेत्रातील सैद्धांतिक पार्श्वभूमी स्पष्ट करण्यासाठी प्रामुख्याने दुय्यम व प्राथमिक स्रोत यांचा वापर केलेला आहे. यामध्ये विविध संदर्भ ग्रंथ, अहवाल, मासिके, वेबसाइट, यांचा आधार घेतला असून इस्रायल शेतीचा अभ्यास दौरा करणाऱ्या शेतकऱ्यांची प्रत्यक्ष चर्चा केली असून त्यांच्या शेताची पाहणी केली आहे.

**सिंचन प्रणाली :** इस्रायली शेतीतील यशाचा एक महत्वाचा घटक म्हणजे प्रगत सिंचन प्रणाली. या देशाने अत्याधुनिक ठिबक सिंचन तंत्रज्ञान विकसित केलेले आहे. जे पाण्याचे संरक्षण करते आणि पिकांना योग्य प्रमाणात पाणी तसेच पोषक द्रव्ये मिळतील याची खात्री करते. हे तंत्र पर्यावरणपूरक देखील आहे; कारण ते पाण्याचा होणारा अपव्यय

लक्षणीयरित्या कमी करते आणि शेतकऱ्यांना त्यांच्या संसाधनांचा अनुकूल वापर करण्यास मदत करते. भारतात शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी वेगवेगळे स्रोत उपयोगात आणले जातात. यामध्ये विहिरी, कुपनलिका, तलाव, खाजगी, व सरकारी कालवे, शेततळी इत्यादींचा समावेश होतो. आर्थिक नियोजनाच्या प्रारंभी भारतात निरनिराळ्या साधनांद्वारे सिंचनाखाली आलेले क्षेत्र केवळ २०९ लाख हेक्टर होते. ते २००५-२००६ पर्यंत ६०२ लाख हेक्टर्स पर्यंत वाढले. परिणामत: एकूण लागवड – क्षेत्राशी एकूण सिंचन क्षेत्राचे प्रमाण १७.५% वरुन ४४% पर्यंत वाढले आहे. तर सध्या भारतात एकूण सिंचनाखालील क्षेत्र ६४.७ दशलक्ष हेक्टर आहे. भारतात १९५१ मध्ये एकूण शेती क्षेत्रापैकी सिंचनाखालील क्षेत्र फक्त १७% होते. त्यात वाढ होऊन आज जवळपासस ४९% क्षेत्र सिंचनाखाली आलेले आहे. म्हणजेच एकूण क्षेत्रफळाच्या ५१% शेती ही मान्सूनवर आधारित आहे म्हणून भारतातील शेतीला मान्सूनचा जुगार असे म्हटले जाते. निसर्गाच्या लहरीपणावर कृषी उत्पादकता अवलंबून आहे यात इस्रायली शेती पद्धतीचा अवलंब करून सुधारणा शक्य आहे.

**शाश्वत शेती :** इस्रायली शेतकरी शाश्वत शेती पद्धतीसाठी वचनबद्ध असून ते पिकांच्या संरक्षणासाठी कंपोस्ट खत आणि हिरवळीचे खत यासारख्या नैसर्गिक खतांचा वापर करतात. शक्य तेव्हढे किटकनाशके आणि रासायनिक खतांचा वापर टाळतात. पर्यावरणीय संरक्षण करणारे आणि हानिकारक किटकनाशके व पदार्थांपासून मुक्त असलेली आरोग्यदायी, अधिक पौष्टिक पिके तयार करतात. भारतासारख्या विकसनशील देशात नियोजन काळात वाढत्या अन्नधान्याची गरज व इतर गरजा भागवण्यासाठी निरनिराळ्या पिकांची उत्पादकता वाढवण्यासाठी प्रयत्न केले गेले या प्रयत्नातूनच १९६०-६५ या काळात भारतात हरितक्रांती घडुन आली. हि हरितक्रांती म्हणजे भारतातील

शाश्वत शेतीचे यशस्वी स्वरूप आहे. सुधारित बियाणे, सिंचन, रासायनिक खते, पीक संरक्षणाचे उपाय, आधुनिक अवजारांचा उपयोग हि हरीतक्रांतीची साधने होती. पिकांचा फेरपालट, सैंद्रिय द्रव्यांचा वापर, वनस्पतींना पोषकद्रव्ये, जैवविविधतेत वाढ, अनुत्पादक इंधनांचा किमान वापर, अत्याधुनिक सिंचन व जलव्यवस्थापन हे शाश्वत शेतीचे घटक आहेत. भारतात शेती क्षेत्रातील आदाने पुरवण्यासाठी जैन एरिगेशन, बायर क्रॉप सायन्स, अॅस्टरल लिमिटेड, फिनॉलेक्स इंडिया, प्रिन्स पाइप, किर्ती इंडिया, या कंपन्यांबरोबरच ग्रामीण भागातील कारागीर, लघु व मध्यम कृषी आदाने उत्पादन संस्था या महत्वपूर्ण जबाबदारी पार पाडत आहेत.

**अत्याधुनिक हरितगृहे :** इस्रायल देश हा त्याच्या उच्च तंत्रज्ञानाच्या हरितगृहांसाठी ओळखला जातो. असे तंत्रज्ञान जे वर्षभर शेतकऱ्यांना पिके देऊ शकतात. हि हरितगृहे तापमान, हवेची आर्द्रता आणि प्रकाशपातळीचे निरीक्षण करणाऱ्या संगणकीकृत प्रणालीसह नविनतम तंत्रज्ञानाने सुसज्ज आहेत. ते रोपांची वाढ आणि उत्पन्न वृद्धीसाठी रचनाबद्ध केलेले आहे. हरितगृहे कठोर हवामान, कीटक आणि रोगांपासून देखील संरक्षण करतात. हरितगृहे शेतकऱ्यांना सातत्यपूर्ण गुणवत्ता आणि प्रमाणित पिके घेण्यास सक्षम करतात. भारतातील हवामान हे कडधान्य पिकांच्या उत्पादनासाठी पोषक आणि पूरक असून फळे, फुले आणि भाजीपाला यांचे उत्पादन हे नैसर्गिक हवामानावर खूप मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. त्यामुळे या पिकांचे उत्पादनवाढीच्या दृष्टीने यशस्वीपणे नियोजन करण्यासाठी भारतात हरीतक्रांतीसारख्या नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करणे आवश्यक ठरते. हरित गृहामधील लागवडीचे फायदे तसेच मुक्त अर्थव्यवस्थेमधील त्याचे महत्वाचे स्थान या गोष्टीचा विचार करून केंद्र आणि राज्य शासन हरितगृह उभारणीसाठी सढळ हाताने आर्थिक मदत करीत आहे. यासाठी केंद्र व राज्य सरकारने वेगवेगळ्या योजना आखल्या

आहेत. त्या पुढीलप्रमाणे- केंद्र पुरस्कृत पुष्पोत्पादन विकास योजना, शीतगृह अनुदान योजना, राष्ट्रीय फलोत्पादन अभियान, केंद्र पुरस्कृत फुलशेती संवर्धन आणि मूल्यवृद्धी योजना. या योजनांचा फायदा घेऊन महाराष्ट्रातील अनेक गावांची फळ उत्पादन गावांची ओळख निर्माण झाली आहे. जसे महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यातील कडबनवाडी गावाने हरितगृह व शेडनेटचा कार्यक्षमपणे व्यावसायिक वापर करून रंगीत मिरचीच्या बाबतीत आपली ओळख निर्माण केली आहे. तसेच इस्रायल शेतीच्या कृषी प्रक्रिया उद्योगाचा परिणाम म्हणून नाशिक जिल्ह्याची वायनरी हब म्हणून प्रसिद्धी असून सुला वाईन ने जागतिक पातळीवर व वाईन उद्योगात वर्चस्व निर्माण केले आहे.

भारतात कृषी विकासासाठी हरितगृह व शेडनेट योजनेच्या माध्यमातून शाश्वत शेतीचे प्रयोग राबवले जात आहेत यासाठी वेगवेगळ्या राज्यात अनुदाने दिली जातात यामध्ये गुजरात ६५%, मध्य प्रदेश ५०%, महाराष्ट्र ५०%, उत्तर प्रदेश ५०%, राजस्थान ५०%, गोवा ४०% अनुदान देत आहेत. तसेच शेतकऱ्यांना कृषी कर्जमाफी योजनांची प्रभावी अंमलबजावणी केली जात असून शेती क्षेत्रातील धोका व अनिश्चितता कमी करण्यासाठी कृषी विमा काढत आहेत.

**संशोधन आणि विकास :** इस्रायलच्या शेतीतील यशाचे श्रेय त्यांच्या संशोधन आणि विकासाच्या प्रक्रियेतील भांडवली गुंतवणुकीला जाते. या देशातील आघाडीची विद्यापीठे आणि विविध संशोधन संस्था पीक प्रजनन, आनुवंशिकी संवर्धन तसेच वनस्पती शरीरविज्ञान मध्ये अत्याधुनिक संशोधन करतात. ज्यामुळे नवीन पिकांचा आणि वाणांचा विकास होतो. या व्यतिरिक्त शेती क्षेत्रातील नाविन्यपूर्ण आणि तंत्रज्ञानातील प्रगतीला प्रोत्साहन देण्यासाठी तेथील सरकार आर्थिक सहाय्य आणि अनुदाने देते. भारत हा शेतीप्रधान देश असून ६.२० लाख

खेड्यातील शेतकऱ्यांना शेती क्षेत्रात मुळ वाणांचे संगोपन करून संशोधन आणि विकासाच्या अनेक संधी आहेत. या संधींचा लाभ उठविण्याच्या हेतूने भारतात अनेक ठिकाणी कृषी विद्यापीठे आणि प्रयोगशाळा स्थापन करण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे शिक्षण क्षेत्रात विद्यार्थ्यांसाठी सवलतीच्या दरात कृषी शिक्षण अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आले आहे. संशोधक विद्यार्थी वर्गाला विविध शिष्यवृत्ती केंद्र आणि राज्य सरकारतर्फे पुरवल्या जातात.

**शेतकरी ते ग्राहक व्यापार :** इस्रायलच्या प्रगतिशील शेती तंत्रज्ञानानेही 'फार्म टू टेबल' चळवळीला चालना दिलेली आहे. उच्च गुणवत्तेचे स्थानिक पातळीवर पिकवलेल्या उत्पादनांचे उत्पादन करून, इस्रायली शेतकरी ताजी फळे आणि भाजीपाला स्थानिक रेस्टॉरंट्स आणि बाजारपेठांमध्ये पुरवण्यास सक्षम आहेत; ज्यामुळे लांब पल्ल्याच्या वाहतुकीची गरज कमी होते. तसेच पिकांची चव आणि पौष्टिक मूल्य जतन केले जाते. भारतातही शेतमाल विक्रीसाठी शहरी आणि ग्रामीण भागात बाजारसमित्यांची स्थापना करण्यात आलेली आहे. तसेच प्रमुख पिके आणि अन्नधान्याला केंद्र सरकार हमीभाव ठरवून देत असून किमत निर्देशांकानुसार हमीभावात वाढ करत असून नाफेड मार्फत खरेदी करत आहे.

**सहकार्य आणि सहयोग :** इस्रायलच्या शेतीतील यशाचा आणखी महत्वाचा घटक म्हणजे शेतकरी नवीन तंत्रे आणि तंत्रज्ञानाचा अधिक विकास करण्यासाठी सक्षम आहेत. कारण, शेतकरी, संशोधक आणि सरकारी संस्था यांच्यातील परस्पर सहकार्य आणि समन्वयाची भावना येथे महत्वाची ठरतात. भागीदारी आणि महत्वाच्या माहितीच्या देवाणघेवाणीच्या माध्यमाद्वारे शेतकरी वेगवेगळ्या शेतीतील आव्हानांना तोंड देण्यासाठी वेगवेगळया उपाययोजना विकसित करत आहेत. भारत देशानेही शेती क्षेत्राचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी इस्रायल

देशासोबत सहकार्य आणि सहयोग करार केलेला आहे. इस्रायल देशाच्या मदतीने भारताने जलसिंचन क्षेत्रात सुधारणा घडवून आणल्या आहेत.

**ज्ञान आणि कौशल्य :** प्रगतिशील शेतकरी आणि अत्याधुनिक शेतीतील तंत्रज्ञान कौशल्यामुळे इस्रायल देशाला त्याचे ज्ञान आणि कौशल्य जगातील इतर देशांमध्ये निर्यात करण्याची परवानगी मिळाली आहे. परिणामी..................विकसनशील देशांसोबत भागीदारीद्वारे, इस्रायलने जल संधारण, पीक लागवड आणि शाश्वत शेतीसाठी आपले तंत्रज्ञान सामायिक केलेले आहे, ज्यामुळे जगाच्या इतर भागात अन्नसुरक्षा आणि आर्थिक विकास सुधारण्यास मदत झाली आहे. भारतही इस्रायलच्या मदतीने पारंपरिक आणि आधुनिक शेतीचा समन्वयातून पीक लागवड व उत्पादन, भूमी धारणाक्षेत्रात विपुल वाढ घडवून आणण्यात यशस्वी झालेला आहे.

**सेंद्रिय शेती :** सेंद्रिय शेती जगभरात लोकप्रिय होत आहे. शेतीमध्ये ग्राहक वर्गाला सेंद्रिय शेतीचे महत्व समजले आहे. सेंद्रिय शेतीमध्ये इस्रायल अग्रेसर आहे. अनेक शेतकरी सेंद्रिय शेती पद्धतीचा शेती उत्पादनासाठी अवलंब करतात. जसे कि पीक रोटेशन, नैसर्गिक कीड नियंत्रण आणि मातीचे आरोग्य सुधारण्यासाठी सेंद्रिय मल्चिंगचा वापर इ. इस्रायली सेंद्रिय उत्पादने अनेक देशात निर्यात केले जातात आणि आता ग्राहक वर्गात जागृती होत असल्याने आरोग्याबाबत पोषक अशा सेंद्रिय अन्नाची मागणी करणारी ग्राहक संख्या वाढत असल्याचे दिसते. भारतात सेंद्रिय शेतीला चालना देण्यासाठी जैविक खतांचा, जीवामृत वापरावर भर दिला जात आहे. शेतकरी पाणी-माती परीक्षण करून सेंद्रिय शेतीकडे वळत आहेत. परिणामी अशा शेतकऱ्यांना कृषी मालाची जास्तीची किंमत मिळत आहे. भारतातील अन्नधान्याचा तुटवडा आणि वाढती लोकसंख्या यामुळे सरकारने १९६५ नंतर शेती विकासाचे धोरण अवलंबले. या धोरणानुसार

काही विशिष्ट पिकांच्या उत्पादकतेत वाढ घडवून आणण्यासाठी, बहुपीक पद्धतीचा अवलंब करताना सेंद्रिय शेतीला मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन देण्यात आलेले आहे.

**आधुनिक शेती :** अचूक शेती ही एक शेतीचे तंत्र आहे. जे पिकांची वाढ, मातीची स्थिती आणि हवामानाच्या नमुन्यावर लक्ष ठेवण्यासाठी सेन्सर्स, ड्रोन आणि जीपीएस् सारख्या प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करते. डेटा नंतर उत्पादन वाढीसाठी वापरला जातो. पिकांची लागवड, खते आणि कापणी याबाबत निर्णय घेण्यासाठी संबंधीत डेटा उपयोगी ठरतो. इस्रायल अचूक शेतीमध्ये आघाडीवर आहे, अनेक शेतकरी पीक उत्पादन इष्टतम करण्यासाठी आणि कचरा कमी करण्यासाठी या तंत्रज्ञानाचा अवलंब करतात. भारतात अत्याधुनिक शेती संसाधनांचा वापर बदलत्या कालमानानुसार टप्प्याटप्प्याने वाढत असून संगणकीकृत शेतीवर मोठया जमीनधारणा क्षेत्रात जास्त भर दिला जात आहे. परिणामी भारतातील शेतकरी शेतीला पाणी देण्याऐवजी तो नवीन तंत्राच्या सहाय्याने पिकांच्या मुळाला पाणी देत आहे.

**व्हर्टीकल फार्मिंग :** ही तंत्र सर्वच बाजूंनी नवीनतम आहे. ज्यामध्ये उभ्या थरांमध्ये पिकांची लागवड करणे समाविष्ट असते, सामान्यतः हरितगृह किंवा वेअरहाऊस सारख्या नियंत्रित वातावरणात या प्रकारची लागवड केली जाते या तंत्रामुळे शेतकऱ्यांना शहरी भागात फायदा होत आहे. तेथे वर्षभर विविध पिके घेतात आणि त्यामुळे पिकांची वाहतूक आणि साठवणूक करण्याची गरज कमी होते. इस्रायल देशात व्हर्टीकल फार्मिंग शेतीचे तंत्र सातत्याने विकसित होत आहे. अनेक कंपन्या पीक उत्पादन वाढीसाठी आणि उभ्या शेतीच्या वातावरणात पाण्याचा वापर कमी करण्यासाठी नावीन्यपूर्ण उपाय विकसित करीत आहेत. भारतात शहरी आणि नागरी शेतीतील क्षेत्रात इमारतीच्या गच्चीवर, घरच्या अंगणात

किंवा पाठीमागील जागेत परसबागेत, तसेच ग्रामीण भागातील लहान मर्यादित लहान जमीनधारणा क्षेत्रातही 'व्हर्टीकल फार्मिंग' पद्धती सुयोग्य व्यवस्थापन आणि नियोजनाद्वारे यशस्वी होण्याच्या संधी आणि शक्यता आहेत.

**प्रगतिशील शेती तंत्रज्ञान :** इस्रायलच्या प्रगतिशील शेती तंत्राने कृषी उद्योगात क्रांती घडवून आणली आहे, हे सिद्ध केले आहे. सर्वात ओसाड आणि कोरडया भूभागाचे देखील सुपीक, उत्पादक जमिनीत रूपांतर केले जाऊ शकते. प्रगत तंत्रज्ञान, शाश्वत पद्धती आणि संशोधन तसेच विकासासाठी वचनबद्धतेच्या संयोजनाद्वारे, इस्रायलच्या शेतकऱ्यानी निरोगी, पौष्टिक पिकांचे उच्च तंत्रज्ञान आणि त्यांच्या लोकांसाठी शाश्वत अन्न पुरवठा करून प्रगतिशील शेती तंत्रज्ञानात उल्लेखनीय यश संपादन केलेले आहे. स्वातंत्र्यानंतरच्या काळात १९६० च्या दशकातील विशेषतः १९६५ नंतर भारतीय शेतीत नवीन शेतीविषयक व्यूहरचना आणि हरितक्रांती या दोन महत्वपूर्ण घटना घडल्या असून भारतात पुन्हा तंत्रज्ञानाने शेती क्षेत्रात नवीन क्रांती होत आहे.

**आधुनिक शेतीनिर्मित समस्या :** व्यापारी दृष्टिकोन समोर ठेऊन आधुनिक शेती केली जाते. आधुनिक शेतीमध्ये आर्थिक फायदा असला तरी अशा शेतीमुळे मोठे शेतकरी लाभार्थी ठरत आहेत लहान शेतकरी या तंत्रापासून वंचित आहेत, नवीन शेती सुधारणा जरी घडून येत असल्या तरी शेतीच्या यांत्रिकीकरणाची प्रवृत्ती वाढत आहे. त्याचा वाढत्या मनुष्य बळावर विपरीत परिणाम होऊन बेरोजगारी वाढण्याची भिती निर्माण झालेली आहे, भारतात सुधारित नव्या तंत्राचा वापर प्रामुख्याने गहू व तांदूळ या पिकांसाठी जास्त प्रमाणात झालेला आहे परंतु इतर पिके मात्र दुर्लक्षित राहिले आहेत, हरीतक्रांतीच्या काळात पंजाब, हरियाणा, चंदिगढ

आणि उत्तर प्रदेशात प्रमुख पिकांची उत्पादकता जवळपास सव्वा दोन पटीने वाढली इतर राज्य मात्र मागासलेले दिसतात.

**उपाययोजना :**

1. हरितगृह शेती हि शेती क्षेत्रातील क्रांतिकारी वाटचाल असल्याने यामध्ये प्रतिकूल परिस्थितीवर मात करून कृत्रिम वातावरणात पिकांचे उत्पादन घेतले जाते, यामध्ये शासनाच्या विविध अर्थसहाय्य योजनांचा लाभ मोठया शेतकर्यांबरोबरच लहान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे.
2. जुन्या व कालबाह्य उत्पादन तंत्राचा वापर करण्याऐवजी आधुनिक तंत्राचा स्वीकार केल्यास शेती उत्पादन क्षमतावृद्धी शक्य आहे.
3. पाणी पुरवठयाच्या विविध योजना राबवून सिंचन सुविधांचा विस्तार केल्यास शेतीची उत्पादकता वाढेल.
4. भारत सरकारने रासायनिक खतांचा योग्य पुरवठा व्हावा म्हणून खतांचे उत्पादन वाढवण्यासाठी खत उत्पादकांना उत्पादनवाढीसाठी प्रोत्साहन योजना राबवणे आवश्यक आहे.
5. सरकारने शेतकऱ्यांना कृषी प्रदर्शने व पीक संरक्षणाचे प्रशिक्षण स्थानिक पातळीवर उपलब्ध कसून दिल्यास पिकांचे नुकसान टाळून शेती उत्पादकता वाढेल.
6. सुसंघटित आणि निर्दोष विक्रीव्यवस्था बाजारात उपलब्ध झाल्यास शेतमालाला योग्य किंमत मिळून त्याची प्रेरणा वाढते. त्यासाठी बाजार समितीमधील विक्री व्यवस्थेतील अडथळे कायदेशीररीत्या दूर करणे आवश्यक आहे.
7. शेतकऱ्यांना अल्प मध्यम व दीर्घकालीन संस्थात्मक वित्तपुरवठा योग्यवेळी, योग्यप्रमाणात, योग्यव्याजाने होणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष :** भारत आणि इस्रायल देशातील व्यापारी संबंध आणि सहकार्य देशाला भविष्यात शेती, संरक्षण, सेवा, आरोग्य, आंतरराष्ट्रीय सहकार्य अश्या अनेक क्षेत्रात सर्वांगीण विकासासाठी उपयोगी ठरत आहेत. जलसंधारण, सिंचन व्यवस्था, पीक उत्पादकता वृद्धी, बहुपीक पद्धतीचा विस्तार, अचूक शेती पद्धती इ. तंत्रज्ञान भारतात यशस्वी ठरू शकते.

**संदर्भग्रंथ सुची :**


1. V. K. Puri / S. K. Mishra (2021) 39th Edition Indian Economy- Himalaya Publishing House, Girgoan, Mumbai.
2. A. N. Agrawal (2010) 36th Edition Indian Economy- New Age International (P) Ltd, New Delhi
3. डॉ. वसुधा पुरोहित- (२०१६) प्रथमावृत्ती- कृषी अर्थशास्त्र- विद्या बूक पब्लिशर्स, औरंगपूरा, औरंगाबाद.
4. डॉ. प्रदीप आगलावे: (२०००) प्रथमावृत्ती- संशोधन पद्धतीशास्त्रे आणि तंत्रे- विद्या प्रकाशन, नागपूर
5. गं. वि. कायंदे-पाटील (२००५) संशोधन पद्धती- चैतन्य प्रकाशन, नाशिक
6. रंजन कोळंबे (२०२०-२१) भारतीय अर्थव्यवस्था- भगीरथ प्रकाशन


**शोध निबंध :**


1. श्री. प्रवीण भाऊसाहेब विखे (५ जानेवारी २०१८) - भारतातील हरीतगृहासंबंधी शासकिय धोरण – एक अभ्यास – आयूषी इंटर इंटरडिसीप्लिनरी रिसर्च जनरल.
2. अहवाल : नॅशनल हौर्टी कल्चर बोर्ड वार्षिक अहवाल २०१५, Economic survey २०२२-२३.
3. मासिक : अर्थसंवाद (२०२२) ऑक्टोबर/नोव्हेंबर/डिसेंबर खंड ४६ अंक ३
4. वर्तमानपत्रे : दै. लोकसत्ता, दै.सकाळ- अॅग्रोवन- पुरवणी, दै. लोकमत- संपादकीय.


***

# अंदाजपत्रकातील बदल


## प्रा. दिपमाला बबनराव वाघमारे

विद्या प्रतिष्ठानचे शिक्षणशात्र महाविद्यालय, बारामती.


**प्रस्तावना :-**

कोणत्याही देशात तेथील सरकारकडून एका आर्थिक वर्षासाठी आर्थिक नियोजनाचा जमा खर्च मांडला जातो. भारतात देखील अशा पद्धतीने दरवर्षी नियोजनाचा जमा खर्च मांडला जातो त्याला अर्थसंकल्प म्हणतात. अर्थसंकल्प मांडण्याची सुरवात स्वातंत्र्यापुर्वी झाली आणि आत्तापर्यंत तो मांडताना त्यामध्ये विविध बदल होत गेले आहेत. हा बदल त्यावेळेसं असणारी परिस्थिति लक्षात घेऊन केलेले असतो. असे झालेले बदल लक्षात घेऊन अर्थसंकल्प म्हणजे काय त्याचे प्रकार, त्याची रुपे व कामकाजाची प्रक्रिया यात मांडलेली आहे.

**अर्थसंकल्प :-**

अर्थसंकल्पाला इंग्रजीमध्ये budget असा शब्द प्रयोग केला जातो. Budget हा शब्द bougette या मूळ फ्रेंच शब्दापासून तयार झाला आहे. त्याचा अर्थ चामडयाची पिशवी असा होतो. 1733 मध्ये सर्व प्रथम इंग्लंड मध्ये budget शब्द वापरण्यात आला. इंग्लंड मध्ये ट्रेजरी विभाग अर्थसंकल्प तयार करतो. भारतामध्ये अर्थसंकल्प तयार करण्याची जबाबदारी अर्थमंत्रालायकडे असते. अर्थमंत्रालयातील अर्थसंकल्प विभागाद्वारे अर्थसंकल्प तयार केला जातो.घटनेमध्ये अर्थसंकल्पासाठी budget या शब्दाचा वापरला नाही त्याऐवजी वार्षिक वित्तीय विवरणपत्र हा शब्द प्रयोग केला आहे. केंद्राचा अर्थसंकल्प घटनेच्या 112 व्या कलमानुसार तर राज्याचा अर्थसंकल्प 102 या कलमानुसार आदर केला

जातो. भारतामध्ये अर्थसंकल्प मांडण्याची सुरवात स्वातंत्र मिळण्यापूर्वीच चालू झाली होती.


- 7 एप्रिल 1860 रोजी पहिला अर्थसंकल्प जेम्स विल्सन या वित्त सदस्याकडून मांडण्यात आला होता.
- 1947-1948 स्वातंत्र्यापूर्वीचा अर्थसंकल्प लियाकत अली खान यांनी मांडला होता.
- 26 नोव्हेंबर 1947 रोजी स्वातंत्र्यानंतरचा पहिला अर्थसंकल्प श्री.आर.के.शण्मुखम चेट्टी यांनी मांडला.

पूर्वी भारतामध्ये दरवर्षी फेब्रुवारीमध्ये संसदेचे बजेट अधिवेशन सुरू होऊन मे महिन्यापर्यंत चालत असे. सन 1921 च्या ॲकवार्थ समितीच्या शिफारशीनुसार रेल्वे अर्थसंकल्प साधारण अर्थसंकल्पा पासून 1924 नंतर वेगळा मांडला जात असे . फेब्रुवारी मध्ये शेवटच्या दिवशी पुढील आर्थिक वर्षासाठी साधारण अर्थसंकल्प संसदेत मांडला जात असे. त्याच्या एक दिवस आधी म्हणजे 25/26 फेब्रुवारी ला आर्थिक चालू वर्षाची भारताची आर्थिक पाहणी संसदेत मांडली जात असे. 2017 पासून फेब्रुवारीच्या शेवटच्या दिवशी मांडले जाणारे बजेट पहिल्या दिवशी म्हणजे 1 फेब्रुवारीला मांडले जाऊ लागले तसेच रेल्वे बजेट व साधारण बजेट एकत्र करून एकाच दिवशी सादर केले जाऊ लागले. 2017 पासून पंचवार्षिक योजना बांध करण्यात आल्या त्यामुळे सरकार ने आत्ता योजना खर्च व बिगर योजना खर्च मांडणे सोडून दिले आहे.

आज भारताच्या राष्ट्रपतीनी 31 जानेवारीला संसदेत अभिभाषण केल्या नंतर अर्थमंत्री 1 फेब्रुवारीला सकाळी 11 वाजता संसदेत अर्थसंकल्प सादर करतात. त्याची वेळ निश्चित केलेली असते. अर्थसंकल्प पूर्वी राष्ट्रपती भवनात छापला जात असे. नंतर त्यामध्ये बदल करण्यात आला आणि छपाईचं काम अर्थमंत्रालयातच सुरू झाले. आज


अर्थमंत्री निर्मला सीतारमण टॅबच्या माध्यमातून अर्थसंकल्प सादर करतात . स्वातंत्र्यापुर्वी संध्याकाळी 5 वाजता बजेट सादर होत असे तो तसाच स्वातंत्र्यानंतरही बऱ्याच काळ सायंकाळी पाच वाजता सादर करण्यात येत होता. वाजपेयी सरकारने अर्थसंकल्प सादर करण्याची वेळ बदलून ती 11 वाजता केली तेव्हा यशवंत सिन्हा यांनी 11 वाजता अर्थसंकल्प सादर केला. आजमितीला 1 फेब्रुवारीला अर्थसंकल्प सादर केला जातो, आणि त्याची वेळ देखील 11 वाजेचीच असते, त्यामुळे जुन्या आणि नव्या परंपरेची चर्चा अर्थसंकल्पाच्या वेळी वारंवार होत असते.

**अर्थसंकल्प मांडण्याची प्रक्रिया**:-




राष्ट्रपती वर केंद्राचा अर्थसंकल्प मांडण्याची तर राज्यपालांवर राज्याचा अर्थसंकल्प मांडण्याची जबाबदारी असते. राष्ट्रपती व राज्यपाल यांच्या वतीने अर्थमंत्री लोकसभा व विधानसभेत अर्थसंकल्प सादर करतात. त्यानंतर अर्थसंकल्पातील सरकारचा करप्रस्ताव व सरकारच्या नियोजित खर्चासाठी भारताच्या संचित निधीतून पैसे काढण्यासाठी संसदेची संमती मिळवणे म्हणजे अर्थसंकल्पास कायदेशीर रूप देणे होय. कायदेशीर रूप देताना साधारण चर्चा व अनुदानाच्या मागणीवर चर्चा व मतदान केले जाते. अर्थसंकल्पातील खर्च दोन प्रकारचा असतो प्रभारीत

खर्च व मतदानित खर्च. संचित निधीतून करण्याचे व घटनेने ग्राह्य मानलेले खर्च प्रभारीत खर्च असतात. उदारणार्थ राष्ट्रपतीचे पगार व भत्ते व त्यांच्या कार्यालयाचा सर्व प्रशासकीय खर्च,लोकसभा व राज्यसभाच्या अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे पगार व भत्ते, उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांचे पगार, सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांचे पगार भत्ते व पेन्शन आणि कार्यालयीन प्रशासकीय खर्च, संघ लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षाच्या व सदस्याचे पगार भत्ते पेंशन व कार्यालयीन सर्व प्रशासकीय खर्च ,महालेखापलचे पगार भत्ते पेंशन आणि कार्यालयीन सर्व खर्च. मतदानीत खर्चामध्ये प्रत्येक मंत्रालयाचा किवा विभागाच्या अनुदानाच्या मागणीच्या खर्चाचा समावेश असतो. हा खर्च मतदानीत असतो त्यावर लोकसभेत मतदान घेतले जाते. हा खर्च सुद्धा संचित निधीतून करावयाचा असतो. मागण्यावर कपात प्रस्ताव येतो , कपात प्रस्तावासं 26 दिवसांचा कालावधी निश्चित केलेला असतो. कपात प्रस्ताव तीन प्रकारचे असतात





1. **काटकसर कपात -** अनुदानाच्या मागणीत असलेल्या रक्कमेतून काही विशिष्ट रक्कम कमी करण्यात यावी. यात कपातीमुळे
   काटकसर कशी होईल हे दाखवून द्यावे लागते.
   **धोरणात्मक कपात-** अनुदानाच्या मागणीची रक्कम एक रुपयापर्यंत कमी करण्यात यावी असा हा प्रस्ताव असतो
2. **प्रतिकात्मक प्रकार –** भारत सरकार जबाबदार असणाऱ्या जनतेचा प्रश्न लोकसभेपूढे आणण्यासाठी हा प्रस्ताव मांडला जातो. अनुदानाच्या मागणीतून शंभर रुपये कमी करण्यात यावे असा हा प्रस्ताव असतो.

अनुदानाच्या मागणीवर प्रत्यक्ष चर्चा व मतदान अपेक्षित असते परंतु शेवटच्या दिवशी चर्चा झालेली असो व नसो या मागण्या मतदनाद्वारे संमत केल्या जातात. या प्रक्रियेला guillotine म्हणतात.लोकसभेमध्ये अनुदानाच्या मागण्या संमत होतात म्हणजे ठराविक खात्याला रक्कम मजूर होते.ही रक्कम भारताच्या संचित निधीतून प्राप्त करावी लागते. त्यासाठी लोकसभेत विनियोजन विधेयक कलम 114 नुसार मांडून संमत करून घ्यावे लागते.अर्थसंकल्प लोकसभेत मांडल्याबरोबर हे विधेयक मांडले जाते. हे विधेयकास 75 दिवसाच्या आत संसदेची तसेच राष्ट्रपतीची संमती मिळणे आवश्यक असते.

इतर अनुदान यामध्ये पूर्वी ज्याची अतिशय गरज होती असे एक लेखानुदान. (Vote Of Account) फेब्रुवारीच्या शेवटच्या दिवशी बजेट मांडल्यावर दोन महिन्यासाठी वार्षिक अंदाज खर्चापैकी 1/6 खर्चाचे मागणीसाठी लेखानुदान मांडले जात होते. आत्ता बजेट फेब्रुवारी च्या पहिल्याच दिवशी मांडल्यामुळे याची आवश्यकता भासत नाही.निवडणुकीच्या वर्षात अंतरिम बजेट मांडले जाते. दुसरे पूरक अनुदान- या मागणीनुसार एखाद्या बाबीवरील समत रक्कम अपुरी ठरली किवा नवीन खर्चाची बाब उद्धभवली जिचा समावेश अर्थसंकल्पात नव्हता, तर अशा खर्चासाठी राष्ट्रपती संसदेच्या दोन्ही सभागृहापुढे पूरक अनुदानाची मागणी कलम 115 नुसार मांडतो. तिसरे अतिरिक्त अनुदान एखाद्या आर्थिक वर्षात जर एखाद्या बाबीवरील खर्च तिच्यावरील समत रकमेपेक्षा जास्त ठरला तर राष्ट्रपती कलम 115 नुसार अतिरिक्त अनुदानाची मागणी घडवून आणतात॰ चौथे पत अनुदान ( Vote Of Credit )– अनपेक्षित रित्या उद्धभवलेल्या खर्च ज्याचे काटेकोर अंदाज मांडता येत नाही परंतू तो भागवण्यासाठी एका मोठ्या रकमेची मागणी


असते याला पट अनुदान म्हणतात . याला संसदेने सरकारला दिलेला ‘ब्लंक चेक’ असे म्हणतात.

केंद्र सरकारचे निधि :यात तीन प्रकारच्या निधींचा समावेश होतो .





1. **संचित निधी:-** कलम 266(1)मध्ये संचित निधी असतो.निधीतला पैसा लोकसभेच्या/विधानसभेच्या समतीशिवाय प्राप्त होत नाही. यामध्ये सरकारला मिळालेला सर्व कर उत्पन्न,सरकारने घेतलेली सर्व कर्ज, सरकारने दिलेल्या कर्जाची आलेली परतफेड तसेच सार्वजनिक उद्योगांचा नफा समावेश आहे.
2. **सार्वजनिक लेखे:-** कलम 266(2)मध्ये सार्वजनिक लेखे असतात. निधीतला पैसा सरकार वापरीत असला तरी हे पैसे सरकारच्या मालकीचे नसतात त्यामुळे संसदेची समतीची गरज नसते कारण कालांतराने हे ज्याचे पैसे आहेत त्याला परत द्यायचे असतात. उदाहरणार्थ पेन्शन निधी,जनतेच्या अल्प बचती, प्रोव्हिडट निधिचा पैसा.
3. **आकस्मिक खर्च निधी:-** कलम 267 मध्ये आकस्मिक खर्च निधी असतो. हा निधी राष्ट्रपती/राज्यपालच्या ताब्यात असतो. खर्च करतेवेळी संसदेची संमती घेण्याची आवश्यकता नसते मात्र त्यानंतर संसदेच्या पहिल्या अधिवेशनात या खर्चाला संमती घ्यावी लागते.

**केंद्रीय बजेट -** केंद्रीय बजेट चे दोन भाग पडतात.




1) **महसूल बजेट** (Revenue Budget):- महसूल बजेट मध्ये सरकारचे महसूल उत्पन्न आणि त्यातून भागवायचा महसूल खर्च याची माहिती असते. महसुली खर्च हा योजना खर्च व बिगर योजना खर्च अश्या स्वरुपात 1987 ते व बिगर योजना खर्च असे विभाजन बंद झाले.




**महसुली जमा :-**


**कर महसुल:-** या मध्ये प्रत्यक्ष कर व अप्रत्यक्ष कर याचा समावेश होतो .प्रत्यक्ष करमध्ये आकार महामंडळ कर या सारख्या कारचा समावेश आहे तर अप्रत्यक्ष करामध्ये जीएसटी अश्या कराचा समावेश असतो

**करेतर महसुल:-** या मध्ये शूल्क, नफा, व्याज, अनुदान, लाभांश, निनावी संपत्ती याचा समावेश असतो .

**महसुली खर्च:-** यामध्ये कर्जावरील व्याज, सरक्षणाचा महसुली खर्च, नागरी प्रशासन खर्च, अनुदान तसेच योजनावरील महसुली खर्च याचा समावेश होतो.

2**) भांडवली बजेट** (capital Budget)


ज्या बजेट मध्ये देशाचा खर्च यंत्रसामग्री, उपकरणे, घर, आरोग्य सुविधा शिक्षण यावरील सरकारचा केलेला खर्चाचा लेखाजोखा समाविष्ट असतो. यालाच भांडवली बजेट किंवा कॅपिटल बजेट म्हटले जाते.




**भांडवली जमा:-** यामध्ये कर्ज ,कर्ज पुनप्राप्ती, निर्गुंतवणूक व इतर देणी यांचा समावेश होतो.

**भांडवली खर्च:-** कर्जाची परतफेड, सरक्षणाचा भांडवली खर्च, कर्ज तसेच योजनांना दिलेला भांडवली खर्च याचा समावेश असतो.

**अर्थसंकल्पाचे प्रकार :-** अर्थसंकल्पाचे तीन प्रकार पडतात.



**तुटीचा अर्थसंकल्प:-** आर्थिक विकासास चालना मिळण्यासाठी तुटीचा अर्थसंकल्प मांडला जातो. भारतात मनुष्यबळ आणि नैसर्गिक साधनसंपत्ती भरपूर प्रमाणात आहे आहे ती वित्ताची म्हणून भारतासारखे विकसनशील देश तुटीच्या अर्थसंकल्पाची मांडणी करतात. तुटीच्या अर्थसंकल्पात अनेक प्रकारच्या तुटींचा समावेश असतो.

| | |
|---|---|
| 1)महसूल तूट :- (Revenue Deficit) | महसूल तूट = महसूल उत्पन्न - महसूली |
| 2) अर्थसंकल्पीय तूट :- (Budgetary Deficit) | अर्थसंकल्पीय तूट = एकूण उत्पन्न - एकूण खर्च |
| 3)राजकोषीय तूट :- (Fiscal deficit) | राजकोषीय तूट = (एकूण खर्च)- (महसुली जमा + कर्जेतर भांडवली जमा |
| 4) प्राथमिक तूट :- (primary deficit) | प्राथमिक तूट = राजकोषीय तूट – घेतलेल्या कर्जावरील व्याजखर्च |
| 5)प्रभावी महसूल तूट :- (effective revenue Deficit) | प्रभावी महसूल तूट=(महसूल तूट)-(भांडवली मालमत्ता निर्माण करण्यासाठी वापरलेली अनुदाने व्याजखर्च) |

अर्थसंकल्पाची रुपे :-

**1) पारंपारिक बजेट** ( Traditional Budget) :- सरकार यामध्ये फक्त जमा आणि खर्च सांगते. खर्चाचे काय परिणाम होतील याचे विवेचन यामध्ये नसते.

**2) निष्पादन बजेट** (Performance Budget :- याची सर्वप्रथम मांडणी 1951 मध्ये अमेरिकेमध्ये झाली, 1953 मध्ये डिन ॲपलबी यांनी भारतात याचा अभ्यास केला आहे. यामध्ये उद्दिष्ट महत्वाचा नाही तर उद्देश महत्वाचा आहे. खर्चाच्या गुणवत्तेवर काम केले पाहिजे.

**3) परिणाम बजेट** ( Outcome Budget) :- 25 ऑगस्ट 2005 मध्ये पहिलं परिणाम बजेट वित्तमंत्री पी. चिदंबरम यांनी मांडला होता. यामध्ये फलनिष्पत्तीचा विचार केला जातो.

उदारणार्थ - पारंपरिक अर्थसंकल्पात इमारती बांधण्यासाठी केलेली तरतूद असते. ह्या इमारती मध्ये शिक्षण क्षेत्रासाठी तरतूत असणे निष्पादन बजेट असते. आणि यामुळे साक्षरतेत झालेली वाढ हे परिणाम बजेट होय.

**4) शून्याधारीत बजेट (**Zero Budget) :- शून्यधारीत अर्थसंकल्पनेचे प्रवर्तक पीटर ए. पीहर आहेत. सर्वप्रथम यू एस ए मध्ये ज्यार्जिया शहरात जीमी कर्टर यांनी 1973 मध्ये ही संकल्पना मांडली होती. सरकारला प्रत्येक विभागाच्या खर्चाचे अंदाज ठरविताना मागील वर्षाचे आकडे आधारभूत न मानता अगदी सुरवातीपासून खर्चाचा अंदाज घेतला जातो , आणि प्रत्येक खर्चाच्या बाबीचा त्याच्या उपयोगीतेचा नव्याने विचार करून खर्चाचे अंदाज केले जातात म्हणजे आधार शून्य मनाला जातो याला शून्याधारीत अर्थसंकल्प असे म्हणतात . भारतामध्ये ब्रिटानिया या खाजगी कंपनीने याची सुरवात केलेली होती.सार्वजनिक क्षेत्रामध्ये सर्वप्रथम विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागामध्ये 1983 मध्ये सुरवात झाली. भारत देशातील राज्यांचा विचार करता महाराष्ट्र राज्याने 1986 मध्ये सर्वप्रथम शंकरराव चव्हाण मुखमंत्री तसेच सुशील कुमार शिंदे वित्त मंत्री असताना हा बजेट मांडला होता. शून्यधारीत अर्थसंकल्प अंतराळ विभाग सोडून इतर कोणत्याही विभागात यशस्वी होऊ शकला नाही.

**5) जेंडर बजेट :-** जेव्हा अर्थसंकल्पात महिलांसाठी स्वतंत्र वित्तीय तरतुदी केल्या जातात त्याला जेंडर बजेट असे म्हणतात. जेंडर बजेट म्हणजे महिलांसाठी वेगळा बजेट नसून अर्थसंकल्प मांडताना महिलांचा विकास, कल्याण तसेच सबलीकरणा विषयी संबधित योजना एक निश्चित रक्कम

खर्च करण्याची तरतूद करते . भारतामध्ये जेंडर बजेट ची नोडल एजन्सी म्हणून महिला व बाल विकास मंत्रालय काम पहाते. ही संकल्पना सर्वप्रथम आस्ट्रेलिया देशात स्वीकारण्यात आली. भारतामध्ये सर्व प्रथम सातव्या पंचवार्षिक योजनेत संसाधन विभागणीत जेंडर संवेदनशीलता आणली पाहिजे. आठव्या योजनेमध्ये महिलांसाठी वेगळ्या योजनेची गरज आहे असे मांडण्यात आले. नवव्या योजनामध्ये महिलांसाठी स्वतंत्र निधीची औपचारिक सुरवात झाली आणि याला महिला घटक योजना असे नाव देण्यात आले. त्यानंतर 2000 साली जे बजेट सादर झाले त्यामध्ये सर्वात पहिले गेंडर बजेट हा शब्दोच्चार करण्यात आला. 2005 साली पी.चिदंबरम यांनी अनुदानाच्या मागण्यामधील महिलांसाठी 10 मागण्याचे स्वतंत्र विवरण तयार करु असे सांगितले

**सार्वजनिक खर्च वाढ व कारणे:-**


अर्थसंकल्पनेत पुढील आर्थिक वर्षात सरकारने आपल्या करावयाच्या खर्चाचे विवरण म्हणजे सार्वजनिक खर्च होय. स्वातंत्रापासून सार्वजनिक खर्चात सतत वाढ होत आहे. अल्फ्रेड वेगनर यांच्या मते सार्वजनिक खर्च व आर्थिक विकास यामध्ये कारण संबध आहे. यानियमा नुसार सार्वजनिक खर्च दरडोई राष्ट्रीय उत्पादनाच्या तुलनेत अधिक वेगाने वाढतो. दुसऱ्या शब्दात असे म्हणता येईल की सार्वजनिक खर्चाच्या बाबतीत मागणीची उत्पन्न लवचिकता एक पेक्षा अधिक असते. सार्वजनिक खर्च वाढीची कारणे पुढील प्रमाणे आहेत

पायाभूत सुविधांवरील खर्च, अनुदानावरील खर्च, कल्याणकारी योजनाची अमलबजावणी , संरक्षण वरील ,वाढता खर्च इ.

**लेखापरीक्षण :-**

लेखापरीक्षणात सरकारची जमा व खर्च याच्या तपासणी येते. सरकारने केलेल्या खर्चाची तपासणी म्हणजे लेखापरीक्षण होय. केलेला

खर्च योग्य होता का , त्याची खरच गरज होती का, सरकार तो खर्च वाचवु शकले असते का याचे परीक्षण म्हणजेच auditing / लेखापरीक्षण होय. या प्रक्रियेसाठी तीन लोक कामे पाहतात




- **भारताचा नियंत्रक व महालेखापरीक्षक (CAG) :-** या पदाची निर्मिती स्वातंत्र्यपूर्व काळात 1857 साली झाली. CAG ला भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीसारखा दर्जा असतो. केंद्र तसेच राज्य आणि सार्वजनिक क्षेत्रातील संस्थांच्या खात्यांचे लेखापरीक्षण करण्यासाठी आणि राज्य सरकरांच्या खात्याची देखरेख करण्यासाठी कॅग जबाबदार असते. स्वातंत्र्यानंतर या पदाची स्थापना 1950 मध्ये करण्यात आली आहे. घटनेमध्ये कलम 148 अंतर्गत राष्ट्रपती मार्फत नेमले जाते.1976 पूर्वी CAG ला दोन प्रकारची कार्य करावी लागत होते. 1976 मध्ये CAG ( कर्तव्य कायदा ,1976) समत करण्यात आला आणि

CAG ची लेखेविषयक कामे काढून घेण्यात आली आणि त्यांना फक्त लेखेतपासणीची कामे देण्यात आली आहेत.

- **कंट्रोलर जनरल आफ अकाऊंट्स (CGA) :-** CGA लेखेविषयक कामाबद्दल भारत सरकारचा प्रमुख सल्लागार म्हणून काम पाहतात. राष्ट्रपतींना केंद्र व राज्य शासनाच्या लेखयाचे स्वरूप विहित करण्याची जबाबदारी आहे ती जबाबदारी राष्ट्रपतींनी CGA यांच्यावर टाकलेली आहे.
- **लेखापरीक्षण संसदिय समित्या :-** यामध्ये तीन समित्या असतात .

1)लोकअंदाज समिति – 1921 मध्ये स्थापन करण्यात आलेल्या या समितीस स्वातंत्र्यानंतर वित्त मंत्री जॉन मथाई यांनी 1950 मध्ये शिफारस केली. यामध्ये एकूण 30 सदस्य असतात पैकी एकाची नेमणूक अध्यक्ष म्हणून लोकसभेच्या अध्यक्षामार्फत केली जाते. यांचा कालावधी एक वर्षाचा असतो. ही समिति वार्षिक अर्थसंकल्पातील जमा खर्चाच्या अंदाजाची तपशीलवार तपासणी करते.

**2)लोकलेखा समिती:-** देशातील सर्वात जुनी अर्थविषयक समिती आहे, या समितीची स्थापना 1921 मध्ये झाली आहे.या समितीत 22 सदस्य असतात पैकी 15 लोकसभेतून तर 7 राज्यसभेतून निवडलेले असतात. यांचा कालावधी एक वर्षाचा असतो. लोकअंदाज समितीला लोकलेखा समितीची जुळी बहीण म्हणतात, कारण दोनहिची कामे एकमेकास पूरक आहेत. लोखलेखा समितीला खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी भारताच्या महालेखापालाच्या सरकारी जमा खर्चाच्या अहवालावर अवलंबून राहावे लागते. म्हणूनच भारताच्या महालेखापालाला लोखलेखा समितीचे कान व डोळे असे म्हणतात.

3) **सार्वजनिक निगम समिती:-** 1964 मध्ये कृष्ण मेनन समितीच्या शिफारशी नुसार झाली. या समितीत 22 सदस्य असतात पैकी 15 लोकसभेतून तर 7 राज्यसभेतून निवडलेले असतात . यांचा कालावधी एक वर्षाचा असतो.

**संदर्भ सूची:-**


1. 12 वी. अर्थशात्र महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,पुणे .
2. अर्थसंकल्प म्हणजे नेमके काय ? देवेंद्र फडणवीस
3. www.google.com


***

# कर प्रणालीत झालेला बदल

**प्रा. गणपत सुभाष शेळके**

सहायक प्राध्यापक, एम.ए.अर्थशास्त्र (सेट) मामासाहेब मोहोळ महाविद्यालय, पौड रोड, पुणे

**प्रस्तावना :**

भारतात कर हा फार पूर्वीपासून महसूल प्राप्तीचा मार्ग राहिला आहे यामध्ये करप्रणाली ही प्रशासनाच्या महसुलाचा मुख्य स्त्रोत आहे. इंग्रज भारतात येण्या अगोदर भारतात विविध राजे महाराजे विविध भूभागावर आपली सत्ता स्थापित केली होती. त्यांच्यावर राज्य करीत होते. तेथील जनतेला संरक्षण देण्यासाठी त्यांच्याकडून कर आकारत असत. कर हा पैशाच्या स्वरूपात, वस्तूच्या स्वरूपात अकारात असत. महाराष्ट्रात सातवाहन, वाकटक, चालुक्य, राष्ट्रकुल, मुघल, मराठा, पेशवाई असे शासनकर्ते यांनी आपले शासन केले. त्यानंतर साधारणतः 1818 नंतर ब्रिटिश सरकारने महाराष्ट्रात आपली सत्ता स्थापन केली. ते 1947 पर्यंत ते आपला राजकारभार चालविला. भारतीय कर प्रणालीत झालेला बदल़ यामध्ये आपणास स्वातंत्र्यपूर्वक करप्रणाली व स्वातंत्र्योत्तर करप्रणालीत झालेला बदल अभ्यासता येईल.यामध्ये स्वातंत्र्यपूर्वी भारतीय विविध भूभागात आपली सत्ता बाळगणारे राजे, महाराजे संस्थानिक व त्यानंतर ब्रिटिश महसूल करप्रणाली यांचा अभ्यास करता यईल. तर स्वातंत्र्यानंतर स्वातंत्र भारतातील कर प्रगतीचा संशोधन अभ्यास करता यईल. कर म्हणजे सरकारी तिजोरीत जमा करायची सक्तीची वर्गणी, जिचा उपयोग जनतेच्या कल्याणासाठी राबवाव्या लागणाऱ्या योजनांचा खर्च

भागविण्यासाठी केला जातो. सरकारला राज्यघटना कलम 265 अंतर्गत कर रोपण करण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे.

**कराशी संबंधित संकल्पना (व्याख्या) :**

1) **सेलिंगमन : "कर म्हणजे** लोकांकडून सक्तीने वसूल केलेली वर्गणी आहे व तिचा उपयोग सर्वांचे हितासाठी केला जातो. वैयक्तिक लाभाशी त्याचा काही संबंध नाही."

2) **डॉ. डाल्टन :** "**कर** हे सक्तीचे देणे आहे व त्याचा सममूल्य सेवेची काही संबंध नाही".

3) **टेलर :** "कोणत्याही प्रत्यक्ष लाभाची अपेक्षा न करता जनतेने सरकारला केलेले सक्तीचे शोधन म्हणजे **कर** होय".

4) **प्रत्यक्ष कर :** "जो कर ज्या व्यक्तीवर लावला जातो व त्या व्यक्तीकडून भरला जातो अशा करार प्रत्यक्ष कर असे म्हणतात" - **डॉ. डाल्टन**


5) **अप्रत्यक्ष कर :** "जो कर व्यक्तीवर लावला जातो; परंतु अंशत:अथवा पूर्णतः दुसऱ्या व्यक्तींकडून भरला जातो अशा करास अप्रत्यक्ष कर असे म्हणतात". -**डॉ. डॉल्टन**

6) **कर आघात :** ज्याच्यावर कर लावला जातो त्यास कराचा आघात सहन करावा लागतो. म्हणजे सरकार ज्या व्यक्तीवर कर भरण्याची जिम्मेदारी सोपवते त्यावर कराचा अपघात हा पडतो कर संक्रमण अवस्थेत कराचा अपघात हा प्रथम अवस्था आहे.

7) **कर बोजा :** म्हणजे जेव्हा कर लावला जातो तेव्हा उत्पादक तो कर इतर व्यक्तीवर संक्रमित करू शकतो.म्हणजे ग्राहकाकडे करायचे ओझे संक्रमित करता येते . जेव्हा ग्राहक हा कर अंतिमता भरतो तेव्हा त्याला **कर बोजा** म्हणतात. यात कराचा अपघात हा उत्पादकावर लागू असतो तर **कर बोजा** हा ग्राहकावर. यात ग्राहक

हे कारचे पैसे देत असतो. हा कर संक्रमणाचा अंतिम टप्पा असतो.

8) **आर्थर लाफर वक्ररेषा :** यानुसार -समजा सरकारने (शून्य) ‘0’ कर दर आकारला तर शासनाला शून्य महसूल गोळा होईल आणि 100% कर आकारला तर लोक उत्पादन करणार नाहीत आणि शासनाला शून्य महसूल गोळा होईल म्हणजे समाजातील बचत व गुंतवणूक कमी होईल.म्हणून सरकारला शून्य कर मिळेल म्हणून **लाफर** यांच्या मताने शासनाने करायचे दर वाजवी ठेवावेत.




**संशोधनाची गृहीतके :**

एक) भारतात कर प्रणालीत काळानुसार बदल झालेला आहे.

दो) कर आकारणी ही विविध तत्वे व अटी लक्षात घेऊन केली जाते.

तीन) भारतीय कर प्रणाली चा मुख्य उद्देश हा सामाजिक कल्याण साध्य कारणे हा आहे.

चार) भारतातील कर प्रणाली ही लवचिक आहे.

**संशोधनाचे उद्देश** :

1. भारतातील करप्रणाली द्वारे आर्थिक विषमतेचा अभ्यास करणे.
2. संशोधनाचा मुख्य उद्देश म्हणजे भारतीय कर प्रणाली समजून घेणे.
3. भारतातील कर प्रणालीच्या बदलाचा अभ्यास करणे.
4. भारतीय कर प्रणालीत बदलांद्वारे अर्थव्यवस्थेतील फायदे-तोटे अभ्यासणे.

**कर प्रणालीचे वैशिष्टे :**

1) **कर सक्तीचे देणे :** प्रत्येक व्यक्तीला त्याच्यावर आकारलेले कर सक्तीने द्यावे लागतात. कर न भरणे कायद्याने गुन्हा आहे. त्यासाठी व्यक्तीला शिक्षक देखील होऊ शकते. काही कर हे संरक्षणात्मक करत असतात. उदाहरणार्थ, लहान उद्योगाला संरक्षण मिळावे म्हणून मोठ्या उद्योगात तयार होणाऱ्या वस्तूंवर कर आकारणे, देशी उद्योगाला संरक्षण देण्यासाठी विदेशी वस्तूंचे आयातीवर कर लावणे.

**2) सार्वजनिक फायदा :**

करामुळे विशिष्ट व्यक्तीला, करदात्याला काही ठराविक फायदे देण्याची हमी सरकारने दिलेली नसते. कराचा उपयोग सार्वजनिक सेवा, सुविधा निर्माण करण्यासाठी केला जातो. त्याचा फायदा जनतेला होतो. उदाहरणार्थ, रस्ते, शाळा, दवाखाने, सार्वजनिक वाचनालय, इत्यादी.

**करपद्धतीचे गुणधर्म :** चांगल्या करपद्धतीचे काही गुणधर्म ॲडम स्मिथ यांनी सांगितले आहेत. ते पुढील प्रमाणे मांडता येतील-

**1) न्याय्य वाटा (Equity)** : करांची आकारणी न्याय्य असली पाहिजे, प्रत्येकाने त्याच्या उत्पन्नातील 'योग्य वाटा' करस्वरूपात दिला पाहिजे.

2**) तटस्थता (Neutrality) :** कर आकारणीची तत्त्वेचे निश्चित झाल्यानंतर या तत्त्वांना कुठलेही कठोर किंवा सौम्य आर्थिक निर्णय घेताना बाधा पोहोचू नये.

3) **कार्यक्षमता (Efficiency) :** कर आकारणी आणि करवसुली अशा प्रमाणात झाली पाहिजे, की तिने अर्थव्यवस्थेस चालना दिली पाहिजे लाफरने सुचविल्याप्रमाणे लाफर कर्व्हच्या सर्वात वरच्या बिंदूला 'जिथे शासनाचा महसूल सर्वाधिक राहील आणि अर्थव्यवस्थेची कार्यक्षमताही वाढीस लागेल त्या बिंदूला कर आकारणी झाली पाहिजे.

**4) उत्पादकता (Productivity) :** अर्थव्यवस्थेची उत्पादकता वाढण्यासाठी शासनाला यथायोग्य महसूल देण्याची क्षमता करांमध्ये असली पाहिजे.

**5) सरलता (Simplicity) :** कराचे स्वरूप, मापनपद्धत, वसुली पद्धत सोपी असली पाहिजे. करांसाठी चांगली आणि नियंत्रित अधिकार असणारी प्रशासन यंत्रणा कार्यरत असली पाहिजे.

**6) निश्चितता (Certainty) :** कर भरणे हे निश्चित असले पाहिजे. कर कधीपर्यंत भरायचा, किती भरायचा कसा भरायचा याबाबत निश्चितता हवी.

**7) लवचिकता (Flexibility):** करांमध्ये निश्चिततेसोबत लवचिकताही हवी. अर्थव्यवस्थेतील बदलानुरूप कर पद्धतीत बदल करण्यास वाव असावा.

**8) विविधता (Diversity) :** जास्तीत जास्त घटकांवर परंतु कमीत कमी प्रमाणात आकारले जाणारे कर असावेत, जेणेकरून कर महसुलात प्रत्येकाच्या क्षमतेनुसार प्रत्येकाला काहीना काही योगदान देता येईल.

**9) पारदर्शकता (Transparency) :** करदाता किती कर भरतो, कर भरल्यामुळे त्याला काय काय लाभ मिळतो, करमहसूल गोळा करून सरकार कुठल्या योजना राबवतंय याबाबत पारदर्शकता असली पाहिजे.

**भारतीय कर प्रणालीत झालेला बदल :**

यामध्ये आपणास स्वातंत्र्यपूर्वक करप्रणाली व स्वातंत्र्योत्तर करप्रणालीत झालेला बदल अभ्यासता येईल.यामध्ये स्वातंत्र्यपूर्वी भारतीय विविध भूभागात आपली सत्ता बाळगणारे राजे, महाराजे संस्थानिक व त्यानंतर ब्रिटिश महसूल करप्रणाली यांचा अभ्यास करता यईल. तर स्वातंत्र्यानंतर स्वातंत्र भारतातील कर प्रगतीचा संशोधन अभ्यास करता यईल. कर म्हणजे सरकारी तिजोरीत जमा करायची सक्तीची वर्गणी, जिचा उपयोग जनतेच्या कल्याणासाठी राबवाव्या लागणाऱ्या योजनांचा खर्च भागविण्यासाठी केला जातो. सरकारला राज्यघटना कलम 265 अंतर्गत कर रोपण करण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे.

दीर्घकाळ सेवेत असलेल्या लष्कराच्या वेतनाचा खर्च राज्याच्या कोषागारातून दिला जात असे.म्हणून ईशान्य भारतातील व्यापार-उदिमामुळे वस्तूंच्या विक्रीवर वसुलीकर आकारून मगध साम्राज्यात राजे संपत्ती गोळा करीत व तिचा विनियोग लष्कराच्या देखभालीसाठी केला जाई. लष्करी संघटनाबाबत मगध राज्याला एक खास फायदा मिळत होता. मगधाच्या नंद राजांजवळ प्रचंड संपत्ती असल्यामुळे

लष्करासाठी खर्च करणे त्यांना शक्य होते, परंतु कोणत्या विशेष उपायांचा अवलंब करून इतक्या मोठ्या प्रमाणावर करामार्फत पैसा गोळा करीत असत, यासाठी एका निश्चित आधारावर करवसुलीची व्यवस्था प्रस्थापित झाली होती. योद्धे व पुरोहित, म्हणजेच क्षत्रिय व ब्राह्मण, यांना कर द्यावा लागत नसे; **करांचा सर्व बोजा शेतकरी व प्रामुख्याने गृहपती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वैश्यांवर** पडत होता. वैदिक काळात जमातीच्या लोकांकडून स्वेच्छेने आपल्या प्रमुखाला काही रक्कम दिली जात होती. बुद्ध काळात अशा त-हेची रक्कम देण्याची शेतकऱ्यांवर सक्ती झाली. ही रक्कम गोळा करण्यासाठी बलिसाधक नावाचे अधिकारी नेमले जात असत. शेतकऱ्यांच्या उत्पन्नातील एक-षष्ठांश भाग कर म्हणून राजा गोळा करीत असे. ग्रामप्रमुखाच्या मदतीने राजाचे मदतनीस करनिश्चिती व कर गोळा करणे ही कामे पार पाडत. लेखनकलेच्या शोधामुळे करनिश्चिती व करसंचय या दोन्ही गोष्टी करण्यास साहाय्य झाले असावे. आहत नाण्यांचे मोठे साठे करवसुली रोख रकमेत अथवा धान्याच्या स्वरूपात होत असल्याचे सूचित करतात. ईशान्य भारतात **करभरणा तांदळाच्या रूपात** केला जात असे. या करभरण्याखेरीज शेतकऱ्यांना राजाने सुरू केलेल्या कामावर विनावेतन सक्तीने जावे लागे. बुद्धाच्या कथांमध्ये (जातककथांमध्ये) काही शेतकरी करांच्या जुलमी ओझ्यातून सुटका मिळवण्यासाठी देश सोडून गेल्याचे सांगितले आहे. कारागीर व व्यापारी यांनाही कर द्यावा लागे. कारागिरांना प्रत्येक महिन्यात राजासाठी एक दिवस काम करावे लागे. व्यापाऱ्यांना आपल्या वस्तूंच्या विक्रीवर सीमाशुल्क द्यावे लागे. कर गोळा करणाऱ्या अधिकाऱ्यांना शौलकिक किंवा **शुल्काध्यक्ष** म्हणत असत.

**करांचे वर्गीकरणः**

विविध करांचे वर्गीकरण पुढील गटांमध्ये करता येते.

- प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कर (Direct and Indirect Taxes)
- प्रमाणशीर, प्रगतीशील आणि प्रतिगामी कर (Proportional, Progressive and Regressive Taxes)
- विशिष्ट आणि मूल्यानुसारी कर (Specific and Ad Valorem Taxes)
- एकमुखी आणि बहुमुखी (Single and Multiple Taxes)
- मूल्यवर्धीत कर (Value-Added Tax: VAT)

करासंबंधित वरील वर्गीकरण लक्षात घेता त्याचा अर्थ सांगता ना असे समजते की-प्रत्यक्ष कर म्हणजे असे कर की ज्याच्या बाबतीत कायदेशीरपणे ज्या व्यक्तीवर कर लादलेला असतो तीच व्यक्ती कर भरत असते. तर अप्रत्यक्ष कर म्हणजे असे कर की ज्याच्या बाबतीत करायचा आघात आणि करभार वेगवेगळे व्यक्तीवर पडत असतो. जर काही करदायित्व उत्पन्नातील वाढीच्या समप्रमाणात वाढत असेल तर त्या करास प्रमाणशीर कर असे म्हणतात. जर कर वस्तूच्या वजन आणि आकारमानाच्या एककानुसार आकारला असेल तर त्यास विशिष्ट करा असे म्हणतात. जर कर वस्तूच्या किमतीच्या प्रमाणात आकारला जात असेल तर त्यास मूल्यानुसार कर म्हणतात. जर कर व्यवस्थेत एकच कर आकारला जात असेल तर त्यास एकमुखी कर पद्धती असे म्हणतात. जर कर व्यवस्थेत अनेक कर आकारले जात असतील तर त्यास बहुमुखीकर पद्धती असे म्हणतात. करा संबंधित वरील

वर्गीकरण लक्षात घेता त्याचा त्या संबंधी आपणास असे सांगता येईल की देशात कोणती करप्रणाली अस्तित्वात असते.

➢ **भारतीय कर प्रणाली :-**

| अ. क्र. | कर | सुरुवात | कायदा/शिफारस | लागू |
|---|---|---|---|---|
| 1 | वैयक्तिक आयकर /प्राप्तिकर | 1860 | आयकर ॲक्ट 1961 | व्यक्तींनी कमावलेला उत्पन्नावर लावला जातो. |
| 2 | महामंडळकर /निगमकर | --------- | आयकर कायदा 1961 | कंपन्यांच्या उत्पादन संस्थांच्या उत्पन्नावर नफ्यवर लावला जातो. |
| 3 | खर्च कर | 1957 | प्रो.निकोलस कॉल्डर यांच्या शिफारशीनुसार | प्रतिदिन दरडोई खर्च 400 रु. पेक्षा अधिक असल्यास हा कर लावला जाईल. |
| 4 | देणगीकर | 1958 | 1990-91 अर्थसंकल्प | मागील |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | आर्थिक वर्षात दिलेल्या देण्यावर हा कर लावला जातो. |
| 5 | संपत्ती कर | 1957 | संपत्तीकर कायदा 1957 | व्यक्ती हिंदू अविभाजित कुटुंबे आणि कंपन्यांच्या संचित संपत्ती वर हा कर लावला जाईल. |
| 6 | अबकारी कर/उत्पादन शुल्क | 1976 | एल के झा समिति 1976 | देशांतर्गत उत्पादन झालेल्या वस्तूवर अबकारी कर आकारण्यात येतो. |
| 7 | मालमत कर | 1953 | --------- | वारसा हक्काने मिळणाऱ्या मालमत्तेवर . |
| 8 | सीमा कर/कस्टम | 1962 | कस्टम कायदा 1962 | भारतातून निर्यात |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ड्युटी | | | केलेल्या वस्तूवर व आयात केलेल्या वस्तूवर हा अप्रत्यक्ष कर लावला जातो. |
| 9 | विक्रीकर(VAT) | 2005 | | विविध वस्तूच्या विक्रीवर हा कर आकरला जातो |
| 10 | सेवा कर | 1994-95 | 88 वि घटना दुरुस्ती कायदा 2003 | विविध सेवावर हा कर आकरला जातो |

- **वैयक्तिक आयकर/प्राप्तिकर :** (Personal Income Tax)

इंग्रज यांनी 1860 मध्ये भारतीयांवर पहिल्यांदा आयकर/प्राप्तिकर लागू गेला. प्राप्तिकराची घोषणा जेम्स विल्सन या पहिल्या इंग्रज 'फायनान्स मेंबर' ने 1860 मध्ये केली.उत्पन्नावर आकारला जाणारा कर म्हणजे आयकर, भारतीय राज्यघटनेतील 7 व्या परिशिष्टातील केंद्रसूचीतील विषय क्रमांक 82 नुसार कृषी उत्पन्न वगळता इतर उत्पन्नावर केंद्र आयकर आकारते. कोणते उत्पन्न ग्राहय धरायचे हे त्या

देशातील कायदेशीर पद्धतीनुसार ठरते. केंद्र सरकार आकारत असलेल्या आयकरासाठी सध्या 'आयकर कायदा 1961' आणि 'आयकर नियम 1962' लागू आहे. राज्यसूचीतील विषय क्रमांक 46 नुसार कृषी उत्पन्नावर राज्यांना आयकर आकारण्याचा अधिकार आहे. (अर्थात कोणत्याच राज्याने कृषी उत्पन्नावर कर आकारलेला नाही.)

वैयक्तिक आयकर केंद्राला उत्पन्न मिळवून देणाऱ्या प्रमुख करांपैकी एक असला, तरी वैयक्तिक आयकर प्रगतिशील (Progressive) असल्यामुळे उत्पनाच्या पुनर्वितरणात तो महत्त्वाची भूमिका बजावतो मात्र भारतात या उत्पन्नाच्या पुनर्वितरणात सकारात्मक भूमिका बजावण्यात आयकर अपयशी ठरला आहे. कृषी उत्पन्न आयकराच्या जाळ्याच्या बाहेर असणे, असंघटित व अनोंदणीकृत यंत्रणेचे मोठे प्रमाण असणे, काळ्या पैशाचे प्रमाण लक्षणीय असणे ही यामागील कारण आहेत. आयकर हा लवचिक स्वरूपाचा कर आहे. परंतु भारतात आयकराची लवचिकत्ता आढळून येत नाही. भारतात अजूनही बरेचसे व्यवहार अनौपचारिक किंवा रोखीच्या स्वरूपात होतात. नोटाबंदीनंतर डिजिटल व्यवहार वाढले असले, तरी काळ्या पैशाने मोठी समांतर व्यवस्था निर्माण केल्यामुळे बरेचसे उत्पन्न आयकर कक्षेच्या बाहेर राहते

भारतात आयकराचे दर प्रगतिशील आहेत. आयकर 'भरण्याची क्षमता' (ability to pay) तत्त्वावर आकारला जातो. श्रीमंत व्यक्ती जास्त आयकर भरू शकतात, म्हणून जास्त उत्पन्नावर आयकराचा दर जास्त आहे. 2016-17 पर्यंत आयकराचे 10%, 20% आणि 30% असे 3 स्तर (slabs) होते. 2017- 18 पासून आयकराचे 5%, 20% आणि 30% असे 3 स्तर ठरविण्यात आले. या दरांना आता विद्यमान दर (existing rates) असे म्हटले जाते.. जे करदाते विद्यमान दराने कर भरू इच्छितात, ते विविध करसवलती घेण्यास पात्र असतात. 2020-21 अर्थसंकल्पात

आयकराचे 5%, 10%, 15%, 20%, 25% अणि 30% असे वेगळे 6 स्तर घोषित करण्यात आले. या दरांना नवीन दर (new rates) असे म्हटले जाते.

वित्तीय वर्ष 2023-24 आयकरचे दर :-

| अ. क्र | आयकर सीमा | आयकर दर (%) |
|---|---|---|
| 1 | 3 लाख पर्यंत | 0 |
| | 3 ते 6 लाख | 5 |
| | 6ते 9 लाख | 10 |
| | 9 ते 12 लाख | 15 |
| | 12 ते 15 लाख | 20 |
| | 15 लाख च्या वर | 30 |

**मूल्यवर्धित करप्रणाली (Value Added Tax: VAT)**

मूल्यवर्धित करप्रणालीचे प्रतिपादन १९१८ मध्ये एफ्.वान. सिमेस यांनी केले होते. भारतात व्हॅट लावण्याची शिफारस राष्ट्रीय विकास परिषदेने 1956-57 साली केली होती. त्यानंतर 1976 च्या एल्. के. झा समिती (अप्रत्यक्ष कर चौकशी समिती) ने अबकारी करासाठी VAT लावण्याची शिफारस केली. त्यानुसार MANVAT (Manufacturing VAT) पद्धती सुरु करण्यात आली. त्याचे रुपांतर 1986-87 च्या बजेटमध्ये MODVAT (Modified VAT) मध्ये तर MODVAT चे रुपांतर 2000-01 च्या बजेटमध्ये CENVAT (Central VAT) करण्यात आले.1991 च्या 'राजा चेलय्या समिती'ने (Tax Reforms Com- mittee) विक्री करासाठी सर्वसमावेशक अशा VAT प्रणालीचा अवलंब करून राज्य विक्री कर व केंद्रीय उत्पादन शुल्क त्यात विलीन करण्याची शिफारस केली. 1999

मध्ये भरलेल्या राज्ये/कें. प्र. च्या मुख्यमंत्र्यांच्या परिषदेत VAT पद्धत्त लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. • जुलै २००० मध्ये VAT लागू करण्याच्या प्रक्रियेची देखरेख पाहण्यासाठी 'Empowered Committee of State Finance Ministers' ची स्थापना करण्यात आली. 01 एप्रिल 2003 पासून VAT लावण्याबाबत झालेल्या एकमताची अंमलबजावणी मात्र होऊ शकली नाही. 28 जून 2004 रोजी झालेल्या Empowered Committee च्या मिटींगमध्ये (Convener: असिम दासगुप्ता) 1 एप्रिल 2005 पासून राज्य-स्तरीय VAT ची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेण्यात आला.सर्व 29 राज्ये व 5 केंद्रशासित प्रदेश यांनी व्हॅट लागू करण्यात आला. अंदमान व निकोबार बेटे तसेच लक्षद्वीप या दोन केंद्रशासित प्रदेशांमध्ये विक्री कर आकारला जात नसल्याने तेथे व्हॅटचा प्रश्न उद्भवत नाही. महाराष्ट्रातील विक्री कर/व्हॅट हा स्वातंत्र्यापूर्वी बॉम्बे प्रांतामध्ये सर्वप्रथम तंबाखूच्या विक्रीवर २४ मार्च, १९३८ रोजी विक्री कर लावण्यात आला होता. कालांतराने मोटर स्पिरीटवर विक्री कर लावण्यात आला.08 मार्च, 1946 रोजी बॉम्बे विक्री कर कायदा, 1946 (Bombay . Sales Tax Act, 1946) संमत करण्यात येऊन एक सामान्य विक्री कर (a general Sales Tax) लागू करण्यात आला. पुढील कालावधीत विक्री कर आकारणीच्या पद्धतीत खूप बदल करण्यात आले.

**VAT ची महत्वाची वैशिष्ट्ये :-**

1. VAT च्या कार्यवाहीमुळे विक्री कराच्या आकारणीबाबत आढळून येणारा 'धबधबा परिणाम' (Cascading effect) टाळता येईल.
2. सध्या असलेले विक्री कर दराचे बाहुल्य (Multiple rates) कमी होऊन २-३ दर ठरविले जातील. तसेच, टर्नओव्हर टॅक्स, विक्री करावरील अधिभार, वाढीव अधिभार इ. कर VAT या एकाच कराचा हिस्सा बनतील.

3. वार्षिक टर्नओव्हर ५ लाखापेक्षा अधिक असलेल्या डिलर्ससाठी नोंदणी आवश्यक असेल. म्हणजेच, ५ लाखापेक्षा कमी टर्नओव्हर असलेल्या डिलर्संना VAT भरावा लागणार नाही.
4. प्रत्येक करदात्यास ११ अंक असलेला Identification Num- ber देण्यात येईल.

➢ **वस्तू व सेवा कर (Goods and Services Tax: GST)**

वस्तू व सेवा कर (Goods and Services Tax: GST) ही उत्पादकापासून उपभोक्त्यापर्यंत वस्तू व सेवांच्या पुरवठ्याच्या प्रत्येक टप्प्यावर लागू केलेली एकेरी मूल्यवर्धीत करप्रणाली आहे, जेणे करून संपूर्ण देशासाठी एकच अप्रत्यक्ष कर असेल व ज्यामुळे भारत एक एकीकृत सामाईक बाजार प्रस्थापित होईल. आदानांच्या खरेदीवर भरलेल्या कराची वजावट प्रदानांच्या पुरवठ्यावर भरावयाच्या क़रातून मिळत असल्याने हा कर केवळ मूल्यवर्धनावर लागू होईल व ग्राहकावर केवळ शेवटच्या विक्रेत्याने आकारलेल्या कराचे ओझे पडेल. त्यामुळे संपूर्ण पुरवठा साखळतील 'करावरील कर' परिणाम (tax- on-tax or cascading effect) नष्ट होण्यास मदत होईल.

भारतात VAT प्रणाली प्रथम केंद्रीय अबकारी कराला  लागू करण्यात आली. त्यांनतर VAT प्रणाली 01 एप्रिल, 2005 पासून राज्य विक्री कराला लागू करण्यात आली. आता VAT प्रणाली बहुतेक सर्व अप्रत्यक्ष करांना लागू करून GST हा एकच करप्रणाली सुरू करण्यात आली आहे.GST ची संकल्पना सर्वप्रथम 2004  च्या विजय केळकर समितीने मांडली. 2006-07 च्या अर्थसंकल्पात अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनी 01 एप्रिल, 2010 पासून GST लागू करण्याची घोषणा केली. मात्र ते शक्य न झाल्याने दरवर्षी ही तारीख एकेक वर्षाने पुढे ढकलण्यात आली.

122 वे घटनादुरूस्ती विधेयक, 2014 लोकसभेत मांडले.06 मे, 2015 रोजी लोकसभेत विधेयक पारित केल्यानंतर राज्यसभेने 03 ऑगस्ट, 2016 पारित केले. त्यानंतर विधेयक 8 सप्टेंबर, 2016 रोजी राष्ट्रपतींनी विधेयकास संमती दिल्यानंतर 16 सप्टेंबर, 2016 रोजी 122 वे घटनादुरूस्ती विधेयक 101 वा घटनादुरूस्ती कायदा म्हणून अंमलात आला.01 एप्रिल, 2017 पासून देशभरात GST लागू करण्यात आला.

- **GST मध्ये वर्ग करण्यात आलेले कर** :

भारतात कॅनडाप्रमाणे 'दुहेरी GST' (Dual GST) व्यवस्था स्विकारण्यात आली आहे. त्यामध्ये केंद्र सरकारमार्फत आकारला जाणारा 'केंद्रीय जी.एस.टी.' (Central GST) आणि राज्यांमार्फत आकाराला जाणारा 'राज्य जी.एस.टी.' (State GST) यांचा समावेश आहे, त्यांमध्ये वर्ग करण्यात आलेले कर पुढीलप्रमाणेः

1) केंद्रीय उत्पादन शुल्क/अबकारी कर
2) अतिरिक्त उत्पादन शुल्क
3) औषधी व सौंदर्य प्रसाधने कायद्यांतर्गत आकारले जाणारे उत्पादन शुल्क
4) सेवा कर
5) अतिरिक्त सीमा शुल्क (काऊंटरवेलिंग ड्युटी)
6) विशेष अतिरिक्त सीमा शुल्क
7) केंद्रीय अधिभार व उपकर

**SGST मध्ये वर्ग करण्यात आलेले करः**

1) विक्री कर / व्हॅट
2) करमणूक कर (स्थानिक संस्थांनी आकारलेल्या करमणूक कराव्यतिरिक्त)
3) केंद्रीय विक्री कर

**4)** जकात व प्रवेश कर

**5)** लक्झरी कर

**6)** लॉटरी, जुगार व सट्टा यांवरील कर

**7)** खरेदी कर

**8)** राज्याधिकार व उपकर राज्य अधिकार

- **GST मध्ये वर्ग न करण्यात आलेले करः**

  i) मूलभूत सीमा शुल्क

  ii) निर्यात कर

  iii) रस्ते व प्रवासी कर

  iv) टोल कर

  v) प्रॉपर्टी कर

  vi) मुद्रांक शुल्क

  vii) वीज कर

**संदर्भ ग्रंथ :-**


1) डॉ. किरण देसले,स्पर्धा परीक्षा अर्थशास्त्र दीपस्तंभ प्रकाशन,जळगाव 2022

2) रंजन कोळंबे, भारतीय अर्थव्यवस्था, भगीरथ प्रकाशन,पुणे 2023

3) M.C. Vaish & H.S.Agrawal Public Finance Wiley Eastern limited 1992

4) M.M.Sury, Indian tax system, New century publication, 2015

5) Mahesh c.Purohit tax system in India Oxford University press,2014

6) Yeshwant sinha, indirect tax reform in India,SEGA publication,2020.


***

# भारताची महासत्तेच्या दिशेने वाटचाल आणि सामाजिक समस्या व आव्हाने

**संजीवनी श्रीकांत जाधव**

एम. ए. समाजशास्त्र (संशोधन विद्यार्थिनी)

**प्रस्तावना :**

भारत हा खेडयाचा व कृषी प्रधान देश आहे. भारतीय समाजातील 70% लोक हे शेती व्यवसाय करतांना आढळुन येतात. भारतीय समाज हा शेतीवर अवलंबुन आहे आणि प्रत्येक समाजाच्या विकासाची प्रक्रिया वेगळी आहे. जिवन मान उंच्चावण्यासाठी ग्रामीण विकास होणे ही एक काळाची गरज मानली जाते. सर्व जगभर शहरांचा सतत विकास होत असुन सुध्दा जागतीक लोकसंख्येपैकी ग्रामिण भागात राहणाऱ्याचे प्रमाण 1950 मध्ये 70% पेक्षा थोडे अधिक होते.

भारत हा खेडयांचा देश आहे आणि येथील जनता खेडयामध्येच वास्तव्य करते असे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी म्हंटले आहे. महात्मा गांधी हे वाक्य ग्रामिण विकासाचा उदेशावर आणि महत्वावर विशेष भर देताना आपणास दिसुन येते. भारताच्या ग्रामिण भागाचा विकास झाल्या शिवाय भारता हा जगाच्या आर्थिक विकासाच्या प्रगती मध्ये प्रवेश घेवु शकत नाही. भारताच्या पंचवार्षिक योजनामुळे ग्रामिण विकासाला चालना मिळाली. कोणत्याही राष्ट्रात ग्रामिण समाज उल्लेखनीय कामगीरी बजावित असतो. अन्नधान्ने व कच्चा माल याचे उत्पादनही ग्रामीण भागातच होत असतांना आपनास

दिसुन येते. राष्ट्राची नैसर्गिक साधन संपत्ती ही वहुतांशी ग्रामिण भागातच उपलब्ध होत असते. भारता सारख्या विकसनशील राष्ट्रांना तर ग्रामिण विकासाची गरज फारच तीवृतेने भासते. परंपरा प्रिय ग्रामिण जनतेला आधुनिक शास्त्रीय दृष्टीकोन पटवुन देवुन तिला आर्थिक विकासाच्या मार्गावर शक्य तितक्या लवकर आणण्याचे प्रयत्न शासनाला करावे लागतात. शिक्षणाच्या व दळण वळणाच्या सोयी भरपुर प्रमाणत पोहचुन ग्रामिण जनतेला विकासोन्मुख केल्यानंतरच ग्रामिण विकासाचे पाऊल पुढे पडु शकते. भारतातील ग्रामिण विकासाचा इतिहास पाहील्यास असले आढळते की भारत हा खेडयांचा देश आहे. तीर्थ क्षेत्रं व राजधान्यांची ठिकाणे हीच मोठी शहरे असायची बाकी सर्व खेडी.

19 व्या शतकात भारतातील औदयोगीकरणाला सुरूवात झाली. वेकार कारागीर शहरात नोकरी धंदा शोधयला जावू लागती पण तेथे ही उदयोगांची वाढ फारशी न झाल्याने बेकार कारागीरांना शेती कडे वळावे लागले. ग्रामिण लोकसंख्येचे प्रमाण 68.8% असुन खेडे गांवाची संख्या 35.85% आहे. मोगल काळामध्ये ब्रिटिश काळामध्ये स्वातंत्र्यता आंदोलनाच्या वेळी किंवा स्वातंत्र प्राप्ती नंतर भारत सरकारने पंचवार्षिक योजनांच्या माध्यामांतुन हा विकास होताना दिसुन येते.

भारतामध्ये ग्रामीण विकासांची प्रक्रिया प्राचीन काळा पासुन चालत आली आहे. भारता मधील खेडेगावानी व वेगवेगळ्या राज्यांनी राजकिय नेत्यानी आपआपल्या इच्छा व स्वार्या साठी विकास करण्याचा प्रयत्न केला.

ग्रामीण भागात लघु व कुठीर उदयोगांना मोठ्या प्रमाणत वाढविण्याचा प्रयत्न केला. सुख सुविधांचा विरुतार मोठया प्रमणात

झालेला दिसुन येतो. आज ग्रामिण समाज हा 21व्या  शतकात प्रवेश करत आहे. ग्रामिण भागात दुरदर्शन, बैंक, विमा, बचतगट, वाहन, जल सिंचन इ. अनेक सुविधांचा विकास मोठ्या प्रमाणात होतांना आपनास दिसुन येते ग्रामीण विकास हा अपाटयाने प्रगती करतांना दिसुन येतो अनेक सुख सुविधा मोठ्या प्रमाणात वाढताना आपनास दिसुन येतात, आर्थिक स्तर ही वाढलेला आहे.

महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरु आणि सुभाष चंद्र बोस यांनी ग्रामिण विकासचे समर्थन केले आणि शेतक-यांच्य मालांना भाव वाढविण्यासाठी अनेक आंदोलने केले.

नवनी पंचवार्षिक योजना 1997-2002 मध्ये ही आठव्या योजनांचे कार्यक्रम चालने परंतु ग्रामिण विकासांची प्रक्रिया तेजीने किंवा रोजगार कार्यक्रमाला प्रभावी बनण्यासाठी ग्रामिण विकास व गरीबी संबंधीत काही योजनांचा समावेश केला आहे. ग्रामिण भागामध्ये स्वंगरोजगार उपलब्ध करण्यासाठी विविध योजनांचा लाभ देण्यात येत आहे. ग्रामिण विकास कार्यक्रम, ग्रामिण भागातील महिला व बालविकास योजना 1 एप्रिल 1998 स्वर्ण जयंती स्वंयरोजगार योजना सुरुवात केली आणि जवाहर योजनेला ग्राम समृध्दी योजना, इंदीरा अवास योजना या जागी समग्र आवास योजना सुरू केली. वाजपेयी सरकारने  ग्रामिण विकासासाठी ग्राम पंचायतीला 50,000 रू पर्यत वाली योजना देण्याचा अधिकार ग्राम पंचायतीना दिला गेला. आणि 1999 ग्राम सभा वर्ष  घोषीत केले गेले. सामूदायीक विकास कार्यक्रम व पंचायत राज व्यवस्थेच्या माध्यमातुन ग्रामिण विकास झापाटयाने होतान आपणास दिसुन येतो. गावामध्ये जलसिंचन, विज, पाणी  पुरवठा, आरोग्य, शिक्षण,

योजना इ. सार्वजनिक सुविध उपलब्ध झाल्या आहेत. ते केवळ ग्रामिण विकासामुळेच.

**ग्रामिण विकासाच्या व्याख्या:**

1) **उमा शौली यांच्या मते** : "ग्रामिण विकास हे एक ग्रामिण भागामध्ये राहणा-या अनेक भागामध्ये राहणाच्या अनेक कमी ऊत्पत्र वाले लोकांच्या जिवन स्तरामध्ये सुधारणा करने आणि त्यांच्या विकासा मध्ये आत्म प्रोत्साहन देणे म्हणजेच ग्रामिण विकास होय."

2) **एस.एम.साह यांच्या मते:** "ग्रामिण विकास हे एक पध्दती आहे त्यांच्या अंतर्गत सामूहिक प्रयत्नाने शहरी भागाच्या बाहेर राहणा-या लोकांच्या काव्याना किंवा आत्मज्ञाना मध्ये सुधारण करण्याचा प्रयत्ल केला जातो."

**ग्रामिण विकासाचे उद्‌देश :**

1. ग्रामिण भागामध्ये शेती आणि उदयोग या दोन्हीही उत्पादकता च्या सोबत उत्पादना मध्ये वाढ करणे.

2. सर्वांसाठी लाभदायक योजना सुरू करूने हा ग्रामिण विकासाचा मुख्या उद्‌देश आहे.

3. ग्रामिण भागातील लोकांना स्वावलंबी बनविले.

4. माती, पाणी, हवा, जंगल अशा महत्वपूर्ण नैसर्गिक संसाधनाला व्यवस्थीत ठेवुन मानव आणि नैसर्गिक वातावरण बनविणे.

5. भारत हा खेडयाचा देश आहे म्हणुन त्यांच्या आर्थिक विकासामध्ये वाढ होणे.

6. स्वार्थसाठी नेतृत्व यासाठी विकास हा ग्रामिण भागाचा उद्‌देश आहे.

**ग्रहितकृतेय :**

1) ग्रामिण विकास हा विविध शासकिय योजना वर आधारीत आहे.

2) ग्रामिण विकास स्वावलंबी  बनविण्यासाठी आहे.

3) भारत हा खेडयाचा देश आहे म्हणून आर्थिक विकास गरजेचे आहे.

4) ग्रामीण भागातील लोकानपर्यंत माहिती व साधनांचा पुरवठा करणे.

5) ग्रामीण भागातील लोकानां योग्य मार्गदर्शन करणे.

**संशोधन अराखडा :**

यामध्ये वर्णनात्मक संशोधन अराखडा व विश्लेषत्याक अराखडा वापरण्यात आला आहे व अशे विश्लेषण करण्यात आले आहे.

**ग्रामीण विकासात  मुख्य घटक :**

**शेती :** शेतीचा विकास मिशनचा विकास करणे नि. वियानांचा प्रयोग करुण शेतीचा विकास करण्यात येतो. किटक नाशक औषधीचा उपयोग करणे व्यवसायांचा विकास करणे हे शेती विकासाचे मुख्य घटक आहेत. व हया द्वारे शेतीचा विकास केला जातो.

**ग्रामिण उदयोग:** ग्रामिण भागामध्ये उदयोगांचा विकास करने आधूनिकीकरण व्यवसायिक प्रशिक्षणे देवून ग्रामिण उदयोंगाचा विकास घडवुन आणला जातो. ग्रामिण उदयोगांचे खुप मोठ्या प्रमाणत प्रगती झालेली आपणास दिसुन येते.

**शिक्षण :** शिक्षणाचा प्रसार करणे शेती उत्पादनात वाढ करणे यांचे प्रशिक्षण देणे उदयोगांचा विकास करणे मेळाव्याचे आयोजन करणे.

**सुविधा :** ग्रामिण भागाच्या विकासासाठी खुप मोठ्या प्रमाणात सुविधांचा विकास केला जातो आरोग्यांच्या सेवा, कुंटूव कल्याण कार्यक्रम ग्रामिण भागामध्ये कार्यशाळा भरविणे बैंक इ.

**ग्रामिण विकासाचे वैशिष्टे :** ग्रामिण भागामध्ये कमी योजनांची ग्रामिण योजनांचा प्रमुख लाभ घेण्यासाठी ग्रामिण विकास हे एक

प्रमुख आहे. ग्रामिण विकासांच्या योजनांचा लाभ घेण्यासठी गावातील गरीब लोकापर्यंत पोहचविण्याचे कार्य ग्रामिण युवक वर्ग यांचा उपयोग करीत आहेत. ग्रामिण साधानांचे एकत्रिकरण करणे औदयोगीक उत्पादन वाढविणे आणि कल्यानकारी विविध सुविधांचा विकास होत आहे. ग्रामिण गरीब वर्गातील पुरुष, महीला आणि मुले यांच्या मध्ये उत्पादन क्षमता उदयोग शिलतां विकास करणे हे एक अत्यंत महत्वाचे वैशिष्टे आहे. ग्रामिण भागामध्ये जेथे गरीब अधिक आहे. तेथे साधनांना एकत्रीत करून लोकाचे कल्याण आणि उत्पादन संबधी सेवा उपलब्ध करणे. ग्रामिण भागामध्ये सामाजीक सेवा उदा: शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, शाळा, महामंडळ, बैंक इ. चा विकास ग्रामिण भागामध्ये झाला आहे.

**ग्रामिण विकासाचे महत्व** : भारता मध्ये स्वातंत्र्या नंतर नियोजन काळामध्ये जेव्हा ग्रामिण विकासाची प्रक्रिया सुरू झाली तेव्हा भारतीय ग्रामिण जिवनांमध्ये अनेक स्तरातध्ये परिवर्तन होताना आपनास पाहावयास मिळतात. सरकार दवारे चालविल्या गेलेल्या ग्रामिण विकास कार्यक्रमांची रचनात्मक भूमिकेच्या कारणामुळे ग्रामिण विकासाचे महत्व वाढलेले आहे. मागासलेल्या ग्रामिण भागात पाणीसाठा, विजपुरवठा, जलसिंचन, दळणवळण, संचार साधणे बैंक इ. सुविधांचा विकास झाल्यामुळे देशाच्या आर्थिक विकासामध्ये ग्रामिण लोकांचे जीवन मान उंचावलेले आहे.

**1) ग्रामीण गरीबी निवारण :** ग्रामीण विकासाच्या क्षेत्रामध्ये ग्रामिण विकासा संबंधी गती वाढलेली आहे. या मध्ये ग्रामिण गरीब लोकांच्या उत्पादन कार्यामध्ये वाढ  झालेली आहे. ग्रामिण विकास कार्यक्रमांणा अंतर्गत गरीब  कुटूवांना आर्थिक मदत करूण त्यांचे दारिद्र  नष्ट करण्यांचा प्रयत्न केला जात आहे. भारता मध्ये 1977-

78 मध्ये खुप मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागामध्ये गरिबी चे प्रमाण 30.7 करोड लोक गरिबी मध्ये जीवन जगत होते. पण आज 2000 पर्यंत हि संख्या खूप कमी झाली आहे. त्यामुळे त्यांच्या जिवन मानात बदल झालेला आपणास दिसुन येतो.

**2) बेरोजगारी निर्मुलन** : भारतातध्ये गरिबी से एक वेरोजगारीचे मुख्य कारण मानले जाते. ग्रामिण भागामध्ये आवश्यकते पेक्षा अधिक लोक शेती हा व्यवसाय करतात. त्यामुळे बेरोजगारीचे प्रमाण वाढतांना दिसून येत आहे. ग्रामिण भागामध्ये बेरोजगारी दूर करण्यासठी ग्रामिण विकास आवश्यक आहे. जवाहर रोजगार योजनेचा उद्‌देश डी ग्रामिण गरीव लोकांची उपजिवीका भागविण्यासाठी उपलब्ध करणे, ग्रामिण विकास कार्यक्रमांच्या अतर्गत लघु व कुटीर उदयोगांची स्थापना केली जाते त्यामुळे लोकांना काम मिळते.

**3) ग्रामीण शेतीचा विकास :** ग्रामीण विकासाचे परिणाम स्वरुप शेती कार्यामध्ये जल सिंचन किटक नाशक मिशन इ. कारणामुळे शेतीचा विकास खुप मोठ्या प्रमाणात झाला आहे. कृषी क्षेत्रामध्ये शेतक-यासाठी नविन वियानांची माहिती मिळाली. त्यामुळे ग्रामिण शेतीचा विकास झाला व ग्रामिण परिवर्तन झाले. 4) आधुनिकी करण : कृषी उदयोगांमध्ये आधुनिकी करणामुळे विकास होत आहे. जुन्या प्रया व परंपरां नष्ट होत चालल्या आहेत. त्यामुळे शेतीचा विकास होत आहे. आधुनिकीकरणामुळे ग्रामिण भागाचा विकास हा झपाटयाने होत चालेला आहे.

**5) आर्थिक असमानता मध्ये कमी:** भारता मध्ये आर्थिक विषमता खुप मोठ्या प्रमाणत पहावयास मिळते. गरिब आणि चिमंता मध्ये खुप मोठ्या प्रमाणात अंतर होते ते आता कमी झालेले दिसुन येते.

भारता मध्ये आज आर्थिक विषमतेचे प्रमाण खुपच कमी दिसुन येत आहे.

**6) ग्रामिण भागामध्ये संसाधनाचा विकास :** विकास खुप मोठ्या प्रमाणात झालेला आहे. गावामध्ये रस्ता योजना दळण वळण साधने, बैंक ग्रामिण लोकामध्ये नैसर्गिक साधने खूप मोठ्या प्रमाणात मिळत आहेत. त्यामुळे ग्रामिण विकास झाला आहे.

**7) शिक्षण आणि तांत्रिक ज्ञानात वाढ झाली:** शिक्षण आणि तांत्रिक ज्ञानामुळे ग्रामिण भागामध्ये खूप मोठ्या प्रमाणात विकास झालेला आहे. ग्रामिण भागामध्ये प्रत्येक गावामध्ये शिक्षणांची सुविधा उपलब्ध झाली आहे आणि प्रौढ शिक्षनामुळे ग्रामिण भागाचा विकास झालेला आहे. त्यामुळे ग्रामिण भागामध्ये राहणारे लोक हे अंधश्रध्दा पाळत होते अंधशध्देला बळी पडत होते ते आता शिक्षनामुळे कमी झालेले आहे. ग्रामिण युवक व युवती यांना ज्ञान दिले जाते व त्याचे प्रशिक्षण घेतले जाते त्यामुळे ग्रामिण भागाचा विकास हा झपाटयाने झालेला दिसुन येतो.

**8) ग्रामीण जनतेची राष्ट्र निर्मीती साठी भागीदारी:** ग्रामीण विकासामुळे लोकामध्ये राष्ट्र निर्माती साठी आपल्या भागीदारीची जानीव झालेली आहे. ही जानीव उत्पादनाच्या माध्यमातुन किवा राजकीय क्षेत्राच्या माध्यामातुन मिळाली आहे. आर्थिक विकासा बरोबरच राजकीस क्षेत्रामध्ये ही ग्रामिण नेतृत्वाचे क्षेत्र वाढले आहे. महिला मध्ये हि नेतृत्व करण्याची क्षमता निर्मीती झाली आहे जे पूर्वी महिला मध्ये संकुचित वृत्ती होती व तिला चुल व मुल म्हणुन तीच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन होता. तो आता कमी झाला आहे त्यामुळे ग्रामिण विकास झापाटवाने होत चालेला आहे.

**9) ग्रामिण विकासाचे चक्रिय प्रवाह:** ग्रामिण विकास कार्यक्रमाध्ये चक्रिय विकासाचा प्रवाह दिसुन येतो. ग्रामिण रोजगार उदयाँगाची स्थापना करणे त्यामुळे रोजगार मिळतो गरिवीचे प्रमाण कमी झाले. उत्पदानामध्ये खुप मोठ्या प्रमाणात वाठ झालेली दिसुन येते.

त्यामुळे भारत देशाचा आर्थिक विकास खूप मोठ्या प्रमाणात बाढलेला आपनास दिसुन येतो.

**निष्कर्ष :** भारतीय समाजामध्ये ग्रामिण विकासाचे विशेष असे महत्व निर्मान झाले आहे. भारतीय ग्रामीण समाजामध्ये ग्रामीण विकासाला खुप मोठ्या प्रमाणात चालना मिळाली आहे. ग्रामीण विकासामुळे आज खुप मोठ्या प्रमाणात गरिव व होत करू शेतक-याचा झपाटयाने विकास झालेला आपणास दिसुन येतो.

ग्रामिण भागात लघु व कुठीर उदयोगांना चालना मिळाली गरिव व श्रीमंतीची दरी नष्ट झाली. त्यामुळे ग्रामिण विकास. खुप मोठ्या प्रमानात झाला शिक्षनाला व तंत्रज्ञानाला चालना मिळाली. नवनविन योजनाची निर्मीती झाली, आजच्या ग्रामिण समाजावर आधुनिकी करणाचा प्रभाव खुप मोठया प्रमाणावर पडलेला आपणास दिसुन येतो. बलुत्तेदारी पध्दत जवळपास नष्टच होत चालेली आहे. आज प्रत्येक माणुसा हा आधुनिकतेच्या हव्यासाकडे वळत आहे. त्यामुळे ग्रामिण भागातील ज्या काही जुन्या रूठी प्रथा व परंपरा आहेत. त्या नष्ट होत चाललेल्या आहेत. त्यामुळे आजच्या युगात ग्रामिण भागाचे खुप मोठ्या प्रमाणात विकास होताना आपनास दिसुन येतो. आर्थिक विषमतेची दरी कमी होत चालेली आहे. ग्रामिण भागा मध्ये दळण वळणाच्या साधनांचा विकास झपाटयाने झालेला आहे. आजच्या संगणकीय युगात ग्रामिण भागाचा खुप झपाटयाने विकास होताना आपणास दिसुन येत आहे व जे पुर्विचे गांधीजीचे स्वप्न होते ते आज साकार होताना आपनास दिसुन येते आहे. मानवी सभ्यता व संस्कृती मध्ये जो बदल घडते किंवा जे परिवर्तन होत आहे तो बदल किंवा परिवर्तनच विकासाचाच भाग असतो विकास हा एक सर्व व्यापी शब्द असुन. सर्व व्यापी घटनांचा त्या मध्ये समावेश होतो. आज संपूर्ण जग या विकासाच्या संकल्पनेत प्रभावित झालेले आहे. विकास हि एक सतत चालणारी प्रक्रिया आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

1. भारत में ग्रामिण विकास डॉ.डी.सी. पत्न विश्व भारती पब्लिकेशन्य नवी दिल्ली - 110002
2. ग्रामिण समाज शास्त्र - दा.धो. काचोळे
3. भारतीस समाज रचना डॉ. गुरूनाथ गोंडे पिंपळापुरे ॲन्ड क. पब्लिशर्स नागपुर
4. भारतीय मानव संसाधन विकास अमोल लक्ष्मण घोडके सामान्य अध्यायन पेपर - 3 युनिक अकॅडमी
5. लोकतांत्रिक विक्रेद्रिकरण और ग्रामिण विकास प्रो. पी.पी. गौर एव प्रो. आरके मराठा अर्जुन पब्लिशिंग हाऊस इंटरनेट

***

# ‘भारताच्या महासत्तेकडील वाटचालीत जागतिकीकरण व भांडवलवाद यांचा जनसामान्यावर होणारा प्रभाव’

**प्रा. डॉ. राजू लक्ष्मण आदे**
सहयोगी प्राध्यापक तथा अर्थशास्त्र
विभागप्रमुख ने. हि. महा. ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर (म.रा.) ४४१२०६

**सारांश :—**
भारताच्या महासत्तेकडील वाटचालीत आजच्या आधुनिक व बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगाात तसेच नवीन आर्थिक सुधारणा काळात जागतिकीकरण आणि भांडवलवाद यासारख्या आर्थिक घटनांचा जागतिक स्तरावर त्यांचे परिणाम झालेले दिसून येतात. संपूर्ण जगातील जनसामान्यांवर त्यांचे चांगले—वाईट परिणाम झाल्याचे आढळून येतांना दिसतात. जागतिकीकरण आणि भांडवलवाद यांच्या प्रभावामुळे विकसीत अर्थव्यवस्था या भांडवलवादी तथा आर्थिक महाशक्ती राष्ट्राच्या रूपाने उदयास येत आहेत. याऊलट आर्थिकदृष्टया कमकुवत अर्थव्यवस्था या विकसनशील तथा मागासलेल्या अर्थव्यवस्था म्हणून नावारूपास येत आहेत. प्रस्तुत संशोधन लेखात भारताच्या महासत्तेकडील वाटचाली जागतिकीकरण व भांडवलवाद यांच्या सहसंबंधाचे अध्ययन करून त्यांचा जनसामान्यांवर काय परिणाम झालेला आहे. त्या परिणामांचे अध्ययन करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**बीज शब्द (Key Words)** :— भारत, महासत्ता, जागतिकीकरण, भांडवलवाद, जनसामान्यावरील प्रभाव.

**प्रस्तावना :—** सध्याच्या भारताच्या बदलत्या स्वरूपात जागतिक स्तरावर जागतिकीकरण हा शब्द मोठया प्रमाणावर परीचीत झालेला

आहे. सर्वप्रथम जेव्हा सन १९९१ मध्ये जगात नवीन आर्थिक धोरणांची सुरूवात झाली व तेव्हा जागतिकीकरण ही संकल्पना एक महत्वाची व चर्चेचा विषय बनलेला होता. जागतिक पातळीवर आंतरराष्ट्रीय व्यावसायिक पर्यावरणात जे आधुनिक बदल झाले. आणि परिवर्तन होत आहेत, त्यामध्ये जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला प्रथम स्थान देण्यात आला आहे. तसेच जागतिकीकरणामुळे भांडवलवादाला पोषक वातावरण मिळतांना दिसून येत आहे. याला भारत देश देखील अपवाद नाही.

स्वातंत्र्यानंतर भारतात मिश्र अर्थव्यवस्थेचा स्विकार करण्यात आला. त्याचे मुख्य कारण म्हणजे भारत देशात कल्याणकारी तथा समाजवादी समाजरचना निर्मितीची अपेक्षा बाळगली होती. सन १९९१ मध्ये ज्या नवीन आर्थिक धोरणांचा स्वीकार कण्यात आला, त्या पूर्णपणे बाजारतंत्र आणि भांडवलवादाशी संबंधीत होत्या. त्यामुळे भारत आपोआपच भांडवलवादाच्या जाळयात सापडला. भांडवलवाद आणि भांडवलदारांचे वर्चस्व वाढविण्याकरीता जनसामान्य लोकांच्या व उपभोक्ता वर्गाच्या लाभांना उपेक्षित ठेवून उद्योगपती, कारखानदार व भांडवलदारांना नफा मिळवून देणारे नियम आणि कायदे बनविण्याच्या निर्णयाला सुरूवात झाली. भारताच्या महासत्तेकडील वाटचालीत जागतिकीकरण आणि भांडवलवाद यांचा जनसामान्यांवर विपरित परिणाम होत आहे. त्यामुळे भारतातील साहित्य, संस्कृती, संचार आणि मानसिकतेमध्ये परिर्वतने होतांना दिसून येत आहेत. त्यामुळे भारताच्या महासत्तेकडे वाटचालीत भारतासारख्या विकसनशील व मागासलेल्या देशांवर आर्थिक, सामाजिक, राजकीय, पर्यावरणीय, व नैतिक परिणामामुळे प्रभावित होऊन यासारख्या देशामध्ये गरीबी, बेरोजगारीची समस्या रूद्र रूप धारण करून गंभीर समस्या बनलेली आहे आणि याचा संपूर्ण फायदा भांडवलवादी राष्ट्रांना मिळत आहे. त्यामुळे भांडवलवादी देश संपन्न व समृध्द होत आहेत तर विकसनशील तथा मागासलेले देश गरीब होतांना दिसुन येतात.

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अध्ययनात भारताच्या महासत्तेकडील वाटचालीत जागतिकीकरण आणि भांडवलवाद

यांचा जनसामान्यांवर कसा परिणाम होतो? हे जाणून घेण्याच्या उद्‌देशाने प्रस्तुत संशोधन विषयाची निवड संशोधनकर्त्याद्वारे करण्यात आली आहे.

**जागतिकीकरणाची संकल्पना :—**

'जागतिकीकरणाचा तात्पर्य व्यापार, रोजगार, तंत्रज्ञान, संचार, पर्यावरण, वित्त, शासन आणि समाजव्यवस्था तथा संस्कृती यासारख्या सर्व क्षेत्रातील होणारे परिवर्तन आहे.'

जगतिकीकरणात वित्त आणि भांडवलाच्या अधिकारात बदल होतो. यासोबतच नवनवीन संशोधन, ज्ञान व तंत्रज्ञानामुळे उपभोगाच्या नवनवीन वस्तूंची निर्मिती झाल्यामूळे समाज आणि लोकांच्या राहणीमानात बदल घडून येतो. आणि राजनैतिक संलग्नता जागतिक नियम तथा कायदे यांच्या व्यवस्थापणाचा सुध्दा समावेश होतो.

अशाप्रकारे जागतिकीकरण केवळ आर्थिकच नव्हे, तर राजनैतिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रामध्ये आपला विस्तार करत असतो. आंतरराष्ट्रीय मौद्रिक नीधीच्या व्याख्येनुसार जागतिकीकरणाचा तात्पर्य वस्तू, सेवा आणि आंतरराष्ट्रीय भांडवलाचा प्रवाह तीव्र गतीने प्रसारीत होणारे तंत्रज्ञान यांचे वाढलेले प्रमाण आणि विविधता यांच्या सहाय्याने जगातील देशांमध्ये नियमित वाढत जाणारे परस्परावलंबन आहे.

**भांडवलवादाची संकल्पना :—**

भांडवलवादाचा तात्पर्य जगामध्ये किंवा देशा—देशांमध्ये भांडवलप्रधान अर्थव्यवस्था निर्माण करणे असा आहे. भांडवलवादात आर्थिक तथा तंत्रज्ञानाच्या दृष्टीकोनातून शक्तीशाली, संपन्न राष्ट्र कमकुवत व गरीब देशांना आपल्या स्पर्धेत टिकू देत नाही. आणि अशा गरीब व कमकुवत देशांचा आर्थिक शोषण करून त्या देशांवर आपला वर्चस्व कायम ठेवण्याचा प्रयत्न करतात. उदा. अमेरीका, इंग्लंड, फ्रॉन्स, जपान, आणि जर्मनी यासारखे विकसीत देश, विकसनशील व मागासलेल्या देशांवर आपला दबाव कायम ठेवतात. प्रस्तुत संशोधन लेखाच्या

अध्ययनाचा मुख्य उद्‌देश भांडवलवादाचा सामान्य देशांवर आणि जनसामान्य लोकांवर कसा परिणाम होतो? हे जाणून घेण्यासाठी प्रस्तुत संशोधन विषयाची निवड करण्यात आली आहे.

**संशोधन विषयाचा उद्‌देश :—** भारताच्या महासत्तेकडील वाटचालीत जागतिकीकरण व भांडवलवाद यांचा जनसामान्यांवर होणारा प्रभाव या शोधनिबंधाचे उद्‌देश खालील प्रमाणे प्रस्तूत केलेले आहेत.

१) या शोध निबंधाद्वारे जागतिकीकरणाची संकल्पना, महत्व आणि आवश्यकता जाणून घेणे.

२) प्रस्तूत शोधपत्राद्वारे भांडवलवादाची संकल्पना आणि उद्‌देश जाणून घेणे.

३) या संशोधन लेखाद्वारे जागतिकीकरणाचे विकसनशील आणि मागासलेल्या देशांवर होणारे परिणाम जाणून घेणे.

४) प्रस्तुत संशोधन लेखाचा उद्‌देश हा भांडवलवादी देशांचा विकसनशील आणि मागासलेल्या देशांवर होणाऱ्या परिणामांची माहिती करून घेणे.

५) भारताच्या महासत्तेकडील वाटचालीत जागतिकीकरण आणि भांडवलवादाचे जनसामान्यांवर होणारे प्रभाव जाणून घेण्याच्या दृष्टीकोनातून प्रस्तूत विषयाच्या शोधनिबंधाची रचना करण्यात आली आहे.

**जागतिकीकरणाची आवश्यकता व महत्व :—**

जगतिकीकरणाच्या प्रक्रियेला जवळपास जगातील संपूर्ण देशांनी मान्यता दिलेली आहे. जागतिक व्यापार संघटनेच्या (WTO) 164 देशांनी सदस्यत्व स्विकारून जागतिकीकरणाचा स्वीकार केलेला आहे. याचे कारण जागतिकीकरणाची आवश्यकता व महत्व यामध्ये नमूद केले आहे.

१) जागतिकीकरणामुळे बाजारापेठांचा विस्तार घडून येतो. त्यामुळे उत्पादनाला मोठया प्रमाणात मागणी निर्माण होतो. एकाच देशावर अवलंबून राहण्याची गरज नसतो. मागणीचा विस्तार होतो. आणि वस्तूंच्या निर्मितीमध्ये विविधता निर्माण होतो.

२) ज्या देशात उत्पादनाचे अतिरीक्त संसाधने उपलब्ध आहेत. अशा संसाधनाचा पुरेशा प्रमाणात उपयोग केला जाऊ शकतो.

३)	जगातील वेगवेगळया बाजारपेठांचा शोध घेता येतो.

४)	आर्थिक विकासामुळे देशातील नागरिकांची क्रयशक्ती वाढतो व त्यामुळे लोकांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावतो.

५)	जागतिकीकरणामुळे केवळ आर्थिकच नाही तर सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व नैतिक परिवर्तने घडून येतात. जगात परस्पर—सहकार्याची भावना निर्माण होऊन एकतेचा वातावरण निर्माण होतो.

६)	जगातील विकसीत देशांचे संशोधन, तंत्रज्ञान आणि व्यवस्थापनाचे नवीन प्रवाह इतर देशांतील उत्पादक उपयोगात आणू शकतात. देशातील कंपन्यांना विकासाची संधी प्राप्त होत असतो.

७)	व्यापारचंक्रामुळे होणाऱ्या परिणामांची तीव्रता टाळता येतो किंवा कमी करता येतो. जागतिकीकरणामुळे वेगवेगळया देशांचा एक दुसऱ्या देशांशी व्यापार घडून येतो. तेजी आणि मंदीचे चक्र एकाच वेळी सगळया देशात क्रियाशील नसतात. त्यामुळे आपल्या व्यापारात विविधीकरण आणि विशेषीकरण करून तेजीमंदीचा दुष्परिणामांची तीव्रता कमी करता येतो.

८)	जगातील जास्तीत जास्त देश जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत समाविष्ट झाल्यामुळे आर्थिक क्षेत्रात जागतिक स्तरावर विकासाच्या प्रक्रीयेला सुरूवात झालेली आहे. कोणताही देश यापासून अलिप्त राहू शकत नाही.

९)	जागतिकीकरणामुळे मोठया प्रमाणावरील उत्पादनाचे लाभ प्राप्त करता येतो. तसेच उत्पादन व्यय कमी करून वस्तुमध्ये विशेषीकरण व विविधीकरण निर्माण करणे, गुणवत्तापूर्ण वस्तुची निर्मीती करणे, विक्रीव्ययात घट करणे इत्यादी बाबी जागतिकीकरणामुळे साध्य करता येतो.

**भारतात जागतिकीकरणाचे उद्‌देश :—** जागतिकीकरणाचे उद्‌देश खालील प्रमाणे दिलेली आहेत.

१)	आर्थिक विकासाच्या दरात वृध्दी करणे.

२)	विदेशी विनिमयातील गंगाजळीमध्ये वृध्दी करणे.

३)	देशात आर्थिक स्थिरता निर्माण करणे तसेच देशातील वित्तीय कमतरता कमी करून चलन फुगवटा दर कमी करणे.

४) बाजार यंत्रणेला मजबूत बनविण्याकरिता उदारवादी धोरणाच्या प्रक्रियेवर भर देणे.

५) अर्थव्यवस्थेत संसाधनांचे योग्य वितरण करून उत्पादन, गुंतवणूक आणि किंमतपातळी यावर असणाऱ्या नियंत्रणाला शिथील करणे.

वरील उद्देश डोळयसमोर ठेवून भारताने महासत्तेकडील वाटचालीत नविन आर्थिक धोरणांचा स्वीकार केलेला आहे.

**संशोधन पध्दती :—** प्रस्तुत शोध निबंध लेखन करण्यासाठी संशोधनकर्त्याने पुस्तके, ग्रंथ, दैनिक वृत्तपत्र, संशोधन लेख, मासिके, इंटरनेट इत्यादी दुय्यम सामग्रीचा वापर केलेला आहे.

**संशोधनाची गृहिते :—**

१) जागतिकीरणाचा आर्थिक दृष्टीकोनातून कमकुवत व गरीब देशातील साहित्य, संस्कृती, संचार, आणि मानसिकतेवर दृष्परिणाम झालेला आहे.

२) जागतिकीकरणामुळे एक—दुसऱ्या देशांमध्ये प्रतिस्पर्धा वाढतो.

३) जागतिकीकरणामुळे भांडवलवादाला पोषक वातावरण निर्माण होतो.

४) भांडवलवादामुळे जगामध्ये भेदभावाची भावना निर्माण होतो.

५) जागतिकीकरण व भांडवलवादाचा जनसामान्यांवर मोठया प्रमाणात दृष्परिणाम होतो.

**भारत आणि भांडवलवाद :—** प्रस्तुत शोधनिबंधाद्वारे संशोधनकर्त्याने भारत आणि भांडवलवाद यांचे सहसंबंध प्रस्तुत करण्याचा प्रयत्न केला आहे. जागतिकीकरणाच्या नंतर जवळपास २० वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेचा प्रवास समाजवादी अर्थव्यस्थेकडून भांडवलवादी अर्थव्यवस्था असा होतांना दिसून येतो. भांडवलवादाच्या अंतर्गत दोषांमूळे भारतीय अर्थव्यवस्था स्वतः भांडवादी अर्थव्यवस्थेमध्ये प्रवेश केलेला आहे. खुली अर्थव्यवस्था व खाजगीकरणाचा वाढता प्रभाव, गुंतवणूकीचे धोरण, प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक या हेतूने सरकारचे मंत्री, उद्योजक आणि नोकरदार वर्ग यांच्यातील समायोजनेमुळे भ्रष्ट्राचार तथा घोटाळे मोठया प्रमाणात सुरू झालेत. उदा. टु. जी. स्पेक्ट्रम घोटाळा, आदर्श घोटाळा, लवासा घोटाळा इत्यादी घोटाळयांचे प्रकरणे समोर आले. समाजवादामुळे अर्थव्यवस्था बंदीस्त होती. अशी टिका

करणाऱ्यांना भांडवलवादाची संकल्पना अपेक्षीत होती काय? साम्यवाद, समाजवाद आणि भांडवलवाद यापैकी कोणतीही अर्थव्यवस्था असली तरी आदर्श परिस्थितीचे निर्माण करणे हे त्या देशातील सरकारच्या प्रामाणिकतेवर, पारदर्शकतेवर आणि प्रभावशाली अमंलबजावणीवर अवलंबून असतो. याच भांडवलवादाच्या कारणाने भारताच्या महासत्तेकडील वाटचालीत भारताच्या लघु व कुटीर उद्योग, मध्यम आकाराच्या उद्योगाची उपेक्षा झाल्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर दिर्घ स्वरूपाचे परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

प्रस्तुत विषयाच्या संशोधनात्मक अध्ययनानुसार भारताच्या महासत्तेकडील वाटचालीत जागतिकीकरण आणि भांडवलवादाचे भारतासारख्या विकसनशील आणि मागासलेल्या देशांवर अनुकूल परिणामांच्या तुलनेत प्रतिकूल परिणाम जास्त प्रमाणात होतांना दिसून येतात. भारतात कृषी उत्पादनाला योग्य किंमत तसेच न्युनतम समर्थन मूल्य मिळत नसल्यामूळे शेतकऱ्यांमध्ये निराशावादाची भावना दिसून येतो. परिणामत: भारतासारख्या कृषीप्रधान देशात शेतकऱ्याच्या आत्महत्या मोठया प्रमाणात होतांना दिसून येतात. एकीकडे संपन्नता, समृध्दता तर दुसरीकडे गरीबी, उपासमारी अशा दोन भागात भारताची विभागणी होत असल्याचे दिसून येते. व्यक्तिगत विषमतेसोबतच प्रादेशिक विषमता, उत्पन्न व संपत्तीच्या संग्रहणात विषमता वाढल्याने समाजात आर्थिक विषमतेची दरी निर्माण झाली आहे. त्यामुळेच भारतात नक्षलवाद, दहशतवाद, आणि फुटीरवाद यासारख्या सामाजिक समस्या जन्माला आल्या आहेत. आणि यांचा प्रसार वेगाने होत आहे. त्यांच्या निर्मूलनाची जबाबदारी देशातील सरकारची आहे. यावर नियंत्रण ठेवणे आजची गरज निर्माण झाली आहे.

**निष्कर्ष** (conclussion) : प्रस्तुत शोधनिबंधाच्या अध्ययनावरून असा निष्कर्ष निघतो की, भारताच्या महासत्तेकडील वाटचालीत जागतिकीकरण आणि भांडवलवादाच्या दुष्प्रभावामुळे भारतीय समाज आणि लोक आपले साहित्य, संस्कृती, संचार आणि मानसिकता यांना विसरून पाश्चिमात्य संस्कृतीचे अनुकरण करीत आहेत. जागतिकीकरण आणि भांडवलवादाच्या प्रभावामुळे भारतीय समाज आणि लोकांची विचारधारा, सभ्यता, आणि मानवता नष्ट होत आहे. या प्रमाणेच जागतिकीकरण आणि भांडवलवादामुळे एक—दुसऱ्या देशांमध्ये, आप—आपसात प्रतिस्पर्धा वाढून वैरभावाची

भावना निर्माण होत आहे. एक—दुसऱ्या देशात भेदभावाची भावना निर्माण होत आहे. जागतिकीकरण आणि भांडवलवादाचा जनसामान्यांवर गंभीर स्वरूपाचे दुष्परिणाम होत आहेत. लोक आधुनिक आणि पाश्चिमात्य संस्कृतीच्या हवाशापोटी आपली मूळ संस्कृती, सभ्यता, आणि प्रतिभांना विसरत चालले आहेत. परिणामत: जागतिकीरण आणि भांडवलवादामुळे संपूर्ण जगातील देशा—देशांमध्ये विषमता वाढत आहे. **'विश्व एक गाव'** ही भावना लुप्त होण्याच्या मार्गावर आहे. आर्थिक दृष्टीकोनातून कमकुवत देश गरीब होत आहेत. तर आर्थिक दृष्टीकोनातून शक्तशाली देश संपन्न, समृध्द तथा श्रीमंत होतांना दिसून येतात.

भारताच्या महासत्तेकडील वाटचालीत जागतिकीकरण आणि भांडवलवादाच्या जाळयातून सुटण्याकरिता सरकारला सावधान होण्याची आवश्यकता आहे. यांच्या दृष्प्रभावातून वाचण्यासाठी स्वदेशीचा नारा, स्विकारला पाहीजे. आपल्या देशाला स्वावलंबी, आत्मनिर्भर बनविण्यासाठी देशातील लोकांमध्ये राष्ट्रप्रेमाची भावना, राष्ट्रभक्ती, राष्ट्रनिष्ठेची भावना लोकांच्या मनात निर्माण करावी लागेल. आपल्या देशात एकतेची भावना लोकांच्या मनात जागृत करून आपल्या देशाला महाशक्ती राष्ट्र बनवून देशात आर्थिक संपन्नता, समृध्दता निर्माण करावी लागेल तेव्हा कुठे भारताच्या महासत्तेकडील वाटचालीत जागतिकीकरण आणि भांडवलवादाच्या जाळयातून भारताला वाचवू शकतो. आणि आपल्या मूळ साहित्य, संस्कृती, संचार आणि मानसिकतेला वाचवून भारताला आपण सर्व एक महाशक्तीशाली व समृध्दशाली राष्ट्र बनवू शकतो.

## संदर्भ ग्रंथसूची —


१) **भारतीय अर्थव्यवस्था** — प्रतियोगिता दर्पण — २०१८

२) **भारतीय अर्थव्यवस्था खंड** — १, खंड—२ डॉ. जी. एम. झामटे, पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लिशर्स नागपूर — जून २०१४.

३) अर्थशास्त्र — प्रगति बुक्स प्रा. लि. जाने. २०११

४) भारतीय अर्थव्यवस्था — रंजन कोळंबे — भगीरथ प्रकाशन पुणे —२०१४—१५

५) Indian Economy, development & Environmental Economics – Dr. Prachi Deshpande – G.C. Publication Nagpur-2015


***

# मोदीकालीन परराष्ट्रीय धोरणाची परिपक्वता : एक चिकित्सक अध्ययन

**डॉ. सुभाष दौलतराव उपाते**
सहयोगी प्राध्यापक व राज्यशास्त्र विभाग प्रमुख
आदर्श कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, देसाईगंज (वडसा) जि. गडचिरोली

**सारांश :**

अलीकडेच भारताने स्वायत्त परराष्ट्र धोरणाची ७५ वर्षे साजरी केली आणि जागतिक वास्तुशास्त्रातील त्यांची भूमिका मांडली. १९५४ चा पंचशील करार, १९७१ चा भारत –सोव्हिएम मैत्री करार, १९८७ चा भारत–श्रीलंका करार आणि १९९८ मध्ये भारताच्या अणुचाचण्या या सर्वांनी भारतीय परराष्ट्रीय धोरणावर प्रभाव टाकला. पंतप्रधान नरसिंहराव (१९९१–९६) यांच्या काळात आर्थिक उदारीकरणाच्या काळात भारताची जगाने प्रशंशा केली. पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी (१९९८–२००४) यांचे धाडसी परराष्ट्र धोरण. पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या सुरुवातीच्या काळात (२००४–२०१४) देशाची आर्थिक वृद्धी दुहेरी अंकी होती. २०२२ मध्ये आंतरराष्ट्रीय नाणेनिधी नुसार भारतात युनायटेड किंग्डमला मागे टाकून जगातील पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था म्हणून पुढे आली. अर्थात याच वेळी रशिया–युक्रेन युद्ध भारतासाठी भू–राजकीय आणि कुटनितीक स्तारावर हाताळणे एक कठीण काम होते कारण अमेरिका आणि युरोपासोबतचे धोरणात्मक संबंध आणि रशियाची असलेले पारंपरिक संबंध यामुळे पर्याय निवडणे अधिक कठीण काम होते.

**मूळ शब्द :–** परराष्ट्र धोरण, व्यावहारिकता, ग्लोबल साउथ, सहकार्य व विकास

**प्रस्तावना :–**

भारताच्या परराष्ट्र धोरण संदर्भाने विचार करताना सातत्य आणि बदल तसेच आंतरराष्ट्रीय व्यवस्थेत होत असलेल्या बदलावामध्ये भारत नेमका कुठे उभा आहे? गजबजलेल्या मैदानात अनेक दशकापासून भारताला एक

मध्यम शक्ती म्हणून मानल्या जात आहे नजीकच्या काळात भारत कदाचित एक मोठी जागतिक महासत्ता म्हणून नावारूपास येईल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. महासत्ता होणार का? जागतिक महासत्ता म्हणून भारत आपला खरा आवाज शोधत आहे का? असेल तर त्याची बलस्थाने कोणती? धोरणात्मक प्रधान्यक्रम कोणता असेल तर त्याची बलस्थाने कोणती? धोरणात्मक प्राधान्यक्रम कोणता आणि त्या समोरील आव्हाने कोणती आहेत? याचा उहापोह या शोधनिबंधाच्या मागचे प्रयोजन आहे. काही तज्ञांचे मते, भारतीय परराष्ट्र धोरणात मूलभूत बदल झाला आहे, तर काहींच्या मते गतकाळात होते तसेच आहे. परराष्ट्र धोरणाचा अभ्यास करता असे लक्षात येते की, सातत्य आणि बदल या दोघांचाही समावेश आहे. काही क्षेत्रांमध्ये बदल झालेले लक्षात येतात. गेल्या काही वर्षात भारतीय परराष्ट्रीय धोरणाच्या मूळ उद्दिष्टांमध्ये मोठ्य प्रमाणात सातत्य दिसून येते. जसे ''शेजारी राष्ट्रांमध्ये शांतता, सुरक्षितता आणि स्थैर्य नांदणे भारताच्या दृष्टीने चांगले आहे. आयात, गुंतवणुकीबाबत भारताचा प्रभाव वाढविणे, भारताच्या विकासासाठी प्रादेशिक स्थैर्य गरजेचे आहे.''[१] २०१४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पंतप्रधान पदाच्या शपथ सोहळ्याला दक्षिण आशियायी प्रादेशिक सहकार्य संघटनाचे नेते व मॉरिशसच्या सर्व नेत्यांची उपस्थिती याची जाणीव करून देते.

**डद्दिष्टे :—**

१. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या परराष्ट्रीय धोरणाचे अध्ययन करणे.
२. पंतप्रधान नरेंद्र मोदींचे धोरण व्यावहारिकव निर्णायक आहे.
३. पंतप्रधान नरेंद्र मोदींचे धोरण कुटनितीवर आधारले आहे.

**व्यावहारिकता :—**

२१व्या शतकाच्या वळणावर भारताच्या परराष्ट्रीय धोरणाच्या दृष्टिकोनात एक वेगळा बदल झाला. एकेकाळी असंलग्न चळवळीच्या तत्त्वाचे काटेकोरपणे पालन करणारे आणि प्रमुख महासत्तापासून अंतर राखणारे राष्ट्र, भारताने आपले आर्थिक आणि सुरक्षा हित अग्रस्थानी ठेवून अधिक व्यावहारिक भूमिका घेण्यास विकसित केले आहे. बाह्य दबावाला बळी पडण्यास नकार देत भारताने जागतिक राजकारणात आपली स्वातंत्र भूमिका ठामपणे मांडली आहे. हे युक्रेन संघर्ष, चीनच्या बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्ह आणि मधील सदस्यत्वावरील त्यांची भूमिका स्पष्ट करण्यास पुरेशी आहे.

युक्रेन वरील रशियाच्या लष्करी आक्रमणामुळे ही आयात कमी करण्यासाठी पाश्चात्य दबाव असतानाही रशियाकडून कच्च्या तेलाची आयात सुरू ठेवण्याच्या भारताच्या निर्णयात हा बदल दिसून येतो. याशिवाय रशियन तेल आयात करण्याचा भारताचा निर्णय देखील धोरणात्मक व्यावहारिकता दर्शवितो. अनेक दशकापासून रशिया हा भारताचा संरक्षण हार्डवेअरचा सर्वात महत्त्वाचा पुरवठादार आहे. रशियाशी संलग्नता सुरू ठेवून भारताने ही महत्त्वपूर्ण संरक्षण भागीदारी कायम ठेवली आहे. जरी ते पश्चात्य राष्ट्रांसोबतचे संबंध काळजीपूर्वक संतुलित राखले आहे. शिवाय संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचा कायमस्वरूपी सदस्य म्हणून भारताची स्थिती आणि कायमस्वरूपी जागेसाठी असलेल्या आकांक्षामुळे भारताने पाश्चात्य देश आणि रशिया या दोन्ही राष्ट्रांसोबतचे संबंध काळजीपूर्वक हाताळणे आवश्यक आहे. रशियाकडून कच्च्या तेलाची आयात करण्याचा भारताचा निर्णय या सुक्ष्म राजनयिक समतोल साधण्याचे द्योतक आहे.

रशियन अर्थव्यवस्थेला लक्ष्य करण्यासाठी पाश्चिमात्य राष्ट्रांनी अनेक निर्बंध लावले. परिणामी अन्न आणि इंधनाचा तुटवडा आणि किंमती वाढल्या यामुळे भारत चिंतीत झाला. ''युक्रेन–रशिया या युद्धाच्या भारत विरोधी होता. तरीपण भारताने UNSC, UNGA, IAEA मानवाधिकार आयोग आणि इतर बहुपक्षीय व्यासपीठांवर आक्रमण आणि मानवतावादी संघटनासाठी रशियावर टिका करूनही डझन भराहून अधिक ठरावांमध्ये अलिप्त राहण्याचा निर्णय घेतला.''[२] EU&इंडिया ट्रेड अँड टेक्नॉलॉजी कौन्सिलची नुकतीच स्थापना, जो युनायटेड स्टेट्स नंतरचा दुसरा देश आहे. ज्यासोबत EU ने असा मंच स्थापन केला आहे. चीन पासून दूर असलेल्या पुरवठा साखळीमध्ये विविधता आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या सप्लाय चेन रेझिलीन्स इनिशिएटिव्ह मध्ये भारताचा सहभाग येथे खूप महत्त्वाचा आहे.

**देशांतर्गत चिंतेच्या पलीकडे :–**

संयुक्त पुरोगामी आघाडीच्या (यूपीए) शासनाच्या अंतर्गत, देशांतर्गत राजकारणाच्या ओढीने भारताच्या धोरणात्मक बाह्य हितसंबंधाची दुर्दैवाने तडजोड झाली. उदा. श्रीलंकेतील राष्ट्रकुल शिखर परिषदेवर बहिष्कार टाकण्याचा पंतप्रधान मनमोहन सिंग यांचा निर्णय, भारताला दक्षिण आशियातील एक प्रादेशिक शक्ती स्थान म्हणून स्थान देण्यासाठी मोजलेल्या

धोरणाचे उत्पादन नव्हते. त्याऐवजी २०१४ च्या सर्वत्रिक निवडणुकीत सत्ताधारी काँग्रेस पक्षासाठी ज्यांची युती फायदेशीर ठरू शकते, अशा तमिळ पक्षाच्या मागण्यांचे हे आत्मसर्पण होते. परराष्ट्रमंत्री सलमान खुर्शीद यांचे खाते याची पुष्टी करते, देशांतर्गत राजकीय मजबुरीमुळे भारताची जागतिक स्थिती कशी वारंवार ओलीस ठेवली गेली हे अधोरेखित करते. परिणामी महत्त्वपूर्ण आंतरराष्ट्रीय संबंध विस्कळीत झाले. जसे की नवी दिल्लीच्या श्रीलंकेशी असलेल्या संबंधाप्रमाणे चीन सारख्या दूरच्या राष्ट्रांना दुर्दैवाने फायदा झाला. यूपीए सरकारच्या दृष्टिकोनाने जागतिक राजनीतिशी राष्ट्रीय हितसंबंध जुळवण्यात स्पष्ट उल्लंघन केले आहे. देशांतर्गत राजकीय समस्यांमूळे यापुढे आपल्या महत्त्वाच्या राष्ट्रीय धोरणात्मक हितसंबंधाचे नुकसान होणार नाही.

भारत सरकार चीनच्या धोरणावर आणि प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरील स्टॅन्ड ऑफवर टीका करत आहे. चीनच्या परराष्ट्र मंत्र्याची भारत भेट आणि अडथळे दूर होऊनही, प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर भारत चीन तणाव कायम राहिला आणि अरूणाचल प्रदेशातील यांगत्से येथे भारतीय चौक्या घेण्याचा चिनी पीएलए च्या अयशस्वी प्रयत्नाने वर्ष संपले. भारताने लोकसंख्येसह लोकसंख्या शास्त्रीय लाभांश देखील राखला आहे. जो २०२३ मध्ये चीनला मागे टाकून जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश बनला असे संयुक्त राष्ट्रांनी म्हटले आहे.

**ग्लोबल साउथचा आवाज :—**

आंतरराष्ट्रीय स्तरावरील विकसनशील राष्ट्रांच्या चिंता आणि आकांक्षा व्यक्त करत भारत ग्लोबल साउथचा प्रमुख वकील म्हणून उदयास आला आहे. हे स्थान भारताच्या मजबूत अर्थव्यवस्थेच्या पायावर लोकशाही, मूल्यांप्रति असलेली बांधिलकी आणि धोरणात्मक युती तयार करण्यासाठीचे राजनयिक प्रयत्न यांच्यावर उभारले गेले आहेत. BRICS आणि G-20 सारख्या मंचामध्ये भारताचे नेतृत्व तसेच हवामान बदल, विकास आणि शांतता राखण्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या चर्चेत सक्रिय सहभाग ही भूमिका प्रतबिंबीत करते. भारताचे ”दक्षिण—दक्षिण सहकार्य“ हे धोरण सहकारी दक्षिणी अर्थव्यवस्थांसोबत विकासात्मक उपाय समायिक करण्याची आपली वचनबद्धता अधोरेखित करते.

G-20 अध्यक्षपदामुळे भारताचा बहुध्रुवीय जागतिक दृष्टिकोन पुढे नेण्यात आणि राष्ट्रांमध्ये विश्वासार्ह भागीदारी निर्माण करण्यात मदत झाली. जिच्यामुळे सर्वात महत्त्वाचे म्हणजे इंडो पॅसिफिक ची शांतता आणि समृद्धी वाढवते. भारताने इतर महत्त्वाच्या मुद्यांसह हवामान बदलातील संक्रमण, ''महिला नेतृत्वात'' विकास आणि बहुपक्षीय सुधारणा अधोरेखित करणे अपेक्षित भारताने संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचा दोन वर्षाचा कार्यकाळ पूर्ण केला. भारताने नुकतेच शांघाय को–ऑपरेशन ऑरगॅनिझेशनचे अध्यक्षपदही स्वीकारले. चीन, कझाकस्थान, कीरगीझस्तान, रशिया आणि ताजिकीस्थान यांचा समावेश असलेला शांघाय पाच SCO मध्ये विकसित झाला. २०१७ मध्ये भारत आणि पाकिस्तानच्या जोडणीसह, SCO ही सर्वात मोठी आंतरराष्ट्रीय संघटना बनली, जी जागतिक GDP च्या जवळपास ३० टक्के आणि जगाच्या लोकसंख्येच्या ४० टक्के इतके प्रतिनिधित्व करते.

**विकासातील भागीदारी :–**

भारताने स्वत:ला एक विश्वासार्ह विकास भागीदार म्हणून प्रस्थापित केले आहे. विशेषतरू ग्लोबल साउथ मध्ये, जमिनीवर ठोस परिणाम प्रदान केले आहेत. भारताच्या पुढाकारांमध्ये आयटी केंद्रे स्थापन करणे, फेरी वितरित करणे, गाड्यांचा पुरवठा करणे, कारखाने पुनरुज्जिवित करणे आणि मोठ्य प्रमाणात वाहतूक उपाय तयार करणे त्यात समाविष्ट आहे. तंत्रज्ञानातील सहकार्य, सरकार ते सरकार आणि व्यवसाय ते व्यवसाय या दोन्हीमुळे, तंत्रज्ञानाच्या सुधारणांसाठी विशेषतरू तरुणांसाठी संधी उपलब्ध झाल्या आहेत. आंतरराष्ट्रीय योग दिन, आयुर्वेदाची जागतिक लोकप्रियता आणि भारतीय संस्कृतीच्या इतर पैलूंसारख्या उपक्रमामुळे जागतिक स्तरावर भारताचा सांस्कृ तिक आदर वाढला आहे. या आदरामुळे परदेशातील भारतीयांना समजून घेणे आणि स्वीकारणे सोपे झाले आहे.

**आर्थिक सहयोग :–**

भारताच्या परराष्ट्र धोरणातील अग्रक्रमांमध्ये दक्षिण पूर्व आशिया (आणि नंतर पूर्व आशिया आणि व्यापक इंडो पॅसिफिक प्रदेश) चे महत्व वाढवण्याच्या प्रयत्नाचा एक भाग म्हणून १९९० च्या दशकाच्या सुरुवातीला हे धोरण सुरू करण्यात आले. भारताचे प्रादेशिक एकीकरण नेहमीच देशाच्या देशांतर्गत सुधारणांच्या अजेंड्यच्या गतीवर अवलंबून राहिले आहे.

अलीकडच्या काळात, भारत सरकार विविध देशांसोबत मुक्त व्यापार करार (FTAS) करण्यासाठी सक्रियपणे पाठपुरावा करत आहे. भारताने UAE आणि ऑस्ट्रेलिया सोबत व्यापार करारावर स्वीकार केली आणि इतरांसाठी EU, गल्फ कोऑपरेशन कौन्सिल आणि कॅनडा यांच्याशी चर्चेत प्रगती होण्याची आशा आहे. भारताचे परराष्ट्र धोरण श्रीलंकेच्या पतनादरम्यान आर्थिक मदतीद्वारे चिन्हांकित होते. बांग्लादेश, भूतान आणि नेपाळ यांच्याशी प्रादेशिक व्यापार आणि ऊर्जा करारांमुळे दक्षिण आशियाई ऊर्जा ग्रीडचा उदय होऊ शकतो. भारताने मध्य आशियायी राष्ट्रांशी कनेक्टिव्हिटीवरही संबंध मजबूत केलेले आहेत. जागतिक अर्थव्यवस्थेतील सहयोगी म्हणून भारताची ओळख आहे. थेट परकीय गुंतवणुकीत वाढ, वाढते निर्यात आणि सेमीकंडक्टर सारख्या उच्च तंत्रज्ञान उद्योगांमधील सहकार्य यातून दिसून येत आहे.

**जागतिक समस्यांमध्ये योगदानकर्ता :—**

अफगाणिस्तान मधील तालिबान आणि म्यानमार जंटा यासारख्या दडपशाही राजवटींसोबत सरकारने चॅनेल उघडे ठेवले. इराण मध्ये जिथे कार्यकर्ते महसा अमिनी यांच्या हत्येविरोधातील निदर्शने हजारो रस्त्यांवर उतरली आहेत, भारताने कोणत्याही टीकेला तोंड दिले नाही. आरोग्य, हवामान बदल आणि आपत्ती व्यवस्थापन यासारख्या जागतिक समस्यांसाठी भारताने स्वत:ला एक प्रमुख योगदानकर्ता म्हणून स्थापित केले आहे. लस मैत्री उपक्रम आणि इंटरनॅशनल सोलर अलायन्स आणि कोलिशन फॉर डिझास्टर रेझीलिएंट इन्फ्रास्ट्रक्चर मधील देशाचे नेतृत्व हे स्पष्ट करते. तसेच क्वाड, शांघाय कार्पोरेशन ऑर्गनायझेशन आणि निर्यात नियंत्रण व्यवस्था यासारख्या जागतिक संस्थांमध्ये भारताचा प्रवेश, जागतिक मंचावरील वाढत्या मूल्य ॲडिशनला प्रतिबिंबित करतो. भारत हवामान बदल, दहशतवाद विरोधी आणि इंडो पॅसिफिक ऑफ क्वाड सारख्या जागतिक धोरणात्मक संकल्पना यासारख्या मुद्यांवर जागतिक वक्तव्य तयार करत आहे. भारत आपले व्यासपीठ तयार करण्यात, प्रवचने आयोजित करण्यात आणि वक्तव्याला आकार देण्यात यशस्वी झाला आहे. केवळ इतरांनी आयोजित केलेल्या जागतिक संभाषणामध्ये सहभागी होण्याऐवजी, भारत सक्रियपणे त्यांचे संवाद तयार करत आहे.

**परदेशात भारतीय नागरिकांचे संरक्षण :—**

भारताने परदेशात विशेषतरू संकट काळात आपल्या नागरिकांचे संरक्षण करण्यासाठी वचनबद्धता दर्शविली आहे. संघर्ष किंवा कोविड—१९ साथीच्या आजारामुळे परदेशात अडकलेल्या आपल्या नागरिकांची सुरक्षितता आणि परत येण्याची खात्री करण्यासाठी देशाने अनेक ऑपरेशन्स हाती घेतलेले आहेत. भारतीय कुटनितीमूळे अनेक देशांसोबत गतिशीलता करार व्यवस्थापित करण्यात यशस्वी झाली आहे. ज्यामुळे भारतीय कामगार आणि व्यावसायिकांसाठी परदेशात संधी वाढल्या आहेत. कल्याणकारी व्यवस्थेतील सुधारणा, विशेषतरू आखाती देशातील भारतीय कामगारांसाठी, यशस्वी राजनैतीक वाटाघाटींचा परिणाम आहे. देशभरात आणि परदेशात पासपोर्ट सेवा केंद्राच्या विस्तारामुळे पासपोर्टसेवा अधिक सुलभ झाली आहे, ज्यामुळे अधिकाधिक भारतीय परदेशात प्रवास करू शकतात.

अभूतपूर्व वळणावर, भारत प्रादेशिक आणि परकीय व्यापार करारांच्या दिशेने त्यांच्या दृष्टिकोनात क्रांती करत आहे. हे परिवर्तन न।म, ऑस्ट्रेलिया, EU, युनायटेड किंगडम सारख्या देशासोबत अनेक मुक्त व्यापार करार (थ्जै) द्वारे चिन्हांकित केले आहे. हा बदल भारताच्या धोरणात्मक दूरदृष्टीचा आणि जागतिक व्यापाराच्या गतिमानतेचा स्वीकार करण्याच्या त्याच्या उत्सुकतेच्या दाखला आहे. भारत आता व्यापाराकडे केवळ व्यवहारांची देवाण—घेवाण म्हणून पाहत नाही त्या ऐवजी ते अधिक समग्र दृष्टिकोन स्वीकारत आहे. जेथे हे करार मजबूत राजनैतिक संबंध वाढवण्यासाठी, धोरणात्मक हितसंबंध सुरक्षित करण्यासाठी, आणि आर्थिक वाढीला चालना देण्यासाठी एक मार्ग म्हणून काम करतात.

आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे अधिक पक्के खेळाडू म्हणून झालेले परिवर्तन हे असंलग्न प्रतिक्रियात्मक दृष्टिकोनातून सक्रिय आणि धोरणात्मक दृष्टिकोनातून बदल दर्शविते. आपल्या आर्थिक पराक्रमाचा, भू—सामरिक स्थितीचा आणि कुटनितीचा उपयोग करून भारत त्याच्या मूळ हितसंबंधावर आणि मूल्यांवर आधारित इतर राष्ट्रांशी आपले संबंध आकामानास आणते. हा मजबूत दृष्टिकोन सीमा विवादांच्या मजबूत हाताळणीत, आंतरराष्ट्रीय संस्थांमधील वाढता प्रभाव आणि धोरणात्मक आघाड्य वाढवण्यामध्ये प्रकट होतो. हा व्यवहारिक परंतु ठाम परराष्ट्र धोरणाचा दृष्टिकोन भारताच्या उज्वल भविष्यासाठी वचन देतो आणि जागतिक राजकारणाच्या गुंतागुंतीच्या बुद्धीबळात एक प्रबळ शक्ती म्हणून स्वतरूला प्रस्थापित करतो.

**निष्कर्ष :—**

१. आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेतील विकसनशील देशांचा समावेश असलेल्या 'ग्लोबल साऊथचे नेतृत्व करण्यासाठी भारत खूप महत्वकांक्षी ठरला आहे.
२. भारतीय परराष्ट्र मंर्त्यांचा असा विश्वास आहे की त्यांच्या राष्ट्राची तुलना कृष्णाशी केली जात आहे कारण ते सर्वोत्तम निवडण्यापूर्वी सर्व पर्यायांचे मूल्यांकन करते.
३. भारताने सॉफ्ट पॉवर डिप्लोमसीतून भारताची परराष्ट्र धोरणे नेहमीच संवाद, शांतता आणि राष्ट्रीय आणि जागतिक करार निर्माण करण्याच्या उद्दिष्टांवर आधारित केलेली आहेत.
४. नागरी करार, नियमांचे रक्षण करणे, जागतिक शांततेला चालना देणे, दहशतवाद आणि राजकीय हिंसाचाराचा मुकाबला करणे आणि शांततापूर्ण आणि समृद्ध जगाचा मूलभूत पाया विकसित करणे यासारखी परस्पर उद्दिष्टे असणाऱ्या राष्ट्रांसोबत अधिक चांगल्या सहकार्याचा अंदाज घेणे हे निवडले आहे.
५. मेक इन इंडिया आणि आत्मनिर्भर भारत या सरकारी मोहिमांनी पाठिंबा दिला आहे. ज्याचा उद्देश भारतीय उद्योगांचीी लवचिकता आणि स्पर्धात्मकता मजबूत करणे असा आहे.
६. धोरणात्मक दृष्ट्य महत्त्वपूर्ण क्षेत्रातील राष्ट्रीय विजेत्यांच्या विकासास समर्थन देणारे उत्पादन संबंधित प्रोत्साहन आणि बहुमंडळ कनेक्टिव्हिटीसाठी गतिशक्ती राष्ट्रीय मास्टर प्लॅन ज्याचा उद्देश शेवटच्या माईलची पायाभूत सुविधा कनेक्टिव्हिटी सुधारणे हा आहे.

**संदर्भ ग्रंथ :–**

१. मिश्रा जितेंद्रनाथ : Ambc(निवृत्त) झारखंड सेंट्रल युनिव्हर्सिटी, रांची परराष्ट्र मंत्रालय– भारत सरकार, ३१ जानेवारी २०१७
२. Google स्रोत :TH : भारताच्या परराष्ट्र धोरणात काही बदल झाले आहेत का? चालू घडामोडी nextias-com
३. बिबेक देबरॉय, आदित्य सिन्हा : ९ वर्षांमध्ये भारताचे परराष्ट्र धोरण ९ मार्गांने विकसित झाले आहे. प्रकाशित गुगल १३ जून २०२३
४. सी.राजा मोहन : ''ब्रिक्स आणि क्वाड दरम्यान : भारताचा नवीन आंतरराष्ट्रीय वाद'' ISAS संक्षिप्त सिंगापूर इन्स्टिटयुट ऑफ साउथ एशियन स्टडीज, ६ जुलै २०२२
५. सुब्रमण्यम जयशंकर : 'आशिया सोसायटी पॉलिसी इन्स्टिट्युटच्या शुभारंभाप्रसंगी टिप्पणी''नवी दिल्ली, २९ ऑगष्ट २०२३

***

# विविध योजना (स्टार्टअप इंडिया, डिजिटल इंडिया, मेक इन इंडिया)

**डॉ. मारुती भिवा चौगले**
बॅ. बाळासाहेब खर्डेकर महाविद्यालय, वेंगुर्ला.

**गोषवारा**

तंत्रज्ञान हे मानवतेसाठी एक संपत्ती बनत आहे. देशाच्या शाश्वत विकासात उत्तम प्रकारे विणलेली आणि समन्वय साधलेली प्रणाली अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते. व्यक्तीच्या दररोजच्या जीवनाचा केवळ अपरिहार्य भाग म्हणून तंत्रज्ञानाकडे पाहिले जाते. डिजिटल समावेशनाची सुनिश्चिती करुन त्याद्वारे सामाजिक सक्षमीकरणाची सुनिश्चिती होत असते. नवनिर्मिती करणे आणि उद्योजकतेला चालना देणे हे स्टार्टअपचे उद्दिष्ट आहे. स्टार्टअप कंपन्या नव्या भारताचा कणा ठरणार आहे. तरुण आणि चैतन्यपूर्ण कर्मचारी वर्ग हे भारतीय स्टार्टअप परिसंस्थेचे वैशिष्ट्य आहे. अलिकडच्या काळात किंवा भविष्यामध्ये कोणत्याही तांत्रिक प्रयत्नांमध्ये डिजिटलीकरणाच्या अपरिहार्यतेचे महत्त्व अमान्य करता येणार नाही. डिजिटल इंडिया ही संकल्पना न्याय्य आणि सर्वसमावेशक आर्थिक वाढीचे महत्त्व तसेच भविष्यासाठी सामुहिक दृष्टिकोन यावर भर देणारी आहे. डिजिटल इंडिया हे प्राधान्यक्रमाशी सुसंगत आहेत. तसेच जगभरातील राष्ट्रासाठीही आदर्शवत आहे. सेवा क्षेत्राची कार्यक्षमता पाहता औद्योगिक क्षेत्राला अधिकाधिक बळकटी देण्यासाठी सरकारने 'मेक इन

इंडिया' या उपक्रमाला सुरुवात केली. मेक इन इंडिया हा भारत सरकारचा महत्त्वपूर्ण राष्ट्रीय क्रम आहे.

अतिमहत्त्वाचे शब्द : सुनिश्चिती, डिजिटलीकरण, साधर्म्य, समावेशन.

**प्रस्तावना**

तंत्रज्ञान हे मानवतेसाठी एक संपत्ती बनत आहे. कारण तंत्रज्ञानामुळे उत्पादकता वाढते. अधिक पैसानिर्मिती होते. हेच तंत्रज्ञान जेव्हा सुयोग्य सार्वजनिक धोरणात्मक उपाययोजनेशी चोखपणे जोडले जाते तेव्हा जागतिक आर्थिक विकासाला गतिमान करते. तांत्रिक प्रगतीचे लाभ जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचविण्यात सरकार यशस्वी झाल्यास निश्चितच ती अर्थव्यवस्था विकासाच्या उच्च पातळीवर स्थानापन्न असेल यात शंकाच राहणार नाही.

२१ व्या शतकाच्या जागतिक अर्थव्यवस्थेत ज्ञान हेच आत्यंतिक महत्त्वपूर्ण साधन आहे. ज्ञानाच्या बळावरच जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान आणि स्वत:च्या देशात तयार झालेली उत्पादने यांचा संपूर्णपणे लाभ घेता येणे शक्य होईल. सध्याचे युग हे तंत्रज्ञानाचा वापर दर्शविणारे, नव्या वाटा चोखाळणाऱ्या नाविण्यपूर्ण उपक्रमांचे, शोधांचे आणि उत्पादनाचे आहे. देशाच्या शाश्वत विकासात उत्तम प्रकारे विणलेली आणि समन्वय साधलेली प्रणाली अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते. भारतातील पायाभूत सुविधांची कार्यक्षमता वाढवण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाला जुंपून नवीनतम उपक्रमांचा उद्देश भारतातील पायाभूत सुविधांची कार्यक्षमता वाढवण्याचा आहे.

नवीन तंत्रज्ञानाची उत्क्रांती अनेक शक्यतांसाठी दरवाजे खुले करत आहे. व्यक्तीच्या दररोजच्या जीवनाचा केवळ अपरिहार्य भाग म्हणून तंत्रज्ञानाकडे पाहिले जाते. डिजिटल सेवा प्रशासन आणि सेवांच्या वितरणात पारदर्शकतेची सुनिश्चिती करण्यासह कमी किचकट आणि

अधिक परिणामकारक सिद्ध होऊ पहात आहेत. डिजिटल तंत्रज्ञान आमचे जीवन प्रत्येक पायरीवर सहज सोपे करत आहे. प्रशासनात पारदर्शकता आणि उत्तरदायित्वाची सुनिश्चिती करण्यासाठी डिजिटल सेवांसाठी असलेली नागरिकांची वाढती मागणी पुरवण्यासाठी आणि अधिक सुटसुटीत आणि उच्च दर्जेदार सेवा पुरवण्यासाठी सरकार आणि सार्वजनिक क्षेत्र त्याचा वापर करत आहे. डिजिटल समावेशनाची सुनिश्चिती करुन त्याद्वारे सामाजिक सक्षमीकरणाची सुनिश्चिती करत आहे. सध्याचे युग हे तंत्रज्ञानाचा वापर दर्शविणारे, नव्या वाटा चोखाळण्याचा नाविण्यपूर्ण उपक्रमांचे, शोधाचे आणि उत्पादनाचे आहे आणि या तंत्रज्ञानासह आपण अनंत शक्यतांच्या जगात जगत आहोत.

प्रस्तुत शोधनिबंधात स्टार्टअप इंडिया, डिजिटल इंडिया आणि मेक इन इंडिया या तीन उपक्रमांची माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला आहे.

❖ **स्टार्टअप इंडिया :-**

स्टार्टअप इंडियाचे उद्दिष्ट उद्योजकतेला चालना देणे आणि भारतीय तरुणांमध्ये नवनिर्मितीला चालना देणे हे आहे हे महत्त्व ओळखून भारतात १६ जानेवारी २०१६ मध्ये स्टार्टअप इंडिया कार्यक्रम सुरू करण्यात आला. कोणत्याही अर्थकारणासाठी नाविण्य हा आत्मनिर्भर आणि शाश्वत अशा वाढीसाठीचा आत्मा असतो. वर्ष २०१६ मध्ये केवळ ५०० स्टार्टअप असलेल्या भारतात फेब्रुवारी २०२३ पर्यंत चक्क ९२००० मानयताप्राप्त स्टार्टअप असणे ही भारतीयांच्या दृष्टीने खूप जमेची बाजू आहे.

नवउद्योजक, रोजगार निर्मिती व एक मजबूत परिसंस्था तयार करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. सद्यस्थितीत भारतात सुमारे २,४४,००० स्टार्टअप्सची नोंद झालेली असून यातील ८८१३६ स्टार्टअप्स उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभागातर्फे मान्य आहेत.

स्टार्टअप आपल्या जीवनातील अडचणी सोडवण्यासाठी नाविण्यपूर्ण आणि तंत्रज्ञानावर आधारित उपाय शोधतात.

आपल्या देशातील स्टार्टअप कंपन्या सर्व गृहितके बदलत आहेत. स्टार्टअप कंपन्या नव्या भारताचा कणा ठरणार आहेत. जगातील सर्वात मोठी युवा लोकशाही आज भारत देशात आहे. भारताच्या लोकसंख्येपैकी १०० कोटी नागरीक ३५ वर्षे वयाखालील आहेत. म्हणजेच २०४७ पर्यंत जागतिक कार्यशक्तींपैकी २१% कार्यशक्ती भारताचीच राहील. मानवी संस्कृतीशी निगडीत अत्यंत गुंतागुंतीच्या समस्यांवर समाधान शोधण्यासाठीची भारतीय युवकांची क्षमता, ज्ञान आणि उत्साह याची आज संपूर्ण जग दखल घेत आहे. स्टार्टअप म्हणजे असा एक नवा भारत जिथे उत्तम अर्थव्यवस्था देशाच्या राजकारणाच्या केंद्रस्थानी असेल आणि हे अर्थकारण देशात अत्यंत आवश्यक असलेल्या परिवर्तनाला प्रेरणा देणारे ठरेल. तरुण आणि चैतन्यपूर्ण कर्मचारी वर्ग हे भारतीय स्टार्टअप परिसंस्थेचे वैशिष्ट्य आहे.

**स्टार्टअप इंडिया मधील लक्षवेधी :-**

१) बाजाराच्या मागण्या पूर्ण करण्यात आघाडीवर

२) ज्ञान आधारित डिजिटल अर्थव्यवस्थेत अधिकाधिक वाव

३) राष्ट्रीय लॉजिस्टिक धोरणासाठी वरदान

४) ऊर्जा क्षेत्रातील संधी

५) ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्ट, गेमिंग ॲण्ड कॉमिक्स अशा एव्हीजीसी क्षेत्रात कामगिरी

६) संरक्षण व अवकाशी क्षेत्रात योगदान

वरील सर्व लक्षवेधी बरोबरच भारतीय अर्थव्यवस्थेचा आधारस्तंभ असलेल्या शेती उद्योगात सुद्धा स्टार्टअपचे योगदान विशेष उल्लेखनीय आहे जे शेतकरी मत्स्यपालन किंवा पशुपालनासाठी पाऊल टाकू

इच्छितात. त्यांच्याकडे योग्य गुंतवणूक, विपणन माध्यम आणि ज्ञान नाही त्यांना Agritech स्टार्टअप शेतीच्या विविधीकरणासाठी प्रेरणा देत आहे. शेतकऱ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी भारतामध्ये खेतीगाडी, क्रोफार्म, फार्मर फार्म, मेरा किसान आणि फ्रेशोकार्ट्ज अशी उच्च ५ अॅग्रीटेक स्टार्टअप्स कार्यरत आहेत. यासाठी बँकांकडून बीज भांडवल, निधीची सुलभता, समर्पित एक्सचेंज क्षेत्र, तज्ञांचे सहकार्य, आर्थिक साक्षरता तसेच सरकारची अनुकुल भूमिका याची शेतकऱ्यांना आवश्यकता आहे. Agritech स्टार्टअप आणि नवकल्पना यांच्या संयोजनात भारतीय शेतीची गतिशिलता बदलल्यास भविष्यकालीन प्रगतीचा मार्ग सुलभ होईल.

कोणत्याही देशातील औद्योगिकीकरणाची क्षमता आणि विकासाची गती ही त्या देशातील औद्योगिकीकरणास सहाय्यक किंवा पूरक घटकांच्या उपलब्धतेवर अवलंबून असते. विकासाचे अनेक पैलू असतात. तसेच विकास हा सर्वांगीण स्वरुपाचा असतो. क्रमाक्रमाने प्रगतीशिल राहून परिपक्वता साधणे हा विकासाचा मुख्य उद्देश असतो. स्टार्टअप म्हणजे 'द अॅक्शन ऑर प्रोसेस टू गेट समथिंग इनमोशन' अर्थात एक ठराविक गती येण्यासाठी केलेली कृती वा प्रक्रिया तसेच भविष्यकालीन नफ्याचा विचार करुन सुरू केलेली अंशकाली उद्योगरचना म्हणजे स्टार्टअप होय.

**स्टार्टअप इंडिया योजनेचे महत्त्व :-**

१) नव उद्योजकांना प्रोत्साहन देणे व रोजगार निर्मिती घडवून आणणे.

२) बौद्धिक व तंत्रज्ञान मालमत्तेच्या आधारावर नवनवीन उत्पादने व सेवांचे व्यापारीकरण व

आधुनिकीकरण करणे.

३) उद्योजकांसाठी सरकारी नियम आणि बंधने कमी करणे.

४) लघुउद्योग निर्मितीमधील परवाना व परकीय गुंतवणूक अडथळे समाप्त करणे.

५) रोजगार निर्मितीसाठी शाश्वत आर्थिक वृद्धीला चालना देणे.

६) महिला उद्योजकांना १००० कोटी अर्थसहाय्य देणे, ऑनलाईन व ऑफलाईन अभ्यासक्रम चालविणे

तसेच महिला नवोद्योजकांना कायदेविषयक, करविषयक व आर्थिक सल्ला देणारी यंत्रणा निर्माण करणे.

७) स्टार्टअप इंडिया ही स्वयंम प्रमाणित पद्धत आहे.

८) पहिल्या तीन वर्षात कोणतीही शासकीय पाहणी होत नाही.

९) स्टार्टअप इंडियासाठी अर्ज व वेबपोर्टल सुरू राहिल आणि एक साधारण अर्जानुसार रजिस्ट्रेशन करता
येईल.

१०) स्टार्टअप इंडिया अंतर्गत पेमेंट नोंदणी शुल्क नसते. तसेच अर्ज सादर करताना ८०% सुट असते.

११) सुमारे १०,००० कोटी रुपयांपर्यंत भांडवल पुरवठा नवउद्योजकांना होतो.

१२) स्टार्टअप उद्योगांना भांडवली लाभ करात सुट तसेच तीन वर्षांपर्यंत उत्पन्न करात सुट मिळते.

१३) सार्वजनिक खाजगी भागिदारी मॉडेल व इतर ३५ मॉडेल्सचा समावेश.

❖ **डिजिटल इंडिया :-**

डिजिटायझेशनच्या आजच्या युगात कोणत्याही यशस्वी अर्थव्यवस्थेशी निगडीत सर्वच क्षेत्रांमध्ये तसेच प्रगतीशील समाजाच्या सर्व पैलूंमध्ये समान दुवा असणे आवश्यक आहे. अलीकडच्या काळातील किंवा भविष्यातील कोणत्याही तांत्रिक प्रयत्नामध्ये डिजिटलीकरणाच्या अपरिहार्यतेचे महत्त्व अमान्य करता येणार नाही. आज जवळजवळ प्रत्येक

क्षेत्रात नव्या युगातील तंत्रज्ञान हळूहळू संस्था आणि अर्थव्यवस्थांमध्ये बदल घडवून आणते आहे. तंत्रज्ञानातील जलद प्रगतीमुळे आर्थिक आणि वित्तीय क्षेत्रात क्रांती घडून येते आहे. ज्यायोगे भविष्यात समाजासाठी मोठ्या प्रमाणात दीर्घकालीन लाभ प्राप्त होत राहतील.

०३ जुलै २०१५ साली सुरू करण्यात आलेला डिजिटल इंडिया उपक्रम डिजिटल क्षेत्रातील तफावत दूर करण्यासाठी जी-२० च्या वचनबद्धतेशी साधर्म्य दाखविणारा आहे. हा उपक्रम डिजिटल पायाभूत सुविधा प्रदान करण्यावर आणि डिजिटल सुविधा प्रदान करण्यावर आणि डिजिटल साक्षरतेला प्रोत्साहन देण्यावर लक्ष केंद्रित करणारा उपक्रम आहे. भारतनेट प्रकल्पाने ११ सप्टेंबर २०२३ पर्यंत देशभरात ६,५८,६८५ किलोमीटर ऑप्टिकल फायबर केबल्सचे जाळे पसरून २,०२,०२८ ग्रामपंचायतींना यशस्वीरीत्या जोडले आहे. त्याशिवाय ६,४३,७८९ फायबर-द होम जोडण्या सक्रीय करण्यात आल्यात आणि तळागाळात तसेच दुर्गम भागात जोडणीची हमी देण्यासाठी १,०४,६७५ वायफाय हॉटस्पॉट उपलब्ध करुन दिले आहेत.

डिजिटली सक्षम समाज आणि ज्ञान अर्थव्यवस्थेत बदलण्याचे उद्दिष्ट डिजिटल इंडियाचे आहे. देशातील प्रत्येक नागरिकाला डिजिटली सक्षम बनविण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम सुरू करण्यात आला. डिजिटल इंडिया ही संकल्पना न्याय्य आणि सर्वसमावेशक आर्थिक वाढीचे महत्त्व तसेच भविष्यासाठी सामुहिक दृष्टिकोन यावर भर देणारी आहे. या दृष्टिकोनाच्या अनुषंगाने भारताने डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांचा संचय असणारे जागतिक डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा संचयनीचे डिजिटल स्टोरेज तयार करण्याची आणि देखरेख करण्याची योजना आखली आहे. भारतात जन धन बँक खाती आणि आधार सारख्या

डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांनी मोबाईल फोनच्या माध्यमातून व्यवहारांना चालना देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांचा वापर करुन भारताने जगातील सर्वात मोठ्या डिजिटल गव्हर्नमेंट-टू-पर्सन (G2P) यंत्रणेची स्थापना केली आहे. या उपक्रमामुळे आयतागायत ३१३ महत्त्वाच्या योजनांच्या माध्यमातून केंद्र सरकारच्या ५३ मंत्रालयांच्या लाभार्थींना सुमारे ३२.२१ ट्रिलियन रुपये इतकी रक्कम थेट हस्तांतरीत करणे शक्य झाले आहे. भारताचे युनिफाईड पेमेंट्स इंटरफेस (UPI) हे भारतात वापरले जाणारे जलद आणि त्वरीत पेमेंट नेटवर्क आहे. UPI - Pay Now ने भारताला फ्रान्स, सिंगापूर, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, हाँगकाँग, ओमान, कतार, युएसए, सौदी अरेबिया, युएई आणि युनायटेड किंगडम अशा अकरा देशांशी जोडले आहे. डिजिटल सुविधा जलद आणि जास्त किफायतशीर असून सीमेपलिकडील प्रदान पारदर्शक असल्याचे सुनिश्चित करणारी आहे.

**डिजिटल इंडियामधील उपक्रम :-**

१) प्रधानमंत्री जनधन योजना

२) मेक इन इंडिया

३) स्टार्टअप इंडिया

४) स्मार्ट शहरे मोहिम

५) आधारप्रणाली

६) उमंग आणि डिजिलॉकर

७) भारत बॉडबॅड नेटवर्क

८) डिजिटल साक्षरता अभियान

९) ॲग्रीमार्केट

१०) पीक विमा

११) डिजिटल एम्स

१२) ई - पंचायत

१३) डिजिधन बाजार

१४) सायबर स्वच्छता केंद्र

१५) दीनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजना

१६) सेंट्रल बँक डिजिटल करन्सी

१७) कृत्रिम बुद्धिमत्ता

डिजिटल इंडिया हे प्राधान्यक्रमांशी सुसंगत आहेत. तसेच ते जगभरातील राष्ट्रांसाठीही आदर्शवत आहेत. देशाची यशोगाथा ही लवचिक आणि सर्वसमावेशक डिजिटल भवितव्य घडविण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या देशांसाठी प्रेरणास्थान आहे. डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांच्या परिवर्तनशील क्षमतेची खातरजमा करणारे आहे. त्याचबरोबर अधिक न्याय्य आणि समृद्ध जागतिक डिजिटल जगताला प्रोत्साहन देण्याचे महत्त्व अधोरेखित करणारे आहे. म्हणूनच भारतासारख्या विकसनशील देशात स्वप्रगती व स्वविकास साधताना डिजिटल इंडिया या उपक्रमाशिवाय दुसरा पर्याय नाही. साहजिकच डिजिटल इंडिया या उपक्रमांतर्गत नाविण्यपूर्ण योजनांचा स्विकार करणे गरजेचे आहे.

❖ **मेक इन इंडिया :-**

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २५ सप्टेंबर २०१४ रोजी भारतात बनवा हा उपक्रम राबविला. भारतीय व परकीय कंपन्यांनी मिळून भारतीय श्रम, साधनसामग्री, परकीय भांडवल, परकीय तंत्रज्ञान यांचा वापर करुन वस्तूंचे उत्पादन करावे. भारताची आयात कमी व्हावी, निर्यात वाढावी व गुणवत्तापूर्वक वस्तू क्षेत्रामध्ये गुंतवणूकीचे चांगले वातावरण निर्माण करणे हा भारतात बनवा या उपक्रमाचा उद्देश आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळातील शेती आणि निसर्गनिर्मित मालाची निर्यात करुन तयार माल भारतात आयात करणारी अर्थव्यवस्था स्वातंत्र्यानंतरच्या काळात बदलत गेली. तरुण भारतात पुढील दशकात

वार्षिक १ कोटी रोजगार संधीची आवश्यकता आहे. केवळ सेवा क्षेत्रातील प्रगती ही अवाढव्य वाढणारी रोजगार संधी उपलब्ध करुन देऊ शकत नाही. म्हणूनच भारतातील औद्योगिक क्षेत्राला पुन्हा पुढे आणण्यासाठी सरकारने 'भारतात बनवा' अशी महत्त्वाकांक्षी योजना आखली आहे. भारतात बनवा हा भारत सरकारचा महत्त्वपूर्ण राष्ट्रीय कार्यक्रम आहे. जो गुंतवणूक सुलभ करण्यासाठी आणि नवकल्पना वाढवण्यासाठी, कौशल्य विकास वाढवण्यासाठी, बौद्धिक संपत्तीचे संरक्षण करण्यासाठी आणि देशातील उत्कृष्ट उत्पादनाच्या पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी डिझाईन करण्यात आला आहे. भारतात बनवा अंतर्गत ॲटोमोबाईल, ॲटोमोबाईलचे सुटेभाग, जीव तंत्रज्ञान, बांधकाम, संरक्षण उद्योग, इलेक्ट्रीक यंत्रे, इलेक्ट्रॉनिक पद्धती, डिझाईन व उत्पादन, अन्नधान्य प्रक्रिया, माहिती तंत्रज्ञान, बिझनेस प्रोसेसिंग व मॅनेजमेंट, कातडी उद्योग, माहिती प्रसारण व मनोरंजन, खाणकाम, खनिजतेल, गॅस, औषधी जलवाहतूक, संदेशविकास, रेल्वे, पुर्ननिर्माण करता येणारी ऊर्जा, सौर ऊर्जा, पवन ऊर्जा व जलऊर्जा, रस्ते, महामार्ग, अंतरिक्ष, कापड, औष्णिक ऊर्जा, पर्यटन, आरोग्य व वेलनेस सेंटर या उद्योगांमध्ये गुंतवणूक करण्याचे ठरविण्यात आले.

भारत सरकारच्या वाणिज्य मंत्रालयाने Indian Brand Equity Foundation ची स्थापना करुन भारताबाहेर Made in Indian च्या लेबलला जागतिक पातळीवर मान्यता देण्याचा प्रयत्न केला आहे. भारतात बनवा या योजनेअंतर्गत पुढील उद्दिष्ट्ये महत्त्वपूर्ण आहेत :

१) उत्पादन क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नात स्थूल देशांतर्गत उत्पादनाच्या किमान २५% पर्यंत वाटा वाढवणे.

२) उत्पादन क्षेत्राची उत्पादकता वाढावी यासाठी गुंतवणूक वाढवणे.

३) सर्वोत्तम पायाभूत सुविधांची निर्मिती करणे.

४) मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती व संयोजनाला वाव देणे.

५) भारताच्या उत्पादन क्षेत्रात व्यवसाय करणे सहज सोपे राहिल.

६) भारत जगात गुंतवणूकीचे प्राधान्य क्षेत्र व्हावे यासाठी प्रयत्न करणे.

७) मालाला जागतिक पातळीवर डिझाईन व उत्पादन करणारे क्षेत्र बनवणे.

८) कौशल्य विकास, कौशल्य वृद्धी, नवप्रवर्तन यामध्ये उच्च गुणवत्ता प्राप्त करणे.

९) उच्च बौद्धिक संपत्तीचे संरक्षण करणे व अशा संपत्तीस भारतात आकर्षित करणे.

**भारतात बनवा कार्यक्रमाचे फलित :-**

१) रोजगारवृद्धी होईल.

२) आर्थिक विकास व आर्थिक वृद्धी होईल.

३) तंत्रज्ञानाचा विकास.

४) परकीय भांडवलाचा प्रवाह वाढेल.

५) ग्रामीण भागाच्या विकासास पोषक.

६) रुपयाचे महत्त्व वाढेल.

७) भारतीय उद्योगांना चालना मिळेल.

८) नागरी विमान व वाहतुक क्षेत्रातील गुंतवणूक वाढली.

९) सूक्ष्म, लघु व मध्यम आकाराचे १.५ लक्ष उद्योग सुरू झाले व त्यामधून ११ लक्ष लोकांना रोजगार प्राप्त झाला.

१०) औषधी उत्पादन तसेच उद्योगांचे उत्पादन वाढले.

११) भारतात वीजनिर्मिती वाढली.

**भारतात बनवा कार्यक्रमाचे दोष :-**

१) नैसर्गिक साधनसामुग्रीवर वाढता ताण.

२) वस्तूंच्या कमी होणाऱ्या किंमती.

३) अपूर्ण मागणी व मंदी.

४) प्रदूषण.

५) जमिनीची विभागणी व वाढता ताण.

६) नोटबंदीनंतर येणारी उद्योगांना रोखतेची समस्या.

७) अपेक्षेप्रमाणे पुरेसे रोजगार तयार न होणे.

८) लहान उद्योगांना मारक.

९) कृषी क्षेत्राकडे दुर्लक्ष.

वरील काही दोष भारतात बनवा या उपक्रमाचे असले तरी सध्या या जागतिकीकरणाच्या युगात ही योजना भारतासारख्या विकसनशील देशासाठी उपयुक्त ठरेल.

**समारोप :-**

भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाहीप्रधान देश आहे. बेकारी, दारिद्र्य, उपासमारी, साक्षरतेचे प्रमाण कमी, भ्रष्टाचार, लोकसंख्या यामुळे भारतात अनेक समस्या दिसून येतात. या समस्यांच्या विळख्यातून देशाला बाहेर काढण्यासाठी मोठ्या प्रमाणात रोजगार वृद्धी घडवून आणणे गरजेचे आहे आणि या दृष्टीकोनातून स्टार्टअप इंडिया, डिजिटल इंडिया आणि मेक इन इंडिया या तिन्ही योजना अतिशय महत्त्वाच्या आहेत. म्हणूनच आगामी भारताच्या यशस्विततेसाठी या तिन्ही उपक्रमांना अनन्य साधारण महत्त्व आहे.

**संदर्भ :-**


1. व्यवसायिक अर्थशास्त्र - एस. एच. अट्रावलकर - सेठ प्रकाशन - मुंबई जानेवारी २०२०
2. योजना मासिक - उमेश उजगरे - केंद्र सरकार माहिती व प्रसारण मंत्रालय प्रकाशन, नवी मुंबई. जून २०२२
3. योजना मासिक - मनोज्ञा राणी पाल केंद्र सरकार माहिती व प्रसारण मंत्रालय प्रकाशन, नवी मुंबई. नोव्हेंबर २०२३
4. योजना मासिक - मनोज्ञा राणी पाल केंद्र सरकार माहिती व प्रसारण मंत्रालय प्रकाशन, नवी मुंबई. जानेवारी २०२४
5. योजना मासिक - मनोज्ञा राणी पाल केंद्र सरकार माहिती व प्रसारण मंत्रालय प्रकाशन, नवी मुंबई. एप्रिल २०२३
6. भारतीय अर्थव्यवस्था - सुरवसे, महालिंगे, जुमारे, सामंत, कांबळे, सेठ प्रकाशन, मुंबई २०२१


***

# भारतीय विविध योजनांचा आढावा

## प्रा. डॉ. कांबळे नागनाथ विठ्ठलराव

अर्थशास्त्र विभाग प्रमुख, वसंतराव नाईक महाविद्यालय वसरणी, नांदेड

**प्रस्तावना** :-

भारतात 2014 मध्ये सार्वत्रिक निवडणुका पार पडल्या. तेव्हापासून भारतात अनेक केंद्रीय योजना ह्या नव्याने सुरुवात करण्यात आल्या. यामध्ये पायाभूत सुविधांसाठी निगडीत अशा प्रमुख योजना होत्या, त्या आजतागायत सुरु आहेत. या योजनांमध्ये कृषी, उद्योग, सेवा क्षेत्राशी निगडीत अशा योजनांचा समावेश करण्यात आला.

कृषी क्षेत्राशी निगडीत योजनांमध्ये कृषी विमा योजना, कृषी वित्त पुरवठा, कृषी सौर उर्जा इत्यादी योजनांचा समावेश केला जातो. उद्योग क्षेत्राशी संबंधित योजनांमध्ये मेक-इन इंडिया, स्टार्ट-अप इंडिया अशा योजनांचा समावेश होता, तर सेवा क्षेत्रांशी संबंधित अनेक वित्तीय योजना ज्यामध्ये जनधन योजनेचा समावेश केला जातो. त्याचबरोबर अनेक विमा योजना सुरु करण्यात आल्या आहेत.

प्रस्तुत शोधनिबंध लिहिताना केंद्रीय योजनांपैकी काही निवडक योजनांचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. या आढाव्यामध्ये प्रामुख्याने जनधन योजना, स्टार्ट-अप योजना, मेक-इन इंडिया तसेच डिजीटल योजना या योजनांचा आढावा घेण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये** :-

प्रस्तुत संशोधन कार्य करण्याची प्रमुख उद्दिष्ट्ये पुढील प्रमाणे सांगता येतील.

1. भारतातील अलिकडच्या कालखंडातील प्रमुख योजनांचा आढावा घेणे.
2. भारतातील जनधन योजनेचा आढावा घेणे.

3. भारतातील स्टार्ट-अप योजनेचा आढावा घेणे.
4. भारतातील मेक-इन इंडिया योजनेचा आढावा घेणे.
5. भारतात राबविलेल्या डिजीटल इंडिया योजनेचा आढावा घेणे.

**संशोधन पध्दती** :-

प्रस्तुत शोधनिबंध लिहिताना माहिती संकलन करण्यासाठी द्वितीय साधनसामग्रीचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये विविध संदर्भग्रंथ, प्रकाशित पुस्तके, विविध खात्यांचे अहवाल, वेबसाईट वरील माहितीचा आधार घेण्यात आला आहे.

**संशोधनाचे महत्त्व** :-

प्रस्तुत शोधनिबंधाचे महत्त्व पुढील प्रमाणे सांगता येईल.

1. भारतात राबविण्यात आलेल्या विविध योजनांचे आकलन होण्यास मदत होईल.
2. भारतात कार्यान्वित असलेल्या जनधन योजनेची माहिती प्राप्त होईल.
3. भारतातील स्टार्ट-अप योजनेचे स्वरुप लक्षात येईल.
4. भारतातील मेक-इन इंडिया योजनेचे स्वरुप लक्षात येईल.
5. भारतातील डिजीटल इंडिया या योजनेची विस्तृत माहिती प्राप्त होईल.

**विषय आशय** :-

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये भारतात राबविण्यात आलेल्या प्रमुख चार योजनांचा समावेश करण्यात आला आहे.

1. **जनधन योजना** :-

वित्तीय समावेशनासाठी ही योजना 28 ऑगस्ट 2014 ला सुरु करण्यात आली. ही योजना तीन टप्प्यामध्ये कार्यान्वित करण्यात आली. या योजनेचे सहा आधारस्तंभ आहेत. त्यामध्ये (1) वैश्विव बँकिंग पोहोच (2) बँक खाते (3) वित्तीय साक्षरता कार्यक्रम (4) पत हमी निधी (5) सुक्ष्म विमा (6) असंघटीत क्षेत्रासाठी पेन्शन योजना.

या योजनेतंर्गत 1 एप्रिल 2021 पर्यंत 42.2 कोटी बँक खाती जनधन योजनेत उघडली गेली. त्यापैकी 27.9 कोटी खाती ग्रामीण व 14.4 कोटी खाती शहरी भागात उघडली गेली. या योजनेतंर्गत 30.9 कोटी 'रूपे कार्ड' वितरीत करण्यात आले आहेत. या सर्व खात्यांमध्ये 1,45,550 कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. 1.26 लाख 'बँक मित्र' नेमण्यात आले आहेत. बँक मित्रांकडे एक ऑनलाईन उपकरण असते, ज्याद्वारे कुठेही e-kyc आधारीत खाते उघडता येते.

प्रस्तुत योजनेमुळे अनेक सकारात्मक बदल होत आहेत. उदा.

1) वित्तीय साक्षरता वाढून संघटीत वित्त संस्थांकडून होणारा वित्त पुरवठा वाढत आहे.
2) ग्रामीण भागातील वित्तीय समावेशनाला गती लाभत आहे.
3) सूक्ष्म विमा सेवांचा पाया विस्तृत होत आहे.

2. **स्टार्ट-अप इंडिया** :-

देशातील स्टार्ट-अप उद्योगांना पूरक ठरणारे स्टार्ट-अप इंडिया धोरण 16 जानेवारी 2016 ला जाहीर झाले.

**स्टार्ट-अप उद्योगाची व्याख्या** – भारतात स्थापन झालेल्या किंवा भारतात नोंदणी झालेल्या उद्योगाला स्टार्ट-अप असे म्हणतात.

1) त्या उद्योगाला पहिली 10 वर्षे स्टार्ट-अप म्हणतात.
2) त्या उद्योगाची वार्षिक उलाढाल 100 कोटी रुपयांच्या आत असेल तरच त्या उद्योगाला स्टार्ट-अप उद्योग म्हणतात.
3) औद्योगिक नाविन्यता, विकास, सुधारणा, प्रक्रिया, सेवा यासाठी कार्यरत असणाऱ्या व्यवसायाला देखील स्टार्ट-अप म्हटले जाईल.
4) तीव्र रोजगार निर्मिती व संयत्री निर्माण करणाऱ्या उद्योगांना स्टार्ट-अप म्हटले जाईल.

या आराखड्याचा उद्देश अभिकल्प व नाविन्यता पुरवून स्टार्ट-अप उद्योगांचे सशक्तीकरण करणे होय.

भारत सरकारने स्टार्ट-अप उद्योगांसाठी दूरदर्शन चॅनल अंतर्गत स्वतंत्र चॅनल निर्माण करण्याची घोषणा केली आहे.

2020-21 च्या अर्थसंकल्पात स्टार्ट-अप उद्योगांना साह्य करण्यासाठी प्रारंभिक निधी व सीड निधी उभारण्याची घोषणा केली आहे.

2022-23 च्या अर्थसंकल्पात Animation, Visual Effects, Gaming and Comic आणि उद्यमान म्हणजेच Sunrise क्षेत्रे — Artificial Intelligence, Geospatial System, Drones, Semiconductors, Space Economy, Genomics, Green Energy, Clean Mobility System यांना प्रोत्साहन देण्याची घोषणा केली.

3. **मेक-इन इंडिया** :-

भारताला 'उत्पादनाचे केंद्रस्थान' बनविण्याच्या उद्देशाने भारतातील गुंतवणूक वाढावी, व्यावसायिक वातावरण निर्मिती व्हावी आणि उत्पादनात लक्षणीय वाढ व्हावी, यासाठी भारत सरकारने 'मेक-इन इंडिया' हे अभियान 25 सप्टेबर 2014 ला सुरु केले.

मेक-इन इंडिया हे अभियान (1) नवीन प्रक्रिया (2) नवीन पायाभूत सुविधा (3) नवीन क्षेत्रे (4) नवीन विचारसरणी या बाबींवर अवलंबून आहे.

मेक-इन इंडिया अभियानासाठी 25 प्रकारची उत्पादन क्षेत्रे निवडली गेली आहेत. मेक-इन इंडिया सोबत कुशल भारत (Skill India) अभियान देखील सुरु केले.

मेक-इन इंडिया 2.0 सुरु करण्यात आले, त्याची उद्दिष्ट्ये पुढील प्रमाणे होती.

1) उत्पादन क्षेत्राचा मध्यवर्ती वृध्दी दर 12 ते 14% ठेवणे.
2) 2022 पर्यंत उत्पादन क्षेत्रात 100 मिलीयन जास्तीची रोजगार निर्मिती करणे.
3) भारताच्या GDP मध्ये उत्पादन क्षेत्राचा वाटा 25% करणे.

4) उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी आत्मनिर्भर भारत अभियान सुरु करणे.

2019 -20 च्या आर्थिक पाहणी अहवालात मेक-इन इंडिया अभियानांतर्गत Assemble in India अभियान सुरु करण्यात आले. या योजनेमुळे –

1) भारतात निर्यातीतील वाटा 2025 पर्यंत 3.5% ने आणि 2030 पर्यंत 6% ने वाढू शकतो.
2) भारतात 2025 पर्यंत 4 कोटी आणि 2030 पर्यंत 8 कोटी रोजगार निर्माण होऊ शकतो.

4. **डिजीटल इंडिया** :-

डिजीटल इंडिया ही योजना भारत सरकारने 2 जुलै 2015 ला सुरु केली. या योजनेचा मुख्य उद्देश म्हणजे शासकीय सेवा ही प्रत्येक नागरीकांना इलेक्ट्रॉनिकरित्या उपलब्ध करुन देणे ही होय.

या योजनेचे मुख्य तीन घटक आहेत.

1) डिजीटल आधारभूत संरचना तयार करणे.
2) डिजीटलरित्या सेवा वितरण.
3) डिजीटल साक्षरता

डिजीटल इंडिया कार्यक्रमाद्वारे शिक्षण, रूग्णालये आणि सरकारी कार्यालये देशाच्या राजधानीशी जोडल्या जातात. भारत सरकारने या कार्यक्रमांतर्गत पहिल्या टप्प्यात 2-5 लाख गावात ब्रॉण्डबँड सेवा उपलब्ध करुन दिल्या.

डिजीटल इंडिया कार्यक्रमामुळे कोविडच्या काळात लोक घरबसल्या काम करु शकले, डिजीटल पेमेंट करु शकले, विद्यार्थ्यांना शिक्षण प्राप्त झाले, त्याच ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना PM-सन्मान निधी यांसारख्या योजनांचा लाभ मिळाला आहे.

**संदर्भसूची** :-

1. किरण जी. देसले, भारतीय अर्थव्यवस्था, दिपस्तंभ प्रकाशन, जळगाव, 2022.
2. एस.एन.लाल आणि एस.के.लाल, भारतीय अर्थव्यवस्था, शुभम पब्लिशर्स, दिल्ली, 2021.
3. जे.पी. मिश्रा, भारतीय अर्थव्यवस्था, साहित्य भवन पब्लिकेशन्स, नवी दिल्ली, 2022.
4. www.pmjdy.gov.in
5. www.startupindia.gov.in
6. www.makeinindia.com
7. www.csc.gov.in

***

# भारताचे बदलते परराष्ट्र धोरण

**संभाजी अंकुश तांबे**

राज्यशास्त्र विभाग, विवेकानंद महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर.

---

**गोषवारा**

स्वतंत्र भारताच्या परराष्ट्र धोरणाला आकार व दिशा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी केले. परंतु नुकत्याच स्वातंत्र्य मिळालेल्या भारतासमोर शीतयुद्ध सारखे मोठे संकट उभे राहिले होते. त्यामुळे भारताने अलिप्ततावाद सारख्या चळवळीचा आधार घेऊन तटस्थतेची भूमिका स्वीकारली. ही भूमिका तत्कालीन परिस्थितीला अनुसरून घेतल्या गेली. यानंतर जशी जागतिक परिस्थिती बदलली त्यानुसार भारतीय परराष्ट्र धोरण देखील बदलत गेले. विशेषतः शीतयुद्धानंतर भारताचे परराष्ट्र धोरण मोठ्या प्रमाणात बदलले.

**मूळ शब्द -**

परराष्ट्र धोरण, आदर्शवादाकडून वास्तववादाकडे, राष्ट्रहितास प्राधान्य, राष्ट्रीय सुरक्षा, इ.

**प्रस्तावना -**

स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय परराष्ट्र धोरणाचा विकास प्रामुख्याने दोन टप्प्यांमध्ये झालेला दिसतो. यातील पहिला टप्पा म्हणजे १९४७ ते १९९०. या काळातील म्हणजेच भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून शुद्धयुद्धाच्या अखेरपर्यंतच्या काळातील टप्पा असे म्हणता येईल. दुसरा टप्पा हा शीतयुद्धोत्तर काळातील म्हणजेच १९९१ ते आज पर्यंतच्या कालावधीतील आहे. हा परराष्ट्र धोरणाचा अतिशय महत्त्वाचा टप्पा आहे. या काळामध्ये आंतरराष्ट्रीय राजकारणाची

समीकरणे बदलत असलेली दिसून येतात. कारण, या काळात शुद्धयुद्धाचा शेवट झाला होता. तसेच, जागतिकीकरणाची प्रक्रिया वेगवान होत होती. या बदललेल्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीमध्ये भारताने देखील आपले परराष्ट्र धोरण बदलण्यास सुरुवात केलेली दिसून येते.

**संशोधनाचे उद्देश -**

१ बदलते भारतीय परराष्ट्र धोरणाचे स्वरूप अभ्यासणे.

२ भारतीय परराष्ट्र धोरणासमोरील आव्हानांची माहिती घेणे.

**गृहीतकृत्ये**

१ शीतयुद्धानंतर बदललेल्या जागतिक परिस्थितीनुरूप भारताचे परराष्ट्र धोरण बदलले आहे.

२. भारतीय परराष्ट्र धोरणासमोर शेजारील राष्ट्रांशी संबंध सुधारणे यासारखे आव्हाने आहेत.

**संशोधन पद्धती.**

सदरील शोधनिबंधासाठी वर्णनात्मक, विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे.

**संशोधनाची साधने -**

प्रस्तुत संशोधन लेखांमध्ये तथ्य संकलनासाठी दुय्यम साधनसामग्रीचा वापर करण्यात आलेला असून त्यात विविध लेखकांच्या ग्रंथांचा, संशोधनांचा, वर्तमानपत्र तसेच इंटरनेटचा वापर करण्यात आलेला आहे

**भारतीय परराष्ट्र धोरण -**

स्वतंत्र भारताचे परराष्ट्र धोरण निर्मितीमध्ये भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांची भूमिका खूप महत्त्वाची राहिलेली आहे. म्हणूनच त्यांना भारतीय परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार म्हणून ओळखले जाते. भारतीय परराष्ट्र धोरणाला दिशा देण्याचे काम पंडित

नेहरूंनी आपल्या निर्णयातून केल्याचे दिसून येते. १९४७ पासून ते शीतयुद्धाच्या अंतापर्यंत म्हणजेच १९९०-९१ पर्यंत भारत हा त्यांनी दाखवलेल्या मार्गावरच बऱ्याच प्रमाणात प्रमाणात चालत राहिला. त्यामुळे या काळात भारतीय परराष्ट्र धोरण हे मुख्यतः स्वायत्त परराष्ट्र धोरण, अलिप्ततावाद आणि तिसऱ्या जगाचे ऐक्य या तत्त्वावर आधारलेले होते. यावेळी हितसंबंधाच्या रक्षणापेक्षा विचारसरणीला अधिक महत्त्व दिल्या गेले. तसेच, यामध्ये साम्राज्यवाद, शस्त्रस्पर्धेला विरोध शांततापूर्ण, सहअस्तित्व, आंतरराष्ट्रीय सहकार्य यांचा समावेश होतो. परंतु, शीतयुद्धानंतर या प्रकारच्या भारतीय धोरणामध्ये बदल होण्यास सुरुवात झाली.

**शीतयुद्धोत्तर काळातील बदलते परराष्ट्र धोरणाचे स्वरूप**

शीतयुद्धोत्तर काळामध्ये म्हणजेच १९९० नंतर जागतिक घडामोडी मध्ये अमुलाग्र बदल होण्यास सुरुवात झाली. त्यामुळे बदलत्या जागतिक परिस्थितीनुसार भारताने देखील आपले परराष्ट्र धोरण बदलण्यास सुरुवात केली. या काळामध्ये भारतीय परराष्ट्र धोरणाने आर्थिक हितसंबंधाचे रक्षण करणे, राजकीय संबंधापेक्षा आर्थिक संबंध याला महत्त्व प्राप्त होणे, तसेच समाजवादाकडून भांडवलदाराकडे झुकाव यासारखे तत्वे स्वीकारलेले दिसून येतात. त्यामुळे भारतीय परराष्ट्र धोरण आदर्शवादाकडून वास्तववादी बनू लागले. या बदलत्या काळात भारताने आपले लक्ष पूर्वकडील राष्ट्रांकडे वळवलेले पाहायला मिळते. कारण पूर्वेकडील राष्ट्र देखील व्यापाराच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत, याची जाणीव राज्यकर्त्यांना झाली.

शीतयुद्धोत्तर काळामध्ये भारताचे शेजारील राष्ट्रांबरोबरचे संबंध सुधारण्यावर भर देण्यात आला. त्यात प्रामुख्याने भारत-पाक संबंध याचा उल्लेख करण्यात येतो. यामध्ये जम्मू-काश्मीरचा मुद्दा काही वेळ बाजूला ठेवून इतर प्रश्नावर सहकार्य करण्याचे ठरवले गेले. त्यानुसार भारतीय चित्रपट पाकिस्तानमध्ये प्रदर्शित करण्यात आले तर पाकिस्तानचे अनेक

गायक भारतात येऊ लागले. तसेच भारत-पाकिस्तान यांच्यामध्ये क्रिकेट सामने सुरू झाले. शिवाय, भारत-पाकिस्तान व्यापारी संबंधांमध्ये देखील वाढ होण्यास सुरुवात झाली.

१९९८-२००३ या काळामध्ये वाजपेयींनी भारताचे परराष्ट्र धोरण अधिक वास्तववादी करण्याचा प्रयत्न केला. यामध्ये भारतीय परराष्ट्र धोरणाला बदलून टाकणारा निर्णय वाचपेयी यांनी घेतले. या निर्णयानुसारच भारताने आण्वस्त्रे बनवण्यास सुरुवात केली आणि स्वतःला आण्वस्त्र संपन्न राष्ट्र म्हणून घोषित केले. आपले वेगळे आण्वस्त्र धोरण देखील जाहीर केले. या धोरणांमध्ये भारत प्रथम दुसऱ्या देशावर कधीही आण्वस्त्र हल्ला करणार नाही, यासारखे तत्व समाविष्ट होते.

२००४ ते २०१४ या काळामध्ये भारताने आर्थिक विकासाचे कार्यक्रम चालू ठेवले. तसेच, जागतिक महासत्तांशी भारताने आपले संबंध सुधारण्याचा प्रयत्न केला. शिवाय, भारताने व्यापारी संबंध सुधारण्यावर या काळामध्ये भर दिला. इतर राष्ट्रांमध्ये गुंतवणूक करण्याकडे कल या काळामध्ये वाढलेला दिसून येतो.

२०१४ नंतर भारतीय परराष्ट्र धोरणामध्ये प्रथमतः शेजारील राष्ट्रांचे संबंध सुधारण्यावर भर देण्यात आलेला दिसून येतो, म्हणूनच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपला पहिला परदेश दौरा भूतान पासून सुरू केला. याला कारण की, या शेजारील राष्ट्रांमध्ये लोकशाही व्यवस्थित चालली, शांतता प्रस्थापित झाली, त्यांचा विकास झाला तरच भारतात शांतता आणि स्थैर्य निर्माण होईल. दुसरे म्हणजे या काळात असेही राष्ट्रांसोबत सालोख्याचे संबंध विकसित करण्यावर भर देण्यात आला. तिसरी गोष्ट म्हणजे विकसित देशांबरोबर चांगले संबंध विकसित करण्याकडे लक्ष देण्यात आले. त्यासाठी पंतप्रधान यांनी अमेरिका दौरा देखील केलेला दिसून येतो. या काळामध्ये आर्थिक विकासाला प्राधान्य देण्यात आले. परदेशी गुंतवणूक आकर्षित करण्याचा प्रयत्न करण्यात

आला. परदेशी भांडवल व तंत्रज्ञान यासाठी पोषक वातावरण निर्मिती करण्यात आली. तसेच, राष्ट्रीय सुरक्षा, हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी योग्य ते पावले यावेळी उचललेले पाहायला मिळतात.

**भारतीय परराष्ट्र धोरणासमोरील आव्हाने**

शीतयुद्धानंतर प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय राजकारणाचे समीकरणे बदलत आहेत. अशावेळी भारतीय परराष्ट्र धोरणासमोर देखील काही आव्हाने उभे राहिलेले आहेत. त्यात खालील काही अव्हानांचा समावेश होतो.

**शेजारील राष्ट्रांशी संबंध बळकट करणे** –

भारताचे शेजारील राष्ट्र भारतासंबंधी शांसक असलेले दिसून येतात. त्यात नेपाळ, भुतान, श्रीलंका, बाग्लादेश यांचा समावेश होतो. ही राष्ट्रे कधी भारताविरोधी भुमिका घेतात तर कधी भारताला समर्थन देतात. अशावेळी त्यांचा विश्वास संपादन करून त्यांच्याशी भारताला आपले संबंध बळकट करणे हे फार आवश्यक आहे.

**पाकिस्तान संबंधाचे व्यवस्थापन करणे -**

भारत पाकिस्तान या देशाच्या सीमेवरून सतत चालत असलेला संघर्ष पुढे देखील भारतासाठी डोकेदुखी ठरणार आहे. त्याचे दोन्ही राष्ट्रीय अण्वस्त्रसंपन्न असल्यामुळे हा प्रश्न आता युद्धाच्या मार्गाने सोडवणे म्हणजे जागतिक राजकारणामध्ये स्वतःवर नामुष्की वढवून घेण्यासारखे आहे. त्यामुळे हा प्रश्न शांततेच्या मार्गाने बोलणे चालू ठेवून सोडवण्याशिवाय भारताकडे दुसरा पर्याय नाही. या देशासोबत भारताला चांगले संबंध प्रस्तापीत करणे आवश्यक आहे.

**चीनची वाढती आक्रमकता** –

चीनचे विस्तारवादी धोरण भारतासाठी डोकेदुखी ठरत आहे. चीन पाकिस्तानसह युती करून भारताला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न करताना दिसत आहे. अशावेळी भारताला आपले संरक्षण सामर्थ्य वाढवणे आवश्यक

आहे. तसेच चीन सोबत संवादाची प्रक्रिया भारताला चालू ठेवणे आवश्यक आहे.

**समारोप** -

स्वातंत्र्योत्तर काळात शीतयुद्धाच्या शेवटपर्यंत भारतीय परराष्ट्र धोरण हे आदर्शवादावर आधारलेले आपल्याला दिसून येते. तसेच, यामध्ये अलिप्ततावादाला महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले होते. परंतु शीतयुद्धानंतर भारतीय परराष्ट्र धोरणामध्ये कमालीचे परिवर्तन पाहायला मिळाले. या काळामध्ये भारतीय राष्ट्रीय हितसंबंधांना महत्त्व प्राप्त झालेले दिसून येतात. भारताने आदर्शवादापेक्षा वास्तववादावर भर देण्यास सुरुवात केली. तसेच राष्ट्रीय सुरक्षा, दहशतवाद, आंतरराष्ट्रीय व्यापार यासारख्या प्रश्नांना भारतीय परराष्ट्र धोरणामध्ये महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले.

**निष्कर्ष** -

शीतयुद्धानंतर भारतीय परराष्ट्र धोरण वास्तववादी बनले. भारतीय परराष्ट्र धोरण आर्थिक हितसंबंध, राष्ट्रीय हित याला प्राधान्य देत आहे. भारतीय परराष्ट्र धोरण बदलत्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीनुसार सतत बदलत आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची -**


1. देवळांकर शैलेंद्र, (२०१७) भारताचे परराष्ट्र धोरण नवीन प्रवाह, सकाळ पेपर प्रा.लि.पुणे.
2. देवळांकर शैलेंद्र, (२०१४) समकालीन जागतिक राजकारण भारताच्या परराष्ट्र आणि संरक्षण धोरणा पुढील आव्हाने, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.
3. देवळांकर शैलेंद्र (२०१६) आंतरराष्ट्रीय संबंध, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.
4. मिश्रा म.क. (२०१७) आंतरराष्ट्रीय संबंध, पॅसिफिक पब्लिकेशन, दिल्ली.
5. रायपूरकर व. (२०१८) आंतरराष्ट्रीय संबंध मंगेश प्रकाशन, नागपूर.
6. भिडे चिंतामणी (२०१८) समकालीन आंतरराष्ट्रीय राजकारण, डायमंड पब्लिकेशन, पुणे.


***

# डिजिटल इंडिया : उद्दिष्टे, फायदे आणि आव्हाने

**डॉ. सिद्धार्थ हरिदास मेश्राम**
सहयोगी प्राध्यापक (अर्थशास्त्र विभाग) सेठ केसरीमल पोरवाल कला आणि विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, कामठी, जि. नागपूर - 441001

---

**प्रास्ताविक:**

**डिजिटल इंडिया:** डिजिटल इंडिया हा ग्रामीण भागात हाय-स्पीड इंटरनेट नेटवर्क उपलब्ध करून देण्यासाठी भारत सरकारने घेतलेला पुढाकार होता. मेक इन इंडिया, भारतमाला, सागरमाला, स्टार्टअप इंडिया, भारतनेट आणि स्टँडअप इंडिया यासह इतर सरकारी योजनांचे लाभार्थी म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 1 जुलै 2015 रोजी डिजिटल इंडिया मिशन सुरू केले. विशेषत: केंद्र सरकारने सुरू केलेल्या अनेक उपक्रमांचे सकारात्मक परिणाम दिसून आले आहेत. डिजिटायझेशनचे प्रयत्नही सुरू आहेत, ज्यामध्ये पंचायतीसारख्या स्थानिक संस्थांना सर्वसमावेशकपणे समाविष्ट करून त्यांची कार्ये सुलभ करण्यासाठी आणि त्यांच्या दैनंदिन कामकाजात पारदर्शकता वाढविण्यासाठी डिजिटल इंडिया कार्यक्रम पूर्णपणे कार्यान्वित झाला आहे.

**डिजिटल इंडिया 2023 :** ही योजना भारत सरकारचा प्रमुख उपक्रम आहे, ज्याचे उद्दिष्ट भारताला डिजिटली सक्षम समाज आणि ज्ञान अर्थव्यवस्थेत बदलण्याचे आहे. कागदोपत्री कामे काढून नागरिकांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सरकारी सेवांचा लाभ घेता येईल याची खात्री करणे हे त्याचे उद्दिष्ट होते. भारताच्या पंतप्रधानांनी भारताला ज्ञानावर

आधारित भविष्यासाठी तयार करण्यासाठी आणि तंत्रज्ञानाला सक्षम बदलाच्या केंद्रस्थानी ठेवण्यासाठी डिजिटल इंडियाची सुरुवात केली. पंतप्रधानांच्या भाषणानुसार, डिजिटल इंडियामध्ये भारताचे भविष्य बदलण्याची क्षमता आहे, जेणेकरून IT (भारतीय प्रतिभा) + IT (माहिती तंत्रज्ञान) = IT (India Tomorrow). अनेक विभागांचा समावेश असलेला हा एक छत्री कार्यक्रम असण्याचा हेतू आहे. कार्यक्रम मोठ्या संख्येने कल्पना आणि विचारांना एकाच, सर्वसमावेशक दृष्टीमध्ये एकत्रित करतो, जेणेकरून प्रत्येकाला स्वतःच्या पायावर उभे राहून मोठ्या ध्येयाचा भाग म्हणून पाहिले जाईल. हे एकीकरण डिजिटल इंडिया मिशनला एक संकल्पना म्हणून पाहते. त्यासाठी, डिजिटल इंडिया कार्यक्रम व अनेक विद्यमान योजना एकत्र करतो, ज्यांची पुनर्रचना करून पुनर्केंद्रित करण्यात आले आहे. तसेच समन्वित पद्धतीने अंमलात आणल्या जात आहेत. डिजिटल इंडियाचा एक भाग म्हणून कार्यक्रमांच्या एकूण ब्रँडिंगचा उद्देश त्यांच्या परिवर्तनात्मक प्रभावावर प्रकाश टाकणे आहे. डिजिटल इंडियाच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून त्यांचे परिवर्तनात्मक प्रभाव ठळकपणे दाखविण्यासाठी कार्यक्रमांना सातत्याने ब्रँड केले जात आहे. डिजिटल इंडियाची अंमलबजावणी संपूर्ण सरकारद्वारे केली जाईल, ज्यामध्ये इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान विभाग संपूर्ण समन्वय प्रदान करेल.

डिजिटल इंडिया मिशनचे ब्रीदवाक्य **'Power to Empower'** आहे. डिजिटल इंडिया उपक्रमाचे तीन प्रमुख घटक आहेत. ते म्हणजे डिजिटल पायाभूत सुविधा निर्माण करणे, सेवांचे डिजिटल वितरण आणि डिजिटल साक्षरता होय.

**डिजिटल इंडियाची मुख्य तीन मुख्य उद्दिष्टे:**

- प्रत्येक नागरिकाला डिजिटल इंडियाच्या फायद्यांची जाणीव करून देणे.
- नागरिकांच्या मागणीनुसार प्रशासन आणि सेवा प्रदान करणे.
- प्रत्येक नागरिकाच्या डिजिटल सक्षमीकरणाकडे लक्ष देणे.

इलेक्ट्रॉनिक सेवा, उत्पादने, उत्पादन आणि नोकरीच्या संधी या क्षेत्रांमध्ये सर्वसमावेशक वाढ करण्याच्या दृष्टीकोनातून डिजिटल इंडियाची स्थापना करण्यात आली. डिजीटल इंडियाचे उद्दिष्ट वाढीच्या क्षेत्राच्या नऊ स्तंभांना अत्यावश्यक सहाय्य प्रदान करणे आहे. यापैकी प्रत्येक क्षेत्र एक जटिल कार्यक्रम आहे आणि अनेक मंत्रालये आणि विभागांमध्ये समावेश करतो. डिजिटल इंडियाचे नऊ स्तंभ खाली दिले आहेत,

**ब्रॉडबँड महामार्ग**- यामध्ये तीन उपघटक समाविष्ट आहेत, सर्वांसाठी ब्रॉडबँड - ग्रामीण, सर्वांसाठी ब्रॉडबँड - शहरी आणि राष्ट्रीय माहिती पायाभूत सुविधा (NII).

**युनिव्हर्सल ऍक्सेस टू मोबाईल कनेक्टिव्हिटी**- हा उपक्रम नेटवर्क प्रवेशावर आणि देशातील कनेक्टिव्हिटीमधील अंतर भरून काढण्यावर लक्ष केंद्रित करतो.

**सार्वजनिक इंटरनेट प्रवेश कार्यक्रम-** सार्वजनिक इंटरनेट प्रवेश कार्यक्रमाचे दोन उपघटक म्हणजे कॉमन सर्व्हिसेस सेंटर्स (CSCs) आणि पोस्ट ऑफिस हे बहु-सेवा केंद्रे आहेत.

**ई-गव्हर्नन्स:** तंत्रज्ञानाद्वारे सरकार सुधारणे- सरकारी प्रक्रिया सुलभ करण्यासाठी आणि सरकारी प्रक्रिया अधिक कार्यक्षम करण्यासाठी आयटीचा वापर करून पुनर्अभियांत्रिकी करणे हे विविध सरकारी डोमेनमध्ये सरकारी सेवांचे वितरण अधिक प्रभावी करण्यासाठी

परिवर्तनासाठी महत्त्वपूर्ण आहे आणि म्हणून सर्वांनी त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. मंत्रालये/विभाग.

**ई-क्रांती** - सेवांचे इलेक्ट्रॉनिक वितरण- सार्वजनिक सेवांचे वितरण सुधारण्यासाठी आणि त्यांच्यामध्ये प्रवेश करण्याची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी. या संदर्भात, ई-गव्हर्नमेंटच्या युगाची सुरुवात करण्यासाठी विविध राज्य सरकारे आणि केंद्रीय मंत्रालयांनी अनेक ई-गव्हर्नन्स उपक्रम हाती घेतले आहेत. भारतातील ई-गव्हर्नन्स सरकारी विभागांच्या संगणकीकरणापासून नागरिककेंद्रितता, सेवा अभिमुखता आणि पारदर्शकता यासारख्या प्रशासनातील बारीकसारीक बाबींचा समावेश करणाऱ्या उपक्रमांमध्ये सातत्याने विकास झाला आहे.

**सर्वांसाठी माहिती-** या स्तंभाचा उद्देश भारतातील लोकांसाठी वापर, पुनर्वापर आणि पुनर्वितरणासाठी लाइन मंत्रालयांद्वारे व्युत्पन्न केलेल्या विश्वसनीय डेटाची पारदर्शकता आणि उपलब्धता सुनिश्चित करणे आहे.

**इलेक्ट्रॉनिक्स मॅन्युफॅक्चरिंग-** हा स्तंभ देशातील इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनाला चालना देण्यावर लक्ष केंद्रित करतो.

**नोकऱ्यांसाठी IT-** हा आधारस्तंभ युवकांना IT/ITES क्षेत्रात रोजगाराच्या संधी मिळविण्यासाठी आवश्यक कौशल्यांचे प्रशिक्षण देण्यावर भर देतो.

**अर्ली हार्वेस्ट प्रोग्राम्स**- या स्तंभामध्ये विविध अल्प-मुदतीच्या प्रकल्पांचा समावेश आहे ज्याचा भारतीय डिजिटल इकोसिस्टमवर त्वरित परिणाम होतो जसे की मास मेसेजिंगसाठी IT प्लॅटफॉर्म, ई-ग्रीटिंग्जचे क्राउड सोर्सिंग, सरकारी कार्यालयांमध्ये बायोमेट्रिक उपस्थिती, सर्व विद्यापीठांमध्ये WI-FI. इ.

**डिजिटल इंडिया मिशनचे फायदे :**

डिजिटल इंडिया मिशन हा एक उपक्रम आहे ज्यामध्ये देशातील ग्रामीण भागांना हाय-स्पीड इंटरनेट नेटवर्कने जोडण्याच्या योजनांचा

समावेश आहे. सार्वजनिक इंटरनेट प्रवेश कार्यक्रम हा डिजिटल इंडियाच्या नऊ स्तंभांपैकी एक आहे. डिजिटल अवलंब करण्याच्या व्यासपीठावर, भारत जागतिक स्तरावर पहिल्या 2 देशांमध्ये आहे आणि भारताची डिजिटल अर्थव्यवस्था 2023 पर्यंत $1 ट्रिलियन ओलांडण्याची शक्यता आहे.

**डिजिटल इंडियाचे काही फायदे :**

- ई-गव्हर्नन्सशी संबंधित इलेक्ट्रॉनिक व्यवहारांमध्ये वाढ झाली आहे.
- भारत नेट कार्यक्रमांतर्गत 2,74,246 किमी लांबीच्या ऑप्टिकल फायबर नेटवर्कने 1.15 लाख ग्रामपंचायतींना जोडले आहे.
- भारत सरकारच्या नॅशनल ई-गव्हर्नन्स प्रोजेक्ट अंतर्गत एक कॉमन सर्व्हिस सेंटर (CSC) तयार करण्यात आले आहे जे माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान (ICT) साठी प्रवेश प्रदान करते.
- संगणक आणि इंटरनेट वापराद्वारे, CSCs ई-गव्हर्नन्स, शिक्षण, आरोग्य, टेलिमेडिसिन, मनोरंजन आणि इतर सरकारी आणि खाजगी सेवांशी संबंधित मल्टीमीडिया सामग्री प्रदान करतात.
- सौर प्रकाश, एलईडी असेंबली युनिट, सॅनिटरी नॅपकिन उत्पादन युनिट आणि वाय-फाय चौपाल यासारख्या सुसज्ज सुविधांसह डिजिटल गावांची स्थापना.
- सेवांच्या वितरणासाठी इंटरनेट डेटाचा वापर प्रमुख साधन म्हणून केला जातो आणि शहरी इंटरनेट प्रवेश 64% पर्यंत पोहोचला आहे.
- कोविड-19 महामारीच्या काळात डिजिटल इंडिया कार्यक्रमामुळे लोक घरबसल्या काम करू शकले, डिजिटल पेमेंट करू शकले, विद्यार्थ्यांना टीव्ही, मोबाइल, लॅपटॉपवरून शिक्षण मिळाले, रुग्णांना टेलि-कन्सल्टेशनद्वारे डॉक्टरांचा सल्ला मिळाला आणि

ग्रामीण भागातील शेतकरी त्यांच्या बँक खात्यात थेट प्रवेश करणे. खात्यात PM-किसान सारख्या योजनांचा लाभ मिळविणे सुलभ झाले.

**डिजिटल इंडियाची आव्हाने:** भारत सरकारने देशातील ग्रामीण भागांना हाय-स्पीड इंटरनेट नेटवर्कने जोडण्यासाठी डिजिटल इंडिया मिशनद्वारे पुढाकार घेतला आहे. आर्थिक खर्च, निरक्षरता, डिजिटल साक्षरतेचा अभाव, नागरिक आणि सरकारी विभाग तसेच कर्मचाऱ्यांबद्दलची विरोधी वृत्ती यासारख्या भारतातील कोणत्याही सरकारी कार्यक्रमातील नेहमीच्या आव्हानांव्यतिरिक्त, डिजिटल तक्रार निवारण, सायबर-गुन्हे आणि धोरणात्मक समस्या डिजिटल इंडियासमोरील प्रमुख आव्हाने म्हणून उदयास येत आहेत. ते पुढीलप्रमाणे दर्शविली आहेत.

- दैनंदिन इंटरनेटचा वेग, तसेच वाय-फाय हॉटस्पॉट, इतर विकसित राष्ट्रांच्या तुलनेत मंद आहेत.
- बहुतांश लघु आणि मध्यम उद्योगांना नवीन आधुनिक तंत्रज्ञानाशी जुळवून घेण्यासाठी खूप संघर्ष करावा लागतो.
- सहज इंटरनेट प्रवेशासाठी एंट्री-लेव्हल स्मार्टफोन्सची मर्यादित क्षमता.
- डिजिटल तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात कुशल मनुष्यबळाचा अभाव.
- डिजिटल गुन्ह्याच्या वाढत्या धोक्याची तपासणी आणि निरीक्षण करण्यासाठी सुमारे दहा लाख सायबरसुरक्षा तज्ञ शोधणे.
- वापरकर्ता शिक्षणाचा अभाव.

**डिजिटल इंडिया उपक्रम:** डिजिटल इंडिया मोहिमेअंतर्गत सरकारने अनेक उपक्रम हाती घेतले आहेत. अशा काही महत्त्वाच्या उपक्रमांची खाली चर्चा केली आहे.

**DigiLockers** – या प्रमुख उपक्रमाचा उद्देश नागरिकांच्या डिजिटल दस्तऐवज वॉलेटमध्ये अस्सल डिजिटल दस्तऐवज उपलब्ध करून देऊन नागरिकांचे 'डिजिटल सक्षमीकरण' हे आहे.

**ई-हॉस्पिटल्स** - ही एक हॉस्पिटल मॅनेजमेंट इन्फॉर्मेशन सिस्टीम (HMIS) आहे जी रुग्ण, रुग्णालये आणि डॉक्टरांना एकाच डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे जोडण्यासाठी एक-स्टॉप उपाय आहे. फेब्रुवारी 2021 पर्यंत, डिजिटल इंडिया मोहिमेअंतर्गत तब्बल 420 ई-रुग्णालये स्थापन करण्यात आली आहेत.

**ई-पाठशाळा -** NCERT द्वारे विकसित केलेली, ई-पाठशाळा वेबसाइट आणि मोबाइल अॅपद्वारे पाठ्यपुस्तके, ऑडिओ, व्हिडिओ, नियतकालिके आणि इतर विविध प्रिंट आणि नॉन-प्रिंट सामग्रीसह सर्व शैक्षणिक ई-संसाधनांचे प्रदर्शन आणि प्रसार करते.

**भीम अॅप** – भारत इंटरफेस फॉर मनी हे एक अॅप आहे जे युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस (UPI) वापरून पेमेंट व्यवहार सोपे, सोपे आणि जलद करते.

**आधार प्रणाली:** आधार ओळख प्लॅटफॉर्म हा 'डिजिटल इंडिया' च्या मूलभूत पायांपैकी एक आहे, ज्यामध्ये प्रत्येक नागरिकाला एक विशिष्ट ओळख किंवा आधार क्रमांक दिला जातो. आधार, जगातील सर्वात मोठी बायोमेट्रिक्स-आधारित ओळख प्रणाली, सामाजिक आणि आर्थिक समावेशन, सार्वजनिक क्षेत्रातील सेवा सुधारणा, वित्तीय बजेट व्यवस्थापन, सुविधा आणि लोक-केंद्रित प्रशासन यासाठी एक धोरणात्मक धोरण साधन आहे. डुप्लिकेट किंवा बनावट ओळख टाळण्यासाठी हे अद्वितीय आणि मजबूत आहे आणि विविध सरकारी सहाय्य प्रणाली आणि कार्यक्रम, मोकळेपणा आणि चांगले प्रशासन यासाठी पाया/प्राथमिक ओळख म्हणून वापरले जात आहे.

**सायबर स्वच्छता केंद्र:** भारत सरकारच्या डिजिटल इंडिया उपक्रमामध्ये सायबर स्वच्छता केंद्र (बॉटनेट क्लीनिंग आणि मालवेअर विश्लेषण केंद्र) समाविष्ट आहे, ज्याचे उद्दिष्ट भारतातील बॉटनेट संसर्ग शोधून एक सुरक्षित सायबर स्पेस तयार करणे आणि पुढील संक्रमण प्रतिबंध करण्यासाठी अंतिम वापरकर्त्यांच्या प्रणालींना सूचित करणे, सक्षम करणे आणि सुरक्षित करणे हे आहे. देशाच्या 'नॅशनल सायबर सिक्युरिटी पॉलिसी'च्या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी याची स्थापना करण्यात आली आहे, ज्याचा उद्देश सुरक्षित सायबर इकोसिस्टम तयार करणे आहे. हे केंद्र इंटरनेट सेवा प्रदाते आणि उत्पादन/अँटीव्हायरस उत्पादक यांच्याशी जवळून सहकार्य करते.

**इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सर्व सेवा लोकांपर्यंत पोहोचवणे:** गेल्या काही वर्षांमध्ये, विविध राज्य सरकारे आणि केंद्रीय मंत्रालयांनी ई-गव्हर्नन्सच्या युगात प्रवेश करण्यासाठी अनेक पावले उचलली आहेत. सार्वजनिक सेवा वितरणात सुधारणा करण्यासाठी आणि त्या प्राप्त करणे सोपे करण्यासाठी विविध स्तरांवर प्रयत्न केले गेले आहेत. भारतात, सरकारी विभागांच्या संगणकीकरणापासून ते नागरिक-केंद्रितता, सेवा अभिमुखता आणि पारदर्शकता यासारख्या प्रशासनातील बारीकसारीक घटकांचा समावेश असलेल्या कार्यक्रमांपर्यंत ई-गव्हर्नमेंटने प्रगती केली आहे.

**प्रमाणपत्र-इन (Cert-In):**

- भारतीय सायबर स्पेस सुरक्षित करण्याच्या उद्देशाने CERT-In ची स्थापना करण्यात आली. हे सेवा सुरक्षा गुणवत्ता, व्यवस्थापन सेवा, तसेच घटना प्रतिबंध आणि प्रतिसाद सेवा प्रदान करते. माहिती तंत्रज्ञान (सुधारणा) कायदा 2008 च्या कलम 70B अंतर्गत सायबर सुरक्षेच्या क्षेत्रात खालील कार्ये पार पाडण्यासाठी राष्ट्रीय एजन्सी म्हणून नियुक्त केले आहे.

- सायबर घटनांवरील माहिती संकलित केली जाते, विश्लेषित केली जाते आणि प्रसारित केली जाते सायबर सुरक्षा घटनांचा अंदाज आणि इशारा दिला जातो आणि सायबर सुरक्षा घटना आपत्कालीन परिस्थितीत हाताळल्या जातात.
- माहिती सुरक्षा पद्धती, प्रक्रिया, सायबर घटना प्रतिबंध, प्रतिसाद आणि अहवालाशी संबंधित शिफारसी, सल्ला, असुरक्षितता नोट्स आणि श्वेतपत्रे जारी करते.

**ॲग्रीमार्केट मोबाइल ॲप:** शेतकऱ्यांना शेतीमालाच्या किमतींबाबत अद्ययावत ठेवण्याच्या आणि त्यांना त्रासदायक विक्री करण्यापासून परावृत्त करण्याच्या उद्देशाने मोबाईल ॲप्लिकेशन तयार करण्यात आले. AgriMarket मोबाइल ॲप शेतकऱ्यांना त्यांच्या डिव्हाइसच्या 50 किलोमीटरच्या आत असलेल्या बाजारपेठेतील पिकांच्या किंमतीबद्दल माहिती मिळवू देते. हे सॉफ्टवेअर मोबाईल GPS चा वापर करून शेतक-यांची स्थिती आपोआप कॅप्चर करते आणि 50-किलोमीटरच्या परिघात पिकांची बाजारमूल्ये मिळवते. Agmarknet पोर्टलचा वापर कृषी मालाच्या किमती मिळवण्यासाठी केला जातो. हे ॲप्स सध्या इंग्रजी आणि हिंदी या दोन भाषांमध्ये प्रवेश योग्य आहे.

**बेटी बचाओ बेटी पढाओ:** मुलींचा जन्म, संगोपन आणि भेदभाव न करता त्यांना शिक्षण मिळावे, जेणेकरून त्या सक्षम नागरिक बनू शकतील याची खात्री करण्यासाठी हा कार्यक्रम प्रयत्नशील आहे. 100 जिल्ह्यांमध्ये, कार्यक्रम राष्ट्रीय, राज्य आणि जिल्हा-स्तरीय हस्तक्षेपांना समुदाय-स्तरीय कृतीशी जोडतो, अधिक प्रभावासाठी विविध भागधारकांना एकत्र आणतो. मोहिमेशी जोडलेले विविध व्हिडिओ उपक्रमाच्या यूट्यूब चॅनेलवर उपलब्ध आहेत.

**ई-पंचायत:** हा एक ग्रामीण ई-शासन कार्यक्रम आहे जो ग्रामपंचायत कर्तव्ये स्वयंचलित करण्याच्या उद्देशाने संपूर्ण सॉफ्टवेअर समाधान प्रदान करतो. स्थानिक समुदायांना त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक पद्धती, किस्से आणि आव्हाने दाखवण्यासाठी आणि सामायिक करण्यासाठी सक्षम बनवण्याच्या उद्देशाने पंचायत प्रतिनिधींसाठी उर्वरित जगाशी संवाद साधण्याचा हा एक मार्ग आहे.

**ई-बिझ:** Infosys Technologies Limited (Infosys), वाणिज्य आणि उद्योग मंत्रालय, भारत सरकारच्या औद्योगिक धोरण आणि प्रोत्साहन विभागाच्या (DIPP) निर्देशानुसार आणि देखरेखीखाली eBiz ची अंमलबजावणी करत आहे. इंटरनेट प्लॅटफॉर्मद्वारे गव्हर्नमेंट-टू-बिझनेस (G2B) सेवांमध्ये जलद आणि सुलभ प्रवेश प्रदान करून देशातील व्यावसायिक वातावरण सुधारणे हे eBiz चे ध्येय आहे. हे फर्म सुरू करण्यासाठी आणि देखरेख करण्यासाठी आवश्यक असलेल्या अनेक नियामक प्रक्रियांमधील अनावश्यक विलंब कमी करण्यास मदत करेल.

- **निष्कर्ष :**

भारतीय शासन अधिक पारदर्शक बनवण्यासाठी,प्रत्येक गाव आणि दुर्गम भागात सरकारी सुविधांना हाय स्पीड इंटरनेटने जोडण्यासाठी आणि भारताला डिजिटली सशक्त देशात बदलण्यासाठी भारत सरकारने सुरू केलेला डिजिटल इंडिया उपक्रम हा एक महत्त्वाचा कार्यक्रम आहे. डिजीटल इंडिया योजना भारताला निरक्षरता, गरिबी, बेरोजगारी या सर्व वाईट गोष्टींपासून दूर ठेवू शकते आणि ही योजना भारतातील मागासलेल्या भागांसाठी अमृतासारखे काम करेल तसेच नवीन भारत निर्माण करण्यास मदत करेल. हा प्रकल्प सर्वांसाठी ई-सेवांचा प्रचार करून देशाचा विकास सुलभ करतो आणि अनेक कार्यक्रम नियोजनाच्या टप्प्यापासून अंमलबजावणीच्या टप्प्यात सुधारित केले आहेत अनेक योजना

यशस्वीपणे स्वीकारल्या गेल्या आहेत. डिजिलॉकर सारख्या सेवा आता चार दशलक्ष वापरकर्ते वापरत आहेत. My Gov.in अॅप नागरिकांना सरकारशी संवाद साधण्यासाठी एक व्यासपीठ प्रदान करते आणि दहा लाखांहून अधिक वापरकर्ते वापरतात.

सुमारे 12000, ग्रामीण भागातील पोस्ट ऑफिस शाखा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने जोडल्या गेल्या आहेत .जीडीपी, हेल्थकेअर, ऑनलाइन पायाभूत सुविधा, मेक इन इंडिया उपक्रम आणि शिक्षण क्षेत्रातही वाढ झाली आहे. डिजिटल अवलंबनाच्या व्यासपीठावर, भारत जागतिक स्तरावर पहिल्या दोन देशांमध्ये आहे. भारताची डिजिटल अर्थव्यवस्था 2022 पर्यंत $1 ट्रिलियन ओलांडण्याची शक्यता आहे. भारत आता जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा इंटरनेट वापरकर्ता देश आहे. डिजिटल इंडिया कार्यक्रमामुळे पुढील काही वर्षांत रोजगाराच्या संधी निर्माण करणे, सेवा वितरणाचा वेग आणि गुणवत्ता वाढवणे, सामाजिक आणि आर्थिक सेवा वाढवणे यामुळे नागरिकांना मोठ्याप्रमाणात फायदा होण्याची शक्यता आहे.

**संदर्भ:**


1. https://dnyantarangini.com/2023/08/essay-on-digital-india-marathi.html
2. https://www.mahayojanaa.in/2022/12/digital-india-in-marathi%20.html
3. https://www.loksatta.com/techit/what-is-digital-india-1147645/
4. https://www.informationmarathi.in/2023/04/Digital-India-Mission-Information-Marathi.html
5. https://www.mygov.in/group/digital-india/
6. https://byjus.com/free-ias-prep/digital-india/


***

# सक्षम भारतासाठी महिला सक्षमीकरण काळाची गरज!!

**प्रा. डॉ. सुदाम राठोड**

सहायक प्राध्यापक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज कार्य महाविद्यालय, मोराणे. धुळे

**प्रस्तावना**

**नारी के सहयोग बिना हर बदलाव अधूरा है!**

वास्तविक पाहता सक्षम भारतासाठी समाजातील अनेक घटकांचे योगदान आणि सक्षमीकरण महत्त्वाचे आहे संयुक्त राष्ट्र संघटनेने 1975 पासून आंतरराष्ट्रीय महिला वर्ष साजरा केला जातो प्रतिवर्षी 8 मार्च हा जागतिक महिला दिन म्हणून साजरा केला जातो याचा प्रमुख उद्देश जागतिक पातळीवर महिलांच्या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधले जावे महिलांच्या आरोग्य शिक्षण रोजगार व महिला संरक्षणाचे कायदे या संदर्भात व्यापक पातळीवर चर्चा होणे अपेक्षित वास्तविक महिलांच्या सर्व समावेशी धोरणाची नितांत गरज आहे ज्यामध्ये महिलांच्या अशा आकांक्षांचा पुरेपूर विचार केला जाईल व महिला संरक्षण, महिला रोजगार, महिला शिक्षण, महिला आरोग्य, महिलांची आर्थिक सक्षमीकरण, इत्यादी बाबी या सर्व समावेशी धोरणांमध्ये समाविष्ट असतील तरच भारत महासत्ताक होईल हे नाकारता येत नाही.महिला सक्षमीकरणासाठी महिलांचे आरोग्य अतिशय महत्त्वाचे आहे.

भारतातील महिला आरोग्याची स्थिती अतिशय चिंताजनक आहे कारण भारतात प्रत्येक दुसरी स्त्री ही एनिमिक एनेमिया व हिमोग्लोबिनच्या कमतरतेमुळे त्रस्त आहे यानेमिक हिमोग्लोबिन चे

प्रमाण आठ टक्के पेक्षा कमी आहे अशा महिलांना वास्तविक अॅनिमिया हमखास असतो अॅनिमिया आढळण्या ची कारणे म्हणजे योग्य पोषण न मिळणे हे होय. भारतातील सामाजिक स्थितीमुळे महिला आरोग्य नेहमी दुर्लक्षित राहिलेली आहे भारतात स्त्रीला पुरुष पेक्षा गौण लेखले जाते दुय्यम लेखले जाते तिच्या जन्मापासूनच स्त्रीला अवहेलनेला सामोरे जावे लागते.

**संशोधन पद्धती:**

सदरील शोधणे बनण्यासाठी दुय्यम तत्वे साहेब त्याचा वापर करण्यात आला आहे यामध्ये शासकीय अहवाल पुस्तके, मासिके ,वर्तमानपत्रे, आणि वेबसाईट, इत्यादी .

**उद्देश :**

1. महिला सक्षमीकरण संकल्पना समजून घेणे
2. महिला सक्षमीकरणासाठी व्यापक सक्षमीकरणाचे कायदे अभ्यासने.

वास्तविक पाहता सक्षम भारतासाठी महासत्ताक होण्यासाठी महिलांच्या समस्या जाणून घेणे आवश्यक आहे. समस्या समजून घेणे व व्यापक उपायोजना करणे ही काळाची गरज आहे. तरच भारत महासत्ताक होण्यामध्ये अर्थ आहे .

भारतातील महिलांच्या काही प्रमुख आरोग्याच्या समस्या आपल्याला सांगता येईल-

**१. मासिक पाळी:** मुली वयात आल्यानंतर मासिक पाळी सुरू होते, त्यात नियमित रक्तस्त्रावाने अशक्तपणा येणे ओटीपोटात वेदना होणे, योग्य ते सॅनिटरी नॅपकिन्स न वापरणे, इत्यादीमुळे संसर्गजन्य आजार होतो. त्यातून भविष्यकाळात लैंगिक आजार गंभीर होता. पारंपरिक पद्धतीने होणारा रक्तस्त्राव स्वच्छ करण्यासाठी माती, जुनी कापडे इत्यादी सारखी

वापरले जातात. यामुळे महिलांच्या समस्यांमध्ये दिवसेंदिवस भर पडत असते. चार ते पाच दिवसात महिलांमध्ये मानसिक ताण देखील निर्माण होतो. आजही ग्रामीण भागात महिलांना विविध खोल्यांमध्ये ठेवले जाते. का तर विटाळ ही संकल्पना अजूनही समाजामध्ये रुजलेली आहे.

**२. गुप्तांगाला होणारा संसर्ग:** वास्तविक पाहता महिलांमध्ये अनेक वेळा गुप्तांगांना झालेला संसर्ग माहित असूनही स्त्रिया वैद्यकीय उपचारासाठी जाणे टाळतात. कारण महिला डॉक्टरांची असणारी कमतरता तसेच गुप्तांगाच्या स्वच्छतेबाबत असणारे अज्ञान.

**३. कुटुंब नियोजन कार्यक्रमाविषयी अनास्था :** भारतातील स्त्री मुलींना जन्माला घालत असली तरी तिला किती मुलांना जन्माला घालावे याची स्वातंत्र्य नाही. प्रामुख्याने कायद्याने दोनच मुले असा नियम असला तरी ग्रामीण भागात सर्रास दोन पेक्षा अधिक अपत्याला जन्म दिला जातो. त्यामुळे महिलांवर असलेली मातृत्व ही पद्धत लाभलेली पाहायला मिळते. तिची इच्छा नसतानाही तिच्या शरीराची क्षमता नसतानाही ती गंभीर परिस्थितीला सामोरे जाते.

भारतात लैंगिक शिक्षणाचा मोठ्या प्रमाणात अभाव असल्यामुळे महिला व पुरुष या दोघांनाही कुटुंब जीवन आणि लग्नानंतरचे सहजीवन याविषयी वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव दिसून येतो. वैज्ञानिक ज्ञान अभावामुळे कुटुंब नियोजनाची साधने आणि इतर उपाययोजना याविषयी महिला पुरुष अज्ञानी असतात. त्यामुळे निरोध का वापरावा, कॉपर टी का बसवावी याच्या संदर्भातले ज्ञान कमी प्रमाणात दिसून येते. भारतीय महिलांमध्ये बऱ्याच प्रमाणात कॅन्सरचे वाढते प्रमाण दिसून येते. त्यात ब्रेस्ट कॅन्सरचे प्रमाण अत्याधिक आहे. जसे की एक लाख महिलां मागे 25.8% महिलांना ब्रेस्ट कॅन्सरची लागण आढळून येते. त्यापैकी 12.7% महिलांचा ब्रेस्ट कॅन्सर मुळेच मृत्यू ओढवतो.

ब्रेस्ट कॅन्सर विषयी योग्य माहिती नसणे, त्याचबरोबर लोकलाज येणे, स्वतःच्या शरीराची माहिती न घेणे, स्वतःच्या शरीराकडे दुर्लक्ष करणे, यासारख्या अनेक घटकांमुळे ब्रेस्ट कॅन्सरचे योग्य वेळी योग्य निदान होत नाही, परिणामी योग्य उपचार केले जात नाही.

महिला सक्षमीकरणासाठी उपाय योजना: भारतातील महिला सक्षम झाली तरच भारत हा महासत्ताक होण्यामध्ये अर्थ आहे. देशातील लोकसंख्येच्या मानाने  अधिक संख्येमध्ये असणारी महिला व सक्षम असेल तर भारत महासत्ता होणार नाही यासाठी महिला सक्षम करण्याची नितांत गरज आहे.

**१.कुटुंब जीवन शिक्षण:** महिला सक्षमीकरणांमध्ये मुलींना प्राधान्य दिले पाहिजे. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या मुलींना त्यांच्या शरीरामध्ये होणाऱ्या बदलाविषयी वेळीच सल्ला आणि मार्गदर्शन होणे गरजेचे आहे.  या वयोगटांमध्ये चर्चासत्र आयोजित केले पाहिजे आणि कुटुंब जीवनाची शिक्षण देणे गरजेचे आहे. मुलींना जाणीव जागृती करणे, कुटुंब जीवनाच्या संदर्भात मार्गदर्शन करणे आणि वाढत्या वयामध्ये निर्माण होणारे बदल व शारीरिक वाढ व विकासासंदर्भात वेळीच मार्गदर्शन करणे आवश्यक आहे स्त्रियांचा समाजामध्ये असलेल स्थान भक्कम झाले पाहिजे. यासाठी कुटुंब जीवन शिक्षणाची नितांत गरज आहे. या वयोगटात कौशल्य आधारित शिक्षण यावर अधिक भर दिले पाहिजे आणि स्त्रिया आर्थिक दृष्ट्या संपन्न होण्यासाठी सर्वकश धोरणा ची गरज अधोरेखित केली पाहिजे.

**२. लैंगिक शिक्षण प्रचार आणि प्रसार:** भारतातील शैक्षणिक अभ्यास क्रमात लैंगिक शिक्षण देणे अनिवार्य केले पाहिजे. शैक्षणिक अभ्यासक्रमात असणाऱ्या लैंगिक शिक्षणाचे घटक अतिशय नियंत्रित व अल्प प्रमाणात आहे. भारतात लैंगिक शिक्षणामुळे व्यभीचार  वाढतील अशी भीती

समाजातील लोकांमध्ये आढळून येते. परंतु लैंगिक शिक्षण म्हणजे केवळ लैंगिक व्यवहार नाही तर हे लैंगिक व्यवहार करताना घ्यावयाची काळजी, या वयातील धोके, मुला-मुलींमधील आकर्षण, गुड टच बड टच इत्यादी बाबत व्यापक जनजागृती करणे अत्यावश्यक आहे. तसेच मुलींना लैंगिक साहित्य वाचनासाठी दिले पाहिजे जेणेकरून जनजागृती होईल.

**४ समाजांमध्ये समाज भान निर्माण करणे:** भारतीय समाजामध्ये स्त्री-पुरुष भेदभाव हेच महिलांच्या आरोग्य समस्यांचे कारण आहे असे दिसून येते. पुरुषप्रधान संस्कृतीत महिलांसाठी समान संधी, समान नियम, समान आदर, समान आचरण इत्यादी बाबींचा अभाव आढळून येतो. मानवी जीवनाचा आणि मानवी समूहाचा अर्धा भाग स्त्रियांनी व्यापलेला असला तरी स्त्रियांना समान वागणूक दिली जात नाही. स्त्रियांनी समतेची संधी घालू नये. स्त्रियांना व्यापक पातळीवर रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या पाहिजे. तसेच कौशल्य वाढीसाठी उपाययोजना केल्या पाहिजे. चित्रपट, दूरदर्शन इत्यादी मध्ये स्त्रियांच्या बाबतीमध्ये केलेली अवहेलना, दुष्प्रचार टाळले पाहिजे.

**४.स्त्रियांचा कायदेशीर दर्जा उंचावणे:** भारतीय राज्यघटनेनुसार भारतीय समाजातील प्रत्येक नागरिकास पुरुष असो किंवा स्त्री सर्वांना समान अधिकार असतात, आहेत, त्याचप्रमाणे होते, स्त्रियांसाठी विविध कायदे तयार करण्यात आले. कायदे सर्वात महत्त्वाचा आधारस्तंभ मानला जातो.कायदयाच्या माध्यमातूनच सामाजिक परिवर्तन या बाबींना बळ मिळते, म्हणून कायद्याद्वारे सगळीकडे मोठ्या प्रमाणात परिवर्तन होते जसे-

वारसा हक्क अधिनियम १९८०, बालविवाह प्रतिबंधक अधिनियम १९५४, मजुरी दर अधिनियम १९४८, विशेष विवाह कायदा १९५४, नोंदणी विवाह कायदा १९५४, हिंदू विवाह कायदा १९५५, वेश्या व्यवसाय विरोधी

कायदा १९५६, दत्तक विधान अधिनियम १९५६, द्विभारया प्रतिबंधक अधिनियम १९५५, पोटगी कायदा १९४६, मातृत्व लाभ कायदा १९६१, हुंडा प्रतिबंधक कायदा,१९६१, नोंदणी विवाह कायदा १९५४, इत्यादी.

**५. महिला विकासाच्या योजनांची अंमलबजावणी:** भारतातील महिलांच्या विकासासाठी अनेक योजना राबवण्यात येतात परंतु त्या काही अंशी कागदावरच राहतात. गरजू महिलांना त्या पुरवल्या जात नाहीत. याच्यासाठी व्यापक जनजागृतीची नितांत गरज आहे जशा-

1. निराश्रीत महिलांसाठी शासकीय राज्यगृहे
2. महिला आर्थिक विकास मंडळाच्या महिला प्रशिक्षण केंद्र अनुदान
3. व्यावसायिक प्रशिक्षण घेणाऱ्या मुलींना विद्यावेतन
4. देवदासी पुनर्वसन योजना
5. देवदासी निर्वाह अनुदान योजना
6. सावित्रीबाई फुले बहुउद्देशीय महिला केंद्रे
7. कामधेनू योजना
8. राष्ट्रीय बायोग्यास विकास योजना
9. इंदिरा आवास योजना
10. एकात्मिक बाल विकास सेवा योजना
11. तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला सशक्तिकरण कार्यक्रम
12. ग्रामीण भागातील आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या स्त्रियांसाठी मोफत शिलाई मशीन पुरवणे
13. महिला मंडळातर्फे गावात वाचनालय
14. ग्रामपातळीवरील बालकांच्या, महिलांच्या स्पर्धा
15. महिला प्रतिनिधींना पंचायत राज संस्थेत सहभाग
16. गरजू महिलांना स्वयंरोजगारासाठी गाय, म्हैस, बकरी, कुक्कुटपालन खरेदीसाठी अर्थसहाय्य

17. गरीब मुलींच्या लग्नासाठी अर्थसहाय
18. स्वयं शिद्धा बचत गट योजना
19. शिधावाटप-रास्त भाव दुकानांचे वाटप
20. बीज भांडवल योजना उद्योग विभाग
21. आर्थिक दृष्ट्या गरीब स्त्रियांना संसार उपयोगी साहित्य पुरवणे
22. अपंग स्त्रियांना कृत्रिम अवयव बसविणे व त्यांचे पुनर्वसन करणे
23. महिला लोक प्रतिनिधींसाठी अभ्यास सहलीचे आयोजनासाठी अनुदान योजना.

**संदर्भ :**


1. शुभांगी गोटे- गव्हाणे, महिला सबलीकरण: स्वरूप व समस्या, वरद पब्लिकेशन्स, औरंगाबाद
2. पाटील हेमलता,स्त्रियांची आर्थिक व सामाजिक स्थिती, गोदा प्रकाशन, औरंगाबाद
3. भारत सरकार २०११ चा जनगणना अहवाल, नवी दिल्ली
4. महीला सबलीकरणात शासनाची भूमिका, गोल्डन रिसर्च थॉट,मार्च २०१४
5. खंडागळे चंद्रकांत, ग्रामीण समाजशास्त्र, मायादेवी खंडागळे प्रकाशिन, सांगली २००५
6. डॉ. निळकंठ भुसारी- प्रतिबिंब महिला समस्यांचा आत्मशोध, अथर्व पब्लिकेशन्स
7. डॉ. जागृती व्यास नारी शोषण एक विश्लेषण
8. डॉ. राजेंद्र प्रसाद सुंदरीया, महिलाएं एंव घरेलू हींसा
9. प्रा. डॉ. प्रदीप आगलावे, समाजशास्त्र
10. प्रा. डॉ. स्मिता मेहत्रे, भारतीय स्त्री आणि मानवाधिकार
11. देवळानकर शैलेंद्र, समकालीन जागतिक राजकारण, विद्या बुक्स फर्निचर २००५


***

# भारताचे महासत्तेकडील वाटचालीचे एक पाऊल : महिला उद्योजकता


## डॉ. सुजाता शिवाजी गडाख

विभागप्रमुख आणि सहयोगी प्राध्यापक,
मराठा विद्या प्रसारक समाजाचे, कर्मवीर रावसाहेब थोरात आर्ट्स, भाऊसाहेब हिरे कॉमर्स आणि अण्णासाहेब मुरकुटे सायन्स
(के.टी.एच.एम ) कॉलेज, नाशिक



**गोषवारा :**

भारत देश हा महासत्ता व्हावा हे प्रत्येक भारतीयाचे स्वप्न आहे. भारत देश हा कृषिप्रधान देश असून अजूनही 62% लोकांचा व्यवसाय शेती आहे. शेतीमाल निसर्गावर अवलंबून असतो, नाशवंत असतो अशा अनेक मर्यादा शेती व्यवसायाला असल्यामुळे अजूनही भारताने म्हणावी तशी प्रगती केलेली नाही. भारत देशाला महासत्ता बनवायचे असेल तर शेती, सेवा आणि उद्योगांचा विकास होणे आवश्यक आहे. भारतात एकूण लोकसंख्येमध्ये 50 टक्के महिला आहे. भारतात अजूनही पुरुषप्रधान संस्कृती असल्याने महिलांना फक्त चूल आणि मूल सांभाळणे एवढ्याच गोष्टी कराव्या लागतात. त्यामुळे या कार्यक्षम मनुष्यबळाचा पर्याप्त वापर होत नाही. जर भारताला महासत्ता होण्याची स्वप्न पूर्ण करायचे असेल तर महिलांचा विकास होणे गरजेचे आहेत. मुले, घर सांभाळून महिला उद्योजकतेतून स्वतःचा व राष्ट्राचा विकास करू शकतात. भारतात महिलांना उद्योजक होण्यासाठी येणाऱ्या अडचणी व संधी यांची मांडणी सदर प्रकरणात करण्यात आली आहे.

**प्रस्तावना :**

भारतात काही महिलांनी 1970 पासून व्यवसाय उद्योग क्षेत्रात प्रवेश केला असून १९७५ नंतर शासकीय धोरणात अनेक बदल झाले. त्यामुळे अनेक नवीन पिढीतील महिलांमध्ये उद्योजकतेविषयी चांगल्या प्रकारे जागरूकता निर्माण झाली. 1980 नंतरच्या काळात महिलांचा उद्योग क्षेत्रामधील प्रवेश दिसू लागला. शासनाने 1991 मध्ये औद्यागिक धोरण ठरवितांना महिला उद्योजकतेबाबत प्रथमच विचार केला आणि महिला उद्योजक कोणाला म्हणावे याबाबत निश्चित व्याख्या केली. त्यामध्ये उद्योगाची मालकी व नियंत्रण हे घटक लक्षात घेण्यात आले. उद्योगाचे भांडवल किमान 51% महिलांनी पुरवलेले असावे आणि उद्योगात रोजगार 51% महिलांना दिलेला असावा असे ठरविण्यात आले. परंतु रोजगाराविषयी अनेक अडथळे आल्यामुळे त्यात बदल करण्यात आला. 1994 मध्ये महिलांसाठी स्वतंत्र महिला धोरण 2001 मध्ये दुसरे महिला धोरण 2013 मध्ये तिसरे महिला धोरण आखण्यात आले. या धोरणाद्वारे महिला सक्षमीकरणासाठी उद्योग हा घटक अत्यंत महत्त्वाचा आहे असे मानून काही बरेच चांगले निर्णय झाले व बरेच उपक्रम मार्गी लागले. त्याचप्रमाणे भारतात नोंदणीकृत कंपन्यांच्या संचालक मंडळात किमान एक महिला संचालक असावी हा नियम आहे तसे नसल्यास सेबीने दंडाची तरतूद केली आहे. महिला संचालक नसलेल्या ५३०
कंपन्यांना जुलै २०१६ मध्ये दंड करण्यात आला. सध्या देशात महिला उद्योजकांचे प्रमाण 9% इतके अल्प आहे ते 20% करण्याचे उद्दिष्ट आगामी सरकारने ठेवले आहे. महिलांमध्ये उपजतच काही गुणवैशिष्ट्य असतात उदाहरणार्थ सहनशीलता, सातत्यता, चिकाटी, जिद्द, एकाग्रता, व्यवहार कुशलता, लवचिकता, निर्णयअचुकता.इत्यादी. वरील गुणांच्या आधारे महिला उद्योजिका उद्योजक म्हणून नवीन उद्योग सुरू

करण्याच्या दृष्टीने संभाव्य संधींचा शोध घेणे, जोखीम स्वीकारणे, आर्थिक अनिश्चिततेला सामोरे जाणे, नवनवीन समन्वय साधने, प्रशासन कार्य करणे, नियंत्रण ठेवणे, दैनंदिन देखरेख करणे इत्यादी कार्य आणि भूमिका महिला उद्योजिका यशस्वीपणे पार पडू शकतात.

**अभ्यासाची उद्दिष्टे:**

i "महिला उद्योजकता " ही संकल्पना जाणून घेणे.

ii महिला उद्योजकतेसमोरील आव्हानांचा अभ्यास करणे.

iii "महिला उद्योजकतेसाठी सरकारी योजनांचे" विश्लेषण करणे.

**महिला उद्योजकांच्या अडचणी :**

1. कौटुंबिक जबाबदाऱ्या
2. स्थलांतरावर मर्यादा
3. सामाजिक प्रवृत्तीची वस्तूस्थिती
4. जोखीम पत्करण्याची मर्यादित क्षमता
5. भांडवलाची कमतरता
6. पुरुष मालकीच्या उद्योगांशी स्पर्धा
7. हळवा व संकोची स्वभाव
8. कायद्याची किचकट चौकट

**महिला उद्योजकांना असणा-या संधी :**

महिलांच्या क्षमतांचा उपयोग व्यवसाय उद्योगात व्हावा याकरिता महिला उद्योजकांसाठी महाराष्ट्र शासनाने 2017 या वर्षी विशेष धोरण जाहीर केलेले आहे. या धोरणाचा मुख्य उद्देश महिलांमध्ये जनजागृती करणे व त्यांना प्रोत्साहन देऊन भावी यशस्वी उद्योजिका तयार करणे हा आहे. नवीन उद्योजकांना उद्योगाचे प्रशिक्षण देण्यासाठी 1 ऑक्टोबर 1988 रोजी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राची स्थापना केली. या केंद्राची प्रमुख उद्दिष्टे म्हणजे सुशिक्षित युवक

युवतीमध्ये उद्योजकतेचे वातावरण निर्माण करणे. महिला धोरण शासन राबवीत असताना महिला उद्योजकता विकास शिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, उद्योजक्ता विकास कार्यक्रमाचे अनेक माध्यमांच्या साह्याने या धोरणाचा प्रसार व प्रचार करण्याची जबाबदारी महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र या संस्थेकडे सोपविण्यात आलेली आहे. याद्वारे महिला सक्षमिकरण करण्याचे कार्य सुरू आहे. महिला उद्योजकता विकासासाठी राज्य, राष्ट्र व आंतरराष्ट्रीय स्तरावरील महिला उद्योजक संघटनांची स्थापना झालेली आहे. या संघटनांचा प्रमुख हेतू ग्रामीण तसेच शहरी भागातून महिला उद्योजकतेच्या विकासाला पोषक वातावरण निर्माण व्हावे हा आहे. काही निवडक महिला उद्योजक संघटना खालील प्रमाणे :

1) The National Alliance of Youth Entrepreneurs.
2) Indian council of Women Eentrepreneurs.
3) Federation of Indian chamber of Commerce and Industries.
4) National Commission on self employed women in the informal sector.
5) world Association of Women Eentrepreneurs.

**महिला उद्योजकांसाठी सरकारी योजना**

स्त्रियांच्या सुधारणेसाठीचे सरकारी कार्यक्रम भारतात 1954 पासून अगदी वेळेवर सुरू झाले, परंतु खरा पाठिंबा 1974 मध्ये स्पष्टपणे सुरू झाला. आत्तापर्यंत, भारत सरकारकडे विविध कार्यालये आणि सेवांद्वारे काम करणाऱ्या महिलांसाठी 34 पेक्षा जास्त योजना आहेत. त्यातील योजना खालीलप्रमाणे आहेत;

1. राष्ट्रीय महिला कोष (RMK) 1992-1993
2. महिला समृद्धी योजना (MSY) ऑक्टोबर, 1993.
3. इंदिरा महिला योजना (IMY) 1995.
4. 1997-98 मध्ये महिला उद्योजक विकास कार्यक्रमाला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले.

5. सुमारे 9000 गावांमध्ये महिला समख्या राबविण्यात येत आहे.

6. स्वयंसिद्धा .

7. स्वशक्ती ग्रुप.

8. महिलांसाठी प्रशिक्षण आणि रोजगार कार्यक्रमास समर्थन (STEP).

9. स्वावलंबन.

10. कामकरी आणि आजारी मातांच्या मुलांसाठी क्रेचेस/ डे केअर सेंटर.

11. नोकरदार महिलांसाठी वसतिगृहे.

12. स्वाधार.

13. महिला सक्षमीकरणासाठी राष्ट्रीय अभियान.

14. एकात्मिक बाल विकास सेवा (ICDS) (1975),

15. किशोरवयीन मुलींच्या सक्षमीकरणासाठी राजीव गांधी योजना (RGSEAG) (2010).

16. काम करणाऱ्या मातांच्या मुलांसाठी राजीव गांधी राष्ट्रीय क्रेच योजना.

17. एकात्मिक बाल संरक्षण योजना (ICPS) (2009-2010).

18. धनलक्ष्मी (2008).

19. शॉर्ट स्टे होम्स.

20. उज्ज्वला (2007).

21. जेंडर बजेटिंगसाठी योजना (XI योजना).

22. एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम (IRDP).

23. ग्रामीण युवकांना स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षण (TRYSEM).

24. पंतप्रधान रोजगार योजना (PMRY).

25. महिला विकास महामंडळ योजना (WDCS).

26. कार्यरत महिला मंच.

27. इंदिरा महिला केंद्र.

28. महिला समिती योजना.

29. खादी आणि ग्रामोद्योग आयोग.

30. इंदिरा प्रियदर्शिनी योजना.

31. SBI ची स्त्रीशक्ती योजना.

32. SIDBI ची महिला उद्यम निधी महिला विकास निधी.

33. NGO च्या क्रेडिट योजना.

34. कृषी आणि ग्रामीण विकास योजनांसाठी राष्ट्रीय बँका

**अनुमान :**

महिला ज्याप्रमाणे घर यशस्वीपणे सांभाळतात त्याचप्रमाणे उद्योग व्यवसायही यशस्वीपणे सांभाळू शकतात हे अनेक यशस्वी महीला उद्योजकांनी दाखवून दिले आहे. उदाहरणार्थ इंद्र नुई, इंदू जैन, चंदा कोचर इत्यादी. यशस्वीतेचा हा वेग जरी मंद व संथ असला तरी हळूहळू समाजातील संकल्पना बदलत आहे. व्यवसायाभिमुख अभ्यासाकडे मुलींचा ओढा वाढत आहे ही सुद्धा एक समाधानकारक बाब आहे. स्त्रिया या छोट्या छोट्या उद्योगातून आपले स्थान निर्माण करून नक्कीच देशाच्या विकासात हातभार लावतील व भारत महासत्ता होण्याकडे नक्कीच भारताच्या यशस्वी वाटचालीत महत्वाचा वाटा उचलतील.

**संदर्भसूची :**


1. डॉ.आर.एम.सरोदे, “ २१ व्या शतकातील उद्योजकतेच्या संधी’, tactful management research journal, ISSN २३१९-७९४३, Vol.5, Issue- 10,pp – 1 to 3.
2. www.womenentrepreners.com
3. yojna.gov.in
4. www.standupmitra.com
5. उद्योजकतेचे मूलमंत्र, महिला व बालकल्याण समिती, पुणे महानगर पालिका, pp 25 to 28.


***

# छोटे उद्योगधंदे सुंदर आणि शक्य- एक व्यावसायिक दृष्टीकोन

**प्रा. डॉ. रवींद्र बापूराव शेंडे**

सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख

लोकमान्य महाविद्यालय,वरोरा जिल्हा-चंद्रपूर 442907.

**गोषवारा-**

भारत हा कृषिप्रधान देश असला तरी येतील छोट्या उद्योग निर्मित वस्तू जगप्रसिद्ध होत्या, अशी वर्णाने इतिहासात सापडते.आजही भारताच्या विविधतेत वस्तूंच्या विविधता पाहायला मिळतात.स्वातंत्र्योत्तर काळात जलद आर्थिक विकास व्हावा, यासाठी औद्योगीकरणावर विशेष भर देण्यात आला. (औद्योगिक धोरणे-1948, 1956, 1970, 1977, 1980, 1991, औद्योगिक क्रांती-1.0 ते 4.0) परंतु हा औद्योगिक व आर्थिक विकास होताना देशातील साधनसंपत्तीचे आणि आर्थिक संपत्तीचे केंद्रीकरण होऊ नये आणि देशात विकेंद्रीत आर्थिक विकास व्हावा यासाठी सुरुवातीपासूनच औद्योगिक धोरणावर भर देण्यात आला.हा भर देण्यात आला असला तरी,१९९१ च्या औद्योगिक धोरणातील परकीय गुंतवणूक व खाजगी गुंतवणुकीच्या प्रोत्साहनामुळे विकेंद्रीकरण प्रवृत्तीला देशात आळा बसला आहे आणि विकेंद्रीकरण धोरण अपयशी ठरले.सोबतच रोजगार विरहित वृद्धीत् वाढ झाली आहे.ही बाब अर्थव्यवस्थेच्या शाश्वत विकासाकरिता पूर्ण धोकादायक आहे.स्वातंत्र्याचा सद्यस्थितीतील अमृत काळात (2022-2023 ते 2046-2047)मागच्या चुका लक्षात घेऊन दुरुस्ती करण्यासाठी चांगली संधी आहे.याचा शासन आणि जनतेने एकत्र विचार करणे गरजेचे आहे. लहान ते सुंदर आणि शक्य ही युक्ती लघु आणि कुटीर उद्योगधंद्यात वापरणे गरजेचे आहे.

**बिज शब्द**-

कबोट तंत्रज्ञान, औद्योगिक क्रांती 5.0, औद्योगिक अपत्य प्रेम, शाश्वत विकास, अमृत काळ, कुटुंबवसल्य विकास.

**संबंधित साहित्याचा आढावा-**

1. आर्थिक विकास प्रक्रियेत सेवा क्षेत्राला जास्त महत्त्व देण्यात येत आहे तरी, उद्योग (छोटे व मोठे) व शेती क्षेत्राचे स्थान महत्त्वपूर्ण आहेत, हेही लक्षात घेणे आवश्यक आहेत. (डॉ. अविनाश कुलकर्णी)
2. भारताकडे निर्मिती क्षमतेचा गुण आहेत आणि त्यातल्या त्यात स्त्रियांकडे अपत्य प्रेम आहे, त्यामुळे छोटे धंदे टिकविणे शक्य् आहे. ( डॉ. विमल वाणी)

**शोधनिबंधाची उद्दिष्टे**

1. उद्योग, शेती आणि सेवा क्षेत्राचा संतुलित व शाश्वत विकास आवश्यक आहे .याचा अभ्यास करणे.
2. संरक्षित व्यापार धोरण लघु आणि कुटीर उद्योगासाठी अधिक महत्वाचे आहे. याचा अभ्यास करणे.
3. उत्पादकता आणि कौशल्य विकास यांचा जवळचा संबंध आहे.याचा अभ्यास करणे.
4. औद्योगिक उत्पादनावर परिणाम करणारे घटकांचा अभ्यास करणे.

**शोधनिबंधाची गृहितके.**

1. शाश्वत स्वरूपाचा रोजगार व रोजगार संधीसाठी छोटे उद्योगधंदे महत्वाचे आहे.
2. विकसित भारत@४७ करिता छोट्या उद्योगधंद्यांचा संतुलित आणि सर्वसमावेशक विकास अपेक्षित आहे.

**संशोधन पद्धती-**

प्रस्तुत शोधनिबंधात दुय्यम सामग्रीचा वापर करण्यात आला आहे. यासाठी वर्तमानपत्रे,पुस्तके, संशोधन अहवाल. इत्यादींचा वापर करण्यात आला आहे.

**शोधनिबंधाचे विश्लेषण-**

**1 उद्योग( छोटे आणि मोठे), सेवा आणि शेती क्षेत्राचा एकत्रित शाश्वत विकास**

भारताने अमृत महोत्सवाकडून अमृत काळात प्रवेश केला आहे. ही सर्व भारतीयांसाठी आनंदाची गोष्ट आहे. स्वातंत्र्यानंतर देशाच्या जीडीपी मध्ये कृषी क्षेत्राचे योगदान घसरत गेले आणि ते 20 टक्क्यांपेक्षा कमी झाले.परिणामतः कृषी क्षेत्रातील भविष्यातील रोजगार संधी कमी झालेल्या आहेत.हे खरे असले तरी उद्योग क्षेत्रातील रोजगार संधी वाढत जात आहे. त्यामुळे उद्योग व शेती क्षेत्रात चांगला मेळ घालने आवश्यक आहे. शेतीनंतर अधिक लोकांना सामावून घेण्याची ताकद उद्योग क्षेत्रात आहे. त्यातल्या त्यात छोट्या उद्योगात प्रचंड आहे. आज भारतामध्ये उपलब्ध मनुष्यबळास रोजगारक्षम बनवण्यासाठी कुशल आणि ज्ञानी बनविणे आवश्यक आहे. ते देशाच्या आर्थिक वृद्धीमध्ये योगदान देऊ शकतील.सेवा क्षेत्रात प्रचंड लोकांना सामावून घेण्याची शक्ती असली तरी अकुशल किंवा अर्धकुशल लोकांच्या बाबतीत शेती आणि उद्योग क्षेत्राची ताकद मोठी आहे. एकूणच तीनही क्षेत्राच्या परस्पर सहकार्याने प्रत्येक क्षेत्राचा शाश्वत विकास साधने अत्यावश्यक आहे व हा शाश्वत विकास साधताना निर्मिती क्षमतेचा व निर्यातीचा गुणधर्म वाढविणे महत्त्वाचे आहे.

**2.लघु आणि कुटीर उद्योगधंद्यांना संरक्षित व्यापार धोरण**

शाश्वत औद्योगिक विकासाकरिता जुन्या लघु व कुटिर उद्योगांना जिवंत ठेवून, नवीन कुटीर उद्योगधंदे निर्माण करणे आवश्यक

आहे. मोठे उद्योगधंदे उत्पादनव्यय कमी करीत असले तरी, कौशल्य आणि गुणवत्ता यात मेळ छोट्या धंद्यांमार्फत शक्य आहे. मोठ्या उद्योगधंद्यांच्या मर्यादा ओळखून छोट्या धंद्यांना प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. जुन्या छोट्या धंद्यांबरोबरच नवीन छोट्या धंद्यांना मोठ्या प्रमाणात संरक्षण देणे खूप खूप गरजेचे आहे. जागतिकीकरण, उदारीकरण तथा मुक्त व्यापार धोरणाच्या परिणामांमुळे अनेक देशांनी मुक्त व्यापार धोरणाला आळा घालून संरक्षणवादी धोरणाचा वापर सुरू केला आहे. कोरोना आपत्तीमुळे संरक्षणवादी व्यापाराची कक्षा वृंदावली आहेत. सार्वजनिक आपत्तीमध्ये एकमेकांवर अवलंबून राहणे फार कठीन असते.हे करोना आपत्तीने लक्षात आणून दिलले आहे. संरक्षणवादी व्यापार धोरणाची लोकप्रियता प्रत्येक देशात वाढत चाललेली आहे आणि ही वृत्ती सर्वांसाठी फायद्याची आहे.फक्त त्याच्या मर्यादा प्रत्येकाने सांभाळणे गरजेचे आहे.सरक्षित व्यापार ही संकल्पना सर्वप्रथम 1790 साली अलेक्झांडर हॅमिल्टन यांनी मांडली व तिला अधिक शास्त्रीय लोकप्रिय करण्याचे कार्य फे. लिस्टनी 1885 साली केले. जॉन स्टुअर्ट मिल यांच्या मते छोट्या उद्योगांना स्थापनेच्या काळात (बाल अवस्थेत) संरक्षण देणे गरजेचे आहे. छोटे उद्योग या संकल्पनेचे समर्थन करताना म्हटले जाते की, ज्याप्रमाणे लहान मूल उभे राहत असताना ते पडू नये म्हणून कुटुंबातील व्यक्ती त्याला आधार देण्याचा प्रयत्न करते व नंतर ते उभे राहण्यास लागल्यावर आधार देणे बंद केले जाते. त्याप्रमाणे नव्याने स्थापन झालेल्या छोट्या उद्योगांना स्पर्धेला सामोरे जाण्याची क्षमता निर्माण होण्याच्या सुरुवातीच्या काळात संरक्षण देण्याची आवश्यकता असते. म्हणून या युक्तिवादाला कुटीर उद्योग संरक्षण युक्तिवाद असे म्हणतात. विशिष्ट परिसरासाठी लघू व कुटीर उद्योग प्रशिक्षण संस्था, प्रदर्शनी, नियमक संस्था, खेडे उद्योग स्नेही धोरणे, विम्याच्या सोयी,

संघटित क्षेत्रासारखी वागणूक, ऑनलाइन मार्केटची जोड, नवीन तंत्रज्ञानात्मक बाबी इत्यादी गोष्टी शासनाने उपलब्ध करून दिल्यास लघु आणि कुटीर उद्योगधंद्यांचे पुनरुस्त्यान होऊन औद्योगिक विकास प्रवाह सुरू होईल.या छोट्या उद्योगधंद्यांमध्ये संशोधन, लेखन, चित्रकला ,संगीत आरोग्यसेवा, पर्यटन, मनोरंजन, अशा सर्वच ,बाबींना अनुसरुन छोटे लघुउद्योग वाढविने आवश्यक आहेत.नफा मिळविणे हे कोणत्याही धंद्याचे प्रमुख उद्दिष्ट असले तरी ,वस्तूच्या दर्जाकडे दुर्लक्ष होता कामा नये.तसेंच शासनाने सुद्धा करात सूट देऊन या धंद्यांच्या किमती वाढणार नाहीत याची काळजी घेणे आवश्यक आहे.लघु व कुटीर उद्योगाची प्रगती करीत असताना स्थानिक परिसरातील मनुष्यबळाचा,स्थानिक साधनधनाचा चांगला पद्धतीने वापर अपेक्षित आहे.अमृत कलावधीमध्ये संपूर्ण वर्तमान पिढी बरोबरच येणाऱ्या पिढ्यांना त्रास होणार नाही,याची काळजी छोट्या उद्योगधंद्यांच्या प्रगतीसह घेणे आवश्यक आहे.

**3.औद्योगिक उत्पादकता व कार्यक्षमता यांचा परस्पर संबंध**

औद्योगिक उत्पादकता व कार्यक्षमता यांच्या जवळचा सबंध आहे.उत्पादनाच्या तंत्राचा उत्पादनावर परिणाम होतो. उत्पादनाचे तंत्र यामध्ये फक्त तंत्रज्ञानाचा समावेश होतो असे नाही, तर उत्पादन घेण्याच्या पद्धती किंवा उत्पादनासाठी वापरली जाणारी विविध प्रकारची साधनसामग्री, व्यक्तिगत तथा तांत्रिक कौशल्य, उत्पादनाचे ठिकाण यासारख्या विविध घटकांचाही समावेश होतो.यंत्रासाठीची सुटे भाग आणि यांत्रिक समस्या किंवा बिघाड झाल्यास तत्परतेने दूर करणारे कुशल कामगार यांचा उत्पादनावर परिणाम होत असतो. आर्थिक तथा वित्तीय साधने, नैसर्गिक घटक, औद्योगिक शांतता, व्यावसायिक व्यवस्थापन, औद्योगिक धोरण, उद्योगांचा आकार, श्रमिकांची गुणवत्ता आणि कौशल्य, शिक्षण व प्रशिक्षण. हे सर्व घटक परस्परांशी संबंधित आहे.

त्यामुळे काही ठराविक घटकांमुळेच औद्योगिक उत्पादकतेवर परिणाम घडवून येतात, असे म्हणता येत नाही, औद्योगिक उत्पादनाच्या दृष्टिकोनातून पुढील सर्व घटक तितकेच महत्त्वपूर्ण आहे. (डॉ. अविनाश कुलकर्णी)

**4. लहान ते सुंदर आणि शक्य(Small is Beautiful & Possible)**

मोठे उद्योगधंदे विकासाच्या दृष्टिकोनातून योग्य असले तरी छोटे उद्योगधंदे त्यापेक्षा जास्त महत्त्वाचे आहे.कारण अधिकाधिक लोकांना सामावून घेण्याची ताकद छोट्या धंद्यामध्ये आहेत. विशेषतः अर्धकुशल कामगारांना सामावुन घेण्याची ताकद छोट्या उद्योगधंद्यांमध्ये दिसून येते. मानवी कौशल्य विकसित करण्यात या धंद्यांचे महत्त्व मोठे आहे. मानवाचे आरोग्य चांगले राहण्याकरिता चांगल्या वस्तू या उद्योगधंद्यानमार्फत निर्माण करता येते. पर्यावरणाला कुठलाही धोका निर्माण होत नाही. अल्प भांडवलाने हे धंदे सुरू करता येते व चालविता येते. अनेक अंतर्गत व बाह्य बचती या छोट्या धंद्यांमार्फतमार्फत निर्माण होऊन शाश्वत विकासाचा प्रवाह प्रगत होत जातो.अतिरिक्त ताण कोणावरही निर्माण न होता, खेड्या-खेड्याच्या विकासाला, तालुक्या- तालुक्याच्या विकासाला, जिल्हा- जिल्ह्याच्या विकासाला, राज्य- राज्याच्या विकासाला दिशा देणारे, हे छोटे धंदे आहे.अंतर्गत व बाह्य कुठलाही दबाव न निर्माण होता, सर्वांच्या प्रगतीला प्रोत्साहन यामार्फत मिळणारे आहे. कुटुंबवसल्य प्रेम या उद्योगधंद्या मार्फत सर्वांना मिळणारे आहे. लहान ते सुंदर आणि शक्य या समीकरणाचा वापर छोट्या धंद्यांमध्ये पुरेपूर होत असल्यामुळे या लहान धंद्यांना जिवंत ठेवणे, भारतासाठी खूप खूप आवश्यक आहे. तसेच प्रत्येकाला आपल्या स्थानिक परिसराविषयी अफाट प्रेम असते. उदा. शेती, स्थानिक धंदा.

प्रसंगी बाहेर गेला असला तरी तो स्वतःच्या स्थानिक परिसराविषयी सतत चिंतन करीत असतो. कौटुंबिक आधार त्याला सतत मिळत जात असल्यामुळे स्थानिक परिसरामध्ये छोट्या छोट्या धंद्यांना पाठिंबा घराघरांमध्ये आणि शासनाने देणे गरजेचे आहे.आपली संस्कृती, राजकीय स्थिरता, आर्थिक स्थिरता, बंधुभाव, सामाजिक बांधिलकी, नैसर्गिक साधन, पशुधन, पूजा- आर्चना,लहानपणापासुन मृत्यूपर्यंतचा आनंद, अशा सर्वच बाबी जिवंत मिळत असल्यामुळे छोट्या धंद्यांना टिकविणे आवश्यक आहे. थोडक्यात लहान ते सुंदर आणि शक्य हे समीकरण छोट्या धंद्यांमध्ये पाहायला मिळत असल्यामुळे, मागच्या पिढ्यांना मिळालेला आनंद वर्तमान पिढीला मिळणार आणि भविष्यकाळातील पिढ्यांना सुद्धा मिळणार आहे.

**5. कबोट तंत्रज्ञान आणि छोटे उद्योग धंदे**

औद्योगिक क्रांती 5.0 मधील “मिनी कबोट तंत्रज्ञानाचा”वापर छोट्या उद्योगधंद्यात सुरुवातीपासूनच मोठ्या प्रमाणात होत आहे. मानवी कौशल्य आणि तंत्रज्ञान यांचा संयुक्त वापराला कबोट तंत्रज्ञान असे म्हणतात. छोट्या धंद्यांमुळे रोजगार गुणक वाढत जातो. रोजगार सुरक्षितता सुद्धा वाढत जाणारी आहे. मालक कामावर आपल्याला नेहमी ठेवणार व आपणही हक्काने नेहमी उद्योगात राहणार ती गोष्ट कामगारांना माहीत असते. किंमत व वस्तूचा दर्जा हे समीकरणही छोट्या-छोट्या उदयोगात निर्माण करणे आणि टिकवीने शक्य आहे. छोट्या धंद्यात मालकी ही कार्यक्षमता वाढविणारी आहे. याची जाणही मालकांनी व शासनाने लक्षात ठेवणे आवश्यक आहे. एकूणच त्या त्या परिसरामध्ये छोटे धंदे शाश्वत विकासासाठी समृद्ध करणे आवश्यक आहे.

**5.निष्कर्ष**

1. आधुनिक काळात मोठे उद्योगधंदे सामाजिक जबाबदारी सांभाळत आहे, त्यापेक्षा मोठी सामाजिक जबाबदारी छोटे उद्योगधंदे प्राचीन कळापासून सांभाळत आहे.
2. पर्यायी वस्तूंचे व विक्रेत्यांचे स्वागत लहान धंद्यात प्रत्येक वेळी होताना दिसते त्यामुळे गळेकापू स्पर्धा यात दिसत नाही.
3. लहान ते सुंदर आणि शक्य हे समीकरण लहान धंद्यामध्ये निर्माण करून टिकवता येते.
4. विदेशी व्यापारची दिशा आणि रचना काळानुसार बदलत गेली आहेत. प्रचंड धोके वाढले आहे. या बचावासाठी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग टिकविणे महत्त्वाचे आहे.
5. छोट्या धंद्यांमार्फत खऱ्या खाजगीकरणाला प्रोत्साहन मिळते आणि सार्वजनिक क्षेत्रावरचा ताण कमी होतो.
6. अंतर्गत व बाह्य बचती लहान धंद्यातून मोठ्या प्रमाणात निर्माण होऊन मोठ्या धंद्यांना सुद्धा फायदा मिळतो.
7. भारतीय अर्थव्यवस्थेला सुरुवातीपासून गती देण्याचे काम या छोट्या धंद्यानी दिलेले आहे. या धंद्यांना आधुनिक भारताची मंदिरे म्हणणे अतिशोक्तिचे होणार नाही.
8. भारतातील भांडवल बाजार विकसित झाला आहे, छोट्या धंद्यांना या भांडवली बाजाराचा फायदा मिळणे अत्यावश्यक आहे.
9. छोट्या धंद्यांना चांगली बँकिंग सुविधा मिळण्यासाठी एखाद्या प्रमुख व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण आवश्यक आहे.
10. छोट्या धंद्यांच्या प्रगतीच्या दृष्टीने, शासनाने देशातील सर्व सक्षम नियामक संस्थाची दखल वेळोवेळी घेणे आवश्यक आहे.

11. भारताला जागतिक उत्पादनाचे क्षेत्र बनवून देण्याची ताकद छोट्या धंद्यांमध्ये आहे.याचा प्रचार आणि प्रसार करणे महत्त्वाचे आहे.

**सारांश**

"छोटे ते सुंदर आणि शक्य" हे समीकरण छोट्या धंद्यांत मागच्या काळापासून दडलेले आहे.छोटी धंदे वाचली पाहिजे, बहरले पाहिजे, यासाठी स्थानिक तसेच देश-विदेशातून प्रोत्साहन मिळणे गरजेचे आहे.भारतातील प्रतिभा आणि विशेष कौशल्यांचा वापर करणे, रोजगाराच्या संधी निर्माण करणे, बळकटी देण्याचा उद्देश या छोट्या धंद्यांच्या बहरण्यामागे आहे.यात शासनाची भूमिका नियामक न राहता सहाय्यक असावी व छोटा धंदाचालकानी यात मनापासून सहभागी होणे आवश्यक आहे.

**संदर्भग्रंथ सूची**


1. कुलकर्णी अविनाश, औद्योगिक अर्थशास्त्र, डायमंड पब्लिकेशन पुणे,2021
2. गोविलकर विनायक, भारतीय अर्थव्यवस्थेतील निर्णयक वळणे, डायमंड पब्लिकेशन, पुणे 2018
3. देशपांडे विनायक, भारतीय अर्थव्यवस्था (संक्रमण आणि विकास) हिमालया पब्लिकेशन, नागपूर 2003
4. अर्थसंवाद, मराठी अर्थशास्त्र परिषद, नियतकालिक, जानेवारी- मार्च 2019
5. दैनिक वर्तमानपत्रे, जानेवारी 2023 ते डिसेंबर 2023.


***

# भारताची महासत्तेकडील वाटचाल व जागतिक संघटनेतील सहभाग व महत्त्व

**श्री आडे गजानन धर्मा**
सहाय्यक प्राध्यापक (राज्यशास्त्र) कै.बाबुराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय. हिंगोली

**प्रस्तावना** :

भारताची महासत्ताकडे वाटचाल कशाप्रकारे आहे .व ती वाटचाल एकविसाव्या शतकामध्ये महासत्ता होण्याच्या वाटेवर भारताची कशा पद्धतीने भूमिका आहे. व स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या गेल्या 75 वर्षांमध्ये भारताच्या जागतिक पातळीवरील वाढता प्रभाव व जागतिक संघटनांमध्ये इतर देशाच्या तुलनेत भारताचे नेतृत्व व इतर राष्ट्राबरोबर असलेले संबंध समतोल पद्धतीने प्रस्थापित करत आहे. तसेच अग्रणीय स्थरावर भारत प्रवास करताना दिसत आहे.भारताचे परराष्ट्र धोरण आज घडीला महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे .कारण विसाव्या शतकापेक्षा एकविसाव्या शतकामध्ये भारताची भूमिका ही परराष्ट्र धोरणामध्ये महत्वपूर्ण दिसत आहे .आज भारत विविध जागतिक संघटनांमध्ये असलेला सहभाग व महत्त्व कशा पद्धतीने आहे .व ते महत्त्व दिवसेंदिवस कशा पद्धतीने वाढत आहे .त्या वाढत्या प्रभावामुळे आणि महत्त्वामुळे आज भारत कुठेतरी महासत्तेच्या वाटेवरती येऊन उभा आहे.कारण जागतिक संघटनेमध्ये भारताचा महत्व आणि भारताची नेतृत्व भूमिका दिवसेंदिवस वाढत आहे .त्यामुळे एकंदरीत पाहता भारत येणाऱ्या काळात महासत्ता होण्याच्या मार्गावर आहे . याचे विश्लेषण आपण विविध जागतिक संघटनेंमधून पाहणार आहोत.

## जागतिक संघटना व भारत

### 1 ) संयुक्त राष्ट्र संघटना( युनो ) :

युनोची स्थापना 24 ऑक्टोबर 1945 ला झाली . विशेष म्हणजे युनो हा शांतता व सुरक्षितता राखणे राष्ट्रांमध्ये मैत्रीपूर्ण संबंध विकसित करणे आंतरराष्ट्रीय सहकारी साध्य करणे यासाठी स्थापन करण्यात आलेली होती. ही जगातील सर्वात मोठी संस्था होय .युनोचे मुख्यालय न्यूयॉर्क मध्ये आहे .तसेच भारताचा सहभाग व महत्त्व हे एक अनन्य साधारण स्वरूपाचे आहे .कारण युनोची स्थापना वेळेपासून सहभागी राष्ट्र व पुढाकार घेऊन सदस्य राष्ट्र म्हणून भारताची भूमिका होती. तसेच भारताने नेहमीच शांतता व सुरक्षासाठी पुढाकार घेतलेला आहे. तरी युनो मध्ये पहिल्या 50 राष्ट्रांमध्ये भारताने स्वाक्षरी केली होती. वाशिंग्टन डी सी येथे जाहीरनाम्यावर भारताने स्वाक्षरी केली आहे. व भारताची ही त्यावेळी तेवढेच महत्त्व होते व आजही भारतचे युनो मध्ये स्थायी सदस्य देशांमध्ये सहभागी होणाऱ्या वाटेवर आहे. कारण की रशियाने पाठिंबा दर्शवला आहे. तसेच इतरही राष्ट्र भारतच्या बाजूने आहे. तसेच युनोच्या सुरक्षा परिषदेच्या आठ टर्मसाठी कायमस्वरूपी सदस्य भारत आहे .तसेच युनो कडून शांतता सुरक्षा प्रस्थापित करण्यासाठी भारताने युद्धप्रसंगी शांतता राखण्यासाठी विविध देशांमध्ये सैन्य सहाय्यता देऊन शांतता प्रस्थापित करण्यास मदत केली आहे . म्हणुन भारताचे हेतु शांतता टिकवणे हि आहे. त्यामुळे भारत आज जगाच्या पाठीवर वेगळा ठसा उमटवत आहे. तसेच प्रगतीच्या वाटेवर विकास हि वाढत आहे.त्यामुळे महासत्ता कडे वाटचाल करताना दिसत आहे .युनो मध्ये होणाऱ्या विविध कार्यक्रमांमध्ये दहशतवादी असेल किंवा इतर काही आपत्ती असेल आरोग्य नियंत्रणाच्या बाबींमध्ये किंवा पर्यावरण संवर्धन अनेक बाबींमध्ये युनोच्या

कार्यक्रमांमध्ये सहभागी व सक्रियपणे भूमिका बजावताना दिसत आहे .त्यामुळेच आज भारताची युनो सारख्या संघटनेमध्ये महत्त्व वाढलेले आहे.

**2) इंटरनॅशनल मॉनिटरी फंड (IMF) :**

IMF ची स्थापना 27 डिसेंबर 1945 रोजी झाली. ही संघटना 190 देशांची एक संघटना आहे . ज्यावेळी प्रत्येकाला IMF च्या कार्यकारी मंडळावर त्याच्या आर्थिक महत्वाचे प्रमाणात प्रतिनिधित्व आहे तसेच जागतिक अर्थव्यवस्थेत सर्वात शक्तिशाली देशांना सर्वाधिक मतदानाचा अधिकार आहे

**IMF चे उद्दिष्टे :**

1) सुरक्षित आर्थिक स्थिरता .

2)जागतिक आर्थिक सहकार्य वाढवणे.

3)आंतरराष्ट्रीय व्यापार सुलभ करणे तसेच

4)जागतिक गरिबी कमी करणे अशा प्रकारची उद्दिष्टे आहेत .

**IMF मध्ये** भारताचे महत्त्व व सहभाग कशा पद्धतीने आहे.

1)भारता IMF चा संस्थापक सदस्य होय. 2)पैशाच्या क्षेत्रात IMF द्वारे आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या विस्तारास भारताचा फायदा झालाआहे

3)फाळणीच्या वेळी भारताची परिस्थिती हालकीची होती त्यावेळी भारताला IMF ने मदत केली होती. 4)1965 व 1971 च्या युद्धा वेळी झालेल्या आर्थिक चणचण भागवण्यासाठी IMF ने कर्ज देऊन मदत केली होत.

5) तसेच भारताला विविध क्षेत्रासाठी विकास कामासाठी IMF ची मदत होत असते .

**IMF मध्ये सध्याच्या परिस्थितीनुसार भारताचा असणारा महत्त्व .**

1)फंडाच्या संचालक मंडळात भारताचे विशेष स्थान आहे .भारताने निधीचे धोरण निश्चित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. यामुळे आज आंतरराष्ट्रीय वर्तुळात भारताची प्रतिष्ठा वाढली आहे.

2)1993 पासून भारताने IMF कडून कोणतेही कर्ज घेतले नाही. व IMF कडून घेतलेल्या सर्व कर्जाची परतफेड 31 मार्च 2000 रोजी पूर्णझाली.

3)भारताचे अर्थमंत्री हे IMF च्या गव्हर्नर मंडळावर पदसिद्ध गव्हर्नर आहे आरबीआय गव्हर्नर हे IMF ची पर्यायी गव्हर्नर आहेत .

4)IMF मध्ये भारताचा सध्याचा कोटा SGR (स्पेशल ग्रोइंग राइट्स) 5821.5 दशलक्ष आहे. ज्यामुळे तो IMF मध्ये तेरावा सर्वात मोठा कोटा धारण करणारा देश बनतो. त्यामुळे 2.47 शेअर होल्डिंग आहे.

5)मतदानाच्या टक्केवारीचे आधारे कार्यकारी मंडळाच्या 24 मतदार संघाच्या यादीत उदाहरणात बांगलादेश भूतान श्रीलंका यांच्यासह 17 व्या क्रमांकावर भारत देशाचा नंबर लागतो .

6)IMF ला संसाधने कर्ज देण्यामध्ये भारताचे योगदान आहे.

जी 20 च्या लंडन शिखर परिषदेत IMF ची कर्जक्षमता US$ 500अब्जपर्यंत तिप्पट करण्याचा निर्णय घेण्यात आला .या निर्णयाच्या अनुषंगाने भारताने 14 अब्जपर्यंत गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला आहे.

जगातील विकसनशील देशांमध्ये भारत सर्वात जास्त प्रभावी देश होय .व भारत आज वर्ल्ड बँकेचा ही सदस्य होय .त्यामुळे आज दिवसेंदिवस IMF मध्ये भारताचे महत्त्व सहभाग वाढत आहे .याच धर्तीवर आज भारताची वाटचाल काही प्रमाणात महासत्ता होण्याच्या उंबरठ्यावर येऊन पोहचली आहे.

**3) जागतिक व्यापार संघटना ( WTO**):

ही एक आंतरराष्ट्रीय व्यापार संघटना आहे .जगातील देशांमध्ये होणाऱ्या आंतरराष्ट्रीय व्यापारावर देखरेखीचे काम करते. 1 जानेवारी 1995 ला WTO ची स्थापना. GATT च्या 8 व्या उरुग्वे फेरीच्या वेळी स्थापन करण्यात आली .तसेच आज भारतासह 184 देश संघटनेचे सदस्य आहेत .जिनिव्हा येथे मुख्यालय आहे.

**WTO मध्ये भारताचे महत्त्व व सहभाग :**

पाश्चिमात्य राष्ट्राच्या दबावाला नजुमानता भारताने WTO च्या व्यापार सुलभीकरण प्रस्तावावर TRF वर स्वाक्षरी करण्यास नकार दिला आह. कारण जागतिक व्यापाराशी बांधिलकी ठेवण्यापेक्षा गरीब व भुकेल्या जनतेला अणुसुरक्षा देणे अधिक महत्त्वाचे असल्याची भूमिका भारताने घेतली आहे तसेच भारताने गरीब व भुकेलेल्या राष्ट्रांसाठी भुमिका घेत. अनुदान देणे हा आमचा हक्क आह. व तो आम्ही बजावणारच अशा शब्दात -अनंद शर्मा यांनी 2013 मध्ये बाली परिषदेवेळी म्हणाले होत. भारत सारख्या विकसनशील राष्ट्रांमध्ये दुर्बल घटकांची अन्नसुरक्षा ची गरज पूर्ण करण्यासाठी सरकार हमीभावात अन्नधान्य खरेदी करून दुर्बल घटकांना दोन-तीन रुपये दराने देतो .कारण जनता चे अन्नधान्य सरकार माफक व मोफत दरात भारतात दिले जात. यासाठी तसेच शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करायला सरकार कटीबद्ध आहे .विकसनशील देशाच्या सार्वजनिक साठवणूक कार्यक्रमावर जागतिक व्यापार संघटनेने घातलेल्या मर्यादा सरकारचा आक्षेप आहे भारत सारख्या विकसनशील देशांना आपल्या धान्य साठ्यातून कोणतेही आंतरराष्ट्रीय दायित्वाचे उल्लंघन न करता गरिबांसाठी धान्य पुरवठा करण्याचे स्वातंत्र्य हवे, आपल्या नागरिकांचे जीवन आणि उपजीविकी संबंधित मूलभूत हक्कांचे संरक्षण करणे आपले कर्तव्यआहे कारण आपल्या देशात 60% हून अधिक जनता शेतीवर अवलंबून असल्याने आपण लागू किमती सोडू शकत नाही. भारत

जागतिक व्यापार संघटनेच्या सदस्य देशांची मत धरणे करण्यात यशस्वी होई, आणि या मुद्द्यांवर त्यांचीही सहकार्य मिळे. असा विश्वास वाटतो - निर्मला सीतारामन (केंद्रीय वाणिज्य उद्योग राज्यमंत्री) एकच म्हटले आहेत एकंदरीत भारताचे वर्चस्व गरीब व विकसनशील राष्ट्रांमध्ये मदत करणे अनुदानाच्या बाजूने वाढताना दिसत आहे.

याबाबतीत WTO मधील व्यापार सुलभीकरण प्रस्तावाच्या विरोधात भारताने ठाम आणि नकारात्मक भूमिका घेतल्याने अमेरिका हादरली आहे .व्यापारी विषयक सोयी उपलब्ध करण्याच्या बांधिलकी पासून भारताने फारकत घेतल्यामुळे ,WTO संकटात सापडली आहे. असे -गॅरी हयुबर यांनी म्हटले आहे.( अर्थतज्ञ व आंतरराष्ट्रीय व्यापार तज्ञ आहेत.)

अशा पद्धतीने भारताचे या जागतिक संघटनामध्ये वाढता सहभाग व महत्त्व पाहता. भारताची वाटचाल ही विज्ञान व तंत्रज्ञान क्षेपणा शस्त्र संरक्षण क्षेत्रातील भारत शस्त्र साठा म्हणून चौथ्या क्रमांकाचा देश म्हणून ओळखला जातो.तसेच अन्नधान्यासाठाही भारताकडे मुबलक प्रमाणात आहे .तसेच पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था असुन, आज तिसऱ्या क्रमांकाच्या वाटेवर भारत वाटचाल करताना दिसत आहे. तरी एकंदरीत पाहता जागतिक पातळीवर भारताचे वर्चस्व निर्माण करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावताना दिसत आहे . आणि ती भूमिका यशस्वी होता नाही दिसत आहे . तसेच काही सहकारी देशाबरोबर ब्रिक्स, सार्क, संघाय यासारख्या प्रादेशिक व खंड प्रणित संघटनांमध्ये भारताची सहभाग व महत्त्व मोठ्या प्रमाणात आहे. या सर्व बाबींचा उल्लेख करता भारताची जागतिक संघटनेतील महत्त्व सहभाग पाहता भारत ही जागतिक महासत्ता व बहुध्रुवी महासत्ता होऊ पाहत आहे.

**सारांश :**

सर्व बाबींचा विचार करत असताना आज भारत देशाची प्रतिमा जागतिक संघटनेमध्ये ,व आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये, परराष्ट्र धोरणामध्ये ,भारताची भूमिका ही महत्त्वपूर्ण भूमिका दिसत आहे. व भारताचे वर्चस्व महत्व जागतिक पातळीवर ती योगदान व आंतरराष्ट्रीय राजकारण आंतरराष्ट्रीय भौगोलिक दृष्ट्या महत्त्वाचे ठरत आहे .तसेच भारत आज जागतिक महासत्ता व बहुधूर्य महासत्ता यामध्ये आपले ठसा उमटवण्याचा व महासत्ता बनण्याच्या उंबरठ्यावरती आपला भारत देश आज कुठेतरी जाऊन पोहोचला आहे .त्यामुळे एकंदरीत पाहता वरील जागतिक संघटनांचा आढावा घेत असताना जागतिक संघटनांमधून भारत हा आज आंतरराष्ट्रीय वर्तुळामध्ये आपली महत्त्वपूर्ण वर्चस्व व महत्त्वपूर्ण भूमिका असल्याचे आपल्याला दिसून येते त्यामुळे भारता जागतिक महासत्ता होण्याच्या मार्गावर आहे. म्हणूनच भारत महासत्ता बनेल असे म्हणणे वावगे ठरणार नाही .

**संदर्भ सूची :**


1. आंतरराष्ट्रीय संबंध - डॉ शैलेंद्र देवळाणकर. प्रकाशन - विद्या बुक्स पब्लिकेशन औरंगपुरा औरंगाबाद. आवर्ती - जानेवारी 2021
2. इंडियन पोलिटी- मूळ लेखक एम लक्ष्मीकांत अनुवाद - श्रीकांत गोखले प्रकाशन - के सागर पब्लिकेशन पुणे. आवर्ती - जानेवारी 2017
3. संयुक्त राष्ट्र संघटना -डॉ व्ही वाय जाधव प्रकाशन - अथर्व पब्लिकेशन जळगाव आवर्ती- फेब्रुवारी 2000
4. विश्व व्यापार संघटन- पि.के. वासुदेव प्रकाशन - प्रभात प्रकाशन आवर्ती - जानेवारी 2009
5. महाराष्ट्र टाइम्स ई पेपर -संपादकीय लेख ऑगस्ट 2014.
6. दृष्टी आयएस नोट्स -दिवे चक्रवर्ती सर.


***

# मेक इन इंडिया - एक अभ्यास

## डॉ. मयुरी राजेश्वर फुके

पिपल्स महाविद्यालय, नांदेड.

**प्रस्तावनाः**

भारत हा एक विकसनशील देश आहे आणि त्याची ७० टक्के पेक्षा जास्त लोकसंख्या खेडयांमध्ये राहते आणि उपजिविकेसाठी शेतीवर अवलंबून आहे हे आपल्याला माहित आहे. पण केवळ शेती करुन आपला विकास होऊ शकत नाही, हे भारतात ज्या वेगाने लोकसंख्या वाढत आहे, ज्यावेगाने आपण संसाधनांचा वापर करत आहोत त्यावरुन स्पष्ट होते. आपल्याला लवकरच रोजगाराच्या नवीन संधी निर्माण कराव्या लागतील तरच आपण विश्वगुरु होण्याचे स्वप्न पूर्ण करु शकू. त्यामुळे हाच विचार करुन, देशव्यापी स्तरावर उत्पादन क्षेत्राचा विकास करण्याच्या उद्देशाने भारत सरकारने २५ सप्टेंबर २०१४ रोजी विज्ञान भवन, नवी दिल्ली येथून मेक इन इंडिया उपक्रम सुरु केला.

मेक इन इंडिया उपक्रमाचा एक मुख्य उद्देश भारतातील रोजगारांच्या संधी वाढवणे हा आहे. या योजने अंतर्गत प्रामुख्याने देशातील तरुणांवर लक्ष केंद्रीत करण्यात आले आणि देशातील उद्योजकतेला कसे चालना देता येईल याची चौकटही तयार करण्यात आली. गुंतवणीकीसाठी अनुकूल वातावरण आणि आधुनिक आणि कार्यक्षम पायाभूत सुविधा निर्माण करणे, परदेशी गुंतवणुकीसाठी नवीन क्षेत्रे उघडणे आणि सरकार आणि उद्योग यांच्यात भागीदारी निर्माण करणे हे त्याचे ध्येय आहे.

मेक इन इंडिया कार्यक्रमाचा फोकस २५ क्षेत्रांवर आहे. यामध्ये ऑटोमोबाईल, ऑटोमोबाईल घटक, विमान चालन, जैवतंत्रज्ञान, रसायने, बांधकाम, संरक्षण उत्पादन, इलेक्ट्रिकल मशिनरी, इलेक्ट्रॉनिक प्रणाली,

अन्न प्रक्रिया, आयटी आणि बीपीएम, लेदर, मिडीया आणि मनोरजंन, खाणकाम, तेल आणि वायू, फार्मास्युटीकल्स, बंदरे आणि शिपिंग, रेल्वे, अक्षय उर्जा, रस्ते आणि महामार्ग, अंतराळ, कापड आणि वस्त्र, औष्णिक ऊर्जा, पर्यंटन आणि आदरातिथ्य आणि आरोग्य.

**मेक इन इंडिया – उद्‌दिष्टेः-**

मेक इन इंडिया प्रकल्पाची अनेक उद्‌दिष्टे आहे ते खालील प्रमाणे आहेत.

१. वार्षिक उत्पादन क्षेत्राची वाढ १२-१४ टक्के पर्यंत वाढविणे.

२. २०२२ पर्यंत मॅन्युफॅक्चरिंग नोक-यांची संख्या १०० दशलक्षने वाढविणे.

३. २०२२ पर्यंत जी.डी.पी. मध्ये उत्पादन क्षेत्राचे योगदान २५ टक्के पर्यंत वाढविणे.

४. सर्वसमावेशक विकासाला चालना देण्यासाठी शहरी गरीब आणि ग्रामीण स्थलांतरितांमध्ये आवश्यक कौशल्ये विकसीत करणे.

५. उत्पादन क्षेत्रात देशांतर्गत मूल्यवर्धन आणि तंत्रज्ञानाची खोली वाढली आहे.

६. प्रगती पर्यावरणीयदृष्टया टिकाऊ आहे.

७. भारतीय उत्पादन क्षेत्राची जागतिक स्पर्धात्मकता वाढविणे.

**मेक इन इंडिया – व्हिजनः**

१. सध्या उत्पादन क्षेत्राचा राष्ट्रीय जीडीपी च्या १५ टक्के पेक्षा किंचित जास्त वाटा आहे. इतर आशियाई विकसनशील देशांमध्ये आढळल्याप्रमाणे हे २५ टक्के योगदान वाढवण्याचे या कार्यक्रमाचे उदिष्टय आहे. नौक-या निर्माण करणे, लक्षणीय विदेश थेट गुंतवणूक आकर्षित करणे आणि भारताला जगभरात एक पसंतीचे उत्पादन केंद्र बनवण्याचा सरकारचा मानस आहे.

२. मेक इन इंडिया मोहिमेचा लोगो हा अशोकचक्राने प्रेरित असलेला एक उत्कृष्ट सिंह आहे आणि अनेक क्षेत्रामध्ये भारताचे यश प्रतिबिंबित करण्याचा हेतू आहे. पंतप्रधानांनी ही मोहीम प्रसिध्द देशभक्त, तत्वज्ञ आणि राजकीय नेते पंडित दीनदयाळ उपाध्याय यांना समर्पित केली, ज्यांचा जन्म याच तारखेला १९१६ मध्ये झाला होता.

३. पंतप्रधानांनी या मोहिमेत सामील असलेल्या प्रत्येकाला, विशेषतः उद्योजक आणि कार्पोरेशन्सना प्रथम विकसनशील भारत आणि गुंतवणूकदारांनी देशाला थेट परदेशी गुंतवणूकीसह संपन्न करण्यासाठी भारतीय नागरिक म्हणून त्यांच्या जबाबदा-या पार पाडण्याचे आवाहन केले.

४. पंतप्रधानांनी पुढे सांगितले की, त्यांचे प्रशासन भारताला आकर्षक अनुभव देऊन गुंतवणकदारांना मदत करेल आणि त्यांच्या प्रशासनाने व्यापक राष्ट्रीय विकासाला राजकीय अजेंडा ऐवजी विश्वासाचा मुद्दा म्हणून पाहिले आहे. त्यांनी मेक ईन इंडियाला पूरक तंत्रज्ञानाच्या दृष्टीने अत्याधुनिक डिजिटल इंडियाच्या त्यांच्या व्हिजनचा पायाही घातला. त्यांनी रोजगार निर्मिती आणि दारिद्रय मुक्तीवर भर दिला जे मोहिमेच्या यशानंतर अपरिहार्यपणे दुरुस्त होईल.

**मेक इन इंडियाः एक समर्थ योजनाः-**

मेक इन इंडिया उपक्रमाला मदत करण्यासाठी अनेक उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. या योजनांचे खाली अधिक विस्तारपूर्वक वर्णन केले आहे.

- या उपक्रमाच्या अंतर्गत भारतातील विविध क्षेत्रातील १० दशलक्ष लोकांना दरवर्षी प्रशिक्षण देण्याचा मानस आहे. मेक इन इंडिया

प्रत्यक्षात आणण्यासाठी अफाट मानव संसाधन कुशल असले पाहिजे. हे महत्वपूर्ण आहे कारण भारतातील औपचारिक पणे कुशल कामगार लोकसंख्येच्या केवळ २ टक्के आहेत.

- या उपक्रमा मागील प्राथिमक उदिष्‍्टय एक अशी परिसंस्था निर्माण करणे आहे, जी स्टार्टअपच्या वाढीस चालना देते तसेच दीर्घकालीन आर्थिक विकासाला चालना देणे आणि मोठया प्रमाणत रोजगार निर्मिती करते.
- भारताला माहितीच्या आधारित आणि डिजिटली सक्षम अर्थव्यवस्था बनवणे हे ध्येय आहे.
- भारताला स्वच्छ बनवण्याचा आणि मूलभूत स्वच्छता आणि स्वच्छतेला प्रोत्साहन देण्याचा हा प्रयत्न आहे.
- या धोरणाचा उद्‌देश बंदरांची वाढ करणे आणि देशातील बंदरांच्या नेतृत्वाखालील विकासाला चालना देणे हा आहे.
- आयएसए ही १२१ देशांची युती आहे, त्यापैकी बहुतेक सूर्यप्रकाश असलेले देश आहेत, जे कर्क आणि मकर राशीच्या उष्ण कटिबंधमध्ये पूर्णपणे किंवा अंशतः आहेत. त्यामुळे सौर तंत्रज्ञान संशोधन आणि विकासाला चालना देण्यासाठी आणि या क्षेत्रातील धोरणे तयार करण्यासाठी भारताचा हा उपक्रम आहे.
- एजीएनआयआय किंवा नविन भारताच्या नवोपक्रमाची वेगवान वाढ, लोकांना जोडून आणि नव कल्पनांच्या व्यापारीकरणाला पाठींबा देऊन देशाच्या नाविन्यपूर्ण परिसंस्थेला चालना देण्यासाठी स्थापन करण्यात आली.

**मेक इन इंडिया अभियानाला समर्थन देण्यासाठी प्रमुख योजना सुरु करण्यात आल्याः-**

**१. स्किल इंडिया मिशन-**

या मिशनचे उदिष्टे भारतात दरवर्षी विविध क्ष्ोत्रामध्ये १० दशलक्ष कौशल्य निर्माण करण्याचे आहे, मेकइन इंडिया मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीला पाठिंबा देण्यासाठी, मोठया प्रमाणावर उपलब्ध मानवी संसाधने वाढवण्याची गरज आहे. सध्या, भारतात औपचारिकपणे कुशल कामगारांची टक्केवारी लोकसंख्येच्या केवळ २ टक्के आहे. स्किल इंडिया कार्यक्रमाचा उद्देश देशभरातील विविध कौशल्य विकास कार्यक्रमांद्वारे ही टक्केवारी वाढवणे आहे.

**२. स्टार्टअप इंडिया** –

स्टार्टअप इंडिया कार्यक्रमाचा उद्देश स्टार्टअपच्या वाढील चालना देणारी शाश्वत आर्थिकवाढ आणि मोठया प्रमाणावर रोजगार निर्माण करणारी इकोसिस्टीम तयार करणे आहे. या कार्यक्रमांतर्गत सरकारने उद्योजकांसाठी अनेक महत्वाच्या सवलती दिल्या आहेत.

**३. डिजिटल इंडियाः**

अनेक सेवा पूर्णपणे ऑनलाईन करुन भारताला माहिती आधारित आणि डिजिटली सशक्त अर्थव्यवस्थेत रुपांतरीत करण्याचा हेतू आहे.

**४. प्रधानमंत्री जनधन योजनाः- (पीएमजेएवाय)**

हा उपक्रम आर्थिक सेवांमध्ये प्रवेश सुनिश्चित करण्यासाठी आर्थिक समावेशाची कल्पना करतो, जसे की बँकींग बचत आणि ठेव खाती, रेमिटन्स क्रेडिट, विमा, पेन्शन परवडणा-या पध्दतीने.

**५. स्मार्ट शहरेः-**

या मोहिमेचे उदिष्ट भारतीय शहरांमध्ये परिवर्तन आणि कायापालट करण्याचे आहे. अनेक उपक्रमांद्वारे भारतात १०० स्मार्ट शहरे निर्माण करण्याचे उदिष्ट आहे.

**६. अमृतः-**

अमृत हे कार्याकल्प आणि शहरी परितवर्तनाचे अटल मिशन आहे, मूलभूत सार्वजनिक सुविधा निर्माण करणे आणि भारतातील ५०० शहरे आधिक राहण्या योग्य आणि सर्वसमावेशक बनविणे हे त्याचे उदिष्ट आहे.

**७. स्वच्छ भारत अभियानः-**

भारताला स्वच्छ बनविणे आणि मूलभूत स्वच्छता आणि स्वच्छतेला प्रोत्साहन देणे हे या अभिनयाचे उदिष्ट आहे.

**८. सागरमालाः-**

या योजनेचा उद्‌देश देशातील बंदरे विकसित करणे आणि बंदरांच्या नेतृत्वाखालील विकासाला चालना देणे आहे. या प्रकल्पांतर्गत अनेक बंदरांची निर्मिती आणि नूतनीकरण करण्यात येत आहे.

**९. इंटरनॅशनल सोलर अलायन्स (आयएसए)-**

आयएसए ही देशांची युती आहे  ज्यातील बहुतेक समशतोष्ण प्रदेशात आहेत. सौर तंत्रज्ञानमध्ये संशोधन आणि विकासला चालना देण्यासाठी आणि त्या संदर्भात धोरणे तयार करण्याच्या उद्‌देशाने भारताचा हा उपक्रम आहे. आयएसए चे मुख्यालय गुरुग्राम येथे आहे.

**१०. एजीएनआयआयः**

एजीएनआयआय किंवा ॲस्लेरेटींग ग्रोथ ऑफ न्यु इंडियाज इनोव्हेशन लॉन्च केले गेले आहे. जेणे करुन लोकांना जोडून आणि नव कल्पनांचे व्यावसायीकरण करण्यात मदत करुन देशातील इनोव्हेशन ईकोसिस्टमला चालना मिळेल.

**मेक इन इंडिया उपक्रमाची प्रगतीः-**

मेक इन इंडिया योजनेच्या उपलब्धतेचे अनेक टप्पे आहेत. काही प्रमुख बाबी खाली सूचीबध्द आहेत.

१. वस्तू आणि सेवाकर (जीएसटी) लागू केल्याने व्यवसायांसाठी कर प्रक्रियात्मक प्रणाली सुलभ झाली आहे. जीएसटी मेक इन इंडिया मोहिमेला भरभरुन देणारा ठरला आहे.
२. देशात डिजिटलायझेनला वेग आला आहे. एकूण प्रक्रिया सुलभ करण्यासाठी आणि कार्यक्षमता सुधारण्यासाठी कर आकारणी, कंपनी निगमन आणि इतर अनेक प्रक्रिया ऑनलाईन केल्या गेल्या आहेत. यामुळे ईओडीबी निर्देशांकात भारताचा क्रमांक वाढला आहे.
३. दिवाळखोरी आणि दिवाळखोरी संहिता २०१६ या नविन दिवाळखोरी संहिताने दिवाळखोरीशी संबंधित सर्व कायदे आणि नियम एकाच कायद्यात एकत्रित केले आहेत. यामुळे भारताच्या दिवाळखोरी संहितेला जागतिक मानकांच्या बरोबरीने घेतले आहे.
४. पीएमजेएवाय सारख्या आर्थिक समावेशाच्या योजनांमुळे मे २०१९ पर्यंत, ३५६ दशलक्ष नवीन बँक खाती उघडण्यात आली.
५. एफडीआय उदारीकरणामुळे भारताचा ईओडीबी निर्देशांक अनुकूल होण्यास मदत झाली आहे. मोठया एफडीआयमुळे नोक-या उत्पन्न आणि गुंतवणूक निर्माण होईल.
६. पायाभूत सुविधा आणि कनेक्टिव्हिटीला भारतमाला आणि सागरमाला यांसारख्या प्रमुख पुश यू योजना, तसेच विविध रेल्वे पायाभूत सुविधा विकास योजना प्राप्त झाल्या आहेत.
७. भारतनेट – हे देशाच्या ग्रामीण भागात डिजिटल नेटवर्क वाढवण्यासाठी भारत सरकार द्वारे स्थापीत केलले टेलीकॉम इन्फ्रास्ट्रक्चर प्रदाता आहे. हा कदाचित जगातील सर्वात मोठा ग्रामीण ब्रॉडबॅन्ड प्रकल्प आहे.

८. पवन ऊर्जा वापरण्याच्या क्षमतेच्या बाबतीत भारत जगात चौथ्या क्रमांकावर आहे. आणि सौर उर्जेचा वापर करण्याच्या बाबतीत जगात सहाव्या क्रमांकावर आहे. एकंदरीत स्थापित अक्षय उर्जा योजनेमध्ये भारत जगात पाचव्या क्रमांकावर आहे.

**मेक इन इंडियाः फायदे** –

मेक इन इंडिया ही एक क्रांतिकारी कल्पना आहे ज्याने गुंतवणूक आणि नवनिर्मीतीला प्रोत्साहन देण्यासाठी, बौध्दीक संपत्तीचे संरक्षण करण्यासाठी आणि देशात जागतिक दर्जाच्या उत्पादन पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी प्रमुख नविन उपक्रम सुरु केले आहेत. भारतात व्यवसाय करण्याची संपूर्ण प्रक्रिया या उपक्रमामुळे सुलभ झाली आहे. नवीन प्रक्रियेत गती आणि पारदर्शकता मोठया प्रमाणात वाढली आहे. आता व्यवसाय करताना भारत अनेक परदेसी कंपन्यांना आकर्षित करतो. आता भारत अशा सर्व गुंतवणूकदारांसाठी एक सुलभ आणि पारदर्शक प्रणाली प्रदान करत आहे जे स्थिर अर्थव्यवस्था आणि फायदेशीर व्यवसाय संधी शोधत आहेत. भारतात गुंतवणुक करण्याची हीच योग्य वेळ आहे. जेंव्हा या देशात सर्वांना प्रगती आणि समृध्दी देण्यासारखे खूप काही आहे.

मेक इन इंडिया मोहिमेमुळे देशामध्ये अनेक सकारात्मक घडामोडी घडल्या आहेत. खालील प्रमाणे या मिशन मधून मिळालेले आणखी काही फायदे आहेत.

१) रोजगाराच्या संधी निर्माण करणे.

२) आर्थिक वाढीचा विस्तार करुन जीडीपी वाढवणे.

३) जेव्हा एफडीआय चा प्रवाह अधिक होईल तेंव्हा रुपया मजबूत होईल.

४) लहान उत्पादकांना विशेषतः जेंव्हा परदेशातील गुंतवणूकदार देशात गुंतवणूक करतात तेंव्हा त्यांना प्रोत्साहन मिळेल.

५) जेंव्हा देश भारतात गुंतवणूक करतील तेंव्हा ते त्यांच्या सोबत विविध क्षेत्रातील अद्यायावत तंत्रज्ञान आणतील.

६) मिशन अंतर्गत घेतलेल्या विविध उपक्रमांमुळे, भारत ईओडीबी निर्देशांकात वरचा क्रमांकावर पोहोचला आहे.

७) ग्रामीण भागात उत्पादन केंद्रे आणि कारखाने सुरु केल्याने या भागांच्या विकासालाही चालना मिळेल.

**मेक इन इंडिया उपक्रमासमोरील आव्हानेः-**

या मोहिमेला काही भागात यश आले असले तरी त्यावर टिकाही होत आहे. आस्थापनेने निश्चित केलेल उदात्त लक्ष् साध्य करावये असेल तर देशासमोर अनेक आव्हाने आहेत.काही टीका खाली दिल्या आहेत.

१) भारतात जवळपास ६० टक्के शेती योग्य जमीन आहे. उत्पादनावर जोर दिल्याने शेतीवर नकारात्मक परिणाम होत असल्याचे म्हटले जाते. यामुळे शेती योग्य जमिनीचा कायम स्वरुपी विस्कळीतपणाही होऊ शकतो.

२) असेही मानले जाते की जलद औद्योगिकरणामुळे नैसर्गिक संसाधनांचा –हास होऊ शकतो.

३) मोठया प्रमाणावर एफडीआयला आंमत्रण दिल्याचा परिणाम असा आहे की, स्थानिक शेतकरी आणि छोटे उद्योजक आंतरराष्ट्रीय उद्योगांच्या स्पर्धेला तोंड देऊ शकत नाहीत.

४) उत्पादनावर सर्व लक्ष केंद्रीत करुन ही मोहीम प्रदूषण आणि पर्यावरणीय दुष्परिणामांना कारणीभूत ठरु शकते.

५) देशातील भौतिक पायाभूत सुविधांमध्ये गंभीर कमतरता आहेत. मोहीम यशस्वी होण्यासाठी देशात उपलब्ध पयाभूत सुविधांची

उभारणी करणे आणि भ्रष्टाचारा सारख्या खालच्या स्तरावरील समस्या कमी करणे आवश्यक आहे. येथे, भारत चीनकडून धडा घेऊ शकतो, ज्याने १९९० च्या दशकातील जागतिक उत्पादनातील आपला वाटा २.६ टक्के वरुन २०१३ मध्ये २४.९९ पर्यंत वाढवला आहे.

**सारांशः-**

हा भारत सकराचा एक प्रमुख आणि महत्वपूर्ण राष्ट्रीय कार्यक्रम आहे जो गुंतवणूक सुलभ करण्यासाठी, नवकल्पना वाढवण्यासाठी, कौशल्य विकास वाढवण्यासाठी, बौध्दिक संपत्तीचे संरक्षण करण्यासाठी आणि देशातील उत्कृष्ट उत्पादनाच्या पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी डिझाईन करण्यात आला आहे.

- एफडीआय चा ओघः भारतात २०१४-१५ मध्ये युएसडी ४५.१५ अब्ज इतका होता आणि त्यानंतर सलग ८ वर्षापर्यंत विक्रमी एफडीआय प्रवाह गाठला आहे.
- २०२१-२२ या वर्षात युएसडी ८३.६ अब्ज इतकी सर्वाधिक एफडीआय नोदविली गेली.
- अलीकडच्या वर्षात आर्थिक सुधारणा आणि व्यवसाय करणे सुलभतेच्या पार्श्वभूमीवर भारत चालू आर्थिक वर्षात (२०२-२३) युएसडी १०० अब्ज एफडीआय आकर्षित करण्याच्या मार्गावर आहे.
- २०२१-२२ मध्ये खेळण्यांची आयात ७० टक्केने कमी होऊन युएसडी ११० मिलीयन (८७७.८ कोटी रुपये) झाली आहे.
- भारताच्या खेळण्यांच्या निर्यातीत एप्रिल-ऑगस्ट२०२२ मध्ये २०१३ मधील याच कालावधीच्या तुलनेत ६३६ टक्के ची प्रचंड वाढ झाली आहे.

या उपक्रमाचा मुख्य उद्देश जगभरातून गुंतवणूक आकर्षित करणे आणि भारताचे उत्पादन क्षेत्र मजबूत करणे हा आहे.याचे नेतृत्व वाणिज्य आणि उद्योग मंत्रालय, भारत सरकाच्या उद्योग आणि अंतर्गत व्यापार विभाग (डीपीआयआयटी) करीत आहे. मेक इन इंडिया कार्यक्रम भारताच्या आर्थिक वाढीसाठी अतिशय महत्वाचा आहे. कारण त्याचा उद्देश सध्याच्या भारतीय प्रतिभा उपलब्धेतेचा वापर करणे, अतिरीक्त रोजगाराच्या संधी निर्माण करणे आणि दुय्यम आणि तृतीयक क्षेत्राचे सक्षमीकरण करणे आहे.

**संदर्भसूची**ः-


1. www.makeinindia.com
2. www.google.com
3. www.dristiias.com
4. Make in India or Trade in India by Sachin Gupta.
5. दै. लोकसत्ता
6. दै. सकाळ


***

# शिक्षण क्षेत्रातील बदल नवीन शैक्षणिक धोरण 2020

**श्री. खरबे नारायण तुकाराम**
पी.एच.डी संशोधक - पीपल्स कॉलेज नांदेड

**प्रस्तावना** :

मानवाला आपल्या पूर्ण क्षमता वापरात येण्यासाठी, समान आणि न्याय समाज विकसित करण्यासाठी तसेच राष्ट्रीय विकासाला चालना देण्यासाठी शिक्षण हा पाया आहे भारताच्या सातत्यपूर्ण प्रगतीसाठी आणि आर्थिक विकास, सामाजिक न्याय आणि समानता, शास्त्रीय प्रगती राष्ट्रीय एकात्मता आणि जतन या क्षेत्रामध्ये वैश्विक पातळीवर नेतृत्व करण्यासाठी सर्वांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देणे महत्त्वाचे आहे. व्यक्ती, समाज, देश आणि जगाच्या हितासाठी आपल्या देशातील समृद्ध प्रतिभा आणि संसाधनाचा पुरेपूर वापर करण्याकरिता सार्वभौमिक शिक्षण हा भविष्यासाठी सर्वात चांगला मार्ग आहे. पुढच्या दशकात जगातील सर्वात मोठी युवकांची लोकसंख्या भारतामध्ये असेल आणि त्या सर्वांना चांगल्या गुणवत्तेच्या शिक्षणाच्या संधी पुरविण्याच्या आपल्या क्षमतेवर आपल्या देशाचे भवितव्य ठरेल.

भारत सरकारने 34 वर्षांपूर्वी च्या शैक्षणिक धोरणात अमुलाग्र बदल केले आहेत. सरकारने दिनांक 29 जुलै 2020 रोजी नवीन शैक्षणिक धोरण 2020 आणले आहे. या धोरणाचे मुख्य उद्दिष्टे म्हणजे भारत सरकारने पूर्वीचे 10+2 हा आकृतीबंध बदलून 5+3+3+4 असा आकृतीबंध आणला आहे.10+2 हा आकृतीबंध यात बदल होणार आहे यामध्ये प्रथम

प्रामुख्याने खालील टप्पे केलेले आहेत 5+3+3+4 याचा अर्थ खालील प्रमाणे

1. प्रथम 5 वर्ष म्हणजे, वयाचे 3 वर्ष पूर्ण झाल्यानंतर वयाच्या 8 वर्षापर्यंत दुसरी पर्यंत शिक्षण असेल. थोडक्यात 1 ली च्या अगोदर एकूण 3 वर्ष पूर्व शाळा असे शिक्षण असेल व नंतर 1 ली आणि 2 री असा एकूण हा पाच वर्षाचा कालावधी असेल.
2. पुढील 3 वर्ष म्हणजे वयाचे 8 वर्षे पूर्ण झाल्यानंतर पुढील 3 वर्ष म्हणजे 3 री 4 थी व 5 वी हा दुसरा टप्पा अर्थात वय 11 वर्ष पूर्ण होईपर्यंत इयत्ता 5 वी पूर्ण होईल.
3. त्या पुढील अजून 3 वर्षे म्हणजे, वयाचे 11वर्ष ते 14 इयत्ता 6 वी ते 8 वी पूर्ण होईल.
4. त्या पुढील 4 वर्षे म्हणजे वयाचे 14 वर्षे ते 18 वर्षे इयत्ता 9 वी ते 12 वी असा टप्पा राहील.

इयत्ता पाचवी पर्यंत मातृभाषेतून शिक्षण होईल. या धोरणानुसार राष्ट्रीय शिक्षण आयोगाची स्थापना करणे आणि खाजगी शाळांना अनियंत्रित फी वाढविण्यापासून रोखण्याची शिफारस नव्या शैक्षणिक धोरणात करण्यात आली आहे. दोन ते आठ वर्षे वयोगटातील मुलांना बहुभाषा शिकता येणार, तीन भाषा शिकण्याची परवानगी देण्यात आली आहे. कला ,क्रीडा, संगीत, योग ,समाज सेवा या विषयांना अभ्यासक्रमातच समाविष्ट करणार आणि विद्यार्थी एकत्रितपणे दोन शाखांचा अभ्यास करू शकणार आहे. आठवीपर्यंत प्रादेशिक भाषा अनिवार्य करण्यात आली आहे. देशाचे नवीन शैक्षणिक धोरणानुसार तीन वर्षे वयोगटापासून 14 वर्षापर्यंतची मुले आता शिक्षणाचा अधिकार या कायद्याच्या कक्षात येतील. नवीन शैक्षणिक धोरणाचा मसुदा भारतीय अवकाश संशोधन संस्था इस्रोचे माजी प्रमुख के कस्तुरी रंगन यांच्या अध्यक्षतेखालील

समितीने तयार केला आहे. त्यानुसार हे शैक्षणिक धोरण मांडण्यात आले आहे.

**शैक्षणिक धोरणाचा इतिहास :**

1. आपल्या देशात सर्वात प्रथम 'पंतप्रधान इंदिरा गांधी'यांच्या काळात 1968 साली पहिले राष्ट्रीय धोरण जाहीर करण्यात आले.
2. त्यानंतर 'राजीव गांधी' यांच्या कार्यकाळात 1986 साली दुसरे राष्ट्रीय धोरण जाहीर करण्यात आले. त्यानंतर 1992 मध्ये 'आचार्य राममूर्ती' यांच्या अध्यक्षतेखाली 'राष्ट्रीय शिक्षण धोरण' कृती आराखडा आणि स्थापना करण्यात आली. या समितीने दुसऱ्या शैक्षणिक धोरणाचा आढावा व काही शिफारशी केल्या.
3. अटल बिहारी वाजपेयी यांच्या कार्यकाळात सन 2002 साली घटना दुरुस्ती करण्यात आली.
4. त्यानंतर सन 2009 साली शिक्षण हक्क कायदा मंजूर करण्यात आला. या कायद्याची अंमलबजावणी 2013 पासून करण्यात आली.

**नवीन शैक्षणिक धोरण 2020 वैशिष्ट्ये**

नवीन शैक्षणिक धोरण 2020 अंतर्गत शालेय व उच्च शिक्षणाच्या रचनेत अमुलाग्र बदल करण्यात आले आहेत. शिक्षण अभ्यासक्रमांना वेगवेगळ्या शाखांच्या चौकटीतून बाहेर काढून आंतरशाखीय आणि समन्वयी करण्यात आले आहे. याचा सोपा अर्थ असा आहे की आता एकाच वेळी अभियांत्रिकी व संगीत हे दोन्ही विषय घेऊनही उच्च शिक्षण पूर्ण करता येईल. नवीन शैक्षणिक धोरणानुसार शालेय विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित केला जाणारा असून एकविसाव्या शतकासाठी आवश्यक कौशल्य प्रदान करण्याला महत्त्व देण्यात आले आहे.

**अभ्यास विषयाचे उद्देश:**

1. नवीन शैक्षणिक धोरण 2020 ही संकल्पना अभ्यासणे

2. नवीन शैक्षणिक धोरण 2020 शिक्षण क्षेत्रातील बदल अभ्यासणे
3. नवीन शैक्षणिक धोरण 2020 महत्त्व व व्याप्ती अभ्यासणे.

**संशोधन पद्धती**

सदरील संशोधन हे द्वितीय साधनसामग्री वर आधारित आहे. आवश्यक साधन सामग्री ही विविध लेख, पेपर, अहवाल, विविध संकेतस्थळे, पुस्तके, ग्रंथ, मासिके यावरून घेतली आहे.

**नवीन शैक्षणिक धोरण 2020 ,(संकल्पना) शिक्षण पद्धतीत नेमका काय बदल झाला आहे :**

पाचवी पर्यंतच्या शिक्षणाचे माध्यम मातृभाषेत असावे असे धोरण या नव्या शिक्षण प्रवाहात पुढे येणार आहे. शिक्षणाची टप्पे 10+2 ऐवजी आता 5+3+3+4 असे असणार आहे. या नव्या शिक्षण धोरणानुसार 3 ते14 वर्ष वयोगटाचे विद्यार्थी शिक्षण हक्क कायद्याच्या कक्षेत आले आहेत यापूर्वी हा वयोगट 6 ते 14 वर्ष होता

- तुम्हाला पदवीनंतर पीएचडी करता येईल एम फिल ची आवश्यकता नाही.
- सर्वच महाविद्यालयासाठी एकच सामायिक प्रवेश परीक्षा एन टी ए ही परीक्षा घेणार आहे पण ही परीक्षा ऐच्छिक असेल.
- ला आणि मेडिकल शिक्षण वगळता उच्च शिक्षण एका छताखाली येणार, एम. फिल आणि  डीटीएड बंद होणार.
- नवीन धोरणानुसार 2030 नंतर तुमची आधीची डिग्री गृहीत धरली जाणार नाही.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 चे महत्व :**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे जुने प्रगती पुस्तक इतिहास जमा होणार आहे. प्रगती पुस्तकात फक्त गुण व शिक्षकांचे शेरे न देता

स्वतः विद्यार्थी सह विद्यार्थी व शिक्षक यांना मूल्यमापन करायचे आहे त्या आधारावर विद्यार्थ्यांच्या जीवन कौशल्यांचा विकास करता येईल.

1. समग्र शिक्षण धोरण: देशाला असलेली एक समग्र शिक्षण पद्धतीची गरज यामधून पूर्ण होते.
2. एकात्म शिक्षण धोरण: पूर्व प्राथमिक ते विद्यापीठ स्तरापर्यंतच्या साखळीला जोडणारे हे शिक्षण धोरण आहे या साखळीचा वेगवेगळ्या तुकड्यांमध्ये नाहीतर एकत्रित विचार करण्यात आलाय.
3. सर्व समावेशक शिक्षण धोरण: सर्व सामाजिक आणि आर्थिकस्तर, महिला व पुरुषांना शिक्षणाच्या पातळीवर एक समान पातळीवर आणणारे धोरण.
4. भविष्यवेधी धोरण: पुढील वीस वर्षासाठीचे ध्येय लक्षात ठेवून हे धोरण आखण्यात आले. त्यामुळे आगामी वीस वर्षानंतर काय बदल होऊ शकतात याचा विचार या शैक्षणिक धोरणात करण्यात आला आहे.

**समारोप :**

कोणत्याही व्यक्तीला किंवा देशाला घडवणारी व्यवस्था म्हणजे शिक्षण आपण नोकरी किंवा व्यवसायाच्या कोणत्याही टप्प्यावर असलो तरी आपल्याला संबंधित विषयातले अद्ययावत शिक्षण असणे आवश्यक आहे.अद्ययावत शिक्षण नसेल तर आपण इतरांपेक्षा मागे पडू शकतो. देशाचे राष्ट्रीय शिक्षण धोरण 1986 नंतर अद्ययावत झालेच नव्हते. गेल्या 34 वर्षात किती बदललंय हे वेगळं सांगण्याची गरज नाही. बदलत्या जगाशी देशातल्या भावी पिढीला जुळवून घेण्यासाठी, त्यांना बदलत्या जगात वावरण्याचे बळ देण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरण हे आवश्यक होते. पार्श्वभूमीवर राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 कडे पाहिले पाहिजे.

संदर्भ ग्रंथ :


1. राष्ट्रीय शिक्षण धोरण दृष्टीक्षेपात (संकलन- संपादन: विजय प्रकाशन, नाशिक.)
2. http://www.maxmaharstra.com
3. दैनिक वृत्तपत्रे दिनांक 30.07.2020
4. http://niepid.nic.in_2020
5. भारतीय शिक्षण: सातत्य आणि स्थित्यंतरे.-डॉ. अशोक सिद्धेवाड


***

# भारताचे नवीन शैक्षणिक धोरण, २०२० आणि मध्यम वर्गीय मानसिकता

**प्रा. डॉ. सुर्यकांत लक्ष्मणराव शेळके**
राज्यशास्त्र विभाग, स्वामी विवेकानंद रात्र महाविद्यालय, डोंबिवली (पूर्व)

२९ जुलै २०२० रोजी भारताचे नवीन शैक्षणिक धोरण जाहीर करण्यात आले. या धोरणाच्या प्रस्तावनेत प्रारंभीच म्हटले आहे कि, मानवाला आपल्या पूर्ण क्षमता वापरता येण्यासाठी, समान आणि न्याय समाज विकसित करण्यासाठी तसेच राष्ट्रीय विकासाला चालना देण्यासाठी शिक्षण हा पाया आहे. भारताच्या सातत्यपूर्ण प्रगतीसाठी आणि समानता, राष्ट्रीय प्रगती, राष्ट्रीय एकात्मता आणि संस्कृतीचे जतन या क्षेत्रामध्ये वैश्विक पातळीवर नेतृत्व करण्यासाठी सर्वांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देणे महत्वाचे आहे. व्यक्ती, समाज, देश आणि जगाच्या हितासाठी आपल्या देश्यातील समृद्ध प्रतिभा आणि संसाधनांचा पुरेपूर वापर करण्याकरिता उच्च दर्जाचे सार्वभौमिक शिक्षण हा भविष्यासाठी सर्वात उत्तम मार्ग आहे.

नव्या शैक्षणिक धोरणाचे हे 'महान' उद्दिष्ट वरील शब्दात जाहीर करतानाच दुसरा परिच्छेद, भारताने २०१५ साली स्वीकारलेल्या शाश्वत विकास २०३० च्या कृती कार्यक्रमाच्या उद्दिष्ट ४ (SDG-4) चा हवाला देतो. अर्थातच २०३० चा कृती कार्यक्रम हा केवळ भारताचा कृती कार्यक्रम नसून तो युनोने स्वीकृत केलेला जगातील सर्व राष्ट्रांनी मान्य केलेला कार्यक्रम आहे. हा कार्यक्रम काय आहे ते आणि त्याचा इतिहास पहिला की, आज विविध राष्ट्रामध्ये आणि विविध पातळ्यावर सत्तेत प्रत्यक्ष अप्रत्यक्ष

सहभागी असणारा व सत्ता, संपत्ती व संसाधनाचा लाभार्थी असलेला ‘मध्यम वर्ग’ किती ढोंगी (Hypocrisy) आहे; याची प्रचीती येते. कारण हा वर्ग समाजाचा ‘धुरीण वर्ग’ असतो. आणि त्याच्या धारणात्मक धोरणावरच समाजाची वाटचाल सुरु असते. त्याची स्वीकृती आणि नकार यावरच कोणत्याही राष्ट्राची गतिशीलता अवलंबून असते.

**कृती कार्यक्रम २०३० ची १७ कलमे**

युनोने २०१५ साली स्वीकारलेल्या कृती कार्यक्रम २०३० ची १७ उद्दिष्ट्ये आहेत. १) जगातील दारिद्र्य संपविणे २) भूक शून्यावर आणणे ३) चांगले आरोग्य आणि राहणीमान ४) दर्जेदार शिक्षण ५) लैंगिक समानता ६) स्वच्छ पाणी आणि सांडपाणी व्यवस्थापन ७) सर्वाना परवडेल अशी ग्रीन उर्जा ८) प्रत्येकाला प्रतिष्ठेचा रोजगार आणि आर्थिक प्रगती ९) उद्दोग संशोधन आणि संसाधनांचा विकास १०) विषमता कमी करणे 11) शाश्वत शहरे आणि वस्त्या १२) जबाबदार उत्पादन आणि वापर १३) वातावरण बदल आणि प्रदूषण यावर उपाय १४) जलसृष्टी संवर्धन १५) भूसृष्टी संवर्धन १६) समता न्याय आणि समर्थ प्रशासन १७) यासाठी सर्वांचे सहकार्य इ. ही उद्दिष्ट्ये आणि भारतीय राज्यघटनेतील मुल्येविचार व शासनाची विविध धोरणे याचा परस्परसंबंध असून वरील कार्यक्रम जगासमोर मांडणाऱ्या युनोच्या नेतृत्वाला आणि तो स्वीकृत करणाऱ्या भारतातील राज्यकर्त्यांना विचारले पाहिजे की, गेल्या ७५ वर्षात एकातरी क्षेत्रात या दिशेने एकतरी ठोस पाउल पडले आहे काय? आणि येत्या काळात ही परिस्थिती सुधारेल काय ? याचा विश्वास देता येईल काय? आणि त्यासाठी मध्यमवर्गीय लोक पुढाकार घेतील काय? याचे ठाम उत्तर मिळणार नाही. आणि याला जबाबदार आहे धुरीण वर्ग असलेला मध्यमवर्ग व त्याची मानसिकता. रिओ परिषद, क्योटो परिषद व इतर अन्य परिषदा आणि शाश्वत विकास याचा अनुभव आपल्या गाठीशी आहे.

परिषदा पार पडल्या मात्र ज्याप्रमाणात त्या यशस्वी व्हायला हव्या तसे मात्र घडले नाही. वर्षागणिक पर्यावरणीय समस्या, प्रदूषण, आर्थिक विषमता, गरिबी-दारिद्रय, शिक्षण, आरोग्य, सामाजिक न्याय, उर्जा, इंधन इ. प्रश्न अधिकच गंभीर व उग्र बनले. कारण यासाठी समाजाचा धुरीण वर्ग असलेल्या मध्यम वर्गाने जी कृतीशील भूमिका घ्यायला हवी ती घेतली नाही. यासाठी मध्यमवर्गीय मानसिकता समजणे आवश्यक आहे.

**मध्यम वर्गाचा चेहरा**

साधारणपणे मध्यम उत्पन्न गट आणि मध्यम वर्ग हे दोन्ही शब्द बऱ्याचदा एकाच अर्थाने वापरले जातात. ते बरोबर नाही. भारतात १% लोकांकडे ४०% संपत्ती तर ५% लोकांकडे ६०% संपत्ती आहे. म्हणजे तळातले ४०% लोक हे दारिद्र्य रेषेखाली आहेत. वरचे ५% आणि तळातले ४०% यांच्या दरम्यान जो ५५% समाज आहे तो मध्यम उत्पन्न गटात येतो. त्यातही अनेक सामाजिक थर आहेत. मात्र हे थर म्हणजे मध्यमवर्ग नव्हे. मध्यमवर्ग ही जीवनशैली आहे. अर्थात उच्च शिक्षित, शहरात राहणारा, श्रीमंत, मोठी घरे असलेल्या, खाजगी किंवा सार्वजनिक क्षेत्रात उच्च पदावर राहून निर्णय प्रक्रियेत सहभागी असलेल्या व्हाईट कॉलर अर्थात पांढरपेशा लोकांना मध्यम वर्ग म्हटले जाते. बाजारात येणाऱ्या अत्याधुनिक साधनांचा वापर करणारा हा वर्ग असतो. हा वर्ग अल्प असला तरी तो सत्तेच्या परिघात वावरणारा असतो. त्याच्या मालकाशी, भांडवलादारशी, त्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या राज्यकर्त्याशी इमान राखून तो निर्णय घेतो. तो समाजिक समस्यावर चर्चा करतो, रिसर्च पेपर सादर करतो मात्र कृती अन्य लोकांनी करावी असा त्याचा व्होरा असतो. तो समाजाचे पुढारपण करतो तरी पण सामन्याशी फटकून राहतो. असा हा मध्यम वर्ग युरोपमध्ये औद्दोगिक क्रांती नंतर उदयाला आला असला तरी भारतात मात्र तो १९९० नंतर दखलपात्र झाला. ९० च्या दशकानंतर

भारताची जी वाटचाल आहे त्यासाठी मध्यमवर्गीय मानसच जबाबदार आहे.

**शिक्षण आणि मध्यम वर्ग**

भारतीय स्वातंत्र्यानंतर शिक्षण क्षेत्रात जोरदार प्रयत्न करण्यात आले. विशेष म्हणजे हे सर्व प्रयत्न सार्वजनिक क्षेत्रात करण्यात आले. कारण शिक्षणाच्या प्रारंभिक विकासासाठी मोठ्या गुंतवणुकीची गरज होती. शिक्षण हा नफ्याचा उद्दोग नव्हता. अर्थातच खाजगी विनाअनुदानित शिक्षण संस्था या काळात नव्हत्या. या काळात जो विकास झाला तो सार्वजनिक क्षेत्रात झाला. सार्वजनिक क्षेत्रातील विंकासाचा लाभ घेऊनच मध्यमवर्गाचा एक जाड थर या काळात तयार झाला. हा वर्ग सत्तेत सहभागी होऊ लागला. वर्षागणिक त्याचा सहभाग मुख्यप्रवाहात वाढत गेला. आणि ९० च्या दशकात मध्यमवर्गीय जीवनशैली आकाराला आली. ९० च्या दशकापर्यन्त भारतातील उद्दोजक जसा आंतरराष्ट्रीय स्पर्धेत स्वबळावर उतरण्या एवढा तगडा झाला आणि laissez fair चा नारा देऊ लागला तसा हा मध्यमवर्ग त्याला पाठींबा देत खाजगी क्षेत्राचे समर्थन करू लागला. यातूनच पुढे खा.उ.जा.चे धोरण अवतरले. खा.उ.जा. ही जागतिक अगतिकतेतून आलेली अपरिहार्यता असली तरी सार्वजनिक क्षेत्रावर पोसलेला, बलवान झालेला मध्यमवर्ग मात्र लगेच पलटी मारून आपली भाषा बदलला आणि खाजगीकरणातूनच विकास कसा शक्य आहे; याच्या वल्गना करू लागला. खाजगीकरणच सर्व समस्यावर कसा जालीम उपाय आहे; याची बतावणी करू लागला. हे त्याचे वर्गीय आणि न्यायिक चारित्र्य आहे.

**शिक्षणाचे व्यापारीकरण**

याच सुमारास थायलंड येथे आंतरराष्ट्रीय शिक्षण परिषद पार पडली. त्याचे यजमान पद जागतिक बँकेकडे होते. परिषदेचे नाव मोठे

गोंडस होते. 'Education for all'. इथे सर्व गरीब देशांना जागतिक बँकेने एक कार्यक्रम दिला. सरकारने शिक्षणावरचा खर्च कमी करावा, सबसिडी कमी करावी. ज्यांना परवडते त्यांनी खाजगी संस्थांत फी भरून शिकावे. गोरगरिबांना सर्व शिक्षा अभियानांतर्गत शिक्षण देण्यासाठी बँक मदत करेल. हा कार्यक्रम स्वीकारल्यानंतर भारतात दोन शिक्षण व्यवस्था उभ्या राहिल्या. पहिली गरिबांसाठी आणि दुसरी श्रीमन्तासाठी. पहिली व्यवस्था सरकार चालविल आणि दुसरी खाजगी संस्था चालवतील. परिणामी १९९० नंतर सरकारी शाळावरील खर्च सरकारने झपाट्याने कमी केला. खाजगी शिक्षणाचे पेव फुटले. पर्यायाने शिक्षणाचे बाजारीकरण झाले. सरकारी शिक्षणाची अवस्था अतिशय दयनीय असल्याने दर्जेदार शिक्षण सामान्यांना असून नसल्यासारखे आहे आणि खाजगी संस्थांची फी परवडत नसल्याने ते त्यांच्यासाठी नाहीच. आणि दर्जेदार शिक्षण नसल्याने या व्यवस्थेत त्यांना जागा नाही. त्याहीपुढे जाऊन दुर्गम भाग, वाड्या, वस्त्या, तांडे यांची अवस्था तर त्याहीपेक्षा बिकट आहे. समाजातील जो उपेक्षित वंचितांचा मागासप्रवर्ग आहे त्याचीही अवस्था यापेक्षा वेगळी नाही. परिणामी सामन्यांसाठी शिक्षणाची दारे बंद झाल्यात जमा आहे. अगदी कोविड काळातील शिक्षणाची अवस्था पहिली तरी भारतातील शिक्षणाची काय परिस्थिती लक्षात येते. कोविड काळातील शिक्षणाचा अभ्यास २०२२ मध्ये केला गेला. त्याचा अहवाल प्रसिद्ध झाला. भारतातील ७०% मुलांचे शिक्षण इंटरनेट सुविधेच्या अभावामुळे बंद होते; असे अहवाल सांगतो. वानगीदाखल हा अहवाल लक्षात घेतला तरी भारतातील शिक्षणाचे चित्र अधिक स्पष्ट होते.

खर तर अशा परिस्थितीत भारतासारख्या विकसनशील देशात शिक्षण जर सर्वापर्यंत पोहचावे असे वाटत असेल तर शिक्षण क्षेत्राचे सार्वजनिकरण झाले पाहिजे. शिक्षण क्षेत्राला निधीची कमतरता पडायला

नको म्हणून त्यासाठी भरीव मदत केली पाहिजे. तसाही शिक्षण हा भारतीय नागरिकांचा मुलभूत अधिकार ( कलम २१ अ ) असल्याने शिक्षणाची जबाबदार घेणे हे सरकारचे दायित्वच आहे. आणि यासाठी मध्यम वर्गाने भूमिका व पुढाकार घेणे आवश्यक आहे. परंतु तो तसे करत नाही. उलट तो भारतीय शिक्षणाची तुलना स्वीडन, फिनलंड, नार्वे, अमेरिका, जपान या देशातील शिक्षणाशी करतो. तसे शिक्षण भारतात मिळाले पाहिजे; अशी अपेक्ष करतो. अर्थात भारतात दर्जेदार शिक्षण मिळत नाही; हे तो कबुल करतो. अन्य प्रगत देशासारखे शिक्षण मिळाले पाहिजे; अशी अपेक्षा करतो. मात्र त्यासाठी शिक्षणाचे सार्वजनिकरण/ सार्वत्रीकरण झाले पाहिजे यासाठी तो पुढाकार घेत नाही. अशी या मध्यम वर्गाची दुट्टपी व दांभिक भूमिका आहे.

काळाच्या ओघात बदलत्या समाजाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी, नवी आव्हाने पेलण्यासाठी आणि समस्यावर मात करण्यासाठी शैक्षणिक धोरणाची नव्याने आखणी करणे आवश्यकच आहे. त्याची सुरुवातही झाली आहे. तथापि प्रश्न आहे तो नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीचा आणि या धोरणाच्या महान व उदात्त उद्दिष्ट व ध्येयपूर्तीचा. प्रक्रियेच्या पातळीवर सरकार हे धोरण रेटून नेईलही. मात्र एकूणच भारतीय समाज जीवनाचे वास्तव नाकारून नव्या शैक्षणिक धोरणाचा उदात्त हेतू साध्य करता येणार नाही. सरकारचे लक्ष समाजजीवनाच्या वास्तवाकडे वेधण्यासाठी समाजाचा एक जबाबदार घटक म्हणून मध्यमवर्गाने विविध पातळ्यावर भूमिका घेणे व प्रयत्न करणे आवश्यक आहे. खऱ्या अर्थाने तो समाजाचा चेहरा आहे. त्याच्या भूमिकेवरच नवीन शैक्षणिक धोरणाचे यशापयश अवलंबून आहे; एवढे मात्र नक्की.

***

# शाश्वत विकास व सर्वसमावेशक वृद्धी

**डॉ. (सौ.) मंजूषा राजेंद्र ठाकरे**
प्रोफेसर, अर्थशास्त्र विभाग प्रमुख
अण्णासाहेब गुंडेवार महाविद्यालय, काटोल रोड, नागपूर–१३

**प्रस्तावना–**

जागतिक अर्थव्यवस्थेत सर्वच देशांनी सर्वसमावेशक वृद्धीचे तत्व मान्य केले आहे. देश कोणत्याही प्रकारच्या अर्थव्यवस्थेचा भाग असो. परंतु विकासात्मक योजना राबविणे हा सर्वसमावेशक वृद्धीचा एक भाग मानला जातो. धोरणात्मक दृष्टिकोनातुन विचार केल्यास सर्वसमावेशक वृद्धी या तत्वाकडे शाश्वत विकासाचा एक निकष म्हणून बघितले जाते. जेव्हा आपण सर्वसमावेशक वृद्धी या संकल्पसनेचा विचार करतो तेव्हा आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत निर्माण होणाऱ्या उत्पन्नाच्या विषमतेवर सामाजिक दुर्लभ/दुर्लक्षित घटकांना विशेष महत्व दिले जाते. ही संकल्पना भौतिक व मानवी विकासावर निर्भर आहे. भौतिक विकासाचा विचार करताना देशातील प्रतीव्यक्ती म्हणजेच दरडोई उत्पन्न कसे वाढेल याचा प्रयत्न केला जातो. तर मानवी म्हणजेच सामाजिक विकासात मानवाच्या विकासाचा चहुबाजुंनी सांगोपांग विचार केला जातो. म्हणजेच शिक्षण, आरोग्य, मुलभूत सोयी–सुविधा, पर्यावरण समतोल इ. घटकांना त्यात समावेशीत केले जाते.

**उद्दिष्टे–**

१. विकासातुन वगळल्या गेलेल्यांचा वृद्धी प्रक्रियेच्या मुख्य प्रवाहात समावेश करणे.
२. उत्पादन, उत्पन्न, उपभोग व वितरणाच्या संदर्भात दुर्लक्षित तसेच दुर्बल घटकांना सामावुन घेणे.
३. कृषी क्षेत्र व बिगर कृषिक्षेत्रात काम करणाऱ्या श्रमिकांच्या उत्पन्नातील दरी कमी करणे.

४. पर्यावरणात संतुलन प्रस्थापित करणे.

**गृहिते—**

१. विकास प्रक्रियेत उपेक्षित घटक दुर्लक्षित आहे.

२. उत्पन्नात असमानता व पर्यावरण असंतुलन दिसून येते.

३. विकास प्रक्रिया दिर्घकालीन स्वरुपाची आहे.

## संशोधन पद्धती—

प्रस्तुत शोधनिबंधात दर्शविण्यात आलेली माहिती दुय्यम सामुग्रीच्या आधारावर मांडण्यात आलेली आहे. त्यासाठी प्रकाशीत व अप्रकाशीत स्वरुपातील वार्षिक अहवाल , मासिके, पाक्षिके इ. चा आधार घेण्यात आला आहे. तसेच सरकारी स्तरावर प्रकाशीत व अप्रकाशीत स्वरुपातील अहवालाचा आधार प्रस्तुत शोधनिबंधात करण्यात आला आहे.

**सर्वसमावेशक वृद्धिची ऐतिहासिक पार्श्वभूमी —**

आज विकासाच्या प्रक्रियेत मनुष्य साध्याकडे दुर्लक्ष करुन वृद्धीला महत्व देत आहे. १९६६ नंतर अमंलात आणलेल्या हरित क्रांतीचा समावेश ग्रामीण विकासाच्या दृष्टीने महत्वाचा होता. चौथ्या योजनेत आर्थिक स्वावलंबन साध्य करण्यासाठी स्थैर्यासह आर्थिक विकास हे उद्दिष्ट ठेवण्यात आले. ते भारतीय अर्थव्यवस्थेत समावेशक समाज निर्माण करण्यासाठी महत्वाचे होते. पाचव्या योजनेत भारतातील गरीब व श्रीमंत यामधील तफावत कमी करण्याचे प्रयत्न करण्यात आले. २० कलमी कार्यक्रम स्विकारुन दारिद्रय निर्मुलन व राहणीमानाचा दर्जा उंचावण्याचे प्रयत्न झाले. सहाव्या योजनेत त्यावर अधिक भर देण्यात आला. सातव्या योजनेपर्यंत भारताची नियोजनाची उद्दिष्टे ही साधारणपणे समावेशक वद्धीकडे नेणार होती. १९८० नंतर भारतात लघुउद्योग व कुटिरउद्योगांना प्रोत्साहन देऊन ग्रामीण व शहरी भागात रोजगारनिर्मितीला चालना देऊन ती शाश्वत विकासाला प्रेरणा देईल असा विश्वास होता. देशातील न्युनतम स्तरावर जीवन जगणाऱ्या व्यक्तीसाठी विमा योजना,

अंत्योदय योजना, आश्वासित रोजगार योजना, संजय गांधी निराधार योजना, इंदिरा आवास योजना, कामासाठी अन्न इ. योजनांचा समावेश होता. सरकारच्या रोजगार व दारिद्रय निर्मुलनाच्या योजना समावेशक वृद्धीच्या दृष्टीने अधिक महत्वाच्या समजल्या जातात. १९९१ नंतरच्या खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणावर आधारित नव्या आर्थिक धोरणांचा अर्थव्यवस्थेच्या कृषी, उद्योग व सेवा क्षेत्रावर अनुकूल व प्रतिकुल परिणाम झाला.

## सर्वसमावेशक वृद्धी व शाश्वत विकास —आंतरसंबंध

सर्वसमावेशक संकल्पना ही विकासात्मक दृष्दिकोनातुन साकार झालेली संकल्पना असली तरी उपेक्षित, दुर्लक्षित व निरंतर विकासाच्या मार्गातुन डावलेल्या घटकांना विकासाच्या प्रवाहात आणणे हेच खरे ब्रिदवाक्य सर्वसमावेशक वृद्धी सकल्पनेंतर्गत आहे. त्याअंतर्गत युनायटेड नेशन्स ने शाश्वत विकासासाठिची वर्ष २०१५ पासुन २०३० पर्यंत एकूण १७ जागतिक ध्येये निश्चित केली. २०१५ च्या ऑगस्ट मध्ये १९३ देशांनी खालील १७ ध्येयांना मान्यता दिली आहे, ती खालीलप्रमाणे—

1. दारिद्रय निर्मुलन — सर्वत्र, सर्व स्वरूपतील दारिद्रय / गरीबी नष्ट करणे.
2. भूक निर्मुलन — भूक नष्ट करणे, अन्नाची सुरक्षितता व सुधारीत पौष्टिकता साध्य करणे आणि शाश्वत शेतीची जाहिरात करणे.
3. चांगले आरोग्य — निरोगी आयुष्याची खात्री करून घेणे आणि सर्व वयोगटांमधील लोकांना स्वास्थ्य राखण्यास मदत करणे.
4. दर्जेदार शिक्षण — सर्वांसाठी सर्व—समावेशित व योग्य शिक्षणाची खात्री करून घेणे आणि सर्वांना आयुष्यभर शिक्षणाच्या सुसंधी मिळवून देण्यासाठी मदत करणे.
5. लैंगिक समानता — लैंगिक समानता साध्य करणे आणि सर्व महिला व मुलींना अधिकार देणे.

6. शुद्ध पाणी आणि आरोग्यदायक स्वच्छता – सर्वांसाठी पाणी आणि आरोग्यदायक स्वच्छता उपलब्ध असल्याची खात्री करून घेणे आणि त्याची व्यवस्था बघणे.
7. नूतनीकरण करण्याजोगी आणि स्वस्त ऊर्जा – सर्वांना स्वस्त, विश्वसनीय, शाश्वत आणि आधुनिक ऊर्जा उपलब्ध असल्याची खात्री करून घेणे.
8. चांगल्या नोकऱ्या आणि अर्थशास्त्र – सर्वांसाठी, कायम चालू ठेवलेली (सस्टेन्ड), सर्वसमावेशक व शाश्वत आर्थिक वाढ , पूर्ण आणि फलदायक कामधंदा / नोकरी आणि योग्य काम मिळवून देण्यास मदत करणे.
9. नवीन उपक्रम आणि पायाभूत सुविधा – विविध शब्दरचना आवश्यक: लवचिक पायाभूत सुविधा उभारणे, सर्वसमावेशक व शाश्वत उद्योगीकरण आणि भरभराटीस सहाय्य करणाऱ्या नवीन उपक्रमांना मदत करणे.
10. असमानता कमी करणे – सर्व देशांमधील व देशांची आपापसातील असमानता कमी करणे.
11. शाश्वत शहरे व वसाहती – शहरे व मानवी समाजांना सर्वसमावेशक, सुरक्षित, संवेदनक्षम आणि शाश्वत बनविणे.
12. उपलब्ध साधनांचा जबाबदारीपूर्वक वापर – साधनांचा शाश्वत उपभोग आणि उत्पादन नमुना याची खात्री करून घेणे.
13. हवामानाचा परिणाम – हवामानातील बदल आणि त्याचे परिणाम निराकारण करण्यासाठी त्वरीत उपाययोजना करणे.
14. शाश्वत महासागर – शाश्वत विकासासाठी महासागर, समुद्र, आणि सागरी साधने जतन करणे व त्यांचा सातत्याने वापर करणे.
15. जमिनीचा शाश्वत उपयोग – विविध शब्दरचना आवश्यक: जमिनीवरील पर्यावरण संस्थेचे रक्षण करणे, त्याची पुन:स्थापना

करणे, त्याचा शाश्वत वापर करण्यास मदत करणे, सातत्याने जंगलांची व्यवस्था बघणे, जंगले ओसाड होण्यापासून थांबवणे, जमिनीची धूप थांबवणे व धूप झालेल्या जमिनीची पुन:स्थापना करणे आणि जैवविविधतेची हानी होण्यापासून थांबवणे.

16. शांतता आणि न्याय – शाश्वत विकासासाठी शांतताप्रिय आणि सर्वसमावेशक समाजांना प्रोत्साहन देणे, सर्वांना न्याय मिळवून देणे, सर्व पातळींवर कार्यक्षम, जबाबदार आणि सर्वसमावेशक संस्था स्थापन करणे
17. शाश्वत विकासासाठी भागिदारी – शाश्वत विकासाची पूर्तता करण्याच्या पद्धती सामर्थ्यवान करणे आणि जागतिक भागिदारीमध्ये नवचैतन्य निर्माण करणे.

यामध्ये शाश्वत विकासासंदर्भातील १)आर्थिक प्रगती, कार्यक्षमता व स्थैर्य, २) पर्यावरणीय समस्या, संसाधने, कचरा ३) सामाजिक सबलीकरण, संघटन आणि समावेशकता, या तीन घटकांतील परस्परसंबंधांचे निराकरणही केले पाहिजे. शाश्वत विकास तीन मूलभूत स्तंभांवर आधारित आहे: सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरण. ब्रुंडलँड अहवाल जो शाश्वत विकासाच्या नावाने जगप्रसिद्ध झाला. या अहवालात गरिबी कमी करणे, जागतिक लिंग समानता आणि संपत्ती पुनर्वितरण या स्वरूपात मानवी संसाधनांच्या विकासाचे द्योतक असल्याचे वर्णन केले आहे. शाश्वत विकासाचा गाभा म्हणजे सर्वसमावेशक वृद्धी होय. संपत्ती व समृद्धी वितरणात समानता असेल तरच आर्थिक वृद्धी शक्य होते. आणि हीच आर्थिक वृद्धी समावेशक केल्यास विकास शाश्वत बनतो. कल्याणकारी राज्याच्या निर्मितीसाठी सर्वसमावेशक वृद्धी अत्यंत महत्वपूर्ण तत्व मानले जाते. म्हणूनच अकराव्या पंचवार्षिक योजनेत सर्वसमावेशक वृद्धी या उद्दिष्टाकडे लक्ष केंद्रित करण्यात आले होते.

दारिद्र्यात घट होण्यासाठी सर्वसमावेशक वृद्धीची गरज असते.

**सेन अमर्त्यसेनचा सर्वसमावेशक वृध्दीच्या संदर्भात सामान्य कल्याणाचा निकष अत्यंत महत्वपूर्ण ठरतो. आर्थिक कल्याणाबरोबर गरिबांची खरेदीशक्ती वाढल्यास सामाजिक कल्याण साधुन आपोआप समावेशक वृद्धी घडून येईल असे ते म्हणत.**

'विकास साधताना विकासाचा लाभ वेगवेगळया परिस्थितीत राहणाऱ्या लोकांना मोठया प्रमाणात झाला पाहिजे.'**भारतीय नियोजन मंडळाचे तत्कालीन उपाध्यक्ष 'समाजातील सर्व प्रकारच्या उत्पन्न घटकातील लोकांचा उत्पादनातील सहभाग, विकास व वितरणातील समानता महत्वाची असते.'** सर्वसमावेशक वृद्धि ही संकल्पना निरंतर चालणारी दिर्घकालीन प्रक्रिया आहे. उत्पन्नाचे समान वितरणावर लक्ष केंद्रित करण्यापेक्षा उत्पादक रोजगार म्हणजेच कार्य करण्याची इच्छा असणाऱ्या बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करुण देणे गरजेचे असते. जेणेकरुन दुर्लक्षित लोकांना रोजगार उपलब्ध होऊन त्यांच्या उत्पन्नात वाढ होईल. श्रमशक्तीचा विकास प्रक्रियेतील सहभाग जेवढा जास्त तेवढा समावेशक वृद्धीचा मार्ग अधिक प्रबळ होताना दिसतो.

विकास प्रक्रियेत मनुष्याचा सर्वांगीण विकास अत्यंत महत्वपूर्ण मानला गेला आहे. म्हणजेच मानवाची सातत्याने होणारी प्रगती आवश्यक आहे. आर्थिक विकासातुन मानवी विकासाचे उद्दिष्ट मान्य झाले आहे. मानवी क्षमतेच्या विकासासाठी शिक्षण, आरोग्य व उत्पन्नवाढीचे प्रयत्न आवश्यक आहे.

## समावेशक वृद्धीचे निकष

### १.दारिद्रय निर्मुलन

अर्थव्यवस्थेतील दारिद्रय निर्मुलनासाठी शेती व उद्योग क्षेत्रांचा मानवातील कौशल्याच्या आधारे रोजगारात वाढ घडवून आणता येते. ज्यायोगे मानवी कौशल्य विकसित होऊन दारिद्रयातील लोकसंख्येचे आकारमान व प्रमाण कमी होईल. आंतरराष्ट्रीय प्रमाणकाप्रमाणे आंतरराष्ट्रीय स्तरावर ४० टक्के लोकसंख्या दारिदयरेषेखाली जीवन जगत

आहे. दारिद्रयाच्या सापेक्ष व निरपेक्ष प्रकारचा विचार करता भारताला समावेशक धोरणाची अत्यंत गरज आहे.

२. **जीवनावश्यक वस्तुंची उपलब्धता—**

शाश्वत विकास साध्य करण्यासाठी समाजातील सर्व लोकांना वाजवी राहणीमानाचा दर्जा प्राप्त करुन देणे, माफक किंमतीत जीवनावश्यक वस्तुंची उपलब्धता करुन देणे सरकारचे मूलभूत कर्तव्य आहे. म्हणून समावेशक वृद्धीच्या तत्वात जीवनावश्यक वस्तूंच्या उपलब्धतेच्या निकषास महत्व आहे. अकराव्या योजनेत सर्वसमावेशक वृद्धी तत्वांची अंमलबजावणी करताना जीवनावश्यक वस्तुंच्या उपलब्धतेकडे लक्ष पुरविण्याचे ठरविले. परंतु भारतासारख्या जास्त लोकसंख्येच्या देशात या तत्चाची उपयुक्तता विचारात घेता शासनाच्या विधायक दृष्टिकोन महत्वाचा आहे.

३.**रोजगारनिर्मिती—**

उत्पादक रोजगारनिर्मिती करणे आवश्यक असते. त्यामुळे वंचित लोकांच्या उत्पन्नात वाढ होते. श्रमशक्तीचा विकास पक्रियेतील सहभाग हा समावेशक वृध्दीचा कार्यक्षम मार्ग असतो. भारतात अनेक योजनांद्वारा रोजगारनिर्मितीचे प्रयत्न होत आहे. समावेशक वृद्धीकडे वाटचाल करणाऱ्या योजनाकारांचा हा द्दष्टिकोन योग्य व महत्वाचा आहे.

४.**मागणीची कमतरता—**

सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ डॉ. अमर्त्य सेन यांनी शासनाने व्यापक प्रमाणात श्रीमंतांची श्रीमंती व गरिबांची गरिबी कमी करण्याचे प्रयत्न केले पाहिजे. तरच समावेशक वृद्धी शक्य होईल. भारतात या तत्वानुसार गरिबांची मागणी वाढविण्यासाठी त्यांचे दरडोई उत्पन्न वाढविण्यावर अधिक भर देण्यात येत आहे. तसेच गरिबांची क्रयशक्ती वाढवुन मागणीची कमतरता दूर करणे गरजेचे आहे. अलीकडे महिलांचा कामकाजातील वाढता सहभाग लक्षात घेऊन त्यांच्या विकासासाठी धोरण ठरविणे गरजेचे आहे. त्यामुळे स्त्री—पुरुष यांच्यातील आर्थिक व

सामाजिक विषमता कमी होऊन सर्वसमावेशक विकासाला चालना मिळेल. अर्थात, भारतात अधिक प्रमाणात स्त्रियांचे सामाजिक व आर्थिक सबलीकरण वाढले पाहिजे.

**५.सार्वजनिक वितरण अधिक व्यापक करणे–**

स्वातंत्र्यानंतर भारताने दारिद्रय निर्मुलनाचा एक विशेष कार्यक्रम म्हणून सार्वजनिक वितरण प्रणालीचा स्वीकार केला. सन १९६५ ते १९९० पर्यंत गरिबांची गरिबी कमी करण्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थेने महत्वाचे कार्य केले. १९९१ नंतर आर्थिक सुधारणांच्या धोरणाने सार्वजनिक वितरण प्रणालीचे महत्व व उपयुक्तता कमी होत आहे. यास अनेक घटक जबाबदार आहेत. मात्र भारतातील श्रीमंत व गरीब यांच्यामधील आर्थिक तफावत कमी करण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्था कार्यक्षमपणे राबविणे आवश्यक आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक व्यापक व कार्यक्षम होणे गरजेचे आहे.

**६.साक्षरता वाढविणे–**

उच्च शिक्षणात दूरगामी बदल करणे गरजेचे आहे. प्राथमिक स्तरावरील मुलांच्या गळतीचे प्रमाण कमी करणे, व्यावसायिक शिक्षणाचा विस्तार करणे, डोंगराळ व आदिवासी विभागात अधिक शिक्षण केंद्रे उभारणे, उच्च शिक्षणात दूरगामी बदल केले पाहिजेत. तरच समोशक वृद्धकडे टाकलेले अचूक व महत्वपूर्ण पाऊल होईल.

**७.बॅंकांचा पतपुरवठा वाढविणे–**

समावेशक वृद्धीच्या दृष्टीने, बॅंक पतपुरवठयाच्या दृष्टीने अपात्र मानल्या जाणाऱ्या छोटया उत्पादकांना पतपुरवठा व्हावा म्हणून बॅंकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले होते. परंतु ते फारसे सफल झाल्याचे दिसून येत नाही.

**८.इतर उपाययोजना–**

भारतातील बालमृत्युच्या प्रमाणात घट घडवून आणणे, मातांच्या आरोग्यात सुधारणा करणे व लिंग समानता प्रस्थापित करणे आवश्यक आहे. ग्रामीण भागात प्राथमिक सुविधांची वाढ करणे, जनसामान्यांच्या

मुलभूत गरजा पूर्ण करणे, तसेच त्यांना आरोग्य व शिक्षणाच्या सुविधा माफक खर्चात उपलब्ध करुन देणे. समावेशक वृद्धीत न्यायाची कल्पना अंतर्भुत आहे.

**निष्कर्श–**

भारतात समावेशक वृद्धीची कल्पना निराशाजनक आहे. विकास हा अधिक मानवीय जीवनाकडे वाटचाल करणारा असला पाहिजे. परंतु भारतात आतापर्यंत समावेशक वृद्धी फारशी घडून आली नाही. शासन, लोकप्रतिनिधी, विविध पातळींवरील कर्मचारी वर्ग, निरनिराळया विकास योजनांची अंमलबजावणी किती प्रामाणिकपणे आणि कार्यक्षमतेने करतो यावर समावेशक वृद्धीचे भवितव्य अवलंबुन आहे.

**उपाययोजना–**

गरिबांना दारिद्र्यातुन मुक्ती तेव्हाच मिळु शकेल जेव्हा त्यांच्या कौशल्यात वाढ होईल, आणि कौशल्यात तेव्हाच वाढ होऊ शकते जेव्हा गरिबांच्या सुप्त गुणांना वाव मिळेल. ज्यामुळे त्यांच्या दरडोई उत्पन्नात वाढ होऊन आर्थिक विकासाला गती मिळेल. हाच विकास काही कालावधीनंतर शाश्वत विकास म्हणून गणला जातो. याच शाश्वत विकासाचा कृषी, उद्योग व सेवा क्षेत्रावर अनुकूल परिणाम होऊन अर्थव्यवस्था सुदृढ होण्यास मदत होते.

## संदर्भ (संपादन)


1. http://www.un.org/sustainabledevelopment/sustainable-development-goals/
2. http://www.un.org/sustainabledevelopment/sustainable-development-goals/
3. भारतीय अर्थव्यवस्था– प्रा. श्रीधर देशपांडे, डॉ. विनायक देशपांडे, हिमालय पब्लिकेशन, प्रथम आवृत्ती २०१०
4. भारतीय अर्थव्यवस्था– प्रा. एन.एल.चव्हाण, प्रशांत पब्लिकेशन, जळगांव, २००९


***

# सामाजिक बाजारमंच

## (Social Stock Exchange)


## डॉ. उदय खंडू टेके

सहयोगी प्राध्यापक, वाणिज्य विभाग म.स.गा.महाविद्यालय,मालेगाव कॅम्प (नाशिक)



**गोषवारा**

भारतातील सामाजिक वंचित आणि गरीब वर्गांसाठी कार्यरत असणाऱ्या सेवाभावी संस्थांना निधीची उपलब्धता न होणे ही मोठी समस्या भेडसावत आहे. यावर उपाय म्हणून भारतीय अर्थ मंत्रालयाने या सेवाभावी संस्थांना निधि उपलब्ध व्हावा यासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण केली आहे, ती यंत्रणा म्हणजेच सामाजिक बाजारमंच होय. सामाजिक बाजारमंच हे एक व्यासपीठ आहे ज्यावर सामाजिक उपक्रम, स्वयंसेवक गट आणि कल्याणकारी संस्था सूचीबद्ध केल्या जातील जेणेकरून त्या भांडवल उभारू शकतील. या सामाजिक बाजारमंचाने सेवाभावी संस्थांचे लक्ष वेधले आहे. या निर्णयामुळे सेवाभावी संस्था,सामाजिक उद्योजक गुंतवणूकदारांना आकर्षित करू शकतात. या बाजारमंचामुळे सामाजिक उपक्रमामध्ये भांडवल गुतवणूक करू इच्छिणारे गुंतवणूकदार त्यांचे भांडवल अशा उपक्रमांमध्ये गुंतवतात ज्यामुळे सामान्य जनतेला आरोग्यसेवा, परवडणारी घरे आणि दर्जेदार रोजगार उपलब्ध होतील. तथापि, सामाजिक बाजारमंच म्हणजे काय हे समजून घेण्याआधी, **'सामाजिक उपक्रम'** आणि **'प्रभाव गुंतवणूक'** या दोन संज्ञा समजून घेणे आवश्यक आहे. सामाजिक उपक्रम हा एक अर्थप्राप्ती करणारा व्यवसाय आहे, परंतु त्याचे प्राथमिक उद्दिष्ट सामाजिक उद्दिष्ट साध्य करणे आहे.

हे उपक्रम नफ्याकडे दुर्लक्ष करत नाहीत परंतू समाजसेवा हे त्याचे प्राथमिक ध्येय आहे. सामाजिक उद्दिष्टांचा पाठपुरावा करताना, सामाजिक उपक्रम नफ्याकडे दुर्लक्ष करत नाहीत,कारण या उपक्रमाचे अस्तित्व टिकवण्यासाठी उत्पन्न आवश्यक असते.त्यामुळे असे म्हणता येते की, सामाजिक उपक्रम देखील अत्यंत फायदेशीर असू शकतो. प्रभाव गुंतवणूक म्हणजे सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय घटकावर एक सकारात्मक प्रभाव टाकणाच्या उद्देशाने व्यवसायांमध्ये केलेली गुंतवणूक होय.

**प्रस्तावना**

पारंपारिक भाग बाजाराच्या अगदी विरूद्ध संकल्पना म्हणजे सामाजिक बाजारमंच होय. सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थांच्या वित्तीय साधनांचा व्यापार करण्यासाठीचे हे एक व्यासपीठ आहे. सामाजिक बाजारमंचाद्वारे गुंतवणूकदारांना सामाजिक संस्थांचे भाग व वित्तीय साधने खरेदी विक्री करण्याचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाते. सामाजिक बाजारमंचामध्ये वित्तीय साधनांचे मूल्य संस्थेच्या किंवा कंपनीच्या समाजावरील सामाजिक प्रभावावर अवलंबून असते. सामाजिक बाजारमंच म्हणजे काय हे समजून घेण्यापूर्वी, दोन संज्ञा ‘सामाजिक उपक्रम’ आणि ‘प्रभाव गुंतवणूक’ समजून घेणे आवश्यक आहे.

**सामाजिक उपक्रम/संस्था**

सामाजिक उपक्रम हा महसूल निर्माण करणारा व्यवसाय असतो, परंतु त्याचे मुख्य उद्दिष्ट काही सामाजिक हेतु साध्य करणे हे असते. या संस्था नफ्याकडे दुर्लक्ष करत नाहीत, तर समाजसेवा हे त्याचे प्राथमिक ध्येय असते. सामाजिक उद्दिष्टांचा पाठपुरावा करताना, या उपक्रमांना नफ्याकडे दुर्लक्ष करून चालत नाही, कारण यांना कायमस्वरूपी अस्तित्व टिकविण्यासाठी नफा आवश्यक असतो. त्यामुळे असे म्हणता येईल की,

सामाजिक उपक्रम देखील अत्यंत फायदेशीर असू शकतो. या संस्थांनी निर्माण केलेला नफा गुंतवणूकदारांना लाभांश देण्यासाठी वापरला जात नाही, परंतु त्यांच्या सामाजिक कार्यक्रमांमध्ये पुन्हा गुंतवला जातो. नफ्यामुळे सामाजिक उपक्रमांना दीर्घकालीन योजनांची अंमलबजावणी करण्यास आणि आवश्यक तंत्रज्ञान व व्यावसायिकता उपक्रमात आणण्यास मदत मिळते. नफ्यामुळे सामाजिक उपक्रमाचे अस्तित्व टिकून राहते व त्यांचे धर्मादाय संस्थांपासूनचे वेगळेपण निश्चित करते.

सामाजिक क्षेत्राची व्याप्ती मोठी आहे, ज्यामध्ये विविध संस्थांचा समावेश होतो. भारतामध्ये २ दशलक्षाहून अधिक सामाजिक उपक्रम/संस्था आहेत. ज्या नफ्यापेक्षा सामाजिक किंवा पर्यावरणीय ध्येयाला प्राधान्य देतात, या संस्थाद्वारे मागास समुदायांना थेट रोजगार आणि कौशल्य प्रशिक्षण उपलब्ध करून दिले जाते. त्यांच्या अर्धवेळ कर्मचाऱ्यांपैकी ६५% महिला आहेत. परंतु आपल्या अर्थव्यवस्था व उद्योजकता वाढीमध्ये त्यांचे योगदान योग्यरित्या मान्य केले जात नाही.

सामाजिक उपक्रमांचे अनेक प्रकार अस्तित्वात आहेत, त्यांचे व्यापकपणे **ना-नफा संस्था (NPO)** आणि **नफ्यासाठी सामाजिक उपक्रम (FPEs)** मध्ये वर्गीकरण केले जाऊ शकते. NPO ची नोंदणी सामान्यतःबिगर-सरकारी संस्था, कंपनी कायदा, ट्रस्ट किंवा सोसायटीच्या कलम ८ अंतर्गत नोंदणीकृत कंपन्या म्हणून केली जाते. FPE खाजगी मर्यादित कंपन्या, भागीदारी किंवा एकल व्यापारी संस्था असू शकतात.

**प्रभाव गुंतवणूक**

सामाजिक उपक्रमांद्वारे केल्या जाणाऱ्या गुंतवणुकीचे वर्णन एका वेगळ्या शब्दाने केले जाते ज्याला **प्रभाव गुंतवणूक** म्हणतात. प्रभाव गुंतवणूक म्हणजे सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय घटकावर सकारात्मक प्रभाव टाकणाऱ्या व्यवसायांमध्ये केलेली गुंतवणूक होय. या

गुंतवणुकीतून नफ्याबरोबरच जनसामान्यांना शिक्षित करणे, त्यांच्यामध्ये सामाजिक प्रश्नाबाबतीत जागरुकता निर्माण करणे अशा स्वरुपात मोठ्या प्रमाणात परतावा मिळतो. प्रभाव गुंतवणूक समजून घेण्याचा एक मार्ग म्हणजे सामाजिकदृष्ट्या फायदेशीर वस्तू आणि सेवांसाठी वित्तपुरवठा उपलब्ध करून देणे होय. या गुंतवणूकीतून जगातील सर्वात गंभीर सामाजिक आणि पर्यावरणीय समस्यांना तोंड देण्यासाठी खाजगी भांडवल आणि बाजार-आधारित व्यवस्थेद्वारे समाधान शोधण्याचा प्रयत्न केला जातो. २००७ पासून प्रभाव गुंतवणूक ही मोठ्या प्रमाणात वाढत आहे. प्रभाव गुंतवणुकीच्या कल्पनेमध्ये सामाजिकदृष्ट्या फायदेशीर वस्तू आणि सेवा (उदा. गृहनिर्माण, आरोग्य, शिक्षण आणि वीज) या मध्ये बदल करण्याची क्षमता असणाऱ्या उपक्रमामध्ये गुंतवणुकीसाठी अर्थसहाय्य केले जाते. अशी गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी सामाजिक जाणीव असणाऱ्या दूरदर्शी गुंतवणूकदारांची आवश्यकता असते. ग्लोबल इम्पॅक्ट इन्व्हेस्टिंग नेटवर्क (“GIIN”), या सामाजिक अर्थपुरवठ्याच्या क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थेने प्रभाव गुंतवणुकीची व्याख्या पुढील प्रमाणे केली आहे.

‘प्रभाव गुंतवणूक म्हणजे आर्थिक परताव्यासह सामाजिक आणि पर्यावरणीय प्रभाव निर्माण करण्याच्या उद्देशाने कंपन्या, संस्था आणि निधीमध्ये केलेली गुंतवणूक. प्रभाव गुंतवणूक उदयोन्मुख आणि विकसित अशा दोन्ही बाजारपेठांमध्ये केली जाऊ शकते आणि परिस्थितीनुसार या गुंतवणुकीवरील परतावा बाजार दर अथवा बाजार दरापेक्षा कमी असू शकतो.’

**सामाजिक बाजारमंच**

**(Social Stock Exchange)**

सोशल स्टॉक एक्सचेंज (SSE) हे एक व्यासपीठ आहे ज्यावर सामाजिक उपक्रम, स्वयंसेवक गट आणि कल्याणकारी संस्था सूचीबद्ध केल्या जातात जेणेकरून त्या भांडवल उभारू शकतील. या संस्थांना

भांडवल उभारणीचा मार्ग दाखवणारी ही एक क्रांतिकारी संकल्पना आहे, ज्यामुळे या संस्था भांडवलासाठी गुंतवणूकदारांच्याकडे जाऊ शकतात. देशाच्या मुख्य समस्यांपैकी एक म्हणजे गरिबी दूर करणे आणि आर्थिक वाढीचे फायदे देशातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत हस्तांतरित करणे होय. हे काम सामाजिक उपक्रम/संस्था करतात,परंतू त्यांची मुख्य समस्या भांडवल उभारण्याची असते व ही समस्या सोशल स्टॉक एक्सचेंज द्वारे सोडवली जाते.

२०१९-२० या आर्थिक वर्षात अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी त्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणात सोशल स्टॉक एक्सचेंज स्थापन करण्याचा प्रस्ताव ठेवला होता. त्यानंतर सेबीने स्थापन केलेल्या कार्यगटाने विना नफा संस्थांना बाँड जारी करून सोशल स्टॉक एक्स्चेंजवर थेट सूचीबद्ध करण्याची शिफारस केली होती. त्यानंतर सप्टेंबर २०१९ मध्ये सेबीने इशरत हुसैन यांच्या अध्यक्षतेखाली सामाजिक स्टॉक एक्स्चेंजवर एक कार्यकारी गट स्थापन केला होता, ज्यामध्ये समाज कल्याणासाठी काम करणारे लोक, वित्त मंत्रालयाचे प्रतिनिधी, स्टॉक एक्सचेंज आणि NGO यांचा समावेश होता. या बाजारात सामाजिक उपक्रमांना त्यांच्या प्रतिभूती किंवा इतर आर्थिक साधनांची नोंद करून भांडवल उभारणी करता येईल.त्यामुळे त्यांना कार्यवृद्धीसाठी/भांडवल उभारण्यासाठी अनुदान किंवा देणग्यांसारख्या तदर्थ निधीवर अवलंबून राहण्याची गरज नाही. या बाजार मंचामुळे सामाजिक विचारसरणीच्या गुंतवणूकदारांना त्यांच्या गुंतवणुकीच्या पोर्टफोलिओमध्ये वैविध्य आणणे आणि देशात मजबूत सामाजिक सिक्युरिटीज मार्केट विकसित करणे शक्य होईल.

**सामाजिक स्टॉक एक्सचेंजची कार्यपद्धती**

सामाजिक स्टॉक एक्सचेंजमधून ना-नफा संस्था (NPO) आणि नफ्यासाठी सामाजिक उपक्रम (FPEs) या दोन प्रकारच्या संस्था निधीची उभारणी करू शकतात.

**ना-नफा संस्था (NPO)** मध्ये ट्रस्ट कायदा १८८२ अंतर्गत नोंदणीकृत धर्मादाय ट्रस्ट, राज्याच्या सार्वजनिक न्यास कायद्यांतर्गत नोंदणीकृत धर्मादाय ट्रस्ट, सोसायटी नोंदणी कायदा, १८६० अंतर्गत नोंदणीकृत धर्मादाय संस्था, कंपनी कायदा, २०१३ च्या कलम ८ अंतर्गत समाविष्ट केलेली कंपनी व भविष्यात SEBI द्वारे निर्दिष्ट केल्याप्रमाणे इतर कोणत्याही संस्था समाविष्ट होतात.या संस्थांना निधी उभारण्यासाठी नोंदणीसाठी किमान आवश्यकता पूर्ण करून प्रथम या एक्सचेंजवर नोंदणी करावी लागेल.

नोंदणीनंतर या संस्था सार्वजनिक इश्यू किंवा खासगी प्लेसमेंटच्या माध्यमातून **'झिरो कूपन झिरो प्रिन्सिपल'** सारखी साधने प्रसृत करून निधी उभारणीची प्रक्रिया सुरू करू शकतात. सध्या 'झिरो कूपन झिरो प्रिन्सिपल' प्रसृत करण्यासाठी किमान इश्यू आकार १ कोटी आणि सबस्क्रिप्शनसाठी प्रत्येकी किमान २ लाख रुपये मर्यादा निर्धारित केली आहे. ना नफा-ना तोटा तत्त्वावर काम करणाऱ्या बंगळुरू स्थित **'उन्नती फाउंडेशन'**ने २० नोव्हेंबर २०२३ रोजी राष्ट्रीय शेअर बाजार आणि मुंबई शेअर बाजारातील 'एस.एस.ई.' मंचावर त्यांची नोंदणी केली आहे. इन्फोसिस फाउंडेशन, एक्सॉनमोबिल, बोईंग, एमयूएफजी बँक आणि एचडीबी फायनान्सियल सर्व्हिसेस हे उन्नती फाउंडेशनचे सर्वोच्च देणगीदार आहेत. **म्युच्युअल फंड** योजनांद्वारे सुद्धा NPO देणगी प्राप्त करू शकतील. **भविष्यात SEBI द्वारे निर्दिष्ट केलेले इतर** कोणत्याही माध्यमाद्वारे या संस्था निधी प्राप्त करू शकतात.

**नफ्यासाठी सामाजिक उपक्रम (FPEs)** सम भाग व कर्जरोख्याद्वारे निधीची उभारणी करू शकतात.

**सोशल स्टॉक एक्सचेंजचे महत्त्व**

- UNDP चा अंदाज आहे की २०३० पर्यंत UN शाश्वत विकास उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी भारताला प्रतिवर्ष USD १ ट्रिलियनची गरज आहे आणि प्रतिवर्षी USD ५६० अब्ज निधी कमी पडत आहे. एवढा मोठा निधी सरकार एकत्रित करू शकत नसल्यामुळे, खाजगी क्षेत्र आणि उच्च मिळकत गटातील व्यक्तीकडून निधी तयार करण्यासाठी त्यांच्याकडून अपेक्षा करू शकते त्यासाठी सोशल स्टॉक एक्सचेंजची भूमिका महत्वाची ठरू शकते.
- सामाजिक उपक्रम, विकास क्षेत्रातील संस्था, गैर-नफा, स्वयंसेवी संस्था आणि नागरी संस्था (CSOs) समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्याचे उद्दिष्ट ठेवतात. परंतू हा हेतू साध्य करण्याच्या त्यांच्या प्रयत्नांना भांडवलाच्या कमतरतेमुळे अडथळा येतो. सोशल स्टॉक एक्सचेंज (SSE) मुळे त्यांची ही समस्या दूर होण्यास मदत मिळू शकते.
- सोशल स्टॉक एक्सचेंज (SSE) मुळे ना-नफा संस्था आणि सामाजिक कल्याणकारी संस्थांना पारदर्शक इलेक्ट्रॉनिक प्लॅटफॉर्मवर सामाजिक भांडवलाचे फायदे मिळू शकतील. सोशल स्टॉक एक्स्चेंजच्या कामकाजामुळे, ना-नफा क्षेत्राला पोषक वातावरण तसेच त्याच्या क्षमतांचा पुरेपूर वापर करण्याची संधी मिळेल.
- सोशल स्टॉक एक्सचेंजवर, सूचीबद्ध संस्थेचे मूल्य त्याच्या सामाजिक प्रभावाशी जोडले जाईल. सूचीबद्ध संस्थेने समाजावर सकारात्मक रीतीने टाकलेल्या सामाजिक प्रभावाच्या आधारावर

गुण (पॉईंट्स) दिले जातील, सूचीबद्ध संस्थेने जितका अधिक सामाजिक प्रभाव निर्माण केला तितके जास्त गुण त्यांना मिळतील त्यामुळे त्यांचे मूल्य वाढेल आणि त्यामुळे त्यांना जास्त निधी मिळेल.

- सोशल स्टॉक एक्सचेंज अर्थव्यवस्थेतील सामाजिक उपक्रमांच्या योगदानाबद्दल सर्व भागधारकांमध्ये, विशेषत: निधी देणारे, सूचीबद्ध संस्था आणि ग्राहकांमध्ये जागरूकता निर्माण करेल. या एक्सचेंजमुळे सामाजिक वित्त व्यवहार प्रमाणित होतील, या क्षेत्राच्या गरजा आणि आव्हानांबद्दल जागरूकता निर्माण होईल तसेच सामाजिक भांडवल विकसित करण्यासाठी कार्यपद्धती देखील निर्माण होईल.
- सोशल स्टॉक एक्सचेंजमुळे सामाजिक संस्था व गुंतवणूकदारांसाठी आवश्यक सामाजिक गुंतवणूक इकोसिस्टम तयार होईल ज्याचा उद्देश नफा वृद्धीच्या संधी शोधत जास्तीत जास्त सकारात्मक सामाजिक प्रभाव निर्माण करणे आणि पर्यावरणीय, सामाजिक संतुलन साध्य करणे शक्य होईल.

**भारताच्या संदर्भात सामाजिक स्टॉक एक्सचेंज**

- भारतातील सामाजिक उपक्रमांची परिसंस्था वेगाने वाढत आहे, अलीकडेच ब्रिटीश कौन्सिल इंडियाने सामाजिक उपक्रमांच्या स्थितीवर केलेल्या सर्वेक्षणात असे आढळून आले आहे की,५७ टक्के संस्थांना कर्ज किंवा समभागाद्वारे भांडवल उभारणी हा विकासासाठी आणि सामाजिक काम करण्यासाठी मोठा अडथळा वाटत आहे. सामाजिक उपक्रम आणि गुंतवणूकदारांना एकाच व्यासपीठावर म्हणजेच सोशल स्टॉक एक्सचेंजवर आणून हा अडथळा दूर केला जाऊ शकतो.

- सामाजिक स्टॉक एक्सचेंज केवळ सामाजिक उपक्रमांना भांडवल उपलब्ध करून देणार नाही, तर भांडवल उभारणीच्या प्रक्रियेचे प्रमाणीकरण करून त्यांच्यासाठी भांडवल उभारणी प्रक्रिया खूपच सोपी,सुटसुटीत व किफायतशीर करेल.
- ब्रुकिंग्स इंडियाच्या सर्वेक्षणानुसार, भारतातील २७ टक्क्यांहून अधिक प्रभाव गुंतवणूकदारांना उच्च दर्जाच्या गुंतवणुकीच्या संधी शोधणे हे आव्हान वाटते. ग्लोबल इम्पॅक्ट इन्व्हेस्टिंग रेटिंग सिस्टम आणि इम्पॅक्ट रिपोर्टिंग आणि इन्व्हेस्टमेंट स्टँडर्ड्स यासारख्या साधनांची उपलब्धता असूनही, गुंतवणूक आणि सामाजिक परताव्याच्या प्रभावाचे मूल्यांकन आणि निरीक्षण करणे ही एक अवघड समस्या आहे. सामाजिक स्टॉक एक्सचेंजद्वारे, प्रभावाचे निरीक्षण आणि मूल्यांकन करण्यासाठी एक पद्धती विकसित केली जाईल. सामाजिक स्टॉक एक्सचेंजवर प्रवेश करणाऱ्या सामाजिक उपक्रमांची नोंद करण्यापूर्वी त्यांच्या सामाजिक कार्यांची तपासणी केली जाईल, अशा प्रकारे गुणवत्ता सुनिश्चित होईल आणि यापैकी काही समस्या दूर होतील. थोडक्यात, सामाजिक स्टॉक एक्सचेंजवर सूचीबद्ध होणे हे सामाजिक उपक्रमासाठी गुणवत्तेवर शिक्कामोर्तब करेल आणि गुंतवणूकदारांमध्ये विश्वास निर्माण होईल.
- ब्रुकिंग्स इंडियाच्या दुसऱ्या  सर्वेक्षण अहवालात असे म्हटले आहे की, ४४ टक्क्यांहून अधिक प्रभावशाली गुंतवणूकदारांना गुंतवणूक कधी काढून घ्यावी हे समजत नाही. त्यामुळे गुंतवणूकदार गुंतवणुकीच्या बाबतीत जास्त सावध राहतील, परिणामी निव्वळ गुंतवणूक कमी होईल. या अडचणीवर उपाय म्हणजे सामाजिक स्टॉक एक्सचेंज, कारण सामाजिक स्टॉक एक्सचेंज गुंतवणूकदारांना बाहेर कधी जायचे याचे मार्गदर्शन करते.

- ब्रिटीश कौन्सिलच्या अहवालात असे नमूद करण्यात आले आहे की, ३२% भारतीय सामाजिक उपक्रमांच्या बाबतीत बँका आणि वित्तीय संस्थांमध्ये त्यांच्या कार्याबद्दल समज कमी आहे आणि २०% समुदाय सदस्यांमध्ये त्यांच्या उद्दिष्टे, कार्ये आणि उद्दिष्टांबद्दल जागरूकता नाही. अहवालात असेही आढळून आले की सुमारे ३३% भारतीय सामाजिक उपक्रमांना असे वाटते की त्यांचे मर्यादित नेटवर्क गुंतवणूकदारांपर्यंत पोहोचण्यात अडथळा म्हणून काम करतात.
- सामाजिक स्टॉक एक्सचेंज वरील नोंदनिकृत सामाजिक उपक्रमांनी निर्माण होणाऱ्या प्रभावाचे नियमित ऑडिट केले जाईल, त्यामुळे सामाजिक संस्थांना प्रोत्साहन मिळेल आणि बाजार शिस्त निर्माण होईल. सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या सामाजिक उपक्रमांच्या प्रतिभूतींना चांगली मागणी असेल आणि कार्यक्षम नसलेल्या कंपन्यांच्या प्रतिभूती  बाजारातून आपोआप बाहेर पडतील.
- सामाजिक स्टॉक एक्सचेंज ची स्थापना भारतातील झपाट्याने वाढणाऱ्या प्रभाव गुंतवणूक बाजाराला अधिक नियंत्रित भांडवली बाजार बनण्यास मदत करेल. कारण प्रस्तावित सामाजिक स्टॉक एक्सचेंज चे नियमन सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया द्वारे केले जाईल.
- सामाजिक स्टॉक एक्सचेंज च्या साहाय्याने प्रभाव गुंतवणूक अधिक सुलभ होत असल्याने, शाश्वत विकासासाठी गुंतवणूक वाढेल, ज्यामुळे सरकारवरील भार कमी होईल. योग्य आराखड्यासह सामाजिक स्टॉक एक्सचेंज विकसित केल्यास, सामाजिक स्टॉक एक्सचेंज आंतरराष्ट्रीय विकास वित्तासाठी एक महत्त्वाचे माध्यम म्हणून उदयास येऊ शकतात.

**समारोप**

सध्या भारतात अनेक मार्गाने सामाजिक क्षेत्राला (नफ्यासाठी आणि नफ्यासाठी सामाजिक उपक्रम) निधी मिळतो. ज्यामध्ये कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (CSR), इम्पॅक्ट इन्व्हेस्टिंग, सोशल रिस्पॉन्सिबल इन्व्हेस्टिंग (SRI), सरकारी अनुदान व देणग्या इ.समावेश होतो.या सर्व वैविध्यपूर्ण मार्गांचे एक समान राष्ट्रीय व्यासपीठावर एकत्रीकरण करणे आणि आर्थिक आणि सामाजिक परतावा अहवाल आणि मोजण्यासाठी एकसमान फ्रेमवर्क स्थापित करणे हे सामाजिक स्टॉक एक्सचेंज चे उद्‌दिष्ट आहे. सामाजिक प्रभाव निधीसाठी उपलब्ध असलेल्या भांडवलाला त्या दिशेने प्रवाहीत करण्यात सामाजिक स्टॉक एक्सचेंज ची महत्त्वाची भूमिका आहे.

**संदर्भ**


१. Wendt, Karen. "Social Stock Exchanges - Democratization of Capital Investing for Impact." SSRN Electronic Journal – Researchgate, 2017, 1-39. English.
२. Saini, Sandeep. https://www.financialexpress.com, 2019.
३. Chhichhia, Bandini. The Rise of Social Stock Exchanges. Stanford, 2015.
४. Arvind, Indulekha. Economic Times, 2019.
५. https://www.theindiaforum.in/article/social-stock- exchanges
६. https://www.drishtiias.com/daily-updates/daily-news-analysis/social-stock-exchange
७. https://www.investindia.gov.in/team-india-blogs/advent-social-stock-exchange-india
८. https://oecd--development--matters-org.- डॉ आर बालसुब्रमण्यम , अध्यक्ष, सेबी सोशल स्टॉक एक्सचेंज सल्लागार समिती, भारत यांचा 10/05/2023 चा लेख.
९. बाजारात लवकरच सुरु होणार सोशल स्टॉक एक्सचेंज, SEBI ने दिला 'ग्रीन सिग्नल'- महाराष्ट्र टाइम्स.कॉम-Dated-24 Feb 2023.
१०. सेबीकडून सोशल स्टॉक एक्सचेंजसाठी फ्रेमवर्क तयार, SSE म्हणजे काय समजून घ्या-दीपक पळसुले, एबीपी माझा- Dated-20 Sep 2022


***

# भारताची स्वदेशी शस्त्रनिर्मिती आणि लष्करी व आर्थिक सामर्थ्यातील भरारी

**डॉ. सोनवणे जी. एन.**
संरक्षणशास्त्र विभाग श्री.पंडितगुरु पार्डीकर महाविद्यालय, सिरसाळा-431128
ता.परळी (वै), जि.बीड.

**सारांश**

प्रस्तुत शोधनिबंधात भारताच्या स्वदेशी शस्त्रनिर्मितीतील स्वयंपूर्णतेची मीमांसा करण्यात आलेली आहे. जगभरात कालानुरूप शस्त्रास्त्रांच्या विकासात वेळोवेळी बदल होत गेले आहेत. त्यांचा युद्धावर कसा परिणाम होत असतो. विशेषत्वाने भारतात त्या संदर्भात नेमकी काय परिस्थिती आहे, हेही जाणून घेणे क्रमप्राप्त आहे. या दृष्टीने भारताची स्वदेशी शस्त्रनिर्मितीची परिस्थिती काय आहे. भारतात यापूर्वी अशाप्रकारचे स्वदेशी शस्त्रनिर्मितीचे प्रयत्न झाले. परंतु त्यात गतिमानता नव्हती. कारण भारताचा सुरवाती पासूनचा मित्र रशिया त्याने अनेक बाजूंनी वेळोवेळी मदतीचा हात दिला होता. याबरोबरच रशियाने काही खास प्रसंगी व्हेटो ही वापरून आपलं संरक्षण केलं होते. त्यामुळे अनेक संरक्षण विषयक सिद्धता आपण रशियाच्या मदतीने पूर्ण केल्या होत्या. त्यामुळे अशाप्रकारची स्वदेशी शस्त्रनिर्मितीतील स्वयंपूर्णतेची गरजच भासली नव्हती. परंतु आता भारत स्वदेशी शस्त्रनिर्मितीतील स्वयंपूर्णतेच्या दिशेने अग्रेसर आहे. या दृष्टीने भारताने क्रायोजेनिक इंजीन बनवलं, भारताने सुपर कॉम्प्युटर परम बनवलं, भारताने अनेक मिसाईल्स टेस्टिंग यशस्वीपणे पूर्ण केले आहे. हळूहळू परंतु खंबीरपणे भारत स्वयंपूर्ण होत आहे. याबरोबरच तेजस विमान, ब्रह्मोस मिसाईल,

काली क्षेपणास्त्र इ बाबतीत तर चीन सुद्धा भारतास वचकून बसला आहे. लवकरच भारत आत्मनिर्भरता मिळवत आहे. आणि यशस्वी होईल यात शंकाच नाही. त्याचा आढावा या लेखाद्वारे घेण्यात आला आहे. प्रस्तुत शोध अध्ययनासाठी दुय्यम स्त्रोतांचा अवलंब करून तथ्यांचे संकलन करण्यात आलेले आहे. अध्ययन विषयाशी अनुषंगिक तथ्य संकलीत करण्यासाठी विषयाशी निगडीत प्रकाशित, अप्रकाशित असलेले शोध अध्ययन साहित्य, संदर्भग्रंथ, साप्ताहिके, वृत्तपत्रे, संशोधन पत्रिका, संकेत स्थळे आदी दुय्यम साधनाच्या माध्यमातून तथ्य संकलित करण्यात आलेले आहे.

**मुख्य शब्द-** भारताची शस्त्रनिर्मितीतील स्वयंपूर्णता, भारताची स्वदेशी शस्त्रनिर्मिती, भारताची लष्करी व आर्थिक सामर्थ्यातील भरारी

**प्रस्तावना :**

'शस्त्र पाप ना स्वयेंचि, शस्त्र पुण्य ना स्वयें; इष्टता अनिष्टताहि त्यास हेतूनेच ये' अशाप्रकारे स्वातंत्र्यवीर सावरकरांनी देशाचे सार्वभौमत्व कायम ठेवण्यासाठी, स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी शस्त्रसञ्जता आवश्यक असल्याचे स्पष्ट केलेले आहे. ती काळाची गरजाही ठरत आहे. कारण भारत हा शांतताप्रिय धोरण असणारा देश असला तरी देशाच्या सीमांचे व जनतेचे संरक्षण करणे अपरिहार्य आहे. देशाजवळ शस्त्र सज्जता नसेल तर, देश जर दुबळा असेल तर तो आक्रमणांना बळी पडतो. याच कारणाने भारताच्या अर्थसंकल्पात सर्वात जास्त तरतूद ही संरक्षण मंत्रालयासाठी केली जाते. सुमारे बारा लाख जवान आपल्या सीमांचे रक्षण करण्यासाठी सज्ज आहेत. बदलत्या काळात आता सैनिकांच्या संख्येपेक्षा अत्याधुनिक शस्त्रास्त्रांचे महत्व वाढत चालले आहे. त्याबरोबरच देशातील लष्करी धोरणात स्वदेशी शस्त्रनिर्मिती वरही भर देण्यात येत आहे. या बाबतीत लेफ्टनंट कर्नल सोधी (निवृत्त) यांनी अत्यंत महत्वाची माहिती

यासंदर्भात दिली आहे आणि ती म्हणजे युद्धनौका, लढाऊ विमाने, पाणबुड्या, बंदुका या प्रकारच्या शस्त्र आणि सामुग्रीच्या बाबतीत भारत स्वदेशी निर्मितीत अग्रेसर होत आहे. परिणामी भारतात शस्त्रास्त्रे आयात करण्याची गरज भासणार नाही असे धोरण अवलंबिले जात आहे. 2014-2015 साली शस्त्र निर्यातीत भारताचा वाटा जो अवधा 1941 कोटींचा होता तो 2021-2022 सालात आठ हजार कोटींहून अधिकचा झाला आहे. अशाप्रकारे भारताने स्वदेशी शस्त्रनिर्मितीतून मोठे परकीय चलनही प्राप्त करण्यावर भर दिलेला दिसून येतो. प्रस्तुत शोधनिबंधात भारताच्या स्वदेशी शस्त्रनिर्मितीतील स्वयंपूर्णतेची मीमांसा करण्यात आलेली आहे.

**भारताची स्वदेशी शस्त्रनिर्मितीतील भरारी**

भारत शस्त्रास्त्र निर्मिती करतच नाही असे नाही. परंतू आधुनिक तंत्रज्ञानाच्या बाबतीत भारत थोडा मागे आहे. हे मात्र मान्य करावे लागेल. पूर्वी भारत शस्त्रास्त्रे-सामुग्री विकत घेत असे. त्यानंतर शस्त्रास्त्रे-सामुग्री बरोबर तंत्रज्ञान विकत घ्यायला सुरवात झाली. परंतू आता भारत सामुग्रीबरोबर खरेदी केलेल्या तंत्रज्ञानाचा विकास करून स्वतःची सामुग्री निर्माण करत आहे. सध्या भारत लांब पल्ल्याची जी शस्त्रास्त्र निर्माण करत आहे ती, विमानविरोधी तोफा, रणगाडे, पाणबुड्या... वगैरे सामुग्री स्वतः तयार करतो. सध्या भारतातील मोठा आयात खर्च संरक्षण साहित्य आणण्यावर खर्च होतो. पुढे त्याचे सुटे भाग मिळवणे व त्या शस्त्रास्त्रांची देखरेख करणे हा खर्च अजून वेगळाच. यावर उपाय म्हणून सध्या सरकारने असे धोरण ठेवले आहे की परदेशातून आयात करण्यापेक्षा जर परकीय शस्त्रपुरवठादार कंपन्या भारतातच शस्त्रनिर्मिती करतील तर अनेक फायदे होतील. जसे मोलाचे परकीय चलन कमी प्रमाणात खर्च होईल, वाहतुकीचा व विमा काढण्याचा खर्च कमी होईल. शिवाय देशांतर्गत

रोजगार निर्मिती होईल व कालांतराने तत्रंज्ञानाचेही भारताकडे हस्तांतरण होईल.

देशांतर्गत शस्त्रास्त्रे निर्मितीत भारताने मोठी भरारी घेतली आहे. त्यात तेजस सारख्या विमानाची निर्मिती महत्त्वपूर्ण मानली जाते. तेजस विमान हे त्याच्या श्रेणीमध्ये अत्यंत उत्तम मानलं जातं. दुबईला झालेल्या डिफेन्स एक्स्पो मध्ये, अनेक देशांनी खूप खास लक्ष दिलं होतं तेजस कडे. मलेशिया ने तर मोठी ऑर्डर देऊन टाकली. तसंच, अग्नी मिसाईल बद्दल अनेक देशांनी रस दाखवला होताच. तसेच DRDO ही संस्था अत्यंत तळमळीने नवीन शस्त्र आणि सामग्री ह्यात नवनवीन प्रयोग करून प्रचंड दर्जेदार युद्धसामग्री निर्माण करते. त्यातल्या काही गोष्टी भारत इतर देशांना निर्यात करतो. ह्यात दर्जाचा कधीही प्रश्न नव्हता. प्रश्न होता योग्य धोरण असण्याचा. पूर्वीच्या काळात सत्तेत असलेल्या सरकारांनी तेव्हा सगळी उपकरणं बाहेरून विकत घेण्यावर त्यांचा भर दिलेला असायचा. ह्यामुळे सगळी डिफेन्स सामग्री आणि शस्त्र निर्मिती अगदी दुर्लक्षित राहिली. ह्या सात वर्षात जितकं लक्ष आणि प्रोत्साहन मिळालं त्यामुळे सगळेच आपल्या योग्यतेनुसार काम करून देऊ लागले. मग उत्तम विमान अन् मिसाईल तयार होणं हे क्रमप्राप्त होतं. त्यातूनच तेजस सारख्या विमानाची निर्मिती होत असलेली महत्त्वपूर्ण मानली जाते.

या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प सादर करण्यात आला तेव्हा संरक्षण खात्यासाठी 4 लाख 71 हजार 378 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. आधीच्या वर्षी चार लाख 31 हजार कोटी रुपयांची तरतूद करूनही प्रत्यक्षात तो खर्च 17 हजार कोटी रुपयांनी वाढला होता. तसे, यंदाही होऊ शकते. हा खर्च जसा पगार आणि इतर व्यवस्थांवर होतो, तसाच तो शस्त्रखरेदीवरही होतो. भारत हा गेली पाचहून अधिक वर्षे सतत शस्त्र आयातदारांच्या यादीत पहिल्या तिघांमध्ये राहिला आहे. सध्या तर तो

सौदी अरबस्तानच्या पाठोपाठ दुसराच आहे आणि सध्याची पूर्व आणि पश्चिम सीमेवरील परिस्थिती पाहता तो लवकरच पहिल्या क्रमांकावर गेला तर आश्चर्य वाटायला नको. या साऱ्या शस्त्र आयातीमध्ये स्वाभाविकच निम्म्याहून अधिक वाटा हा भूदलाचा असतो. त्यानंतर हवाई दल आणि नौदलाचा क्रम लागतो. या साऱ्या पार्श्वभूमीवर संरक्षणमंत्री यांनी जाहीर केलेल्या 'आत्मनिर्भर संरक्षण' या घोषणेकडे पाहावे लागेल. तसे, 2018 मध्येच केंद्र सरकारने संरक्षण क्षेत्रात स्वदेशी कंपन्यांना प्रोत्साहन देण्याचे धोरण आखले होते. यंदाच्या अर्थसंकल्पातही संरक्षण क्षेत्रात गुंतवणूक करणाऱ्या परदेशी कंपन्यांना अर्थमंत्र्यांनी विशेष सवलती जाहीर केल्या होत्या. राजनाथ सिंह यांनी येत्या पाच वर्षांत ज्यांची आयाता थांबणार आहे, अशा 101 शस्त्रे किंवा लष्करी उपकरणांची यादी जाहीर केली आहे. ही आयात पुढील पाच वर्षांत टप्प्याटप्प्याने थांबणार असली तरी यंदा डिसेंबरपासूनच या यादीतल्या अनेक उपकरणांची आयात बंद होणार आहे. ही यादी तयार करण्यापूर्वी स्वाभाविकच तीनही दलांशी सविस्तर चर्चाविनिमय करण्यात आला आहे. अशाप्रकारे या आर्थिक वर्षात देशांतर्गत शस्त्रास्त्रे निर्मितीत भारताने लक्ष केंद्रित केलेले दिसून येते.

भारत अद्याप अशा शस्त्राअस्त्रांच्या आयातीतून भारत पूर्णपणे मुक्त होऊ शकत नाही हे खरे असले तरी मात्र भारताने आत्मनिर्भरतेचा ध्यास घेतला आहे. हेही नाकारता येणार नाही. 47 हजार कोटी खर्च करून भारतीय हवाई दलासाठी हिंदुस्थान एरॉनॉटिक्सकडून तेजस ही लढाऊ विमाने खरेदी करण्यात येणार आहे. याबरोबरच अग्नी, प्रलय, ब्राह्मोस अशी क्षेपणास्त्रे भारताची सामरिक शक्ती वाढवत आहेत. भारताजवळच्या समुद्रात चीनच्या वाढत्या हालचालींना शह देण्यासाठी भारताची स्वदेशी बनावटीची आयएनएस विक्रांत ही युद्धनौका नौदलात दाखल झाली आहे. विक्रमादित्य या युद्धनौकेबरोबरच आता विक्रांत ही युद्धनौका सामील

झाल्याने भारताचे सामर्थ्य वाढले आहे. भारताची सामरिक सिद्धता आणि संरक्षणसज्जता यांत अद्यापि काही उणिवा असतीलही. मात्र, त्या दूर करण्याची मानसिकता आणि सतत शस्त्रसज्जता वर्धिष्णू ठेवण्याची इच्छाशक्ती यांमुळे भारत अधिकाधिक सामर्थ्यशाली होत आहे, हे मान्य केलेच पाहिजे. शस्त्रास्त्रसज्ज असण्याने देशाच्या सीमा सुरक्षित राहतात. अशाप्रकारे या आर्थिक वर्षात देशांतर्गत शस्त्रास्त्रे निर्मितीत भारताने मोठी भरारी घेतली असल्याचे दिसून येते.

लष्करी आणि संरक्षण सज्जतेत पायाभूत सुविधांपासून प्रशिक्षणापर्यंत अनेक गोष्टींचा अंतर्भाव असतो. त्यातील शस्त्रसज्जता हा एक अत्यंत महत्वाचा मुद्दा आहे. भारताने चीनच्या युद्धातील पराभवातून धडा घेत स्वतस शस्त्रसज्ज करण्याया प्राधान्य दिले आणि आता भारताचा प्रवास आत्मनिर्भरतेकडे होतो आहे ही स्वागतार्ह बाब आहे. शस्त्रास्त्रावरुन राष्ट्राच्या सामर्थ्याची परीक्षा होत असते आणि त्यामुळेच लष्करी संचलन होते तेव्हा त्यात अत्याधुनिक शस्त्रांचे दर्शन घडविले जाते. यामुळे एकीकडे देशातील नागरिकांचे मनोबल उंचावते आणि दुसरीकडे शत्रूला इशारा दिला जातो. शस्त्रास्त्रांचा उद्योग मोठा आहे आणि प्रत्येक राष्ट्र या बाबतीत स्वयंपूर्ण होण्याचे स्वप्न पाहत असते. अशीच प्रयत्ने भारतातील धोरणाच्या आधारे केली जात आहेत. गेल्या सात-आठ वर्षात 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' या घोषणांनी अनेक उद्योजकांना शस्त्रनिर्मितीचा क्षेत्राकडे आकृष्ट केले आहे. परिणामी देशाची स्वदेशी शास्त्रनिर्मिती वधारलीच आहे असे नाही तर शस्त्रनिर्मितीच्या निर्यातीत देखील उल्लेखनीय वाढ झाली आहे.

**स्वदेशी शस्त्रनिर्मिती: आर्थिक सामर्थ्यांतील भरारी**

स्वदेशी शस्त्रनिर्मितीच्या मागे दुसरी एक आर्थिक बाजूही आहे. स्वदेशी शस्त्रनिर्मितीतून भारताने आर्थिक सामर्थ्यांतील भरारी ही घेतली

आहे. कारण स्वदेशी शस्त्रनिर्मितीच्या माध्यमातून  येत्या काही वर्षांत 50 हजार कोटी रुपयांची आयात जरी आपण थांबवू शकलो तरी तितका पैसा हा देशातच गुंतवला जाईल आणि त्या प्रमाणात रोजगारनिर्मितीही होऊ शकेल. दुसरे म्हणजे, भारत हा शस्त्र आयातदार असला तरी तो शस्त्र निर्यातदारही आहे आणि भारताकडून आज शस्त्रे व इतर युद्धसामग्री आयात करणारे अनेक देश आहेत. पुढील काही वर्षांत ही बाजारपेठ टिकवावी आणि वाढवावी लागेल. संरक्षण क्षेत्रातले स्वयंपूर्णतेचे महत्व ओळखून मोठे महत्वपूर्ण निर्णय घेतले जात आहेत. आज आपल्या सैन्यांकडे भारतात निर्मित उपकरणे असतात, तेव्हा त्यांचा आत्मविश्वास, त्यांचा अभिमान आणखी दुणावतो. भारतात निर्मित वस्तूंबाबत त्याच्या मनात एक वेगळाच  स्वाभिमान असतो. म्हणूनच आणि हे केवळ आपण आत्मनिर्भर झालो तरच शक्य आहे. संरक्षण क्षेत्रातली निर्यात जी पूर्वी 1,900 कोटी रुपयांची होती, ती आता 13,000 कोटी रुपयांच्या पुढे गेली आहे. मागील काळात 1990 च्या दशकात बुलेटप्रूफ जॅकेट भारतातच बनवण्याचा प्रयत्न झाला होता. सध्या उत्तर प्रदेशातील कानपूरस्थित एका खासगी कंपनीत बुलेटप्रूफ जॅकेट बनवले जातात. मात्र, हे जॅकट बनवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या केवलार (Kevlar) नामक वस्तूची अजूनही परदेशातूनच आयात केली जाते. दोन वर्षांपूर्वी देशातच उत्पादन सुरू झालं. मात्र, संख्यात्मक पातळीवर पाहिल्यास म्हणं तेवढं उत्पादन भारतात होत नाही. त्यामुळे बुलेटप्रूफ जॅकेटमध्येही भारत अजून आत्मनिर्भर नाहीय. परंतु भारत अल्पावधीत या क्षेत्रात 'आत्मनिर्भर' होईल. असा आशावाद या योजनेद्वारे व्यक्त करण्यात आला आहे.

संरक्षण उत्पादनात देश स्वयंपूर्ण करून पुढची दिशा म्हणजे भारताला संरक्षण उत्पादनांच्या निर्यातीत अग्रेसर बनवणे. सध्या भारत वर्षाला 330 मिलियन डॉलर एवढी निर्यात करत आहे. मात्र भारताने

वर्षाला 2 बिलियन डॉलरच्या शस्त्रनिर्यातीचे महत्वाकांक्षी उद्दिष्ट ठेवले आहे. सुरवातीला भारत देशातील कंपन्यांनी देशांतर्गत उत्पादन केलेली शस्त्रास्त्रे निर्यात करायला प्राधान्य देईल. पण पुढच्या टप्प्यात भारताने इतर देशांशी जे सह-उत्पादन व सह-विकास प्रकल्प राबवले आहेत (उदा. रशियाबरोबर मिळून ब्रह्मोस क्षेपणास्त्र) त्यांच्याही निर्यातीवर भर देईल. संरक्षण क्षेत्रातले स्वयंपूर्णतेचे महत्व ओळखून मोठे महत्वपूर्ण निर्णय घेतले जात आहेत. आज आपल्या सैन्यांकडे भारतात निर्मित उपकरणे असतात, तेव्हा त्यांचा आत्मविश्वास, त्यांचा अभिमान आणखी दुणावतो. भारतात निर्मित वस्तूंबाबत त्याच्या मनात एक वेगळाच स्वाभिमान असतो. म्हणूनच आणि हे केवळ आपण आत्मनिर्भर झालो तरच शक्य आहे. 2025 पर्यंत संरक्षण उत्पादनातून 1.75 लाख कोटी रुपयांचे उद्दिष्ट गाठण्याचा निर्धार आहे, ज्यामध्ये 35,000 कोटी रुपयांची निर्यात समाविष्ट आहे. देशातील पहिल्या स्वदेशी विमानवाहू INS विक्रांत ज्यामध्ये 76% स्वदेशी सामग्री आहे, जीचे 02 सप्टेंबर 2022 रोजी कोची येथे लोकार्पण केले होते. भारताच्या स्वावलंबनाच्या मार्गातील हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. ज्याने जगामध्ये भारताची प्रतिमा एका मूक निरीक्षकापासून प्रतिज्ञाकर्ता आणि प्रदाता अशी बदलली आहे. अशाप्रकारे ही स्वदेशी शस्त्रनिर्मितीतून भारताने घेतलेली आर्थिक सामर्थ्यांतील भरारीच मानले जात आहे.

**समारोप**

एकीकडे भारतास आर्थिक महासत्तेची चाहूल लागत आहे. अशावेळी संरक्षणात मात्र परावलंबी राहणे परवडणारे नाही. आजचे धोरण कायम राहिले तर येत्या दोन ते तीन दशकांमध्ये भारत खऱ्या अर्थाने सर्व क्षेत्रांत आत्मनिर्भर होईल. म्हणून हा देशांतर्गत शस्त्रास्त्रे निर्मितीचा, संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भर होण्याचा निर्णय महत्त्वाचा आहे. भारत

नुकताच जागतिक शस्त्रास्त्र निर्यात नियंत्रण करणारा करार (MTCR) चा सदस्य झाल्याने भारताला आता दाही दिशा निर्यातीसाठी खुल्या आहेत. अर्थात काही शस्त्रे सगळ्यांना भारत विकेल तर इतर काही खास शस्त्रे फक्त भागीदार देशांसाठी राखून ठेवली जातील. या धोरणाचे सध्याचे सर्वोत्तम उदाहरण म्हणजे भारताने आपला खास मित्रदेश व्हिएतनामला ब्रह्मोस क्षेपणास्त्र निर्यात करण्याचा निर्णय घेतला आहे. यासर्वातुन भारताला परकीय चलन प्राप्ती होईल व भारतातील रोजगार व संशोधनाला चालना मिळेलच. पण त्यापलीकडे जाऊन ज्या देशांशी आपण अशा प्रकारे व्यवहार करू ते आपले दीर्घकालीन मित्र बनतील. आपल्या परराष्ट्र धोरणातील हा एक मास्टर स्ट्रोक ठरू शकेल.

**संदर्भ ग्रंथ सूची**


1. मेजर राजेश बावा -लष्करी आधुनिकीकरण; खासगी क्षेत्राने पुढे यावे,
2. अग्रलेख दै.लोकसत्ता, 29 नोव्हे 2018
3. राहुल गोखले- भारताची शस्त्रसज्जता, 2 ऑक्टो 2022
4. महाराष्ट्र टाइम्स, अग्रलेख : स्वदेशी शस्त्रांचा अर्थ, 11 ऑगस्ट 2020.
5. इंडिया टुडे -मासिक पत्रिका
6. दै.लोकसत्ता, 13 जुलै 2020.
7. दै.लोकमत - 14 ऑगस्ट 2021.
8. महाराष्ट्र टाईम्स -10 एप्रिल 2022.
9. Maharashtra Times 7th Dec 2016


***

# भारतातील वाहतूक सूविधा : प्रगती आणि विकास

**डॉ. सरिता उदापुरकर**

सहयोगी प्राध्यापक (वाणिज्य) न.मा.द.महाविद्यालय, गोंदिया.

**प्रस्तावना**

कोणत्याही देशाचा आर्थिक विकास, घडवून आणण्यासाठी त्या देशाची आधारभूत संरचना निर्माण होणे आवश्यक असते. आधारभूत संरचना आणि देशाचा विकास यांचा थेट संबंध असतो. भारत हा विकसनशील देश आहे विकासाकडे वाटचाल सुरू असताना कृषीक्षेत्र, उद्योंगक्षेत्र व सेवाक्षेत्राच्या उत्पन्नात वाढ होणे आवश्यक असते. कृषी उत्पादनासाठी प्रेरकशक्ती, सिंचनसूविधा, वाहतूकीच्या सोयी इत्यादी बाबी आवश्यक असतात. तर औद्योगिक उत्पादनासाठी यंत्रसामूग्री आणि उपकरणे, कुशल श्रमशक्ती, व्यवस्थापन, प्रेरकशक्ती, बँका व विम्याच्या सोंयी, विपणनाच्या सोयी, वाहतूक सेवा या बाबी उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्यासोबतच रेल्वेमार्ग, रस्तेमार्ग, जहाजे, दळणवळणाच्या सोयी, दूरसंचार इत्यादी बाबींचाही त्यात समावेश आवश्यक असतो. या सर्व बाबी म्हणजेच आधारभूत सूविधा. त्यांनाच पायाभूत सूविधा असेही म्हणतात. देशाचे आर्थिक, सामाजीक, व सांस्कृतिक व राजकीय इत्यादी सर्व व्यवहार प्रामुख्याने वाहतूक व्यवस्थेवर अवलंबून असतात. देशाच्या आर्थिक व औद्योगिक विकासात उर्जा क्षेत्रानंतर वाहतूक व दळणवळण हे दुसरे असे क्षेत्र आहे जे पायाभूत संरचनेच्या उभारणीत महत्त्वपूर्ण भूमिका वठविते. अर्थव्यवस्थेच्या शरीरातील वाहीन्या म्हणजेच वाहतूक व्यवस्था होय.

**पायाभूत सूविधांमध्ये पूढील प्रमूख बाबींचा समावेश होतो.**

अ) वाहतूक – रेल्वे, रस्ते, जहाजसेवा, विमान वाहतूक इ.

ब) दळणवळण – टपाल, दुरध्वनी, भ्रमणध्वनी, दूरसंचार, आंतरजाळे इ.

क) बॅका, वित्त, विमा कंपनी इ.

ड) प्रेरकशक्ती – कोळसा, वीज, खनिजे, तेल, उर्जा व अपारंपारीक स्त्रोत.

इ) सामाजीक बाबी – आरोग्य, शिक्षण, निवास

ई) विज्ञान, तंत्रज्ञान, पर्यावरण, पर्यटन, संशोधन.

**ऐतिहासीक पार्श्वभूमी**

पंचवार्षीक योजनेच्या काळात आधारभूत संरचनेच्या विकासावर अतिशय भर देण्यात आला आहे. त्यापूर्वी स्वातत्र्यपूर्वीच्या काळात भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसने नियोजनाचे महत्त्व ओळखून 1938 मध्ये पं. जवाहरलाल नेहरूच्या पूढाकाराने राष्ट्रीय नियोजन समितीची स्थापना केली या समितीच्या मतानुसार सर्व प्रमुख उद्योग सेवा, खनिज संपत्ती, रेल्वे, जलवाहतूक, जहाजसेवा आणि सार्वजनिक उपयोगिताचे उद्योग आणि मोठे उद्योग, मक्तेदारी स्वरूपाचे असतील ते सर्व सरकारी मालकीचे किंवा सरकारी नियंत्रणाखाली असावे असे ठरविण्यात आले. 1996–97 च्या अंदाजपत्रकात रस्ते, पूल, नवीन विमानतळ, बंदरे, रेल्वे, प्रकल्प, पाणीपूरवठा इत्यादीमध्ये गुंतलेल्या कंपन्यांना 5 वर्षांसाठी करमूक्त करण्यात आले. तर 1999–2000 च्या अंदाजपत्रकात आधारभूत संरचना प्रकल्पांना 15 वर्षेपर्यंत करमाफी देण्यात आली. 2001–2002 च्या अंदाजपत्रकानुसार राज्य महामार्ग विकसीत करण्यासाठी राज्यांना 162 कोटी रूपयांची मदत देण्यात आली. तसेच पंतप्रधान ग्रामीण सडक योजना सुरू करण्यात आली. त्याद्वारे ग्रामीण क्षेत्रात रस्त्यांचे जाळे पसरविण्याचे उद्यिष्टे होते. सध्या 2022–2023 च्या आर्थिक वर्षात एकूण 177 मोठे प्रकल्प पूर्ण करण्यात आले आहेत.

पंचवार्षीक काळामध्ये वाहतूक व दळणवळणांवर झालेला एकूण खर्च खाली दिलेला आहे.

| पंचवार्षीक योजना | पंचवार्षीक योजनेचा कालावधी | एकूण खर्च (रूपये कोटीमध्ये) | वाहतूकीवर खर्चाचे (प्रतीशत मध्ये) |
|---|---|---|---|
| पहिली | 1951 – 1956 | 1,960 | 2.64% |
| दूसरी | 1956 – 1961 | 4,672 | 27.0% |

| | | | |
|---|---|---|---|
| तिसरी | 1961 – 1966 | 8,577 | 24.6% |
| चौथी | 1969 – 1974 | 15,779 | 19.5% |
| पाचवी | 1974 – 1979 | 39,426 | 17.4% |
| सहावी | 1980 – 1985 | 1,09,291 | 16.2% |
| सातवी | 1985 – 1990 | 1,80,000 | 13.5% |
| आठवी | 1992 – 1997 | 4,34,100 | 12.9% |
| नववी | 1997 – 2002 | 1,41,041 | 25.1% |
| दहावी | 2002 – 2007 | 3,24,945 | 91,3% |
| अकरावी | 2007 – 2012 | 6,13,185 | 16.7% |

स्त्रोत – भारत सरकार, नियोजन मंडळ

**भारताच्या आर्थिक विकासात वाहतूक व्यवस्थेचे महत्त्व**

1) **बाजारपेठा –** भारतात बाजारपेठा विस्तृत प्रमाणात उपलब्ध आहेत. पक्का माल कारखान्यातून ग्राहकांपर्यंत पोहचण्यासाठी वाहतूक व्यवस्था विकसीत होणे आवश्यक आहे. भारताचा आर्थिक विकास करण्यात विस्तृत बाजारपेठा व बाजारपेठांसाठी वाहतूक व्यवस्था विकसीत करणे आवश्यक आहे.

2) **श्रमविभागणीमूळे मोठे प्रमाणावर उत्पादन –** श्रमिकांची निवासस्थानांवरून कारखान्याच्या स्थानापर्यंत येजा करण्यासाठी

वाहतूक व्यवस्था मदत करते. त्यामूळे कूशल श्रमिक, उत्कृष्ठ कर्मचारी, व्यवस्थापक मिळून व्यवसायाची प्रगती होऊ शकते.

3) **कच्चा माल, इंधन, यंत्रसामूग्री इत्यादीची उत्पादन केंद्राकडे ने–आण**–वाहतूक व्यवस्था सोयीची असल्यास कच्च्या मालाचा पूरवठा, इंधन पूर्तता, यंत्राची ने–आण करणे सोपे होते व व्यवसायातील उत्पादनात वाढ होण्यास त्याचा हातभार लागतो.

4) **दूरवरचे प्रदेश आणि साधनधन उत्पादनासाठी खूले** – वाहतूक व्यवस्थेमूळे दूरवर विक्रीसाठी उत्पादने पोहचविणे शक्य होते. विक्री वाढल्याने उत्पादनात वाढ होईल व नफाही वाढेल. उद्योगधंदया मध्ये नफा वाढला तर आर्थिक विकासातही वाढ होते.

5) **मागास आणि अप्रगत देशाचा विकास** – मागास आणि अप्रगत देशांचा विकास करण्यासाठी सोयी सूविधा त्यांच्यापर्यंत पोहचविणे आवश्यक आहे. आरोग्य व शिक्षण इतर सोयीसुविधा या वाहतूकीच्या साधनांद्वारे त्यांच्यापर्यंत पोहचविल्या जातात.

6) **औद्योगिकरणात वाढ** – वाहतूकीच्या सोयींमध्ये वाढ झाल्याने औद्योगिक वस्तूंच्या मागणीत वाढ होते. ही झालेली वाढ वाहतूकीच्या माध्यमातूनच पूर्ण करता येते म्हणून अर्थव्यवस्थेच्या विकासात वाहतूक व्यवस्थेचे अतिशय महत्त्व आहे.

7) **उत्पादनकेंद्रे, वितरण केंद्र आणि अंतिम उपभोक्ते यांना जोडणारा दूवा** – वाहतूक व दळणवळण यांच्या माध्यमातून कारखाने, गोदाम, विक्रीकेंद्रे, दूकानदार व उपभोक्ते यांना एकत्र आणता येते व त्यांच्या आवश्यकता पूर्ण करता येतात. तो सर्व उत्पादन–वितरण व विक्री यांना जोडणारा दूवा आहे.

**वाहतूक संरचना व क्षेत्र**

भारतातील चार प्रकारच्या वाहतूक व्यवस्थेची झालेली प्रगती खालीलप्रमाणे दिसून येते.

**1) रेल्वे वाहतूक** – रेल्वे विस्तारामूळे आणि विकासामूळे संपूर्ण जगात वाहतूकीच्या क्षेत्रात क्रांती झाली. जड वाहतूकीसाठी व लांब अंतरासाठी रेल्वे वाहतूक अत्यंत सूलभ आहे. देशातील अनेक प्रदेशांना रेल्वे जोडते आणि व्यवसायीक व औद्योगिक गतिक्षमताही वाढविते. भारतीय रेल्वेची सुरूवात 16 एप्रिल 1853 ला झाली. ठाणे ते मुंबई या 34 कि.मी. रेल्वे मार्गावरून प्रथम वाहतूक सूरू झाली. त्यानंतर

1950–53 मध्ये रेल्वे मार्गांची लांबी 53,600 कि.मी., व 2011–12 मध्ये ती 64,600 कि.मी. झाली. आज 68,907 कि.मी. लांबीचे एकूण रेल्वे मार्ग असून त्यापैकी 892 कि.मी. रेल्वे मार्गांचे विद्युतीकरण झालेले आहेत. एकूण रेल्वे मार्गांपैकी 64,241 कि.मी. बॉडग्रेजचे, 245 कि.मी. स्टॅन्डर्ड गेजचे, 1655 कि.मी. मिटर गेजचे व 1294 कि.मी. नॅरोगेजचे रेल्वे मार्ग आहे. एकूण ट्रॅकची लांबी 128,305 कि.मी. आहे. भारतीय रेल्वेने रोज 2 करोड 31 लाख प्रवासी व 33 लाख टन मालाची ने–आण केली जाते.

**रेल्वेची प्रमुख वैशिष्टये**

1) 11.215 कि.मी. लांबीचा पीर पेजल रेल्वे बोगदा हा भारतातील सर्वात लांब बोगदा आहे.

2) संपूर्ण भारतात एकूण 156,417 पूल रेल्वे मार्गावर आहेत.

3) बोगी बील पूल हा सर्वात लांब पूल 4.94 कि.मी. चा आहे.

4) एकूण 8016 रेल्वे स्टेशन संपूर्ण भारतात असून 748 मेट्रोस्टेशन आहेत.

5) एकूण 12,12,882 कर्मचारी रेल्वे मध्ये कार्यरत आहेत. (31 मार्च 2022 च्या आकडेवारीनुसार)

6) भारतीय रेल्वेचे एकूण 17 ऑपरेशनल व एक नॉन ऑपरेशनल झोन आहेत.

7) 2017 पासून रेल्वे आणि सामान्य अर्थसंकल्पाच्या विलीनीकरणास भारत सरकारने मान्यता दिलेले आहे.

**2) रस्तेमार्ग** – रस्तेमार्गाने वाहतूक करणे हा ही दूसरा महत्त्वाचा मार्ग उपलब्ध आहे. डिसेंबर 2022 च्या आकडयानूसार भारतात एकूण 6331,791 कि.मी. लांबीचे रस्तेमार्ग आहेत. अमेरीकेनंतर भारताचा दूसरा क्रमांक लागतो. भारताच्या रस्तेमार्गांने चिनच्या नेटवर्कलाही मागे टाकलेले आहे. गेल्या गोल्डन चतूर्भूज प्रकल्पामूळे रस्तेमार्गामध्ये मोठया प्रमाणात सूधारणा झाल्या. भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण या रस्तेमार्गांच्या संबंधीत निर्णय घेते. त्यासाठी सडक परिवहन नियम अधिनियम 1950 ला लागू झाला.

डिसेंबर 2023 च्या उपलब्ध माहिती नुसार भारतात एकूण राष्ट्रीय राजमार्गाची लांबी 1,46,145 कि.मी. आहे. चारलेनपेक्षा जास्त लेनचे एकूण राष्ट्रीय राजमार्ग 46,179 कि.मी. चे बांधले गेले आहेत. एकूण 599 राष्ट्रीय राजमार्ग आहेत तर हायस्पीड कॉरिडोरची लांबी 3913 कि.मी. एवढी आहे.

रस्त्यांचे वर्गीकरण सामान्यतः चार गटात केले जाते. राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग, जिल्हा रस्ते व ग्रामीण रस्ते. रस्तेमार्ग बांधण्यासाठी 2000 च्या केंद्रीय रस्ते निधी कायद्यानुसार केंद्रीय रस्ते निधीची स्थापना करण्यात आली. तसेच जागतिक बॅंक, आशियाई विकास बॅंक इ. कडून निधी प्राप्त करता येतो. रस्तेक्षेत्राला उद्योग म्हणून घोषित करण्यात आले आहे. मोठया खाजगी कंपन्यांना रस्ते निर्माण कार्यात प्रवेश करता यावा म्हणून कायद्याच्या तरतुदी शिथील करण्यात आल्या आहेत. तसेच विदेशी भांडवल गुंतवणूकीला सरकारने परवानगी दिली आहे. बांधा, चालवा आणि हस्तांतरित करा या तत्त्वावर जलद गती राष्ट्रीय महामार्ग बांधण्याची खाजगी कंपन्यांना अनुमती देण्यात आलेली आहे.

**3) जलवाहतूक** – भारतातील जलवाहतूकीचे दोन भागात वर्गीकरण केले जाते. आंतरजाल वाहतूक व सामुद्रीक जल वाहतूक. आंतरजाल वाहतूक ही सर्वात स्वस्त वाहतूक असून नैसर्गीक वाहतूक आणि कृत्रिम रितीने बांधलेल्या कालव्यामधून वाहतूक यांचा त्यात समावेश होतो. आधुनिक यूगात रस्ते व रेल्वे वाहतूकीला जास्त वाव मिळाल्याने व नदीच्या पाण्याचा वापर सिंचनासाठी व उद्योगासाठी करीत असल्याने आंतर जलवाहतूकीचे महत्त्व कमी झालेले आहेत. भारतात अंतर्गत जलवाहतूकीचा मार्ग 14550 कि.मी. आहे. सहाव्या पंचवार्षीक योजनेत या मार्गाच्या विकासकामासाठी 45 कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. त्यात जलमार्गांना राष्ट्रीय जलमार्ग घोषीत करणे, नवीन नावांची निर्मीती करणे. बंदराचे आधुनीकीकरण करणे इत्यादी बाबींचा समावेश केला गेला आहे. सातव्या पंचवार्षीक योजनेत ही तरतूद वाढवून 226 कोटी एवढी करण्यात आली. भारताला 1516.6 कि.मी. लांबीचा समूद्रकिनारा लाभला असून 11 मोठी व 168 छोटी बंदरे आहेत. मोठी बंदरे केंद्रसरकारच्या अखत्यारीत

आहेत व लहान बंदरे संबंधीतराज्य सरकारच्या नियत्रणात आहे. एकूण 80% पेक्षा जास्त वाहतूक ही मोठया बंदरातून केली जाते.

1694–95 मध्ये 147 दशलक्ष टन मालाची वाहतूक जहाजांद्वारे विदेशांतून केली गेली. 1990–2000 मध्ये 224.60 दशलक्ष टनांपर्यत वाढली होती व 2010–2011 मध्ये 570 दशलक्ष टनांपर्यत वाढली होती. भारतात जहाजांची मालवाहतुक क्षमता अपूरी आहे. जहाजे संचालनातही अनेक अडचणी येतात. भारतातील जहाज वाहतूक कंपन्यांना परदेशातील जहाज वाहतूक कंपन्यांबरोबर तीव्र स्पर्धा करावी लागत आहे. भारत आंतरराष्ट्रीय शिपमेंट श्रेणीमध्ये 22 व्या स्थानावर आहे. भारतामध्ये पहिला आंतरराष्ट्रीय क्रूज लाइनर कोररा सेरेना मूंबईहून सूरू झाला आहे.

भारतामध्ये 11 राष्ट्रीय जलमार्ग असून त्यांची एकूण लांबी 20,186 कि.मी. आहे. त्यापैकी 1450 कि.मी. अंतर्गत जलवाहतूक मार्ग आहे. फ्लू इकॉनॉमीच्या समर्थनार्थ 'समूद्री अमृत काल विजन 2047' लॉन्च केले गेले आहे. समूद्री मंथन नावाचे डिजीटल प्लॅटफॉर्म उपलब्ध करून देण्यात आले आहे. ज्यात जलमार्ग मंत्रालय आणि संबंधीत सर्व संघटनांशी संबधीत माहिती पुरविली जाते. 'सागर–सेतु' नावाचा मोबाईल ॲप ही नॅशनल लॉजिस्टीक पोर्टल तर्फे सुरू करण्यात आला आहे.

**4) विमान वाहतूक** – विमान प्रवास हा अत्याधुनिक, अतिशय जलद व प्रतिष्ठितांचे प्रवास साधन म्हणून ओळखले जाते. वजनाने हलक्या, मूल्यवान, आकाराने लहान तसेच नाशवंत वस्तूंची वाहतूक वायूमार्गाने केली जाते कारण विमानवाहतूक अत्यंत खर्चिक आणि अवजड वस्तू वाहून नेण्यासाठी सोयीस्कर नाही. भारतात 1920 मध्ये विमानवाहतूक सुरू झाली. मूलकी विमान वाहतुकीचे काम प्रत्यक्षात 1924–25 ला सुरू झाले व 1927 मध्ये मूलकी विमान वाहतूक खाते स्थापन करण्यात आले. 1947 पासून 1951 पर्यंत मूलकी विमान वाहतुकीवर फक्त 6.6 कोटी खर्च करण्यात आला 1953 मध्ये विमान वाहतुकीचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. 'वायु निगम कायदा 1953' पास केला गेला. त्यानुसार 'इंडियन एअरलाईन्स' आणि 'एअर इडिया' इंटरनेशनल ही दोन मंहामंडळे स्थापन केली गेली.

भारतातील विमान वाहतूक सेवा विकसीत करण्यासाठी पंचवार्षीक योजनांमध्ये मुलकी विमान वाहतूकीच्या विकासांवर भर देण्यात आला. त्यात विमानतळाच्या सुधारणा, दळणवळणाच्या सोयी, उपकरणे इत्यादीवर 24 कोटी खर्च करण्यात आले. हाच खर्च तिसऱ्या योजनेच्या अखेरीस 50 कोटींवर नेला गेला. हळूहळू या खर्चात वाढ होऊन सातव्या योजनेत 1923 कोटींची तरतूद करण्यात आली तर आठव्या योजनेत रू. 7097 कोटी खर्च करण्यात आला. 2001–2002 या वर्षांच्या शेवटी एअर इंडियन एअरलाईन्स या कंपन्यांच्या मालकीची विमाने अनुक्रमे 28 आणि 53 होती. विमान वाहतुकीत वार्षीक 12.4 टक्के दराने वाढ झालेली दिसून येते. 2009 मध्ये 4 कोटी 51 लाख 6 हजार एवढी प्रवाशी वाहतूक तर 4 लाख 19 हजार किलो एवढी वजनाची मालवाहतूक केली गेली. 2010–2011 मध्ये आतर्देशीय विमानवाहतूकीअंतर्गत 588 लाख प्रवाशांनी प्रवास केला. तर 384 हजार टन मालवाहतूक करण्यात आली. 2007 मध्ये एअर इंडिया आणि इंडियन एअरलाईन्स कंपनी ऑफ इंडिया लि. ची स्थापना करण्यात आली.

सध्या भारतात विमानतळांची संख्या दूप्पट झालेली असून ती 149 झाली आहे. 'उडान योजना' कार्यान्वित करण्यात आली आहे.

**पायाभूत सूविधांची विकासातील संधी**

1) **सार्वजनिक–खाजगी भागीदारीमध्ये यश –** सार्वजनीक क्षेत्र व खाजगी क्षेत्रामध्ये भागीदारी करून घेऊन भारताची प्रगती करून घेण्यासाठी पीपीपी संकल्पना राबविली गेली आहे. ही पायाभूत सूविधांच्या विकासातील एक महत्त्वाची संधी आहे.
2) **तंत्रज्ञानाचा पूरेपूर वापर –** अत्याधूनिक तंत्रज्ञानाचा पूरेपूर वापर करण्याची सूवर्णसंधी भारताला मिळाली आहे. त्याचा उपयोग करून पायाभूत सूविधांचा विकास करता येतो.
3) **शाश्वत विकासावर भर –** पायाभूत विकास करून पर्यावरणीय, शाश्वत विकास करण्याची संधी भारताला मिळाली आहे. पायाभूत विकास करतांना शाश्वत विकासावरही भर देण्यात आला आहे.

4) **प्रादेशिक विकास –** पायाभूत विकास करतांना प्रादेशीक विकास करवून घेण्याचीही संधी आहे. भारत हा भौगोलिकदृष्टया

विविधतेने नटलेला देश आहे. त्यानुसार प्रदेशानूसार उपलब्ध संसाधनाचा वापर करून प्रादेशिक विकास घडवून आणता येतो.

5) **कौशल्य विकास –** पायाभूत सूविधांच्या विकासात कौशल्य विकास, करवून घेता येतो. व्यक्तिगत कौशल्याचा पूरेपूर वापर या विकासात करून घेता येतो.

**पायाभूत संरचना विकासातील आव्हाने –**

**1) राजकीय गुंतागुत –** मोठे प्रकल्प यशस्वी करण्यासाठी संपूर्ण चक्रामध्ये विविध सरकारी कार्यालयातून मंजूरीची आवश्यकता असते. त्या कार्यालयातील राजकीय दबाव व गूंतागूत सांभाळणे अत्यंत जोखिमेचे आहे. सोबतच सामूदायिक विरोध, मालमत्ता विषयक नियम, करारांना असणारा विरोध जूमानून कार्य करणे हेही कठीण असते. .

**2) विकासाला आवश्यक जमिनीचे संपादन –** प्रकल्पासाठी आवश्यक जमीन मालकाकडून संपादन करून घेणे व उपेक्षितांचे पूनर्वसन करणे ही एक मोठी समस्या व आव्हान सरकारपूढे असते. त्यासाठी दीर्घ कालावधी लागतो.

**3) पर्यावरण मानकांचे जतन –** पर्यावरणाचा ऱ्हास होऊ न देता विकास घडवून आणणे हे एक मोठे आव्हान आहे. त्यासाठी सूरक्षा उपाय आणि मार्गदर्शन तत्त्वे विकसीत केली गेली आहेत. पण प्रकल्प पूर्ण करतांना या सुधारीत मानकांचे पालन होतेच असे नाही.

**4) अपूरा वित्तपुरवठा –** मोठया प्रकल्पांना मोठया वित्ताची आवश्यकता असते. त्यासाठीचे अर्थसहाय्य मिळण्यासाठी दीर्घकालीन कर्ज घ्यावे लागते. हे एक मोठे आर्थिक संकट घेऊन समोर येते. गुंतवणूकदार व बँकर्स यांना अपूऱ्या वित्तपूरवठयामूळे विकासप्रकल्पातील अडथळयांना सामोरे जावे लागते.

**5) अकार्यक्षम खाजगी कंपन्या –** मोठे प्रकल्प हाती घेऊन ते पूर्ण करण्याची कार्यक्षमता खाजगी कंपन्याकडे नाही. त्यासाठी सार्वजनिक कंपन्यांशी हातमिळवणी करून प्रकल्प पूर्ण करणे आवश्यक आहे. पण प्रत्यक्षात हे एक मोठे आव्हान आहे.

**2023–2024 च्या अंदाजपत्रकाची ठळक वैशिष्टये**

1) रेल्वेचे संपूर्ण नेटवर्कचे विद्युतीकरण करण्याचे ठरविले असून त्यासाठी रू. 79000 कोटी भांडवली परिव्ययासाठी देण्याचे ठरविले

आहे. 66% ने खर्च वाढवीला गेला असून त्यासाठी INR 2.40 लाख कोटी भांडवली परिव्यय वाटप करण्यात आला.

2) सार्वजनिक खाजगी भागीदारी (पीपीपी) द्वारे समूद्रीकिनाऱ्यावरील वाहतूक वाढविण्याची प्रयत्न केला जाणार आहे. त्यात जहाजांचे सूरक्षा प्रमाप, प्रवासांच्या बोर्डिगवर नियंत्रण तंत्र, ऑनलाईन तिकीटांची प्रणाली, या सूविधांचा विचार केला जाणार आहे.
3) पायाभूत सूविधाच्या विकासासाठी आवश्यक गूंतवणूकीत खाजगी क्षेत्राला आमंत्रीत व आकर्षित करण्यासाठी 'पायाभूत सूविधा वित्त सचिवालय' स्थापन करण्यात आले.
4) भांडवली गुंतवणूक खर्च सलग तिसऱ्या वर्षी 33 टक्क्यांनी वाढवून तो 10 लाख कोटी केला गेला आहे. या वाढीचे प्रमाण सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या 3.3 टक्के असेल.
5) अधिकाधिक शहरांना नमो भारत आणि मेट्रो रेल्वे या पायाभूत सूविधा प्रकल्प मिळतील.
6) ई–वाहन इकोसिस्टमला चालना देण्यासाठी सरकारकडून चार्जिंग इन्फ्रस्ट्रकचरला पाठिबा दिला जाईल.
7) 100 गंभीर वाहतूक पायाभूत सूविधा प्रकल्प पहिल्या आणि, शेवटच्या मैलाच्या जोडणीसाठी खाजगी स्त्रोताकडून INR 15000 कोटींसह INR 75000 कोटी गुंतवणूकीसह प्राधान्याने घेतले जाईल.
8) 50 अतिरिक्त विमानतळे, हेलीपोर्ट, ऐरोड्रॉम आणि ॲडव्हान्स लॅडींग ग्राउंडसचे पूनरूज्जीवन केले जाईल.
9) पायाभूत सूविधा क्षमता विकासामधील सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातील सहकार्य वाढविण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल म्हणून जागतिक बॅंक समूहाचे अध्यक्ष अजय बंगा यांनी 20 डिसेंबर 2023 रोजी नवी दिल्ली येथे सार्वजनिक खाजगी भागीदारी (पीपीपी) अंतर्गत बिगोनर्स ई–कोर्सचा शुभांरभ केला आहे.
10) मेट्रो रेल्वे आणि नमो भारत शहरी परिवर्तनासाठी उत्प्रेरक संसदेत वर्ष 2024–25 चा अंतरिम अर्थसंकल्प सादर करतांना केंद्रीय वित्त आणि कंपनी व्यवहार मंत्री निर्मला सितारामन यांनी पायाभूत सूविधांच्या खर्चासाठी 11.1% वाढीसह 11,11,11 कोटी रूपये तरतूद करण्याचा प्रस्ताव मांडला. हा जिडीपीच्या 3.4% असेल.

11) सूदर्शन सेतू किंवा सूदर्शन ब्रीज हे पायाभूत सूविधा विकासाचे महत्त्वपूर्ण उदाहरण आहे. 2.32 किंमी लांबीचा भारतातील हा सर्वांत लांब पूल आहे.
12) गतीशक्ती (National Single window system) अंतर्गत निवडण्यात आलेल्या तीन प्रमूख कॉरीडोर ची निर्मीती करण्यात येत आहे त्यात (i) उर्जा, खनिजे आणि सिमेंट कॉरिडोर (ii) बंदर कनेक्टिव्हेटी कॉरिडोर व (iii) सर्वांधिक वाहतूक असलेला कॉरिडोर यांचा समावेश आहे.
13) 40,000 रेल्वे डब्यांना वंदेभारतच्या तोडीचे करण्यात येणार आहे.
14) हवाईमार्गांचे 517 नवीन मार्ग बनविण्यात आले असून त्याद्वारे 1.3 कोटी प्रवाशांने ने–आण करीत आहे.
15) भारतीय कंपन्यांनी 1000 नव्या विमानांच्या खरेदीचा आदेश दिला आहे.
16) 2023–24 या आर्थिक वर्षात वित्तीय तूट 5.1 टक्क्यांपर्यंत कमी करण्याचे आणि दिर्घकाळात ते 4.5% पर्यंत कमी करण्याचे उद्दिष्टे आहे.

**सारांश**

भारत हा विकसनशील देश आहे त्याला विकासाकडे नेताना नवीन योजनांच्या अमलबजावणीनंतर पायाभूत सूविधांच्या क्षमतेत वाढ करणे आवश्यक आहे. भारत सरकारने मेक इन इंडिया, स्मार्ट सिटीज आणि इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट फायनान्स कॉर्पोरेशन (IDFC) सारख्या क्षेत्रातील गुंतवणीकीला प्रोत्साहन देण्यासाठी अनेक उपक्रम सुरू केले आहे. CRISIL (क्रिसील) यांच्या अनुमानानुसार 2017 आणि 2023 या आर्थिक वर्षाच्या काळात रू. 67 लाख करोड एवढी खर्चात वाढ दिसून येते. 2030 पर्यंतच्या सात आर्थिक वर्षात 143 लाख करोड पर्यंत ही वाढ जाणार आहे. भारतीय अर्थव्यवस्था ही 5 ट्रिलीयन डॉलर पर्यंत नेण्याचे उद्येश आहे. त्यानुसार मल्टीमॉडेल कनेक्टिव्हिटी सक्षम केली जाईल. तर लॉजीस्टिक च्या कार्यक्षमतेत सुधारणा केल्या जातील. तसेच प्रवाशांची सुरक्षितता, कमी खर्च या बाबींकडे विशेष लक्ष दिले जाईल. या सर्व सोयी, सूविधा व संरचनेचा परिणाम अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या पायाभूत सूविधांना विकसीत करण्यात होत आहे. ज्याद्वारे विकसनशील भारत विकसीत भारताकडे वाटचाल करू शकेल.

**संदर्भसूची**


1)भारतीय अर्थशास्त्र – डॉ.सुधाकर शास्त्री, डॉ.प्रकाश देहलीवाल, विश्व पब्लिशर्स
2)भारतीय अर्थव्यवस्था (संकमण आणि विकास) – डॉ.श्रीधर आत्माराम देशपांडे, डॉ.विनायक श्रीधर देशपांडे – हिमालया पब्लिशिंग हाऊस
3)भारतीय अर्थव्यवस्था – रमेश सिंह
4)भारतीय अर्थव्यवस्था – संजीव वर्मा, यूनीक पब्लीशर्स
5)https://www.linkedin.com/pulse/challenges-opportunities-infrastructure-development-india
6)https://www.tarunbharat.net/Encyc/2023/3/4/Infrastructure-development by-Prime- Minister-Modi.html
7) https://en.wikipedia.org/wiki/Roads_in_India
8)https://en.wikipedia.org/wiki/Ministry_of_Road_Transport_and_Highways
9)https://www.researchgate.net/publication/338066888_Highways_and_Road_ Development_in_India_Progress_and_Prospects


***

# कामकाजी महिलाएं एवं भूमिका संघर्ष


## डॉ. तृप्ती पंचोली

शोधार्थी, मोहनलाल सुखाड़िया विश्वविद्यालय, उदयपुर



**सार :**

आधुनिक युग में कामकाजी महिलाओं को घर एवं बाहर की दोहरी भूमिकाओं का निर्वाह करना होता है। ये भूमिकाएं परस्पर विरोधी है अतः उन्हें भूमिका–संघर्ष का सामना करना पड़ता है। परिणाम स्वरूप जो पारिवारिक असंगतियां, तनाव एवं कार्यकारी सम्बन्धों में संघर्ष जैसी परिस्थितियां उत्पन्न हुई हैं। पारिवारिक असंगतियों का प्रभाव एक ओर स्वये एवं दूसरी ओर कार्यक्षेत्र पर पड़ता है। प्रस्तुत लेख में कामकाजी महिलाओं के माध्यम से उनमें हो रही भूमिका संघर्ष की चर्चा की है।



**संकेत शब्द** : जेण्डर, कामकाजी महिला, भूमिका संघर्ष, पारिवारिक असंगतियां


समाजशास्त्रियों के लिए गैर–बराबरी के प्रश्न शाश्वत रहे हैं, प्रारम्भ में यह माना जाता था कि गैर–बराबरी एक स्वाभाविक प्रक्रिया है, सामाजिक व्यवस्था का यह एक स्वाभाविक आचरण है, और ईश्वरी इच्छा के अनुरूप यह समाज में व्याप्त है, इसे सहज रूप में स्वीकार कर लेना चाहिए, किन्तु धीरे–धीरे आधुनिक समय में, उन संदर्भों की व्याख्या की जाने लगी जिनमें गैर–बराबरी की उत्पत्ति को अन्य संदर्भों में देखा जाने लगा। यह बात विशेष रूप से समूहों और व्यक्तियों के बीच के अन्तरों के माध्यम से और अधिक समझी जाने लगी। आधुनिक समय में गैर–बराबरी की ये व्याख्याएं समाजशास्त्रियों में अपने ही तरीके से विश्लेषित की गई हैं और समाज व्यवस्थाओं के माध्यम से इन्हें समझने का प्रयास भी किया गया।

आज के युग में बराबरी समाज का प्रमुख लक्ष्य है। बराबरी लाने की अपनी मीमासाएं हैं और आधुनिक समाज के बहुत से आन्दोलन बराबरी लाने के उद्देश्य के साथ जुड़े हैं। भारत के प्रथम प्रधानमंत्री पण्डित नेहरु (1989) का यह मानना था कि वर्तमान युग

की आत्मा बराबरी के साथ जुड़ी हुई है। उन्होंने इतिहास की अपनी व्याख्या की थी। बहुत कुछ वामपंथी चिन्तन से प्रभावित नेहरू ने यह माना था कि अंततः गैर–बराबरी के स्थान पर सामाजिक बराबरी स्थापित होनी चाहिए।

वर्तमान में गैर–बराबरी के प्रश्न सार्वभौमिक हैं। समाजशास्त्रियों का मानना है कि गैर–बराबरी का सम्बन्ध समाज में किसी समूह या समूहों में विभिन्न व्यक्तियों को मिलने वाले पुरस्कार तथा अवसरों की भिन्नता से है। यदि बराबरी को कानूनी, अवसरों, या प्राप्तियों की बराबरी की आकांक्षा के रूप में देखा जाए तो गैर–बराबरी के सारे संदर्भ बहुत पुराने हैं। वर्तमान में यदि गैर–बराबरी के कारकों अथवा प्रभावों के देखा जाए तो वर्ग, जेण्डर, नृजातीयता तथा निवास समाजशास्त्रीय परिप्रेक्ष्य से गैर–बराबरी के सवालों के साथ जुड़े हुए हैं।

पिछले कुछ वर्षों से समाजशास्त्रियों ने जेण्डर सम्बन्धी दृष्टिकोणों को अपने अध्ययन के लिए स्वीकार किया है। महिला और पुरूषों के बीच की गैर–बराबरी को अब समाजशास्त्री महज शारीरिक लक्षणों के आधार पर अन्तर के रूप में स्वीकार नहीं करते। इस सम्बन्ध में उनकी सोच के स्वरूप बदल गए हैं तथा यह समाज की व्यवस्था के अनुसार परिस्थितियों का निर्माण है। न केवल यह विशुद्ध सामाजिक रचना है बल्कि कई प्रकार से यह सामाजिक शक्तियों द्वारा निर्मित है।

**ओकले** (1976) जिन्होंने समाजशास्त्र में जेण्डर अवधारणा प्रतिपादित की थी, ने यौन और जेण्डर में अन्तर किया। उनके अनुसार यौन महिला और पुरूष के बीच जैविकीय विभाजन है, जबकि जेण्डर सामाजिक समानान्तर गैर–बराबरी है जो स्त्रीत्व (Feminity) तथा पुरूषत्व (Masculinity) के आघार पर बंटी हुई है।

इस प्रकार जेण्डर शब्द महिला और पुरूषों के बीच समाज द्वारा रचित अन्तरों के साथ सम्बन्धित है। न केवल इसका सम्बन्ध व्यक्तिगत पहचान से है, बल्कि साथ ही साथ मूल्यों, मानकों, वैचारिकी और जीवनशैली के निर्माण की व्याख्या भी इसके साथ जुड़ी हुई है।

जेण्डर के इस प्रकार के परिप्रेक्ष्य का सम्बन्ध उन भूमिकाओं से है जो समाज में महिला और पुरूषों को अलग–अलग बांटती है। पहले ऐसा विचार किया जाता था कि ये भूमिकाएं शारीरिक आधार पर तय हुई हैं, लेकिन धीरे–धीरे इस अन्तर का सम्बन्ध उस संस्तरण से जोड़ा जाने लगा, जो श्रेष्ठता एवं निम्नता के सम्बन्धों के साथ देखा जाता था। दुनिया का कोई समाज ऐसा नहीं है जिसमें महिला और पुरूषों के बीच गैर–बराबरी जेण्डर के आधार पर तय नहीं कि गई हो। इस प्रकार गैर–बराबरी का प्रभाव जीवन के अवसर तथा उन संभावनाओं पर पड़ता है जो किसी राज्य द्वारा गारन्टी दिए जाने के बावजूद नहीं मिलते, किसी भी संस्कृति में महिला और पुरूषों के सम्बन्ध में ऐसे सांस्कृतिक उदाहरण देखने में नहीं मिलता, जिसमें महिला की श्रेष्ठता मौजूद हो। मातृसत्तात्मक संस्थाएं इसका अपवाद हो सकती हैं। प्रकार्यात्मक परिप्रेक्ष्य में यह कहा गया है कि महिला और पुरूषों को निर्धारित कार्य इसलिए दिए गए हैं क्योंकि वे उनकी शारीरिक रचना के अनुकूल हैं। प्रकार्यात्मक संरचना में समाजशास्त्रियों ने इस विभेदीकरण को स्वाभाविक, सुविधाजनक और व्यावहारिक माना कि स्त्रियां घरेलू तथा पारिवारिक संगठन का कार्य करें और पुरूष शारीरिक श्रम तथा मेहनत का काम करें (**मरडॉक, 1949**)। लेकिन इस परिप्रेक्ष्य की अनेकों आलोचनाएं हैं जो इस बात को स्वीकार नहीं करती कि ऐसी व्यवस्था एक स्वाभाविक प्रक्रिया है।

**पारसन्स (1995)** के अनुसार सफल समाजीकरण के लिए एक स्थायी तथा सहायक परिवार आवश्यक है। इसीलिए महिला–पुरूषों के बीच परिवार में एक ऐसी व्यवस्था की आवश्यकता है जिसमें वे एक स्थायित्व पैदा कर सकें।

सामाजिक परिवर्तन की प्रक्रिया में प्रजाति, जाति, वर्ग व अन्य सामाजिक श्रेणियों में गतिशीलता के आयाम स्पष्टतः दृष्टिगोचर होते हैं। औद्योगिक क्रान्ति के पश्चात न केवल जीवनशैली व सांस्कृतिक मूल्यों में परिवर्तन आये, अपितु सामाजिक संरचना में भी व्यापक परिवर्तन उभरकर सामने आये हैं। मानव समाज के आरम्भ से ही स्त्रियां पारीवारिक एवं आर्थिक गतिविधियों में भाग लेती रही हैं। जब आदिम पुरूष शिकार पर आश्रित रहते हुए जंगल–जंगल भटकता था, तब कृषि का अविष्कार करके उसे घर–परिवार की

स्थिरता देने वाली स्त्रियां ही थीं। घरेलू कार्यों के साथ कृषि और कुटीर उद्योगों में हाथ बंटाकर वे घर–बाहर दोनों क्षेत्र संभालती हुई परिवार के लिए सुदृढ़ सामाजिक–आर्थिक आधार प्रस्तुत करती रहीं हैं।

महिलाओं की स्थिति में बहुत बड़ा परिवर्तन हुआ है औद्योगिक क्रान्ति के पश्चात् हुआ। कृषि समाज में उनके लिए रोजगार, काम आदि के अवसर बहुत थे क्योंकि वे कृषि से ही जुड़ी थी। औद्योगिक समाज में महिलाओं को काम के असंख्य अवसर प्राप्त हुए। आधुनिकीकरण की प्रक्रिया ने महिला सम्बन्धी परम्पराओं पर अपना प्रभाव डाला। **श्रीनिवास (1972)** ने पाश्चात्यीकरण की प्रक्रिया को कई अर्थों में महिलाओं की प्रस्थिति पर प्रभाव डालने वाले कारके के रूप में स्वीकार किया था। वे मानते थे कि पाश्चात्यीकरण का एक प्रभाव नए मूल्यों की उत्पत्ति था और ये नए मूल्य निरपेक्षता, समानता तथा शोषण विहीन समाज की कल्पना करते थे। इन मूल्यगत परिवर्तनों ने महिलाओं के प्रति दृष्टिकोणों पर भी प्रभाव डाला। औद्योगिक विकास के साथ महिलाओं की हर क्षेत्र में मांग बढ़ने लगी। धीरे–धीरे पूरे विश्व में महिलाएं विभिन्न प्रकार का कार्य विभिन्न स्थानों पर करने लगीं चाहे वे कारखाने, मिल या फैक्ट्री हों, सरकारी अथवा गैर–सरकारी ऑफिस। 19वीं और 20वीं सदी के आते–आते तो कामकाजी महिलाओं की संख्या में बहुत तेजी से बढ़ती जा रही है।

**कपूर (1970)** ने कहा कि ''1943 में पहली बार राशनिंग प्रणाली लागू किये जाने के दौरान और उसके बाद 1947 में देश का विभाजन होने के बाद मध्यमवर्ग की स्त्रियां बड़ी संख्या में दफ्तरों में काम करने के लिए घर से निकलीं। इस प्रकार हम देखते हैं कि मध्य और उच्च वर्ग की स्त्रियों द्वारा दफ्तरों में क्लर्क और अफसरों के रूप में नौकरी करने जाना भारत में स्वतंत्रोतर काल की घटना है।''

आज कार्यालयों, विद्यालयों, राजकीय संस्थानों आदि प्रायः सभी क्षेत्रों में महिलाएं कार्यरत हैं। वे सफलतापूर्वक राजनीतिक, प्रशासनिक, पुलिस, सामाजिक, व्यावसयायिक, साहित्यक, विधि एवं

क्रीड़ा आदि के विविध क्षेत्रों में निपुणतापूर्वक कार्य कर रही है तथा घर और बाहर के दूसरे दायित्व निभा रही हैं **(प्रकाश, 1995)**।

**कामकाजी महिला**

जीविकोपार्जन के लिए किए जाने वाले किसी भी काम को 'कामकाज' कह सकते हैं।' 'जीविकोपार्जन' शब्द से यह भी स्पष्ट होता है कि श्रम का भुगतान किया जाए। यह भुगतान पैसों के रूप में भी हो सकता है या किसी अन्य वस्तु के रूप में भी। इसी भुगतान के कारण ही 'गृहिणी' और 'कामकाजी' महिला में अन्तर आ गया है।

व्यापक अर्थ में कामकाजी महिला वह है जो अर्थोपार्जन के लिए घर या बाहर कुछ काम करती हो। **कपूर (1976)** के अनुसार कामकाजी महिला शब्द का प्रयोग प्रायः नौकरी करने वाली महिला के संदर्भ में किया जाता है। अर्थात् वे महिलाएं जो घरों के बाहर नियमित रूप से आर्थिक व व्यावसायिक गतिविधियों में व्यस्त रहती हैं।

भारत में कलकारखानों, उद्योगधन्धों सरकारी व गैर–सरकारी दफ्तरों में वेतन पर काम करने वाली तमाम महिलाएं कामकाजी महिलाएं हैं। इस अर्थ में दूसरे घरों में कार्य करने वाली महिलाएं भी कामकाजी हैं क्योंकि उन्हें इस कार्य के लिए वेतन मिलता है। इसी प्रकार जो महिलाएं अपना स्वयं का उद्योग–धंधा चलाती हैं एवं जो सक्रिय रूप से राजनीति में है वे भी कामकाजी महिलाओं की श्रेणी में आएंगी।

भूमिका स्वयं में एक अवधारणा नहीं है। यह प्रस्थिति का गतिशील या व्यावहारिक पहलू है। प्रस्थितियां धारण की जाती हैं जबकि भूमिकाओं का निर्वाह किया जाता है। समाज में किसी विशेष प्रस्थिति धारित व्यक्तिस अनुकूल भूमिका निभाने की अपेक्षाएं होती हैं। अधिकांशतः सामाजिक अपेक्षाओं के अनुरूप ही भूमिका अदा की जाती है। लेकिन अवसर ऐसे आते हैं जब व्यक्ति अपेक्षाओं के अनुसार भूमिका का पालन नहीं कर पाते या ऐसा अवसर आ जाए जब कि दो भिन्न प्रस्थितियों की भूमिका निभानी हो और उनके मानसिक अंतर्द्वन्द्व का अनुभव होने लगे तो उसे भूमिका संघर्ष कहा जाएगा। जब कामकाजी महिलाएं घर व बाहर की विरोधी भूमिकाओं

में सामंजस्य व समन्वय स्थापित नहीं कर पाती हैं तो उनके व्यवहारों, आचरणों में असंगतियां उत्पन्न हो जाती है, जिसे पारिवारिक असंगति कहते हैं।

कामकाजी महिलाओं को अपनी विरोधी भूमिकाओं में समायोजन स्थापित करना पड़ता है। कुछ ही महिलाएं इस समायोजन को स्थापित कर पाने में सफल होती है। परन्तु जो महिलाएं उक्त भूमिकाओं में समायोजन नहीं कर पाती है उनके व्यवहार एवं आचरण में असंगतियां उत्पन्न होती हैं। परिणामस्वरूप पारिवारिक विघटन, गृह क्लेष, मानसिक तनाव, कार्यशीलता में कमी, दबाब, कार्यकारी सम्बन्धों पर पड़ने वाले परिणाम, पति–पत्नी में आपसी अनबन एवं टकराव, बच्चों के पालन–पोषण पर उचित ध्यान न देना, दैनिक कार्यों के प्रति उदासीनता आदि समस्याओं का सामना करना पड़ता है। प्रश्न यह है कि क्या पारिवारिक असंगतियों के कारण उनके कामकाजी महिलाओं में तनाव का निर्माण हो रहा है? इन असंगतियों के क्या परिणाम हो रहे हैं? कार्यस्थलीय असंगतियों के कारण एवं परिणामों क्या है? इन प्रश्नों के तथ्यात्मक उत्तर समाजशास्त्र के लिए महत्वपूर्ण हैं। इसी दृष्टिकोण से उदयपुर शहर के शैक्षणिक एवम् बैंकिग क्षेत्र में कार्यरत विवाहित महिलाओं से गहन साक्षात्कार कर जानकारी प्राप्त की गई।

**कामकाजी महिलाएं एवं पारिवारिक असंगतियां**

किसी भी व्यक्ति का व्यक्तित्व उसके सामाजीकरण पर आधारित होता है। महिलाओं के सन्दर्भ में देखें तो विवाहोपरांत नये परिवार के साथ समायोजन की क्षमता भी उसके सामाजीकरण का एक पहलू हैं। विवाहित महिला द्वारा नौकरी करने की जो लहर आई है उसके कारण उनको दोहरी भूमिकाओं का निर्वाह करना पड़ता हैं जिसमें वे कठिनाई महसूस करती हैं। बदलते सामाजिक परिवेश में उन्हें एक साथ कई भूमिकाए निभानी पड़ती है। घर पर आदर्श गृहिणी के रूप में, एक आदर्श पत्नी के रूप में, एक आदर्श मां के रूप में, तथा नौकरी में विभिन्न भूमिकाओं, कहीं न कहीं संघर्ष देखने को मिलता है, यही उनका भूमिका–संघर्ष है।

इसी संदर्भ में कामकाजी महिलाओं से बात की गई तो अध्ययन निदेर्शित अधिकांश महिलाओं ने (50%) कहा कि उनके

पारिवारिक सम्बन्ध सामान्य है कुछ महिलाओं ने कहा (33%) उनके पारिवारिक सम्बन्ध मधुर है एवं कुछ महिलाओं ने कहा कि (17%) उनके पारिवारिक सम्बन्ध तनावपूर्ण है। जिन महिलाओं ने तनावपूर्ण सम्बन्ध बताए उन्हें उनके कारण पूछने पर बताया कि वे घर के कार्य को ठीक से समय पर नहीं कर पातीं, इसी प्रकार वे बच्चों तथा परिवार के अन्य सदस्यों को समय नहीं दे पाती इसी कारण उनके सम्बन्ध तनावपूर्ण हैं। इसी संदर्भ में जब उनसे पूछा गया कि उनके नौकारी करने के कारण उनके परिवार में तनाव है तो अधिकांश महिलाओं ने (89%) ने कहा तनाव नहीं है केवल 17 प्रतिशत महिलाओं ने कहा कि उनके परिवार में तनाव है।

इन महिलाओं से पारिवारिक तनाव के विभिन्न कारणों का पता लगाने के पश्चात् यह प्रश्न किया गया कि आपकी दृष्टि में पारिवारिक तनाव के लिए उत्तरदायी सदस्य कौन है? तो निम्न जानकारी प्राप्त हुई–

**सारणी 1. पारिवारिक असंगतियां एवं तनाव के लिए उत्तरदायी सदस्य**

| असंगतियां | प्रतिशत |
|---|---|
| पति | 31.00 |
| सास–ससुर | 20.00 |
| बच्चे | 13.00 |
| रिश्तेदार | 10.00 |
| कार्यालयीन परिस्थितियां | 26.00 |
| **योग** | **100.00** |

अतः स्पष्ट है कि जिन कार्यरत महिलाओं के परिवार में तनाव था उनमें से 31 प्रतिशत महिलाओं ने पति, 20 प्रतिशत महिलाओं ने सास–ससुर एवं 13 प्रतिशत महिलाओं ने बच्चे, 10 प्रतिशत महिलाओं ने रिश्तेदार एवं 26 प्रतिशत महिलाओं ने कार्यालयीन परिस्थितियों को जिम्मेदार ठहराया। उनसे प्राप्त जानकारी में यह भी पाया गया कि कामकाजी महिलाओं को काम में परिवार का सहयोग प्राप्त होता है। अधिकांश महिलाओं ने (54%) ने

कहा कि उन्हें परिवार का सहयोग प्राप्त नहीं होता है। केवल (46%) महिलाओं ने कहा कि उन्हें परिवार का सहयोग प्राप्त होता है। यह सहयोग खाना बनाने, बच्चों की देखभाल, घर की सफाई, बाजार से सामान लाना आदि में मिलता है। जिन महिलाओं को परिवार का सहयोग प्राप्त नहीं होता वे स्वयं ही सारा काम अकेले करती है इसलिए उनके व्यवहार में असंगतियां देखी गईं, जिससे भूमिका संघर्ष उत्पन्न हो जाती है।

कामकाजी महिलाओं के पारिवारिक जीवन में उत्पन्न बाधाओं के बारे में पूछने पर उन्होंने अनेक कारण बताएं जैसे, बच्चों को समय न देना, घर का काम समय पर न कर पाना, बच्चों के व्यक्तित्व विकास में सहयोग न दे पाना, पति से वैचारिक मतभेद होना आदि।

**कामकाजी महिला एवं कार्यस्थलीय**

कार्यस्थल पर कामकाजी महिलाओं के अपने अधिकारियों, सहकर्मियों व अधीनस्थ कर्मचारियों से कार्यों के आधार पर सम्बन्ध बनते, विकसित होते और बिगड़ते रहते हैं। अपने उच्च अधिकारी से कामकाजी महिलाओं के प्रति व्यवहार के बारे में पूछने पर कई महत्वपूर्ण तथ्य सामने आए।

**सारणी 2. अधिकारी का कामकाजी महिलाओं के प्रति व्यवहार**

| **व्यवहार** | **प्रतिशत** |
|---|---|
| सन्तोषजनक | 30.00 |
| सामान्य | 50.00 |
| असंतोषजनक | 20.00 |
| **योग** | **100.00** |

अधिकांश महिलाओं ने (50%) कहा कि अधिकारी का उनके प्रति व्यवहार सामान्य है। उसी प्रकार (30%) महिलाओं ने कहा कि अधिकारी का उनके प्रति व्यवहार संतोषजनक तथा (20%) महिलाओं ने कहा कि उनके प्रति व्यवहार असंतोषजनक है। अपने उच्च अधिकारियों के व्यवहार से असंतुष्ट महिलाओं से जहां उनके कारण पूछे तो उन्होंने जातिवादी प्रवृत्ति, सहानूभूतिपूर्ण रवैया न होना आदि कारण बताए।

इसी संदर्भ में कार्यरत महिलाओं से कार्यालयी सहकर्मियों से सम्बन्धों के बारे में पूछने पर अधिकांश (50 प्रतिशत) महिलाओं ने ये सम्बन्ध सामान्य होने की बात कही। 30 प्रतिशत महिलाओं ने सम्बन्ध मधुर होने की बात कहीं तथा 20 प्रतिशत महिलाओं के सम्बन्ध तनावपूर्ण बताए। ये तनाव वैचारिक एवं स्वभावगत विशेषता, दोगली नीति एवं दिखावे की प्रवृत्ति आदि कारण के कारण है। कार्यरत महिलाओं से जब पूछा गया कि कष्ट के समय सहकर्मियों से सहयोग प्राप्त होता है क्या तो अधिकांश महिलाओं ने (66 प्रतिशत) कहा कि उन्हें सहयोग प्राप्त होता है। 20 प्रतिशत ने कहा कि उन्हें सहयोग कभी–कभी प्राप्त होता है। तथा 14 प्रतिशत महिलाओं ने कहा कि उन्हें सहयोग प्राप्त नहीं होता है। उन्होंने बताया कि मुख्यतः यह सहयोग कार्यालय के काम में कार्यालयों में आने वाली समस्याओं को सुलझाने में प्राप्त होता है। महिलाओं को सहयोग प्राप्त नहीं होने के कारण पूछने पर सहयोगियों से उनके सम्बन्ध तनावपूर्ण होना है।

**कामकाजी महिलाएं एवं पारिवारिक असंगतियों के परिणाम**

कामकाजी महिलाओं की दोहरी भूमिका के कारण पारीवारिक असंगतियों के प्रभाव स्वयं एवं कार्यक्षेत्र दोनों जगहों पर देखने को मिलते हैं। पारीवारिक असंगतियों का स्वयं पर प्रभाव पूछने पर इस संदर्भ में (30%) महिलाओं ने मानसिक तनाव, चिड़चिड़ापन, व्यक्तिवादी की प्रवृत्ति का निर्माण तथा (50%) महिलाओं ने कहा कि सहनशीलता का अभाव, कर्तव्यों की उपेक्षा एवं (20%) महिलाओं ने कार्यक्षमता पर विपरीत परिणाम होता है बताया।

कामकाजी महिलाओं के पारीवारिक असंगतियों का नौकरी पर भी प्रभाव होता है अधिकांश महिलाओं ने (42 प्रतिशत) कहा कि उन्हें काम पर जाने के लिए देर हो जाती है, कुछ (25 प्रतिशत) महिलाओं ने कहा कि नौकरी में घर की, बच्चों की अधूरे छोड़े कार्यों की, सास–ससुर की चिंता बनी रहती है तथा कुछ (33 प्रतिशत) महिलाओं ने कहा कि पारिवारिक चिंता के कारण वे कार्य ठीक तरह से नहीं कर पाती है। इससे उनके कार्य पर प्रभाव पड़ता है उन्हें अधिकारी के क्रोध का शिकार होना पड़ता है तथा कुछ को नौकारी

पर देर से पहुंचने की वजह से तनख्वाह कट जाती है, जिससे उन्हें मानसिक संताप झेलना पड़ता है।

**निष्कर्ष**

आज महिलाओं का कामकाजी होना आधुनिकता का परिणाम है। शिक्षा एवं.पाश्चात्यीकरण का प्रभाव भी कहा जा सकता है। लिंग समानता के क्षेत्र का आज कामकाजी महिला प्रतिनिधित्व कर रही है। आज वह अपनी घर एवं बाहर की दोहरी भूमिका की पूर्ण क्षमता के साथ निभा रही है फिर भी पारंपारिक घर की भूमिका से आज उसे मुक्ति नहीं मिल पाई है आज भी समाज की अपेक्षा उससे वहीं है घर और कार्यक्षेत्र के दोहरे बोझ के कारण कामकाजी महिलाओं की भूमिका संघर्ष का सामना करना पड़ रहा है। आज महिलाएं कार्यरत होने के कारण उनकी दोहरी भूमिका के कारण उनके पारिवारिक एवं कार्यस्थलीय संबंध प्रभावित हुए है। आज उन्हें पारीवारिक असंगतियों व्यक्तिगत तनाव एवं कार्यस्थलीय क्षेत्र में भी अनेक समस्याओं का सामना करना पड़ रहा है। जिसमें उन्हें कभी–कभी परिवार तथा कार्यस्थल के सदस्यों द्वारा अपेक्षाकृत सहयोग प्राप्त हो रही है। फिर भी वे आज घर तथा कार्यक्षेत्र की भूमिका के कारण भूमिका–संघर्ष से गु जर रही है।

**सन्दर्भ**


1. कपूर, प्रमिला (1970), मेरिज एण्ड वर्किंग विमेन इन इण्डिया, दिल्ली : राजकमल।
2. कपूर, प्रमिला (1970), भारत में विवाह और कामकाजी महिलाएं, दिल्ली : राजकमल।
3. Murdock, J. (1949), *Social Structure*, New York : Macmillan.
4. Nehru Jawaharlal (1989), The Discovery of India, Delhi : Oxford.
5. Onkly, Ann (1976) Housewife, London : Allenlane
6. Parsons, T. and R.F. Bales (eds) (1995), Family, Socialization and Interaction, New York : The Free Press.
7. प्रकाश, उर्मिला (1995), नारी, नव जागरण और महिला उपान्यसकारों की स्त्री–पुरूष परिकल्पना, पिलानी : चिंतरा प्रकाशन।
8. Shrinivas, M.N. (1972) Social Change in Modern India. New Delhi : Orient Longmon.


***

# भारत G20

## ''वसुधैव कुटुंम्बकम्''

**सौ. भारती बेदील माने**

ग्रंथपाल दादासाहेब जोतिराम गोडसे आर्टस्, कॉर्मस्, सायन्स कॉलेज वडूज ता. खटाव जि. सातारा

---

भारत देश हा जगासाठी एक मोठी बाजारपेठ आहे. जिथे इतर देशांची दुकान थाटण्याची मोठी स्पर्धा आहे. 1997 मध्ये अशियाई आर्थिक संकटानंतर जागतिक आर्थिक समस्यांवर चर्चा करण्यासाठी G20 लॉच करण्यात आली. 2007 मध्ये जेव्हा त्यात सदस्य देशाच्या राष्ट्रप्रमुखाचा समावेश होता. संपूर्ण जग आर्थिक मंदीच्या गर्तेत आली तेव्हा या समुहाच महत्व आणखी वाढल.

1999 च्या आधी अशिया खंडातील देश आर्थिक संकटाचा सामनाच्या पार्श्वभूमीवर जर्मनीमध्ये G-8 देशांची बैठक झाली आणि त्यांनी G-20ची स्थापना केली या परिषदेत 20 देशाचे अर्थमंत्री आणि केंद्रीय बॅक गव्हर्नरना बोलावण्यात आले. आर्थिक समस्यावर परस्पर चर्चा करुन तोडगा काढण हा या संघटनेचा मुख्य उद्‌देश होता.

1 डिसेंबर 2022हा भारतासाठी एक संस्मरणीय दिवस ठरला.याच दिवशी भारताने इंडोनेशिया कडून G20 चे अध्यक्षपद स्वीकारले. बाली शिखर परिषदेतील राष्ट्रअध्यक्ष सुमित यांच्याकडून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी G20 ची जबाबदारी स्विकारली ही जबाबदारी स्विकारताना पंतप्रधान नरेद्र मोदींनी भारताचे अध्यक्षपद हे सक्रिय, सर्वसमावेशक व महत्वकांक्षी निर्णायक असल्याचे जाहिर केले.

9 आणि 10 सप्टेंबर 2023 ला प्रगती मैदानात भारत मंडपम् दिल्ली येथे झाले G20 व्या परिषदेच्या तयारीसाठी संबधित कार्यक्रमात 1 डिसेंबर 2022 पासूनच देशभरात सुरु झाले होते हे कार्यक्रम 30 नोव्हेंबर 2023 पर्यंत सुरु राहणार असल्याची पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जाहीर केले.

**G20 परिषदेची उद्‌दिष्ठे**

जागतीक स्थरावर एकाच व्यासपीठावर सर्व सदस्य देशांसाठी समान आधार शोधने हे G20 परिषदेचे विशेष उद्‌दिष्ठ होते. ट्वेंटी ही एकुण 20 देशाच्या समुहाने वर्षातुन एकदा परिषदेसाठी एकत्र येतात आणि जगभरातील आर्थिक मुद्यावर तसेच डिजीटर इनोव्हेश्न, जल वायु आणि जागतिक आरोग्य चक्राकार जैव अर्थव्यवस्था, महिला सशक्तीकरण आणि प्रतिनिधीत्व, प्लास्टिक प्रदूषण समाप्त कायदा, सागरी जैविक विविधतेचे संरक्षण व सागरी कायदे- करार, क्रिष्टोग्राफी आणि क्वांटम् अल्मेरीदमचा शोध, नैसर्गिक धोके व आपत्ती व्यवस्थापन उपाययोजना, शाश्वत विकास, कृषीऊर्जा, भ्रष्टाचाराविरोधी विषयांवर चर्चा G20 या परिषदेश अध्यक्षपद भूषवणा-या देशांच मुख्य कार्य म्हणजे एका विशिष्ट विषयावर सर्व देशांमध्ये एकमत निर्माण करण.

8 नोव्हेंबर 2022 रोजी पंतप्रधानांनी G20 चा लोगो लॉच केला, लोगोची रचना राष्ट्रध्वजाच्या रंगात करण्यात आला यात कमळामध्ये पृथ्वी विराजमान आहे G20 प्रेसीडेंसी थीमच अनावरण करताना पंतप्रधान नरेंद्र मोदीनी ‘वसुधैव कुटुंम्बकम् म्हणजेएक पृथ्वी एक कुटुंब, एक भविष्य, जाहीर केला. भारत इंजेनेशिया आणि  झीलच्या मदतीन G20 च्या कारभार पहात होते.

G20 परिषदेत अर्जेटिना, ऑस्ट्रेलिया, ब्राझील, कॅनडा, चीन, फ्रान्स, कोरिया, प्रजासत्ताक, मेक्सिको, रशिया, सौदी अरेबिया,दक्षिण अफ्रिका, तुर्की, युके, अमेरिका, आणि युरोपियन युनियन यांचा समावेश

होता, भारताने बांगलादेश, इंजिप्त, नेदरलॅड, मॉरिशिस, नायजेरिया, सिंगापूर, स्पेन, संयुक्त, अरब, अभिराती, ओमान, या देशानाही विशेष आमंत्रित केल होत, G20 शिखर परिषदेत 112 प्रस्तावना संमत केल गेल त्यांच्यावर सर्व देशांनी सह्या केल्या. G20 शेरपाचे अमिताभ कांत म्हणाले की G20 च्या इतिहासातील सर्वात महत्वकांक्षी ही परिषद होय.

G20 या समन्य जनतेला फायदा काय एक तर जागतीक अर्थव्यवस्था मजबूत करण्यावर व प्रोत्साहनामुळे देशांमध्ये रोजगाराच्या अधिक संधी निर्माण होतात, शिक्षण, अन्नधान्याच्या किंमती नियंत्रित करण, रोजगारात वाढ आशा मुद्यावर भर देण्यात आला. 9 व 10 सप्टेंबर 2023 च्या G20 च्या दोन दिवसात ‘भारतात वसुधैव कुटुंबकम’ म्हणत भारताने परदेशी पाहुण्यांच स्वागत केल की नवा इतिहास घडविण्यासाठी भारत सज्ज झाला.

आंतरराष्ट्रीय पातळीवरील तणावांचा सामना करण्यासाठी G20 गटांची भूमिका मांडताना द्विराष्ट्र सिध्दांत हा भाग असल्याने भारताचे मत आहे सर्व भूराजकीय समस्यांवर रचनात्मक पध्दतीने तोडगा काढण्यासाठी सर्वांनी एकत्र येण्याची गरज आहे असे मत परराष्ट्र राज्यमंत्री व्ही मुरलीधरन यांनी व्यक्त केले दहशतवाद निषेध करण्यासाठी भूमिका मांडली व भूराजकीय वादावर तोडगा काढणे आवश्यक असल्याची मत व्यक्त केले.

G20 परिषदेच्या माध्यमातून मजबूत, शाश्वत संतुलित आणि सर्व समावेशक विकासात गती आणण्याच आणि शाश्वत विकासासाठी 2030 अजेंडाची संपूर्ण प्रभावी अंमलबजावणी करण्याचा वचन बध्दतेची पुनरुच्चार केला ती साकारण्यासाठी एम. एस.एम ई. ची मध्यवर्ती भूमिका आधोरेकित करण्यात आली, यातून राष्ट्रीय लघु उद्योगाला चालना मिळून तरुणाच्या विचारांची कक्षा विस्तृत करण्याचा संदेश दिला 2047

मध्ये जेव्हा भारत देश स्वातत्र्याची 100 वर्षे साजरी करेल तेव्हा भारत एक विकसित राष्ट्र असेल असेल पंतप्रधान मोदींनी उद्दिष्ट मांडल आहे. G20 या एकत्रित परिणाम म्हणजे देश म्हणून आपली ताकद जगाला दाखवण्यात भारत यशस्वी ठरत आहे. भारतात G20 परिषदेसाठी आलेल्या सर्व परदेशी पाहुण्याच भारतीय संस्कृती नुसार "अतिथि देवो भव" या उक्तीस साजेस मोठ्या दिमाखात स्वागत झाल " वसुधैव कुटुंबकम्" म्हणत नव इतिहास रचना 10 सप्टेंबर 2023 ला तिसर सत्र पार पडल. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी G20 ची सुत्र ब्राझीलचे राष्ट्रपती लुईज इनासियो लूला डी सिल्वा यांच्याकडे सूपूर्द केला.

**॥ जय भारत ॥**

**संदर्भ -**


1) V. Srinivas : G20 @ 2023 The RGADMAP TO INDIA PRESTDINCY HARSH VADDHAN & HRINGIA
2) न्यू इंडिया समाचार : मार्च २०२३
3) कुरुक्षेत्र ग्रामीण भारत मे प्रतिभा


***

# योग आणि भारत

**Dr. Naresh P. Borkar**
Smt. Rewaben Manoharbhai Patel Mahila Mahavidyalaya, Bhandara

**प्रस्तावणा :-**

योग हा एक आध्यात्मिक आणि शारीरिक सराव असून योगाचा उगम प्राचीन भारतात झालेला आहे. योग, आरोग्य आणि सामाजिक कल्याणासाठी एक समग्र दृष्टीकोन आहे, जो शारीरिक मुद्रा, श्वास घेण्याची तंत्रे, ध्यान आणि नैतिक तत्त्वे एकत्रित करतो. योगाची उत्पत्ती सुमारे 5000 वर्षांपूर्वी सिंधू संस्कृतीत सापडते. तथापी, भारतीय इतिहासाच्या शास्त्रीय कालखंडात, इ.स.पूर्व 800 ते इ.स. 500 दरम्यान योग अधिक संहिताबद्ध आणि पद्धतशीर झाला. भारतात या काळात, सांख्य योग आणि वेदांत शाळा हया अनेक तात्विक विचारधारा उदयास आल्या. या शाळांनी योगाशी संबंधित विविध संकल्पना आणि पद्धती विकसित केल्या, जसे की स्वतःची म्हणजे आत्माची कल्पना, वास्तवाचे स्वरूप म्हणजे ब्रह्म, आणि मुक्तीचा मार्ग म्हणजे मोक्ष. योग शाळेने, विशेषतः, योगाची एक सर्वसमावेशक प्रणाली विकसित केली ज्यामध्ये शारीरिक मुद्रा म्हणजे आसन, श्वास तंत्र म्हणजे प्राणायाम, ध्यान, आणि नैतिक तत्त्वे म्हणजे यम आणि नियम यांचा समावेश होता.

पतंजलीची योग सूत्रे, योग तत्त्वज्ञान आणि अभ्यासाच्या सर्वात महत्त्वाच्या ग्रंथांपैकी एक मानली जाते. हे योगाच्या आठ अंगांची रूपरेषा स्पष्ट करते, ज्यात नैतिक तत्त्वे, शारीरिक मुद्रा, श्वासोच्छवासाची तंत्रे, एकाग्रता, ध्यान आणि समाधी म्हणजे आध्यात्मिक ज्ञानाची अवस्था यांचा समावेश होतो. योगाच्या विकासावर या मजकुराचा महत्त्वपूर्ण प्रभाव पडला आणि आजही त्याचा अभ्यास आणि सराव सुरू आहे. योग सुरुवातीला स्वयं–शिस्तबद्ध पध्दतीने भारतातील योगींनी केला होता ज्यांनी भौतिक जगाच्या पलीकडे जाण्याचा आणि आध्यात्मिक मुक्ती मिळविण्याचा प्रयत्न केला. कालांतराने, योग देखील मोठ्या लोकसंख्येसाठी अधिक सुलभ झाला. योग हे अशा लोकांनी स्वीकारले होते, ज्यांनी त्यांचे आरोग्य

सुधारण्याचा, तान–तणाव कमी करण्याचा आणि अधिक परिपूर्ण जीवन जगण्याचा प्रयत्न केला.

भारतातील मध्ययुगीन काळात योगाचा विकास आणि प्रसार होत राहिला. यात भक्ती चळवळीने वैयक्तिक देवाच्या भक्तीवर जोर दिला, योग पद्धतींना त्यांच्या धार्मिक विधींमध्ये समाविष्ट करुन त्यातुन भक्ती योगाचा विकास झाला, योगाचा एक प्रकार जो वैयक्तिक देवांबद्दल भक्ती आणि प्रेमावर जोर देतो. हठ योग परंपरा देखील या काळात उदयास आली, ज्याने शरीर शुद्ध करण्यासाठी आणि आध्यात्मिक अभ्यासासाठी तयार करण्याचे साधन म्हणून शारीरिक मुद्रा आणि श्वासोच्छवासाच्या तंत्रांवर जोर दिला. हठ योग प्रदिपिका आणि घेरंडा संहिता यासारखे हठ योग ग्रंथ, विविध आसन आणि प्राणायाम तंत्रांबद्दल तपशीलवार मार्गदर्शन करतात.

20 व्या शतकात, योगाला पाश्चिमात्य देशांमध्ये, विशेषतः युनायटेड स्टेट्समध्ये लोकप्रियता मिळू लागली. हे स्वामी विवेकानंद, परमहंस यांसारख्या योग शिक्षक आणि गुरूंच्या प्रयत्नांमुळे झाले. योगानंद आणि बी.के.एस. अय्यंगार, यांनी पश्चिमेकडे प्रवास केला आणि पाश्चात्य लोकांना योगाची ओळख करून दिली. आज, जगभरातील लाखो लोक योगाचा अभ्यास करतात त्यामुळे योग व्यायाम आणि विश्रांतीचा एक लोकप्रिय प्रकार बनला आहे. सुधारित लवचिकता, सामर्थ्य, संतुलन आणि हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी आरोग्य तसेच तणाव, चिंता आणि नैराश्य कमी करण्याची क्षमता यासह अनेक आरोग्य फायद्यांसाठी योग महत्वपूर्ण ठरले आहे.

भारतात, योग हा देशाच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वारसाचा एक महत्त्वाचा भाग बनलेला आहे. योग हे शाळा आणि विद्यापीठांमध्ये शिकवले जाते आणि देशभरात असंख्य योग केंद्रे आणि आश्रम आहेत. 2014 मध्ये, योगाची जागतिक लोकप्रियता आणि महत्त्व साजरे करण्याचा दिवस म्हणून भारत सरकारने 21 जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून घोषित केला. हजारो वर्षांचा भारतातील योगसाधनेचा समृद्ध आणि गुंतागुंतीचा इतिहास कालांतराने विकसित झालेला आहे. विविध तात्विक, धार्मिक आणि सांस्कृतीक प्रभाव या अंतर्गत आज जगभरात योगाचा सराव केला जातो आणि

त्यामुळे योग हा भारताच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वारसाचा तो एक महत्त्वाचा भाग झालेला आहे.

## ➢ योग एक भारतीय वारसा :-

योग हा भारताचा सर्वात मोठा सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वारसा मानला जातो. "योग" हा शब्द संस्कृत शब्द "युज" पासून आला आहे, ज्याचा अर्थ एकत्र येणे किंवा जोडणे असा होतो. योगाच्या सरावाचे उद्दीष्टये शारीरिक मुद्रा, श्वासोच्छवासाचे तंत्र आणि ध्यान यांच्या मालिकेद्वारे वैश्विक चेतनेला वैयक्तिक चेतनेशी जोडणे आहे.

योगाचा इतिहास भारतातील प्राचीन सिंधू संस्कृतीपर्यंत 5,000 वर्षांपूर्वीचा आहे. योगाच्या सरावाचे वर्णन हिंदू धर्मातील सर्वात जुने पवित्र ग्रंथ वेदांमध्ये केले गेले. कालांतराने, योग विकसित झाला आणि विविध शैली आणि परंपरांच्या श्रेणीमध्ये विकसित झाला, प्रत्येकाचा स्वतःचा विशिष्ट दृष्टीकोन आणि तत्त्वज्ञान. संपूर्ण इतिहासात भारतीय संस्कृती आणि अध्यात्मात योगाने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. हे वैयक्तिक विकास आणि आत्म–प्राप्तीसाठी तसेच शारीरिक, मानसिक आणि भावनिक कल्याण साधण्याचे साधन म्हणून वापरले गेले आहे. योग भारताच्या धार्मिक परंपरांमध्ये, विशेषतः हिंदू, जैन आणि बौद्ध धर्मात खोलवर रुजलेला आहे.

अलिकडच्या वर्षांत, योगाची लोकप्रियता भारताच्या सीमेपलीकडे पसरली आहे आणि ती एक जागतिक घटना बनली आहे. आज, जगभरातील लाखो लोक योगाचा सराव करतात, ज्यामध्ये अनेक भिन्न शैली आणि परंपरा शिकविल्या जातात आणि सराव केला जातो.

जागतिक लोकप्रियता असूनही, योग हा भारताच्या सांस्कृतिक वारसाचा एक महत्त्वाचा भाग आहे. भारत सरकारने देशाच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरांचे जतन आणि उत्सव साजरा करण्याचा एक मार्ग म्हणून योगास प्रोत्साहन देण्यासाठी पावले उचलली आहेत. 2014 मध्ये, या प्राचीन प्रथेचे जागतिक महत्त्व ओळखून संयुक्त राष्ट्रांनी 21 जून हा आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून घोषित केला.

## ➢ भारतातील सर्वोत्तम योग अभ्यासक्रम :-

देशाचा समृद्ध इतिहास आणि योगाशी संबंधित वारसा यामुळे भारतातील योग अभ्यासक्रमांना खूप महत्त्व आहे. भारत हे योगाचे जन्मस्थान मानले जाते आणि परिणामी, देशाला त्याच्या प्रामाणिक

स्वरूपात योग शिकण्याची आणि सराव करण्याची एक अतुलनीय संधी मिळते. भारतातील योग अभ्यासक्रम योग शिकण्यासाठी एक समग्र दृष्टीकोन देतात, ज्यामध्ये केवळ सरावाच्या भौतिक पैलूंचाच समावेश नाही तर तात्विक आणि आध्यात्मिक परिमाण देखील समाविष्ट आहेत. हे अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना केवळ शारीरिक व्यायामाचा संच नव्हे तर जीवनाचा एक मार्ग म्हणून योगाची सखोल माहिती देतात. याव्यतिरिक्त, भारतातील योग शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना अनुभवी शिक्षकांकडून शिकण्याची संधी देतात, ज्यांनी आपले जीवन सरावासाठी समर्पित केले आहे आणि त्यातील बारकावे समजून घेतले आहेत. यापैकी बरेच शिक्षक पारंपारिक आश्रमावर आधारित आहेत, जे एक तल्लीन अनुभव देतात जिथे विद्यार्थी योग जीवनाचा मार्ग पूर्णपणे स्वीकारू शकतात.

याशिवाय, भारतात योग अभ्यासक्रम पूर्ण केल्याने व्यक्तींना जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त प्रमाणपत्र मिळते, जे त्यांना योग प्रशिक्षक म्हणून यशस्वी करिअर बनविण्यात मदत करू शकते. योग अलायन्स सारख्या आंतरराष्ट्रीय योग संस्थांद्वारे योग प्रमाणित म्हणून ओळखले जाते, ज्यामुळे जगभरातील योग स्टुडिओ, वेलनेस सेंटर्स आणि जिममध्ये रोजगाराच्या संधी शोधणे लोकांना सोपे जाते.

विन्यासा योग आश्रम ऋषिकेश, भारत येथे असे जीवन परिवर्तन करणारे योग शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रम ऑफर करतो जेथे कोणीही त्यांचा योग प्रवास सुरू करू शकतो किंवा त्यांच्या योग पद्धतींमध्ये खोलवर जाऊ शकतो. अत्यंत अनुभवी आणि पात्र शिक्षक त्यांचे ज्ञान सामायिक करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या संपूर्ण आरोग्यासाठी मदत करण्यासाठी येथे आहेत.

- **भारतातील योगाचे आध्यात्मिक महत्त्व :-**

भारतामध्ये योगाचे सखोल आध्यात्मिक महत्त्व आहे. अनेकदा योगाला आत्म–साक्षात्कार आणि आध्यात्मिक ज्ञान प्राप्त करण्याचे साधन म्हणून पाहिले जाते. योगाचा अभ्यास प्राचीन भारतीय अध्यात्मिक परंपरांमध्ये आणि देशाच्या संस्कृतीत आणि जीवनशैलीत खोलवर रुजलेला आहे. योगाच्या अंतर्निहित मुख्य आध्यात्मिक तत्त्वांपैकी एक म्हणजे संघटन किंवा एकत्वाची संकल्पना होय. योग मन, शरीर आणि आत्मा यांना एकत्र आणण्याचा प्रयत्न करतो,

अभ्यासकांना त्यांना स्वतःशी आणि त्यांच्या सभोवतालच्या जगाशी जोडण्यात मदत करतो. हे संघटन अधिक जागरूकता, करुणा आणि आंतरिक शांती मिळविण्याचे साधन म्हणून पाहिले जाते.

भारतातील प्रमुख धर्मांपैकी एक असलेल्या हिंदू धर्माशी योगाचा जवळचा संबंध आहे. योगाच्या अनेक मुद्रा आणि पद्धती हिंदू पौराणिक कथांमध्ये रुजलेल्या आहेत आणि अभ्यासकांना देवाशी जोडण्यात मदत करण्यासाठी तयार केलेल्या आहेत. विशेषतः, हठ योगाचा सराव हिंदू देवता शिवाशी संबंधित आहेत, ज्याला अनेकदा बसलेल्या ध्यानाच्या आसनात चित्रित केले जाते. याव्यतिरिक्त, योगाचा सराव इतर आध्यात्मिक पद्धतींसह केला जातो, जसे की ध्यान, प्राणायाम म्हणजे श्वास घेण्याचे व्यायाम आणि नामजप या पद्धती लोकांचे मन शांत करण्यास, आंतरिक जागरूकता विकसित करण्यास आणि देवाशी जोडण्यास मदत करण्यासाठी तयार केल्या आहेत.

भारतात अनेक योग आश्रम आणि अभ्यास केंद्रे आहेत, जिथे अभ्यासक योगाच्या अभ्यासात मग्न होऊ शकतात आणि त्याचे आध्यात्मिक परिमाण विकसित करू शकतात. ही केंद्रे योग वर्ग, ध्यान सत्र, अध्यात्मिक चर्चा आणि अभ्यासकांना त्यांचा सराव सखोल करण्यास आणि त्यांच्या अंतर्मनाशी जोडण्यात मदत करण्यासाठी तयार केलेल्या इतर क्रियाकलापांसह कार्यक्रम आणि क्रियाकलापांची विस्तृत श्रेणी स्पष्ट करतात. थोडक्यात असे स्पष्ट होते की, भारतातील योगाचे आध्यात्मिक महत्त्व देशाच्या प्राचीन आध्यात्मिक परंपरा आणि सांस्कृतिक वारसा यात खोलवर रुजलेले आहे. योगास अधिक जागरूकता, आंतरिक शांती आणि आध्यात्मिक ज्ञान प्राप्त करण्याचे साधन म्हणून पाहिले जाते त्यामुळे योग हे हिंदू धर्म आणि इतर आध्यात्मिक पद्धतींशी जवळून संबंधित आहे.

### ➢ भारतातील प्राचीन योगी :-

प्राचीन भारतामध्ये योगी आणि अध्यात्मिक नेत्यांचा समृद्ध इतिहास आहे ज्यांनी देशाच्या अध्यात्मिक आणि सांस्कृतिक वारसाला आकार देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. हे योगी त्यांच्या सखोल अध्यात्मिक ज्ञानासाठी, योग आणि इतर अध्यात्मिक पद्धतींवर प्रभुत्व आणि आध्यात्मिक ज्ञानाच्या मार्गावर इतरांना मार्गदर्शन आणि प्रेरणा देण्याच्या क्षमतेसाठी ओळखले जात होते.

प्राचीन भारतातील योगींची काही उदाहरणे खालिलप्रमाणे आहेत :-

- **पतंजली :-** पतंजलीला योगाचे जनक म्हणून ओळखले जाते, आणि योग सूत्रे लिहिण्याचे श्रेय त्यांना दिले जाते, जो योगाच्या मूलभूत ग्रंथांपैकी एक आहे. ई.स.पूर्व दुसरे शतक ते इसवी सन पाचव्या शतकादरम्यान तो भारतात वास्तव्यास होता असे मानले जाते.
- **स्वामी विवेकानंद :-** स्वामी विवेकानंद हे 19 व्या शतकातील भारतीय संत होते, ज्यांनी योग आणि भारतीय अध्यात्म पश्चिमेमध्ये लोकप्रिय करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. ते महान भारतीय संत रामकृष्ण परमहंस यांचे शिष्य होते. त्यांनी रामकृष्ण मिशनची स्थापना केली, जी आजही योग आणि वेदांताच्या शिकवणींना चालना देत आहे.
- **आदि शंकराचार्य :-** आदि शंकराचार्य हे आठव्या शतकातील भारतीय तत्वज्ञानी आणि धर्मशास्त्रज्ञ होते जे वेदांवर, अव्दैत तत्वज्ञानावर, प्राचीन हिंदू धर्मग्रंथांवर भाष्य करण्यासाठी ओळखले जातात. त्यांना भारतीय इतिहासातील महान आध्यात्मिक नेत्यांपैकी एक मानले जाते, आणि त्यांच्या शिकवणींचा आजही हिंदू धर्म आणि इतर भारतीय आध्यात्मिक परंपरांवर प्रभाव पडत आहे.
- **महावतार बाबाजी :-** महावतार बाबाजी हे भारतीय अध्यात्मातील एक पौराणिक व्यक्तिमत्त्व आहे जे शतकानुशतके जगले आणि योगाच्या अभ्यासाद्वारे आध्यात्मिक ज्ञान प्राप्त केले. लाहिरी महाशय आणि परमहंस यांच्यासह इतर महान योगी आणि अध्यात्मिक नेत्यांचे गुरु म्हणून त्यांचे चित्रण केले जाते.
- **स्वामी शिवानंद :-** स्वामी शिवानंद हे 20 व्या शतकातील भारतीय योगी आणि अध्यात्मिक शिक्षक होते, ज्यांनी योग आणि वेदांत शिकवणींचा प्रचार करण्यासाठी समर्पित संस्था, डिव्हाईन लाइफ सोसायटीची स्थापना केली. अध्यात्मिक वाढ साधण्याचे साधन म्हणून कर्मयोग किंवा निःस्वार्थ सेवेवर भर दिल्याबद्दल ते प्रसिद्ध होते.

- **अनेक महान योगी :-** प्राचीन भारतातील अनेक महान योगींचेही काही उदाहरणे आहेत ज्यांनी देशाचा अध्यात्मिक आणि सांस्कृतिक वारसा घडवण्यात मदत केली आहे. त्यांच्या शिकवणी आणि पद्धती आजही जगभरातील लाखो लोकांना प्रेरणा आणि मार्गदर्शन करित आहेत.

➢ **भारतातील योगासाठी सर्वोत्तम ठिकाणे :-**

भारत हे योगाचे जन्मस्थान म्हणून ओळखले जाते आणि देशात अशी अनेक ठिकाणे आहेत जी योगासाठी प्रसिद्ध आहेत. येथे भारतातील काही शीर्ष ठिकाणे आहेत जी त्यांच्या योग अर्पणांसाठी प्रसिद्ध आहेत, ती खालीलप्रमाणे आहेत.

- **ऋषिकेश :-** हिमालयाच्या पायथ्याशी वसलेले, ऋषिकेश "जगाची योग राजधानी" म्हणून ओळखले जाते. हे अनेक आश्रम, योग केंद्र आणि योग शाळांचे घर आहे आणि जगभरातील योग प्रेमींना आकर्षित करते. ऋषिकेशमधील काही लोकप्रिय योग शाळांमध्ये परमार्थ निकेतन, शिवानंद आश्रम आणि आंतरराष्ट्रीय योग महोत्सव यांचा समावेश होतो. याशिवाय, ऋषिकेशमध्ये अनेक शाळा आहेत ज्या विविध प्रकारचे अभ्यासक्रम प्रदान करतात आणि सर्वात लोकप्रिय अभ्यासक्रम म्हणजे ऋषिकेशमधील योग शिक्षक–प्रशिक्षण अभ्यासक्रम होय.
- **म्हैसूर :-** दक्षिणेकडील कर्नाटक राज्यात वसलेले म्हैसूर हे अष्टांग योग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या योगाच्या पारंपरिक शैलीसाठी ओळखले जाते. हे शहर प्रसिद्ध अष्टांग योग संस्थेचे घर आहे, जिथे विद्यार्थी जगातील काही अनुभवी शिक्षकांकडून योगाची ही शैली शिकू शकतात.
- **केरळ :-** शांत बॅकवॉटर आणि हिरव्यागार लँडस्केपसाठी ओळखले जाणारे केरळ हे योग प्रेमींसाठी एक लोकप्रिय ठिकाण आहे. राज्यात अनेक योग केंद्रे आणि आश्रम आहेत, जसे की शिवानंद आश्रम आणि अमृतपुरी आश्रम, जे योग शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम देतात.
- **गोवा :-** गोवा हे भारतातील एक लोकप्रिय बीच डेस्टिनेशन आहे आणि त्याच्या शांत वातावरणासाठी आणि पार्टी संस्कृतीसाठी ओळखले जाते. तथापि, हे अनेक योग केंद्रे आणि रिट्रीटचे घर आहे, जसे की पर्पल व्हॅली योग रिट्रीट आणि आशियाना योग रिट्रीट. गोव्यात योग शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमही खूप लोकप्रिय होत आहे.

- **धर्मशाळा :-** हिमाचल प्रदेशच्या उत्तरेकडील भागात स्थित, धर्मशाळा हे दलाई लामा आणि तिबेट सरकारचे निर्वासित निवासस्थान आहे. तुशिता ध्यान केंद्र, हिमालयीन अय्यंगार योग केंद्र आणि सिद्धी योग धर्मशाळा यांसारखे अनेक योग केंद्रे आणि शाळांसह हे शहर योग अर्पणांसाठी देखील ओळखले जाते.
- **वाराणसी :-** वाराणसी हे भारतातील सर्वात जुने आणि सर्वात पवित्र शहरांपैकी एक आहे आणि ते त्याच्या आध्यात्मिक आणि सांस्कृतिक महत्त्वासाठी ओळखले जाते. आंतरराष्ट्रीय योग आणि ध्यान केंद्र आणि पतंजली योग केंद्र यांसारखी अनेक योग केंद्रे आणि शाळा देखील या शहरात आहेत.

## ➢ निष्कर्ष

योग हा भारताच्या सांस्कृतिक वारसाचा एक मूलभूत पैलू आहे, जो देशाच्या इतिहास, धर्म आणि अध्यात्मात खोलवर रुजलेला आहे. भारतात योगाची प्राचिन काळी सुरुवात होउन, भारतातच त्याचा विकास वेगवेगळया कालखंडात भारतातील अनेक धर्मामव्दारे होत गेला. योग ही भारताने जगाला दिलेली मोठी देणगीच होय. भारत संपूर्ण जगाला योग शिक्षण–प्रशिक्षण देण्याचे कार्य करतो. योग भारतातील हिंदू धर्म, जैन धर्म व बौध्द धर्म यांचा आत्मा आहे. भारतात अनेक ऋषी मुनींनी योगाचा विकास करुन प्रशिक्षणाचे कार्य केले आहे. भारत हे स्थान जगाला योग शिक्षण–प्रशिक्षण देण्यारे महत्वपूर्ण स्थान आहे. योग मन, शरीर आणि आत्मा यांना एकत्र आणण्याचा प्रयत्न करतो. यातुन शारिरीक स्वास्थ्य सुरक्षित केले जाते. अशारितीने भारत हे योगचे माहेरघर आहे.

## ➢ संदर्भसुची


1. Dr. Tarknath Pramanik (2015), "Yoga Education", Sports Publication, New Delhi.
2. Riyaz Ahmad Veeri (2016), "Yoga Education", Amit Brothers Publication, Dhantoli, Nagpur.
3. Piyush Jain (2006), "Yoga & Recreation", Khel Sahitya Kendra, New Delhi.
4. डॉ. तारकनाथ पगामानिक (2016), "योग शिक्षा", स्पोर्ट्स पब्लीकेशन, नवी दिल्ली.
5. डॉ. उषा गोपाल (2005), "प्राणायाम तथा यौगिक व्यायाम", स्पोर्ट्स पब्लीकेशन, नवी दिल्ली.
6. डॉ. तारकनाथ पगामानिक (2018), "योग विज्ञान", स्पोर्ट्स पब्लीकेशन, नवी दिल्ली.
7. डॉ. सुशिल कुमार व्यास (2005), "योग शिक्षा", खेल साहित्य केंद्र, नवी दिल्ली.

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये मातृभाषेचे स्थान

डॉ. पदमाकर डिगांबर वानखडे

नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय, ब्रम्हपुरी

---

आज भारत जागतिक महासत्ता बनण्याच्या मार्गावर आहे. नवनवीन शोध, तंत्रज्ञान यामुळे भारताने अनेक देशांच्या अर्थव्यवस्थेला मागे टाकले आले आहे. शिक्षण क्षेत्रातही भारत देशाने बऱ्या प्रमाणात मजल मारली आहे. शैक्षणिक क्षेत्रातील कमतरता कमी करण्याच्या हेतूने इ.स 2020 मध्ये तब्बल 34 वर्षानंतर आपल्या देशात नवीन शैक्षणिक धोरण राबवण्याचे ठरले आहे. इस्त्रोचे माजी प्रमुख के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली समितीने या धोरणाचा मसुदा तयार केला आहे. या या मसुद्यामध्ये शैक्षणिक क्षेत्रात आमूलाग्र बदल करून देशाचा विकास घडवून भारत जागतिक महासत्ता बनवण्याचा पूर्ण प्रयत्न केल्या जात आहे. भारत सरकारकडून या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला 29 जुलै 2020 मध्ये मंजुरी देण्यात आली आहे. स्वतंत्र भारतानंतर हे तिसरे शैक्षणिक धोरण असून विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे, प्रादेशिक भाषेचा वापर अधिक करणे. मातृभाषेतून व्यक्तीचा विकास घडवून आणणे. ही उद्दिष्टे या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात मध्यवर्ती ठेवले आहेत. व्यक्तीमध्ये कौशल्य असल्यास त्याचा राष्ट्रीय विकासासाठी अधिक फायदा होतो. या बाबीकडे लक्ष केंद्रित केले आहे. विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणाबरोबरच स्थानिक भाषेतून शिक्षण घेण्याला प्राधान्य देऊन पाचवी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना केवळ

मातृभाषा शिकवली जाईल, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात याकडे अधिक लक्ष पुरवल्या गेलेले आहे.

**बिजशब्द :-** शैक्षणिक धोरण, वैज्ञानिक दृष्टिकोन, प्रादेशिक भाषा, मातृभाषा इत्यादी.

**नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण स्वरूप व महत्व :-**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये शिक्षण हे बहुशाखीय असणार आहे. एकविसाव्या शतकाच्या गरजांना अनुरूप असे शिक्षण येथे अपेक्षित आहे. भारत देशाला जागतिक ज्ञान महासत्ता बनविणे, ही नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 चे अंतिम उद्दिष्ट आहे. जुन्या धोरणातील सद्य संरचना संपुष्टात आणून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये 5+3+3+4 रचनेवर आधारित अध्ययन तत्वावर व बौद्धिक विकास या तत्त्वावर आधारित अभ्यासक्रम व अध्यापन शास्त्र रचना विकसित करण्यात आली आहे. प्रत्येक विद्यार्थ्याकडे विशेष लक्ष पुरविले जावे म्हणून विद्यार्थी व शिक्षक यांचे प्रमाण **30:1** असे ठेवण्यात आले आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामधील वेगळेपणाबाबत सांगताना राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग संसदीय कार्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील एका कार्यक्रमात प्रतिपादन करतात, “केंद्र शासनाने देशांमध्ये नवीन शैक्षणिक धोरण लागू केले आहे. या शैक्षणिक धोरणामुळे शिक्षणातील रचनात्मक बदल, अभ्यासक्रमातील सुसूत्रता अध्यापनाच्या नवीन अभिनव पद्धती, मूल्यमापनातील सुधारणा, मातृभाषेतून शिक्षणाच्या संधी, नवीन अभ्यासक्रमातील एकसमान पद्धती अशा विविधांगी पर्यायातून नवीन शिक्षण व्यवस्था निर्माण होईल.यातून स्वयंरोजगारक्षम युवा पिढी तयार होईल.तसेच पारंपरिक शिक्षण पद्धतीतून केवळ बेरोजगारांचे लोंढे तयार न होता विद्यार्थ्यांना कौशल्यही आत्मसात करता येणार आहेत. यामुळे तरुणाईसाठी शैक्षणिक

धोरण महत्त्वपूर्ण ठरणार असून त्यांचे सर्वांनी स्वागत केले पाहिजे. प्रगत देशामध्ये कुशल मनुष्यबळाला मोठी मागणी आहे. या शैक्षणिक धोरणामध्ये कुशल मनुष्यबळ निर्माण होऊन रोजगाराचे विविध पर्याय नवयुवकापुढे निर्माण होईल. त्यामुळे सर्व शैक्षणिक संस्थांनी येत्या शैक्षणिक वर्षापासून नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करावी."[1] असे प्रतिपादन राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग संसदीय कार्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी करून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा स्वीकार करण्यास सांगितले. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून शिक्षणाच्या विविध संधी निर्माण होऊन कौशल्य व व्यावहारिक शिक्षणाला प्राधान्य देण्यात येईल. या शैक्षणिक धोरणामुळे देशात मोठ्या प्रमाणात कुशल मनुष्यबळ निर्माण होऊन स्वयंरोजगारक्षम युवा पिढी तयार होण्यास मदत होईल. शिक्षण हे केवळ कागदापुरते न ठेवता त्याचा दैनंदीन जीवनात वापर होईल.

**नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांमध्ये मातृभाषेचे स्थान :-**

भाषा हे संवादाचे मुख्य साधन आहे. त्यातल्या त्यात भाषा मातृभाषा असेल तर संवाद अधिक चांगल्या प्रकारे होऊ शकतो. व्यक्ती आपल्या भावना, विचार आपल्या मातृभाषेतून अधिकाधिक चांगल्या प्रकारे प्रकट करू शकतो. मातृभाषेचे व्यक्तिच्या जीवनात फार महत्त्वाचे स्थान आहे. त्यामुळे प्राथमिक, माध्यमिक शिक्षण हे मातृभाषेतून अधिक सहजपणे घेता येते. भारतात राज्यांची भाषावर विभागणी होऊन विविध राज्याची निर्मिती झाली. त्यातून 1 मे 1960 ला मध्ये मध्यप्रदेश व गुजरातपासून विलगीकरण करून महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. मराठी ही महाराष्ट्राची मातृभाषा आहे. महाराष्ट्रातील एकूण 11 कोटी लोक मराठी भाषा बोलतात, या व्यतिरिक्त भारताबाहेर असलेले लोक मराठी भाषा दैनंदिन व्यवहारात वापर करतात. पाचव्या- सहाव्या शतकात

निर्माण झालेल्या मराठी भाषेवर विविध भाषिक आक्रमणे झाली असली तरी मराठी भाषेच्या गुणामुळे मराठी भाषा टिकून राहिलेली आहे. जागतिकीकरणाच्या काळात मराठी भाषेचा वापर दिवसेंदिवस कमी होत असल्याचे दिसत असले तरी ज्ञानाचा अमोघ साठा मराठी भाषेत दडलेला आहे, हे आपणास विसरता येत नाही. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री नामदार यशवंतराव चव्हाण यांनी आपल्या भाषणात मराठीच्या संवर्धनासाठी विचार मांडले आहेत त्यांच्यामध्ये “लोकभाषा ही ज्ञानभाषा झाली पाहिजे प्रथम मराठी नंतर हिंदी व शेवटला इंग्रजी भाषा असा ‘थ्री लँग्वेज फार्मूला’ असायला हवा त्यांनी व्यक्त केलेले विचार आजच्या काळात अधिक महत्त्वपूर्ण असल्याचे म्हणता येईल. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये केंद्र सरकारने वरील विचाराची दखल घेतल्याचे आपणास दिसते.

मराठी भाषेला खऱ्या अर्थाने समृद्ध व संपन्न करायचे असेल तर मराठी भाषेचे उपयोजन क्षेत्र वाढविणे आणि प्रभावी उपयोजन करणे अगत्याचे झाले आहे. भारतीय शिक्षण व्यवस्थेत शाळा ते महाविद्यालय स्तरापर्यंत अनेक बदल करून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या कार्यप्रणालीनुसार भारताला जागतिक ज्ञान महासत्ता बनविण्याकरिता सर्वोपरी प्रयत्न केल्या जात आहे. किमान पाचव्या इयत्तेपर्यंत मातृभाषा किंवा प्रादेशिक भाषेत शिक्षण देऊन त्याच्या व्यक्तिमत्वात बदल घडवून आणणे हा मुख्य उद्देश दिसून येतो. विश्वास विश्वनाथ देशमुख ‘मराठी भाषेची श्रेष्ठता’ ग्रंथात मातृभाषेविषयी सांगताना म्हणतात, “लोकभाषा सोडून अन्य भाषा वापरली जाते ते साहजिकच विकासाची गती रोखली जाते. बहुजन लोकांना समजणारी भाषा जीवनातील सर्व व्यवहारात वापरली पाहिजे, हा जनतेचा मूलभूत हक्कच आहे. पाश्चात्य देशात चार लोकांमध्ये असताना इतरांना समजणारी भाषा एका दोघांनी आपसात

बोलणे हे अशिष्ट समजले जाते. फ्रान्ससारखे काही देशात तर इंग्रजी भाषा येत असून सुद्धा तेथील नागरिक परकीय प्रवाशाशी सुद्धा इंग्रजी भाषेत बोलण्याचे कटाक्षाने टाळतात."[2] यावरून बाहेरच्या देशातील नागरिकांचे आपल्या भाषेवर असलेले नितांत प्रेमच निदर्शनास येते.

ज्ञानार्जनाच्या अनेक भाषा असल्या तरी आपल्या भाषेतील ज्ञान अभिजात, कल्पना, संकल्पना कायमस्वरूपी मनात रुजवण्यासाठी मातृभाषाच उपयोगी पडते. मातृभाषेतूनच आपण प्रभावीपणे अभिव्यक्त होत असतो, म्हणूनच प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण मातृभाषा मधूनच द्यावे, असा अनेक शिक्षणतज्ञांनी विचार मांडलेला दिसतो. भारताचे माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी देखील अनेक वेळा आपल्या भाषणांमधून या बाबीवर लक्ष केंद्रित केल्याचे दिसून येते. आज नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात या सर्व बाबी लक्षात घेऊन शिक्षणप्रणाली तयार केली गेली आहे, त्यामुळे 'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) 2020' आजच्या काळात महत्वपूर्ण ठरत आहे. केंद्र सरकारच्या माध्यमातून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व राज्य सरकारच्यावतीने मराठी भाषाविषयी विविध योजना, विविध कायदे यामुळे मराठी माणसात समाधानाचे वातावरण निर्माण होत आहे. याबाबत गुलाबराव सोनोने दैनिक लोकशाही वार्ता वृत्तपत्रातील आपल्या लेखात म्हणतात, "आनंदाची आणि समाधानाची बाब म्हणजे उशिरा का होईना सरकारने मराठी भाषाविषयक धोरणावर गंभीरपणे विचार करायला सुरवात केली आहे. त्याचाच एक भाग म्हणून शासनाने महाराष्ट्र राज्यातील सर्व माध्यमाच्या शाळेत मराठी भाषेचे अध्यापन सक्तीचे केले. अंमलबजावणीमध्ये कसूर आढळल्यास दंडात्मक कार्यवाही निश्चित केली. हा अत्यंत स्तुत्य आणि मराठी व्यक्तीच्या स्वाभिमानाने जतन करणारा निर्णय घेतला. यापुढे मराठीला ज्या दिवशी अभिजात भाषेचा

दर्जा मिळेल, तेव्हा मराठी भाषिक जनतेचे घोडे गंगेत न्हातील यात शंका नाही."[3] महाराष्ट्र शासनाने मराठी भाषेच्या विकासाकरिता व संवर्धनाकरिता याप्रमाणे कार्य केल्यास, त्याचबरोबर मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवून दिलास मराठी भाषेबरोबरच लोप पावत असलेल्या अनेक मराठीच्या बोलीभाषा जिवंत राहतील. भविष्यकाळात या बोली भाषेतील ज्ञान पुढच्या पिढी करता उपयोगाचे ठरेल, यात शंका नाही.

**भविष्यकाळात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी :-**

भविष्यकाळात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे अंमलबजावणी करताना शक्य तितक्या लवकर ही गुंतवणूक जीडीपीच्या 6 टक्क्यापर्यंत पोहोचावी, असा उद्देश ठेवला गेलेला आहे. मात्र तो प्रत्यक्षात साकार होणे गरजेचे आहे. मातृभाषेतून स्थानिक भाषेतून शिक्षण दिल्यास व्यक्तिगत उन्नती सोबत समाजाची उन्नती होणे, येथे अपेक्षित आहे. शाळाबाह्य दोन कोटी मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा मानस या धोरणाचा आहे. या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे पुढच्या काळात पडसाद उमटणार आहेत. हे निश्चित. प्राथमिक व माध्यमिक स्तराबरोबर उच्च शिक्षणही पुढच्या काळात मातृभाषेतून दिल्यास अधिक चांगले होईल, अशी अपेक्षा करायला हरकत नाही

**निष्कर्ष :-**

1. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये मातृभाषेतून तसेच स्थानिक भाषेतून शिक्षण देण्याला प्राधान्य दिले आहे. भविष्यकाळात वरील बाब किती अंमलात येईल, हे पुढच्या काळात समजणार आहे. मातृभाषेतून किंवा स्थानिक भाषेतून विद्यार्थ्यांना शिक्षण दिल्यास त्याचा अधिकाधिक फायदा निश्चितच होईल, यात शंका नाही.

2. मातृभाषेतून किंवा स्थानिक भाषेतून विद्यार्थ्यांना शिक्षण दिल्या गेल्यास व्यक्ती विकासात अधिकाधिक भर पडते.
3. मातृभाषेतून शिक्षण दिले गेल्यास वेळेचा व खर्चाचा अपव्यय होत नाही. संशोधन कार्य सुलभ होते. आवडीचे शिक्षण घेता येते.
4. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये कुशलतेवर अधिकाधिक भर दिला गेला आहे. व्यक्ती बेरोजगार न होता व्यक्तीच्या कार्यप्रवणतेवर भर दिला गेला आहे.
5. शालेय आणि उच्च शिक्षणात मोठ्या प्रमाणात परिवर्तनात्मक बदल घडून आणणे, सुधारणा घडवून आणणे, चैतन्यशील, प्रज्ञावंत समाजाची निर्मिती करणे हा नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा मुख्य उद्देश आहे.

**संदर्भग्रंथ:-**


1) पाटील चंद्रकांत (राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री) : दैनिक लोकशाही वार्ता, दिनांक 24 फेब्रुवारी 2024, शनिवार
2) देशमुख विश्वास विश्वनाथ 'मराठी भाषेची श्रेष्ठता' विद्याभारती प्रकाशन, लातूर प्रथम आवृत्ती 15 ऑगस्ट 2004, पृ.क्र.16
3) सोनोने गुलाब रा. : दै.लोकशाही वार्ता, दिनांक 27 फेब्रुवारी 2024, मंगळवार पृ.क्र.08


***

# नवीन शैक्षणिक धोरण-2020

**प्रा. डॉ. टी. एम. गुरुनुले**

सहयोगी प्राध्यापक, अर्थशात्र विभाग प्रमुख, श्री रेणुकादेवी कला,
वाणिज्य, व विज्ञान महाविद्यालय, माहूर, जि. नांदेड.

---

**प्रस्तावना:**

1986 च्या शैक्षणिक धोरण नंतर झपाट्याने बदलणाऱ्या गरजाचे पूर्तता करण्यासाठी तीन दशकानंतर एक नवीन लवचिक आणि जागतिक स्पर्धेत टिकणारी शैक्षणिक पद्धत तयार करण्यात आले आहे. भारतात नवीन शैक्षणिक धोरणाची सुरुवात जुलै 2020 मध्ये करण्यात आली जे भारताच्या नवीन दृष्टीकोणासाठी उचलण्यात आलेले एक महत्त्वाचे क्रांतिकारी पाऊल आहे.

नवीन शैक्षणिक धोरण 2020 समजून घेण्यासाठी त्याची ऐतिहासिक पाश्र्वभूमी समजुन घेणे महत्वाचे आहे. भारतात यापूर्वी 1986 मध्ये शैक्षणिक धोरणात सुधारणा करण्यात आली होती. या शैक्षणिक धोरणात 21 व्या शतकात सामोरे जाणारे अनेक गोष्टी उपलब्ध नव्हत्या, वर्तमान काळात जग बदलले आहे, बदलत्या जगाला सामोरे जाण्यासाठी आवश्यक असणारी शिक्षण पद्धती कालबाह्य ठरली होती.

भारताला एक व्यापक परिवर्तनची आवश्यकता होती त्यानुसार भारतात 1964 मध्ये कोठारी आयोग नेमण्यात आलं होतं आणि कोठारी आयोगाने आपला अहवाल 1966 मध्ये प्रकाशित करण्यात आले होते, या अहवालात आनेक बदल सुचविण्यात आले होत त्यापैकी या आयोगानुसार

देशाच्या विकासासाठी एक सर्व सामान्य शिक्षण प्रणाली 10+2+3 ची शिफारस करण्यात आली होती.

**उद्दिष्ट:-**

1. नवीन शैक्षणिक धोरण 2020 समजून घेणे
2. नवीन शैक्षणिक धोरणाच्या शक्यतांचा शोध घेणे.
3. नवीन शैक्षणिक धोरणातील आव्हाने समजून घेणे.

**संशोधन पद्धती :** प्रस्तुत संशोधन जर्नल्स, मासिके, लेखांमधून प्राप्त केलेल्या दुय्यम माहितीवर आधारित आहे. अभ्यासाच्या उद्दिष्टांच्या नुसार अभ्यासासाठी वापरलेली संशोधन रचना वर्णनात्मक प्रकारची आहे. निर्धारित उद्दिष्टांच्या विश्लेषणातील निरीक्षण, संशोधन अभ्यासाचा अधिक अचूकता आणि सखोल अभ्यास करण्यासाठी ही संशोधन रचना स्वीकारण्यात आली. दुय्यम महितीचा वापर अभ्यासाच्या उद्देशाने सर्वसमावेशकपणे वापरला आहे. विविध बातम्या लेख आहेत, पुस्तके आणि वेब वापरले आहे.

**विश्लेषण (Analysis) :-** नवीन शैक्षणिक धोरण-2020 हे भारताचे शैक्षणिक धोरण आहे जे भारत सरकारने 29 जुलै 2020 रोजी जाहीर केले. 1986 मध्ये जाहीर झालेल्या नवीन शैक्षणिक धोरणानंतर भारताच्या शैक्षणिक धोरणातील हा पहिला नवीन बदल आहे. हे धोरण आंतरीक्ष वैज्ञानिक कसुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त समितीच्या अहवालावर आधारित आहेत.

नवीन शैक्षणिक धोरण 2020 गुणवत्ता, समानता आणि जबाबदारी या मूलभूत तत्त्वांवर आधारित आहे. यामध्ये प्रत्येक व्यक्तीला त्यांच्या वैयक्तिक आणि बौद्धिक विकासाला प्रोत्साहन देणारे उच्च

दर्जाचे शिक्षण मिळू शकेल यामध्ये भारताचे कल्याण साधण्याची दृष्टी आहे. हे धोरण विद्यार्थी-केंद्रित आणि 21व्या शतकातील आव्हानांना तोंड देण्यासाठी विद्यार्थ्यांना तयार करणारी शिक्षण व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे.

नवीन शैक्षणिक धोरण- 2020 हा भारताच्या शिक्षण व्यवस्थेतील एक महत्त्वाचा टप्पा आहे, जो देशाच्या शैक्षणिक भवितव्याला ला आकार देतो. वेगाने बदलणाऱ्या जगाच्या संदर्भात देशाची शिक्षण व्यवस्था अधिक सर्वांगीण, लवचिक आणि जागतिक बनवण्याचे उद्दिष्ट नवीन शैक्षणिक धोरणाचे आहे.

नवीन शैक्षणिक धोरण- 2020 चे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे ते लहान मुलाची काळजी आणि शिक्षण यावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. बाल मनाचे संगोपन आणि सर्जनशीलतेला चालना देण्यासाठी या शैक्षणिक धोरणाची मदत होईल. दर्जेदार प्री-स्कूल शिक्षणासाठी सार्वत्रिक प्रवेशास समर्थन देऊन प्राथमिक शिक्षणाला महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे.

नवीन शैक्षणिक धोरण- 2020 देखील शिक्षणाच्या उपयोजित दृष्टिकोनामध्ये महत्त्वपूर्ण बदल आणणे आणि शिक्षणामध्ये बहु-विषय आणि सर्वांगीण दृष्टिकोनाला प्रोत्साहन देणे. विद्यार्थ्यांना विविध विषयांमध्ये त्यांची आवड निवडण्यासाठी कला, विज्ञान आणि व्यावसायिक अभ्यासक्रम प्रोत्साहित करणे. नवीन शैक्षणिक धोरण नवीन विचार करू शकणाऱ्या आणि वेगवेगळ्या आव्हानांना तोंड देऊ शकतील अशा मजबूत व्यक्ती विकसित करण्यासाठी आहे.

नवीन शैक्षणिक धोरण- 2020 ची आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे डिजिटल आणि तंत्रज्ञानाद्वारे शिक्षणाला महत्त्व देणे. डिजिटल

युगाच्या आगमनाने, शैक्षणिक धोरणात तंत्रज्ञानाला महत्त्व देण्याची गरज ओळखली आहे. डिजिटल साधने आणि ऑनलाइन संसाधने शिक्षण प्रक्रियेत अखंडपणे एकत्रित केली जातात आणि शिक्षण सुलभ आणि आकर्षक बनविण्यावर लक्ष केंद्रित केले आहे.

**नवीन शैक्षणिक धोरण 2020 मधील महत्त्वाचे मुद्‌दे किंवा वैशिष्ट्‌ये:-**

**1. बालपणीचे शिक्षण:-** नवीन शैक्षणिक धोरण-2020 मध्ये, बालपणीची काळजी आणि शिक्षणाची महत्त्वाची भूमिका मान्य करण्यात आली आहे. नवीन शैक्षणिक धोरणाचा उद्‌देश उच्च दर्जाच्या पूर्व-शालेय शिक्षणाद्‌वारे मुलांच्या सर्जनशील विकासासाठी मजबूत पाया प्रदान करणे हा आहे.

**2. सर्वांगीण आणि बहुविद्‌याशाखीय शिक्षण:-** पूर्वीच्या शिक्षण पद्‌धतीपेक्षा वेगळी, नवीन शिक्षण प्रणाली शिक्षणासाठी एक बहुविद्‌याशाखीय दृष्टिकोन नवीन शैक्षणिक धोरणात आहे. विद्‌यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार वेगवेगळे विषय निवडण्यासाठी प्रोत्साहित करणे आणि कला, विज्ञान आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांमधील पारंपारिक सीमारेषा दूर करून एकाच वेळी सर्वांगीण आणि बहुविद्‌याशाखीय शिकसणाची संधि मिळणार आहे.

**3. शिक्षणाच्या माध्यमात सुधारणा:-** इयत्ता 1 ली ते 5 वी पर्यंत शिक्षणाचे माध्यम म्हणून मातृभाषेचा वापर केला जाईल. यामध्ये सध्याच्या व्यवस्थेचा मोठा दोष मानल्या जाणाऱ्या पाठांतर पद्‌धतीलाही दूर करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. काही कारणास्तव विद्‌यार्थी उच्च शिक्षणाच्या मध्येच अभ्यासक्रम सोडतात. आशावेळी विध्यार्थ्याला काहीच मिळत नसत त्यांना नव्याने सुरुवात करावी लागत आसत. नव्या धोरणात पहिल्या वर्षी अभ्यासक्रम सोडल्यावर प्रमाणपत्र, दुसऱ्या वर्षी

अभ्यासक्रम सोडल्यावर डिप्लोमा आणि अंतिम वर्षात अभ्यासक्रम सोडल्यावर पदवी देण्याची तरतूद आहे.

**4. तंत्रज्ञानाचे सहाय्यक:-** नवीन शैक्षणिक धोरण, डिजिटल युगाला सामावून घेणारे, शिक्षणातील तंत्रज्ञानाला समर्थन देणारे आहे. त्यामुळे भविष्याची कल्पना, डिजिटल साधने आणि ऑनलाइन संसाधने शिक्षण सुलभ, मनोरंजक आणि त्याचा विस्तार होण्यास मदत होईल.

**5. लवचिक मूल्यमापन आणि चाचणी समर्थन प्रणाली:-** रॉट लर्निंगऐवजी, नवीन शैक्षणिक धोरण आता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे आणि कौशल्यांचे मूल्यांकन करण्यासाठी सर्वांगीण आणि सर्वसमावेशक मूल्यांकन पद्धतींची शिफारस करते, जेणेकरून शिक्षण अवजड होण्याऐवजी मनोरंजक होईल.

**6. उच्च शिक्षण सुधारणा समर्थन यंत्रणा:-** नवीन शैक्षणिक धोरण उच्च शिक्षण स्तरावर विद्यापीठे आणि महाविद्यालयांना स्वायत्तता देऊन संरचनात्मक सुधारणा आणते. हे शाळा आणि महाविद्यालये आणि परदेशी संस्थांसोबत अधिक सहकार्याला प्रोत्साहन देते आणि जागतिक शैक्षणिक केंद्र म्हणून भारताच्या विकासाचे समर्थन करते. याव्यतिरिक्त, ते एकाधिक निर्गमन पर्यायांसह चार वर्षांचा पदवीधर कार्यक्रम ऑफर करते जे विद्यार्थ्यांना कौशल्ये आणि उद्योग अनुभव प्राप्त करण्यास अनुमती देते. यासोबतच नवीन शैक्षणिक धोरणात रोजगाराभिमुख शिक्षण व्यवस्था प्रस्थापित करण्यात आली आहे.

**आव्हाने आणि वाद :-** नवीन शैक्षणिक धोरण जाहीर झाल्यानंतर जाणकार, सर्वसामान्य जनता आणि शिक्षण जगताकडून संमिश्र प्रतिक्रिया उमटल्या. मात्र प्रामुख्याने त्यात जाहीर केलेल्या बदलांचे

स्वागत करण्यात आले आहे. परंतु त्यातील अनेक उद्दिष्टे पूर्ण करण्याबाबत शंका उपस्थित केल्या जात होत्या.

तथापि, नवीन शैक्षणिक धोरण- 2020 ला त्याच्या दूरगामी दृष्टिकोनाबद्दल प्रशंसा मिळाली आहे. तरीही त्याला आव्हाने आणि वादांचाही सामना करावा लागला आहे. समीक्षकांचे म्हणणे आहे की धोरणामध्ये स्पष्ट दृष्टी नाही आणि आवश्यक आर्थिक संसाधनांची कमतरता असू शकते. शिवाय, समीक्षकांनीही शिक्षणाचे व्यापारीकरण आणि शिक्षण क्षेत्रातील खाजगीकरणाबाबत चिंता व्यक्त केली आहे.

**निष्कर्ष:-** नवीन शैक्षणिक धोरण 2020 हे 21 व्या शतकातील गरजा पूर्ण करण्यासाठी भारताच्या शिक्षण व्यवस्थेत परिवर्तन करण्याच्या दिशेने एक धाडसी आणि प्रगतीशील पाऊल आहे. बालपणीच्या शिक्षणाला प्राधान्य देऊन, बहुविद्याशाखीय शिक्षण, तंत्रज्ञान-सक्षम आणि लवचिक उच्च शिक्षण, हे विद्यार्थ्यांना वेगाने बदलणाऱ्या जगात यशस्वी होण्यासाठी तयार करण्यासाठी डिझाइन केले आहे. नवीन शैक्षणिक धोरणाची यशस्वी अंमलबजावणी आणि सातत्यपूर्ण मूल्यमापन आणि सुधारणा हे ठरवेल की हा दृष्टिकोन यशस्वी आहे की नाही आणि त्याचा खरा परिणाम काय आहे.

भारतातील शैक्षणिक प्रवास एका महत्त्वाच्या टप्प्यातून जात आहे आणि नवीन शैक्षणिक धोरण-2020 उज्वल आणि अधिक समावेशक भविष्यासाठी मार्गदर्शन प्रदान करते. आव्हाने उभी असली तरी, नवीन शैक्षणिक धोरण भारताची शिक्षण व्यवस्था सर्वांसाठी सुलभ, समान आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनविण्याची क्षमता देते. शैक्षणिक क्षेत्रात आमूलाग्र बदल घडवण्याचे वचन आहे आणि त्यामध्ये भारताच्या उज्ज्वल भविष्याचे वचन आहे.

**संदर्भ:-**


1. चोप्रा रतिका (2020), स्पष्टीकरण: नवीन शैक्षणिक धोरण 2020, द इंडियन एक्सप्रेस.
2. खाते ए आणि नंतदानी, एस. (2020), नवीन शैक्षणिक धोरण-2020 प्रमुख वैशिष्ट्ये: शाळा आणि उच्च शिक्षणामध्ये मोठे बदल
3. प्रंसिला. जे. (2021), राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये प्रस्तावित. नऊ ॲटलस 2022. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020: संधी आणि आव्हाने
4. https://www-wikipedia-com
5. https://www-education-gov-in
6. https://pib-gov-in
7. https://www-education-gov-in
8. https://pib-gov-in
9. https://aplamitra.com/nationaleducation-policy-2020-opportunitiesand challenges/
10. https://aplamitra.com/tag/nationaleducation-policy-2020/
11. https://aplamitra.com/tag/nationaleducation-policy-2020-pdf/
12. https://aplamitra.com/tag/nationaleducation-policy-upsc/
13. https://aplamitra.com/tag/nationaleducation-policy-2020-essay/


***

# भारताची महासत्तेच्या दिशेने वाटचाल आणि सामाजिक समस्या व आव्हाने

**प्रा. डॉ. गुरुनाथ मावंजी घुटे**
इतिहास विभाग,
शांतारामभाऊ घोलप कला, विज्ञान व गोटीरामभाऊ पवार वाणिज्य महाविद्यालय शिवळे ता. मुरबाड जि. ठाणे

**गोषवारा**

आधुनिक काळात जगातील प्रत्येक राष्ट्र आपल्या राष्ट्राची जास्तीत जास्त प्रगती करून महासत्ता बनण्याचे ध्येय ठेवत आहेत त्याच पद्धतीने भारताने वाटचाल करण्यास सुरुवात केलेली आहे भारताला वैभवशाली इतिहास आहे आणि हे वैभव पुन्हा मिळवा जगाची नेतृत्व करण्याची इच्छा मनात ठेवा भारत प्रयत्नशील आहे मात्र यामध्ये भारताला अनेक समस्यांचा सामना करावा लागतो हा सत्तेची ध्येय गाठण्यासाठी अनेक अनेक समस्या व आव्हाने आहेत या सर्व गोष्टी प्रस्तुत लेखात अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे

**Key words –** महासत्ता, सामाजिक, समस्या, आव्हाने.

**प्रस्तावना:-**

भारताला प्राचीन काळापासून वैभवशाली इतिहास लाभलेला आहे मात्र ब्रिटिश काळात भारताची मोठ्या प्रमाणात अधोगती झाली ब्रिटिशांनी दीडशे वर्ष राज्य करून भारताची अर्थव्यवस्था रसातळाला नेली. स्वातंत्र्य भारताने आपल्या प्रगतीसाठी अनेक उपयोजना केल्याचे दिसते पण त्याला म्हणावे तसे यश आलेले नाही.

भारताचे माजी राष्ट्रपती डॉक्टर ए.पी.जे अब्दुल कलाम यांनी भारत 2020 साली महासत्ता बनेल असे भाकीत केले होते त्यानुसार कोणत्या उपाययोजना सुरू कराव्यात याविषयी सरकारला मार्गदर्शन केले, त्यांच्या दृष्टीने युवा/ तरुण हा देशाची शक्ती आहे आणि जगामध्ये भारतात सर्वाधिक युवाशक्ती आहे त्यांच्या जोरावर आपण महासत्ता बनु शकतो असा त्यांचा विश्वास होता मात्र काही कारणास्तव हे ध्येय आपण गाठू शकलो नाही.

सध्याचे विद्यमान सरकार हे भारत महाशक्ती बनावा या दृष्टीने प्रयत्नशील आहे. आता आपण 2047 हे ध्येय ठेवले आहे आपल्याला 2047 भारताला स्वातंत्र्याचा सुवर्ण महोत्सव साजरा करायचा आहे आणि या सुवर्ण महोत्सवाच्या काळात आपण जगातील महाशक्ती असावे असे भारतातील सगळ्याच लोकांना वाटते त्याचा आनंद आहे  मात्र आपण महासत्तेच्या दिशेने वाटचाल करत असताना अनेक सामाजिक समस्यांनी हा भारत देश ग्रासलेला आहे या समस्या दूर केल्यास आपण निर्धारित केलेल्या केलेल्या वेळेच्या आधीच भारत महाशक्ती बनू शकतो या सामाजिक समस्यांचा अभ्यास सदरील संशोधन पेपरमध्ये करण्याचा प्रयत्न केला आहे.

**उद्दिष्टे:-**

1. भारतातील सामाजिक समस्येचा आढावा घेणे.
2. भारताची महासत्तेच्या दिशेने होत असलेली वाटचाल अभ्यासणे.
3. भारताच्या महासत्तेच्या दिशेने होत असलेल्या वाटचालीतील आव्हाने अभ्यासणे

**सामाजिक समस्या आणि आव्हाने:-**

**भारतीय लोकसंख्या:-**

भारत हा क्षेत्रफळाच्या दृष्टीने सातव्या क्रमांकाचा मोठा देश आहे मात्र लोकसंख्येचा विचार केला असता 2022 पर्यंत दुसऱ्या क्रमांकाचा होता तर आत्ता तो लोकसंख्येच्या बाबतीत जगातील प्रथम क्रमांक असलेले राष्ट्र बनले आहे. अतिरिक्त लोकसंख्येमुळे आपण कितीही सेवा सुविधा वाढवल्या किंवा उत्पादन वाढविले तरीही ते कमी पडते आहे. त्यामुळे आपल्याला वाढलेले उत्पादन निर्यात करता येत नाही तर ते आपल्याच देशातील लोकसंख्येच्या गरजा भागविण्यासाठी वापरावे लागते परिणामी आपला व्यापार हा अनुकूल बनत नाही आणि परकीय चलन येत नाही जेवढे जास्त परकीय चलन येईल तेवढी आपल्या देशाची प्रगती लवकरात लवकर करता येईल आणि महासत्तेच्या ध्येयापर्यंत पोहोचता येईल

जगातील काही राष्ट्रांमध्ये अत्यल्प/ विरळ लोकसंख्या आहे अशा राष्ट्रांमध्ये मनुष्यबळ कमी पडत असल्याने त्या देशाचा विकास होत नाही. ज्या देशाची लोकसंख्या नियंत्रित आहे त्या देशाचा विकास मोठ्या प्रमाणात झालेला दिसतो. आपल्याला महासत्तेकडे मार्गक्रमण करायचे असेल तर आपल्याला लोकसंख्या नियंत्रणात ठेवणे गरजेचे राहील भारतीय लोकसंख्या वाढ ही महासत्तेच्या दिशेने वाटचाल करत असताना एक मोठी समस्या ठरत आहे .

**2.मद्यपान आणि व्यसनाधीनता:-**

मद्यपान ही एक मोठी सामाजिक समस्या आहे मद्यपान करणे ही वैयक्तिक बाब असली तरी त्याचा समाज जीवनावर खूप मोठा परिणाम होतो भारतात महाविद्यालयीन तरुणांमध्ये मादक पदार्थांचा दुरुपयोग मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे.

"2015 च्या ग्लोबल स्टडीने केलेल्या सर्वेनुसार असे आढळून आले आहे की मागील 20 वर्षात भारतात मध्यपान करणाऱ्यांचे प्रमाण 55 टक्के वाढले आहे."

“आशिया खंडातील एकूण दारूचे उत्पादनापैकी 65 टक्के उत्पादन भारतात होते.”

यावरून आपल्या लक्षात येईल की भारतात मद्यपानाची व्यसनाधीनता किती मोठ्या प्रमाणात वाढली आहे मद्यपान केल्यामुळे कौटुंबिक व सामाजिक स्वास्थ्य बिघडते. मद्यपान करणारी व्यक्ती व्यसनाच्या आहारी गेलेले असल्याने ती कुठल्याही प्रकारचा रोजगार करत नाही किंवा मिळवत नाही. परिणामी त्याचा अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होतो त्याचबरोबर त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो आणि देशाच्या आरोग्य व्यवस्थेवर ताण वाढतो.

याचबरोबर तंबाखू, गांजा, अफू, कोकेन, ड्रग्ज,यासारखे अनेक व्यसनांनी भारतातील तरुणाई पोखरून टाकली आहे. त्यामुळे ज्या तरुणाईच्या बळावर आपण महासत्तेची स्वप्ने बघत आहोत तीच तरुणाई व्यसनाधीनतेच्या आहारी गेली असेल तर ही एक मोठी समस्या आहे असेच म्हणावे लागेल.

**3 भ्रष्टाचार:-**

भ्रष्टाचार ही एक मोठी समस्या आहे देशातील राजकीय, शासकीय, शैक्षणिक, सामाजिक व धार्मिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार आढळतो. भ्रष्टाचार नाही असे एकही क्षेत्र आपल्याला दाखवता येणार नाही. भ्रष्टाचाराच्या माध्यमातून काळा पैसा उभा करता येतो आणि त्याच्यावरच चैनी व विलासी जीवन जगू शकतो. याच हव्यासापोटी आज भारतामध्ये प्रत्येक क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार चालू आहे.

निवडणुकांमध्ये मतदारांना पैसे वाटून किंवा विकत घेऊन निवडणुका जिंकल्या जातात, शासकीय कार्यालयांमध्ये बेकायदेशीर पैसे घेऊनच सर्व कामे केली जातात, पोलीस स्टेशनमध्ये भ्रष्टाचाराच्या माध्यमातून कायदा फिरवला जातो, नोकर भरतीमध्ये भ्रष्टाचार करून

पदभरती केली जाते या सर्व गोष्टीमुळे योग्य व्यक्ती त्या पदावर पोहोचू शकत नाही. ज्याच्याकडे पैसा आहे तोच सत्ताधीश, कायदेशीर, किंवा नोकरवर्ग बनला आहे. याचा परिणाम सर्वसामान्य जनतेवर झाला आहे सर्वसामान्य जनतेचा विकास झाल्याशिवाय आपला देश महासत्ता बनू शकत नाही त्यामुळे हा भ्रष्टाचाराचा भस्मासुर संपल्याशिवाय किंवा नष्ट झाल्याशिवाय आपला भारत देश महासत्तेपर्यंत पोहोचू शकणार नाही असे मला वाटते.

**4.पांढरपेशी गुन्हे:-**

पांढरपेशी गुन्हे ही संकल्पना सर्वप्रथम सदरलँड यांनी 1940 मध्ये मांडली त्यांच्या मते "समाजातील प्रतिष्ठित चे सामाजिक दर्जा असणाऱ्या व्यक्तीद्वारा आपल्या व्यवसायाच्या संदर्भात केले जाणारे गुन्हे"

समाजातील उच्च वर्गातील श्रीमंत धनिक व्यक्ती हे गुन्हे करतात आणि कायद्यातील पळवटांचा वापर करून ते गुन्हेगार म्हणून सिद्ध होत नाही याचा फायदा घेऊन ते वारंवार हे गुन्हे करत राहतात आणि त्यांना शिक्षा होत नसल्याने समाजामध्ये अविश्वासाची भावना पसरते.

भारतात पांढरपेशी गुन्ह्यामध्ये खालीलपैकी महत्त्वाचे गुन्ह्यांचा समावेश होतो. साठेबाजी आणि काळाबाजार, कर चुकविणे, भेसळ करणे, मादक पदार्थांची विक्री, तस्करी, परकीय चलन सायबर गुन्हे. या माध्यमाने कमीत कमी वेळात मोठ्या प्रमाणात पैसा कमावणे हे उद्दिष्ट ठेवून ही लोक काम करत असतात आणि कायद्याची पूर्ण ज्ञान असल्याने त्यामध्ये आपण अडकणार नाही याची काळजी घेतात पण यामध्ये सर्वसामान्य लोकांचे फसवणूक होऊन त्यांचे जीवन उध्वस्त होते. सहाजिकच समाजातील एक वर्ग प्रचंड श्रीमंत होतो तर दुसरा वर्ग खोल गरिबीच्या दरीत ढकलला जातो या आर्थिक विषमतेमुळे भारताला

महासत्तेकडे वाटचाल करण्यास मोठ्या समस्यांचा सामना करावा लागत आहे.

**5 बेकारी:-**

प्रचंड लोकसंख्या वाढीमुळे भारतात आज मोठ्या प्रमाणात भिकारी वाढलेले आहे सुशिक्षित बेकारी, अर्धबेकारी, अदृश्य बेकारी या माध्यमातून आपल्याला भिकारी दिसते भारतामध्ये ब्रिटिश कालीन शिक्षण पद्धती आजही अस्तित्वात असलेले या शिक्षणातून बाहेर पडलेला सुशिक्षित तरुण वर्ग नोकरीच्या शोधात असतो मात्र सुशिक्षिततेच्या प्रमाणात नोकऱ्या उपलब्ध न झाल्याने बेकारी ची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे हाताला काम नसल्याने तरुणांमध्ये नैराश्य येत आहे त्यातूनही व्यसनाधीनतेचे प्रमाण वाढताना दिसते कुशल शैक्षणिक दर्जा नसल्याने त्यांना रोजगार मिळवण्यासाठी अडचणी येत आहेत.

भारतातील तरुणाई अशी बेकार राहिले आणि त्यांच्या मध्ये नैराश्य आले तर भारताला महासत्ता बनण्यामध्ये मोठ्या अडचणी येऊ शकतात.

**6 धर्मांधता:-**

भारत ही जगातील एक मोठी लोकशाही आहे लोकशाहीमध्ये लोकांच्या मतावरच सत्ता मिळविता येते. लोकांनी आपल्यालाच मतदान करून आपल्याहाती सत्ता द्यावी असे प्रत्येक नेत्याला आणि पक्षाला वाटत असते. त्यानुसार ते आपलं कार्य किती प्रभावी आहे हे जनतेला पाठवून देण्याचे प्रयत्न करतात भारतीय निवडणुका या विकासाचा आराखडा तयार करून किंवा विकासाचा डोलारा उभा करून जिंकता येणे शक्य नाही हे भारतातील राज्य करताना माहिती आहे आणि त्यामुळे ते धर्माचा आधार घेतात कारण भारतीय लोक हे धर्मभोळे / धर्मवेडे आहेत आणि त्यामुळेच मंदिरे आणि देवांच्या नावावर येथील निवडणुका जिंकल्या जातात आणि

सत्तेत आल्यानंतर कुठल्याही प्रकारचा विकास केला जात नाही आजचे चित्र आपल्याला पूर्णतः भारतीय धर्मभोळेपणाचे दिसून येते.

याच पद्धतीने मार्गक्रमण केल्यास भारतीय महासत्ता हे आपले स्वप्नच राहू शकते हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

**7. भारतातील जातीयवाद:-**

भारतीय समाज हा अठरापगड जाती-जमातींनी बनलेला आहे आणि प्रत्येक जात ही दुसऱ्या जातीला आपल्यापेक्षा दुय्यम दर्जाची स्थान देते. त्यामुळे जातीयवाद निर्माण झाला आहे याचाच फायदा राजकीय मंडळी येतात आणि फक्त जातीय अजेंडा ठेवून निवडणुका जिंकून आपला स्वार्थ साधतात. जाती-जातींमध्ये भांडणे वाढवून आपली. राजकीय पोळी भाजून घेतात परिणामी भारत अधोगतीच्या दिशेने वाटचाल करतो. याच दिशेने प्रवास होत राहिल्यास महासत्तेच्या दिशेने होत असलेली वाटचाल मंदावेल.

**निष्कर्ष:-**

भारत महासत्ता होणे हे आपल्यासाठी सर्वांसाठी आनंदाची बाब मानवी लागेल आणि तो दिवस आपल्या सर्वांसाठी गौरवशाली असेल. तज्ञांच्या मते आपल्या देशामध्ये जी तरुणांची संख्या आहे त्यानुसार आपण लवकर महासत्ता होऊ शकतो. पण भारताकडे जरी तरुणांची संख्या मोठ्या प्रमाणात असली तरी लोकसंख्या वाढ, भ्रष्टाचार, जातीयवाद, धर्मांधता, बेकारी, व्यसनाधीनता यासारख्या अनेक समस्या आणि आव्हाने आपल्यासमोर आहेत.

लोकसंख्या वाढीवर भारत सरकारने  निर्बंध लादून लोकसंख्या वाढ नियंत्रणात आणावी लागेल भारतात जरी संततीनियमानाचा कायदा केला असला तरी प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी होताना दिसत नाही. त्यामुळे बेकारी सारखी समस्या वाढत चालली आहे. भ्रष्टाचार समोर नष्ट करण्यासाठी  खडक उपाययोजना करणे गरजेचे आहे भ्रष्टाचार मुक्त भारत केल्यास भारताची आर्थिक भरभराट होईल. लोकांमध्ये सामाजिक

सलोखा निर्माण करून जातीयता किंवा जातीभेद नष्ट करता येईल. भारतामध्ये मोठ्या प्रमाणात जी धर्मांधता वाढलेली आहे ती सुद्धा नष्ट करणे गरजेचे आहे. व्यसनाधीनता हा सुद्धा एक महत्त्वाचार प्रश्न सोडवावा लागेल मात्र भारत सरकार कर मिळवण्याच्या लोभापोटी मोठ्या प्रमाणात मद्य निर्मितीला चालना देत आहे याला पर्यायी करव्यवस्था उभी करून मद्य उत्पादन कमी केल्यास व्यसनाधीन काही प्रमाणात कमी होईल.

**संदर्भग्रंथ सूची:-**


1. डॉ. प्रदीप आगलावे, भारतातील सामाजिक समस्या, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर.
2. प्रा. श्रीकांत वि. देशपांडे, भारतीय राजकीय विचारवंत, श्री मंगेश प्रकाशन नागपूर.
3. प्रा. अरविंद शृंगारपुरे, भारतीय शासन व राजकारण, श्री मंगेश प्रकाशन नागपूर.
4. प्रा. वा.भा. पाटील, आंतरराष्ट्रीय संबंध, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.
5. डॉ. बी. डी. तोडकर, भारत आणि जग- आंतरराष्ट्रीय संबंध, डायमंड पब्लिकेशन पुणे.
6. श्री माधव गोडबोले, भारताच्या संसदीय लोकशाहीचे अग्निपरीक्षा, राजहंस प्रकाशन.
7. डॉ. शैलेंद्र देवळाणकर, भारतीय परराष्ट्र धोरण, प्रतिमा प्रकाशन पुणे.
8. टी.के. ओमन, भारतीय समाजातील समस्या आणि वाद, डायमंड पब्लिकेशन पुणे.
9. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम, माझ्या स्वप्नातील भारत, चिनार पब्लिकेशन पुणे
10. प्राध्यापक मन उदगावकर एकविसाव्या शतकातील दहशतवाद डायमंड पब्लिकेशन पुणे.
11. डॉ. एस. व्ही. ढमढेरे, शाश्वत विकास आणि भारत, डायमंड पब्लिकेशन पुणे.


***

# पर्यावरण में परिवर्तन

**डॉ. गूंजा पंवार**

सहायक प्राध्यापक (गृह विज्ञान)_शासकीय विवेकानंद स्नातकोत्तर महाविद्यालय, मैहर, सतना, म.प्र.

हमारे जीवन का सबसे महत्वपूर्ण हिस्सा पर्यावरण है, हमारे चारों ओर सभी प्राकृतिक तथा जीवित-अजीव चीजों का समूह है, जो हमारे जीवन को संभालता है, इसी के इर्दगिर्द हमारी प्रकृति व्यापक रूप से प्राकृतिक भौतिक या पूरा ब्रह्मांड है ।

पर्यावरण शब्द का निर्माण दो शब्दों से मिलकर बना हुआ है " परी" जो हमारे चारों ओर है "आवरण" जो हमें चारों ओर से घेरे हुए हैं, पर्यावरण वह है जो कि प्रत्येक जीव के साथ जुड़ा हुआ है। पर्यावरण के जैविक संगठनों में सूक्ष्म जीवाणु से लेकर कीड़े-मकोड़े सभी जीव जंतु और पेड़ पौधे आ जाते हैं, और उनके साथ ही उनसे जुड़ी सारी जीव क्रियाएं और प्रक्रियाएं भी अजैविक घटकों में जीवन रहित तत्व और उनसे जुड़ी प्रक्रियाएं आती है जैसे चट्टानें, पर्वत, नदियां, हवाएं और जलवायु आदि ।

पृथ्वी के उदय के बहुत बाद में पर्यावरण का निर्माण हुआ पर्यावरण की प्रक्रिया धीरे-धीरे मंद गति से होती रही, अनेक भौतिक एवं अभौतिक तत्वों का निर्माण तथा इसके मध्य उत्पन्न संबंध से पर्यावरण धीरे-धीरे मूर्त रूप धारण करता गया। वायुमंडल का निर्माण एवं इसकी घटनाएं पर्यावरण के निर्माण एवं विकास में निरंतर सहयोग देती रही कालांतर में भू-तल एक भौतिक पर्यावरण का निर्माण हो गया।

इसके बीच मनुष्य जैसा एक विशिष्ट प्राणी उत्पन्न हुआ, यही एक ऐसा प्राणी है जो चिंतन कृतित्व एवं व्यक्तित्व से परिपूर्ण है। वह अपने

तथा समस्त जैविक-अजैविक संघटकों  के विषय में सोच सकता है, पर्यावरण के उत्पादकों का उपयोग एवं उनकी सुरक्षा कर सकता है पर्यावरण में मानव को बहुत कुछ दिया है। जिससे एक उत्कृष्ट मानव संस्कृति उत्पन्न हुई है, परंतु मानव स्वास्थ्य से अंधा होकर पर्यावरण के विनाश में आगे बढ़ता चला जा रहा है। पृथ्वी का उद वायुमंडल का निर्माण वनस्पति एवं जीवन की उत्पत्ति आदि कालांतर की सक्रिय प्रक्रिया से पर्यावरण का निर्माण हुआ।

पर्यावरण के अध्ययन से हम पर्यावरणीय समस्याओं को समझने में सक्षम होते हैं, जैसे जलवायु परिवर्तन, वनों का अपघात, वायु प्रदूषण, जल प्रदूषण और जीव जंतुओं के संरक्षण की समस्याएं इससे हम उन समस्याओं की गहनता कारण प्रभाव और संभावित समाधान को समझ सकते हैं।

मानव के द्वारा आर्थिक उद्देश्य और जीवन में विलासिता के लक्ष्यों की प्राप्ति हेतु प्रकृति के साथ व्यापक छेडछाड़ के क्रियाकलापों ने प्राकृतिक पर्यावरण का संतुलन नष्ट किया है। जिससे प्राकृतिक व्यवस्था या प्रणाली के अस्तित्व पर ही संकट उत्पन्न हो गया है, पर्यावरणीय परिवर्तन प्राकृतिक आपदाओं के परिणाम स्वरूप होता है।

प्राकृतिक प्रणालियों के माध्यम से सूर्य की ऊर्जा को जीवित पदार्थ में बदल देती है और भू वैज्ञानिक जैविक समुद्री और वायुमंडलीय प्रक्रियाओं के माध्यम से सामग्रियों के चक्रण द्वारा परिवर्तन का कारण बनती है। वर्तमान में देखा जाए तो मनुष्य की निरंतर आगे बढ़ती हुई गतिविधियां इन प्रवाहों को के अनुसार पैमाने पर बदल रही है।

क्लार्क 1989 में 18वीं शताब्दी के बाद से ग्रह ने यूरोप से भी बडे क्षेत्र में 6 मिलियन किलोमीटर  2 वन खो दिए है। आज" पर्यावरण" का अस्तित्व खतरे में है "पर्यावरण" को बचाओ उसकी रक्षा करो। हम हमेशा

यह नारे सुनते रहते हैं, परंतु यह कितने प्रासंगिक है और क्या इनमें सच्चाई है? यदि हम "पर्यावरण" पर जीवन के क्रमिक विकास को देखें तो खोखले नारों के अतिरिक्त कुछ नहीं।

हां मानव जाति स्वयं निश्चित रूप से खतरे में है, क्योंकि वह प्रकृति के नियमों से लगातार खिलवाड़ कर रही है। जीवन तो यहां मानव अस्तित्व से पहले भी रहा है बाद में भी फलता-फूलता रहेगा।

मनुष्य के द्वारा उत्पन्न इस खतरे को मनुष्य के द्वारा फैलाये जा रहे प्रदूषण की परिणिति कहा जाए तो अतिशयोक्ति नहीं होगी। वर्तमान में घटित बहुत प्राकृतिक घटनाओं को देखकर यह अंदाजा लगाया जा सकता है की स्थिति अब बहुत ही भयानक हो चुकी है, और देखा जाए तो अब इसे बदला भी नहीं जा सकता। अगर देखा जाए क्या पर्यावरण संरक्षण के लिए हमें प्रयास नहीं करना चाहिए। बिल्कुल भी नहीं अभी तो पर्यावरण के पांच तत्व पानी, हवा, भूमि, आग और अंबर को सुरक्षित व साफ बनाए रखने का प्रयास करना बहुत ही जरूरी है और इन प्रयासों को अधिक प्रभावशाली तथा तेज गति से किए जाने की आवश्यकता है। वैज्ञानिकों का मानना है कि पिछले कुछ वर्षों में जलवायु परिवर्तन के कारण पूरे संसार में असामान्य तापमान, बरसात, बाढ़ जैसी अनगिनत घटनाओं में वृद्धि हुई है।

उदाहरण के लिए एक रिपोर्ट जो मई 2022 के महीनों के दौरान भारत में रिकॉर्ड अत्यधिक उच्च तापमान का अनुभव किया गया है, जो की 122 वर्ष पूर्व किए गए और सबसे गर्म महीने रहे हैं।

जब सिस्टम थर्मल संतुलन में होता है तब दो प्रणालियों का तापमान समान होता है पृथ्वी का औसत तापमान समान होता है।

पृथ्वी का औसत तापमान 61 डिग्री F (फॉरेन्हाइट) (16 डिग्री C) है। परंतु संपूर्ण विश्व में अलग-अलग जगहों पर वर्षा, समुद्र और पवन

धाराओं पर एवं मौसम की स्थिति के आधार पर तापमान अलग-अलग होता है। पृथ्वी पर जीवन को बनाए रखने के लिए यह औसत तापमान आवश्यक होता है।

हालांकि मानवीय गतिविधियों के द्वारा अत्यधिक ग्रीन हाउस गैसें और एरोसॉल उत्सर्जन के कारण वायुमंडलीय सांद्रता में परिवर्तन होने के कारण पृथ्वी का ऊर्जा बजट प्रभावित हो रहा है। आईपीसीसी ने कहीं प्रमाणों के आधार पर यह बताया है कि मानवीय गतिविधियों के कारण संपूर्ण विश्व में जलवायु परिवर्तन हो रहा है। तापमान विश्लेषण परीक्षण के आधार पर प्रत्येक जिले के तापमान एवं RCP परिदृश्य के आधार पर अनुमानित तापमान की तुलना कर बार चार्ट और ग्रोथ रेखाओं के रूप में सरलता से देखा जा सकता है। ऑस्ट्रेलिया के कुछ हिस्सों में हाल के दिनों में भारी वर्षा और अमेजॉन के जंगलों में 2019 में लगी भीषण आग भी जलवायु परिवर्तन के हानिकारक प्रभावों के प्रत्यक्ष उदाहरण हैं, अगर देखा जाए तो अमेजॉन के जंगलों में लगी आग पर्यावरण को कई तरह से नुकसान पहुंचा रही है। यह एक ऐसी दुर्घटना है जिसमें जंगल में एक हिस्सा या फिर पूरे वन में आग लग जाती है और फैलती रहती है, इस स्थिति में जंगल में उपस्थित जीव जंतु पेड़ पौधे और हमें मिलने वाली वनस्पतियों और जड़ी बूटियां जलकर राख हो जाती है। आग लगने का मुख्य कारण प्राकृतिक कारण भी हो सकते हैं, जैसे बिजली गिरना या फिर अचानक से घर्षण पैदा होना कई बार जंगल की आग मानव निर्मित भी हो सकती है। इस आग की वजह से ग्लोबल वार्मिंग या धरती का तापमान बढ़ने जैसी समस्याएं जन्म ले रही है। निर्विवाद रूप से यह हानिकारक प्रभाव समुद्री पारिस्थितिक तंत्र पर भी देखने को मिला है। समुद्र के स्तर में परिवर्तन के कारण जलवायु परिवर्तन से संबंधित कारणों तक ही सीमित नहीं है यह सर्व-विदित है कि होलोसीन में पिछले कई लाखों वर्षों से

हिमनदों और अंतर हिम-नद काल के विकल्प के कारण समुद्र के औसत स्तर में बार-बार उतार चढ़ाव होता रहता है, औसत समुद्र तल का यह उतार-चढ़ाव लगभग 120 मीटर तक पहुंच गया है। समुद्र के स्तर में भी अल्पकालिक उतार-चढ़ाव होते हैं, जैसे ज्वार लहरें और सुनामी उतार-चढ़ाव की इतनी विस्तृत श्रृंखला के बीच जलवायु परिवर्तन से संबंधित समुद्र स्तर परिवर्तन की अपनी अनूठी विशेषताएं है। आईपीसीसी ने 1988 मैं अपनी स्थापना के बाद से चार प्रमुख मूल्यांकन रिपोर्ट प्रकाशित की है। पहले से चौथी मूल्यांकन रिपोर्ट में अनुमान लगाया है कि भविष्य में समुद्र का स्तर 2100 तक बढ़ जाएगा जो 31-110 सेंटीमीटर है समुद्र के औसत स्तर में अनुमानित वृद्धि में बदलाव का यह प्रमुख कारण है।

एक व्यापक अंतरराष्ट्रीय रिपोर्ट के अनुसार मुख्य रूप से जलवायु परिवर्तन के कारण 2009 के बाद के दशक में विश्व ने अपनी विशेष शक्तियों को लगभग 14 प्रतिशत खो दिया है।

अब प्रश्न उठता है कि क्या हम इन दुष्प्रभावों को रोक सकते हैं या कम कर सकते हैं। यदि हां तो कैसे? क्या विकास पर इसका नकारात्मक प्रभाव पड़ेगा क्या विकास और पर्यावरणीय संतुलन दोनों साथ चल सकते हैं। यह तमाम ऐसे प्रश्न है जो वैश्विक स्तर पर चर्चा के केंद्र में है इन्हीं को दृष्टिगत रखते हुए विश्व के तमाम देश सतत विकास के 17 लक्षणों के साथ पेरिस समझौते में प्रदूषण के दुष्परिणाम को कम करने और संतुलन को साधने के लिए साथ-साथ आए। इस संबंध में यदि भारत के प्रयासों को देखा जाए तो व्यावहारिक रूप से हमारी प्रगति विश्व भर के देशों में अग्रणी है। सस्ती स्वच्छ और अक्षय ऊर्जा का लक्ष्य इन सब में सबसे महत्वपूर्ण है क्योंकि यह प्रत्यक्ष तथा परोक्ष रूप से अन्य सभी सतत विकास के लक्षण से जुड़ा हुआ है। भारत ने 2030 तक अक्षय ऊर्जा के 500 गीगावॉट का

महत्वाकांक्षी लक्ष्य रखा है, जो उसे समय की स्थापित क्षमता का कुल 50% होगी।

कार्बन डाइऑक्साइड और अन्य ग्रीन-हाउस गैसों का उत्सर्जन जलवायु परिवर्तन के कुछ प्रमुख कर्म में से एक और अधिकतर समस्याओं की जड़ है। अच्छा इस पर तत्काल कोई ठोस कदम उठाए जाने की आवश्यकता है। सर्वप्रथम समेकित विकास को नकारात्मक रूप से प्रभावित किए बिना पूर्व तथा वर्तमान में उत्सर्जित ग्रीन-हाउस गैसों का तेजी से रोकने की जरूरत है और यह काम प्राकृतिक कार्बन सिंक में वृद्धि करके किया जा सकता है। जापानी वनस्पति शास्त्री अकीरा मियावाकी द्वारा विकसित" मियावाकी" विधि कम समय में गाने देसी प्रजातियों के जंगलों को उगाने के लिए एक बार की हुई और अनुभूत वैज्ञानिक विधि है। जो तेजी से प्राकृतिक कार्बन सिंक अर्थात जंगलों को बढ़ाने के काम आ सकती है, इस विधि ने खाली पड़ी जमीन को लघु वनों में बदलकर शहरी वनीकरण की अवधारणा में क्रांति ला दी है। यह लघु वन पारंपरिक तरीकों से लगाए गए पौधों की तुलना में 10 गुना तेजी से बढ़ते हैं कई गुना संघ और अधिक जैव विविधता वाले होते हैं साथ ही तीन वर्षों के बाद रख रखाव मुक्त भी हो जाते हैं। यह लघु वन शहरी क्षेत्र में वाहनों के उत्सर्जन से हो रहे वायु प्रदूषण को कम करने में बहुत प्रभावी है साथ ही हिमालय क्षेत्र में हो रहे विकास कार्यों जैसे सड़कों का निर्माण उनका चौड़ीकरण रेलवे लाइन तथा सुरंग के निर्माण आदि से निकले हुए चट्टानी मलबे का निर्दिष्ट स्थल पर एकत्र कर वहां पर भी मियावाकी विधि अपनाई जा सकती है।

**सन्दर्भ ग्रन्थ सूची:-**


1. डॉ. विमल कुमार हटवाल, वैज्ञानिक 'ई' एकीकृत क्षेत्रीय कार्यालय, चंडीगढ़


***

# जागतिक पर्यावरण विषयक समस्या एक अभ्यास

संशोधक
**चिमाजी पांडुरंग हारके**
अर्थशास्त्र विभाग
श्री आसारामजी भांडवलदार महाविद्यालय, देवगाव,
रं. ता. कन्नड, जि. छ. संभाजीनगर

मार्गदर्शक
**प्रा. डॉ. विनायक शिंदे**
दगडोजीराव देशमुख
महाविद्यालय, वाळूज,
छ. संभाजीनगर

**गोषवारा**

जागतिक पर्यावरण समस्या खरोखरच जगभरातील समस्या असेल तर निराकरण देखील सार्वत्रिक असू शकते. तथापि, पर्यावरणीय समस्यांवरील आंतरराष्ट्रीय करार साध्य करणे अनेकदा कठीण असते कारण देश सामाजिक आणि आर्थिक विकासाच्या समतुल्य टप्प्यावर नसतात. विकसित राष्ट्रे पर्यावरणाचे संरक्षण आणि पुनर्संचयित करण्यासाठी सरकारी नियमांवर लक्षणीय अवलंबून असतात; गेल्या दशकात, पर्यावरणाच्या ऱ्हासाने असाधारण जागतिककल पाहिला आहे. याकल किंवा नमुन्यांमध्ये संसाधनांचा अनियंत्रित वापर, प्रचलित दारिद्र्य आणि लोकसंख्येची अनियंत्रित वाढ, जलद औद्योगिकीकरण, शहरीकरण, जागतिकीकरण आणि जंगलतोड यांचा समावेश आहे. या ग्रहावर राहणाऱ्या लोकसंख्येचे आरोग्य आणि जीवन सामाजिक-आर्थिक विकासासाठी मोठ्या प्रमाणात तडजोड केली जाते. जागतिक पर्यावरणीय समस्यांना केवळ आंतरराष्ट्रीय समुदायांद्वारेच नव्हे तर वैयक्तिकरित्या नियोजित कृती आणि ठोस प्रतिसाद आवश्यक आहेत. हे मुद्दे सीमांच्या आत बांधलेले नाहीत, ते प्रत्येक राष्ट्राला स्पर्श करतात. सर्व प्राणी आणि

वनस्पतींच्या जीवनावर विपरित परिणाम करतात. या जागतिक पर्यावरणीय समस्यांचा पर्यावरण, लोक आणि समाजांवर दीर्घकालीन प्रतिकूल परिणाम होतो आणि अल्प कालावधीत उलट करणे नेहमीच कठीण असते.

मानवी प्रभाव आणि नैसर्गिक वातावरणाचे व्यवस्थापन, जैवविविधता टिकवून ठेवण्याच्या चिंतेवर भर दिला जातो. शहरीकरण आणि औद्योगिकीकरण, शेतीचा विस्तार आणि जंगलांचा नाश यामुळे वेगाने वाढणारी लोकसंख्या आणि आर्थिक विकासामुळे भारतातील अनेक पर्यावरणीय समस्या उद्भवू शकतात. पर्यावरणीय समस्या म्हणजे जमीन, संसाधन कमी होणे (पाणी, खनिज, जंगल, वाळू, खडक इ.) पर्यावरणीय -हास, सार्वजनिक आरोग्य, जैवविविधतेचे नुकसान, परिसंस्थेतील लचीलापणा कमी होणे, गरिबांसाठी जीवनमान सुरक्षा.

**प्रस्तावना**

जागतिकीकरणामुळे कच्चा माल आणि अन्नपदार्थ एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेण्याचे प्रमाणही वाढले आहे. पूर्वी, लोक स्थानिक पातळीवर तयार केलेले अन्न वापरत असत, परंतु जागतिकीकरणामुळे लोक परदेशात विकसित झालेल्या उत्पादनांचा वापर करतात. या उत्पादनांची वाहतूक करताना जेवढे इंधन वापरले जाते त्यामुळे पर्यावरणातील प्रदूषणाचे प्रमाण वाढले आहे. यामुळे ध्वनी प्रदूषण आणि भूपृष्ठ घुसखोरी यासारख्या इतर अनेक पर्यावरणीय चिंता देखील निर्माण झाल्या आहेत. वाहतुकीने पेट्रोलसारख्या उर्जेच्या अनूतनीकरण योग्य स्त्रोतांवरही ताण दिला आहे. विमानातून उत्सर्जित होणाऱ्या वायूंमुळे हरितगृह परिणाम वाढण्याबरोबरच ओझोनच्या थराचा ऱ्हास होत आहे. उत्पादनाच्या परिणामी निर्माण होणारा औद्योगिक कचरा जहाजांवर लादून महासागरात टाकला जातो. यामुळे अनेक पाण्याखालील

जीवांचा मृत्यू झाला आहे आणि अनेक घातक रसायने समुद्रात जमा झाली आहेत.

जागतिकीकरण आणि औद्योगिकीकरणामुळे विविध रसायने जमिनीत फेकली गेली आहेत ज्यामुळे अनेक हानिकारक तण आणि वनस्पतींची वाढ झाली आहे. या विषारी कचऱ्यामुळे वनस्पतींच्या अनुवांशिक रचनेत व्यत्यय आणून त्यांचे बरेच नुकसान झाले आहे. त्यामुळे उपलब्ध भूसंपत्तीवर ताण आला आहे. जगाच्या विविध भागांमध्ये, बोगदा किंवा महामार्गासाठी मार्ग तयार करण्यासाठी पर्वत कापले जात आहेत. नवीन इमारतींचा मार्ग मोकळा करण्यासाठी विस्तीर्ण नापीक जमिनींवर अतिक्रमण करण्यात आले आहे. या नवकल्पनांचा मनुष्य हा गोफर म्हणून राहू शकतो परंतु याचा पर्यावरणावर दीर्घकालीन परिणाम होऊ शकतो.. गेल्या काही वर्षांतील विविध अभ्यासात असे आढळून आले आहे की प्लास्टिक हे एक प्रमुख विषारी प्रदूषक आहे, कारण ते एक नॉन-बायोडिग्रेडेबल उत्पादन आहे. तथापि, निर्यात केल्या जाणाऱ्या वस्तूंचे पॅकेजिंग आणि जतन करण्यासाठी प्लॅस्टिकचा प्रचंड उपयोग होतो. यामुळे प्लॅस्टिकचा वापर वाढला असून त्यामुळे पर्यावरणाचे मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होत आहे.

**उद्दिष्ट्ये**

1. जागतिक पर्यावरणीय समस्यांवर चर्चा करणे.
2. हवामान बदलाच्या समस्या आणि परिणाम समजून घेणे.
3. बदलत्या पर्यावरणाचा मानवी आरोग्यावर होणारा परिणाम अभ्यासणे.

**गृहितके**

1. वाढत्या औद्योगिकीकरणामुळे जागतिक पर्यावरणावर बदल होत आहे.

2. पर्यावरणातील बदलामुळे मानवी आरोग्यास धोका निर्माण होत आहे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत जागतिक पर्यावरण विषयक समस्या याचे संशोधन करीत असताना दुय्यम साधनांचा वापर केलेला आहे. यामध्ये सरकारी वार्षिक अहवाल, जागतिक पर्यावरण विषयक मासिके, वर्तमानपत्रे, गॅझेट्स, संशोधन ग्रंथ इत्यादीचा वापर केलेला आहे.

**संशोधन मर्यादा**

प्रस्तुत संशोधन जागतिक पर्यावरण विषयक समस्या याचा अभ्यास करणारे आहे. या संशोधनात पर्यावरण विषयक समस्या तसेच पर्यावरणामध्ये होणारे बदल आणि याचे मानवी आरोग्यावर होणारे परिणाम याचा अभ्यास करण्यात येणार आहे. सदरील संशोधन जागतिक पर्यावरण विषयक समस्या यापर्यंत मर्यादित असेल.

**संशोधन साहित्याचा आढावा**

**पर्यावरण विषयक व्याख्या**

1. सजीवांच्या नैसर्गिक परिसरास पर्यावरण असे म्हणतात. या संज्ञेत वनस्पती अथवा प्राणी ज्या नैसर्गिक परीसरात जगतात, वाढतात, तेथील हवा, जमिन, पाणी, इतर सजीव, पर्जन्यमान, उंची, तापमान इत्यादीचा समावेश होतो.
2. पर्यावरण म्हणजे आपला परिसर जमिन, आकाश व पाणी हे पर्यावरणाचे प्रमुख घटक आहेत तर यामधील जैविक व अजैविक घटक मिळून परिसर अर्थात, पर्यावरण तयार होते. जैविक घटकामध्ये मानव, सर्व प्रकारचे जीव, वनस्पती, झुडपे यांचा समावेश होतो.

3. पर्यावरण म्हणजे हे आपल्या सभोवतालचे सर्व काही आहे हे सजीव किंवा निर्जीव वस्तु असू शकतात. यात भौतिक, रासायनिक आणि इतर नैसर्गिक शक्तीचा समावेश होतो. सजीव वस्तु त्यांच्या वातावरणात राहतात. ते सतत त्यांच्याशी संवाद साधतात. आणि त्यांच्या वातावरणातील परिस्थितीशी जुळवून घेतात.

प्रस्तुत विषय संशोधन करत असताना जागतिक पर्यावरण विषयक समस्या बद्दल ज्या संशोधकानी संशोधन केले आहे. त्या अभ्यास संशोधकाच्य संशोधनाचा आढावा घेतला आहे तो खालील प्रमाणे -

**1) सादुल्ला (2013)**

1972 मध्ये संयुक्त राष्ट्र संघाने पूर्ण जगाचे लक्ष पर्यावरणाचे महत्त्व या विषयावर केंद्रित व्हावे तसेच राजकीय दृष्ट्या पर्यावरण संदर्भात उपक्रम राबविण्या करीता प्रवृत्ती मिळवी या दृष्टीने प्रयत्न सुरू केले. हवामानातील बदलामुळे आपल्या आरोग्यावर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष परिणाम होतात. आजुबाजूच्या परिसरातील चालणारे निसर्गाचे चक्र अनियमित होते. हवा प्रदुषित होते. अन्नपाणी यांच्यावर हा परिणाम इतरांपेक्षा जास्त होऊ शकतो. या हवामानाच्या बदलामुळे वेगवेगळ्या परिसंस्थामध्येही बदल होऊ शकतात. सजीवांचे अधिवास सुस्थितीत राहणे या समतोलावर अवलंबुन असते.

**2) रॉड सायमन (ऑक्टो 2014)**

यांनी पृथ्वीवरील जीवसृष्टीचा समतोल दिवसेंदिवस अनेकविध मार्गानी लुप्त होत आहे. त्यामागे जागतिक तापमान वाढ खनिज तेल गळती जैवविविधतेतील राज आर्थिक परिस्थिती बर्फाची वितळणे, विषारी पाणी नदीत मिसळणे, कचऱ्याचे अनियंत्रित जाळणे, जंगलाचा ऱ्हास त्याचबरोबर जलवायू यांचे प्रचंड प्रदूषण यासारखी असंख्य कारणे आहेत.

या पर्यावरणाच्या संरक्षणासाठी अनेक आर्थिक तसेच फायदेशीर उपाययोजना केल्या जात आहेत. मानवाने पर्यावरणाकडे न पाहता जबाबदारीने पाहिल्यास पर्यावरणाचा विकासाच्या दृष्टीने ते फायद्याचे ठरत शकते.


**3. नलगे दिलीप (1996)**

आजचा निसर्ग अतिशय अस्थिर आहे. निसर्गात काही ना काही घडामोडी होत आहेत. विकास प्रकल्पामुळे निसर्गात मोठ्या प्रमाणात बदल घडत आहेत. मानवाचा शारीरिक स्वास्थ्य बरोबरच मानसिक आरोग्यावर परिणाम होताना दिसून येतात. विज्ञान व तंत्रज्ञानातील मानवाची गरुडभराटी नेत्र सुखद असली तरी शास्त्रीय शोध दळणवळण औद्योगिक प्रगती व विकासाच्या नावाखाली मानवाने नैसर्गिक साधनसामग्रीचा अनिर्बंध वापर केला. कारखानदारी, नागरिकरण, आधुनिकीकरण यामुळे जागतिक पर्यावरणाच्या समस्या वाढत जात आहेत.

**पर्यावरण**

संज्ञा पर्यावरण एनवोर्मेन्ट हा फ्रेंड शब्द एन्व्हेरॉन यापासून तयार झाला आहे. याचा अर्थ वेळने किंवा भोवती असणे असा होतो. आपल्या भोवतीच्या प्रत्येक गोष्टी आहेत. हवा, पाणी, सर्व सजीव व निर्जीव गोष्टी हे आर्थिक आपले पर्यावरण घडवितात व त्याचा आपल्या जीवनावर परिणाम होतो. आपल्या भोवतालच्या याच पर्यावरणातून आपण अन्न, पाणी, वस्त्र, मूलभूत गरजा भागवतो.

जसे हे घटक अंतर्गत जोडलेले व परस्परांवर अंतर्गतपणे अवलंबून असतात. त्यामुळे पर्यावरण ही एक जिवंत जीव चैतन्य असलेली प्रणाली आहे. म्हणूनच एखाद्या घटकात केलेल्या बदल त्याचे चक्रीय पद्धतीने अन्य घटकात स्थित्यंतर केले जाते.




वरील चित्र स्पष्टपणे सूचित करते की, पर्यावरणाचा विकासासाठी उपयोग हा मानवी समाजासाठी फायदेशीर वाटणे शक्य आहे. पण पर्यावरणासाठी एक प्रणाली म्हणून निश्चितपणे लाभदायक नाही.

**मानवी समाज व पर्यावरण**

मानवी समाज ज्या ठिकाणी राहतो जीवन जगतो. त्याच्या सभोवतालच्या परिसरात पर्यावरण असे म्हणतात. पर्यावरण हे जैविक व अजैविक घटकांनी बनलेले आहे. मानवी समाजासाठी निसर्गातील अनेक घटक अतिशय उपयुक्त ठरलेले आहेत. त्याचप्रमाणे प्रामुख्याने हवा, पाणी, जमीन, वनस्पती, नद्या, हवामान इत्यादी घटक तसेच सूक्ष्मजीव, पक्षी, सरपटणारे जीव, जलचर, वन्यजीव इत्यादींचा समावेश घटकात केला जातो. या निसर्गातील विविध घटकांच्या अमर्याद वापरामुळे काही घटक संपुष्टात येत आहेत व काही घटकांच्या अमर्याद वापराने पर्यावरणात अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. वाढत्या लोकसंख्येमुळे हवा, जमीन व ध्वनी प्रदूषण वाढले आहे. कृषी, औद्योगीकरण, तंत्रज्ञान

विस्फोट, हरितक्रांती, नागरिकरण, लोकसंख्या विस्फोट या सर्व घटकांचा पर्यावरणावर विपरीत परिणाम होतो. यातूनच प्रदूषण हवामानातील बदल पर्जन्य, निर्वानीकरण, वाळवंटी करण्यासाठी समस्यांचा परिणाम जागतिक पातळीवर दिसून येत आहे.

**बदलत्या पर्यावरणाचा मानवी आरोग्यावर परिणाम**

बदलत्या पर्यावरणाचा मानवी आरोग्य व कल्याण यावर विपरीत परिणाम होतो. यामुळे प्रामुख्याने ग्लोबल वार्मिंग हरितगृहे परिणाम आम्ल पर्जन्य ओझोनचा ऱ्हास यासारख्या समस्या निर्माण झाल्याने त्याचा मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. यामुळे मानवी आरोग्यास धोका निर्माण होतो. खनिज तेल, दगडी कोळसा याचा वापर कारखानदारी व वाहतुकीसाठी मोठ्या प्रमाणात होत असल्याने हवेत कार्बन डाय-ऑक्साइड मोठ्या प्रमाणात सोडले जातात. त्याच्या सजीवांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे.

अतिरिक्त रासायनिक खते, कीटकनाशके यांच्या वापरण्यात शेती उत्पादन जरी वाढले तरी पिकाची गुणवत्ता कालावधी असून त्याचा कस कमी झाला आहे, अन्नधान्यात डीडीटी व रासायनिक खतांचा समावेश असल्याने मानवी आरोग्यास धोक्यात आले आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे लोकसंख्येचे केंद्रीकरण होऊन मोठी नगरी उदयास आली. स्वच्छतेचा अभाव, गलिच्छ झोपडपट्ट्या, बेकारी गुन्हेगारी आरोग्य यासारखे प्रश्न निर्माण झाले. दोन्ही प्रदूषणामुळे कर्णकर्कश आवाजामुळे बहिरेपणा, चिडचिड, त्वचेचे रोग, आवाजामुळे असहाय्य वेदना, श्रवण क्षमता कमी होणे, शारीरिक व मानसिक आजार जडतात.

आधुनिकीकरण, नागरीकरण, वाहतूक साधनात वाढ, हे इत्यादीमुळे हवा प्रदूषण वाढले आहे. त्याचा श्वसन क्रियेवर परिणाम होऊन कॅन्सरचा प्रादुर्भाव, धुरामुळे रक्त व मज्जसंस्थेवर प्रतिकूल

परिणाम शरीरातील कमी होणे. कार्यक्षमता बिघडणे, स्वस्त बिघडणे, खोकला, फुफ्फुसाचे रोग यासारखे आजार जडतात.

**पर्यावरण जनजागृतीची आवश्यकता**

जागतिक तापमान वृद्धी, ओझोन वायूचा ऱ्हास, आम्लपर्जन्य, जल, हवा दोन्ही प्रदूषण यासारख्या समस्यांनी गंभीर धारण केले आहे. पृथ्वीवरील मानवाची अस्तित्व धोक्यात आले आहे. जे जगाच्या लक्षात आल्याने जगातील सर्वच राष्ट्रांनी पर्यावरण संरक्षणावर भर दिले आहे. आर्थिक विकास साधून जगातील दारिद्र्य कमी करणे, मानवी हक्क व निसर्गातील साधन संपत्तीचे जतन करणे, रस्ता, विकास साधने, पर्यावरणाचे संतुलन राखणे इत्यादी गोष्टीवर पर्यावरण जनजागृतीची आवश्यकता आहे.

पर्यावरणातील नैसर्गिक साधनांच्या अतिवापरामुळे एकविसाव्या शतकात मानवाचे अस्तित्वात धोका निर्माण झाला आहे. म्हणूनच विकसित विकसनशीत राष्ट्र पर्यावरण संदर्भात जागतिक स्तरावर परिषद चर्चा कार्यशाळा याचे आयोजन करून त्यावर उपाययोजना करण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यामुळे जनजागृतीच्या माध्यमातून पर्यावरण संरक्षण करता येते. खालील कारणाने पर्यावरण जनजागृतीची आवश्यकता निर्माण झाली आहे.

- हवा प्रदूषणाने मानवाचे आरोग्य धोक्यात आले आहे
- हवेतील विविध विषारी वायूमुळे रक्तदाब मजा संस्थेचे विकार डोकेदुखी, रक्तदाब इत्यादी आजार निर्माण होतात
- ध्वनी प्रदूषणाने मानसशास्त्र बिघडणे सिडकोरपणा आणि निद्रानाथ डोकेदुखी अपचन शासनाचे रोग निर्माण होतात
- जागतिक तापमान वृद्धीने सरासरी तापमान वाढ हिम अच्छादित प्रदेशातील बर्फ वितळणे ऋतुमानात बदल कृषी क्षेत्रावर परिणाम होत आहे

- ऊर्जेचा प्रचंड मागणीमुळे अणुऊर्जा निर्माण करण्यात आली तिच्या अतिवापराने अनेक गंभीर समस्या निर्माण झाल्या
- धोकादायक किरण सरगामुळे रोगप्रत्यकारक शक्ती कमी होणे निरुत्साह वाढणे भूक कमी होणे उलट्या ताप यासारखे आजार येतात
- जंगल तोडीचे परिणाम जैवविविधता धोक्यात आली आहे
- पर्यावरणाचे संतुलन बिघडणे भूमिगत पाण्याची पातळी कमी होणे.

इत्यादी कारणामुळे जागतिक पर्यावरणाची जनजागृती करणे आवश्यक आहे.

**सारांश**

जागतिक पर्यावरण समस्या जगासमोर सर्वात मोठी समस्या आहे. पर्यावरणीय ऱ्हासासारखे सर्वात मोठे आव्हानाला सध्याच्या समाजाला तोंड द्यावे लागत आहे. या समस्येचे प्रमुख कारण मानवनिर्मित आहे. म्हणूनच पर्यावरणीय सुधारण्याच्या उपाययोजनासाठी आणि घटनांमुळे होणाऱ्या परिणामाविषयी जागृती करून लोकांचे प्रबोधन करण्याची गरज आहे. आपल्या सर्वांचे अस्तित्व हे चांगले पर्यावरणीय स्थिती आणि जीवनाला आधार देणारे यंत्रणा यावर अवलंबून आहे. त्यासाठी सर्वांना प्रामुख्याने लोकांना नैसर्गिक घटकांची संरचना कार्य आणि प्रक्रिया याविषयी तसेच सर्वांची रोजच्या जीवनामधील भूमिका आहेत याची जाणीव करून देणे आवश्यक आहे.

पर्यावरणाचा ऱ्हास व पर्यावरण समस्या या प्रामुख्याने नैसर्गिक संसाधनाच्या अतिवापर आणि चुकीच्या समजुती याच्यावर आधारित आहे असलेल्या प्रगतीच्या क्रिया यांचा वरील परिणामाचा प्रभाव आहे. त्यामुळे अशा परिस्थितीमुळे निर्माण होणाऱ्या जागतिक पर्यावरण समस्याला तोंड देण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे. सध्याच्या वेगाने बदलणाऱ्या अपर्यावरन पूरक आणि अशाश्वत जीवनशैली चुकीच्या

प्रगतीच्या प्राधान्यावर आधारित असल्यामुळे पर्यावरण जनजागृतीची गरज निर्माण झाली आहे.

**संदर्भ**


1) अ. रा. कुंभारे 2004 पर्यावरण शास्त्र पुणे पायल पब्लिकेशन

2) हेमंत पेंडणेकर सचिन पेंडसे 2006 पर्यावरण व शाश्वत विकास नागपूर

3) डॉ. प्रकाश सावंत 2009 पर्यावरण अभ्यास फडके प्रकाशन कोल्हापूर

4) प्रा. सचिन पेंडसे नीता साने 2015 पर्यावरण अभ्यास यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ

5) सिंह कटार सिसोदिया अनिल पर्यावरणीय अर्थशास्त्र सिद्धांत आणि उपाययोजना

6) विकिपीडिया

7) JACSES (August 1, 2013): Problems related to the Environmental and Social Guidelines of Japan Bank for International Cooperation (JBIC) in Delhi Mumbai Industrial Corridor (DMIC) Version 1.

8) Sills, David L. (1968): International Encyclopaedia of the Social Sciences, The Macmillan Company and the free press, United States of America, Vol. 14.

9) Swain, Ashok (September, 1997): 'Democratic Consolidation? Environmental Movements in India', Asian Survey, Vol. 37, No. 9, pp. 818-832.

10) Tong, Yanki (Jan., 2005): 'Environmental Movements in Transitional Societies: A Comparative Study of Taiwan and China', Comparative Politics, Vol. 37, No. 2, pp. 167-188.

11) Vig, Norman J. and Regina S. Axelrod (2006): The Global Environment, Institutions, Law, and Policy, Earthscan Publication Ltd., London, pp. 27-71.


***

# आर्थिक आणि सामाजिक विकास संदर्भात गौतम बुद्धांच्या आर्थिक विचारांचा आढावा

**(A review of Gautama Buddha's economic thoughts in relation to economic and social development)**

**डॉ. सुभाष तातेराव पंडित**

अर्थशास्त्र विभाग

स्वामी विवेकानंद रात्र महाविद्यालय, डोंबिवली (पूर्व)

**गोषवारा:** गौतम बुद्धांचा काळ म्हणजे इ. स. पूर्व सहावे शतक होय. भारतीय इतिहासाच्या दृष्टीने तो काळ सम्यक क्रांतीचा म्हणून ओळखला जातो. बुद्धांच्या मानवतावादी विचारसरणीने तत्कालीन समाजात मुलभूत परिवर्तन घडून आलेले दिसून येते. बुद्धांच्या विचारात व्यवहारोपयोगी आणि समाजोपयोगी तत्वज्ञान दिसून येते. बहुजन हिताय व बहुजन सुखाय अशा लोककल्याणकारी संदेश देणारे बुद्ध लोकशाहीचे प्रथम प्रणेते होते असे स्पष्ट म्हणता येईल. मानवाच्या सर्व दुःखाचे मूळ तृष्णा होय हे सांगताना द्रव्यलालसेलाही किंवा संपत्तीलालसेलाही ही बुद्धाने तृष्णेत समाविष्ट केले आहे. बुद्धांच्या काळात भारतीय समाज पूर्णपणे आर्थिक घटकांसाठी शेती, पशुपालन, व्यापार, उद्योग आणि कला यावर अवलंबून होता. गौतम बुद्धांने सामाजिक व आर्थिक विकासाबाबतीत मांडलेल्या विचारांचा थोडक्यात आढावा या संशोधनात्मक अभ्यासात करण्यात आला आहे.

**प्रस्तावना:** जागतिकीकरणाच्या काळात आर्थिक विकास हाच मानवी जीवनाचा अविभाज्य भाग झालेला आहे. आर्थिक विकासाच्या अनुषंगाने

सामान्य जनतेच्या प्रगतीला चालना मिळाली आहे. राष्ट्राचा आर्थिक विकास हा प्रत्येक व्यक्तीच्या विकासावर अवलंबून असतो. मनुष्यामधील समाज हा राष्ट्राची उभारणी करतो म्हणून संपूर्ण समाजाचा सर्वांगीण विकास होणे गरजेचे असते. परंतु सामान्य माणूस मात्र मुलभूत गरजाही सहज पूर्ण करू शकत नाही. आज प्रगती, विकासाच्या नावावर माणूस भौतिक साधन संपत्तीचा गुलाम बनला आहे. वास्तविकरीत्या समाजाची आंतरिक प्रगती वृद्धीवंत व्हावी जेणेकरून समाजाच्या प्रगतीला चालना मिळेल या दिशेने सातत्याने प्रयत्न करणे आवश्यक आहे. मानवाने विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात मोठी प्रगती केली असली तरी नैतिक मुल्यविरहीत प्रगती कितीही पुढे गेली तरीही मनुष्याची सर्वांगीण प्रगती झालेली दिसून येणार नाही. म्हणून राष्ट्राच्या आंतरिक, सर्वांगीण विकासाकरिता सामाजिक दृष्टीकोनातून स्थिर अर्थव्यवस्थेची जगाला आवश्यकता आहे. ज्या व्यवस्थेत मनुष्याच्या अत्युच्य नैतिक विकासाला व मानवी मूल्यांना प्राधान्य असेल. गौतम बुद्धांच्या विचारांच्या आधारावर समाजिक व आर्थिक विकासाला चालना देणारी आधुनिक व प्रगतीशील व्यवस्था निर्माण झाल्यास या स्थितीवर मात करणे शक्य होईल. कारण गौतम बुद्धांचा विचार हा भौतिक विकासाबरोबरच मनुष्यांचा आंतरिक, सर्वांगीण प्रगतीला चालना देणारा ठरेल.

**संशोधन उदिष्ट्ये:**

१. गौतम बुद्धांच्या सामाजिक व आर्थिक विचारांचे अध्ययन करणे.

२. गौतम बुद्धांच्या सामाजिक व आर्थिक विचारांचे मनुष्य जीवनातील महत्व अभ्यासणे.

३. वर्तमान अर्थव्यवस्थेत बुद्धांच्या विचारांचा उपयोगाचे अध्ययन करणे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत संशोधनात्मक अध्ययन हे माहितीच्या द्वितीय साधन सामुग्रीवर आधारित असून प्राप्त माहितीचे विश्लेषणात्मक व वर्णनात्मक अध्ययन केले आहे. सदर अभ्यासाकरिता पुस्तके, वर्तमान पत्र, इंटरनेटचा उपयोग  करण्यात आला आहे.

**संशोधन मर्यादा:**

प्रस्तुत संशोधनात्मक अध्ययन हे केवळ सामाजिक व आर्थिक विकासाकरिता गौतम बुद्धांच्या आर्थिक विचारांचा उपयोग कसा होईल याचा थोडक्यात आढावा घेतला आहे.

**गौतम बुद्धांचे आर्थिक विचार:**

**१. सार्वत्रिक शिक्षणाविषयक विचार:** मानवाच्या सामाजिक व आर्थिक विकासात शिक्षणाचे महत्व अनन्यसाधारण असून कोणताही मनुष्य योग्य शिक्षणाशिवाय भौतिक, अध्यात्मिक विकास प्रगती करू शकत नाही. सर्वांगीण प्रगती आणि शांततामय सहजीवनासाठी शिक्षण हे एक महत्वाचे साधन आहे. शिक्षणामुळे केवळ वैयक्तिकच नव्हे तर सामाजिक व राष्ट्र विकासाला देखील चालना मिळते. शिक्षणामुळे वैचारिक शक्ती प्रगल्भ होते. समाजाच्या आर्थिक व सामाजिक उच्च प्रगतीसाठी किंवा राष्ट्राच्या उच्च प्रगतीसाठी शिक्षण अत्यावश्यक असल्याने बुद्धाने सार्वत्रिक शिक्षणाचा पुरस्कार केला आहे.

**२. संपतीच्या निर्मितीविषय विचार:** अन्न, वस्त्र, निवारा आणि आरोग्य या मानवांच्या मुलभूत गरजा योग्यरीतीने पूर्णकरण्याकरिता संपत्तीची गरज असते. किंबहुना संपत्तीशिवाय मानवाचा कोणत्याही गरजा पूर्ण होत नाहीत. म्हणून बुद्धांनी समाजातील आर्थिक स्थिरता  आणि राष्ट्राच्या प्रगतीसाठी आवश्यक तीन बाबीची चर्चा केलेली दिसून येते.

१. कुशल व प्रामाणिक प्रयत्नाद्वारे संपत्तीची निर्मिती (उत्थान संपदा)

२. संपत्तीची सुरक्षा व बचत (आरक्ष संपदा)

३. साधन संपत्तीच्या मर्यादेत राहून जीवनयापन करणे (समजीविकता)

संपत्तीच्या निर्मितीला प्रोह्त्सःन देताना बुद्ध त्याकाळात प्रचलित पुढील सहा बाबीचा विचार करतात.

१. शेती

२. व्यापार

३. पशुपालन

४. संरक्षण सेवा

५. शासकीय सेवा

६. व्यावसायिक सेवा

वरील व्यवसायांच्या सह्याने संपत्ती आर्जीत करण्यास बुद्धाने मान्यता दिलेली आहे. संपत्ती निर्माण करण्याचे हे मार्ग समाजातील सर्व घटकांसाठी असून त्यांचा विकास होण्यास मदत होईल असे बुद्ध म्हणतात. एवढेच नाहीतर समाजाच्या व राष्ट्राच्या प्रगतीला चालना देणारे आहेत असे त्यांचे मत होते. संपत्ती निर्मितीच्या अनुषंगाने वरील व्यवसाय करण्यासाठी कोणत्याही प्रकारची सामाजिक, धार्मिक आणि वर्ण व्यवस्थेची अट बुद्धाना मान्य नव्हती. कोणताही माणूस त्याच्या योग्यतेनुसार कोणताही व्यवसाय करण्यास स्वतंत्र होता. परिणामी समाजाची प्रगती होण्यास मदत झाली. बुद्धांच्या संपत्ती निर्मितीविषयक विचारांने मोठ्या प्रमाणात समाजाची आर्थिक उन्नती झालेली दिसून येते.

मानवाने आपल्या गरजा भागविण्याकरिता संपत्ती निर्माण करणे कोणत्याही प्रकारे आक्षेपार्ह नाही असे मान्य केले असले तरी त्यांच्या मते, मानवाने अनाठायी संपत्ती संचयन करू नये. जर मानवाने आवश्यकतेपेक्षा आधिक मोठ्या प्रमाणात संपत्तीचा संचय केला तर ते मानवी सुख किंवा कल्याणासाठी घातक ठरू शकते असे म्हटले आहे. परंतु एखाद्या मानवाकडे आवश्यकतेपेक्षा आधिक साधनसंपत्ती असेल तर त्याने

स्वत:च्या कुंटूबाबरोबरच अन्य नातेवाईक, मित्र, गरजूंना मदत करावी. जेणेकरून मानवाच्या आत्मिक समाधानाबरोबरच समाजाच्या नैतिक व आध्यात्मिक विकासाला मदत होईल. संपत्तीचे समन्यायी वाटप, सुयोग्य नियोजन, बचत व गुंतवणूकीमुळे समाजात शांती आणि प्रगतीबरोबरच अपराध मुक्त समाज निर्माण होईल असे त्यांच्या विचारातून स्पष्ट होते.

**3. बचत व कर्जविषयक विचार:** केवळ संपत्ती आर्जीत करणे पुरेसे नसून योग्य मार्गाने निर्माण केलेल्या संपत्तीचे संरक्षण करणे हे मानवाचे कर्तव्य आहे. कारण संपत्तीमुळे मानव आपल्या भौतिक गरजांची पूर्तता करतो. बुद्धाने आपल्या विचारात नेहमीच आपल्या विचारात बचतीचा पुरस्कार केला आहे. त्यांच्या मते बचतीमुळे देशाच्या सामाजिक व आर्थिक विकासाला चालना मिळते. त्याचबरोबर अत्याधिक कर्ज काढण्याच्या प्रवृतीला बुद्धाने विरोध केला आहे. त्यांच्या मते, कर्जमुक्त जीवन सुखकारक असल्यामुळे कर्जमुक्त समाज निर्मितीला त्यांनी महत्व दिले. बुद्ध एकांत जीवन जगणाऱ्या श्रमणाची तुलना सर्व प्रकारच्या कर्जातून मुक्त व बचतीतून स्वत:च्या कुटुंब व मुलांची योग्य पद्धतीने देखबाल करणाऱ्या व त्यातून आनंद निर्माण करावा. बुद्धाने व्यक्तीच्या बचतीचे चार भाग करण्यास सांगितले आहेत. त्यातील एक भाग त्याच्या व कुटुंबाच्या दैनदिन गरजा भागविण्यासाठी उपयोग करावा तर संपत्तीचा दुसरा व तिसरा भाग व्यापार व गुंतवणूक करण्याकरिता वापर करावा आणि संपत्तीचा चौथा भाग आणीबाणीच्या प्रसंगी वापर करण्यासाठी राखीव ठेवावा असे म्हटले आहे.

**४. संपत्तीच्या विनियोगाविषयक विचार:** मानवाने त्याच्या कुटुंब कल्याणाकरिता संपत्तीचा विनियोग कसा करावा याचा सविस्तर विचार पुढीलप्रमाणे केलेला आपणास दिसून येतो.

१. अन्न, वस्त्र व अन्य गरजावरील खर्च

२. आईवडील, पत्नी, मुले, नोकर यांच्या देखभालीवरील खर्च

३. आजारपण, आपत्ती प्रसंगी करावा लागणारा खर्च

४. दानधर्म करण्यासाठी करावा लागणारा खर्च

५. राज्यांचे कर वेळेवर भरण्यासाठी करावा लागणारा खर्च

६. नातेवाईकांसाठी करावा लागणारा खर्च

७. अभ्यासासाठी करावा लागणारा खर्च

वरील सर्व खर्च व्यक्तीने आपल्या आर्जीत केलेल्या संपत्तीच्या माध्यातून करावा असा सविस्तर विचार मांडला आहे. आजही बुद्धांच्या संपत्ती विनयोगाचा विचार आमलात आणला तर मानवाचे जीवन सुखकारक होईल असे म्हणता येईल.

**निष्कर्ष:**

बुद्धांच्या आर्थिक विचारांचा अभ्यास करताना स्वस्थ समाज निर्मितीसाठी आवश्यक सर्व बाबीची अतिशय योग्य व सोप्या पद्धतीने चर्चा केली आहे. त्यांच्या आर्थिक विचारातून सूक्ष्म अर्थशास्त्राचे सिद्धांत दृष्टीस येतात. बुद्धाने प्रतिपादित केलेल्या सर्वसमावेशक आर्थिक विकासाच्या सिद्धांताच्या आधारे मार्गक्रम केले तर भारतातीलच नाही तर जगातील गरिबी, भूक, निरक्षरता आदी सामाजिक व आर्थिक प्रश्न कायमचे दूर होण्यास मदत होईल.

**संदर्भ सूची :-**


1. Shumekar E. F., Bauddh Economics, Asia: A Handbook, 1955.
2. Gote Prof. Dr. Bhimrao, Gautam Buddha's Theory for solution of Economic Problems in the world, International Seminar, PGTD Pali-Prakrit, R.T.M. Nagpur University-2014.
3. Brown, Clair, Buddhist Economics: An Enlightened Approach to the Dismal Science, UK, 2017.


***

# भारतीय बँकांच्या अनुत्पादक मालमत्तेचा संकल्पनात्मक अभ्यास

**प्रा. संतोष प्रभाकर जाधव**
जी. एम. डी. आर्ट्स, बी.डब्लू कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, सिन्नर , ता.सिन्नर, नाशिक

**डॉ. पाकधाने स्मिता नामदेवराव**
कर्मवीर शांताराम बापू वावरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सिडको, नाशिक

---

**गोषवारा:**

नादारी आणि दिवाळखोरी कायदा २०१६ पूर्वी देशांतर्गत खाजगी गुंतवणुकीवर परिणाम होण्याबरोबरच बँकिंग व्यवस्थेत अनुत्पादक मालमत्तेच्या मोठ्या प्रमाणामुळे आर्थिक विकासात अडथळा निर्माण होत होता. याची दखल घेऊन आपल्या सरकारने यासंदर्भात जलदगतीने कायदा आणण्याबरोबरच त्याची तितक्याच वेगाने अंमलबजावणीही केली आहे. भारताची अर्थव्यवस्था ही वेगाने विकास पावणारी अर्थव्यवस्था असून येत्या दशकात भारताचा विकासदर किमान ७ ते ८ टक्के राहील. भारतीय अर्थव्यवस्थेद्वारे भविष्यातली उज्ज्वल संधी आणि नादारी आणि दिवाळखोरी कायद्याअंतर्गत राबवली जाणारी उचित व न्याय्य प्रक्रिया यामुळे भारतात गुंतवणूक करण्याबाबत विचार करणाऱ्या गुंतवणूकदारांसाठी गुंतवणुकीची मोठी संधी असल्याचे सांगितले जाते आहे. प्रस्तुत संशोधन निबंधामध्ये संशोधकाने बँकांच्या अनुत्पादक मालमत्ता आणि गुंतवणूक यांचा संबंध अभ्यासलेला आहे. तसेच जागतिक स्तरावर अनुत्पादक मालमत्तेचे मानदं, कंपनी कायदा २०१३ आणि

गुंतवणूक क्षेत्र व गुंतवणूकदारांना प्रोत्साहन मिळेल या अनुषंगाने उपाय योजना सुचविलेल्या आहेत.

**प्रस्तावना:**

बँकिंग व्यवसाय हा जमा केलेल्या ठेवी, त्यासाठी आवश्यक कायदेशीर तरतुदी करून, व्यक्ती आणि संस्था यांना पैसे / भांडवल कर्जरूपाने देऊन त्यावर मिळणाऱ्या व्याजावर चालतो. व्यक्ती किंवा कंपनी यांना दिलेले कर्ज ही बँकेच्या दृष्टीने मालमत्ता असते.

कर्जावरील व्याज आणि मुद्दल यांची परतफेड नियमित होत असेल तर ते चांगले कर्ज म्हणता येईल अशा कर्जाचे बँकांच्या गुंतवणुकीवर फारसा विपरीत परिणाम होत नाही. कर्ज देताना ते परत फेडण्याची क्षमता हा निकष लावला जातो. कधी कधी आकस्मित आलेल्या संकटामुळे यात खंड पडू शकतो. कर्ज न फेडण्याची कारणे कधी संयुक्तिक असतात तर काही वेळा मुद्दाम थकवण्याच्या उद्देशाने कर्जे घेतली जातात तर काहीवेळेस जाणीवपूर्वक फसवणूक केली जाते. जेव्हा कर्जावरील व्याज, मुद्दल किंवा दोन्हीही बँकेस कर्जदाराकडून मिळायचे थांबते. तेव्हा ते कर्ज थकीत कर्ज बनते आणि त्यात असलेली मालमत्ता ही अनुत्पादक बनते. विशिष्ट मर्यादेबाहेर अनुत्पादक मालमत्ता वाढल्यास बँक आणि पर्यायाने बँकेचे ठेवीदार व गुंतवणूकदार अडचणीत येतात. विकसित राष्ट्रांच्या तुलनेने विकसनशील राष्ट्रात अनुत्पादित कर्जाचे प्रमाण सर्वाधिक आहे. परिणामत: गुंतवणुक क्षेत्रामध्ये गेल्या अनेक वर्षांपासून पठारावस्था निर्माण झालेली आहे. ज्या विकसनशील देशांची अर्थव्यवस्था उत्तरोत्तर प्रगती करीत आहे अशा ब्रिक्स देशात म्हणजेच ब्राझील, रशिया, भारत, चीन, दक्षिण आफ्रिका यातील ब्राझील आणि दक्षिण आफ्रिका येथील या देशातील अनुत्पादित कर्जाचे प्रमाण मध्यम

स्वरूपाचे तर चीनचे सर्वात कमी म्हणजे जागतिक दर्जाच्या बरोबर अमेरिका, नॉर्वे, स्वीडन, जर्मनी या देशांच्या बरोबरीचे आहे.

**संशोधन उद्दिष्ट्ये:**

१. बँकांच्या अनुत्पादक मालमत्तेचा अभ्यास करणे.
२. भारतीय बँक व्यवसायातील बँकांची अनुत्पादित मालमत्तेचे दृष्टचक्र अभ्यासणे.
३. कंपनी कायद्याची बँकांच्या अनुत्पादक मालमत्तेबाबतची भूमिका अभ्यासणे.
४. बँकांची अनुत्पादित मालमत्ता कमी करण्यासाठी प्रोत्साहनपर उपाययोजना सुचविणे.

**जागतिक स्तरावर अनुत्पादक मालमत्तेचे मानदंड:**

कोणताही व्यवसाय करायचे ठरवल्यावर त्यासंबंधी असलेले धोकेही लक्षात घ्यावे लागतात. अनुत्पादक मालमत्ता एकूण मालमत्तेच्या किती प्रमाणात असावी म्हणजे एकूण व्यवसायास व गुंतवणूकीस बाधा येणार नाही याची निश्चित असे प्रमाण नाही. परंतू विकसनशील देशात ३ % अनुत्पादक कर्ज असेल तर बँकिंग व्यवसायास बाधा येणार नाही असे समजण्यात येते. या तुलनेत चीन २ % पेक्षा कमी तर दक्षिण आफ्रिका, ब्राझील ३ ते ४ % मध्ये आहे. या देशांच्या तुलनेने सप्टेंबर २०२२ रोजी भारताचे हे प्रमाण १०.८ % एवढे सर्वोच्च होते. अलीकडे हे प्रमाण १०.२ % एवढे कमी झाले असले तरी ते अधिक असल्याने अर्थव्यवस्थेसाठी धोकादायकच आहे. रिझर्व बँकेच्या अहवालानुसार सन २००८ ला अमेरिकेत लेहमन ब्रदर्सच्या दिवाळखोरीनंतर निर्माण झालेल्या जागतिक मंदीच्या झळा भारताला पोहोचल्या नाहीत. कारण यावर मात करण्यासाठी सरकारने येथील बँकिंग व्यवस्थेला मोठया प्रमाणात पैसा उपलब्ध करून दिला, असलेल्या कर्जाची पुनर्रचना करून दिली. या काळात बँकांकडे

असलेला पैसा पुरेशी काळजी न घेता उद्योगधंद्यांना सढळपणे दिला गेल्याने तेव्हाची वेळ निभावून गेली. यापैकी खनिज आणि सिमेंट उद्योगातील मंदीमुळे आयात स्वस्त झाली आणि या उद्योगांचा विकास ठप्प झाला त्यामुळे ही कर्जे वसूल न झाल्याने बँकांची अनुत्पादित मालमत्ता वाढली व बँकांची गुंतवणूक घटली.

**अनुत्पादित मालमत्तेचे दृष्टचक्र:**

अनुत्पादक मालमत्तेसाठी रिझर्व बँकेच्या नियमानुसार फायद्यातून तरतूद करायची असल्याने बँकांचे उत्पन्न कमी झाले. उत्पन्न कमी झाल्याने भांडवल कमी आणि भांडवल कमी झाल्याने गुंतवणूक कमी होऊन कर्ज वितरण कमी पर्यायाने नफा कमी अशा चक्रात बँका अडकल्या आहेत. ही सगळी परिस्थिती निर्माण होण्याची जी कारणे आहेत त्यांचा खालील प्रमाणे विचार केलेला आहे.

१. थकीत कर्जामुळे गुंतवणुकीवर नकारात्मक परिणाम होऊन ताळेबंद पत्रकाचा आकार वाढलेला दिसतो. मागचा इतिहास न बघता दिलेली कर्ज ही नंतर परतफेड होण्यास अवघड असतात.
२. जागतिक मागणी व पुरवठा यांच्या स्थितीचा विचार न करता क्षमतेचा अंदाज न घेता काही वेळा कर्ज दिले जातात. व गुंतवणूक घटते.
३. बँकांनी अधिक परताव्याच्या अपेक्षेने गुंतवणूक केलेल्या प्रकल्पांना अनेक कारणांनी विलंब होणे हे देखील यामागील एक प्रमुख कारण आहे.
४. अनेक वेळा कंपन्या समभाग व इतर कर्ज साधनांतून भांडवल उभारणी करून गुंतवणूक करण्यात अपयशी ठरतात. त्यामुळे बँकांनी गुंतवणूक करतांना कंपन्यांचे समभाग नेमके कशा प्रकारचे आहेत ? याचाही विचार करणे आवश्यक ठरते.

५. अतिआशादायी अंदाजामुळे काही वेळा उद्योग अपयशी ठरतात काही वेळा कर्जाचा निधी हा विहित कामासाठी न वापरता विस्तार, आधुनिकीकरण यासाठी वापरला जातो.

६. जाणून बुजून कर्ज थकवण्याचे प्रकारही होतात, त्यात कर्जाचा गैर-विनीयोग व गैर-गुंतवणूक यांचा समावेश होतो. गैर-गुंतवणूकीचा पैसा बनावट कंपन्यांमार्फत वापरला जातो.

**कंपनी कायदा २०१३ आणि अनुत्पादक मालमत्ता:**

बँकांकडून जेव्हा नवीन कर्ज घेतली जातात. तेव्हा ती अनुत्पादक झाली आहेत हे कळायला तीन ते चार वर्षे लागतात. वाढीच्या काळात आणून कर्ज अनुत्पादक होत आहे हे लपून राहते. केवळ अनुत्पादक कर्जांचा आलेख हा चढता नसतो. त्यात अग्रिमांचे प्रमाण अनुत्पादक मालमत्तांच्या तुलनेत सुरुवातीला वाढताना दिसते. या कर्जाची परतफेड न होण्यामागची कारणे लक्षात घेऊन त्यासाठी सुधारणात्मक उपाय करणे गरजेचे असते.

जे लोक ठरवून कर्ज बुडवेगिरी करतात त्यांना कर्ज नाकारली पाहिजे. रिझर्व बँकेचे याबाबतचे पत्रक बघून त्यानुसार सूचक इशारी लक्षात घेतले पाहिजे. कंपनी कायद्यातील काही तरतुदी बघितल्या तर त्यातून अशा कर्ज बुडवगिरी करणाऱ्यांवर कारवाईसाठी अनेक कारणे दिसून येतात व त्यानुसार कारवाई करणे आवश्यक आहे. कंपनी कायदा २०१३ च्या कलम ५७ मध्ये कामकाजाच्या तुलनेत कर्ज बुडवगिरीचा गुन्हा याची “लपवाछपवी किंवा गैरप्रकाराची कुठलीही बाब किंवा पदाचा गैरवापर” अशी व्याख्या केली आहे.

कंपनीच्या हितसंबंधांना यात धक्का लावून भागधारक व गुंतवणुकदार यांना अडचणीत आणणारी परिस्थिती निर्माण केली जाते. यात फायदा किंवा तोटा काहीही झाले असले तरी त्याची गंभीर चौकशी

संस्थेमार्फत केली जाऊ शकते. कंपनी कायदा कलम ४४७ नुसार असे घोटाळे हे गंभीर गुन्हे ठरतात. पण यात मुख्य अडचण अशी की, यात अप्रामाणिकपणाचा हेतू सिद्ध करणे, कर्जदारांकडून चुकीचे दावे केले जाणे व ते सिद्ध करणे अवघड असते. त्यामुळे यात गुन्हेगारी कारवाई सुरू करणे अवघड जाते. नादारी व दिवाळखोरी कायद्यानुसार एखादी व्यक्ती दोषी आढळली तर तिला किमान सहा महिने व कमाल दहा वर्षे तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकतो. बँकांना कर्ज वसुली करण्यासाठी दिवाळखोरी व अवसायन संहिता २०१६ यांचा उपयोग करता येऊ शकतो.

बँका या कायद्याच्या आधारे न्यायालयाच्या मदतीशिवाय त्याचा लिलाव करू शकतात व आपली कर्जातील गुंतवणूक मोकळी करू शकतात. कर्ज वसुली करून त्याची इतर ठिकाणी गुंतवणूक करण्यासाठी हे अधिक प्रभावी हत्यार आहे. त्यात जप्त केलेली मालमत्ता विकून गुंतवणुकीचे नियोजन योग्य प्रकारे करावे लागते. कारण जप्त मालमत्तेचा लिलाव होणार नाही. यासाठी कर्जदार हे विविध युक्त्या वापरत असतात. यात मालमत्तेत अनाधिकाराने प्रवेश करणे व इतर खोटी आरोप ठेवून बँक अधिकाऱ्यांना अडचणीत आणले जाते. त्यामुळे वसुली करणारे अधिकारी कर्मचारी यांचे नीती धैर्य खच्ची होते.

उदा. दीपक नारंग व हरियाणा सरकार यांच्यातील प्रकरणात १४ सप्टेंबर २००६ रोजी पंजाब व हरियाणा उच्च न्यायालयाने अलाहाबाद बँकेचे सहाय्यक महाव्यवस्थापक असलेले दीपक नारंग यांच्या बाजूने निकाल होय. यात कपोलकल्पित बाबींच्या आधारे गुन्हा दाखल करण्याचा आदेश देणाऱ्या दंडाधिकाऱ्यांना पंजाब व हरियाणा उच्च न्यायालयाने फटकारले होते. या प्रकरणात याचिका कर्त्यांना गुन्हेगारी दंड संहितेच्या कायदा २००२ मधील कलम १९७ अन्वये घटल्यापासून संरक्षण मिळाले. सरकारी सेवका विरोधात त्याने केलेल्या गुन्ह्यासाठी खटला

भरविण्याकरता परवानगी लागते. कर्तव्य बजावताना केलेली कृती ही कलम १९७ नुसार केलेली असते.

सिक्युरिटायझेशन ॲक्ट २००२ कलम ३२ योग्य हेतूने कर्जदारावर केलेली कारवाई ही खटल्यास पात्र ठरत नाहीत. त्यात कोणी अधिकारी, व्यवस्थापक यांनी कर्जदारावर केलेली कार्यवाही ही या कायद्यानुसार योग्य ठरते. यात एवढा निकाल देऊनही कर्ज बुडवेगिरी करणाऱ्या विरोधात बँकाकाही कारवाई करत नाहीत. त्यामुळे कर्ज वसुलीत व गुंतवणूक वाढीस अडचणी येतात. या कायद्याच्या कलम ६४ अन्वये बँकांनी २०१७ मध्ये अखर जप्त केलेल्या मालमत्तांची संख्या ३३,९२८ होती. सरकारने या कायद्याबद्दल त्यांना जिल्हाधिकाऱ्यांना व जिल्हा दंडाधिकाऱ्यांना संबंधित मालमत्तेचा ताबा तसा अर्ज केल्यानंतर बँकेला देणे बंधनकारक केले आहेत. असे असले तरी कर्जदार यात अनेक अडथळे आणतात. यामुळे बँकांच्या गुंतवणुकीवर याचा विपरीत परिणाम होतो.

**गुंतवणुकीस प्रोत्साहनपर उपाययोजना:**

नादारी व दिवाळखोरी कायदा २०१६ या नवीन कायद्यानुसार जे लोक कर्ज बुडवीगिरी करतात त्यांना आता कर्जाची रक्कम इतरत्र वळवून गैरप्रकार करणे, त्यांच्याच कंपन्यांची फेर खरेदी करणे असे प्रकार शक्य होणार नाहीत. त्यामुळे प्रवर्तकांना आता लबाडी करता येणार नाही.

यात सरकारचा उद्देश सफल होणार असून अनुत्पादक मालमत्ता कमी होण्यास व बँकांच्या गुंतवणुकीत वाढ होण्यास मदत झाली आहे. त्याचबरोबर कंपनी कायदा २०१३ मधील कलम ४४७ चा वापर याबरोबर केल्याने त्याचा प्रभाव वाढून बँकांच्या गुंतवणुकीत वाढ होण्यास मदत झाली आहे. हेतूपूर्वक कर्जबुडवी करणे हा गंभीर गुन्हा ठरवणे. या दिशेने टाकलेले योग्य पाऊल आहे. त्यामुळे कर्जदारांच्या वर्तनातही फरक पडणार आहे. सध्या जे लोक बँकेकडून कर्ज घेतात त्यांना कर्जाची परतफेड न

करणे हा जन्मसिद्ध हक्क वाटतो. अशा चुकार कर्जदारांना चाप बसण्याची आता वेळ आली आहे. यापुढे जाऊन बँकांनी कर्जापोटी दिलेला पैसा नेमका कशासाठी वापरला जातो याचा शोध बँकांनी घेतला पाहिजे.यासाठी बँकांनी आपल्या गुंतवणूकदारांना सुरक्षितता व रोखता यांचे आश्वासन मिळावे. यासाठी खालील उपाय करणे आवश्यक आहे.

१. सर्व बँकांनी त्यांच्या कार्यकक्षेत येणाऱ्या गुंतवणूकदारांना प्रोत्साहन मिळावे या हेतूने आपल्या मनुष्यबळाला प्रशिक्षण दिले पाहिजे.
२. सरकारने ही संचालक मंडळावर बँकांच्या कामकाजाचे व गुंतवणूक बाजाराचे ज्ञान असलेले संचालक नेमणे गरजेचे आहे.
३. निवृत्त पण गुंतवणूक बाजाराचे ज्ञान चांगले ज्ञान असलेल्या अभ्यासू व्यक्तींची सरकारने व्यवस्थापकीय संचालक व कार्यकारी संचालक मंडळावर नियुक्ती करणे गरजेचे आहे.
४. कर्जाची वसूल वाढवण्यासाठी व गुंतवणूकदरांमध्ये विश्वास निर्माण करण्यसाठी न्यायाधिकरणांची आणि न्यायाधीशांची संख्या ही वाढविणे आवश्यक आहे.
५. दिवाळखोरीचे प्रकार त्वरित निकाली काढणे आवश्यक असते. नवीन दिवाळी खोरी व अवसायन कायद्यामुळे कर्ज व गुंतवणूक संस्कृती बदलत आहे. कर्जदार व गुंतवणूकदार या सगळ्यांनाच सुरक्षित वातावरण त्यातून तयार होत आहे.

**समारोप:**

बँकांची वाढती अनुप्तादक मालमत्ता हा बँक व्यवस्थापनासमोरील अत्यंत ज्वलंत प्रश्न आहे. यासाठी बँकांपुढे अनुत्पादक मालमत्तेसाठी नफ्यातून तरतूद करणे, मालमत्ता पुनर्रचना कंपनीस हस्तांतरण करून

काही पैसे सोडून देणे किंवा मालमत्ता ताब्यात घेऊन तिची विक्री करणे आणि नुकसान सोसणे एवढेच पर्याय राहिले आहेत. मार्च २०२० अखेरपर्यंत अनुत्पादक मालमत्तेचे प्रमाण ८% आणणे हे भारतीय रिझर्व बँकेचे उद्दिष्ट आहे. आंतरराष्ट्रीय मानांकनानुसार भांडवल पर्याप्तता प्रमाण राखण्यासाठी आवश्यक ते अधिक भांडवल या वर्षीच्या अर्थसंकल्पीय तरतुदींद्वारे बँकांना उपलब्ध करून देण्यात आले आहे.

**संदर्भ:**


१. श्याम साळुंके, " आधुनिक बँकिंग आणि वित्तीय पद्धती ", प्रशांत प्रकाशन, जळगाव.
२. RBI Bulletin, March 2022-23.
३. www.rbi.org.in.
४. Aruna Kumar, Anoop Kumar, "Banking Industry and Non-Performing Assets", ISBN - 9789395939140, 1st January 2018, Vinod Publication, New Delhi.
५. डॉ.मुकुंद महाजन, "बँक व्यवसाय आणि वित्तीय प्रणाली", निराली प्रकाशन, पुणे.
६. डॉ.कुलकर्णी एस.एन., "बँक व्यवसायाची मुलतत्वे", विद्या प्रकाशन, नागपूर.
७. प्रा.डॉ.सरला चौधरी, "बँक व्यवसायाची मुलतत्वे", वृंदा प्रकाशन, जळगाव.
८. Dr. Mahajan Mukund, "Principles and Practices of Banking", Nirali Publication, Pune.
९. प्रा.डॉ.पाटील गंगाधर, "बँक व्यवसायाची मुलतत्वे (बँक व्यवसाय व्यवस्थापन)" चैतन्य प्रकाशन, नाशिक २००२
१०. डॉ.सरोदे.जे.एस, "बँक व्यवसायाची मुलतत्वे आणि कार्यपद्धती", वृंदा प्रकाशन, जळगाव"
११. डॉ.कायंदे पाटील, "भारतीय बँक विषयक कायदे व व्यवहार", चैतन्य प्रकाशन, नाशिक, २०१३
१२. डॉ.श्याम साळुंखे आणि विजय लाटे, "आधुनिक बँकिंग आणि वित्तीय पद्धती",प्रशांत प्रकाशन, जळगाव
१३. श्रीधर देशपांडे आणि विनायक देशपांडे, "वित्तीय संस्था आणि वित्तीय बाजार", हिमालया प्रकाशन, नागपूर
१४. Shekhar, K. C. (2006), "Banking Theory & Practice", Vikas Publication, New Delhi, 2002
१५. डॉ.पहुरकर, "भारतीय बँक आणि वित्त", पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर, २००८

# भारतीय विदेश नीति : 'नेहरू युग'

**प्रा. डॉ. अतुल नारायण खोटे**
स्व. पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय रिसोड, जिल्हा वाशिम.

**प्रास्ताविक-**

जवाहरलाल नेहरू को भारतीय विदेश नीति का सूत्रधार कहा जा सकता है। वे न केवल स्वतंत्र भारत के प्रथम प्रधानमंत्री और 17 वर्ष तक विदेश मंत्री रहे, वरन् उससे पूर्व भी लगभग 25 वर्षो से अखिल भारतीय कॉंग्रेस के विदेशी मामलो के प्रमुख प्रवक्ता भी थे। वे आंतरराष्ट्रीयता और अखिल एशियावाद के समर्थक थे। वे साम्राज्यवाद, उपनिवेशवाद और फासीवाद के विरोधी थे। वे चाहते थे की सभी आंतरराष्ट्रीय विवादो को, जहा तक हो सके, शांतीपूर्ण उपायोसे सुलझाया जाये । यद्यपी वे साम्राज्यवादी और फासिवादी आक्रमनों को रोकने के लिए शक्ती के प्रयोग को भी अनुचित नही मानते थे। वे सोवियत संघ और चीन के प्रति विशेष रूप से सहानुभूती रखते थे, क्योंकि उनका विश्वास विश्वास था की ये देश साम्राज्यवाद के शत्रू है । महाशक्तीयों के संघर्ष में वे भारत के लिए तटस्थता और समानता की नीति के प्रबल प्रतिपादक थे। नेहरू स्वतंत्र भारत के प्रधानमंत्री होने के साथ साथ प्रथम विदेश मंत्री भी थे। सरकार और पार्टी मे उनके साथियों ने विदेश नीती के निर्माण और संचालन का दायित्व उनकी ही कंधो पर डालना ठीक समजा। क्योंकि स्वतंत्रता से पूर्व भी नेहरू कॉंग्रेस तथा शेष विश्व के बीच कडी का कार्य कर रहे थे।

नेहरू की जीवनी लेखक माइकल ब्रेशर ने लिखा है कि "नेहरू विश्व के सामने अपने देश की आवाज थे, वे शेष दुनिया के साथ अपने देश की नीति के दार्शनिक, निर्माता और यंत्री थे। अन्य किसी देश में कोई व्यक्ति

विदेश नीति के निर्माण में इतनी प्रभाव भूमिका अदा नहीं करता जितनी नेहरू भारत में करते हैं।"

'नेहरू युग में भारतीय विदेश नीति के कतीपय महत्वपूर्ण पहलू इस प्रकार है।'

**1. भारत और राष्ट्रमंडल -** नेहरू ने विदेश नीति के क्षेत्र में एवं महत्वपूर्ण निर्णय लिया कि भारत राष्ट्रमंडल का सदस्य बना रहेगा। पंडित नेहरू ने कहां की वर्तमान विश्व में जबकि अनेक विध्वंसकारी शक्तियां सक्रिय है और हम प्रायः युद्ध के कगार पर खड़े हैं, मैं सोचता हूं कि किसी समुदाय से सम्बन्ध विच्छेद करना अच्छी बात नहीं है। राष्ट्रमंण्डल की सदस्यता भारत के और संपूर्ण विश्व के लिए लाभदायक है। इससे भारत को लक्ष की प्राप्ति में सहयोग मिलेगा। जिस समय नेहरू ने राष्ट्रमंडल में बने रहने का फैसला किया उसे समय उनके सामने अन्य उद्देश्यों के साथ शायद यह उद्देश भी रहा होगा कि इस मंच के द्वारा भारत नवोदित अफ्रीका और एशियाई देशों का सरगना बन सकता है। नेहरू यह जानते थे कि आर्थिक दृष्टि से भारत का अधिकांश व्यापार ब्रिटेन और राष्ट्रमंडल के देशों पर निर्भर है। इस हालत में एकाएक राष्ट्रमंडल से संबंध विच्छेद कर लेने में कठिनाई थी। सैनिक की दृष्टि से भी भारत पूर्णतया ब्रिटेन पर आश्रित था। अपनी विस्तृत समुद्र तटीय सीमा की रक्षा के लिए भारत ब्रिटेन की नौसेना पर आश्रित था। भारत का पूरा सैनिक संगठन ब्रिटिश पद्धति पर आधारित था और नौ-सैनिक आयुधों के लिए वह ब्रिटेन का मोहताज था।

**2. असंलग्नता-** यद्यपि पंडित नेहरू ने यह कहा था कि असंलग्नता को 'नेहरू नीति' नहीं कहा जा सकता तथापि माइकेल ब्रेशर जैसे विद्वान यह मानते हैं कि असंलग्नता के सिद्धांत का निर्माण और क्रियान्वयन यथार्थ में नेहरू की बहुत बड़ी देन है। नेहरू ने ही विश्व को असंलग्नता का संदेश दिया है। नेहरू ने भारत के लिए जीस विदेश नीति का प्रतिपादन किया

उससे देश की प्रतिष्ठा में अपार वृद्धि हुई। एशिया और अफ्रीका में बहुत से लोग नेहरू और उनकी सरकार को शोषित मानवता का प्रवक्ता मानते थे और राजनीतिक पराधीनता एवं उपनिवेशवाद की विरुद्ध जारी संघर्ष में उनसे नैतिक और भौतिक समर्थन की अपेक्षा करते थे।

अंतरिम सरकार की स्थापना के कुछ समय पश्चात 7 दिसंबर 1947 को आकाशवाणी से प्रसारित अपनी प्रथम शासकीय घोषणा में नेहरू ने कहा हम अंतरराष्ट्रीय सम्मेलनों में एक स्वतंत्र राष्ट्र के रूप में अपनी मौलिक नीति के अनुसार भाग लेंगे, अन्य राष्ट्रों के उपग्रह के रूप में नहीं। हमारा विचार यथासंभव गुटों की सट्टा की राजनीति से अलग रहने का है एक दूसरे के विरुद्ध संगठित इन गुटों ने अतीत में भी विश्व- युद्ध करवाई है और भविष्य में भी यह संसार को भयंकर विनाश की और ले जा सकते हैं। नेहरू के अनुसार गुटनिरपेक्षता का अर्थ तटस्थता नहीं था। यह एक सकारात्मक विदेश नीति थी जिसका अर्थ था शक्ति मूलक राजनीति से पृथक रहना। तथा सभी राज्यों के साथ शांतिपूर्ण सह-अस्तित्व और सक्रिय अंतरराष्ट्रीय सहयोग-चाहे वे राष्ट्र गुटबद्ध हो या गुटनिरपेक्ष हो।

**3. महाशक्ति का सपना-** नेहरू भारतवर्ष को एक महान भविष्य अथवा महान स्थिति का राष्ट्र मानते थे। उन्हें विदित था कि एशिया के मानचित्र पर भारत जिस प्रकार व्यवस्थित है उसमें उसकी स्थिति, शक्ति एवं प्रभाव क्षमता स्वयंसिद्ध है। वह एक बहुत बड़ी राजनीतिक इकाई है। दक्षिण, पश्चिम और दक्षिण एशिया के देशों की स्थिति के प्रसंग में भारत की भूमिका इतनी केंद्रीय है कि यदि वह स्वयं इसे नही स्वीकार करें तो भी इस भूमिका के प्रति उदासीन नहीं रह सकता। उनका अनुमान था कि यदि भविष्य में झाककर देखा जाए और यदि कोई बड़ा संकट नहीं आता है तो भारत अमेरिका, सोवियत संघ और चीन के बाद स्पष्टत: चौथी महाशक्ति है।

**4. पंचशील-** नेहरू ने अंतरराष्ट्रीय राजनीति में पंचशील के सिद्धांत का प्रतिपादन किया और इस कारण उन्हें आदर्शवादी कहा जाता था, किंतु वस्तुतः यह उनकी यथार्थवादी कूटनीतिक चाल थी। वह चीन को पंचशील सिद्धांत में उलझाए रखना चाहते थे ताकि कोई बड़ा संघर्ष टाला जा सके। तिब्बत के प्रश्न पर हमने जो कुछ भी किया उसे एक निजी मजबूरी कहा जा सकता है। हमारे सामने सभी विकल्प द्वार बंद हो चुके थे। हिमालय का प्रांगण रणनीति की दृष्टि से उपयुक्त नहीं था। ब्रिटेन ने एक समुद्री शक्ति होने के कारण कोई विशेष उत्साहप्रद समर्थन नहीं दिया। फिर देश के विकास की आंतरिक प्रगति इतनी धीमी थी कि कोई भी व्यवहार कुशल प्रधानमंत्री ऐसे आदर्शवादी निर्णय कैसे ले सकता था जिससे राष्ट्रीय हितों की उपेक्षा होती हो।

**5. अफ्रेशियाई एकता-** नेहरू एशियाई और अफ्रीका के नवस्वतंत्र राष्ट्र राष्ट्रों की एकता के प्रबल समर्थक थे। एशियाई राष्ट्रों की एकता बनाए रखने के लिए उनकी पहल पर मार्च 1947में नई दिल्ली में एक एशियाई सम्मेलन का आयोजन किया गया। दूसरा सम्मेलन इंडोनेशिया के प्रश्नों पर जनवरी19 49 में दिल्ली में आयोजित किया गया। नेहरू ने 1955में बाण्डुंग सम्मेलन में भाग लिया और वे चाहते थे कि इस सम्मेलन के द्वारा एशियाई देशों के बीच सहयोग और मित्रता की भावना को और मजबूत किया जाए।

**6. भारत चीन युद्ध-** जब भारत चीन युद्ध शुरू हुआ तो देश के कई भागों में इस बात की मांग होने लगी की असंलग्नता की नीति पूर्णतया असफल हो चुकी है और देश के हित में इसका जल्द-से-जल्द परीत्याग होना चाहिए। परंतु 20 अक्टूबर 1962 को रेडियो से राष्ट्र के नाम संदेश देते हुए पंडित जवाहरलाल नेहरू ने स्पष्ट कर दिया कि भारत अपनी असंलग्नता की नीति का अनुसरण करता रहेगा। इसके बाद चीन तथा भारत का युद्ध

जारी रहा तथा नेफा में भारतीय सेना की पराजय हुई। युद्ध की स्थिति अत्यंत गंभीर हो गई और भारत की सुरक्षा अत्यधिक खतरे में पड़ यी। इस हालत में भारत सरकार ने पश्चिमी राष्ट्रों से सैनिक सहायता के लिए अपील की। अमेरिका और ब्रिटेन ने भारत को सहायता देने का निर्णय किया और इन देशों से बड़ी मात्रा में शस्त्रास्त्र भारत पहुंच गए। नेहरू मानते थे कि असंलग्नता की नीति को छोड़कर अमेरिकी गुट में शामिल हो जाने के फल स्वरुप भारत-चीन सीमा संघर्ष शीत-युद्ध का एक अंग बन जाता। नेहरू ने व्यवहारवादी दृष्टिकोण अपनाते हुए निर्णय लिया कि भारत अपनी रक्षा के लिए सभी मित्र राष्ट्रों से सहायता लेगा लेकिन असंलग्नता की नीति का परित्याग नहीं करेगा।

**7. गोआ पर अधिकार-** पं. नेहरू के जीवन काल मे गोआ के प्रश्न पर भारत ने शक्ति का प्रयोग किया और पूर्तगाली अत्याचारों से गोआ को मुक्ती दिलायी।

संक्षेप में, नेहरू की विदेश नीति की दो विशेषताएं है- (i) विश्व-शांति की स्थापना के लिए प्रयत्न करना और (ii) अंतरराष्ट्रीय मामलों में भारत के स्वतंत्र दृष्टिकोण को अभिव्यक्त करना।

**नेहरू की विदेश नीति की आलोचना-** नेहरू नीति की निम्नलिखित आलोचना की जाती है।

1. यह अत्यधिक आदर्शवादी और भावना-प्रधान है। 'शांतिदूत' की प्रतिष्ठा पाने के लिए नेहरू ने राष्ट्रीय हितों की उपेक्षा की। तिब्बत संबंधी नीति भारतीय विदेश नीति की आदर्शवादिता और असफलता का उदाहरण है।

2. इस नीति के कारण विश्व का एक भी राज्य हमारा पक्का मित्र नहीं बन पाया जबकि हमारे दो शक्तिशाली शत्रु - चीन और पाकिस्तान- हमें ललकारने लगे है।

3. असंलग्नता की नीति को पश्चिमी और साम्यवादी दोनों ही गुटों ने संदेह और अविश्वास की दृष्टि से देखा।

4. भारत की राष्ट्रमंडल की सदस्यता कि यह कहकर आलोचना की जाती है कि यह दास मनोवृती का परिचायक है।

**संदर्भ-**

1. फडिया बि. एल., अंतरराष्ट्रीय राजनीति, साहित्य भवन पब्लिकेशन आगरा।

2. रावत बहादुरसिंह, भारतीय विदेश नीति के निर्धारक तत्व एवं सिद्धांत, प्रतियोगिता दर्पण (मासिक) अप्रैल 2020।

3. शर्मा रा. प्राचीन भारत में राजनीतिक विचार एवं संस्थाएं, राजकमल प्रकाशन नई दिल्ली 2009।

4. अशोक कुमार, राजकीय विज्ञान, उपकार प्रकाशन आगरा, 2000.

***

# महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना: एक चिकित्सक अभ्यास

**प्रा. डॉ. अनिल दिगंबर वाडकर**

अर्थशास्त्र विभाग प्रमुख श्री कुमारस्वामी महाविद्यालय औसा, जिल्हा - लातूर,महाराष्ट्र

**सारांश**

"बदलत्या हवामानामुळे व बदलत्या जीवनशैलीमुळे दिवसेंदिवस संपूर्ण विश्वातील मानवी जीवन हे रोगमय बनत चालले आहे. भारतही याला अपवाद नाही. बदलत्या जीवनशैलीमुळे व निकृष्ट आहारामुळे आरोग्यावर गंभीर परिणाम उद्भवत आहेत. देशाच्या आर्थिक प्रगतीचा लाभ हा आरोग्य क्षेत्रात झाला पाहिजे. देशातील लोकांच्या आरोग्यात गुंतवणूक झाली पाहिजे .हे आर्थिक प्रगतीला पोषक ठरेल. विकासाचा आणि आरोग्याचा खूप जवळचा संबंध आहे. जागतिक आरोग्य क्षेत्रातील आरोग्य विषयक कार्यक्रम हा आपल्या देशाशी सुसंगत असला पाहिजे.जागतिक एकूण लोकसंख्येच्या सुमारे 18 टक्के लोकसंख्या भारतात वास्तव्यास आहे. देशामध्ये सामाजिक व आर्थिक विषमता कमालीचे आहे.सरासरी दरडोई उत्पन्न अत्यंत कमी आहे. देशातील एकूण लोकसंख्येच्या सुमारे 14 कोटी(10%)लोकसंख्या एकट्या महाराष्ट्रात राहते.कोणत्याही देशातील लोकसंख्या निरोगी, साक्षर व वैज्ञानिक असेल तर तो देश जलद गतीने प्रगती करू शकतो. लोकांची रोगप्रतिकारशक्ती वाढविणे त्यांना दीर्घायुष्य बनवणे त्यांचे आरोग्य व कार्यक्षमता वाढविणे यासाठीचे संघटित प्रयत्न सार्वजनिक आरोग्य प्रणाली मध्ये केले जात आहेत. राज्यातील लोकांचे जीवनमान व आरोग्य शाश्वत राहावे यासाठी,

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना महाराष्ट्र सरकार एकत्रित राबवत आहे.महाराष्ट्रातील कोणतीही गरीब व्यक्ती किंवा कुटुंब आरोग्य सुविधेपासून वंचित राहू नये यासाठी,एकूण 1356 इतक्या आजारावर महात्मा फुले जन आरोग्य योजनेतील अडीच लाख व आयुष्यमान भारत योजनेतील पाच लाख रुपयांपर्यंतच्या खर्चासह ही योजना लागू आहे.यामुळे गरिबांच्या जीवनात निश्चितच आरोग्यमय बदल होत आहेत."

**प्रस्तावना**

भारताच्या आर्थिक विकासामध्ये महाराष्ट्राचे स्थान अनन्यसाधारण आहे. स्वातंत्र्यानंतर भारत सरकार अनेक पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून व अलीकडे नीती आयोगाद्वारे देशाचा समतोल आर्थिक विकास घडवून आणण्याकडे विशेष लक्ष देत आहे. विशेषतः सामाजिक क्षेत्रातील संरचना व सुधारणा यामध्ये आरोग्य, शिक्षण, रोजगार, स्वच्छता, पोषण, पर्यावरण ,सामाजिक स्थिरता या गोष्टी महत्त्वाच्या ठरतात. देशाच्या स्वातंत्र्यानंतरच्या 75 वर्षांमध्ये अजूनही देशातील माता मृत्यू दर, बालमृत्यू दर, कुपोषणाचे प्रमाण, साथ रोग नियंत्रण यामध्ये आवश्यक प्रमाणात घट झाली नाही. परिणामी मृत्युदर हा अधिक दिसून येतो. तरी परंतु अलीकडच्या काळात सरकारद्वारे देशातील व्यक्तींना विश्वासाहर्य, जबाबदार,पुरेशी गुणात्मक प्रतिबंधात्मक आणि उपचारात्मक आरोग्य सेवा प्रदान करत आहे. ग्रामीण आणि शहरी भागात उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे, सामुदायिक आरोग्य केंद्रे आणि शासकीय रुग्णालये यासह अनेक यंत्रणा उभारल्या आहेत.सुलभ आणि परवडण्यायोग्य आरोग्य सेवा, पुरवण्यासाठी शासन विविध आरोग्यविषयक सेवा योजना व कार्यक्रमाची आखणी करून

अंमलबजावणी करत आहे. त्याचाच भाग म्हणून महाराष्ट्रामध्ये, महाराष्ट्र सरकार महात्मा फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत-पंतप्रधान जन आरोग्य योजना एकत्रितपणे राज्यामध्ये राबवत आहे.या योजनेची कार्यपद्धती व फलश्रुती याचा चिकित्सक अभ्यास प्रस्तुत शोधनिबंधामध्ये करत आहे.

देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या दृष्टीने महाराष्ट्र हे एक अत्यंत महत्त्वपूर्ण राज्य आहे. देशाची आर्थिक राजधानी म्हणून महाराष्ट्रातील मुंबईला संबोधले जाते. देशातील उद्योग, सेवा, आणि कृषी क्षेत्रामध्ये तसेच सांस्कृतिक व राजकीय जडणघडणीमध्ये महाराष्ट्राचे अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान आहे. देशाच्या एकूण लोकसंख्येत महाराष्ट्रातील लोकसंख्येचा वाटा 10% इतका आहे. राज्यातील जनतेचे आरोग्य चांगले व सुनिश्चित राहावे यासाठी, महाराष्ट्र सरकारने महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना राज्यामध्ये दोन जुलै 2012 पासून सुरू केली. या योजनेअंतर्गत निवडक आजारावर ,शासकीय व खाजगी संलग्नित रुग्णालयाच्या मार्फत पात्र शिधापत्रिकाधारक व अन्य लाभार्थी घटकांना निशुल्क वैद्यकीय सेवा पुरविण्यात येत आहेत. ही योजना पूर्वी राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना या नावाने ओळखली जात होती व दिनांक 2 जुलै 2012 पासून आठ जिल्ह्यात लागू करण्यात आली. त्यानंतर दिनांक 21 नोव्हेंबर 2013 पासून ही योजना महाराष्ट्रातील उर्वरित 28 जिल्ह्यांमध्ये विस्तारित करण्यात आली.

दिनांक 14 डिसेंबर 2020 रोजीच्या शासन निर्णयानुसार योजनेच्या नावात महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना असे अंशतः बदल करण्यात आले. या योजनेअंतर्गत राज्यातील 2.22 कोटी लाभार्थी कुटुंबांना निशुल्क वैद्यकीय सेवा पुरविण्यात येत आहेत. आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना ही भारत सरकारची आरोग्य विमा योजना

असून दिनांक 23 सप्टेंबर 2018 पासून राज्यात लागू करण्यात आली. सदर योजना राज्यात महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेसोबत एकत्रितरित्या सुरू करण्यात आली आहे. ही योजना विमा आणि हमी तत्त्वावर राबविण्यात येत असून एकत्रित योजनेअंतर्गत समाविष्ट असलेल्या 2.22 कोटी लाभार्थी कुटुंबापैकी सामाजिक, आर्थिक व जातनिहाय जनगणना 2011 च्या यादीतील 83.63 लाख कुटुंबे या योजनेचे लाभार्थी आहेत. दिनांक 1/ 4/2020 पासून एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना राज्यात राबविण्यात येत आहे. इंडिया इन्शुरन्स कंपनी या सार्वजनिक क्षेत्रातील विमा कंपनी मार्फत एकत्रित योजनेतील गट- अ, लाभार्थी कुटुंबांना 996 उपचाराकरिता प्रतिक कुटुंब प्रति वर्ष रुपये 1.5 लाख रुपये पर्यंतचे आरोग्य विमा संरक्षण विमा तत्वावर पुरविले जात आहे. गट -अ लाभार्थी कुटुंबाच्या वतीने, राज्य आरोग्य हमी सोसायटी, प्रती कुटुंब प्रति पॉलिसी वर्ष रुपये 797/-विमा रक्कम त्रेमासिक हत्यांमध्ये विमा कंपनी देत आहे.राज्य आरोग्य हमी सोसायटी महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेतील गट ब व गट क लाभार्थ्यांना हमी तत्त्वावर उपचार पूर्वीत आहे .त्याचप्रमाणे आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत 996 उपचाराकरिता रुपये 1.5 लाख ते 5 लाख रकमेपर्यंतचे व केवळ सदर योजनेत अंतर्भूत असलेल्या 213 उपचाराकरिता 5 लाख रकमेचे आरोग्य संरक्षण राज्य आरोग्य हमी सोसायटी हमी तत्त्वावर पुरवत आहे. कोविड 19 साथ रोगाच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक आरोग्य विभागाकडील 23 मे 2020 रोजीच्या शासन निर्णयानुसार, महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना राज्यातील सर्व नागरिकांसाठी हमी तत्वावर विस्तारित करण्यात आली होती. महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी सदर योजनेस मुदतवाढ दिली होती.

तथापि सार्वजनिक आरोग्य विभागाकडील सूचनेनुसार दिनांक6/6/ 2022 पासून सदर विस्तारित योजना स्थगित करण्यात आली आहे. महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेसाठी महाराष्ट्र शासनाकडून संपूर्णतः निधी प्राप्त होत आहे. तर प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेची करिता होणाऱ्या खर्चाची केंद्र व राज्य शासन यामध्ये 60:40 या प्रमाणात विभागणी करण्यात आल्याचे निदर्शनास येते.

**संशोधन विषयाचे महत्त्व**

राज्यातील अर्थव्यवस्थेत मानवी भांडवल हे अत्यंत महत्त्वपूर्ण असून, मानवी भांडवलाचे संरक्षण करणे व उच्च दर्जाचे मानवी भांडवल निर्माण करणे हे सार्वजनिक क्षेत्राचे संविधानिक कर्तव्य आहे.लोकांना दीर्घायुषी व आरोग्यमय जीवन लाभले तरच त्या राज्याचा शाश्वत विकास होण्यास सातत्याने मदत होते. अलीकडच्या काळातील हवामान बदलामुळे व बदलत्या जीवनशैलीमुळे तसेच निकृष्ट आहारामुळे मानवी आरोग्यावर दीर्घकालीन घातक परिणाम होत आहेत, लोक विविध आजारांना बळी पडत आहेत व मृत्यू दर वाढत आहे. परिणामी अर्थव्यवस्थेवर खूप मोठा आर्थिक भार पडत असून राज्याचा शाश्वत विकास चिरंतर राहण्यास अडचण निर्माण होत आहे. यासाठी मानवी आरोग्य सुधारणे अत्यंत गरजेचे आहे. मानवी भांडवल निकोप व सुदृढ असेल तर ते राज्य विकासाच्या बाबतीत नेहमीच अग्रेसर राहते. यासाठी महाराष्ट्र सरकारने राबवलेल्या एकत्रित महात्मा फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत पंतप्रधान जन आरोग्य योजना, या योजनेची कार्यपद्धती, लाभार्थी घटक व फलनिष्पत्ती या दृष्टीने हा संशोधन विषय महत्त्वपूर्ण ठरतो.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी प्रामुख्याने वर्णनात्मक व निदानात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. शोधनिबंधासाठी

विशेषता द्वितीय समुग्रीचा आधार घेण्यात आला आहे यामध्ये प्रामुख्याने विविध शासकीय व निम शासकीय प्रकाशनाद्वारे प्रकाशित ग्रंथ, मासिके, पाक्षिके, साप्ताहिके, वर्तमानपत्रे, शासनाचे संबंधित विभागाचे अहवाल याचा आधार घेण्यात आला आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे**

प्रस्तुत शोधनिबंधाला निषेध दिशा प्राप्त होण्यासाठी काही महत्वपूर्ण उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत ती पुढील प्रमाणे…

1) योजनेच्या लाभार्थ्यांची पात्रता व निकष याचा शोध घेणे

2) योजनेची कार्यपद्धती व फलश्रुती याचा शोध घेणे

3) महत्वपूर्ण निष्कर्ष काढणे व शिफारशी करणे

**महात्मा फुले जन आरोग्य योजनेसाठी लाभार्थी पात्रता**

महाराष्ट्र शासनाच्या सुरू असलेल्या महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेसाठी महाराष्ट्र राज्यातील कोणकोणते नागरिक पात्र आहेत त्यांची पात्रता पुढीलप्रमाणे आहे.

1. गट अ-महाराष्ट्रातील 36 जिल्ह्यातील अन्न व नागरी पुरवठा विभाग महाराष्ट्र शासन यांच्याकडून वितरित करण्यात आलेले पिवळी शिधापत्रिका अंत्योदय अन्न योजना शिधापत्रिका अन्नपूर्णा योजना शिधापत्रिका व केशरी शिधापत्रिका धारण केलेली सर्व कुटुंब व कुटुंबातील व्यक्ती.
2. गट ब- महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त 14 जिल्हे (औरंगाबाद, जालना, बीड, परभणी, हिंगोली, लातूर ,नांदेड, उस्मानाबाद, अमरावती, अकोला ,बुलढाणा, वाशिम, यवतमाळ व वर्धा)या जिल्ह्यातील शुभ्र शिधापत्रिका धारक शेतकरी कुटुंबे

3. गट क-I )महाराष्ट्रातील शासकीय अनाथ आश्रमातील मुले शासकीय आश्रम शाळेतील विद्यार्थी शासकीय महिला आश्रमातील महिला शासकीय वृद्धाश्रमातील जेष्ठ नागरिक

ii) महाराष्ट्रातील माहिती व जनसंपर्क कार्यालयातील निकषानुसार पत्रकार व त्यांच्यावर अवलंबित असलेले कुटुंबातील सदस्य

iii) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदणीकृत जीवित बांधकाम कामगार व त्यांची कुटुंबे

4. आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचे लाभार्थी सामाजिक आर्थिक व जातनिहाय जनगणनेच्या वंचित व व्यावसायिक निकषानुसार अनुक्रमे ग्रामीण व शरीरिक क्षेत्रातील कुटुंबांचा या योजनेत समावेश करण्यात आला आहे.

5. शहरी भागातील लाभार्थ्यांची पात्रता शहरी भागातील i) कचरा वेचणारे ii) भिक्षुक iii) घरगुती कामगार iv) गटई कामगार/मोची/फेरीवाले)रस्त्यावर सेवा पुरविणारे अन्य कामगार v) बांधकाम कामगार/प्लंबर/गवंडी कामगार/ रंगारी/वेल्डर/सुरक्षारक्षक/हमाल व डोक्याने भार वाहणारे अन्य कामगार vi) सफाईगार/स्वच्छक /माळीvii) घरकाम करणारे/हस्तकला कारागीर/ शिंपी vii) वाहतूक कर्मचारी/चालक/वाहक/ चालक व वाहकांचे मदतनीस/हातगाडी ओढणारे/सायकल रिक्षा ओढणारे viii) दुकानात काम करणारे/ सहाय्यक/ लहान आस्थापना मधील शिपाई /मदतनीस/ अटेंडंट/ वेटर ix) वीजतंत्री /मेकॅनिक/ असेंम्ब्ली /दुरुस्ती करणारे x) धोबी व वॉचमेन

6. राज्याच्या ग्रामीण भागाच्या एकूण सात वंचित निकषांपैकी, प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेमध्ये पुढील सहा वंचित

निकषातील किमान एका निकषात बसणाऱ्या कुटुंबाचा आपोआप (बेघर, भिक्षुक, स्वच्छता कामगार, निराधार कुटुंबे, मुलत:अनुसूचित जमाती व कायदेशीर नोंदणीकृत कामगार) यांचा समावेश होतो.

i) कच्चा भिंती व कच्चा छताच्या एका खोलीत राहणारे कुटुंब ii) 16 ते 59 वयोगटातील प्रोढ सदस्य नसलेले कुटुंबे iii) 16 ते 59 वयोगटातील प्रोड पुरुष सदस्य नसलेले कुटुंब iv) दिव्यांग कुटुंबप्रमुख असलेली कुटुंबे v) अनुसूचित जाती व जमाती मधील कुटुंबे vi) भूमी मजुराची कुटुंबे

**योजनेच्या लाभासाठी लागणारी कागदपत्रे**

1) लाभार्थीच्या फोटोसह आधार कार्ड/आधार नोंदणी स्लिप 2)पॅन कार्ड 3)मतदार ओळखपत्र 4) ड्रायव्हिंग लायसन्स 5) शाळा/कॉलेज ओळखपत्र 6) पासपोर्ट 7) स्वातंत्र्य सैनिक ओळखपत्र 8) महाराष्ट्रातील आवर्षणग्रस्त14 जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी कुटुंब प्रमुखाचे नाव असलेल्या 7/12 उताऱ्यासह शुभ्र पत्रिका किंवा वळच्या मसुलाधिकाऱ्याने लाभार्थी शेतकरी कुटुंबातील सदस्य हा शेतकरी असल्याचे नमूद केल्याचे प्रमाणपत्र व लाभार्थ्याचे फोटो ओळखपत्र 9) प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेसाठी सामाजिक आर्थिक व जातनिहाय जनगणना 2011 मध्ये नोंदीत कुटुंबातील सदस्य प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत अंगीकृत रुग्णालयात संगणकीकृत इ कार्ड व फोटो ओळखपत्र दाखवून लाभ घेऊ शकतात प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेतून एका राज्यातील रुग्ण देशातील दुसऱ्या कोणत्याही राज्यातील अंगीकृत रुग्णालयात जाऊन शस्त्रक्रिया उपचाराचा लाभ घेऊ शकतात आपले सरकार सेवा केंद्र व अंगीकृत रुग्णालयामार्फत

ऑक्टोबर 2022 पर्यंत74,03,969 व्यक्तींना इ-कार्ड वाटप करण्यात आले आहे.

**विमा संरक्षण**

महात्मा फुले जन आरोग्य योजना दिनांक 2 /7 /2012 ते दिनांक 31/ 3/ 2020 या कालावधीमध्ये नॅशनल इन्शुरन्स कंपनी या सार्वजनिक क्षेत्रातील विमा कंपनी मार्फत राबविण्यात येत होती. परंतु दिनांक 1/4/ 2020 पासून एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी या सार्वजनिक क्षेत्रातील विमा कंपनी मार्फत राबविण्यात येत आहे. महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना या योजनेअंतर्गत पॉलिसी वर्षात लाभार्थ्यावर प्रतिक कुटुंब 1,50,000 पर्यंत झालेल्या सर्व रुग्णालय खर्चाचा समावेश होतो. मूत्रपिंड प्रत्यारोपणासाठी ही मर्यादा प्रती कुटुंब, प्रति पॉलिसी वर्ष 2,50,000 इतकी वाढविण्यात आली आहे. पॉलिसीचा लाभ कुटुंबातील एकाला किंवा सर्व सदस्यांना घेता येतो. पॉलिसी वर्ष 1 एप्रिल ते 31 मार्च असे असते.

आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या योजनेअंतर्गत दुतीय व तृतीय सेवेकरिता देशातील कोणत्याही अंगीकृत रुग्णालयात दाखल झालेल्या राब लाभार्थ्याला प्रतिक कुटुंब प्रति वर्ष पॉलिसी वर्ष पाच लाखापर्यंत आरोग्य कवच पुरवण्यात येते या योजनेचा लाभ देखील कुटुंबातील एका किंवा सर्व सदस्यांना घेता येतो. प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत 1,50,000 लाखापर्यंतचे विमा कवच विमा कंपनी मार्फत पुरविण्यात येते तर 1,50,000 ते 5 लाखापर्यंतचे कवच राज्य आरोग्य हमी सोसायटी मार्फत हमी तत्वावर पुरविण्यात येते.

**योजनेमधील विशिष्ट आरोग्य सेवा उपचार**

प्रस्तुत योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या प्रमुख आरोग्य सेवा उपचाराचा उल्लेख या ठिकाणी करत आहे. ते म्हणजे जळीत, हृदयरोग, हृदयरोग शस्त्रक्रिया व उपचार, आकस्मित सेवा, त्वचारोग, अंतस्राव संस्थेचे विकार, कान, नाक व घसा रोग, सर्वसाधारण औषधशास्त्र चिकित्सा, सर्वसाधारण शस्त्रक्रिया, व्याधी चिकित्सा, संसर्गजन्य आजार, इंटरव्हेनल रेडिओलॉजी, जठरांत्रमार्गाचे रोग, कर्करोगावरील औषधोपचार, नवजात व बालरोग वैद्यकीय व्यवस्थापन, मूत्रपिंड विकार, मज्जातंतूचे विकार, मज्जातंतूच्या विकारांवरील शस्त्रक्रिया, स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र, नेत्ररोग शस्त्रक्रिया, अस्थिव्यंग शस्त्रक्रिया, बालरोग शस्त्रक्रिया, बालरोग कर्करोग, प्लास्टिक सर्जरी, आकस्मित वैद्यकीय उपचार, कृत्रिम अवयव उपचार, फुफ्साच्या आजारावरील उपचार, किरणोत्सवर्गाद्वारे कर्करोग चिकित्सा, संधिवात संबंधी उपचार, जठर व आंत्रविकाराच्या शस्त्रक्रिया, कर्करोगाच्या शस्त्रक्रिया,मूत्रवह संस्थेच्या विकारावरील शस्त्रक्रिया,मानसिक आजार, जबडा व चेहऱ्याच्या अस्थीवरील शस्त्रक्रिया इत्यादी. योजनेअंतर्गत समाविष्ट असणाऱ्या एकूण 1356 आरोग्य सेवा उपचारापैकी वरील प्रमुख आरोग्य सेवा उपचाराचा उल्लेख केला आहे.

**कोण कोणत्या आरोग्य सेवा घटकांच्या खर्चाचा समावेश होतो**

एकीकृत महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य या योजनेमध्ये पात्र लाभार्थ्यासाठी अंगीकृत रुग्णालयांना दिल्या जाणाऱ्या पॅकेजच्या दरामध्ये सर्वसाधारण वार्डमधील खाटांचे शुल्क, परिचारिका शुल्क, विशेषज्ञ, भूलतज्ञ व वैद्यकीय अधिकारी यांचे शुल्क, तपासणी शुल्क, भूल, ऑक्सिजन, ऑपरेशन थिएटर व अतिदक्षता शुल्क, शस्त्रक्रियेसाठी लागणाऱ्या साहित्याची किंमत, औषधे व द्रव्य,कृत्रिम अवयवांची किंमत,

रक्त संक्रमणाचे दर (राज्य शासनाच्या धोरणानुसार रक्त पुरविणे), इनप्लांट ,एक्स-रे व निदान चाचण्या, अंतररुग्णास भोजन, डिस्पोजेबल व कंझुमेबाल, राज्य परिवहनाच्या दरानुसार किंवा रेल्वेच्या द्वितीय श्रेणी भाडे यानुसार वाहतूक खर्च (रुग्णालय ते रुग्णांचे निवासस्थानापर्यंत) या खर्चाचा समावेश होतो. पॅकेज दरामध्ये रुग्ण रुग्णालयात दाखल झाल्यापासून ते घरी जाईपर्यंतच्या तसेच उपचारा दरम्यान काही गुंतागुंत झाल्यास त्यासह संपूर्ण खर्चाचा अंतर्भाव असून लाभार्थ्यास सर्व सेवा शुल्क पुरवावला जातो. जर रुग्णाचा मृत्यू झाला तर रुग्णाचा मृतदेह रुग्णालयातून घरापर्यंत घेऊन जाण्यापर्यंत सर्व खर्च पॉलिसी पॅकेज मध्ये समाविष्ट आहे.

**समाविष्ट रुग्णालये**

या योजनेअंतर्गत शासकीय व खाजगी अशा दोन्ही प्रकारच्या रुग्णालयाच्या समावेश होतो. शासकीय रुग्णालयामध्ये सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग, महानगरपालिका व नगरपालिका यांच्या अखत्यारीतील रुग्णालयांचा समावेश आहे.बहु-विशेष सेवा किंवा एकल विशेष सेवा पुरवठादार शासकीय किंवा खाजगी रुग्णालयाचे अंगीकरण मुख्य कार्यकारी अधिकारी ,राज्य आरोग्य हमी सोसायटी यांच्या अध्यक्षतेखालील समन्वय, अंगीकरण व शिस्त पालन समितीच्या आवश्यकतेनुसार व निर्देशानुसार करण्यात येते. बहु- विशेष खाजगी रुग्णालयासाठी किमान 30 खाट व अतिदक्षता विभाग असे निकष काही सवलतीसह आहेत.एकल विशेष खाजगी रुग्णालयासाठी दहा खाट व इतर निकष लागू आहेत. अंगीकृत रुग्णालयांची कमाल संख्या 1000 इतकी असून, सद्यस्थितीत 999 रुग्णालय अंगीकृत आहेत. त्यापैकी 282 शासकीय रुग्णालये व 717 खाजगी रुग्णालये आहेत.

**योजनेअंतर्गत कार्य व खर्च**

एकीकृत महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत जन आरोग्य योजना या योजनेने23/09/ 2018 ते 31/07/2022 या कालावधीत केलेले कार्य पुढील प्रमाणे आहे.

| एकत्रित योजनेचे कार्य(PMJAY+MJPJAY) दिनांक 23.09.2018 ते 31.07.2022 | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | जिल्ह्याचे नाव | झालेल्या शस्त्रक्रिया व उपचार | | अदा दावे | |
| | | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम |
| 1 | अहमदनगर | 172050 | 3974777349 | 155456 | 3321217377 |
| 2 | अकोला | 50327 | 1122059773 | 48097 | 937732959 |
| 3 | अमरावती | 80592 | 1906061978 | 75185 | 1603650674 |
| 4 | औरंगाबाद | 93701 | 2339326896 | 86120 | 1979076116 |
| 5 | बीड | 88604 | 1993996341 | 80833 | 1674402964 |
| 6 | भंडारा | 20294 | 350314264 | 16944 | 270670007 |
| 7 | बुलढाणा | 72356 | 1680466511 | 66364 | 1411782665 |
| 8 | चंद्रपूर | 25849 | 547744345 | 21903 | 421781230 |
| 9 | धुळे | 64035 | 1459649750 | 59124 | 1234435008 |
| 10 | गडचिरोली | 8048 | 160875141 | 6640 | 121795601 |
| 11 | गोंदिया | 18495 | 365016961 | 14894 | 259580537 |
| 12 | हिंगोली | 31774 | 750640700 | 27068 | 609847161 |
| 13 | जळगाव | 132989 | 2904178756 | 112574 | 2290598337 |
| 14 | जालना | 68923 | 1712456820 | 63041 | 1469029223 |
| 15 | कोल्हापूर | 174702 | 4097509571 | 154938 | 3338488704 |
| 16 | लातूर | 55071 | 1276590802 | 25634 | 1092945735 |
| 17 | मुंबई शहर व मुंबई उपनगर | 181526 | 4584808666 | 168813 | 3882634513 |
| 18 | नागपूर | 96919 | 1914406354 | 81710 | 1477079912 |
| 19 | नांदेड | 77468 | 1810668776 | 72701 | 1524701285 |
| 20 | नंदुरबार | 23458 | 511783113 | 21629 | 440976645 |
| 21 | नाशिक | 162274 | 3940471353 | 150740 | 3394602161 |
| 22 | उस्मानाबाद | 40957 | 895193600 | 37753 | 743132017 |
| 23 | पालघर | 11756 | 286254906 | 7674 | 166478278 |
| 24 | परभणी | 44982 | 1056946995 | 41224 | 896675327 |
| 25 | पुणे | 172573 | 4042514301 | 156514 | 3322524035 |
| 26 | रायगड | 53754 | 1240303354 | 49560 | 1006824007 |
| 27 | रत्नागिरी | 44382 | 1056972609 | 38810 | 824218455 |
| 28 | सांगली | 113067 | 2832352159 | 101001 | 2304574844 |
| 29 | सातारा | 101720 | 2422991522 | 89598 | 1930410686 |
| 30 | सिंधुदुर्ग | 21353 | 531683357 | 18393 | 418951517 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **31** | **सोलापूर** | **114956** | **2631955874** | **103014** | **2119323924** |
| **32** | **ठाणे** | **152451** | **3654714244** | **134044** | **2868103922** |
| **33** | **वर्धा** | **34884** | **823425865** | **31108** | **667373104** |
| **34** | **वाशिम** | **38186** | **921080500** | **36112** | **793381967** |
| **35** | **यवतमाळ** | **54198** | **1320149509** | **46214** | **1025404676** |
| **36** | **एकूण** | **2698644** | **63120343015** | **2428427** | **51844405573** |

वरील सारणी मध्ये महाराष्ट्रातील महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या योजनेअंतर्गत दिनांक 23 9 2018 ते 31 7 2022 या कालावधीत महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमधील नागरिकांनी उपचारासाठी घेतलेली पूर्ण पूर्व मान्यता व त्यावरील रक्कम तसेच या कालावधीत झालेल्या शस्त्रक्रिया उपचार त्याची संख्या व त्यावर योजनेअंतर्गत केलेला खर्च तसेच अदा दावे याची संख्या व त्यावरील रक्कम याची माहिती दर्शविण्यात आली आहे. सन 2018 ते 2022 या कालावधीत महाराष्ट्र मध्ये 27,04,170 आरोग्यविषयक सेवेच्या प्रकरणांना उपचार पूर्व मान्यता देण्यात आली व त्यावर एकूण 6327,39,65,066 रुपये इतका उपचार पूर्ण खर्च मंजूर करण्यात आला. संबंधित कालावधीमध्ये 26,98,644 रुग्णावर शस्त्रक्रिया/उपचार करण्यात आले. शस्त्रक्रिया व उपचारासाठी योजनेअंतर्गत 6312,03,43,015 रुपये इतका खर्च करण्यात आला. तसेच याच कालावधीत अदा प्रकरणाची संख्या 24,28,427 इतकी होती तर यावरील खर्च 5184,44,05,573 रुपये असल्याचा दिसून येतो. या सांख्यिकी वरून महाराष्ट्रातील महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेची फलश्रुती लक्षात येते. यातून सामान्याच्या आरोग्यामध्ये व जीवनमानांमध्ये निश्चितच फलदायी सुधारणा होत आहेत.

| **कालावधी** | **उपचार पूर्व मान्यतेची संख्या** | **उपचारांची संख्या** | **दावे अदा रक्कम** |
|---|---|---|---|
| 02.07.2012ते31.03.2020 | 1801428 | 2908087 | 58876590912 |
| 01.04.2020ते31.07.2022 | 2909298 | 29081794994 | 33262227270 |
| एकूण | 4710726 | 4703081 | 92138818182 |

वरील सारणी वरून वर्ष 2012 ते 2022 या कालावधीमध्ये राज्यातील रुग्णांनी दाखल केलेल्या दाव्यांची उपचार पूर्व मान्यतेची संख्या 47,10, 726 इतकी होती यापैकी 47,03,081 इतक्या रुग्णावर शस्त्रक्रिया व उपचार करण्यात आले तर यावरील दावे आदा रक्कम 9213,88,18,182 रुपये इतकी होती.

**एकत्रित योजने करिता वर्ष 2018- 19 ते वर्ष 2021 -22 या कालावधीत झालेली अर्थसंकल्पीय तरतूद व खर्च**

| | | | (रुपये लाखांमध्ये) |
|---|---|---|---|
| **वित्तीय वर्ष** | **लेखाशीर्ष** | **मंजूर तरतूद** | **प्रत्यक्ष खर्च** |
| 2018-19MJFJAY | 2210G251(GEN) | 153552.00 | 124555.00 |
| | 2210G251 2210G262(SCP) | 22000.00 | 22000.00 |
| | 2210G289(TSP) | 1500.00 | 1200.00 |
| 2019-20MJFJAY | 2210G251(GEN) | 71757.00 | 61621.71 |
| | 2210G289(TSP) | 9043.31 | 9043.31 |
| | 2210G289(TSP) | 1500.00 | 1500.00 |
| 2020-21MJFJAY | 2210G251(GEN) | 84819.00 | 84819.00 |
| | 2210G861(SCP) | 14111.13 | 9780.71 |
| | 2210G289(TSP) | 9751.69 | 9028.20 |
| 2021-22MJFJAY | 2210G251(GEN) | 110227.45 | 108350.41 |
| | 2210G861(SCP) | 18613.22 | 18613.22 |
| | 2210G289(TSP) | 10971.49 | 10414.36 |
| 2022-23MJFJAY | 2210G251(GEN) | 50000.00 | 22025.00 |
| | 2210G861(SCP) | 11800.00 | 3284.70 |
| | 2210G289(TSP) | 7000.00 | 2503.21 |

वरील सारणी मध्ये वर्ष 2018- 19 ते वर्ष 2022- 23 या कालावधीत राज्यामध्ये एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत जन आरोग्य योजना या योजनेवरील अर्थसंकल्पीय तरतूद व खर्चाची प्रवृत्ती लक्षात येते.

**आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना**

(रुपये लाखांमध्ये)

| वित्तीय वर्ष | लेखाशीर्ष | मंजूर तरतूद | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|---|
| 23.09.2018 ते 31.03.2019PMJAY | 2210G449 (राज्य हिस्सा 40%) | 6814.10 | 4000.00 |
| 2019-20 PMJAY | 2210G449 (राज्य हिस्सा 40%) | 23804.00 | 17855.00 |
| 2020-21MJFJAY | 2210G449 (राज्य हिस्सा 40%) | 22209.00 | 21355.57 |
| | 2210G888SCP (राज्य हिस्सा 40%) | 3275.19 | 2414.74 |
| | 2210G494TSP (राज्य हिस्सा 40%) | 2457.81 | 2400.36 |
| 2021-22MJFJAY | 2210G449 (राज्य हिस्सा 40%) | 19014.48 | 19014.48 |
| | 2210G888SCP (राज्य हिस्सा 40%) | 3958.59 | 3934.02 |
| | 2210G494TSP (राज्य हिस्सा 40%) | 2406.42 | 2399.70 |
| 2021-22MJFJAY 12.08.2022till | 2210G449 (राज्य हिस्सा 40%) | 11500.00 | 9507.23 |
| | 2210G888SCP (राज्य हिस्सा 40%) | 280.00 | 588.00 |
| | 2210G494TSP | 1500.00 | 604.86 |

| | | | |
|---|---|---|---|
| | (राज्य हिस्सा 40%) | | |

कोष्टकावरून राज्यामध्ये आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या योजनेवरील सप्टेंबर 2018 ते ऑगस्ट 2022 या कालावधीतील विविध लेखाशीर्षकाखाली मंजूर तरतूद व योजनेअंतर्गत झालेला प्रत्यक्ष खर्च निदर्शनास येतो. एकंदरीत महाराष्ट्रामध्ये एकत्रित महात्मा फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत जन आरोग्य योजना या योजनेच्या माध्यमातून राज्यातील नागरिकांना जास्तीत जास्त आरोग्य सुविधा पुरविण्याचा व्यापक प्रयत्न केल्याचा दिसून येतो. विशेषता ग्रामीण दुर्गम भागात, डोंगराळ प्रदेशात,वाड्या, वत्या, तांडे या भागातील राज्यातील नागरिकांना या योजनेचे विशेष लाभ मिळाले पाहिजेत यासाठी योजनेचा प्रचार आणि प्रसार घराघरापर्यंत पोहोचविणे काळाची गरज आहे.

**निष्कर्ष आणि शिफारशी**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या अभ्यासावरून काही महत्वपूर्ण निष्कर्ष काढण्यात आली आहेत ती पुढील प्रमाणे.

1. एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना MJPJAY व आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना PMJAY या योजनेमध्ये राज्यातील ग्रामीण भागातील व तसेच शहरी भागातील नागरिकासाठी राज्यातील त्या त्या जिल्ह्यातील अन्न व नागरी पुरवठा विभाग महाराष्ट्र शासन यांच्याकडून वितरित करण्यात आलेल्या दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती पिवळी शिधापत्रिका अंतर्गत अंत्यदय अन्न योजना शिधापत्रिका, अन्नपूर्ण योजना शिधापत्रिका व केशरी शिधापत्रिका धारक व्यक्ती या योजनेचा लाभ घेऊ शकतात.

2. महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त म्हणून घोषित केलेल्या 14 जिल्ह्यातीलशुभ्र शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांचाही समावेश या योजनेमध्ये करण्यात आला आहे.
3. महाराष्ट्रातील ग्रामीण व शहरी भागातील गरिबांचे गरीब पात्र व्यक्तींना चांगले व निरोगी आरोग्य मिळवून त्यांच्या जीवनमानात सुधारणा व्हावी यासाठी या योजनेची कामगिरी अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.
4. राज्याच्या या आरोग्यविषयक एकत्रित योजनेच्या माध्यमातून ते जुलै 2022 या कालावधीत राज्यातील रुग्णांनी आरोग्य विषयक दाखल केलेल्या 27,04,170 दाव्यांना पूर्व मान्यता देण्यात आली व यावरील 6327,39,65,066 रुपये खर्चाला पूर्व मान्यता देण्यात आली. याच कालावधीत 26,98,644 रुग्णावर शस्त्रक्रिया व उपचार करण्यात आले यासाठी एकत्रित योजनेतून एकूण 6312,03,43,015 रुपये खर्च करण्यात आला. तसेच संबंधित कालावधीत अदा दाव्यांची संख्या 24,28,427 इतकी होती तर यावरील अदा दाव्यांची रक्कम 5184,44,05,573 रुपये असल्याची निदर्शनास येते. यावरून योजनेची व्याप्ती व कार्यपद्धती लक्षात येते.
5. या योजनेअंतर्गत जुलै 2012 ते जुलै 2022 या कालावधीत एकूण 47,10,726 उपचार पूर्व मान्यतेची संख्या होती. यापैकी 47,03,081 रुग्णावर शस्त्रक्रिया व उपचार करण्यात आले तर 9213,88,18,182 इतकी दावेदार रक्कम असल्याची निदर्शनास येते.
6. प्रस्तुत योजनेसाठी 2018 19 ते 2022 23 या कालावधीत अंदाजपत्रकांतर्गत मंजूर करण्यात आलेल्या तरतुदी पैकी प्रत्यक्ष रक्कम ही कमी प्रमाणात खर्च करण्यात आल्याची दिसून येते.

म्हणजेच निश्चितच अनेक गरीब रुग्णांपर्यंत योजनेचे लाभ पोहोचविण्यासाठी योजनेअंतर्गत संधी आहे.

**शिफारशी**

1. एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत जन आरोग्य योजना या योजनेचा लाभ राज्यातील प्रत्येक गरिबाला मिळाला पाहिजे यासाठी पात्रतेचे निकष बदलणे गरजेचे आहे. कारण राज्यात अशी अनेक कुटुंबे आहेत की त्यांच्याकडे अशा स्वरूपाची शिधापत्रिका नाही.
2. प्रस्तुत योजनेतून खाजगी रुग्णालयात दाखल झालेली अनेक प्रकरणाची क्रॉस चेकिंग करणे अत्यावश्यक वाटते.कारण या योजनेतील अनेक आरोग्य विषयक प्रकरणात खाजगी डॉक्टरांकडून बनावट बिले दाखल करण्यात येत असल्याची प्रकरणे समोर येत आहेत.
3. एकत्रित आरोग्य योजनेचा उद्देश अत्यंत समर्पक व व्यापक आहे. ज्यामुळे राज्यातील नागरिकांना निरोगी व चांगले जीवनमान प्राप्त होईल. यासाठी योजना अधिक पारदर्शक व सर्वांपर्यंत पोहोचण्याची आवश्यकता वाटते.

कोणत्याही देशातील नागरिकांचे आरोग्य निरोगी असेल तर त्या देशातील मानवी भांडवलाचा दर्जा हा अति उत्कृष्ट ठरला जातो . उच्च मानवी भांडवलामुळे देशातील अर्थव्यवस्थेत अनेक सकारात्मक बदल घडून येतात. तसेच राष्ट्राच्या समृद्धीमध्ये व विकासामध्ये देशातील निरोगी नागरिकांचा मोलाचा वाटा कार्यरत असल्याचे अनेक देशात दिसून येते. महाराष्ट्रात राबवलेली ही आरोग्यदायी योजना राज्यातील नागरिकांसाठी आरोग्य संजीवनीच ठरत आहे. त्यामुळे गरीबाच्या जीवनात व राहणीमानात सुधारणा होत आहे.

**संदर्भसूची**

1) आर्थिक समीक्षा अहवाल, 2022- 23, माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकार

2) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, वार्षिक अहवाल 2022- 23, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन ,मुंबई

3) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, महाराष्ट्र सरकार, वार्षिक अहवाल 2022- 23

4) महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना संकेतस्थळ

5) योजना मासिक विविध अंक

6) https://www.jeevandayee.gov.in/

7) https://www.jeevandayee.gov.in/MJPJAY/

8) https://arogya.maharashtra.gov.in/1125

9)https://divyamarathi.bhaskar.com/business/news/mahatma-phule-jan-arogya-yojana- eligibility-facilities-benefits-130732627.html

***

# दुष्काळ मुक्त महाराष्ट्रासाठी पाणी फाउंडेशन एक लोक चळवळ

संशोधक मार्गदर्शक

**प्रा. डॉ. अविनाश गेडाम**

संशोधक विद्यार्थी

**संदिप बबन वाघ**

महात्मा ज्योतिबा फुले समाजकार्य महाविद्यालय, बुलडाणा.

**प्रस्तावना:-**

जीवसृष्टी ही पृथ्वीला लाभलेली निसर्गदत्त देणगी आहे. पृथ्वीवरील जीवसृष्टीच्या अस्तीत्वाच्या दृष्टीने जलसंपत्ती ही आवश्यक गरज असून जलस्त्रोतांच्या सभोवतालीच वनस्पती व प्राणीजीवन विकसित झाल्याचे आढळून येते. मानवाचे देखील जलस्त्रोतांच्या सभोवतालीच आपली वस्ती केली असून जगातील न्युयॉर्क, बिजिंग, मुंबई, कोलकत्ता इत्यादी प्रमुख शहरे ही नद्यांच्या तिरावर वसलेली आहेत. पृथ्वीच्या सुमारे 510 दशलक्ष चौरस किलोमीटर पृष्ठभागाच्या म्हणजेच 70 - 80 टक्के भाग पाण्याने व्यापलेला असून पृथ्वीवर एकूण 4,88,90,500 अब्ज टीएमसी पाणी आहे. पृथ्वीवर उपलब्ध असणाऱ्या एकूण जलसंपत्तीपैकी 97.24 टक्के पाणी महासागरामध्ये असून ते पिण्यायोग्य नाही, उत्तर व दक्षिण ध्रुवांवर हिमनग आणि हिमनद्यांमध्ये 2.14 टक्के शुध्द जलसाठा आहे परंतु तो वापरता येणे अशक्य आहे. नद्यांमध्ये एकूण पाण्याच्या केवळ 0.001 टक्के पाणी आहे. तर गोड्या पाण्याच्या सरोवरात 0.009 टक्के पाणी आहे.थोडक्यात मानवाला वापरण्यायोग्य पाण्याचा उपलब्ध साठा केवळ 328290 अब्ज टीएमसी

म्हणजेच 0.67 टक्के इतके अल्प पाणी उपलब्ध आहे. भारतात भूपृष्ठावरील व भूगर्भातील मिळून एकूण 39,641.9 टीएमसी पाणी असून यापैकी 15,284 टीएमसी म्हणजेच जागतिक तुलनेत 4.66 टक्के इतके पाणी मानवी वापरास उपलब्ध आहे. एकूण जागतिक भूभागापैकी भारताने 2.4 टक्के भूभाग व्यापला असून सध्या पृथ्वीवर वास्तव्य करत असलेल्या 7.7 अब्ज लोकसंख्येपैकी भारतात 121.09 कोटी म्हणजेच 17 टक्के लोकसंख्या आहे. म्हणजेच जागतिक तुलनेत भारतात जमिनीच्या क्षेत्रफळापेक्षा मानवी वापरास उपलब्ध असणाऱ्या पाण्याचे प्रमाण जास्त असले तरी उपलब्ध असणाऱ्या पाण्याच्या प्रमाणापेक्षा लोकसंख्येचे प्रमाण तीन पटीपेक्षा अधिक आहे. अतिरिक्त लोकसंख्या तसेच अनियमित व अनिश्चित मान्सून पर्जन्य आणि उपलब्ध पाण्याच्या सुयोग्य व्यवस्थापनाचा अभाव यामुळे देशात तेसच महाराष्ट्रात जलसमस्या गंभीर रूप धारण करीत आहे.

**Key Words:-** पर्जन्य, जलप्रदूषण, पानी फाउंडेशन, वॉटर कप, समृद्ध गाव, फार्मर कप

**महाराष्ट्रातील पर्जन्य:-**

महाराष्ट्र राज्य हे उष्णकटिबंधीय हवामान प्रदेशात मोडते. महाराष्ट्राच्या पश्चिमेला असणारा अरबी समुद्र, महाराष्ट्राचा अक्षवृत्तीय विस्तार, नैऋत्य व ईशान्य मोसमी वारे व पूर्वेकडील पठारी प्रदेश या सर्व घटकांचा परिणाम महाराष्ट्राच्या हवामानावर होतो. महाराष्ट्रात सर्वाधिक 85% पाऊस हा नैऋत्य मोसमी वाऱ्यापासून जून ते सप्टेंबर अखेरपर्यंत मिळतो. सप्टेंबरमध्ये मान्सूनचे निर्गमन होण्यास सुरुवात होते व ऑक्टोबरपर्यंत सर्व भागातून मान्सूनचे निर्गमन झालेले असते. त्यामुळे ऑक्टोबरला ‘संक्रमणीय काळ’ असे म्हणतात. ऑक्टोबर ते जानेवारी या काळात ईशान्य मोसमी वाऱ्यांपासून पाऊस पडतो, ज्याला ‘परतीचा

पाऊस' म्हणतात. राज्याचे वार्षिक सरासरी पर्जन्यमान सुमारे 1360 मिलीमीटर असले तरी राज्याच्या निरनिराळ्या भागातले पावसाचे प्रमाण मात्र भिन्न आहे. सह्याद्रीवर पाऊस पडल्यानंतर वारे जेव्हा पूर्वेकडे वाहू लागतात तसतसे त्यांची बाष्पधारणशक्ती वाढत जाते, यामुळे पठारावर पाऊस झपाट्याने कमी होतो व त्या क्षेत्रात पर्जन्यछायेचा प्रदेश निर्माण होतो या प्रदेशाला 'अवर्षणग्रस्त प्रदेश' म्हणतात. कोकणात सरासरी वार्षिक पर्जन्य हे 2000 ते 3500 मिमी असून राज्यातील मानवी वापरास उपलब्ध असणाऱ्या पाण्यापैकी सुमारे 55 % पाणी एकट्या कोकणात उपलब्ध आहे. कोकणेतर महाराष्ट्रात म्हणजेच पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भात राज्यातील मानवी वापरास उपलब्ध असणाऱ्या पाण्यापैकी केवळ 45 % पाणी उपलब्ध आहे. सह्याद्रीच्या पूर्वेला पर्जन्यछायेच्या प्रदेशात पर्जन्याचे प्रमाण केवळ 450 मिलीमीटर इतके असून राज्याच्या पूर्व भागात हे प्रमाण 1000 ते 1400 मिलीमीटर पर्यंत वाढत जाते. महाराष्ट्रात अवर्षणग्रस्त प्रदेशाचे क्षेत्रफळ सुमारे 61,600 चौ.कि.मी.आहे. येथे पावसाचे प्रमाण 300 ते 500 मिमी पर्यंत असते. महाराष्ट्राच्या एकूण क्षेत्रफळापैकी 20% प्रदेश हा अवर्षणग्रस्त प्रदेशामध्ये येतो जो राज्याच्या एकूण लोकसंख्येचा 6% भाग आहे.

**महाराष्ट्र राज्यापुढील जल आव्हाने:-**

महाराष्ट्रातील भौगोलिक क्षेत्रफळ हे देशाच्या सुमारे 9.37 % असून भारतातील एकूण जलसंपत्तीच्या सुमारे 14.59% पाणी महाराष्ट्रासाठी उपलब्ध आहे, तरी राज्यात जलसंकट निर्माण होत असून वारंवार दुष्काळस्थिती निर्माण होते. थोडक्यात महाराष्ट्राला नैसर्गिकरीत्या मुबलक प्रमाणात जलसंपत्ती उपलब्ध असूनही सुयोग्य नियोजन व व्यवस्थापन यांच्या अभावामुळे राज्यातील जलसमस्या उग्र रूप धारण करीत आहे. याची काही प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

**1. जलसंपत्तीचे विषम वितरण**

राज्यातील पर्जन्याचे वितरण असमान असून निम्म्यापेक्षा अधिक पाऊस एकट्या कोकणात पडतो तर राज्यामध्ये जवळपास 126 तालुके हे कायमस्वरूपी दुष्काळी आहेत. महाराष्ट्राच्या पश्चिमेस असणाऱ्या सह्याद्री पर्वतरांगांमुळे अरबी समुद्रातून येणारे नैऋत्य मान्सून वारे अडविले जातात त्यामुळे कोकण किनारपट्टीवर 2000 ते 3500 मि.मी पाऊस पडतो, तर सह्याद्री पर्वताच्या पूर्वेस असणाऱ्या पश्चिम महाराष्ट्र व विदर्भातील अनुक्रमे 500 ते 750 मि.मी व 1000 ते 1400 मि.मी. इतका अत्यल्प पाऊस पडतो.

**2. प्रभावी नियोजनाची गरज**

गेल्या 100 वर्षातील पर्जन्याच्या आकडेवारीचा विचार केल्यास राज्यातील पावसाचे सरासरी प्रमाण फारसे कमी झाल्याचे आढळून येत नाही. भारताच्या 14.59 % पाणी महाराष्ट्रात उपलब्ध असून देशाच्या तुलनेत 29.10% वापरायोग्य पाणी एकट्या महाराष्ट्रात उपलब्ध आहे, परंतु लोकसंख्येत झालेली पाचपटींपेक्षा अधिक वाढ, शेतीक्षेत्रातील हरितक्रांती, पायाभूत सुविधांचा विकास, औद्योगिक प्रगती यांमुळे पाण्याची मागणी मोठ्या प्रमाणात वाढतच आहे, परंतु अद्यापही महाराष्ट्रातील जवळपास 80% शेती ही कोरडवाहू स्वरूपाचीच आहे. याशिवाय दरवर्षी राज्यातील जवळपास 1,500 गावे व 4,305 वाड्यांना पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष्य भासत आहे, त्यामुळे जलसंपत्तीचे अधिक प्रभावीपणे नियोजन व व्यवस्थापन करावे लागेल.

**3. भूजलाकडे दुर्लक्ष आणि दुष्काळाचे संकट**

भूपृष्ठाखालील जलसंपत्तीचा संचय व उपलब्धता मुख्यत्वे पर्जन्यमान, भूपृष्ठीय स्थिती आणि भूशास्त्रीय स्थिती यांवर अवलंबून आहे. राज्यातील भूपृष्ठीय स्थितीमध्ये आढळणारी विविधता ही एकूण

क्षेत्राच्या 1/3 डोंगराळ, 1/3 अवर्षण प्रवण व 1/3 अति पर्जन्याचे क्षेत्र अशास्वरूपाचे आहे. याचबरोबर विशिष्ट अशी भूशास्त्रीय रचना (92 % कठीण खडक), पर्जन्यमानातील दोलायमानता आणि क्षेत्रिय विचलन अशा गुंतागुंतीच्या नैसर्गिक परिस्थितीमुळे भूपृष्ठीय व भूजल उपलब्धतेमध्ये राज्यात खूप विविधता आढळते.

**4. नागरीकरण व औद्योगिकरणासाठी पाण्याची वाढती मागणी**

वाढती लोकसंख्या तसेच उच्च राहणीमान, रोजगार व पाण्याचे दुर्भिक्ष या कारणांमुळे ग्रामीण लोकसंख्येचे शहरी भागात स्थलांतर होत आहे. यामुळे शहरी भागात पिण्याच्या पाण्याचा वापर, औद्योगिक वापर तसेच घरगुती वापर यासाठी पिण्याच्या पाण्याच्या मागणीत मोठी वाढ होत आहे.

**5. जलसिंचन क्षमतेचा अपुरा वापर**

राज्यात आजमितीला एकूण 3,910 राज्यस्तरीय सिंचन प्रकल्प (87 मोठे, 297 मध्यम, 3,526 लघु) बांधून पूर्ण झाले आहेत. त्यांची एकूण निर्मित आणि उपयुक्त साठवण क्षमता अनुक्रमे 48,705 दशलक्ष घनमीटर (1,720 TMC) आणि 40,897 दशलक्ष घनमीटर (1,445 TMC) आहे. राज्यातील सन 1960 - 61 ते 2010 - 11 या काळात पिकाखालील एकूण सिंचन क्षेत्रात 6.48 % वरून 20.60 %पर्यंत वाढ झाल्याचे निदर्शनास येते. याशिवाय राज्यातील असंख्य जलसिंचन प्रकल्पांची कामे अपूर्ण असल्याने तसेच कालवे, वितरिका यांची कामे रखडल्यामुळे प्रकल्पांची सिंचनक्षमता पूर्णपणे वापरली जात नाही.

**6. पाण्याचा अयोग्य व बेसुमार वापर**

महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागातील काही गावांत लोकांना पिण्याच्या हंडाभर पाण्यासाठी वणवण करावी लागते. तीव्र दुष्काळी भागात काही शहरांमध्ये आठवड्यातून, पंधरवड्यातून तर काही ठिकाणी

महिन्यातून एकदा नळाला पाणी येते. याऊलट राज्यातील काही शहरात/भागात दररोज दरडोई सुमारे 250 लीटर पाण्याचा बेसुमार वापर केला जातो. शहरातील लोकसंख्यावाढ व  पाण्याच्या बेसुमार वापरामुळे जलस्रोतांमधील शहरांसाठीच्या पाणीवापराचे आरक्षण वाढत असून ग्रामीण  भागातील शेती तसेच पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होत आहे.

**पाणी फाउंडेशन:-**

पानी फाउंडेशन ही २०१६ मध्ये ना-नफा तत्त्वावर स्थापन झालेली संस्था. ग्रामीण महाराष्ट्रातील जनतेला पाण्याच्या तीव्र दुष्काळाशी सामना करता यावा, यासाठी सत्यमेव जयते ह्या टीव्ही मालिकेच्या टीमने पुढाकार घेतला. पाण्याचा तुटवडा हे मानवनिर्मित संकट आहे, त्यामुळे या संकटातून बाहेर येण्यासाठी लोकांनीच प्रयत्न करायला हवेत, म्हणूनच, या दुष्काळाला पळवून लावण्यासाठी ह्या मोहिमेत लोकांना सहभागी करून घेणे, त्यांना प्रोत्साहन देणे आणि प्रशिक्षित करण्यासाठी संवादाचे माध्यम पुरवणे, हे पानी फाउंडेशनचे लक्ष्य आहे. पानी फाउंडेशन सध्या जलसंधारण (शास्त्रशुद्ध पाणलोट व्यवस्थापन), नेतृत्वगुण आणि समाजबांधणी/संघटन या विषयांबाबत प्रशिक्षण देत आहे. महाराष्ट्रातील जवळपास ९०% दुष्काळी भागात पानी फाउंडेशनचे काम सुरू आहे. प्रशिक्षणात पाणलोट व्यवस्थापनाविषयी शिकलेली कौशल्ये प्रत्यक्षात आणण्यासाठी गावकऱ्यांना दिलेली प्रेरणा म्हणून २०१६ यावर्षी ‘सत्यमेव जयते वॉटर कप’ या अनोख्या स्पर्धेची निर्मिती झाली. पानी फाउंडेशनमुळे झालेले कार्य हे जलसाक्षरतेसाठी, जलजागृतीसाठी घेण्यात आलेल्या लोकसहभागाचे उत्तम उदाहरण आहे.

**पाणी फाउंडेशनची गरज:-**

हवामान बदलामुळे पावसाचे पडणारे पाणी हे अनियमित झाले आहे,  म्हणजे नको तेव्हा मनसोक्त बरसतो आणि हवा तेव्हा एकदम

तरसवतो असे प्रकार गेल्या काही वर्षापासून घडतांना दिसत आहे. त्यासोबतच गेली चार दशके दुष्काळाने महाराष्ट्रात थैमान घातले आहे. परिणामी तहान (कोरडा दुष्काळ), भूक, कर्ज, सक्तीचे स्थलांतर आणि करपलेली पिके ह्याचाच सामना लोकांना करावा लागत आहे. शेकडो गांवांमधून प्रवास केल्यानंतर आणि अनेक शेतीतज्ज्ञांशी चर्चा केल्यानंतर पाणी फाउंडेशनच्या असे लक्षात आले, की हे संकट मानवाने स्वत:च्या कृतीतून ओढवून घेतलेले आहे. हवामानबदलामुळे पाणी तसेच अन्य नैसर्गिक स्रोतांचा बेसुमार वापर होत गेला; शिवाय व्यवस्थापनातील ढिसाळपणामुळे हा प्रश्न विकोपाला गेला. या संकटावर मात करण्यासाठी जलसंधारण, जलव्यवस्थापन आणि पर्यावरणाचे पुनरुज्जीवन अशा शास्त्रशुद्ध पद्धतींनी उपाय केले जाऊ शकतात. तज्ज्ञांनी वर्षानुवर्षे याच उपायांचा वापर आणि प्रसार केला आहे. मात्र ह्या उपायांचा अवलंब करण्यातली सर्वात मोठी अडचण होती समाजमनातली दरी. जातिभेद, धर्म, राजकीय हस्तक्षेप, लिंगभेद यांसारख्या प्रश्नांमुळे ही समस्या त्यांना कधी आपली वाटली नाही आणि एकत्र येऊन त्यावर उपायही शोधला गेला नाही. समूहाच्या कृतीशीलतेमध्ये बदल घडवून आणण्याचे सामर्थ्य असते यावर पानी फाऊंडेशनचा विश्वास आहे. त्यामुळे लोक मोठ्या प्रमाणात एकत्र येऊन जर एक चळवळ उभी राहिली, तर गावे या संकटाला निश्चित तोंड देऊ शकतील असा विश्वास पाणी फाउंडेशनला वाटतो. त्यामुळे लोकांच्या एकजुटीतून, अनुभवसिद्ध उपाय आणि तंत्रज्ञानाला अधिकाधिक वाव देऊन महाराष्ट्र दुष्काळमुक्त आणि संपन्न, समृद्ध करणे हे पाणी फाउंडेशनच्या ध्येय होते.

**पाणी फाउंडेशन अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या स्पर्धा:-**

पाणी फाउंडेशनच्या स्थापनेपासून ते आजपर्यंत विविध प्रकारच्या स्पर्धा पाणी फाउंडेशन अंतर्गत राबविण्यात आल्या आहे त्या खालीलप्रमाणे-

**१) सत्यमेव जयते वॉटर कप स्पर्धा:-**

सत्यमेज जयते वॉटर कप ही ४५ दिवसांची एक वार्षिक स्पर्धा होती. २०१६-२०१९ या कालावधीत घेण्यात आलेल्या या स्पर्धेत मृदा आणि जलसंधारणाचे सर्वाधिक व सर्वोत्कृष्ट काम करण्यासाठी महाराष्ट्रातील हजारो गावे सहभागी झाली. पानी फ़ाउंडेशनकडून पाणलोट व्यवस्थापनाचे प्रशिक्षण मिळाल्यानंतर सहभागी स्पर्धक गावांनी पाणलोट रचनांची जणू उद्योजक झाल्याच्या आवेशात बांधणी आणि दुरुस्ती केली, मशीन कामासाठी निधी उभारणी केली आणि इतर कामांमध्ये मातीचे परीक्षण आणि उपचार केले. 'श्रमदान' हा या स्पर्धेचा आत्मा होता. दररोज, हजारो गावकऱ्यांनी एकत्र येऊन श्रमदान केले आणि एका उत्तम ध्येयाने प्रेरित होऊन त्यांच्या वेळाचे आणि परिश्रमांचे भरीव योगदान दिले. वॉटर कप स्पर्धेने नागरिकांना पाणी टंचाईच्या समस्येवर मात करण्यासाठी एक व्हायला शिकवले, शासनावर अवलंबून राहण्याचा प्रघात मोडायला शिकवले आणि स्वकष्टाने आपल्या गावाला पाणीदार करण्याचा मान मिळवण्याचा अनुभवही दिला.

**२) सत्यमेव जयते समृद्ध गाव स्पर्धा:-**

सत्यमेव जयते समृद्ध गाव स्पर्धा ही महाराष्ट्र राज्याच्या ग्रामीण भागातील पर्यावरण तसेच अर्थव्यवस्थेचा कायापालट करण्यासाठी योजली आहे. या स्पर्धेद्वारे गावागावातल्या पर्यावरण आणि अर्थव्यवस्थेला एक समृद्ध वळण देतानाच गावकऱ्यांना त्यांच्या स्वप्नातले गाव उभे करण्यासाठी सक्षम करणे हे ह्या स्पर्धेचे उद्दिष्ट आहे. तसेच या स्पर्धेत प्रामुख्याने, पाण्याचा शाश्वत वापर (जल व्यवस्थापन) आणि पर्यावरणाचे पुनर्संचयन (पर्यावरणाचे आरोग्य सुधारणे) या गोष्टींवर भर आहे. या स्पर्धेत मुख्यत्वे, जल-व्यवस्थापनासाठी समाजाने (गावकऱ्यांनी) मिळून निर्णय घेणे, अभिप्रेत

आहे. पाण्याचा वापर करण्यासंबंधीच्या सामुदायिक योजना आणि आर्थिक अंदाजपत्रक तयार करण्यासाठी गावांना सर्वतोपरी प्रशिक्षण आणि प्रोत्साहन दिले जाईल; याशिवाय या प्रशिक्षणात गावपातळीवर आवश्यक पायाभूत पीक नियोजन देखील शिकवले जाईल.

**३) सत्यमेव जयते फार्मर कप स्पर्धा:-**

मागील काही वर्षात राज्यभर 'वॉटर कप' स्पर्धेच्या माध्यमातून जलसंधारणाची कामे करण्यात आली होती. शिवाय यामध्ये पाणी फाउंडेशनला यशही मिळाले होते. आता शेती उत्पादन वाढावे आणि जमिनीचा दर्जा सुधारावा या दृष्टीकोनातून यंदाच्या (२०२२) खरीप हंगामापासून फार्मर कप स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत शेतकऱ्यांचा पीकनिहाय गट राहणार असून राज्यस्तरावर प्रथम येणाऱ्या गटास तब्बल 25 लाखाचे बक्षीस दिले जाणार आहे. जलंसधारणामध्ये पाणी फांउडेशनची महत्वाची भूमिका राहिलेलली आहे. दरवर्षीच्या स्पर्धेतून गावकऱ्यांची एकजूट, जलसंधारण अशी एकापेक्षा एक चांगली कामे झाली आहेत.

**व्यक्तींचा पाणी फांउडेशनकडे पाहण्याचा दृष्टिकोन:-**

व्यक्तींचा पाणी फांउडेशनकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक असून, त्याअनुषंगाने वर्तमानपत्रावर तसेच समाजमाध्यमांवर खालील काही प्रतिक्रिया उमटल्याचे दिसून आले-

**नवऱ्याच्या हाती फावडे, नवरीच्या हातात पाटी (लोकमत न्यूज नेटवर्क, २९ एप्रिल २०२८)**

माण तालुक्यातील शिवाजीनगर (कुकुडवाड) येथील नवविवाहित दाम्पत्याने लग्नाच्या दुसऱ्याच दिवशी देवदर्शनासाठी जाण्याऐवजी नवरदेव सोमनाथ यांनी असा निश्चय केला की नेहमीप्रमाणे आधी सकाळी श्रमदानाच्या ठिकाणी जाऊन नवरदेव सोमनाथ व नवरी नीता यांनी

हातात फावडे अन पाटी घेऊन जोडीने एकत्र श्रमदान केले व नंतर ते देव दर्शनासाठी गेले. माण तालुक्यातील शिवाजीनगर येथील नवरदेव सोमनाथ पंढरी भोसले याचे होळीचेगाव, ता. खटाव येथील नीता बाबासाहेब जगताप यांचा नुकताच विवाह सोहळा शिवाजीनगर येथे पार पडला. सध्या तालुक्यात गावागावात पाणी फांउडेशन वॉटर कप स्पर्धेचे तुफान आले आहे, असे असताना सोमनाथ व नीता या दोघांनी देव दर्शनाला जाण्यापूर्वी आपल्या शिवारात लोकांच्या समवेत हातात फावडे पाटी घेऊन जोडीने श्रमदान केले.

**गावोगावी श्रमदान, श्रमाला प्रेरणा (लोकमत न्यूज नेटवर्क)**

दुष्काळाचा सामना करणाऱ्या तालुक्यात अनेक गावांनी पाणी फाऊंडेशन अंतर्गत गाव पाणीदार करण्यासाठी कंबर कसली आहे. या गावकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी मंगळवारी जिल्ह्याच्या शिक्षणाधिकाऱ्यांनी प्रत्येक शिवारात पोहचून श्रमदान केले. त्यांच्या श्रमदानाने सर्वसामान्य गावकऱ्यांना नवा हुरूप आला आहे.पाणी फाऊंडेशन अंतर्गत 'सत्यमेव-जयते' वॉटर कप स्पर्धा सुरु आहे. यात घाटंजी तालुक्यातून ४८ गावांनी सहभाग घेतला आहे. या सर्व गावांमध्ये श्रमदानाचे एकप्रकारे तुफान आले आहे. प्रत्येक गावातील आबालवृद्ध, सर्व नागरिक, विविध संघटना सहभाग नोंदवून स्वयंस्फूर्तपणे श्रमदान करीत आहे. त्यातच जिल्ह्याच्या ठिकाणावरुन येऊन शिक्षणाधिकारी डॉ. सुचिता पाटेकर यांनी गावकऱ्यांना नवा उत्साह दिला.

**दारव्हा शहरवासीयांनी काढली 'वॉटर कप रॅली'**

वॉटर कप स्पर्धेत सहभागी झालेल्या गावकऱ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी दारव्हा शहरात मंगळवारी वॉटर कप रॅली काढण्यात आली. या रॅलीने शहरवासीयांचे लक्ष वेधून घेतले. पाणी फाऊंडेशनच्या 'सत्यमेव-जयते' वॉटर कप स्पर्धेत तालुक्यातील ५५ गावे सहभागी झाली आहे.

गावकरी श्रमदानाद्वारे गावाच्या विकासासाठी झटत आहे. विविध प्रकारची कामे मोठ्या प्रमाणात केली जात आहे. परंतु गावकऱ्यांचा उत्साह कायम राहावा तसेच विविध क्षेत्रात काम करणाऱ्या संघटना, शहरातील नागरिकांचा सुद्धा या कार्यात सहभाग वाढावा यासाठी जनजागृतीची गरज आहे. त्या दृष्टीने तहसीलदार कार्यालयातून रॅली काढण्यात आली. शहरातील प्रमुख मार्गाने मार्गक्रमण करीत रॅलीचा तहसील परिसरात समारोप करण्यात आला. यावेळी उपविभागीय अधिकारी जयंत देशपांडे यांनी मार्गदर्शन केले. पाण्याचे महत्व लक्षात घेता या कार्यात सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी दारव्हा शहरवासीयांना केले.

**पूर्वसाहित्याचा आढावा:-**

संशोधन विषयाच्या अनुषंगाने पुढील प्रमाणे पूर्वसाहित्यांचा आढावा घेण्यात आलेला आहे. पाणी फाउंडेशन एक लोकचळवळ या पार्श्वभूमीसाठी इंटरनेटवरील विविध वेबसाईटचा वापर करण्यात आलेला आहे तसेच विविध वर्तमानपत्रातील लेख, पुस्तके आणि प्रत्यक्ष निरीक्षण मुलाखती या प्राथमिक आणि द्वितीय साहित्यांचा समावेश आहे.

**संशोधनाची आवश्यकता:-**

निसर्गात उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा असे ऋतुचक्र सुरू असते. जीवनासाठी आवश्यक असणारे पाणी आपल्याला पावसाळा या ऋतुत उपलब्ध होते. महाराष्ट्रातील सर्व भागात एकसमान पाऊस पडत नाही. पावसाळ्यात विशिष्ट भागात पडणारे पाणी काही प्रमाणात नैसर्गिकरित्या जमिनीत मुरते, काही भूपृष्ट जल म्हणून साठवले जाते. याव्यतिरिक्त या पाण्याचा काही भाग बाष्पीभवनामुळे परत जातो, काही वनस्पती कडून थेटपणेही वापरला जातो आणि बाकी अपधाव स्वरूपात पुढे वाहून जातो. अपधाव म्हणजे भूपृष्ठावरून वाहणारे पाणी प्रवाह. डोंगरकपारी, नदीपात्रात, विहिरीत झरे रूपाने आढळणारे पाण्याचे स्त्रोत

पावसाळा संपल्यानंतर काही दिवसातच आटू लागतात. अशावेळी पाण्याची गरज भासत असते. काही भागास सततपणे दुष्काळी परिस्थितीचा सामना करावा लागत असतो. अशावेळी हा वाया जाणारा अपधाव थांबवून पावसाचे हे पाणी जास्तीत जास्त प्रमाणात अडवणे सुयोग्य ठिकाणी साठवणे किंवा जमिनीत मुरवणे गरजेचे असते. यामध्ये पाणी फांउडेशन उत्तम प्रकारे भूमिका निभावत असल्याचे दिसून येत आहे, म्हणून या लोकचळवळीवर प्रकाशझोत टाकण्याची संशोधकाला आवश्यकता वाटली, म्हणून संशोधन करण्याची आवश्यकता आहे.

**संशोधन पद्धती:-**

सदरील संशोधन हे अन्वेषणात्मक संशोधन आराखडा आणि वर्णनात्मक संशोधन आराखडा या दोहोंचा उपयोग करण्यात आला आहे. जेव्हा एखाद्या संशोधनकार्याचा उद्देश सामाजिक घटनेमध्ये अंतर्भूत असणाऱ्या कारणांचा शोध घेणे हा असतो तेव्हा अन्वेषणात्मक आराखड्याचा वापर होतो तसेच विषयासंदर्भातील उपलब्ध तथ्य, माहिती व आकडेवारीच्या आधारावर वास्तविक तथ्यांचे विवेचन करण्यासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडाचा वापर होईल.

**संशोधनाच्या मर्यादा:-**

प्रस्तुत संशोधन हे पाणी फाउंडेशन वॉटर कप स्पर्धेत सहभागी असलेल्या गावापूर्तेच मर्यादित असून पाणी फाउंडेशनवर प्रकाशझोत टाकण्यासाठी एक प्रयत्न करण्यात आला आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीने सामाजिक जबाबदारी समजून याकडे कटाक्षाने लक्ष वेधणे आवश्यक आहे तरच पाणीटंचाई सारख्या समस्या सोडवण्यासाठी हातभार लागेल.

**संशोधनाचे उद्देश:-**

१) महाराष्ट्रातील जल आव्हानांच्या प्रमुख कारणांचा आढावा घेणे.

२) पाणी फाउंडेशन अंतर्गत येणाऱ्या स्पर्धेचा अभ्यास करणे.

३) गावातील नागरिकांचा पाणी फाउंडेशन विषयी असलेल्या दृष्टिकोनाविषयी अभ्यास करणे.

**संशोधनातील उपकल्पना:-**

१) महाराष्ट्रात जल आव्हानांची बहुविध कारणे आहेत.

२) पाणी फाउंडेशन अंतर्गत एक ना अनेक स्पर्धेचा समावेश आहे.

३) गावातील नागरिकांचा पाणी फाउंडेशन विषयी सकारात्मक दृष्टिकोन आहे.

**नमुना निवड:-**

संशोधनाच्या उद्देशास अनुसरून गैरसंभाव्यता नमुना निवड पद्धतीतील सोयीस्कर नमुना तंत्राचा अवलंब करण्यात आलेला आहे.

**तथ्य संकलन:-**

या संशोधनाकरिता प्राथमिक स्रोत आणि दुय्यम स्रोतांचा वापर करण्यात आलेला आहे. यामध्ये स्वनिरीक्षण, पाणी फाउंडेशन वॉटर कप स्पर्धेत सहभागी असणाऱ्या गावातील गावकऱ्यांच्या मुलाखती, विविध पुस्तके, वर्तमानपत्रातील लेख, इंटरनेटवरील माहिती यांचा उपयोग करण्यात आला आहे.

**सूचना:-**

1. पाणी फाउंडेशने केलेल्या कामांचा आदर्श घेऊन इतरही संस्थानी निस्वार्थपणे पुढाकार घेण्यासाठी पावले उचलावी.
2. पाणी फाउंडेशन सारख्या संस्थांना शासनाने आर्थिक पाटबळ पुरवावे.
3. पाणी हेच जीवन समजून प्रत्येकानेच पाण्याचा काटकसरीने वापर करायला हवा.

**संदर्भग्रंथ:-**


1. https://hindi.indiawaterportal.org/articles/mahaaraasataataila-jalasamasayaa-sadayasathaitai-samasayaa-va-upaayayaojanaa Dt- 11.02.24
2. जलसुरक्षा इयत्ता दहावी (मराठी माध्यम), 2022
3. https://mr.m.wikipedia.org/wiki/%E0%A4%AA%E0%A4%BE%E0%A4%A3%E0%A5%80_%E0%A4%AB%E0%A4%BE%E0%A4%89%E0%A4%82%E0%A4%A1%E0%A5%87%E0%A4%B6%E0%A4%A8 Dt- 11.02.24
4. https://www.google.com/amp/s/www.tv9marathi.com/agriculture/after-the-water-cup-competition-now-the-farmers-cup-competition-of-the-water-foundation-what-exactly-is-the-organizing-au124-703357.html/amp Dt- 12.02.24
5. https://www.google.com/amp/s/www.lokmat.com/satara/hands-husband-shovel-bride-hand/amp/ Dt- 13.02.24
6. https://www.paanifoundation.in/watercup/ Dt- 17.02.2024
7. https://en.wikipedia.org/wiki/Paani_Foundation Dt- 17.02.2024


***

# महाराष्ट्रातील कृषी क्षेत्रातील समस्या व आव्हाने

**प्रा. डॉ. रंजिता डी. जाधव**

गोदावरी कला महाविद्यालय, अंबड, जि. जालना, पिनकोड 431204

**सारांश**

कृषी हा भारतीय अर्थव्यवस्थेचा आधार आहे, देशाचा आर्थिक विकास प्रामुख्याने कृषी विकासावर अवलंबून आहे. कृषीचा विकास झाल्यास इतर सर्व क्षेत्राचा विकास साधला जातो. देशाच्या औद्योगिक विकासात शेती क्षेत्राचा वाटा महत्त्वपूर्ण असून अनेक उद्योगांना लागणाऱ्या कच्च्या मालाचा पुरवठा हा शेती क्षेत्रातून केला जातो. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असल्यामुळे पंचवार्षिक तसेच वार्षिक योजनांच्या माध्यमातून शेतीच्या विकासासाठी विशेष खर्चाची तरतूद केली जाते. देशातील फार मोठ्या ग्रामीण व नागरी लोकसंख्येची उपजीविका प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे शेतीवर अवलंबून असल्यामुळे शेतीच्या विकासातून आर्थिक विषमता कमी करता येते. कृषी क्षेत्रातील समस्या कोणत्याही सरकार पुढील अत्यंत गुंतागुंतीच्या आणि तितक्याच महत्त्वाच्या असतात, त्या समस्या सोडविण्यासाठी आवश्यक असणारा निधी देखील तेवढाच मोठा असतो, त्याशिवाय या समस्या चुटकी सरशी सुटतील अशा मुळीच नसतात, या समस्या सोडविण्यासाठी योग्य दिशेने दीर्घकालीन नियोजन केल्यास कृषी क्षेत्रातील समस्यांवर काही प्रमाणात का होईना परंतु नियंत्रण मिळवता येते, हे जगाच्या पाठीवर काही देशांनी सिद्ध केले आहे.

**कि - वर्ड** आर्थिक विषमता, दरडोई उत्पन्न, अवर्षण, उत्पादकता, हवामान बदल, अर्थव्यवस्था, आर्थिक स्थिती, सिंचन पद्धती.

**प्रस्तावना**

प्राचीन काळापासून कृषी क्षेत्र भारतीय अर्थव्यवस्थेतील एक महत्त्वाचे क्षेत्र आहे. कृषी हा भारतातील लोकांचा प्रमुख व्यवसाय असल्यामुळे देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात, रोजगारात, औद्योगिक विकास आणि एकंदरीत देशाच्या आर्थिक विकासात कृषी क्षेत्राचे स्थान महत्त्वाचे आहे. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे, असे म्हटले जाते, यावरूनच आपल्याला कृषी क्षेत्राचे भारतीय अर्थव्यवस्थेतील असणारे महत्त्व लक्षात येते, परंतु 2014 - 15 पासून बदलते हवामान यामुळे महाराष्ट्रातील शेती आणि शेतकऱ्याची परिस्थिती अत्यंत वाईट झाली आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा करायची असेल तर येथील शेती अधिक उत्पादक करण्याशिवाय दुसरा पर्याय नाही, पण शेती क्षेत्रातील उत्पादकता चुटकीसरशी वाढवता येत नाही हेही तितकेच खरे आहे.

थोडक्यात, शेती क्षेत्राचे दर हेक्टरीचे उत्पादन कमी, त्यामुळे शेतकऱ्याचे उत्पन्न कमी म्हणून वाढत्या प्रमाणात आत्महत्या अशी स्थिती दोन दशकावूनही जास्त काळ राहिलेली दिसते. आजच्या शेतकऱ्यांना भेडसावणारा सर्वात मोठा प्रश्न म्हणजे पायाभूत सुविधांचा अभाव, अपुरी वाहतूक, भांडवलाची कमतरता, हवामान बदलामुळे मातीची धूप, अवर्षण, सिंचन समस्या, यांत्रिकीकरणाचा अभाव इत्यादी अशा अनेक समस्या मुळे आजचा शेतकरी वर्ग हतबल झाला आहे. महाराष्ट्रातील शेती केवळ निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबून न राहता तिचे व्यावसायिक महत्त्व पटवून दिले पाहिजे. उत्पादन खर्च वगळता शेतकऱ्याला नफा झाल्यास शेती हा तोट्याचा व्यवसाय ठरणार नाही.

हवामानातील बदल हे सर्वात मोठे आव्हान आज शेतकऱ्यांसमोर उभे टाकले आहे, त्यानुसार शेतकऱ्यांना शेतीत बदल करणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील शेतीच्या संदर्भात काय समस्या आहेत व त्यांचे निराकरण कोणत्या उपाययोजनांच्या माध्यमातून करण्यात येऊ शकते, याचे विश्लेषण प्रस्तुत शोधनिबंधात करण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

- महाराष्ट्रातील अर्थव्यवस्थेमधील कृषी क्षेत्राचे महत्त्व अभ्यासणे.
- महाराष्ट्रातील शेतीची सद्यस्थितीचा अभ्यास करणे.
- महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांचा अभ्यास करणे.
- महाराष्ट्रातील शेती समोरील उद्भवणाऱ्या आव्हानांचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहितके**

- महाराष्ट्रातील अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राचे महत्त्व अन्यय साधारण आहे.
- शेती हा शेतकऱ्यांचा मुख्य व्यवसाय असून तिची स्थिती कमी अधिक प्रमाणात खालावली आहे.
- महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसमोर शेती संदर्भात अनेक आव्हाने आहेत.
- महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना पूर्वीपासूनच कमी-अधिक प्रमाणात समस्यांना सामोरे जावे लागते.

**संशोधन पद्धती**

कोणत्याही प्रकारचे संशोधन करत असताना तथ्य संकलनाची आवश्यकता असते. प्रस्तुत शोध निबंध दुय्यम स्रोताच्या माध्यमातून तथ्य संकलन केले आहे. विविध संदर्भ ग्रंथ, प्रकाशित व अप्रकाशित

वर्तमानपत्रे, इंटरनेट तसेच लिखित स्वरूपातील लेख व इतर माहितीचा आधार घेण्यात आला आहे, तसेच निरीक्षण प्रणालीतून काही माहिती संकलित केली आहे.

**विषयाचे महत्त्व**

शेती हा मानवाचा अत्यंत प्राचीन असा व्यवसाय आहे. कृषी व्यवसाय हा उपलब्ध नैसर्गिक साधन सामग्री आणि अत्यंत कमी भांडवलात करता येतो, परंतु आता शेतीचे स्वरूप पूर्वीसारखे उदरनिर्वाहक राहिले नाही, तर आता शेतीचे स्वरूप बदलले आहे, ती केवळ उदरनिर्वाहाचे साधन न राहता व्यावसायिक महत्त्व सुद्धा अधोरेखित करते. आधुनिक तंत्रज्ञानामुळे शेतीचे स्वरूप आता पालटले आहे. अन्नधान्यासाठी शेती केली जाते हा समज मागे टाकून तंत्रज्ञानाच्या साह्याने शेतीचे व्यावसायिक स्वरूप विकसित झाले आहे. तांदूळ, गहू, बाजरी, हरभरा, तूर अशा अन्नधान्याच्या उत्पादनाशिवाय कापूस, तंबाखू, ताग, रबर, ऊस अशी व्यापारी पिके मोठ्या प्रमाणात घेतली जाऊ लागली आहेत.

शेतीवर उद्योगधंदे पशुधन आणि मानवी जीवन अवलंबून आहे. शेतीचे चाके थांबल्यास सर्व जनजीवन उध्वस्त होण्याशिवाय पर्याय नसतो, कारण अन्नधान्य, भाजीपाला, दुग्धजन्य पदार्थ यासारखे जीवनावश्यक बाबीचा निर्माता शेती आहे. भारतातील शेती अजूनही पारंपारिक पद्धतीने केली जाते, त्यामुळे उत्पादन क्षमता कमी आहे. महाराष्ट्रातील शेतीचा आकार लहान असून शेती साधारणता पावसाच्या पाण्यावर आधारित आहे, निसर्गाच्या लहरीपणाचा शेतीला मोठा फटका बसत आहे. पावसाचे पाणी साठवून, अडवून सिंचनाची सोय करून शेती केली जाते. ज्यावर्षी पावसाचे प्रमाण कमी असते त्यावर्षी कोरडा दुष्काळ पडतो आणि शेती व्यवसायाची दैनावस्था होते, तर एखाद्या वर्षी नको

तितका पाऊस पडतो आणि ओला दुष्काळ पडतो, अशावेळी सर्वस्वी शेतीवर अवलंबून असणाऱ्या ग्रामीण भागातील लोकांचे जीवन उद्ध्वस्त होते. सिंचनाच्या सोयीच्या अभावी शेती व्यवसाय नेहमी तोट्यात चालतो. शेती पारंपारिक पद्धतीने केली जात असल्यामुळे उत्पादन कमी होते. महाराष्ट्रातील शेती ही भांडवला अभावी आणि आधुनिक यंत्रा अभावी उत्पादन कमी होते. उत्पादन कमी म्हणून शेतकऱ्याचे आर्थिक स्थिती खालवली आहे, म्हणून तो कर्ज काढतो व कर्जाची परतफेड शेतीच्या उत्पादनातून करू असा विचार करतो, परंतु निसर्गाच्या लहरीपणामुळे ते शक्य होत नाही, म्हणून महाराष्ट्रातील शेतीचा म्हणावा तेवढा विकास होताना आढळत नाही.

**महाराष्ट्रातील अर्थव्यवस्थेमधील कृषी क्षेत्राचे महत्त्व**

शेती हा महाराष्ट्र राज्याचा मुख्य आधार आहे. जवळपास 82 टक्के ग्रामीण लोकसंख्या उपजीविकेसाठी शेतीवर अवलंबून आहे. कृषी ही महाराष्ट्रातील अर्थव्यवस्थेचा पाया आहे असे म्हटले जाते. देशाचे एकूण जीडीपी मध्ये शेतीचा वाटा जवळपास 40 टक्के एवढा आहे तथापि सर्व मर्यादा असूनही कृषी क्षेत्र हे भारतीय अर्थव्यवस्थेतील सर्वात महत्त्वाचे क्षेत्र आहे. आर्थिक दृष्टिकोनातून बघितले असता अर्थव्यवस्थेमधील कृषी क्षेत्राचा वाटा महत्वपूर्ण असा आहे. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अशा दोन्ही काळामध्ये भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये शेती उद्योग हे सर्वात महत्त्वाचे क्षेत्र आहे आणि सद्यस्थितीमध्ये ही आहेतच. भारतीय अर्थव्यवस्था ही आज देखील मोठ्या प्रमाणात कृषी प्रधान आहे.

महाराष्ट्रातील लोकसंख्येचा खूप मोठा भाग हा उपजीविकेसाठी शेती उद्योगावर अवलंबून आहे. शेती उद्योग हे अर्थव्यवस्थेमधील सर्वात मोठे साधन आहे. भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये कृषी क्षेत्र हे सर्वात मोठे असंघटित क्षेत्र आहे. भारतीय अर्थव्यवस्था ही शेती क्षेत्राशी निगडित आहे. भारताला

कृषिप्रधान देश म्हणुन ओळखल्या जाते, त्यामुळे शेतीला अन्यय साधारण असे महत्त्व आहे. शेतीला भारतीय अर्थव्यवस्थेत अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे, शेतीमधून शेती तसेच बिगर शेती व्यवसायाद्वारे रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातात. आंतरराष्ट्रीय व्यापारात तसेच आयात निर्यातीत कृषी क्षेत्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. राज्यातील कच्च्या मालाची गरज कृषी क्षेत्रातून पूर्ण केली जाते. राज्यातील अर्थव्यवस्थेत कृषी चे स्थान पाठीच्या कण्यासारखे आहे, असे नेहमी म्हंटल्या जाते. मात्र नैसर्गिक संकटामुळे कृषी मालाचा बाजारात पुरवठा कमी झाला तर त्याचे पडसाद संपूर्ण अर्थव्यवस्थेवर उमटू लागतात.

कृषी हा रोजगार निर्मितीत महत्त्वपूर्ण असे योगदान देते. रोजगार निर्मिती तसेच कृषीतील कच्च्या मालामुळे परकीय व्यापाराला महत्त्वपूर्ण असे योगदान मिळते. महाराष्ट्र हा शेतीप्रधान भाग असल्यामुळे शेती द्वारे वेगवेगळ्या स्वरूपात कर गोळा होतो व त्यामुळे कृषी क्षेत्र हे अतिशय महत्त्वाचे असे अर्थव्यवस्थेतील क्षेत्र आहे.

राज्याच्या आर्थिक विकासात शेती क्षेत्राला महत्त्वाचे स्थान आहे. राज्यातील लोकसंख्येच्या प्राथमिक गरजा पूर्ण करण्यासाठी, औद्योगिक विकासासाठी, कच्च्या मालाचा पुरवठा करणारे एक क्षेत्र म्हणून शेती व्यवसायाकडे पाहिले जाते. शेती ही राज्यातील जनतेचे उपजीविकेचे प्रमुख साधन आहे. लोकांना अन्नधान्याचा पुरवठा शेतीमधून होतो. पशुधनासाठी, चाऱ्यांची उपलब्धता शेतीमधून होते. राष्ट्रीय उत्पन्नातील शेती क्षेत्राचा वाटा मोठा आहे. सन 1950 - 51 मध्ये राष्ट्रीय उत्पन्नातील शेती क्षेत्राचा वाटा 57% इतका होता. 2001- 2002 मध्ये तो 26.2% झाला. शेती हे रोजगारीचे प्रमुख साधन आहे. कृषीमुळे औद्योगिक विकासाला सहाय्य होते. उद्योगाला लागणारा कच्चा माल शेती क्षेत्रातून

उपलब्ध होतो. उदा. कापूस, तेलबिया, उस इत्यादी शेती विकासातून औद्योगिक विकास प्रक्रियेला अनेक मार्गाने गती मिळू शकते.

परकीय चलनाची उपलब्धता कच्च्या मालाच्या निर्याती द्वारे प्राप्त होते. सरकारी उत्पन्नाचे प्रमुख साधन म्हणून शेती व्यवसायाला महत्त्वाचे स्थान आहे. शेतीवर लावण्यात येणाऱ्या वेगवेगळ्या कराद्वारे सरकारला उत्पन्न मिळते. जनतेला आर्थिक स्थिरता प्राप्त करून देण्यासाठी कृषीची भूमिका ही अत्यंत महत्त्वाची आहे. एकंदरीत राज्याच्या आर्थिक, सामाजिक विकासात शेती व्यवसायाचे महत्त्व नाकारता येणार नाही. औद्योगिक विकासासाठी शेती विकास अनिवार्य आहे. अर्थव्यवस्थेतील प्रत्येक क्षेत्राचा शेती व्यवसायाबरोबरच प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष संबंध जोडला गेलेला आहे. अशा अनेक दृष्टीने कृषी क्षेत्र हे अर्थव्यवस्थेमधील अत्यंत महत्त्वाचे क्षेत्र म्हणून भूमिका निभावते .

**राज्यातील शेती व शेतकऱ्यांची सद्यस्थिती**

आज महाराष्ट्रातील शेतकऱ्याची स्थिती पाहता ग्रामीण शेतकरी वर्ग शहरी भागात चांगला रोजगार मिळाला तर शेती सोडून जाण्याची मानसिकता त्याची बनली आहे, कारण याला शेतीचे निसर्गावरील अवलंबित व तसेच शेतीतून मिळणारे तोकडे उत्पन्न या गोष्टी कारणीभूत आहेत. दिल्ली येथील सेंटर फॉर द स्टडी ऑफ डेव्हलपिंग सोसायटीज या संस्थेने शेतकऱ्यांच्या वास्तव स्थितीचे दर्शन घडवणारे सर्वेक्षण केले, त्यानुसार 36 टक्के शेतकरी झोपड्यामध्ये किंवा कच्च्या विटांच्या घरामध्ये राहतात. 28 टक्के शेतकरी अशिक्षित असल्याचे आढळले. एकूण 83% शेतकऱ्यांनी शेती हाच आपला प्रमुख व्यवसाय असल्याचे सांगितले. 32 टक्के शेतकरी कुटुंब शेतीबरोबरच जोड व्यवसाय करतात. दहा टक्के शेतकरी वर्गाने सांगितले की, गेल्या वर्षभरात त्यांच्या कुटुंबाला खायला काहीही नसल्यामुळे, काही वेळा त्यांना उपाशी राहावे लागले.

जवळजवळ सर्वच ठिकाणी पाण्याअभावी उत्पादकता घटलेली दिसून येते. सद्यस्थितीमध्ये शेती क्षेत्राचा मुख्य प्रश्न लहान शेती आकार व लहान शेतकरी असून त्यांचे उत्पन्न कसे वाढवायचे हा प्रश्न आहे. खाजगी बियाणांच्या एकाधिकार झाल्याने सध्या शेतकऱ्यांची पिळवणूक होत आहे. आज शेतकऱ्यांना आपला कौटुंबिक खर्च भागवण्याच्या दृष्टीने शेतीतून मिळणारे उत्पन्न तुटपुंजे झाले आहे, त्यात पावसाचे प्रमाण हे अनियमित व कमी कालावधीत जास्त पाऊस किंवा दोन पावसात मोठा खंड पडत असल्यामुळे पिक उत्पादन हे निश्चित स्वरूपाचे राहिलेले नाही, त्यामुळे पिकांचे उत्पादकता अतिशय कमी असून त्यात नेहमीच अस्थिरता आढळून येत आहे. आज शेतकऱ्यांना दुष्काळजन्य परिस्थितीचा सामना करण्याची वेळ आली आहे, तसेच मागील वर्षीही दुष्काळग्रस्त परिस्थिती असल्याने शेतकऱ्यांनी खचून न जाता त्यावर मात करणे गरजेचे आहे.

मागील काही वर्षाचा अनुभव लक्षात घेता, बदलती हवामान परिस्थिती, काही वर्षी सरासरीपेक्षा अधिक पाऊस, अतिवृष्टी तर काही वर्षात अवर्षणाची परिस्थिती निर्माण झाल्याने शेती व्यवसायात आपत्कालीन परिस्थिती निर्माण होत आहे, अशा प्रकारे बदलत्या नैसर्गिक घटकांचा शेती व्यवसायावर अनिष्ट परिणाम होत आहे. तापमान वाढ, कमी अधिक पाऊस, हिमवर्षाव, शीतलहरी, दोन पावसातील खंड याचा शेती उत्पादनावर विपरीत परिणाम होत आहे. मान्सून उशिरा सुरू झाल्यामुळे पेरणीच्या वेळी अतिवृष्टी झाल्यास वेळेवर पेरणी करणे शक्य होत नाही. पेरणी झाल्यानंतर पाऊस लांबला तर दुबार पेरणीची वेळ येत आहे, अशा प्रकारे निरनिराळ्या नैसर्गिक आपत्तींना सामोरे जाताना शेतकऱ्यांना त्यांच्या उपजीविकेचे साधन केवळ शेती असल्याने मोठ्या संकटाचा सामना करावा लागत आहे.

**महाराष्ट्रातील शेती क्षेत्रातील समस्या**

महाराष्ट्रातील शेती व्यवसायाची भरभराट न होण्याची अनेक कारणे आहेत त्यापैकी....

**- नैसर्गिक समस्या**

राज्यातील शेती ही निसर्गावर अवलंबून आहे, त्यामुळे राज्यातील शेतीवर हवामान बदलाचा सर्वात मोठा परिणाम होताना दिसून येतो. राज्यातील सध्या बदलत्या तापमानाचा व पर्जन्यमानाचा शेतीवर परिणाम झालेला दिसून येतो, त्यामुळे शेतीची उत्पादन ही कमी जास्त होत आहे. पावसाच्या लहरीपणाचा फटका ही शेतीला बसतो आहे. कमी पावसामुळे कधी धान्य पिकत नाही तर अधिक पाऊस पडून धान्य सडून जात आहे, त्यामुळे नैसर्गिक आपत्तीला शेतकऱ्यांना सतत तोंड द्यावे लागत आहे. पिकांना आवश्यक तेवढे पाणी मिळाले नाही तर पिके वाळून जातात, सिंचनाच्या सोयीच्या अभावी शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होते आहे. कधीकधी जास्त पावसामुळे सुपीक मातीचा थर वाहून जाऊन जमिनीची धूप होते व जमिनी खडकाळ बनल्यामुळे शेतीतील उत्पादन कमी कमी होत जाते.

राज्यात क्षारयुक्त व आम्लयुक्त जमिनीचे प्रमाण अधिक होत चालले आहे. सुपीक जमिनीवर क्षाराचे व आम्लाचे प्रमाण वाढल्यास त्या जमिनीवर पिके चांगल्या प्रकारे येत नाहीत, त्यामुळे अशा ठिकाणी शेती करणे शक्य होत नाही. बदलत्या हवामानाचा सर्वात जास्त फटका शेतीला बसतो आहे, त्यामुळे शेतकरी वर्ग पूर्ण कोलमडून जात आहे. बदलत्या हवामानामुळे पर्जन्याचे प्रमाण कमी जास्त होत आहे, पिकांची लागवड करण्याच्या वेळा बदलत जात आहे, त्याचा परिणाम उत्पादनावर होत आहे. बदलत्या हवामानामुळे पिकावर कीड पडण्याची समस्या ही शेती उद्योगात जास्त मारक ठरत आहे. शेतीतील किड किंवा रोग संपूर्ण पीक

उध्वस्त करत आहे, त्यामुळे पिके कुजून सडून नष्ट होतात त्यामूळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. ऊस, तांदूळ, ज्वारी, तूर, कापूस इत्यादी पिकांवर कीड पडते. गव्हावर तांबेरा हा रोग उद्‌भवतो, तसेच तूर, कापसाला अळी लागते. तांदळाच्या पिकावर टोळधाड येते व संपूर्ण पीक नष्ट करते, त्यामुळे पिकावर येणारे कीड व रोग शेतकऱ्यांचे शत्रू समजले जातात.

**आर्थिक समस्या**

राज्यातील शेतीही जास्त मेहनत करून कमी नफा देणारे आहे. शेतकरी रात्रंदिवस मेहनत करतो पण, त्याचा उदरनिर्वाह, दैनंदिन गरजाही शेतातून भागत नाही. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे दारिद्र्य त्याचा विकासाचे सर्वात मोठा अडथळा आहे. पैसे नसल्यामुळे शेतकरी उत्कृष्ट बी बियाणे घेऊ शकत नाही, त्यामुळे उत्पन्न कमी होते. दरवर्षी पेरणी, बी बियाणे, खते घेण्यासाठी शेतकरी कर्ज काढतो, या कर्जाची परतफेड करण्यासाठी त्याच्या आयुष्य खर्ची पडते, दारिद्र्य ही राज्यातील शेतकऱ्याचे महत्त्वाची समस्या आहे. वर्षानुवर्ष शेती केल्यामुळे जमिनीचा कस कमी झालेला असतो, त्यामुळे उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी शेतीला खत देणे आवश्यक असते, पण पैसे अभावी शेतकरी खताचा वापर कमी करतो, त्यामुळे उत्पादन कमी होते. शेतीतून अधिक उत्पादन मिळवण्यासाठी योग्य बी बियाणे वापरणे आवश्यक असते, परंतु पैसा अभावी शेतकरी गावातील बी बियाणे किंवा सावकाराने दिलेले बी बियाणे वापरतो, त्यामुळे शेतकऱ्याला उत्पादन म्हणावे तसे मिळत नाही.

राज्यातील शेती ही पावसाच्या पाण्यावर केली जाते, पावसाळ्यातील पाणी अडविण्यासाठी सिंचनाची साधने उपलब्ध नसल्यामुळे राज्यातील शेतकरी कोरडवाहू शेती करतो, त्यातून त्याला आर्थिक फायदा अजिबात होत नाही. सिंचनाची साधने वापरणे शेतकऱ्याला परवडत नाही, त्यामुळे

उत्पादन क्षमता कमी होते. राज्यात मोठ्या प्रमाणात बाजारपेठा व वाहतुकीचा साधनाचा अभाव असल्यामुळे शेतकरी वर्गाला नुकसान सोसावे लागते. आर्थिक अडचणीमुळे शेतकऱ्यांना कमी भावात माल विकावा लागतो. शेतकऱ्यांचा माल सामान्य माणसापर्यंत जाण्या अगोदर मध्यस्थ किंमत वाढवितात त्यामुळे व्यापारी वर्ग श्रीमंत होतो पण शेतकरी मात्र गरीबच राहतो. वेळेत बाजारपेठ उपलब्ध न झाल्यास भाजीपाला व फुले सडून शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होत आहे. पिकांवर कीड किंवा रोग पडल्यास औषधे व कीटकनाशके फवारणी करण्यासाठी शेतकऱ्याकडे वेळेवर पैसे उपलब्ध नसल्यामुळे उत्पादनात घट होते.

**शेतीचे तुकडीकरण**

ग्रामीण भागातील शेतकरी एक तर अल्पभूधारक असतात किंवा जमिनीचे वारसा हक्कानुसार तुकडीकरण होते, त्यामुळे त्याचा परिणाम उत्पादनावर होतो. अश्या लहान तुकड्यावर शेती करणे आर्थिक दृष्ट्या परवडणारे नसते, त्यामुळे शेतीच्या लहान तुकड्यात विभाजनामुळे शेतीचे उत्पादन कमी होते. राज्यातील शेतीमध्ये गट शेती सामाईक शेती केल्यास शेतकरी वर्गाची आर्थिक परिस्थिती सुधारेल.

**शेती विषयक संशोधनाची कमतरता**

शेतीमध्ये मोठ्या प्रमाणात यांत्रिक व शास्त्रीय संशोधनाची गरज आहे. शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी सुधारित व संकरित बी-बियाणे, नवीन यंत्राचा शोध लावणे, रासायनिक व सेंद्रिय खताची निर्मिती व शेतकऱ्यांना मार्गदर्शन मिळणे गरजेचे आहे. शेतीविषयक संशोधनाला अधिक वाव मिळाला तर उत्पादन वाढण्यास त्याची मदत होईल, तसेच शेतकरी वर्गाला शेती विषयक प्रशिक्षण दिल्यास नक्कीच त्याचा फायदा शेतकरी वर्गाला होईल.

**पारंपरिक शेती पद्धती**

राज्यातील शेती पारंपरिक पद्धतीने व वडीलोपार्जित पद्धतीने केली जाते. शेतातील नांगरणी, पेरणी, काढणी पारंपारिक पद्धतीने केली जाते, त्यामुळे उत्पादनात घट होते. परंपरागत पद्धतीने शेती केल्यामुळे त्याचा उत्पन्नावर परिणाम होतो. नवीन ज्ञानाचा शेती करताना वापर केल्यास निश्चितच उत्पादनात वाढ होईल व शेतकरी वर्गाची आर्थिक स्थिती सुधारेल.

**शेती उदरनिर्वाहाचे साधन**

राज्यातील शेतकरी वर्ग शेती ही केवळ उदरनिर्वाचे साधन आहे या दृष्टीने शेतीकडे पाहतो, त्यातून आपला उदरनिर्वाह भागविणे ही त्यांची प्रमुख गरज असते, यापुढे जाऊन शेतीला व्यवसायिक स्वरूप प्राप्त करून दिल्यास शेतकरी वर्गाची आर्थिक स्थिती सुधारेल, त्यासाठी शेतीसोबतच जोड व्यवसाय करणे आवश्यक आहे, त्यातून त्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत होईल. शेती सोबतच इतर व्यवसाय किंवा जोड व्यवसाय केल्यास नक्कीच शेतकऱ्याला त्याचा फायदा होईल.

**आधुनिक सिंचन पद्धतीचा अभाव**

राज्यातील शेतकरी पारंपरिक पद्धतीने पिकांना पाणी देतो, त्यामुळे पाण्याचा अपव्य तर होतोच पण जमिनी क्षारयुक्त बनतात, त्यामुळे उत्पादन कमी होते. जर ठिबक सिंचन, तुषार सिंचनाचा वापर शेतीतील पिकांसाठी केल्यास पाण्यात बचत होऊन उत्पादनही वाढेल.

एकंदरीत, शेती केवळ निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबून न राहतात त्याचे व्यावसायिक महत्त्व पटवून दिले तर उत्पादन खर्च वगळता शेतकऱ्यांना नफा झाल्यास शेती हा तोट्याचा व्यवसाय ठरणार नाही.

**राज्यातील शेतीसमोरील आव्हाने**

महाराष्ट्रातील शेतीवर अवलंबून असलेल्या जनतेला आजही अनेक आव्हाने पेलावी लागतात. आजही शेतीकडे बेभरवशाचा व्यवसाय म्हणूनच

बघितले जाते. अनेक पिकांचे सरासरी हेक्टरी उत्पादन इतर राज्याच्या तुलनेत बरेच कमी आहे. आजही बहुसंख्य शेतकरी कुटुंबांना पुरेशी वार्षिक उत्पन्न मिळेल याची खात्री नाही आणि अनेक आव्हाने त्यांच्यासमोर उभे आहेत, तसेच पिकांचे एकूण उत्पादन जरी वाढत असले तरीही इतर अनेक देशाचा तुलनेत आपली अनेक पिकांची उत्पादकता कमी आहे, या पार्श्वभूमीवर अर्थव्यवस्थेची विविध वैशिष्ट्ये, शेतीसाठी अवलंबलेली धोरणे आणि अस्तित्वात असलेली शेती विषयक कायदे यामुळे शेती समोर कशा प्रकारे आव्हाने उभी राहिली आहेत हे पाहणे प्रस्तुत ठरते.

महाराष्ट्रातील शेतीमधील पहिले आव्हान म्हणजे शेतीमध्ये आमुलाग्र बदल घडवायचा असेल तर सर्वप्रथम अल्पभूधारक शेतकऱ्यांची स्थिती सुधारली पाहिजे. ग्रामीण भागात तंत्रज्ञानाचा अभाव, भांडवलाची कमतरता, लहरी हवामान, बेभरवशाचा मान्सून, बाजारपेठेचा अभाव, शेतीला योग्य बाजारभाव न मिळणे व इतर काही समस्या यामुळे याकडे तातडीने लक्ष देण्याची गरज आहे. याबरोबरच शेतकऱ्यांना उत्कृष्ट प्रतीचे बियाणांची उपलब्धता करून देणे, हवामानातील बदलाचे अद्यावत माहिती देणे, शेतीतील यांत्रिकरण वाढविणे व शेती विषयक सरकारी धोरणांचा फायदा शेतकऱ्यांना मिळवून देणे हेही महत्त्वाचे आहे. शेती समोरील महत्त्वाच्या आव्हाना संदर्भात पुढील विविध बाबींचा आढावा घेतला जात आहे. शेत जमिनीचे वाढते विभाजन व तुकडीकरण ही फार मोठी समस्या निर्माण झाली आहे. अत्याधिक जल उपसा होत असल्यामुळे क्षारपड जमिनीचे प्रमाण वाढत चालले आहे, बाजारपेठेत मध्यस्थाची भूमिका मजबूत असल्याने शेतकरी वर्ग व ग्राहक कायम लाभापासून वंचित राहून खरा लाभ मध्यस्थ घेत आहे. एकाच वेळी एका भागात कोरडा दुष्काळ दुसऱ्या भागात ओला दुष्काळ दिसून येत आहे, तसेच शासनाने शेतीविषयक धोरण सामान्य शेतकऱ्यांपर्यंत पोहोचू न

शकल्याने आजही शेतकरी परंपरागत तंत्र आणि पारंपरिक पद्धतीने शेती करतात. ग्रामीण भागात पायाभूत सुविधांचा अभाव असल्यामुळे शेतकऱ्यांची मानसिकता विकास न करण्याची बळावते. शेतीला भांडवलाची नेहमीच टंचाई भासते. कर्ज घेऊन शेती केल्यामुळे महाराष्ट्राचे शेतकरी कर्जातच जगतो व  कर्जातच मरतो आहे, हे कडू सत्य आजही बघायला मिळते.

**निष्कर्ष व शिफारशी**

एकंदरीत, शेतकऱ्यांसमोरील ज्या काही समस्या आहेत, त्या सर्व समस्या तसेच त्यांचे निराकरण एकमेकांशी जोडलेले आहेत, गरज आहे ती परिवर्तन व जागृतीची, असे केल्यास निश्चितच राज्यातील शेतकरी आर्थिक दृष्ट्या सक्षम बनेल.

महाराष्ट्रात पाण्याची तीव्र टंचाई आहे, राज्यातील जवळपास 46 टक्के भाग दुष्काळग्रस्त आहे, त्यामुळे शेतीला पर्याय म्हणून दुधाच्या व्यवसायाचा विस्तार करणे योग्य ठरेल, तसेच इतर अनेक जोड व्यवसाय केल्यास शेतीतून मिळणारे उत्पन्न वाढेल. महाराष्ट्रात सिंचनाची वाणवा असल्यामुळे भाजीपाला आणि फळ फळावर अशी  उद्यानवर्गीय पिके घेणे शेतकऱ्यांसाठी दुरापास्त ठरत आहे, असे जरी असले तरी आज घेतल्या जाणाऱ्या पिकाच्या संदर्भातही सुधारणा करण्यात वाव आहे, उदा. डाळिंब या संदर्भात दर्जेदार संशोधन सिन्जेन्टा या बहुराष्ट्रीय कंपनीने केले आहे, तेव्हा त्या कंपनीने निर्माण केलेल्या रोपाची शेतकऱ्यांनी शेतात लागवड करावी,असा संदेश पोहोचवण्याचे काम राज्यातील कृषी विस्तार विभागाने हाती घ्यावे.तसेच महागड्या भाज्या टिकवण्यासाठी शेडनेट, पॉलिहाऊस या चा वापर करण्यासाठी व शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन कृषी विस्तारकाने करावे.

शेतकऱ्यांनी बदलत्या हवामानानुसार पीक पद्धतीत बदल करावा, एकाच वेळी एक पीक न लावता बहुपीक पद्धतीचा अवलंब करावा. सरकारने शेताजवळच प्रक्रिया उद्योग स्थापन करावे, तसेच स्वस्त जमीन, पाणी, वीज कर सवलती देऊन प्रोत्साहन दिले पाहिजे, त्यामुळे ग्रामीण रोजगार वाढवून तेथील उत्पन्न वाढेल, तसेच त्यामुळे शहरातील कारखान्याची गर्दी देखील कमी होईल. तसेच सरकारने शेळ्या व मेंढ्या पालन, कुकूटपालन, रेशीम उद्योग, मधुमक्षिका पालन असे विविध व्यवसाय ग्रामीण भागात संघटित करता येतील, अशा रीतीने रिकाम्या हातांना उत्पादक रोजगार मिळवून देण्यासाठी शासनाने प्रयत्न करायला हवा.

शेतकऱ्यांनी वैयक्तिक लहान आकाराची शेती करण्याऐवजी गट शेतीला प्रोत्साहन देऊन उत्पादन वाढवून संघटित विक्री प्रक्रियेतून लहान शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविता येईल. एकंदरीत, सहकारी तत्त्वावर शेती केल्यास किंवा गट शेती केल्यास उत्पादनात वाढ होऊन शेतकऱ्याचे आर्थिक स्थिती सुधारेल, यासाठी गरज आहे ते ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना याबाबत जागृत करण्याची.

शेतीतील यांत्रिकीकरणामुळे शेतीतील उत्पन्न वाढेल, जेणेकरून शेतीवर आधारित उद्योगधंदे याचाही विकास होईल, शेतीवर आधारित उद्योगधंदे मध्ये ग्रामीण तरुणांना रोजगारही भेटेल व यामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचा आर्थिक विकास होईल. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना आर्थिक दृष्ट्या बरे दिवस दिसावेत असे राज्यकर्त्यांना वाटत असेल तर, पाणी, वीज आणि खते या तीन सुविधा शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यासाठी विविध पातळीवर प्रयत्न करण्याची नितांत गरज आहे. महाराष्ट्रातील शेती विकासासाठी अधिकाधिक सिंचनाची सुविधा उपलब्ध करून द्यावी जेणेकरून शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारेल.

थोडक्यात, महाराष्ट्रातील शेतीमध्ये अमुलाग्र बदल घडवायचा असेल तर सर्वप्रथम, अल्पभूधारक शेतकऱ्यांची स्थिती सुधारली पाहिजे. ग्रामीण भागात तंत्रज्ञानाचा अभाव, भांडवलाची कमतरता, लहरी हवामान बेभरवशाचा मान्सून, सुसज्ज बाजारपेठेचा अभाव, शेतीला योग्य बाजारभाव न मिळणे व इतर काही समस्या कडे तातडीने लक्ष देण्याची गरज आहे, याबरोबरच शेतकऱ्यांना उत्कृष्ट प्रतीचे बी- बियाणांची उपलब्धता करून देणे, हवामानातील बदलाची अद्यावत माहिती मिळणे, शेतातील यांत्रिकीकरण वाढविणे व शेती विषयक सरकारी धोरणांचा फायदा शेतकऱ्यांना मिळवून देणे, हेही तेवढेच महत्त्वाचे आहे.

**संदर्भ ग्रंथ**


1. कृषी भूगोल - डॉ. विठ्ठल घारपुरे, 2013, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर
2. कृषी सेवक परीक्षा - प्रा. हरिहर गायके, प्रा. विजय मोरे - विद्याभारती प्रकाशन, लातूर
3. कृषी दैनंदिनी - विद्यापीठ प्रकाशन
4. शेतकरी- मासिक, कृषी विभाग - महाराष्ट्र शासन
5. औद्योगिक पर्यावरण- राजीव कुमार, 2009- अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नवी दिल्ली
6. कृषी अर्थशास्त्र, 2006, कवी मंडन विजय- श्री मंगेश प्रकाशन, प्रथम आवृत्ती, नागपूर
7. रमेश पाध्ये - मॅक्स किसान, लेख 23 फेब्रुवारी 2024
8. ई सकाळ, ॲग्रो, लेखक अमित घरत 7 जानेवारी 2017
9. भारतातील शेती - कुमार एल. एस. एस., नागपूर, 1966
10. सुलभ शेती - कुलकर्णी दिगंबर, शास्त्र आणि व्यवसाय, पुणे, 1959


***

# "पुणे जिल्ह्यांचे औद्योगिक आणि कृषी विषमता: 2010-11 ते 2019-20"

**निखिल तांबे[१], रचना कोळपे[२], नितेश राठोड[३]**

१ Assistant Professor, Anantrao Thopte college bhor,Pune,

२ Research Scholar, Anantrao Thopte college bhor,Pune.

३ Research Scholar, MES Abasaheb Garware college, Pune.

**गोषवारा:**

भारताची प्रादेशिक विविधता वितरणात असमानतेच्या निर्माणास लेणारी असते, ज्याने सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी चुनौती देतात. महाराष्ट्र हे संसाधन वितरण आणि विकासात या असंतुलनाचे प्रतिबिंब करते, ज्यामुळे विशेष तत्परता आवश्यक आहे. या संशोधनातील ध्येय कृषी आणि औद्योगिक विषयांचे पुणे येथे अभ्यास करणे, असंतुलनाच्या कारणांची विश्लेषण करणे, आणि जिल्ह्यांतर्गतील असमानता कमी करण्यासाठी उपाय सुचवणे आहे.

भारत हा एक अत्यंत विशाल अटल राष्ट्र असून, आर्थिक, सामाजिक गतिविधींच्या, कृषी व्यवस्थेच्या, खनिज संसाधनांच्या, व मानव व पशुपालनांच्या जातींच्या संदर्भातील प्रमुख क्षेत्रिय विविधतेमुळे विशेष विभागिता प्रदर्शित करतो. भारताचे प्राकृतिक दृष्ट्या शिखर, , पठार व समुद्रकिनारी क्षेत्रांमध्ये विविध संसाधन वितरण असून, प्रत्येकाला सामाजिक आणि आर्थिक विकासातील असमानता दिसते. महाराष्ट्र, भारतातील महत्त्वाचे राज्य असून, विविध आणि असमत वितरण आणि विकासाच्या मालकीच्या अंगीचा अद्याप असतो. महाराष्ट्रातील प्रत्येक विभागांमध्ये विशेष वितरणांची असमानता योजनेच्या अभ्यासासाठी मागण्यात येते.

**मुख्य शब्द :** असमानता, कृषी, औद्योगिक, असंतुलन, विकास

**प्रस्तावना:**

भारत हे एक खंडप्राय राष्ट्र आहे. साहजिकच त्यामुळे भारतातील कोणत्याही दिन प्रदेशात, आर्थिक – सामाजिक वैविध्य, हवामान, पिके, खनिजे, मानवी संसाधने, पशुधन याबाबत असमान वितरण दिसून येते. या असमान वितरणाचा सदरील प्रदेशावर तसेच मानवी, सामाजिक, आर्थिक विकासावर चांगले-वाईट परिणाम दिसून येतात. भारताच्या प्राकृतिक दृष्ट्या पर्वत, मैदानी, पठारी व किनारी प्रदेश असे वैविध्य दिसून येते. या प्रत्येक ठिकाणच्या संशाधन वितरण व सामाजिक, आर्थिक विकासामध्ये असमानता दिसून येते. भारतातील पठारी प्रदेशात महाराष्ट्र हे एक आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक दृष्ट्या महत्त्वपूर्ण राज्य आहे. भारतातील उपखंडात असणारी विषमता व असमतोल या समस्येने महाराष्ट्राला सुद्धा ग्रासलेले आहे. महाराष्ट्रात कोकण, खानदेश, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा यांसारखे प्राकृतिक विभाग आहेत.

विदर्भ नैसर्गिक संसाधने व खनिज संपत्तीच्या दृष्टीने समृद्ध प्रदेश आहे. मुबलक पाऊस आणि विपुल साधन संपत्ती असूनही विदर्भ हा विकासात्मक दृष्टीने एक मागास प्रदेश आहे.

कोकण प्रदेशातील काही भगत (रत्नागिरी, सिंधूदुर्ग) खनिजे सापडतात. मुबलक पाऊस व फळबागा असूनही या प्रदेशाची दुर्गम भागांमुळे पायाभूत विकासाला अडचणी निर्माण होतात. पर्यायाने मुंबई व रायगडचा काही भाग सोडता या ठिकाणी औद्योगिक विकास झाला नाही. त्यामुळे कोकण देखील मागास किंवा अप्रगत प्रदेश आहे.

खानदेशातही काही कसदार जमिनीमुळे कापूस, केळी, ऊस, फळबागा यांसारख्या पिकांचे उत्पादन चांगले होत असले तरी उद्योगांचा विकास पुरेशा प्रमाणात झाला नाही.

मराठवाडा विभागातही काही कसदार जमिनी असून देखील जलसिंचनाच्या अपुऱ्या सुविधांमुळे मोठ्या प्रमाणावर कृषीविषयक मागासलेपणा दिसून येतो. उद्योगक्षेत्राचा देखील फारसा विकास झालेला दिसून येत नाही.

पश्चिम महाराष्ट्र मात्र उद्योग व कृषी दृष्ट्या विकसित असल्याचे दिसून येते परंतु पश्चिम महाराष्ट्राला सुद्धा विकासात्मक असमतोलाचा सामना करावा लाग्रो. पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर हे जिल्हे आहेत. यातील पुणे जिल्हा इतर जिल्ह्याच्या तुलनेत विकासात्मक दृष्टीने प्रगत असल्याचे दिसते.

**क्षेत्रनिहाय विभागणी: शेती क्षेत्र**

सदरील तक्त्यामध्ये पुणे जिल्ह्यातील शेती क्षेत्रातील तालुकानिहाय विविध पिकांखालील क्षेत्र दर्शविले आहेत. (संदर्भ वर्ष : २०१९-२०)

| अनु, क्रं | तालुके | ओलिताचे क्षेत्र (हेक्टर) | विविध पिकांखालील क्षेत्र | | | | जिल्हा आणि प्राथमिक पवन संस्था | दुग्ध संकलन (००० लिटर) | विजेचा वापर (००० वॅट तास) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | खाद्य | गळीत (तेल बिया) | फळे व भाजी | ऊस (हेक्टर) | | | |
| १ | बारामती | ५१३६५ | ५२६५२ | ५६४ | १५२६२ | १३१८३ | २१ | १२७४०४ | २४९५४० |
| २ | इंदापूर | ५४८८३ | ३९०६३ | ५७ | १९६५१ | ३१६७३ | १७ | १४२५६९ | १२०२३० |
| ३ | शिरूर | २३७३३ | ८८६७७ | ६० | २३९७८ | २१८२८ | ७ | १०३५९१ | ११३१४० |
| ४ | पुरंधर | १४५७ | ५७ | २३७५ | २०२४ | ३११३ | १८ | २२२६९ | २८० |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ७ | ८०२ | | ८ | | | | २० |
| ५ | हवेली | २५३७० | १५१५८ | ४८६ | ११४६६ | ७०६९ | ६ | २०९८५ | ६२९७० |
| ६ | दौंड | ४११५० | २०७६४ | ५१ | १३०३३ | १५३२० | ११ | ६५०४६ | १८६६५० |
| ७ | जुन्नर | ४०४१८ | ५७०४९ | १०६४७ | १४२३६ | १३४३० | १७ | ७१०९३ | २३०५०० |
| ८ | खेड | २६७५४ | ६५६०९ | ९४७८ | ३४२९८ | ४१०२ | २ | ३९१९१ | १३७७०० |
| ९ | आंबेगाव | १७८६७ | ४६७६३ | ३९१२ | २१२१४ | ३०१४ | १ | ८१२०३ | १३४६०० |
| १० | मावळ | ३७४६ | १५४४० | ३३१ | १०१५ | २१८८ | १ | ८०६५ | ८६६५० |
| ११ | मुळशी | ३१२३ | १०३१० | ५६६ | ५४४ | १२०४ | ० | ३२०९ | ६२९७० |
| १२ | भोर | ६९७३ | ३०८०२ | ४०९० | २६१५ | ८१० | ० | १४९२५ | ८१७० |
| १३ | वेल्हा | १९९७ | ६७४८ | ५७ | ५४४ | २९६ | ० | ४५४६ | ३९६० |

(स्रोत : जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, पुणे)

सदरील तक्त्यामध्ये पुणे जिल्ह्यातील शेती क्षेत्रातील तालुकानिहाय विविध पिकांखालील क्षेत्र दर्शविले आहेत. वरील तक्ता असे दर्शवतो की पुणे जिल्ह्यातील बारामती, इंदापूर, दौंड, जुन्नर या

तालुक्यातील ओलीताखालील क्षेत्र व विविध पिकांखालील क्षेत्र इतर तालुक्यांच्या तुलनेने अधिक आहे. तालुकानिहाय दुग्ध संकलनाचा विचार केला तर बारामती, पुरंधर, जुन्नर, इंदापूर हे तालुके तुलनेने प्रगत असल्याचे दिसून येते. विजेच्या एकूण वापराबाबत विचार केला असता बारामती, जुन्नर, दौंड, इंदापूर, खेड, आंबेगाव हे तालुके तुलनेने अधिक वापर करत असल्याचे दिसून येते. याचबरोबर तालुकानिहाय जिल्हा आणि प्राथमिक पणन संस्थेचा विचार केला असता बारामती, इंदापूर, पुरंधर, जुन्नर हे तालुके प्रगत तर शिरूर, हवेली, दौंड हे तालुके मध्यम तर भोर, वेल्हा, मावळ, मुळशी, आंबेगाव, खेड, पुणे शहर हे तालुके तुलनेने मागास आणि अप्रगत आहेत.

**एकूण कृषी उत्पादकता :**

सदरील तक्त्यामध्ये तालुक्यातील एकूण कृषी उत्पादकता दर्शवली आहे.

(संदर्भ वर्ष : २०१९-२०)

| अनु.क्रं | तालुके | एकूण कृषी उत्पादकता (रब्बी) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ऊस (टन) | ज्वारी | गहू | हरभरा | मका |
| १ | बारामती | ९४.१२ | ४८९ | २०३३ | १०९५ | ५०७७ |
| २ | इंदापूर | १२१.२१ | ८०० | २४६३ | १२४५ | ४६४७ |
| ३ | शिरूर | १००.६२ | ४७४ | २३०४ | ९१३ | ५१५९ |
| ४ | पुरंधर | १०२.३५ | ६६३ | २२५१ | १८७७ | १३६२ |
| ५ | हवेली | ८०.६६ | १२७५ | २२१२ | ७७७ | ०० |
| ६ | दौंड | ८८.७६ | ७१४ | २१२९ | १२३७ | ०० |
| ७ | जुन्नर | १११.२० | ४५३ | ३०७८ | १२८० | ४१९१ |
| ८ | खेड | ९९.६३ | ६७५ | २३०५ | ८६९ | ४७७५ |
| ९ | आंबेगाव | १३१.०५ | २५५ | १८२५ | ६९१ | १८८३ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १० | मावळ | ८७.३७ | ८०८ | २०२६ | ५०२ | ०० |
| ११ | मुळशी | ९८.५५ | ८६७ | १५६८ | ६३८ | ३५८१ |
| १२ | भोर | ९६ | १११८ | १९८६ | ८१७ | ०० |
| १३ | वेल्हा | ९५ | ८३२ | १५४४ | ५८२ | ०० |

(स्त्रोत: जिल्हा व सामाजिक समालोचन, पुणे)

सदरील तक्त्यामध्ये पुणे जिल्ह्यातील तालुकानिहाय एकूण कृषी उत्पादकता दर्शवली आहे. तालुकानिहाय एकूण कृषी उत्पादकता तपासण्यासाठी रब्बी पिकांचा (ऊस, ज्वारी, गहू, हरभरा, मका. इ) विचार केला आहे. एकूण ऊस उत्पादकतेचा विचार केला असता इंदापूर, शिरूर, पुरंधर, आंबेगाव, जुन्नर हे तालुके अधिक प्रगत आहेत तर पुणे शहर, भोर, वेल्हा, मावळ, दौंड हवेली, बारामती है तालुके तुलनेने अप्रगत असल्याचे दिसून येतात. याचबरोबर ज्वारी उत्पादकतेमध्ये भोर, हवेली, मुळशी, वेल्हा, मावळ, इंदापूर हे तालुके प्रगत आहेत तर पुणे शहर, आंबेगाव, शिरूर, बारामती, जुन्नर, हे तालुके तुलनेने मागास आहेत. गहू उत्पादनामध्ये जुन्नर, इंदापूर, शिरूर, खेड हे तालुके आघाडीवर आहेत तर पुणे शहर, भोर, वेल्हा, मुळशी हे तालुके तुलनेने पिछाडीवर असल्याचे दिसते. हरभरा आणि मका या पिकांचा एकत्रित विचार केला असता पुरंधर, इंदापूर, बारामती हे तालुके प्रगत तर पुणे शहर, मावळ, भोर, वेल्हा हे तालुके तुलनेने अप्रगत व मागास असल्याचे दिसून येते.

**उद्योग / औद्योगिक क्षेत्र:**

सदरील तक्त्यामध्ये पुणे जिल्ह्यातील तालुकानिहाय क्षेत्र दर्शविले आहे. (संदर्भ वर्ष : २०१९-२०)

| **अनु. क्रं** | **तालुके** | **MIDC** | **MSME** | **कारखाने** | **औद्योगिक गुंतवणूक (मोठे उद्योग)** | **रोजगारीत संख्या (लाखांत)** | **विजेचा वापर** |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | **(कोटीने)** | | |
| १ | बाराम ती | २ | ६४२७ | ६४३ | १२१४३ | २८९४ | ३५९५४० |
| २ | इंदापूर | २ | ४१३६ | २२५ | २०४८ | ५७१७ | ११२०३० |
| ३ | शिरूर | १ | ७२७७ | १११५ | १९२५ | ४५४९८ | १११८१४ ० |
| ४ | पुरंधर | २ | २६७७ | २९५ | ४९३ | २७५१ | २२१३८० |
| ५ | हवेली | ५ | १४९९५ २ | १९३३ | ११८९७ | १६२३८८ | ३४१२० |
| ६ | दौंड | २ | ४३३३ | ५५१ | ६२७ | ५२४३ | ३०६५५५ ० |
| ७ | जुन्नर | ० | ३४६६ | १७० | ११५ | २४४८ | ८६१० |
| ८ | खेड | ४ (फेज) | १३४५५ | १६५८ | १५५५७ | ६२३१७ | १३१८६० |
| ९ | आंबेगा व | ० | २१७४ | ११९ | ३५३ | १९३९ | ६७५० |
| १० | मावळ | ३ (फेज) | ६०४६ | ४८१ | ४५२० | १३९३१ | २५६९० |
| ११ | मुळशी | ३ (फेज) | ७१३७ | ६४८ | १५५९ | ५२४२८ | २८९८० |
| १२ | भोर | ० | २४८० | २३७ | १२५ | ४६५ | १२६८० |
| १३ | वेल्हा | ० | ८७ | २१ | ९८ | २७५ | ५६४० |

(स्रोत : जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, पुणे)

पुणे जिल्ह्याचा सखोल अभ्यास केल्यास पुण्यातील बारामती, शिरूर, खेद यांसारखे तालुके उद्योग व कृषी दृष्टीने तुलनेत प्रगत असल्याचे दिसते तर भोर वेल्हा हे तालुके उद्योग व कृषीदृष्टीने मागास व अप्रगत असल्याचे दिसते. याचबरोबर मावळ, मुळशी, हवेली यांसारखे तालुके औद्योगिक दृष्ट्या प्रगत तर कृषी दृष्ट्या सुमार कामगिरी करणारे

आहेत, तर दुसरीकडे जुन्नर, इंदापूर यांसारखे तालुके कृषी दृष्ट्या प्रगत तर उद्योगांबाबत मागास किंवा अप्रगत आहेत.

पुणे जिल्ह्यात दिसणाऱ्या कृषी व उद्योगाचा अभ्यासाचा निष्कर्ष पठारी प्रदेशातील जिल्ह्यांना लागू होऊ शकतो. त्यामुळे सदरील संशोधन करणे आवश्यक आहे.

**संदर्भ साहित्य:**

**१)डॉ. एस. विजय कुमारः भारतातील प्रादेशिक असमतोल:विहंगावलोकन:**

प्रादेशिक असमतोल हे सर्वसमावेशक ध्येयासाठी धोका आहे वाढ आणि गरिबी कमी   करणे. वाढत्या प्रादेशिक विषमतेमुळे पुढील आर्थिक गती कमी झाली आहे सुधारणा, आणि त्यामुळे भारताच्या भविष्यात अडथळा निर्माण होऊ शकतो आर्थिक वाढ. प्रादेशिक विषमता प्रादेशिक परिणाम होईल तणाव, ज्यामुळे लोकप्रिय आंदोलने होऊ शकतात आणि काही वेळा अतिरेकी कारवायाही होतात. मध्ये प्रादेशिक असमानता आर्थिक आणि सामाजिक विकास जे काहींमध्ये अस्तित्वात आहेत. काही मागासलेल्या प्रदेशांच्या दुर्लक्षामुळे राज्यांचे सारख्या वेगळ्या राज्यांची मागणी निर्माण केली आणि निर्माण केली वेगळ्या तेलंगणासाठी भूतकाळ आणि आता आणि नंतर विदर्भ आणि बोडो भूमीसाठी. तसे, एक जोरदार गरज आहे मागासलेल्यांमध्ये सुशासन बळकट करण्यासाठी क्षेत्रे या दिशेने स्थानिक स्वराज्य संस्थांची गरज आहे मागासलेल्या भागात सक्षम आणि बळकट केले जातात देशातील प्रादेशिक असमतोल कमी करणे.

**२)मोहम्मद निजामुद्दीन: भारतातील विकासाच्या स्तरावरील प्रादेशिक विषमतेवर एक प्रायोगिक अभ्यास: राज्यनिहाय विश्लेषण:**

या शोधनिबंधात, व्रोक्लॉ टॅक्सोनॉमिक पद्धती (इवुसी, १९७६; एरिफ, १९८२; नरेन इ. २००३, २००९, २०१२; आणि ओहलान) लागू करणाऱ्या भारतीय राज्यांमधील प्रादेशिक असमतोल मोजण्यासाठी

विकासाच्या पातळीचे विश्लेषण केले गेले आहे. बावीस सामाजिक-आर्थिक आणि पर्यावरणीय शाश्वतता निर्देशकांच्या इष्टतम संयोजनावर आधारित संयुक्त निर्देशांकाच्या मदतीने विकासाची पातळी प्राप्त झाली. या निर्देशकांच्या संदर्भात वर्ष 2011-12 साठी राज्यनिहाय डेटा भारतातील 10 वेगवेगळ्या राज्यांसाठी वापरला गेला. प्रादेशिक विषमतेचे स्पष्ट चित्र मिळविण्यासाठी आर्थिक विकास, लोकसंख्याशास्त्रीय संक्रमण, शैक्षणिक विकास, आरोग्य विकास, पर्यावरणीय शाश्वतता आणि सर्वांगीण विकासासाठी विकासाच्या पातळीचा स्वतंत्रपणे अंदाज लावला गेला. महाराष्ट्र राज्य सर्वांगीण विकासात प्रथम क्रमांकावर आहे तर बिहार राज्य विकासाच्या प्रत्येक क्षेत्रात अत्यंत वंचित असल्याचे दिसून आले. समान प्रादेशिक विकास साधण्यासाठी आणि जीवनाचा दर्जा सुधारण्यासाठी पर्यावरणीय शाश्वततेसह विविध सामाजिक-आर्थिक सुविधांसाठी संभाव्य लक्ष्यांचा अंदाज लावला गेला आहे. प्रायोगिक परिणाम दर्शवितात की विविध राज्यांमध्ये विकासाच्या पातळीवर व्यापक असमानता आहे. पर्यावरणीय शाश्वततेसह सामाजिक-आर्थिक विकासाची पातळी सांख्यिकीयदृष्ट्या महत्त्वपूर्ण आणि सर्वांगीण विकासाशी सकारात्मकपणे संबंधित असल्याचे दिसून येते जे दर्शविते की सर्व क्षेत्रांची वाढ आणि प्रगती देशाच्या अर्थव्यवस्थेत हाताशी आहे. परिणाम हे देखील दर्शवतात की राज्यांची लोकसंख्याशास्त्रीय प्रोफाइल ही अडचण आहे आणि सर्वांगीण विकासावर लक्षणीय परिणाम करत नाही. हा अभ्यास सुचवतो की कमी विकसित राज्यांना त्यांच्या सर्वांगीण विकासाची पातळी वाढवण्यासाठी बहुतेक विकास निर्देशक सुधारण्यासाठी सरकारचे त्वरित लक्ष देणे आवश्यक आहे.

**३) अंकित सीकरवार: भारतातील विकास आणि प्रादेशिक विषमता या विषयावरील साहित्याचे समीक्षण:**

आंतर-प्रादेशिक आर्थिक आणि सामाजिक विकासामध्ये असमानता समाजातील विविध घटकांमधील असमानता हे अंगीकारण्याचे प्रमुख फलक आहेत स्वातंत्र्यापासून भारतातील नियोजन प्रक्रिया. मागासवर्गीयांमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करण्याव्यतिरिक्त प्रदेश, अशा प्रदेशांमध्ये खाजगी गुंतवणुकीला प्रोत्साहन देणारी विविध सार्वजनिक धोरणे नियोजित विकासाच्या पहिल्या तीन दशकांमध्ये पाठपुरावा केला गेला आहे. प्रयत्न करत असताना प्रादेशिक असमानता कमी करणे कमी नव्हते, उपलब्धी सहसा अनुरूप नव्हती हे प्रयत्न. सत्तरच्या दशकाच्या शेवटी प्रादेशिक विषमतेची लक्षणीय पातळी राहिली. ऐंशीच्या दशकाच्या सुरुवातीपासूनच्या वेगवान आर्थिक विकासामुळे प्रादेशिक वाढ झाल्याचे दिसते असमानता स्थिरीकरण आणि नियंत्रणमुक्तीसह 1991 पासून चालू असलेल्या आर्थिक सुधारणा धोरणे त्यांच्या मध्यवर्ती तुकड्यांमुळे प्रादेशिक विषमता अधिक रुंदावलेली दिसते. उदयोन्मुख तीव्र प्रादेशिक असमतोलाच्या गांभीर्याकडे अद्याप लोकांचे लक्ष लागलेले नाही

**४) फ्रँक कॉर्व्हर्स आणि केन मेह्यूः प्रादेशिक असमानता: कारणे आणि उपचार:**

प्रत्येक पश्चिम युरोपीय देशात आणि उत्तर अमेरिकेत उत्पन्न आणि संपत्तीची महत्त्वपूर्ण प्रादेशिक असमानता अस्तित्वात आहे, परंतु त्यांची व्याप्ती देशानुसार बदलते. युरोप आणि अमेरिका या दोन्ही देशांमध्ये, साधारणपणे असे मानले जाते की ते 1900 च्या दशकाच्या सुरुवातीपासून ते 1980 पर्यंत संकुचित होते, तेव्हापासून ते रुंद झाले. हे रुंदीकरण लोकसंख्येच्या उदयाशी निगडीत झाले आहे, तर कोविड-19

संकटाने प्रादेशिक गैरसोयींना तीव्र दिलासा दिला आहे. हा लेख मापन समस्यांवर चर्चा करतो, कालांतराने घडामोडींचा मागोवा घेतो आणि प्रादेशिक असमानतेचे सामाजिक आणि आर्थिक परिणाम शोधतो. हे प्रादेशिक धोरणाच्या उत्क्रांतीचे वर्णन करते, आणि विशेषतः युरोपमधील अधिक स्थानिकीकृत दृष्टिकोनांकडे जाणे, त्यांची ताकद आणि कमकुवतपणाचे विश्लेषण

**५)पॉल कॅशीन, निकोला स्पटफोरा, मिसेस व्हॅलेरिया सेरा: प्रादेशिक असमानता, वाढ आणि सर्वसमावेशकता:**

उत्पन्न, शिक्षण किंवा आरोग्य परिणामांमध्ये परावर्तित केल्याप्रमाणे, अनेक देश आर्थिक कामगिरी आणि राहणीमानात महत्त्वपूर्ण प्रादेशिक असमानता दर्शवतात. या प्रादेशिक असमानता इक्विटी चिंता वाढवतात: ते संपूर्ण देशांतर्गत असमानतेमध्ये योगदान देतात आणि ते संधीच्या असमानतेशी जोडलेले आहेत, जसे की, आंतरजनीय गतिशीलता द्वारे मोजले जाते. 2 प्रादेशिक असमानता देखील मर्यादित संधी म्हणून, आर्थिक कार्यक्षमतेवर हानिकारक परिणाम करू शकतात. चुकीच्या जागी अडकलेल्यांमुळे संभाव्यतेचा कमी वापर होतो आणि एकूणच वाढीस अडथळा येतो.3 अधिक व्यापकपणे, शहरी-ग्रामीण फरकांसह प्रादेशिक असमानता, सामाजिक तणाव आणि पॅथॉलॉजीज (केस आणि डीटन 2020) वाढवू शकतात, राजकीय ध्रुवीकरणाला प्रोत्साहन देऊ शकतात (विल्किन्सन 2019) , शहरी उच्चभ्रू लोकांबद्दल लोकवाद आणि संताप वाढवणे (रॉड्रिग्ज-पोज 2018, केसलर 2018, मुरो आणि लिऊ 2016, शिअरर 2016), देशांच्या सामाजिक बांधणीला आणि राष्ट्रीय एकसंधतेला धोका निर्माण करतात आणि अत्यंत प्रकरणांमध्ये संघर्षाला कारणीभूत

ठरते, विशेषत: जेथे अस्तित्वात असलेल्या विषमता अधिक मजबूत होतात.

**संशोधनासाठी पुणे जिल्हा निवडीचे कारण:**

महाराष्ट्राचा प्रशासकीय विभाग निहाय जी.डी.पी:

(संदर्भ वर्ष : २०१९-२०)

| अनु. क्रं | प्रशासकीय विभाग | जी.डी.पी. (GDP) |
|---|---|---|
| १ | कोकण | १०,१६,२३७ Cr |
| २ | नाशिक | ३,१८,३०९ Cr |
| ३ | पुणे | ५,८७,८२२ Cr |
| ४ | औरंगाबाद | २,६६,३६० Cr |
| ५ | अमरावती | १,४९,७९१ Cr |
| ६ | नागपूर | २,४१,१०९ Cr |

(SOURCE: DISTRICT DOMESTIC PRODUCT OF MAHARASHTRA)

महाराष्ट्रातील पश्चिम महाराष्ट्र हा औद्योगिक व कृषी दृष्ट्या विकसित प्रदेश आहे. सर्व सहा प्रशासकीय विभागांमध्ये पुणे प्रशासकीय विभाग हा सर्वांगाने विकसित असा विभाग आहे.

***पश्चिम महाराष्ट्र विभागाचा जिल्हा निहाय जी.डी.पी (GDP):**

(संदर्भ वर्ष : २०१९-२०)

| अनु. क्रं. | विभाग | जी.डी.पी.(GDP) |
|---|---|---|
| १ | पुणे | २,९८,९७७ |
| २ | सातारा | ५७,२०४ |
| ३ | सांगली | ५७,३९४ |
| ४ | सोलापूर | ८४,२८९ |
| ५ | कोल्हापूर | ८९,९८७ |

(स्रोत : आर्थिक व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र)

पुणे प्रशासकीय विभागात पुणे जिल्हा हा आघाडीचा त्याचप्रमाणे कृषी, उद्योग, पशुधन, शेतीपूरक व्यवसाय या सर्वच बाबीमध्ये विकसित आहे. तसेच पुणे जिल्हा सकल घरगुती उत्पादनाबाबत देखील आघाडीवर आहे.

पुणे जिल्हा सर्व बाबींमध्ये आघाडीवर असला तरी पुणे जिल्ह्यातील सर्व तालुके विकासात्मक दृष्टीने समपातळीवर नाहीत. काही तालुक्यांचा विकास जास्त काहीच मध्यम तर काहीच अल्प पातळीवर आहे.

देश तसेच राज्यस्तरावर असमतोलाचा अभ्यास करत असताना पुणे जिल्ह्यासारख्या प्रगत जिल्ह्याचा तालुकानिहाय असमतोलाचा अभ्यास हा मार्गदर्शक ठरेल. पुणे जिल्ह्यांचा अभ्यास हा देशस्तरीय असमतोलाच्या कारणमीमांसेचा सूक्ष्म स्तरीय मूल्यमापन करणारा अभ्यास ठरेल.

**संशोधनाचे महत्त्व:**

भारतातील विकसित राज्यांमधील महाराष्ट्र हे एक प्रगत राज्य आहे. या प्रगत राज्यातील पश्चिम महाराष्ट्र हा प्रगत प्रदेश आहे व या प्रदेशातील पुणे जिल्हा हा शेती तसेच उद्योगाच्या दृष्टीने आघाडीचा जिल्हा आहे.

आर्थिक विकासातील असमतोलाच्या समस्येने भारतातील प्रगत असणाऱ्या पुणे जिल्ह्याला देखील ग्रासले आहे. या असमतोलाची कारणमिमांसा शोधून त्यावर उपाय सुचवणे हे एकूणच भारतीय विकासात्मक असमतोलाच्या समस्येवरील उपायासाठी महत्त्वपूर्ण आहे म्हणूनच भारतातील एका महत्त्वाच्या समस्येवरील उपाय सुचवू शकणारे हे एक महत्त्वपूर्ण संशोधन आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

१)पुणे जिल्ह्यातील तालुकानिहाय कृषिविषयक विषमतेचा अभ्यास करणे.

२)पुणे जिल्ह्यातील तालुकानिहाय औद्योगिक विषमतेचा अभ्यास करणे.

३)कृषी व औद्योगिक असमतोलाच्या कारणांचा शोध घेणे.

४)जिल्ह्यांतर्गत विषमता दूर करण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

**गृहीतकृत्य:**

१. औद्योगिक दृष्ट्या मागास तालुके पायाभूत सुविधांच्या अभावांमुळे मागास आहेत.

२ .उद्योगांच्या विकासामुळे कृषीक्षेत्रातील भांडवल निर्मिती होते.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत संशोधनासाठी महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्याची निवड करण्यात आली  आहे. पुणे जिल्ह्यामधून सात तालुक्यांची निवड करण्यात आली  असून यामध्ये बारामती, इंदापूर, शिरूर, खेड, जुन्नर, मुळशी, भोर, वेल्हा यांचा समावेश करण्यात आले आहे.

निवड केलेल्या तातालुक्यांमधून शेती क्षेत्राच्या आढाव्यासाठी शेतकरी, कृषी अधिकारी, स्थानिक नेतृत्व (राजकीय क्षेत्र, सामाजिक क्षेत्र, आर्थिक क्षेत्र, औद्योगिक क्षेत्र) यांची निवड केली जाणार आहे तर औद्योगिक क्षेत्राचा आढावा घेण्यासाठी MSME उद्योजक, मोठे उद्योजक प्रशासक, MIDC प्रशासक, जिल्हा उद्योग प्रशासक यांची निवड करण्यात आली  आहे.

**तथ्य संकलनाचे स्तोत्र:**

संशोधन विषयाच्या अनुषंगाने व्दितीय किंवा इय्यम स्त्रोताद्वारे माहितीचे संकलन केले गेली आहे.

**व्दितीय स्त्रोत :** प्रबंध, नियतकालिके, संदर्भ पुस्तके, शासकीय अहवाल, शोधनिबंध इत्यादी.

**नमुना निवड पद्धती :**

पुणे जिल्ह्यातील एकूण १३ तालुक्यांपैकी बारामती, इंदापूर, खेड, शिरूर, जुन्नर, मुळशी, भोर, वेल्हा या सात तालुक्यांची निवड करण्यात आली आहे.

**संख्याकीय साधने:**

प्रस्तुत संशोधनामध्ये आकडेवारी, तक्ते, टक्केवारी, वर्गीकरण, सारणी आलेख इत्यादींचा वापर केला जाणार आहे. याचबरोबर गुणात्मक माहितीच्या तुलनेकरिता तसेच उपलब्ध नमुन्यांची संख्या जास्त असेल तर Chi-Square Test चा वापर केला जाईल. जेव्हा माहिती संख्यात्मक स्वरूपाची असेल तर T-Test किंवा Normal Test चा वापर केला जाईल, तर सरासरी व प्रमाण काढण्यासाठी Normal Proportion Test चा वापर केला जाईल, तसेच गृहितकृत्य पडताळण्यासाठी SPSS Software (Statistical Package for The Social Science) चा

वापर करण्यात येईल तर तुलनेतील अचूकता तपासण्यासाठी NCSS Software चा वापर करण्यात येईल.

**संशोधनाची व्याप्ती :**

सदरील संशोधनामध्ये महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यातील तालुकानिहाय कृषी व उद्योग विकासाचा चिकित्सक अभ्यास केला जाणार आहे. या संशोधनासाठी पुणे जिल्ह्यातील बारामती, भोर, वेल्हा, मुळशी, खेड, शिरूर, जुन्नर या सात तालुक्यांची निवड करण्यात आली आहे. त्याचबरोबर या तालुक्यांतील कृषी व उद्योगाच्या असमतोलाची करणे शोधून त्यावर उपाययोजना सुचविण्यात आले आहेत.

निवड केलेले तालुक्यांपैकी काही तालुके पश्चिम घाटाच्या पूर्वेकडील पायथ्याशी असणारे आहेत तर काही तालुके पठारी प्रदेशातील आहेत.

विकास व वृद्धीच्या अध्ययनाचे आरोग्य, शिक्षण, राहणीमान यांसारखे विविध पैलू आहेत तरी आपण विकासाचे विविध पैलू असणाऱ्या उद्योग व कृषी विकासाबाबत अध्ययन करणार आहोत.

सदरील संशोधन विषयाची व्याप्ती पुणे जिल्ह्यापर्यंत मर्यादित असली तरी सदरील संशोधन हे पठारी प्रदेशातील सर्वच जिल्ह्यांना प्रभावित करणारे किंवा लागू होणारे आहे.

**संशोधनाची मर्यादा :**

उद्योगामध्ये सूक्ष्म उद्योजक देखील जमाखर्चाचे लेखे ठेवत नसल्याने त्याबाबतचे निष्कर्ष काढताना अडचणी येतील, तसेच लोकांकडून पुरेशी आणि अचूक माहिती मिळणे अवघड आहे.

त्याचप्रमाणे शेतकरी, शेतमजूर, कामगारांकडून माहिती मिळवत असताना त्यांच्या कामाच्या वेळेत त्यांच्याशी संपर्क साधने व माहिती घेणे दुरापास्त राहील.

**संशोधन अंतर :**

प्रादेशिक असमतोल हा विषय नेहमीच संशोधकांना भुरळ घालणारा विषय आहे. प्रादेशिक विषमता जगभरात आढळून येणारी बाब आहे. भारतातील शहरी तसेच ग्रामीण भागात असणारा असमतोल भारतातील विविध राज्यामधील व प्राकृतिक विभांगामधील असमतोल या विषयांवर वारंवार सखोल व विविध पैलूने अध्ययन झाले आहे.

महाराष्ट्रातील विविध जिल्हे त्याचप्रमाणे प्रादेशिक, प्राकृतिक व प्रशासकीय विभाग निहाय देखील परिपूर्ण संशोधन झाले असल्याचे दिसते.

महाराष्ट्रातील प्रगत असणाऱ्या पश्चिम महाराष्ट्र या विभागातील आघाडीचा जिल्हा असणाऱ्या पुणे जिल्ह्यामध्ये देखील तालुका निहाय असमतोल असल्याचे दिसून येते.

सदरील संशोधनासाठी निवड करण्यात आलेल्या विषयावर परिपूर्ण व सखोल अध्ययनाचा अभाव आहे. या विषयावर सखोल व परिपूर्ण अभ्यास झाल्यास देशस्तरावरील असमतोलाच्या कारणमीमांसेचा सूक्ष्म (MICRO) स्तरावर मूल्यमापन करणारे संशोधन ठरले.

**संदर्भसूची :**


- जिल्हा सामाजिक आणि आर्थिक समालोचन-२०२० (जिल्हा -पुणे)
- अर्थ व संख्यिकी संचनालय नियोजन विभाग आर्थिक पाहणी (२०१९-२०)
- District Census Handbook PUNE Village and town wise primary census abstract (PCA)(Directorate of census operations Maharashtra)
- C-DAP: Comprehensive District Agriculture Plan (District-Pune)
- KothariC.R (1999), Research Methodology, Methods and Technique, second edition, Wiley Eastern Ltd. New Delhi
- NeGP Agriculture empowering Farmer (Agricultural mission mode Project)
- Ministry Of Agriculture & Farmers Welfare. (Dept of Agriculture, Cooperation & farmers welfare)
- Indian Council of Agricultural Research (ICAR) Annual report: 2019-2020
- Government Of Maharashtra Agriculture census
- SAPIENS-A Brief History Of Humankind (Yuval Noah Harari)
- NABARD: National Bank For Agriculture and Rural Development. (Agriculture Development in Maharashtra problems and prospects)
- Pocket Book of agricultural statistics.


***

# भारताला भारतरत्न 'कर्पुरी ठाकूर' यांची आणि 'कर्पुरी फॉर्मुला' ची प्रांसगिकता किंवा गरज

**विनोद सखाराम बोरकर**

संशोधक विध्यार्थी, नूतन महाविद्यालय, सेलू जि. परभणी

---

आज भारतातील प्रत्येक राज्याची परिस्थिती ही मोठया प्रमाणात 'आरक्षण' या विषयावर फारशी चांगली नाही आहे. आरक्षण ही समस्या भारतातील प्रत्येक घटक राज्यात भेडसावत आहे. स्वातंत्र्यांच्या ७५ वर्षांनंतर सुध्दा सर्व घटकाला योग्य तो सामाजिक, आर्थिक, राजकीय अधिकार मिळाले नाहीत. त्यामुळे आज प्रत्येक घटक आपल्या न्याय हक्क साठी संघर्ष करताना पाहायला मिळत आहे. त्यामुळे अशीच जर राज्याची परिस्थिती राहिली तर त्याचा राज्याच्या आर्थिक विकासावर परिणाम होतोच. राज्याच्या विकासावर तर तो भारताच्या विकासावर पण परिणाम करतो. राज्यघटनेनुसार ज्यांना आरक्षण मिळाले आहे त्यातील काही विशिष्ट घटक सोडला तर ब-याच लोकांना आरक्षणचा आज पण फायदा मिळाला नाही. त्यांना स्वातंत्र्यांच्या ७५ वर्षांनंतर सुध्दा योग्य ते प्रतिनिधित्व किंवा आरक्षणाचा फायदा झाला नाही. त्यामुळे भारत सरकारने भारतातील त्या प्रयेक घटकांना त्यांच्या हिस्येचे किंवा त्याचे योग्य ते प्रतिनिधित्व मिळावे आरक्षणाचा फायदा मिळून सामाजिक न्याय प्रस्थापित व्हावा. त्याचा फायदा होऊन या घटकांच्या माध्यमातून राज्याचा आणि देशाचा पण विकास व्हावा. कारण प्रत्येक घटकाचा विकास झाला तरच भारताला त्यांचा फायदा होऊन देश विकसित किंवा महासत्ता

होईल. त्यामुळे भारत सरकारने सामाजिक न्याय प्रस्थापित व्हावा यादुष्टीकोनातून न्या. रोहिणी आयोगाची स्थापना केली. केंद्र सरकारने ऑक्टोबर २०१७ मध्ये दिल्ली हायकोर्टाच्या तत्कालीन मुख्य न्यायाधिश जी. रोहिणी यांच्या अध्यक्षेतेखाली रोहिणी आयोगाची स्थापना केली होती. न्या. जी. रोहिणी नेतृत्वातील आयोग ओबीसी जातींना प्रवर्गाच्या आरक्षणाचा लाभ योग्य स्वरुपात सर्व जातीना मिळावा. यासाठीचे निकर्ष ठरवण्यासाठी ओबीसी प्रवर्गातील देशभरातील २६०० जातीच सब कॅटेगरायझेशन करण्यासाठी तसेच २७% आरक्षण त्यानुसार विभागणीबाबत अभ्यास करण्यासाठी न्या. रोहिणी आयोग स्थापन करण्यात आला होता. ओबीसीतील काही विशिष्ट जातींनाच यांचा ओबीसी आरक्षणाचा फायदा झाला आहे. त्यामुळे आज देशातील मोठा ओबीसीतील मोठा वर्ग हा आपल्या नैसर्गिक अधिकारापासून वंचित आहे. त्यामुळे न्या. रोहिणी आयोगाच्या माध्यमातून ओबीसी प्रवर्गातील यादीतील प्रभावशाली जातीसाठी एक मर्यादा निश्चित करुन या प्रवर्गातील शोषित, वंचित जातींना आरक्षणाचा लाभ दिला जावा, असा एक हेतू यामागील होता. भारतातील हा घटक सर्वात मोठा असल्यामुळे त्याला त्यांचा हक्क मिळावे व हा घटक सामाजिक, आर्थिक, राजकीय न्याय त्यांना मिळावा. म्हणजे स्वातंत्र्यांच्या ७५ वर्षांनंतर जर आपल्या अधिकारापासून वंचित राहत असेल तर ती त्या देशासाठी निश्चितच चिंता कर-यासारखी आहे. भारताच्या लोकसंख्येमध्ये ५५ % ते ६० % यावर्गाची  यांची संख्या आहे. त्यासाठी न्या. जी. रोहिणी आयोगाची स्थापना करुन या मोठया घटकाला न्याय देऊन विकासाच्या प्रवाहात आणून भारताला सुपर पॉवर होण्यासाठी मदत मिळेल. स्वातंत्र्यांच्या ७५ वर्षांनंतर सुध्दा भारत आजपण विकसनशील आहे. आज लहान देश विकसीत होण्याच्या मार्गावर आहेत किंवा विकसित झाले आहेत. कारण त्यांनी देशातील प्रत्येक घटकाकडे

समान लक्ष देऊन त्यांचा विकास घढवून आणला त्यांचा फायदा त्यांच्या देशाला होऊन ते देश आज विकसित आहेत. पण भारतातील आज मोठा वर्ग आपल्या नैसगिक अधिकारपासून वंचित आहे. जे त्याला राज्यघटनेने दिले आहेत ते पण आज त्याला मिळत नाहीत. त्यामागे अनेक कारणे आहेत मग राज्यघटनेची योगय रित्या अंमलजावणी असो किंवा राज्यकर्तेची मानसिकता, किंवा प्रस्थापिताचे वर्चव म्हणता येईल. पण यांच घटकाला मुख्य प्रवाहात आण्यासाठी १९७० – १९८० या काळात बिहार मध्ये भारतरत्न जननायक मा. कर्पुरी ठाकूर यांनी बिहारमध्ये राबविलेला 'कर्पुरी फॉर्मुला' त्यांचा फायदा मोठया घटकाला त्याकाळात झाला. त्यांचे परिणाम कित्येक काळ दिसले सुध्दा पण नंतर पुढील सरकारने यांचा अभ्यास तर केला नसल्यामुळे तो फॉर्मुला बिहार व भारत मध्ये सुध्दा त्याचा योग्य रित्या अंमलबजावणी न झाल्यामुळे मोठा घटक अधिकारापासून वंचित राहिल्यामुळे त्यांचा प्रत्येक घटकावर परिणाम जे व्हायचा तोच झाला आहे. आज २१ व्या शतकात सुध्दा कर्पुरी ठाकूर यांच्या 'कर्पुरी फॉर्मुला 'ची समाजाला भारताला 'सुपर पॉवर' होण्यासाठी गरज आहे. कारण भारत हा विविध जात, धर्म, वर्ण, वंश परंपरा विविधेतेने नटलेला आहे. त्याप्रत्येक घटकाला सामाजिक न्याय मिळावा त्यातूनच त्या राष्ट्राची शक्ती आहे. सामाजिक न्यायाच्या आंदोलनाचे प्रतिक जननायक कर्पुरी ठाकूर होते. भारतरत्न जननायक कर्पुरी ठाकूर यांनी अशा वेळी संपूर्ण सामाजाला आरक्षण देण्याचे राज्यपत्र काढले होते. जेव्हा त्यांची अमलबंजावणी करण्याची कल्पनाही करणे कठीण होते. अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती आणि इतर मागासवर्गाशिवाय चार दशकापूर्वी त्यांनी उच्च जातीतील गरीब आणि प्रत्येक प्रवर्गातील महिलांसाठी ३ % आरक्षणाची तरतूद केली. ११ नोव्हेंबर १९७७ रोजी काका कालेकर आणि मुंगेरीलाल समितीच्या शिफारसी लागु केल्या. त्यामुळे मागासवर्गीयांना

सरकारी सेवांमध्ये २६ % आरक्षणाचा लाभ मिळू लागला. अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती याव्यतिरिक्त ओबीसी वर्गासाठी आरक्षण लागु करणारे बिहार हे देशातील पहिले राज्य ठरले. त्यामुळे 'कर्पुरी फॉर्मुला' मुळे अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती आणि इतर मागासवर्गाशिवाय चार दशकापूर्वी त्यांनी उच्च जातीतील गरीब आणि प्रत्येक प्रवर्गातील महिला हे मुख्य प्रवाहात येण्यास हातभार लागला. त्यामुळे आज जरी भारताने जननायक कर्पुरी ठाकूर यांचा 'कर्पुरी फॉर्मुला' ची अमलंबजावणी केली आणि जननायक यांच्यासारखे निष्कलक, इमानदार नेते जर निर्माण झाले तर नक्कीच थोडयाफार प्रमाणात का होईना भारताला 'सुपर पॉवर' होण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही. कोण होते जननायक कर्पुरी ठाकूर आणि काय आहे 'कर्पुरी फॉर्मुला' **?**

बिहारला राजकारणाच्या इतिहासात आणि विचारधारेत ज्यांनी-ज्यांनी अत्यंत प्रभावित केले. त्यामध्ये जननायक कर्पुरी ठाकूर यांचे नाव सर्वप्रथम घेतले जाईल. जननायक कर्पुरी ठाकूर यांनी आयुष्यभर दलित, शोषित, वंचित वर्गाच्या उत्थानासाठी आयुष्यभर संघर्ष करीत राहिले. भारतीय राजकारणातील जननायक कर्पुरी ठाकूर यांचे योगदान अतुलनीय होते. ते केवळ मागासलेल्या आणि अत्यंत मागासलेल्या वर्गाचे नेते नव्हते. तर संपूर्ण मानवतेला सुशोभित करणारे महान शिल्पकार होते. शतकानुशतके सामाजिक शोषणाच्या, आर्थिक, राजकीय गुलामगिरीत या विषमतेच्या गर्तेत खितपत पडलेल्या भारतीय समाजात त्यांनी सामाजिक, राजकीय, आर्थिक ज्योत जागवली आणि संधी मिळताच ते समाजातील वंचित, शोषित समाजापर्यंत राबविण्यास विलंब केला नाही. हे करत असताना त्यांना अनेक टिकेला सामोरे जावे लागले. तरी त्यांनी यांची कधीही अजिबात पर्वा केली नाही. त्यांनी त्यांच्या काळात जे काही केले ते भावी पिढयांच्या समाजातील वंचित, शोषित, मागासवर्गासाठी सर्व

महिलासाठी केले. यावर्गासाठी राज्यघटनेतील सामाजिक न्याय, स्वातंत्र, समता, बंधूता ही मुल्ये राबवून सामाजातील विषमता दूर करुन सामाजिक न्याय प्रस्थापित केला. ते सामाजिक न्यायाच्या उभारणीचे पुरकर्ते होते आणि सामाजिक समतेचे शिल्पकार ही होते. जननायक कर्पुरी ठाकूर यांची ओळख भारतातील महान स्वातंत्र्यसैनीक, शिक्षक, राजकीय नेता अशी राहिली आहे. पण जनता त्यांना 'जननायक' या नावाने ओळखत होती. बिहारचे दुसरे उपमुख्यमंत्री आणि त्यानंतर दोन वेळा मुख्यमंत्री, १९५२ पासून कधी पराभव न पाहणारे आमदार, खासदार, विरोधी पक्षनेता हया सर्व पदावर असणारे जननायक कर्पुरी ठाकूर यांनी राजकीय जीवनात ही सर्व पदे भूषवली तरी पण त्यांनी आपली तत्वे सोडली नाहीत त्यामुळे ते ख-या अर्थाने जननायक ठरले. गौतम बुध्दाची तपोभूमि, महावीर यांची कमभूमि, गांधी यांची प्रयोग भूमि आणि जननायक कर्पुरी ठाकूर यांची क्रांतीभूमि प्राप्त असा बिहार आहे.  त्यांचा जन्म बिहारमधील समस्तीपूर जिल्हयातील समस्तीपूरच्या पितौझिया (आताचे कर्पुरीग्राम) या छोटयाशा गांवात दि. २४ जानेवारी १९२१ रोजी झाला. त्यांच्या वडीलाचे नाव गोकुळप्रसाद ठाकूर आई रामदुलारी आहे. भारताला ब्रिटिशापासून स्वातंत्र्य करण्यासाठी त्यांनी १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात सहभागी होते. त्यामध्ये त्यांना २६ महिने तुंरुगात पण राहावे लागले. जननायक कर्पुरी ठाकूर यांच्या विध्यार्थीदर्शपासूनच स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय होते. एक दुरदुष्टीचे नेते नाही तर एक उत्तम वक्क्ृत्वपटु पण होते. स्वातंत्र्य लढयातील प्रसंगाच्या वेळेस पटना येथील कृष्णा टॉकीज सभागृहात विध्यार्थ्यांना संबोधित करताना एक क्रांतिकारी भाषण त्यांनी दिले होते. त्यात ते म्हणतात " आपल्या देशातील लोकसंख्या इतकी अधिक आहे की, केवळ ते थुंकले तरी ब्रिटिश सरकार वाहुन जाईल. या भाषणामुळे त्यांना नंतर जेल सुध्दा झाली होती. भारताला स्वातंत्र मिळवून देण्यासाठी २०

वेळा तुंरुगवास सुध्दा त्यांनी भोगला होता. १९५२ मध्ये पहिल्या विधारनसभेच्या निवडणूका जिंकल्यानंतर ते बिहार विधानसभेच्या निवडणूकीत कधीही पराभूत झाले नाहीत. जनतेने त्यांना कधीही पराभूत केले नाही. तर त्याच्याकडे आजच्या उमेदवारांसारखा अमाप पैसा पण नव्हता. भारतीय समाजात जननायक कर्पुरी ठाकूरीजींच्या काळात तीन प्रकारचे समुदाय होते. पुरस्कृत, तिरस्कृत आणि बहिष्कृत जननायक कर्पुरी ठाकूर यांनी तुच्छ आणि बहिष्कृत समुदायाच्या जीवनात बदल घडवून आण्ण्यात यशस्वी ठरले. त्यांनी केवळ त्यांच्यासाठी नोक-यांमध्ये आरक्षणाची व्यवस्था केली नाही. तर ते नोकरीसाठी पात्र व्हावेत यासाठी अनेक नवीन व्यवस्थाही केल्या. गरीब समाजातील मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत. यासाठी त्यांनी सरकारी शाळांमध्ये पहिली ते मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण मोफत केले. संविधान सभेच्या आकांक्षेनुसार त्यांनी सरकारी आणि शाळांमधून इंग्रजीची अनिवार्यता रद्द केली. सरकारी कारभारात हिंदी अनिवार्य करण्यात आली. महिलासाठी नोकरीची दारे उघडली. आज जर पंचायती राजव्यवस्थ्ेत महिलांना ५०% आरक्षण मिळाले असेल तर ही तरतूद जननायक कर्पुजी ठाकूर यांच्या काळात घेतलेल्या पुढाकाराचे फलित आहे. १९६७ मध्ये जेव्हा ते पहिल्यांदा बिहारचे उपमुख्यमंत्री झाले तेव्हा त्यांनी बिहारमध्ये मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी इंग्रजीची अट रद्रद केली. यामागे एक सुविचारित तर्क होता. त्याकाळी बहुतेक मुली इंग्रजीमध्ये मॅट्रिक पास होऊ शकल्या नव्हत्या. त्यामूळे मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण होणे हा मुलीच्या लग्नात अडथळा बनला होता. जननायक कर्पुरी ठाकूर यांनी त्यांचे मूल्यांकन आणि अभ्यास केला. तेव्हा असे आढळून आले की बहुतेक विध्यार्थी इंग्रजीत नापास होतात. हा तो काळ होता जेव्हा सहावी, आडवीपासून इंग्रजीचा अभ्यास सुरु झाला. म्हणजेच इंग्रजीचे ज्ञान उशीरा सुरु झाले

आणि हेच मॅट्रिकच्या परीक्षेत इंग्रजी विषय उत्तीर्ण होण्याची अट रद्रद केली होती. अशाप्रकारे त्यांनी सर्वसामान्यांपर्यंत शिक्षण पोहाचवले. १९७७ मध्ये त्यांनी पहिल्यांदा मुख्यमंत्रीपदाची सुत्रे हाती घेतली. तेव्हा त्यांनी बिहारमधील शिक्षण व्यवस्था सुधारण्यासाठी अनेक उपाययोजना केल्या. समाजाला शिक्षित केल्याशिवाय आपल्या संघर्षाला यश मिळणार नाही हे त्यांना माहित होते.

भारतात सामाजिक न्यायाच्या आंदोलनाचे प्रतिक जननायक कर्पुरी ठाकूर सामाजिक न्यायाचे पुरस्कर्ते होते. त्यांनी अशा वेळी संपूर्ण समाजाला आरक्षण देण्याचे राजपत्र काढले होते. तेव्हा त्यांची अमंलबजावणी करण्याची कल्पनाही करणे कठीण होते. अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती आणि इतर मागसवर्गीयाशिवाय चार दशकापूर्वी त्यांनी उच्च जातीतील गरीब आणि प्रत्येक प्रवर्गातील महिलांसाठी प्रत्येकी ३% आरक्षणाची तरतूद केली होती. आताचे जे ईएसडब्यू आरक्षण लागु झाले त्यांचे प्रवर्तक सुध्दा जननायक कर्पुरी ठाकूरच आहेत. त्यांचा त्यावेळेचा दुरदृष्टीकोन आपल्या लक्षात येईल. म्हणजे सर्व समाजातील सर्व घटकासाठी त्यांनी सामाजिक न्यायासाठी प्रयत्न केल्याचे दिसते. जननायक कर्पुरी ठाकूर मुख्यमंत्री असताना मागासवर्गीयासाठी ओबीसी आरक्षण लागु करणारे बिहार हे देशातील पहिले राज्य ठरले. त्यानंतर त्यांनी नोक-यांमध्ये सुध्दा एकूण २६% कोटा लागु केला होता. बिहार मध्ये जननायक कर्पुरी ठाकूर यांनी १९७३ ते १९७७ च्या काळात जयप्रकाश् नारायण यांच्या नेतृत्वाखाली आंदोलनात कर्पुरी ठाकूर यांनी महत्वाची भूमिका बजावली होती. इंदीरा गांधीच्या आणीबाणीच्या विरोधात ते तुरुंगात गेले होते. १९७७ मध्ये लोकसभेच्या निवडणूका मध्ये ते समस्तीपूर लोकसभा मतदार संघातून खासदार म्हणून निवडूण आले. मात्र २४ जून १९७७ रोजी जननायक कर्पुरी ठाकूर पुन्हा मुख्यमंत्री झाले.

११ नोव्हेंबर १९७७ रोजी काका कालेकर, मुंगेरीलाल समितीच्या शिफारशी लागु केल्या. त्यांनी त्यामुळे मागासवर्गीयांना सरकारी सेवांमध्ये २६% आरक्षणाचा लाभ मिळू लागला. SC-ST याव्यतिरिक्त OBC साठी आरक्षण लागु करणारे बिहार हे देशातील पहिले राज्य ठरले. जननायक कर्पुरी ठाकूर यांनी मुख्यमंत्री असताना केवळ बिहारच्या वंचिताच्या कल्याणासाठीच काम केले नाही तर त्याचे मनोबलही उंचावले. त्यामुळे दलित आणि मागासवगीयांची केवळ राजकारणात नव्हे तर प्रत्येक क्षेत्रात प्रगती झाली आहे. मागासवगीयांना २६% आरक्षण देण्याचे कामही त्यांनी केले जे पहिल्यांदाच बिहारमध्ये लागु झाले. जननायक कर्पुरी ठाकुर यांनी आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात दलित, मागासवर्गीय, सर्वसामान्य आदिवासी आणि अल्पसंख्यांकाना त्यांच्या संख्येच्या प्रमाणात आरक्षण देण्याचे काम केले. एवढेच नाही तर बिहार राज्यात काका कालेकर आणि मुंगेरीलाल यांच्या शिफारशी लागु करून मागासवर्गीयांना २६% आरक्षण दिले. त्यांनी नेहमीच गरीब आणि शोषितांच्या भल्यासाठी काम केले. त्यांनीच वर नमूद केलेल्या वर्गाच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक सहभागाचा पाया घातला. बंगालमधील राजा राममोहन रॉय आणि ईश्वरचंद्र विदयासागर किंवा महाराष्टात महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर दक्षिणेत पेरियार यांना जे महत्व आहे. तितकेच महत्व बिहार च्या सामाजिक चळवळीत जननायक कर्पुरी ठाकूर यांना आहे. त्यांच्यामुळे एक जल्लोष आणि उत्साह निर्माण झाला. त्यांच्या राजकीय जीवनातील यशाची पहिली पायरी म्हणजे मानवी प्रेम त्यांचे हृदय गरीबांसाठी नेहमीच दु:ख्त असे त्यांचा सर्वात महत्वाचा गुण म्हणजे त्यांनी समाजसेवा कधीच अर्धवेळ मानली नाही. पुर्ण समर्पणाने त्यात मग्न राहिले. अत्यंत गरीब कुंटूंबातून उठून आणि बिहारसारख्या राज्याच्या मुख्यमंत्रीपदापर्यंत पोहोचुनही त्यांच्या

आयुष्यात विशेष बदल झाला नाही. किंबहुना आयुष्यभर ते राजकीय तपस्वी दिसले. शोषित, वंचित, दलित वर्गाच्या उत्थानासाठी अनेक आंदोलने केली. त्यामध्ये बंदो दाम, जात तोडो, इंग्रजी भाषा हटाव आदी चळवळी त्यांच्या हितासाठी उभारल्या.

जननायक कर्पुरी ठाकूर यांनी आपल्या जीवनात आयुष्यभर सर्व घटकाला न्याय देण्याचा प्रयत्न केला. विशिष्ट एका जाती किंवा घटकासाठी काम न करता मानवीविकासाठी काम केले. त्यांना राजकीय, आर्थिक, सामाजिक न्याय देऊन समानाता प्रस्थापीत करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. मंडल आयोगाच्या अगोदर ओबीसी समाजाला आरक्षण देऊन नैसर्गिक अधिकार दिले. ३६ वर्षे राजकारणात असून सुध्दा आपल्या येणा-या पिढीसाठी काही गडगज भष्टाचार मार्गाने कोणतीही संपत्ती कमावली नाही. बिहारच्या राजकारणात सलग ३६ वर्षे आमदार, एकदा खासदार, उपमुख्यमंत्री आणि दोनवेळा मुख्यमंत्री, विरोधी पक्षनेता ही सर्व पदे भूषवलेले जननायक कर्पुरी ठाकूर यांची राहणीमान मात्र अत्यंत साधी होती. एवढी वर्षे राजकारणात असूनही त्यांच्या स्वत: ची गाडी नव्हती. आमदारकीच्या भत्याशिवाय कधीही एकही रुपया ज्यादा न घेतलेल्या कर्पुरी ठाकूर हे राजकारणातील एक आश्चर्य म्हणावं लागेल. कर्पुरी ठाकूर यांच्या सारखा समाजवादी विचारसरणीवर जीवन जगणारा व्यक्ती आता पाहायला मिळणार नाही. कर्पुरी ठाकूर यांच्या जीवनातील काही प्रंसग डोळयासमोर आले तरी अनेकांच्या डोळयात पाणी येते. कारण त्यांच्या सारखा सामान्य जनतेचा विचार करणारा नेता राजकारणात पाहायला मिळत नाही. जर आजचे राजकारण आणि राजकारणी नेत्यांनी त्यांचा जरासा विचार आचार अंमलात आणला तरी खूप मोठी सुधारणा पाहायला मिळेल. भारत सरकारने व राज्यातील सरकारने 'कर्पुरी फॉर्मुला' च्या दुष्टीकोनातून काम केले. तर निश्चितच मोठा फरक आपल्या दिसून

येईल. त्यामुळे त्यांच्या कार्याचा गौरव व्हावा अशा भारताच्या महान स्वातंत्र्यसेनानी, शिक्ष्क, राजकारणी आणि बिहारचे माजी मुख्यमंत्री जननायक कर्पुरी ठाकूर यांना मरणोत्त्र भारतरत्न पुरस्कार देऊन त्यांचा कार्याची पोच पावती कळते. गरीब, महिला, शोषित, वंचित, दलित, सर्वसामान्य यासर्व वर्गासाठी त्यांनी काम केले. त्यामुळे त्यांना 'जननायक' ही पदवी दिली. राजकारणात सर्व पदे भूषविली कधीही पराभवाचे तोंड न पाहणारे ख-या अर्थात ते लोकांचे जननायक होते.

**संदर्भ ग्रंथ** :


१) मा. पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांचा लेख
२) विकिपीडीया
३) बिहार में स्वतंत्रता आंदोलन का इतिहास – कालिकिंकर दत्त
४) महाप्राण कर्पुरी ठाकूर, जियालाल आर्य
५) स्मारिका समस्तिपुर महोत्सव – योगेन्द पोदार
६) लोकसत्ता लेख
७) महाराष्ट्र टाईम्स लेख
८) जननायक कर्पुरी ठाकूर और सामाजिक न्याय : बिहार के संदर्भ शोधप्रबंध – चंदन कुमार
९) लोक नायक कर्पुरी ठाकूर – मा. शशिकांत चव्हाण
१०) पुण्यनगरी लेख
११) खान्देश वाहिनी वार्ता
१२) केसरी – विनेश ठाकुर लेख
१३) जननायक कर्पुरी ठाकूर – पंकज कुमार


***

# लोकशाही, समाज आणि नवं युवा मतदार : महाराष्ट्राचे बदलते राजकरण

**प्रा. स्वप्निल भारत रणखांबे**

**मराठी विभाग, रत्नाई महाविद्यालय, राजगुरूनगर, पुणे**

**प्रास्ताविक :**

राजकारण बदलते आहे की बिघडते आहे; यावर सर्वच स्तरांवर चर्चा घडून येतात. मुळात गेल्या दशकभरात देश पातळीवरील झालेले राजकीय बदलांचे पडसाद देशाच्या विविध राज्यांमध्ये परिणाम करणारे ठरले. लोकशाही , समाज आणि देशाचा मुख्य प्रवाही घटक समजला जाणारा नवं युवा मतदार यांच्या भोवती असंबद्ध वातावरण होत असल्याचे दिसून येते. स्वार्थ आणि हेतुपुरस्पर राजकारण करण्याची वृत्ती राजकीय नेत्यांमध्ये स्पष्टपणे दिसू लागली. वर्तमान महाराष्ट्रात शिक्षणाचे प्रश्न, रोजगाराच्या समस्या, शेतकरी-कष्टकरी यांच्या समस्या, रस्त्यांवर कोयते घेऊन हिंडणारे गुंड, राजकारण्यांचे प्रतिविरोधीवर बेछूट गोळीबार करणे, महाराष्ट्रात कायदा आणि सुव्यवस्थेचा भंग करणे हे सर्व घडत असतांना दुसऱ्या बाजूला राजकारण हिही तेवढीच मोठी समस्या निर्माण करणारे आहे. राजकारण हे नेतृत्वावर अवलंबून असते. जर नेतृत्वाला आचार-विचार आणि नैतिकतेची जोड मिळाली तरच पारदर्शी राजकीय भूमिकेची निर्मिती होऊ शकते. नेतृत्व हे व्यक्तिगत वैशिष्ट्यांवर अतिरिक्त भर घालणारे जरी असले तरी त्याला सामाजीकतेचीही बाजू असू शकते. भारतामध्ये सामाजिक आणि आर्थिक परिस्तिथीतुन नेतृत्व घडत जाते. त्यामुळे नेतृत्वाला सामाजिक अर्थ असतो. १ समाजकारण हे राजकारणातील प्रवेशाचे मुख्य कारण असते. मात्र सत्ता संघर्ष होत

असतांना समाजकारणाची नैतिक मूल्ये पायमल्ली होत जातात; तसे काहीसे महाराष्ट्रात घडताना दिसते. महाराष्ट्रातील परिवर्तनाच्या इतिहासात जितकी वैचारिक स्थित्यंतरे झाली त्यात संत, सामाजिक विचारवंत, साहित्यिक, कलावंत यांसोबतच काही निवडक राजकीय नेतृत्वांचाही नामोल्लेख करता येतो. आधुनिक महाराष्ट्र निर्मितीचा काळ हा यशवंतराव चव्हाण यांचा होता हे सर्वच पातळीवर अभिमानास्पद गौरविले जाते. एकेकाळी महाराष्ट्रातील राजकारण आदर्श असे होते , तो काळ गेला; वर्तमान महाराष्ट्राकहे राजकारण कुठली दिशा घेऊन मार्गक्रमण करत आहे याविषयी गुंतागुंतीची भाष्ये निदर्शनास येतात,यातूनच महाराष्ट्राच्या राजकीय भविष्याला कुठला चेहरा असणार यात संभ्रमावस्था निर्माण होते.

**विषयाची उद्‌दिष्टे :**

१) वर्तमानातील महाराष्ट्रातील राजकारणाची दिशा नेमकी कोणती ?

२) राजकारण्यांच्या बदलत्या भूमिकेतून जाती संघटनेत, धर्मीय संघटनेत आणि साहित्य व कला क्षेत्रात निर्माण झालेली अघोषित दडपशाहीचे परिणाम.

३) वर्तमानात राजकीय नेतृत्वांची बदलत्या भूमिकेमागची मानसिकतेचा स्तर कोणता?

४) राजकीय विचारधारा आणि आजचा तरुण यांमध्ये विचारवैमनस्य वाढते आहे ?

५) सोशल मीडिया म्हटली गेलेली समाज माध्यमे राजकीय घडामोडीत जनतेची दिशाभूल करणारी आहे का ?

६) प्रगत समाजाला राजकारणाचे ग्रहण लागू शकते का ?

७) वर्तमानातील महाराष्ट्रातील राजकारणाचे धुरीणत्व मानवी हक्कांचे आणि संविधानिकतेची गळचेपी करणारे ठरत आहे का ?

**गृहीतके :**

१) धार्मिक अस्मिता प्रथमदर्शी ठेऊन गेल्या दशकभरात राजकारण भूमिका बदलत आहे.

२) भारतीय राजकीय व्यवस्था संविधानिक नियमांच्या अधीन राहून कार्यकारिणी करते मात्र वैयक्तिक राजकीय स्वार्थ साधत असताना संविधानिक भूमिकेला प्राधान्य न दिल्याचे दिसून येते.

३) राजकीय वृत्त किंवा वृत्त वाहिन्या यांमार्फत वाढता राजकीय आभासी चर्चा यांमुळे समाजाची संभ्रमावस्था होतांना दिसते.

४) गेल्या दशकांतील राजकारणाशी निगडित सोशल मीडिया आणि त्यातील बनावटी कारभार तरुणांचा दिशाभूल करणारे आहेत.

५) राजकीय अघोषित धोरणे आणि राजकीय नेतृत्वांमुळे जातीय आणि धर्मीय अस्मिता अधिक धारदार होत आहे.

६) राजकारण्यांची खाजगी शिक्षण संस्था आणि वाढते शैक्षणिक खाजगीकरण आणि त्यामुळे वाढते धोके हे भविष्यातील मोठ्या समस्या निर्माण करणारे आहेत.

७) पक्षांतर करणे, पक्ष बदलणे या अंतर्गत वादात वंचित राहणारा पीडित शेतकरी, नवं उद्योजक, नवे शिक्षण तंत्र , नवं सामाजिक धारणा हे विस्कळीत होतांना दिसतात.

८) महाराष्ट्रातील वाढत्या राजकीय दुष्मनी, हत्या, सार्वजनिक सुव्यवस्था बिघडवणारी कोयता गँग, स्थानिक गुंडशाहीकडून कोणावरही सहजरित्या होणारे गोळीबार आणि त्यांवर योग्य कारवाई न होणे, त्यांना स्थानिक राजकारण्यांचा छुपा पाठिंबा असणे हे समाज हत्येचे विघटक विकृत रूप दिसून येते.

**लोकशाहीत लोकांचे महत्व आणि राजकीय परिस्थिती**

महाराष्ट्रातील राजकारणाची दशा आणि दिशा पाहता मतदाराने २०२४ साली किंवा त्यांनतर होणाऱ्या निवडणुकांसाठी सामान्य नागरिक म्हणून आपल्या मूलभूत अधिकारांच्या जाणिवेला किती प्राधान्य द्यावे ? यातच उद्वेग होतांना जाणवतो. महाराष्ट्रातील राजकीय परिस्थिती पाहता मतदान नेमके कोणाला करावे आणि का करावे ? ही सगळ्यात मोठी संभ्रमावस्था होत जाते. यातून मतदान करूच नये असे म्हणणारा देखील एक गट तयार होतो आणि मतदान करून बदल घडवून आणावा असा विश्वास देणारा संविधानिक आचार आणि विचारांचा दुसरा गट तयार होतो. पण प्रश्न इथे हा निर्माण होतो की, ही दोनच गट या प्रक्रियेत अग्रेसर असतात का ? तर तसे नाही. राजकीय नेतृत्व करणाऱ्या प्रत्येकाचा आपला स्वतंत्र चाहता गट असतो, राजकीय पक्षांच्या विचारधारेला जुमाणणाऱ्या मतदारांचा गट असतो, जातीय आणि धर्मीय राजकारणाला थारा न देणारा किंवा जातीय-धर्मीय अस्मिता धारदार करणारा मतदारांचा वेगळा गट असतो, आजकाल राष्ट्रवादाची संकल्पना फक्त धर्मवादाशी निगडित आहे असे मानणारा गट निर्माण झाला आहे; संविधानिक परिवर्तनाला प्राधान्य देणारा जागरूक गट असतो; असे मतदारांचे तत्सम गट विविध अनुषंगाने दिसून येतात. या प्रत्येक गटाची वेगवेगळी आचारसंहिताही तयार असते.या गटांत राजकारणी भेद निर्माण करतात. सामाजिक एकता विभत्स करणारे आणि राजकारणात देश तसेच राज्याची अस्मिता प्रथमस्थानी स्थानी असावे याचे भान हरपणारे गट सर्वाधिक निर्ढावलेले दिसून येतात.पण आज देशात किंवा महाराष्ट्रात सध्याचे राजकारण पाहता मतदारांनी मतदान करण्यासाठी नेमके कशाला प्राधान्य द्यावे हा गुंतागुंतीचा प्रश्न होऊन बसलाय. सामाजिक मानसशास्राचा प्रबलन सिद्धांताचा (Reinforcement Theory) चा अर्थ जर विषयाच्या

अनुषंगाने लक्षात घेतला तर, प्रत्येक व्यक्तीचे वर्तन हे विशिष्ट परिस्थितीनुसार घडून येत असते व त्याचे काही ना काही परिणाम ठरलेले असतात. प्रत्येक व्यक्ती आपली भूमिका अशी वठविते की जेणेकरून त्या भूमिकेला समाजात मान-मान्यता मिळते. २ हाच सिद्धांत सध्याच्या राजकीय नेतृत्वांविषयी जर विचारात घेतला तर प्रत्येक राजकारणी पक्ष बदल करत असतांना भूमिका ठरवून करतो की त्यामागे अंतर्गत समस्यांची भीती असते? महाराष्ट्रातील पक्ष प्रवेशांचे राजकारण हे मुळात कोणते संविधानिक आणि नैतिक मूल्यांना महत्व देणारे आहे ? राजकीय नेतृत्व करणाऱ्याचे वर्तन परिस्थितीनुसार बदलते तसेच राजकारणातील गरज देखील परिस्थितीनुसार बदलत जाते. आपल्या पक्ष बदलाच्या भूमिकेला समाज मान्यता देईल अशी समीकरणे हिशोबात घेऊन मतदाराला गृहीत धरण्याची हातोटी राजकीय वर्तुळात सक्षम असते. महाराष्ट्राच्या राजकारणात सत्ताधारी पक्षाच्या तडाख्यातून स्वतःचा बचाव कसा होईल या प्रथम हेतूने पक्षांतराचे राजकारण सामान्य जनतेची दिशाभूल करताना दिसते.अब्राहम लिंकन हे खऱ्या अर्थाने लोकशाही राज्य पद्धतीचे एक महान समर्थक झाले त्यांनी स्वतः देखील एकदाच अध्यक्षपद मिळावे ही अपेक्षा जनतेकडून व्यक्त केली होती. त्यासाठी त्यांनी पक्ष बदल किंवा सातत्याने पक्ष प्रवेश करून राजकीय आचार विचारांना दूषित करण्याचे काम केले नाही. लोकांच्या मतांची त्यांनी समर्पक अशी अपेक्षा केली होती. मात्र आज देशातील आणि महाराष्ट्रातील पक्षांतराच्या राजकारणामुळे लोकशाहीत लोकांचे महत्व निरर्थक करणे हीच जणू लोकशाहीची नवी व्याख्या होतांना दिसते आहे. “Parties are inevitable…. If parties cause some evils, they avert and mitigate other’s.”3 राजकीय सिद्धांतानुसार कुठलाही राजकीय पक्ष हा अपरिहार्य असतो. या पक्षांकडुन कुठलीही चूक घडल्यास ती टाळली जाते. मुळातच देशाच्या आणि महाराष्ट्राच्या राजकारणात वर्तमानामध्ये कुठले

सिद्धांत उरले असावे का ? हा विचार होणे गरजेचे आहे. यातूनच संविधानाने दिलेल्या मतदान या मौलिक अधिकाराविषयी जागरूकता आणणे आजही महत्वाचे वाटते. व्यवस्था आणि कायदा जर राजकारण्यांची गुलाम बनवली जात असेल तर सामान्य नागरिकांचं काय ? नागरिकांनी मतदानाविषयी जागरूक असावे असे आजही सांगण्याची वेळ सातत्याने येत असते. याचा अर्थ असाही होतो की, मतदार किती जागरूक आहे ? यावर सगळे नियंत्रण अवलंबून आहे.

**राजकारणातील जाती-धर्माची अपरिहार्यता**

देशभरात प्रकर्षाने जाणवणारे धार्मिक राजकारण महाराष्ट्रातही जोरदार झाले. प्रश्न आस्थेवर नाही तर त्या आस्थेवर डोकं वर काढणाऱ्या गढूळ राजकारणाचा आहे. जनतेने आपल्या आस्थेवर राजकारण पोसू दिले यात जनतेची चूक म्हणावी की राजकारण्यांनी जनतेची दिशभूल करण्याचे यश म्हणावे ? वर्तमान महाराष्ट्रातील राजकारणात देव-संस्कृती आणि धर्माचा वापर सर्वाधिक होतांना चित्र स्पष्ट दिसते आहे. राजकीय क्षेत्रामुळे धार्मिक सभ्यतेचे अंतर्बाह्य अंग कलुषित झाल्याचे वारंवार दिसून येते. धार्मिकतेचे तत्त्वतः आचार आणि विचार यांना झुगारून धार्मिक द्वेषाचे राजकारण निर्माण केले जाते. यामुळे देश हिताचे आणि मानवी हिताच्या वैचारिक प्रेरणास्रोतांचे खच्चीकरण होते. देशात आणि महाराष्ट्रात जातीवाद-धर्मवाद संपुष्टात आलेला नसतांना सध्याचे राजकारण त्यात भरिसभर घालून त्याला अधिक हिंसक बनवले जात आहे. आज जवळजवळ सर्वच पक्षांना आणि राजकारणाशी निगडित घटकांना विकासाचे राजकारण फक्त बोलून दाखवण्याची तयारी दिसते मात्र प्रत्यक्षात जातीत आणि धर्मांत भेद करून राजकारण करण्यात अधिक महत्व दिले जाते. धार्मिक तिढे निर्माण करून समाजाचा बुद्धिभेद करण्याकडे आजचे राजकारण सर्वाधिक वेगाने कार्यरत आहे. सन २०२३

मध्ये कोल्हापूर, अमळनेर, छत्रपती संभाजीनगर आणि अहमदनगर शहरात घडलेल्या दंगली सर्व हकीकत दाखवतात. मात्र २०२४ च्या अंतरिम बजेटमध्ये महाराष्ट्राला काय मिळालं ? हा मुद्दा मात्र जाणीवपूर्वक संपवला जातो. सात शहरांना सूर्योदय योजना मिळणार, राज्यातील रेल्वेसाठी १५,५५४ कोटी, साखर कारखान्यांना दहा हजार कोटींचा लाभ ; महाराष्ट्रात एवढ्याच गरजा आहेत का? .आज महाराष्ट्रातील तरुणांची परिस्थिती पाहता शिक्षण आणि रोजगार यांत सगळ्यात मोठी दरी निर्माण केली जाते तरीही महाराष्ट्रात ज्ञानवापी मस्जितमध्ये पूजापाठ चालूच राहणार की नाही हा वाद, मराठा-कुणबी आरक्षणावरून वाद, अरक्षणावरून समाज माध्यमांचा वापर करून दलित समाज आणि मराठा समाज यांतील अघोषित संघर्ष निर्माण करणे चालूच आहे. महाराष्ट्रात यावरून टोकाचे वाद सुरू असतांना प्रत्येक पक्षाचा राजकारणी समाजात फूट पडण्याचे धाडस निर्ढावुन करतो, हिही सर्वात मोठी समस्या आहे.जिथे सामाजिक मूल्ये चिरडली जातील, समाजात अराजकता निर्माण होईल मुळात राजकारण अशाच दिशेला धाव घेतांना दिसते. जातीचे राजकारण आणि धर्माचे राजकारण हे त्यांचे ‘वोट बँक’ असतात, या वोट बँकमध्ये किती विकृती निर्माण होईल यासाठी वारंवार जातीवर-धर्मावर विरोधाभासात्मक टिपणी करून दोन गटांत संभ्रमावस्था राजकारणी निर्माण करत असतो. राजकारणातील सत्ता कारण यासोबत जातीची-धर्माची अपरिहार्यता तितकीच महत्वाची अधोरेखित होऊन जाते. यातून राष्ट्राच्या संविधानिक नैतिक मूल्यांना धोके निर्माण झाल्याचे दिसते.

**नवं युवा मतदार आणि त्याच्यापुढील आव्हाने**

लोकशाही अधिक मजबूत करण्यासाठी युवक आणि युवतींनी मतदार नोंदणी करावी म्हणून महाराष्ट्र शासन अंतर्गत मोहीम आखल्या जातात. मुळात हा नवं युवक ज्याला देशाची आणि आपण स्थित

असलेल्या राज्याच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि वैचारिक, सांस्कृतिक वास्तवतेशी कुठलाही व्यवहारानुभव आलेला नसतो. अशा नवं युवकांकडून लोकशाहीसारख्या राजकारणाने अडगळीत ठेवलेला प्रकार कसा लक्षात येऊ शकेल. नवं मतदार युवक आणि लोकशाही या अंतर्गत महाराष्ट्र शासनाकडून व्याख्यानमाला, शिबिरे, उपक्रम, नवं मतदार नाव नोंदणी आयोजित केल्या जातात.४ मुळात त्या आयोजित होण्यास काही हरकत नाही. पण आपण या देशाचा युवक-युवती आहोत म्हणजे नेमके कोण आहोत? समाजात आपली भूमिका काय आणि कोणती? या जाणिवेतून जो नवं युवक-युवती अनभिज्ञ असतो त्याला लोकशाही कळावी तरी कशी ? मुळात आजचे महाराष्ट्रातील राजकारण तरुणांना लोकशाहीची संकल्पना प्रत्यक्षात उतरवून दाखवणारे उरले आहे का? आजच्या तरूणांना विकसित उपकरणांच्या आधारे महिती आणि ज्ञान संपादन करण्याच्या असंख्य सुविधा निर्माण झाल्या आहेत. ग्लोबल नॉलेज आत्मसात करणारा आजचा बहुतांश युवा-युवतींची लोकशाही आणि संविधान यांची प्रथमदर्शी ओळख नसते. देशाने संविधान स्वीकारून लोकांनी लोकांसाठीचे हे राज्य आहे असे स्वीकारून पंच्याहत्तर वर्षे झाली; अमलबजावणी करून शहात्तर वर्षे झाली तरीही देशात लोकशाही म्हणजे काय ? असा सवाल झाल्यास देशाची पाळंमुळं विस्कळीत होयला सुरुवात होते. अशा परिस्थितीत नवं युवक-युवती मतदारांची लोकशाही समजून घेताना काय अवस्था होईल. त्यांच्या देशाविषयीच्या, समाजविषयीच्या, देशात घडणाऱ्या घडामोडीविषयीच्या जाणिवा अगदी सौम्य असतात, हळव्या असतात ; त्यात फारसे सामंजस्य आणि वैचारिक जाणिवा प्रबळ नसतात. अशा वेळी लोकशाही, देश- देशातील भरकटलेली राजकीय व्यवस्था ही त्यांच्या आयुष्याशी फारशी निगडित नसते. असे असतांना राजकीय व्यवस्था किंवा राजकारणाशी निगडित माध्यमे युवक-युवतींना

भावणारी स्व संस्कृती, स्व धर्म, स्व जात यांविषयी स्फोटक जाणिवा निर्माण करण्यात अग्रेसर असल्याचे चित्र स्पष्ट आहे. आपला देश, आपले संविधान, भारत देशाची मूलगामी विचारसरणी किती वृद्धिंगत आहे याची साधी तोंड ओळख करू न देता त्यांमध्ये जातीय-धर्मीय द्वेषाचे बीज सहज पेरण्याचे कसब राजकारणाशी निगडित माध्यमांना अवगत आहे. मुळात नवं मतदार युवकांसाठी महाराष्ट्र कुठली दिशा ठरवणार याचे ध्येय आणि उद्दिष्टे अतिशय पुसट आहेत. नवं युवक मतदार हा जबर महत्वाकांक्षी आहे. जलद गतीने बदलणाऱ्या जगात तो अति जलद गतीने भरारी घेतो. नवं ध्येयांची आणि तंत्र युगाशी एकरूप होऊन नवं स्वप्नांत स्वतः ला सिद्ध करू पाहणारे या देशाचे तरुण-तरुणी प्रत्येक स्तरावर आपले कसब दाखवणारे आहेत. देश प्रेम आणि देश निष्ठा यांची व्याख्या आणि प्रतिके आज वैचारिक दृष्ट्या जाणीवपूर्वक राजकारणी बदलताना दिसून येतात. याचे गंभीर परिणाम आणि आव्हाने येत्या काळात तरुणांसाठी निर्माण होतील का ? हाही तितकाच महत्वाचा प्रश्न आहे.

**समारोप**

लोकशाही हा या देशाच्या संविधानिक जाणिवांचा आत्मा आहे. काही वर्षांपूर्वी पूर्वीचे पुणे विद्यापीठ व आत्ताचे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी एका प्रसिध्द वाहिनीवर 'आपले संविधान आपला आत्मसन्मान' या चर्चात्मक कार्यक्रमाची यशस्वी सुरुवात केली होती. कालांतराने तो कार्यक्रम बंद झाला. त्याची कारणे यंत्रणा आणि व्यवस्था यांमुळे जनतेसमोर अस्पष्ट आहेत. भविष्य तरुणांच्या हातात असते. युवकांचा सक्रिय सहभाग असल्याशिवाय लोकशाहीच्या सर्वोत्तम कार्यकारिणीला गती येऊ शकणार नाही. आज महाराष्ट्रातील राजकीय परिस्थिती पाहता त्यावर कुठलेच ठोस भाष्य आज तरी करणे गरजेचे वाटत नाही. सध्याची महाराष्ट्रीय राजकीय

स्तिथी पाहता महाराष्ट्रात राजकारण उरले आहे का ? असे म्हणणे रास्त वाटते. राजकीय वर्तुळात राजकीय नेत्यांची बदलती अनैतिक भाषा, एकमेकांवर टीका करत असतांना कुठलेही भान न ठेवणे, जाती आणि धर्म समुदायात तिढा निर्माण होतील असे भाष्य करणे. वारंवार आणि प्रतिदिनी वृत्तववाहिन्या आणि समाज माध्यमांवर पक्षांतर्गत हेवेदावे निर्माण करणे, देशाच्या आणि महाराष्ट्राच्या मूळ समस्या आणि सध्या परिस्थितीला जाणीवपूर्वक तिलांजली देऊन स्वार्थाचे राजकारण करणे हा वर्तमान कालीन महाराष्ट्र राजकारणातील स्फोटक प्रकरणामुळे हादरून जात असता महाराष्ट्राचे भवितव्य कोणाच्या हाती द्यावे ? राजकारण आता सोशल मीडियावरही अग्रेसर झाले आहे. आपली अर्वाच्य आणि बहुतांशी वैचारिक भूमिका न मांडता हेवेदावे मांडणारे राजकारणी सोशल मीडियावर व्हायरल होतांना दिसतात. रराजकारणाची पद्धत बदलते आहे, तिच्यात नैतिकतेत मलिनता आल्याचे सातत्याने दिसून येते. सामान्य जनता प्रत्यक्ष किंवा माध्यमांच्या द्वारे चालेला महाराष्ट्रातील राजकीय गोंधळ पाहतच आहे. मात्र जनेतेने परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन पारदर्शी विचार करणे तितकेच महत्वाचे आहे.

**संदर्भ ग्रंथ :**


१) राजकारण आणि नेतृत्वाची वाटचाल-राजकीय धुरिणत्व-वर्चस्व, प्रकाश पवार, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, पहिली आवृत्ती जानेवारी 2014 पृष्ठ क्र. ८

२) प्रगत सामाजिक मानसशास्त्र, प्रा. डॉ. मोहन निंबाळकर, के. एस. पब्लिकेशन पुणे, प्रथम आवृत्ती, जुलै २०१४, पृष्ठ क्र.२६

३) Political Theory, Chapter- Political Theory, R. C. Agarwal , S. Chand Publishing, New Delhi , 2018, page no. 389

४) Mahasanvad.in माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळांवर नवं युवक मतदार नोंदणी विषयी उपलब्ध माहिती.

**सहाय्यक ग्रंथ :**


१) सदर विषयाशी निगडित वृत्तपत्रांतील प्रकाशित लेखन.

२) भारतीय युवा आणि निवडणुकीय राजकारण, संपादन – संजय कुमार, अनुवाद – श्रीरंजन आवटे, SAGE – Bhasha Publications.

३) महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास इ.स. १८१८ ते १९६० , प्रा. गणेश राऊत, प्रा. ज्योती राऊत, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, चौथी आवृत्ती २००९, पूर्णमुद्रन मार्च २०११

४) भारतीय लोकशाही समोरील आव्हाने, संपादक प्राचार्य डॉ. बाळ कांबळे, डायमंड पब्लिकेशन्स, प्रथम आवृत्ती २०१२

५) राजकीय विचारपरणालीचा परिचय, प्रमोद तांबे,हरिदास जाधव, निराली प्रकाशन,पुणे, प्रथम आवृत्ती जानेवारी २०२१

६) भारतीय राजकारण आणि नेतृत्वाची वाटचाल, प्रकाश पवार, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, पुनर्मुद्रण जानेवारी २०२१


***

# बँकिंग क्षेत्रातील रोकडविरहीत व्यवहार: फायदे, आव्हाने व उपाययोजना

**डॉ. महादेव आसाराम रिठे**

अर्थशास्त्र विभाग प्रमुख, राजे छत्रपती कला महाविद्यालय,धामणगाव बढे, ता. मोताळा जिल्हा बुलडाणा.

**प्रास्ताविक:**

रोखविरहीत व्यवहार याचा अर्थ जास्तीत जास्त डिजीटल पध्दतीचा वापर आणि दैनंदिन व्यवहारामध्ये रोख रकमेचा कमीत कमी बापर करणे, असा होतो. दुसऱ्या शब्दामध्ये याचा अर्थ रोख रकमेचा तुटवडा किंवा कमी पुरवठा असा होत नाही, तर डिजीटल व्यवहारांचा जास्तीत जास्त उपयोग, जसे की, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, नेट बँकिंग, मोबाईल बैंकिग आणि मोबाईल फोनवरील अॅपद्वारे केलेले व्यवहार असा होतो.डॅनियल एट अल यांच्या मते, "रोखविरहीत व्यवहार अशी व्यवस्था आहे की, ज्यामध्ये प्रामुख्याने प्रत्यक्ष रोख रकमेच्या बदल्यात व्यवहार केले जात नाहीत."

भारत सरकारने ८ नोव्हेंबर २०१६ रोजी पाचशे आणि हजाराच्या जुन्या नोटा रद्द केल्या. २७ नोव्हेंबर २०१६ रोजी 'मन की बात' या कार्यक्रमामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रोखमुक्त समाजाची संकल्पना मांडली होती. निश्चलनीकरणाने भारतामध्ये रोखविरहीत व्यवहारांची मुहूर्तमेड रोवली गेली, रोखमुक्तीची संकल्पना म्हणजे काळा पैसा परत अर्थव्यवस्थेमध्ये आणण्याचा मार्ग आहे. डिजीटल व्यवहारांमध्ये रोख पैसा जवळ ठेवावा लागत नाही.

**रोकडविरहीत व्यवहारांचे फायदे :**

नेट बँकिंग व युनिफाईड पेमेंट इंटरफेस (युपीआय) यांचाही वापर रोकड विरहीत व्यवहारासाठी केला जातो.रोकडविरहीत साधनांचा वापर सोपा, सुरक्षित आणि किफायतशिर करणे जरुरीचे आहे. रोकडविरहीत व्यवहारांनी सरकार आणि जनतेस अनेक फायदे होतात.

१) पैसे देण्याची सोयीची पध्दती : कोणत्याही व्यवहारामध्ये रक्कम देण्याची पध्दती रोखविरहीत होत आहे. रोखविरहीत व्यवहार कमी उत्पन्न गटापासून सर्वांनाच फायद्याची आहे. त्यामुळे व्यवहार शुल्क कमी होतात. तसेच रोख रक्कम जवळ बाळगण्याची गरज राहत नाही.

२) कमी जोखीम : सायबर सुरक्षेमुळे ऑनलाईन पेमेंट सुरक्षित व जोखिम विरहीत आहेत. रोख रक्कम जवळ बाळगण्यामध्ये जोखीम असते.चोर दरोडेखोर यासारख्या  अपराध्यापासुन भयमुक्त राहता येते.

३) नोटा छापण्याच्या खर्चामध्ये कपात: रोखविरहीत व्यवहारांमुळे नोटा छापण्याचा खर्च कमी होतो. २०१५ मध्ये नोटांचे मुद्रण करण्यासाठी आर.बी.आय.ला २७ अब्ज रुपये खर्च आला, हा खर्च रोकडविरहीत व्यवहारांमुळे कमी होतो.

४) गुन्ह्यांच्या प्रमाणात घट : डिजीटल आर्थिक व्यवहारांमुळे नोटा जवळ बाळगण्याची गरज राहत नाही. त्यामुळे गुन्ह्यांच्या प्रमाणामध्ये घट होईल. याशिवाय दहशतवादाला अर्थपुरवठा, तस्करी, काळ्या पैशाची साठवणूक यासासख्या गुन्ह्यांचे प्रमाण कमी होईल.

५) अधिकोषण व्यवसायाला लाभ : डिजीटल व्यवहारांचा लाभ अधिकोषण प्रणालीला होतो. जेंव्हा लोक डिजीटल पध्दतीने व्यवहार करतात, त्यावेळी रोख रकमेची गरज कमी होते. अधिकोषांमध्ये मोठ्या प्रमाणात पैसे जमा राहील. त्यामुळे बचत आणि बचतीतून प्रत्ययाची निर्मिती होऊन भांडवलनिर्मिती होईल. त्यामुळे अर्थव्यवस्थेला चालना मिळेल.

६) पारदर्शक व्यवहार : रोखविरहीत व्यवहारांवर सरकार सहजरित्या लक्ष ठेवू शकते, त्यामुळे करचुकवेगिरी टाळता येऊन सरकारी महसूलामध्ये वाढ होईल.

७) पैशाच्या साठेबाजीवर नियंत्रण : रोखविरहीत व्यवहारांमुळे पैशाच्या साठेबाजीवर नियंत्रण येऊन जास्तीत जास्त पैसा बचत खात्यांमध्ये जमा राहील. बचतीमधून भांडवलनिर्मिती होऊन गुंतवणूकीला चालना मिळेल.

८) सामाजिक आणि सांस्कृतिक विकासाला चालना : रोकडविरहीत व्यवहारांमुळे सामाजिक आणि सांस्कृतिक विकासाला चालना मिळेल. भ्रष्टाचार आणि काळा पैसा, सामाजिक व सांस्कृतिक व्यवस्था निकामी करण्याचा प्रयत्न करतात. विवाह किंवा धार्मिक समारंभामध्ये खूप मोठ्या प्रमाणात पैसे खर्च करण्याची वृत्ती, धार्मिक संस्थांना देण्यात येणाऱ्या देणग्यामुळे सामाजिक होते. रोकडविरहीत अर्थ व्यवस्थेमुळे अनैतिक सामाजिक विकासाला प्रतिबंध होणार आहे.

९) बनावट नोटांना आळा : दहशतवादी आणि नक्षलवाद्यांद्वारे दारुगोळा खरेदी, शास्त्रास्त्रे खरेदी, दहशतवादी छावण्या चालविणे, प्रशिक्षण आणि दहशतवादी हल्ले घडविणे, इत्यादी कार्यासाठी मोठ्या प्रमाणावर उच्च मूल्याच्या बनावट नोटांचा वापर होतो. रोकडविरहीत व्यवहारांमुळे बनावट नोटांच्या उपयोगाला आळा बसणार आहे.

१०) अधिकोषणविषयक साक्षरतेत वाढ : रोकडविरहीत व्यवहारांमुळे जनतेच्या अधिकोषणविषयक साक्षरतेमध्ये वाढ होते. रोकडविरहीत अर्थव्यवस्थेमध्ये डिजीटल तंत्रज्ञानाच्या सहाय्याने व्यवहार होत असल्याने नवनविन तंत्रज्ञानाची माहिती अधिकोषाद्वारे ग्राहकांना करुन दिली जाते.

११) भ्रष्टाचाराला आळा : रोकडविरहीत अर्थव्यवस्थेमुळे भ्रष्टाचार आणि अयोग्य मार्गाने जमवलेला काळा पैसा उघडकीस येऊन भ्रष्टाचारमुक्त

समाज निर्मितीच्या दृष्टीने वाटचाल सुरु हाईल. देशामध्ये भ्रष्टाचारमुक्त प्रशासकिय आणि राजकीय पर्यावरण तयार होण्यास मदत होते.

उपरोक्त सर्व बाबीवरून लक्षात येते की, रोकड विरहीत व्यवहारामुळे समाज, व्यापारी, सरकार यांना सर्वांना लाभ होतो. रोकड विरहीत व्यवहार पार पाडण्यासाठी आर्थिक साक्षरतेची गरज असते. त्याच प्रमाणे सरकारी यंत्रणा कार्यक्षम असणे गरजेचे असते.

**रोकडविरहीत अर्थव्यवस्थेपुढील आव्हाणे :**

रोकड विरहीत अर्थ व्यवस्थेला चालना देण्यासाठी सरकार प्रयत्नशीलआहे, मात्र ग्रामिण भागातील अल्पसाक्षरतेचे प्रमाण आणि इंटरनेटच्या माध्यमाची अनुपलब्धता, किंवा या माध्यमासाठी लागणाऱ्या गोष्टींची उणिव, डिजीटल व्यवहारांसाठी त्रासदायक ठरत आहे. रोकड विरहीत अर्थ व्यवस्थेला अडथळा निर्माण करणाऱ्या घटकांना दूर करणे गरजेचे आहे.

१) चलन प्रभावी अर्थव्यवस्था : भारतीय अर्थव्यवस्था हि ग्रामीण अर्थव्यवस्था आहे. कृषी क्षेत्र किंवा प्राथमिक क्षेत्रावर सर्वात जास्त जनता आत्मनिर्भर आहे. या क्षेत्रात जीवन जगणारी जनता हि निरक्षर,अडाणी, अज्ञानी असते, त्यामुळे भारतासारख्या विकसनशिल देशांमध्ये फार मोठ्या प्रमाणात रोखीने व्यवहार करण्याची वृत्ती असते. भारतामध्ये चलनातील रकमेचे प्रमाण राष्ट्रीय उत्पन्नाच्या १३ टक्के आहे.

२)मुख्यत्वे रोख व्यवहार : ग्रामीण भागातील जनता जवळपास २५ टक्के व्यवहार रोखीने करतात. असंघटीत क्षेत्रातील खुप मोठ्या रोजगारांना दिले जाणारे वेतन किंवा मजूरी ही रोखीनेच दिली जाते. या करीता डिजीटल साक्षरतेची गरज नसते.

३)ए.टी.एम.चा वापर रोखतेसाठीच : ए.टी.एम. चा वापर प्रामुख्याने रोखतेची गरज भागविण्यासाठी केला जातो. इतर ऑनलाईन व्यवहार

टाळले जातात. कार्डच्या माध्यमातून व्यवहार करणाऱ्यांची संख्या ही शहरी आणि निमशहरी भागामध्ये मोठ्या प्रमाणात असून ग्रामीण भागामध्ये यांची कमतरता आहे.

४) विक्रींच्या मुलस्थानी साधनांची कमतरता : भारतामध्ये रिझर्व बँकेच्या २० जूलै २०१६ च्या अहवालानुसार १.४४ दशलक्ष ठिकाणी विक्रीच्या मुलस्थानी यंत्रणा अस्तित्वात आहे. ही यंत्रणा अनेक ठिकाणी अधिकोषांनी सुरु केली आहे. यातील बहुतेक यंत्रणा ही शहरी आणि निमशहरी भागामध्ये आहे. ग्रामीण भागामध्ये या यंत्रणेची कमतरता आहे.

५) ग्रामीण भागामध्ये इंटरनेटचा दुर्बल वापर : डिजीटल व्यवहारांसाठी इंटरनेट जोडणी आवश्यक आहे. ग्रामीण भागामध्ये इंटरनेट जोडण्यांचे अल्पप्रमाण आहे. त्यामुळे डिजीटल व्यवहारांना मर्यादा पडतात.

६) गरीबी आणि अशिक्षीतपणा : ग्रामीण भागामध्ये गरीबी आणि अशिक्षीतपणा यांचे प्रमाण खुप जास्त आहे. लोक गरीबीमुळे रोकडविरहीत अर्थव्यवस्थांना लागणारी यंत्रणा, जसे मोबाईल फोन किंवा इंटरनेट जोडणी खरेदी करु शकत नाही. तर अशिक्षितपणामुळे रोकडविरहीत व्यवहार करण्यासाठी यंत्रणा कशी कार्यरत करावी, हा प्रश्न निर्माण होत असल्याने रोकडविरहीत व्यवहाराला अडथळा निर्माण होतो.

७) सायबर गुन्ह्यांचा धोका : रोकडविरहीत अर्थव्यवस्थेतील डिजीटल व्यवहारांमध्ये सायबर गुन्ह्यांचा धोका असतो. सायबर गुन्हे टाळण्याचे उपाय आहेत, मात्र बऱ्याच वेळा तंत्रज्ञानामुळे नव्हे, तर केवळ वापरकर्त्याच्या निष्काळजीपणामुळे सायबर गुन्हे झाल्याचे दिसून येतात. सायबर सुरक्षेबाबत जनजागृती आणि कडक कायदे करणे महत्वाचे आहे.

सायबर गुन्ह्यांचा धोका,गरिबी आणि अशिक्षितपणा, ग्रामीण भागामध्ये इंटरनेटचा दुर्बल वापर, यासारख्या बाबींमुळे रोकड विरहीत अर्थ व्यवस्थेत व्यवहारांना अडथळे निर्माण होतात.

**रोकडविरहीत व्यवहारांसाठी उपाययोजना :**

रोकडविरहीत अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करीत आहे. रोकडविरहीत व्यवहार वाढावेत, पुढील उपाय सुचविता येतात.

१) सरकारद्वारे प्रयोगांची पुनरावृत्ती : रोख रकमेच्या स्वरुपामध्ये काळा पैसा जमा करण्यास प्रतिबंध घालण्यासाठी सरकारने सातत्याने प्रयोग केले पाहीजे. त्याचप्रमाणे सोयीस्कर अंतराने त्याची पुनरावृत्ती केली पाहीजे. त्यामुळे लोकांमध्ये डिजीटल व्यवहार करण्यास तसेच जनतेला अधिकोषणविषयक सवयी लावण्यास प्रोत्साहन मिळेल.

२) डिजीटल प्रणालीद्वारे वेतनांचे शोधन : अनौपचारिक अर्थव्यवस्थेच्या आकारावर बंधने आणण्याची गरज आहे. अनौपचारीक क्षेत्रातील व्यवसाय, कंत्राटदार, जमिनदार तसेच इतर श्रीमंत आणि मध्यम कुटूंबाकडे काम करणाऱ्या कामगारांचे वेतन डिजीटल पध्दतीने झाले पाहीजे. कर्मचाऱ्यांना अधिकोषांमध्ये खाते उघडण्यास प्रोत्साहित केले पाहीजे आणि व्यवस्थापनाने त्यांना ई- ट्रान्झेंक्शन किंवा धनादेशाद्वारे वेतन दिले पाहीजे.

३) क्रेडिट कार्डस् वापरण्यास प्रोत्साहन : डिजीटल पेमेंट्सना जास्तीत जास्त प्रोत्साहन देण्यासाठी, शासनाने डेबिट कार्डस् आणि विशेष क्रेडिट कार्ड वापरावरील व्याजदरात कपात केली पाहीजे. दारिद्रयरेषेखालील कुटूंबासाठी कमी व्याज आकारणीमुळे डेबिट व क्रेडिट कार्ड वापरण्यासाठी प्रोत्साहन मिळेल.

४) शाखा विस्ताराची गरज : भारतातील ग्रामीण भागामध्ये अधिकोषांच्या शाखा विस्ताराची गरज आहे. भारतामध्ये प्रति एक लाख लोकसंख्येसाठी ०.०१ अधिकोष शाखा आहेत. जर्मनीमध्ये हेच प्रमाण २३० पटींनी जास्त आहे.

५) सुरक्षित डिजीटल व्यवहाराची व्यवस्था : डिजीटल अर्थव्यवस्थेच्या संवर्धनासाठी अत्यावश्यक घटकांपैकी एक म्हणजे सुरक्षित डिजीटल व्यवहार होय. डिजीटल गुन्हयांना प्रतिबंध घालण्यासाठी, आवश्यक कृती करण्याची गरज असून डिजीटल गुन्हयांमुळे सामान्य जनतेचा पैसा गेला तरी त्याला भरपाई दिली गेली पाहीजे.

६) डिजीटल बँकिंग व्यवस्थेचा प्रसार : ग्रामीण भागातील जनतेमध्ये डिजीटल बँकिंग व्यवस्थेचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी स्वयंसहाय्यता बचत गटांची मदत घेतली पाहीजे. त्याशिवाय या यंत्रणेचा प्रचार करण्यासाठी युथ क्लब, महिला मंडळे, पंचायती राज व्यवस्था इत्यादी ग्रामीण पायाभूत संस्थांना प्रोत्साहीत केले पाहीजे.

७) करांच्या विस्तारांची आवश्यकता : रोकडविरहीत व्यवहारांसाठी कराचे जाळे विस्तारीत करण्याची गरज आहे. सध्या प्रागतिक करप्रणालीचे अस्तित्व आहे. करांच्या संरचनेमध्ये बदल करणे गरजेचे आहे. कराच्या संरचनेमध्ये बदल केल्यास स्वयंरोजगार, लघुउद्योजक, व्यावसायीक इत्यादींना प्रोत्साहन मिळेल. कर भरण्याची प्रणाली सोपी असावी. कर विवरणपत्रे भरण्याची प्रक्रिया सुटसुटीत असावी, इतकेच नव्हे तर कोणतीही रक्कम भरतांना टी.डी. एस. कपातीच्या धोरणाला बंद केले पाहीजे.

८) राजकीय ईच्छाशक्तीची गरज : रोकडविरहीत अर्थव्यवस्था, निश्चलनीकरण किंवा देशामधील कोणत्याही आर्थिक सुधारणेच्या अंमलबजावणीसाठी सत्ताधारी आणि विरोधी पक्षांमध्ये राजकीय इच्छाशक्तीची गरज असते.

**रोखविरहीत अर्थव्यवस्थेसाठी सरकारद्वारे करण्यात आलेल्या उपाययोजनाः**

रोखविरहीत व्यवहारांना उत्तेजन देण्यासाठी शासनाद्वारे विविध उपाय करण्यात आलेले आहेत.

१) नशिबवान ग्राहक योजना: भारत सरकारद्वारे नशिबवान ग्राहक योजनेसाठी अनेक प्रोत्साहनपर बक्षिसांची घोषणा केली आहे. त्यामुळे डिजीटल व्यवहार करण्यासाठी ग्राहकांना प्रोत्साहन मिळणार आहे. रुपे कार्ड, यु.एस.एस.डी., यु.पी.आय. व आधार पेमेंट सिस्टिम यांचा वापर करण्यात येत आहे.

२) वित्तीय साक्षरता अभियान : वित्तीय साक्षरता अभियानांतर्गत जनतेला डिजीटल अर्थव्यवस्थेविषयी माहिती देण्यात येते. खाजगी संस्थांनी रोख रक्कम स्वीकारू नये.दुकाने,शोपिंग मॉल्स, कॅन्टीन किंवा इतर सेवांमध्ये रोकडविरहीत व्यवहारांचा आग्रह धरण्यात येत आहे. विद्यार्थी, शिक्षकांनी जनतेला डिजीटल व्यवहारांचे प्रशिक्षण देण्यास मनुष्यबळ विकास मंत्रालयाद्वारे सांगण्यात आले आहे.

३)भीम ॲप : भारतामध्ये ३० डिसेंबर २०१६ रोजी पंतप्रधानांनी भीम ॲप (भारत इंटरफेस फॉर मनी) हे इ-वॉलेट सुरु केले आहे. त्यामुळे बकिंगद्वारे ग्राह ऑनलाईन व्यवहारांमध्ये सुलभता येत आहे. आधार कार्डशी निगडीत चेकबक्सची मा असलेल्या या ॲपद्वारे बँक खात्यामधुन पैसे हस्तांतरीत करता येतात विक्रीची सूचना,

४) रुपे कार्ड : द नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडीयाने रुपे कार्ड जनधन योजनेमध्ये सुरु केले आहे. डेबिट आणि क्रेडिट कार्डचे रुपे कार्ड हे भारतीय रुप आहे. रुपे कार्ड तीन मार्गाने कार्य करते, यामध्ये ए.टी.एम., पी.ओ.एस. आणि ऑनलाईन व्यवहारांचा समावेश होतो. अल्प उत्पन्न गटातील लोकांना कॅशलेस व्यवहारांसाठी रुपे कार्ड उपयुक्त आहे.

५) आधार पेमेंट अॅप भारत सरकारने २५ डिसेंबर २०१६ रोजी आधार कार्डद्वारे संचालित पेमेंट अॅप सुरु केले आहे. हे अॅप खाते क्रमांक आणि आधार कार्ड क्रमांकाशी जोडले जाते. बायोमेट्रीक रीडरचा उपयोग आणि आधार क्रमांकाचा वापर करुन व्यवहारासाठी बँकेची निवड करण्यात येते.

**समारोप:**

रोकडविरहीत साधनांचा वापर सोपा, सुरक्षित आणि किफायतशिर करणे जरुरीचे आहे. रोकडविरहीत व्यवहारांनी सरकार आणि जनतेस अनेक फायदे होतात. रोकडविरहीत अर्थव्यवस्थेमुळे भ्रष्टाचार आणि अयोग्य मार्गाने जमवलेला काळा पैसा उघडकीस येऊन भ्रष्टाचारमुक्त समाज निर्मितीच्या दृष्टीने वाटचाल सुरु हाईल. देशामध्ये भ्रष्टाचारमुक्त प्रशासकिय आणि राजकीय पर्यावरण तयार होण्यास मदत होते.

ग्रामिण भागातील अल्पसाक्षरतेचे प्रमाण आणि इंटरनेटच्या माध्यमाची अनुपलब्धता, किंवा या माध्यमासाठी लागणाऱ्या गोष्टींची उणिव, डिजीटल व्यवहारांसाठी त्रासदायक ठरत आहे. रोकडविरहीत अर्थव्यवस्था, निश्चलनीकरण किंवा देशामधील कोणत्याही आर्थिक सुधारणेच्या अंमलबजावणीसाठी सत्ताधारी आणि विरोधी पक्षांमध्ये राजकीय इच्छाशक्तीची गरज असते. वित्तीय साक्षरता अभियानांतर्गत जनतेला डिजीटल अर्थव्यवस्थेविषयी माहिती देण्यात येते. खाजगी संस्थांनी रोख रक्कम स्वीकारू नये.दुकाने,शोपिंग मॉल्स, कॅन्टीन किंवा इतर सेवांमध्ये रोकडविरहीत व्यवहारांचा आग्रह धरण्यात येत आहे. विद्यार्थी, शिक्षकांनी जनतेला डिजीटल व्यवहारांचे प्रशिक्षण देण्यास मनुष्यबळ विकास मंत्रालयाद्वारे सांगण्यात आले आहे.

**संदर्भ:**

१. डॉ.बी.डी. कुळकर्णी, डॉ. एम. व्ही. डमढेरे (२००७), आंतरराट्रीय डायमंड पब्लिकेशन्, पुणे ३०.

२. पु.घ. हौजबाल, वि.शं. नाखे, प्र.दे. येरवडेकर (२००९) (माती आ बँकिंग महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित, पुणे ४११००१ १८
३. कै.डॉ.देसाई स.श्री.मु., डॉ. सौ. भालेराव निर्मल (२०११), भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन, शिवाजी नगर, पुणे ४११००५,
४. वंदना धर्माधिकारी (२०११), मैत्री बँकिंगशी, सकाळ प्रकाशन, पुणे ४११००२.
५. डॉ.एस.व्ही. ढमढेरे, डॉ. अरविंद शेलार (२०१४), आधुनिक बँक व्यवसाय, डायमंड पब्लिकेशन, पुणे ३०.
६. रंजन कोळंबे (२०१८), भारतीय अर्थव्यवस्था, भगीरथ प्रकाशन, पुणे.
७. त्रैमासिक अर्थसंवाद, मराठी अर्थशास्त्र परिषद, पुणे.

***

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जातीनिर्मुलन विषयक विचार

संशोधक

**प्रिती ताराचंद निकाळजे**

देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद

**डॉ. आर. एन. आलटे**

संशोधन मार्गदर्शक

सामजशास्त्र विभाग प्रमुख, स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मंठा जालना

---

**प्रस्तावना** :-

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक महान समाजशास्त्रज्ञ होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजव्यवस्थेचे प्राचीन काळातील सामाजिक जीवन अस्पृश्यता जातीवस्थेच्या विषयासंबंधीचे अतिशय वस्तुनिष्ठ पध्दतीने अध्ययन करुन यासंदर्भात अनेक महत्वपुर्ण ग्रंथ लिहिलेत त्याचप्रमाणे डॉ. आंबेडकरांनी संपूर्ण भारतीय समाज जीवनाचे सखोल अध्ययन केले व त्या संदर्भात महत्वपुर्ण समाजशास्त्रीय सिध्दांतही मांडलेत. भारतीय समाजशास्त्राच्या विकासात डॉ. आंबेडकरांचे योगदान अतिशय मौलीक अशाच स्वरुपाचे आहे.

डॉ. आंबेडकरांनी विद्यार्थी दशेत असतांनाच अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठात विद्यार्थी संघापुढे "भारतीय जाती, तीची घडण, उत्पत्ती आणि विकास यावर संशोधनपर निबंध सादर केला होता. या संदर्भात खैरमोडे असे म्हणतात की, "भिमरावांनी कास्ट इन इंडिया,

(हिंदुस्थानातील जाती त्यांची घटना उत्पत्ती आणि वाढ परिशिष्ट-1) हा निबंध तयार केला. कोलंबिया विद्यापीठातील समाजशास्त्रे प्रोफेसर डॉ. ए.ए. गोल्डन वीजर यांच्या ॲथॉपॉलॉजी सेमिनार पुढे (विद्यार्थी संघापुढे) दि. 09 म 1916हा निबंध वाचला.[1]

या निबंधात डॉ. आंबेडकरांची इंग्रजीभाषा शैली अतिशय उच्च दर्जाची होती. त्याच बरोबर विषय मांडण्याची मूलभूत पध्दतही उत्कृष्ट स्वरुपाची होती.

इ.स. 1936 साली डारॅ. आंबेडकरांनी लोहाराच्या जातपात तोडक मंडळाच्या वार्षिक परिषदेकरिता अध्यक्षीय भाषण लिहिले होते त्या भाषणात त्यांनी जातीव्यवस्था, जातीव्यवस्थेचे समाजावरील दुष्परिणाम आणि जाती व्यवस्थेचे निर्मुलन या बाबतचे समाजशास्त्रीय विश्लेषण केले होते परंतू हे भाषण जातपात तोडक मंडळाच्या सदस्यांना असह्य होईल म्हणून स्वागत समितीने परिषदच रद्द केली होती. परंतू तेच भाषण डॉ. आंबेडकरांनी "अनहिलेशन ऑफ कास्ट" या ग्रंथात प्रकाशित केले. या ग्रंथात डॉ. आंबेडकरांनी जातीव्यवस्थे विषयी मूलगामी व महत्वपूर्ण असे विचार मांडले आहेत.

भारतीय समाजाची उभारणी ही पूर्णत: विषमायुक्त अशा चातुवर्ण्य व जाती व्यवस्थेसारख्या समस्येवर आधारित अशी आहे.

भारतीय समाजात ही विषमता असल्याचे कारण म्हणजे वर्णव्यवस्था व जाती व्यवस्थेसारख्या समस्येचे त्याला समर्थन मिळालेले होते. या जातीव्यवस्थेमुळे विविध प्रकारच्या समस्या निर्माण झालेल्या होत्या. ज्याव्यव्स्थेत सामाजिक विषमतेचे समर्थन केले जाते त्या व्यवस्थेत सामाजिक विषमतेचे समर्थन केले जाते त्या व्यवस्थेत सामाजिक समता कशी असणार ? म्हणून डॉ. आंबेडकर म्हणतात की "जाती व्यवस्था ही सामाजिक समता बंधत्व आणि स्वातंत्र्याला घातक

आहे. म्हणून ती मानवी मूल्यांच्या विरोधी आहे. राष्ट्रीयत्वाच्या भावनेची जोपासून करण्यामध्ये जातिपध्दती अडथळा निर्माणस करते."[2]

जातीव्यवस्थेमुळे समाजात समाजात विधटनकारी प्रवृत्या निर्माण झाल्या आहेत. परंतू या विघटनकारी प्रवृत्त्याला आळा घालणारी कोणतीही प्रतिकार शक्ती हिंदुना निर्माण करता आली नाही. म्हणून जातीव्यवस्था संदर्भात डॉ. आंबेडकर म्हणतात की "जातीच्या पायावर तुम्ही काहीही बांधू शकत नाही तुम्ही राष्ट्राची उभारणी करु शकत नाही. तुम्ही नितीमत्ते उभारणी करु शकत नाही. जातीच्या पायावर तुम्ही जे काही बांधाल ते कोसळून पडेल आणि एकसंघ कधीच निर्माण होणार नाही.[3]

डॉ. आंबेडकरांनी जातीव्यवस्थेचे दुष्परिणाम समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून विश्लेषण करुन जातीय व्यस्थेचे निर्मुलन करण्याबाबत अतिशय मूलगामी वस्तुनिष्ठ विचार मांडले आहेत. त्याचा थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न या ठिकाणी करीत आहे.

जाती व्यवस्थे सारख्या दाहक समसया स्वत: डॉ. आंबेडकरांना कटू अनुभव आले होते. परदेशातील उच्च दर्जाच्या पदव्या घेऊन आलेल्या उच्च विद्या विभुषीत असतांना देखील डॉ. आंबेडकरांना जाती व्यवस्थेसारख्या समस्येतून जावे लागले होते. म्हणून खऱ्या अर्थाने जो व्यक्ती शोषित असतो तोच या समाजाची राष्ट्राची घटना मावतावादी मूल्यांच्या आधारावर तयार करीत असतो. डॉ. आंबेडकरांनी जातीव्यवस्थेचे उच्चाटन करण्या करिता मूलभूत व मुलगामी असे विचार मांडले. एवढेच नाही तर त्या विचारांना प्रत्यक्ष कृतीची जोड भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून दिली जातीभेद नष्ट करण्यासाठी "आंतर जातीय विविाह" सर्वात्तम व श्रेष्ठ उपाय आहे. असे डॉ. आंबेडकर मानतात म्हणून ते असे म्हणतात की, आंतरजातीय विवाह हाच यावर जालीम

उपाय आहे. या बद्दल माझी खात्री झाली आहे. बंधुभाव निर्माण करण्यास रक्त मिश्रण हाच एकमेव औषध आहे. आणि रक्त संबंधाची भावना पराकोटीस पाहोचल्यावाचून जातीनी निर्मलेलि फुटीरतेची भावना नष्ट होणार नाही. अहिंदू समाजापेक्षा हिंदूच्या सामाजिक जिवनात आंतरजातीय विवाहास सर्वाधिक महत्व असणे आवश्यक आहे. एक संघ समाजात विवाह ही आयुष्यातील सामान्य घटना होय. परंतु जो समाज विखुरलेला आहे. विभांगलेला आहे. त्या समाजात एकसंघ निर्मितीसाठी विवाह ही प्राथमिक गरज असते. जात नष्ट करण्याचा आंतरजातीय विवाह हाच एकमेव उपाय आहे "[4]

भारतीय समाजात जातीव्यवस्थेमुळे अस्पृश्यता भेदाभेद विषमता यासारख्या समस्या निर्माण झाल्या तरी सुध्दा हिंदू लोक जातीच्या निमयांचे  पालन करतात. याचे कारण म्हणजे जातीव्यवस्थेला धर्माचे समर्थन प्राप्त झालेले आहे म्हणून डॉ. आंबेडकर असे म्हणतात की, "हिंदु हे जातीभेद पाळतात ते बुध्दीहीन व अमानुश आहेत म्हणून नव्हे तर ते अतिशय धर्मपरायण असल्यामुळेच जातीभेद पाळतात. जातीभेद पाळण्यात लोक चुकतात असे नाही माझ्या मते त्यांच्या मनात जाती यवृत्ती रुजविणारा धर्म हाच याला जबाबदार आहे आणि हे जर खरे आहे तर तुम्हाला हे मान्य करायला हवे की, खरे शत्रु जाती भेद  पाळणरे नसून जातीभेद पाळावयास शिकविणारी शास्त्रे आहे.[5]

धर्मानेच जातीव्यवस्थेची संकल्पना लोकांच्या मनावर बिंबविलेली आहे. जातीव्यव्स्थेसे धर्माचे समर्थन असल्यामुळे जातीभेद पाळला जातो म्हणून मुळातच धर्मावरील लोकांची श्रध्दा नष्ट केली पाहिजे. तरच लोक जातीभेद पाळणार नाहीत. या संदर्भात डॉ. आंबेडकर असे म्हणतात की, "शास्त्राच्या जोखडातून प्रत्येक स्त्री पुरूषास मुक्त करा शास्त्रांनी त्यांच्या मनावर केलेल्या दुषीत संस्कारांना प्रथम स्वच्छ धुवून काढा म्हणजेच मग

पहा ते स्वत:हाच सहभोजन अथवा आंतर जातीय  विवाह करतात की नाही.[6]

म्हणजेच जातीभेद पाळावयांस जी धर्मशास्त्रे आहेत व ज्या धर्माने जातीभेदास पावित्र्याचा आधार दिलेला आहे आणि जातीभेदाची पावित्र्याची जनमानसात पसरलेली आहे ती भावना प्रथम नष्ट करायला पाहिजे. असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. या संदर्भातते म्हणतात की, "जातींना दैव आधार आहे म्हणून जातींना चिकटलेली पावित्र्ये व आधी दैवीक उपपत्ती तुम्हाला प्रथम नष्ट करायला पाहिजे. वेद व शास्त्रे यांचे अधिपत्य प्रथम तुम्ही उध्दवस्त करायला पाहिजे.[7]

अशा प्रकारे आंबेडकरांनी जाती निर्मुलनाच्या संदर्भात मुळ व मुलभूत स्वरुपाचे उपाय सुचविलेले आहे. जातीविच्छेद म्हणजेंच मनोवृत्तीतील परिवर्तन होय हे परिवर्तन डॉ. आंबेडकरांनी वर सुचविलेल्या जाती निर्मलनाच्या उपायाशिवाय होता येणे शक्य नाही. शेवटी जातीनिर्मुलनाच्या संदर्भात डॉ. आंबेडकरांनी गौतम बुध्द आणि गुरूनानक या  महापुरूषाच्या विचारांचे अनुकरण करण्यास सांगितलले आहे आणि ऐवढेच  नाही तर अस्पृश्यता व जातीभेद पाळणे कायद्याने गुन्हा ठरविलेला आहे. थोडक्यात सांगावयाचे  झाल्यास डॉ. आंबेडकरांनी जातीव्यवस्थेचे वस्तुनिष्ठ पध्दतीने अध्ययन करुन जातीव्यवस्थोच्या निर्मुलनाच्या संदर्भात ठोस असे उपाय सांगितलेले आहेत.

**संदर्भ सुची :-**

1. खैरमोडे चांगदेव भवानराव (1989) डॉ. भिमराव रामजी आंबेडकर "सुगावा प्रकाशन, पुणे व्दितीय आवृत्ती पान क्र. 74.
2. लोकराज्य अंक अंक आठवा, आगलावे, प्रदिप "डॉ. आंबेडकरांचे समशास्त्रीय चिंतन" माहिती व जनसंपर्क महासंचालनालय महाराष्ट्र शासन मुंबई पान क्र. 125.
3. कित्ता पान क्र. 125.

4. आंबेडकर बाबासाहेब "जाती संस्थेचे उच्चाटन राजप्रकाशन, अकोला, दुसरी आवृत्ती पान क्र. 64.
5. कित्ता पान क्र. 65.
6. कित्ता पान क्र. 66.
7. कित्ता पान क्र. 67.

***